ओंकार ट्रस्ट

कल्याणी

श्री समर्थ रामदास स्वामी विशेषांक २००८








॥ श्रीराम जयराम जय जय राम ॥

॥ श्रीराम जयराम जय जय राम ॥



गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा ।
मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ॥
नमू शारदा मूळ चत्वार वाचा ।
गमू पंथ आनंत या राघवाचा ॥

जगद्गुरु श्री तुकाराम महाराज यांच्या चारशेव्या जयंती निमित्त

॥ राम कृष्ण हरी ॥



गुरुचरणी ठेविति भाव । आपेआप भेटे देव ॥ १ ॥
म्हणुनि गुरुसी भजावे । रूप ध्यानासी आणावे ॥ २ ॥
देव गुरुपाशी आहे । वारंवार सांगू काये ॥ ३ ।
तुका म्हणे गुरुभजनी । देव भेटे जनी वनी ॥ ४ ॥

उज्वल भवितव्यासाठी

ओंकार ट्रस्ट

स्थापना २६ जुलै १९९१

'विसावा' अनिकेत सोसायटी नं. १,
बिबवेवाडी, पुणे – ४११ ०३७.
दूरध्वनी क्रमांक : २४२१ ००४७

॥ श्रीराम ॥

सप्रेम नमस्कार

श्री समर्थ रामदास स्वामी व स्वामी विवेकानंद आदि थोर सत्पुरुषांच्या शिकवणी व तत्वज्ञानापासून प्रेरित होऊन 'ओंकार ट्रस्ट' या संस्थेची स्थापना गुरुपौर्णिमा या शुभदिनी – दिनांक २६ जुलै १९९१ रोजी करण्यात आली. (रजि. क्र. इ. १५०५, दि. १०-१०-१९९१)

देणगीदारांना ८० ग अन्वये प्राप्तीकरांत सूट मिळते.

आमच्या न्यासाच्या उद्दिष्टाप्रमाणे – सामाजिक बांधिलकीस्तव विविध उपक्रम ''विनामूल्य'' राबविले जातात, त्यापैकी महत्वाचे काही उपक्रम पुढील प्रमाणे –

१) गुजरवाडी – निंबाळकरवाडी (कात्रजपासून पुढे ५ कि.मी. अंतरावर ग्रामीण भागात) येथे न्यासातर्फे मुले-मुलींसाठी संस्कार वर्ग घेण्यात येतो.

२)मांगडेवाडी (कात्रजपासून सुमारे ३ कि.मी.) येथे जिल्हा परिषद शाळेतील मुला-मुलींसाठी संस्कार वर्ग आयोजित केला जातो.

३) कर्वे स्त्री शिक्षण संस्था येथील इयत्ता आठवीतील निवासी मुलींसाठी (सुमारे १८० मुली) संस्कार वर्ग घेतला जातो.

४) डॉ. पारस शहा यांचे नेतृत्वाखाली आतापर्यंत निरनिराळ्या वर्षी आठ नेत्र चिकित्सा शिबिरे गरीब व गरजू व्यक्तींसाठी घेण्यात येवून गरजूंना औषधे व चष्मे मोफत देण्यात आली.

५) तसेच न्यासाने कॅन्सर चिकित्सा शिबीर – मांगडेवाडी येथे, मधुमेह चिकित्सा शिबीर – बिबवेवाडी पुणे येथे व सर्वसाधारण रोगनिदान शिबीर – गुजरवाडी-निंबाळकरवाडी येथे आयोजित केली आहेत.

६) उत्कृष्ट सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तिला अथवा संस्थेला ''वसुंधरा कृतज्ञता'' (न्यासाच्या संस्थापिकेच्या नांवाने) पुरस्कार गेली १२ वर्षे देण्यात येत आहे. या पुरस्काराचे स्वरुप मानपत्र, स्मृतिचिन्ह व रोख रक्कम रु.५०००/- असे आहे. पुरस्कार देण्यात आलेल्या व्यक्ति-संस्था – १) डॉ. स्वर्णलता भिशीकर-सोलापूर २) प्रा. डॉ. अशोक कामत-पुणे ३) समर्थ भक्त सुनीलजी चिंचोलकर-पुणे ४) द्वा. वा. केळकर – पुणे ५) डॉ. सुनीलकुमार लवटे – कोल्हापूर ६) सौ. सिंधूताई सपकाळ – ता. पुरंधर (जि. पुणे) ७) डॉ. पारस शहा – पुणे ८) श्री. श्रीकांत मुंदडा – पुणे ९) श्री. गिरीष यशवंत प्रभुणे – चिंचवड १०) मानव्य संस्था – (संस्थापिका – कै. विजयाताई लवाटे) पुणे ११) डॉ. राजा व सौ. वेणूताई दांडेकर – ता. दापोली (जि. रत्नागिरी) १२) आपल घर (संस्थापक – श्री. विजयजी व सौ. साधनाताई फळणिकर)

७) न्यासाने मराठी व इंग्रजी हस्ताक्षर सुधार प्रकल्प श्री. नानासाहेब लाभे, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली ६ वर्षांच्या कालावधीत सुमारे ३५ शाळांमधून

घेतला व त्याचा फायदा सुमारे १०,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना झाला.

८) न्यास वेळोवेळी आध्यात्म, संतविचार इ. करिता थोरामोठ्यांची प्रवचने / व्याख्याने आयोजित करते. समर्थ भक्त श्री. सुनीलजी चिंचोलकर यांची श्री. एकनाथ महाराज यांचे चिरंजीव काव्य या विषयावर ३ प्रवचने आयोजित करण्यात आली होती.

तसेच यावर्षी ''यांनी घडविला महाराष्ट्र'' या विषयांवर अधिकारी व्यक्तिंची व्याख्याने आयोजित केली होती.

क्रांतीकारक – श्री. निनाद बेडेकर

समाजसुधारक – डॉ. सदानंद मोरे

संतांचे कार्य – डॉ. यशवंत पाठक

याशिवाय डॉ. यशवंत पाठक, प्रमुख – ज्ञानदेव अध्यासन, पुणे विद्यापीठ, पुणे यांनी १) येणे वाग्यज्ञे तोषावे – श्री ज्ञानेश्वर महाराज २) एका जनार्दनी शरण – श्री एकनाथ महाराज ३) उत्कट भव्य तेचि घ्यावे – श्री समर्थ रामदास स्वामी या विषयांवर ३ दिवसांची प्रवचन माला गुंफली.

९) न्यास दरवर्षी खालील शिष्यवृत्त्या – पारितोषिके देत आहे –

१) हुशार व गरीब विद्यार्थीनीला उच्च शिक्षणासाठी रु. ५०००/– ची शिष्यवृत्ती कै. नलिनी विष्णू जोगळेकर यांचे नावाने, त्यांचे बंधु श्री. गजानन विष्णू जोगळेकर यांनी दिलेल्या देणगीतून देण्यांत येते.

२) श्रीमती मृणालिनी अशोक जोगळेकर यांनी त्यांचे पती कै. श्री. अशोक विष्णू जोगळेकर यांचे स्मरणार्थ दिलेल्या देणगीतून गुजरवाडी – निंबाळकरवाडी येथील एक विद्यार्थी व एक विद्यार्थीनीस प्रत्येकी रु. ७००/– ची शिष्यवृत्ती देण्यांत येते.

३) श्री. विष्णू काशिनाथ आठल्ये यांनी दिलेल्या देणगीतून शालांत परिक्षा, पुणे विभागांत संस्कृत व मराठी विषयांत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना कै. श्री. काशिनाथ लक्ष्मण आठल्ये व कै. सौ. विजया काशिनाथ आठल्ये या नावांने पारितोषिके देण्यांत येतात.

१०) ओंकार न्यास गेली १० वर्षे गरीब मुले–मुली दत्तक घेत असून त्यांचा पालन–पोषण, शिक्षण इ. खर्च करत आहे. त्यांचे निवासासाठी गुजरवाडी – निंबाळकरवाडी येथे रु. ६,००,०००/– खर्च करून १६०० चौरस फूट इमारत बांधकाम केले आहे. सध्या ६ मुले–मुली दत्तक घेतली आहेत. त्यांच्या व वाडीतील मुलांच्या विकासासाठी खालील कार्यक्रम राबविले जातात.

दररोज २ तास इंग्रजी व हिंदीचा वर्ग घेतला जातो व त्यालाही मुलांची उपस्थिती चांगली असते आणि त्यांना त्याचा छान उपयोग होत आहे.

संस्कार वर्गात नेहमीच्या उपक्रमाशिवाय गीतापाठ चालू केला आहे. गीता शिकविण्यास कसबा पेठ, पुणे येथून श्री. किशोर वैद्य सर विना मानधन नियमीत येतात. त्यांनी स्वत: मुलांसाठी पुस्तके, सीडी इ. सर्व साहित्य आणले आहे. त्यांच्या सुलभ रीतीने शिकविण्याच्या पद्धतीमुळे मुलांना सुद्धा गीतापाठाची गोडी लागली आहे.

याशिवाय विश्वस्त श्रीमती मालती निमोणकर यांनी यावर्षी नवीन उपक्रम चालू केला आहे. वाडीतील इयत्ता १०वी मध्ये असणाऱ्या काही मुलींना घरी अडचणी असतात, अभ्यासाचे वातावरण नसते, मार्गदर्शन करणारे कोणी नसते. श्रीमती निमोणकर अशा मुलींना न्यासाच्या वाडीतील जागेत अभ्यासाला बोलावून त्यांचेकडून योग्य रीतीने अभ्यास करून घेतात, त्यांच्या अडचणी समजावून घेऊन त्यांना आर्थिक व मानसिक आधार देतात. खरेतर मुलींना मनापासून शिकावयाचे असते परंतु घरातील वातावरण, अडचणी इ. मुळे त्या नापास होतात व नंतर शिक्षण बंद होते ह्यावर मात करण्याच्या दृष्टीने श्रीमती निमोणकर हा प्रयत्न करत आहेत.

१२) ओंकार न्यास दरवर्षी कल्याणी विशेषांक वेगवेगळ्या संतांवर प्रकाशित करत असते. आतापावेतो न्यासाने एकूण १७ अंक प्रकाशित केले आहेत. त्यातील काही संतांची नांवे अशी – श्री ज्ञानेश्वर महाराज, श्री गुरुदेव रानडे, श्री टेंबे स्वामी, श्री स्वरुपानंद, पावस, श्री स्वामी चिन्मयानंद, श्री गोंदवलेकर महाराज, श्री समर्थ रामदास स्वामी इ. यापैकी कल्याणींच्या २००० साली प्रकाशित झालेल्या स्वामी श्री स्वरुपानंद विशेषांकास मराठी वृत्तपत्र लेखक संघाचा उत्कृष्ट आध्यात्मिक अंक म्हणून पांडुरंग भाटकर स्मृति पुरस्कार मिळाला आहे.

न्यासाने प्रकाशित केलेल्या सर्व कल्याणी विशेषांकास साधक / वाचक यांचेकडून फारच उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. मागील कल्याणी विशेषांक एप्रिल २००८ मध्ये समर्थ रामदास स्वामी यांचेवर श्री. चंद्रशेखर महाराज आठवले (पंढरपूर) यांचे शुभहस्ते प्रकाशित करण्यांत आला असून पुढील कल्याणी विशेषांक आद्य श्री शंकराचार्य यांचेवर एप्रिल २००९ मध्ये प्रकाशित करण्यात येत आहे. तसेच समाजासाठी अतुलनीय कार्य केल्याबद्दल वसुंधरा पुरस्कार देण्यांत येणार आहे.

सुसंस्कृत समाज बनण्यासाठी बालांचे मन सुसंस्कृत होणे आवश्यक आहे. ट्रस्टच्या या कार्यांत समाजातील विविध स्तरांतून सक्रिय पाठिंबा व सहभाग मिळत आहे.

आपण आमच्या कार्यास

१) देणगी रुपाने २) वस्तु रुपाने

३) न्यासात कार्यरुपाने भाग घेऊन

मदत करु शकता.

उज्वल भवितव्यासाठी

ओंकार ट्रस्ट

(स्थापना २६ जुलै १९९१)

'विसावा' अनिकेत सोसायटी नं. १,
बिबवेवाडी,
पुणे - ४११ ०३७.
टेलिफोन क्रमांक - २४२१ ००४७
मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा १९५० अन्वये
नोंदणीकृत संस्था नोंदणी क्रमांक -
ई १५०५ दिनांक १० ऑक्टोबर १९९१
कलम ८० ग खाली आयकर सवलत

ओंकार ट्रस्ट २००८ चा "श्री समर्थ रामदास स्वामी" विशेषांक, संपादक श्रीमती रजनी गोपाळ काळे, ट्रस्टी यांनी प्रतिमा ऑफसेट, पुणे - २९. येथे छापून, श्री. भालचंद्र वा. सातवळेकर, ट्रस्टी, यांनी 'विसावा' अनिकेत सोसायटी क्र. १ बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७ येथे प्रकाशित केला.

टिप : (१) सदरचा विशेषांक फक्त खाजगी वितरणासाठी आहे.
(२) या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखनाशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

* मुखपृष्ठ संकल्पना *
श्री. अभय व सौ. अंजली पुरंदरे


* अक्षरजुळणी *
प्रतिमा ऑफसेट, पुणे - २९.

[redacted]

* प्रोसेसिंग *
चित्रभारती, प्रोसेसर, सदाशिव पेठ, पुणे.

* छपाई *
प्रतिमा ऑफसेट, पुणे-२९,
फोन नं. २५४६०२१६

वाटचाल २००७ - २००८



श्रीसमर्थरामदास स्वामी व स्वामी विवेकानंद आदि थोर सत्पुरुषांच्या शिकवणी व तत्त्वज्ञानापासून प्रेरित होऊन **'ओंकार ट्रस्ट'** या संस्थेची स्थापना गुरुपौर्णिमा दि. २६ जुलै १९९१ रोजी करण्यात आली. संस्था सार्वजनिक न्यास म्हणून नोंदविण्यात आली आहे. (रजि. क्र. इ. १५०५, दि. १०-१०-१९९१)

संस्थेचे मुख्य उद्दिष्टे –

१. संस्कार वर्ग

२. दवाखाना व प्रसुतिगृह

३. अध्यात्मिक जनजागरण.

ट्रस्टने **डॉ. पारस शहा** यांचे नेतृत्वाखाली **८ नेत्र चिकित्सा शिबीर** आयोजित केली असून गरजूंना मोफत चष्मे व औषधे देण्यात आली. दीनदयाळ हॉस्पिटल मार्फत एक **कॅन्सर चिकित्सा शिबीर** घेण्यात आले.

उत्कृष्ट, अतुलनीय सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तीला किंवा संस्थेला १९९७ पासून दर वर्षी **''वसुंधरा पुरस्कार''** देण्यात येतो. मराठी-इंग्रजी हस्ताक्षर सुधार प्रकल्प गेले सहा वर्षे **श्री. नानासाहेब लाभे** यांच्या मार्गदर्शनाखाली ३५ शाळांतून राबविण्यात आला. ओंकार न्यासाने १ मुलगा व २ मुली दत्तक घेतली असून त्यांच्याबरोबर महिला गुजरवाडी-निंबाळकरवाडी येथे रहात आहेत. त्यांच्या राहण्यासाठी रु. ६/- लाख खर्च करुन १६०० स्क्वे. फुटांचे घर बांधण्यात आले.

कल्याणीच्या २००० साली प्रकाशित झालेल्या **स्वामी स्वरुपानंद विशेषांकाला** मराठी वृत्तपत्र लेखक संघाचा उत्कृष्ट अध्यात्मिक अंक म्हणून **पांडुरंग भाटकर स्मृति पुरस्कार** मिळाला. इंजिनिअरिंग, मेडिकल किंवा आर्किटेक्टला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थीनीस **'कै. नलिनी विष्णू जोगळेकर'** या नावाची रु.५०००/- **ची शिष्यवृत्ती** गेली ८ वर्षे देण्यात येत आहे.

श्रीमती मृणालिनी अशोक जोगळेकर यांनी आपले पती **कै. श्री. अशोक विष्णू जोगळेकर** यांच्या स्मरणार्थ दिलेल्या देणगीतून एक मुलगा व एक मुलगी यांना दर वर्षी प्रत्येकी रु. ७००/- शिष्यवृत्ती देण्यात येत आहे.

कल्याणीच्या २००७ सालच्या **प.पू. गुरुदेव स्वामी चिन्मयानंद** विशेषांकाचे प्रकाशन **प. पू. तेजोमयानंदजी** यांचे शुभहस्ते दिनांक २१ एप्रिल २००७ रोजी करण्यात आले.

याचवेळी **डॉ. राजा दांडेकर व सौ.रेणूताई दांडेकर**, दापोली यांना **'वसुंधरा कृतज्ञता पुरस्कारा'** ने सन्मानित करण्यात आले.

ट्रस्टने राबविलेले काही उपक्रम पुढीलप्रमाणे :

१. मांगडेवाडी, कर्वे स्त्री शिक्षण संस्था निवासी मुलींसाठी **संस्कार वर्ग** घेण्यात आले.

२. स.भ. श्री सुनिलजी चिंचोलकर यांची अध्यात्मावर प्रवचने आयोजित केली होती.

३. सौ. साधनाताई लेले, कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या निवासी मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी पंचकोश विकसन या संकल्पनेवर आधारित प्रकल्प शिकवितात.


४. श्री रमेश रावेतकर यांचा भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला .

५. समर्थ रामदास स्वामी यांच्या ४००व्या जयंती निमित्त मनाचे श्लोक, रामरक्षा, भिमरुपी या स्पर्धा कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत आयोजित केल्या. न्यास व सौ. संगीता गाडगीळ यांचे संयुक्त विद्यमाने स्पर्धा घेण्यात आल्या. एकूण १४२ मुलींनी भाग घेतला.

६. संस्कार वर्गाचे ठिकाणी वक्तृत्व, निबंध, चित्रकला व मैदानी खेळाच्या स्पर्धा घेण्यात येतात.

ओंकार न्यासाने प्रकाशित केलेल्या आतापर्यंतच्या विशेषांकास साधक/ वाचक यांकडून फारच उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.

- सुसंस्कृत समाज बनण्यासाठी बालांचे मन सुसंस्कृत होणे आवश्यक आहे. ट्रस्टच्या या कार्यात समाजातील विविध स्तरांतून सक्रिय पाठिंबा व सहभाग मिळत आहे.



क्रिया करून करवावी । बहुतांकरवीं ॥

दूरध्वनि - २५४४६९५०

श्री समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड, संचालित

'पत्रद्वारा दासबोध अभ्यास' उपक्रम

"रघुनंदन", पटवर्धन बाग,
एरंडवणे, पुणे ४११ ००४.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

दिनांक - ३१-१-२००८

श्री. भा.वा. सातवळेकर यांसी,

सादर न. वि. वि.

''**कल्याणी**'' नियतकालिकाचा यावर्षी ''श्री समर्थ रामदास'' विशेषांक प्रसिद्ध होणार आहे हे समजून अतिशय आनंद वाटला. त्या अंकासाठी माझ्याकडून 'संदेशाची' अपेक्षा आपण व्यक्त केलीत. संदेश पाठविण्याइतकी माझी पात्रता नाही पण काही विचार मनात आले ते लिहीत आहे.

श्रीसमर्थांच्या महानिर्वाणानंतर दोन शतके महाराष्ट्राला त्यांच्या कार्याची जणू विस्मृती झाली होती; पण धुळ्याचे स. भ. (कै.) शंकरराव देव यांनी श्रीसमर्थांचे वाङ्मय व चरित्र प्रसिद्ध करून नवजागृती निर्माण केली. प्रारंभी ते व्याख्यानातून म्हणत असत की, '' श्रीसमर्थांचे जीवन म्हणजेच राष्ट्राचे जीवन ! त्यांचे विस्मरण म्हणजे राष्ट्राचे मरण''!! पण पुढे कै. देव यांचा अभ्यास वाढत गेला त्यावेळी श्रीसमर्थावतारच्या ग्रंथांच्या १ ल्या खंडात त्यानी असे लिहिले ''श्री शिव-समर्थ यांच्या जीवनाचे स्मरण म्हणजेच राष्ट्राचे जीवन! त्या उभयतांचे विस्मरण म्हणजे राष्ट्रांचे मरण'' (पृष्ठांक २७२ वरील मजकूर आपण पहावा.)

दासबोधाच्या प्रसार कार्याचे निमित्ताने गेल्या ३५-४० वर्षात मला जो अनुभव महाराष्ट्रात गावोगावी गेल्यावर आला त्यावरून कै. शंकरराव देवांच्या वरील विधानात आणखी एका महान् संताच्या नावाची भर घालावीशी वाटते. ''श्री शिवराय, श्री समर्थ आणि श्री तुकाराम महाराज यांची स्मृती म्हणजेच राष्ट्राचे जीवन.'' इतके तुकाराम महाराजांचे कार्य स्मरणीय आहे. त्यांची चतुर्थ जन्मशताब्दी २००८ मध्येच साजरी होत आहे.

'कल्याणी' चा १९९६ चा संत तुकाराम विशेषांक वाचकांनी मुद्दाम वाचावा. वारकरी व धारकरी संप्रदायाचे संमेलन घडविणारे हे वर्ष आहे.

कै. वसुंधरा दिदींची आम्हांला नेहमी आठवण येते. त्यांचेच कार्य 'ओंकार ट्रस्ट' करीत आहे. वयपरत्वे माझ्या हातून कोणतेच कार्य होऊ शकत नाही. पण कै. दिदींच्याचकडून श्री सातवळेकर यांचा निरोप आला असे समजून वरील विचार व्यक्त केले आहेत. ते स्वीकारार्ह वाटतील अशी आशा आहे.

आपला स्नेहांकित.

[redacted]

॥ श्रीराम ॥

संपादकीय .....

ज्या ज्या वेळी समाजामध्ये नितीतत्त्वांचा ऱ्हास होऊन संस्कृतीची पायमल्ली होत आहे अशी परिस्थिती निर्माण झाली त्या त्या वेळी समाज जागृतीचे कार्य करणेसाठी वेगवेगळ्या संप्रदायामध्ये ईश्वरी प्रेरणेनुसार सत् पुरूषांनी अवतार धारण केलेले आहेत. अशा अवतारी महापुरूषांच्या परंपरेमधील प्रखर तेजस्वी आणि दैदिप्यमान तारा म्हणून जर कोणाचे नांव घ्यायचे झाले तर श्रीसमर्थ रामदास स्वामी यांचेच चित्र डोळ्यासमोर उभे राहते. शुकमुनींच्या सारखे प्रखर वैराग्य, वशिष्ठ मुनींच्या सारखे आत्मज्ञान आणि कवि वाल्मिकींच्या सारखे कवित्व असे वर्णन केले जाणारे श्री समर्थ रामदास स्वामी म्हणजे ''ओंकार न्यासा''चे आराध्य दैवतच आहे. त्यांच्याच शिकवणूकीतून ''सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयांचे । परंतु तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहीजे'' ॥ या त्यांच्या उक्ती प्रमाणे ''ओंकार न्यासाची'' स्थापना झाली आहे. त्यामुळे त्यांच्या चतुःजन्म शताब्दीच्या निमित्त्याने 'कल्याणीचे'' हे १७ वे साहित्य पुष्प राष्ट्रगुरूपदी पोचलेल्या श्री समर्थांचे चरणी समर्पित करताना न्यासाला परमानंद होत आहे. 'अत्तर गुलाब पुष्पाप्रमाणे मोहक असलेला आणि विद्वत् जनांच्या सिद्ध हस्त लेखणीतून सुगंधित झालेला हा अंक आमच्या वाचकांना निश्चितच आवडेल'.

बारा वर्षाच्या तपसाधनेनंतर केलेल्या भारत भ्रमणामध्ये निदर्शनास आलेली समाजाची विदीर्ण अवस्था पाहून त्यांचे हृदय कळवळले. ''बुडती हे जन, न देखवे डोळा । म्हणून कळवळा येतो आम्हा ॥ श्री तुकाराम महाराजांच्या या ओवी प्रमाणे त्यांची अवस्था झाली. त्यांना स्वस्थ बसवेना. विवेक गमावून बसलेल्या व दिशाहीन झालेल्या समाजाला ''आत्मज्ञान हे नरजन्माचे सार्थक आहे'' हा विचार पचणारा नाही हे ओळखून त्यांनी जन जागरण सुरू केले. समाज संघटीत करून अन्यायाविरूद्ध प्रतिकार करण्यासाठी समाजाची अस्मिता जागवली, स्वधर्माचे स्फुलिंग चेतवले आणि प्रपंचातील कर्तव्ये पार पाडून परमार्थ कसा साधायचा याचे धडे दिले.

श्री तुकाराम महाराज व श्री समर्थ हे दोघे समकालीन सत् पुरूष - श्री तुकाराम महाराजांचे पण हे चतुःजन्म शताब्दी वर्ष आहे. दोघांचे कार्य पण एकच. एकाने लेखणी सरसावून अभंगाद्वारे जन जागृती केली तर दुसऱ्याने दंड थोपटून बलोपासनेचे व एकजुटीचे महत्त्व स्वधर्म रक्षणासाठी कसे आवश्यक आहे हे सांगितले.

या दोन्ही नित्यमुक्त सत् पुरूषांच्या चरणी नतमस्तक होऊन त्यांना विनम्र अभिवादन.

आमच्या अंकाचा दर्जा उंचावणारे विचारवंत लेखक ही तर आमची शान असून जमेची बाजू आहे. त्यांचा कृपाहस्त आमच्या मस्तकावर असाच राहील याची आम्हाला खात्री आहे.

त्याचप्रमाणे अंक काढणेसाठी आर्थिक सहाय्य करणारे जाहीरातदार आणि हस्त परहस्ते मदत करणारे हितचिंतक या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

जय जय रघुवीर समर्थ


- रजनी काळे



अनुक्रमणिका




- कविता -



॥ श्रीराम जयराम जयजयराम ॥ ॐ॥

“ कल्याणानां निधानं कलिमलमथनं पावनं पावनानाम्
पाथेयं यन्मुमुक्षो: सपदि परपदप्राप्तये प्रस्थितस्य।
विश्रामस्थानमेकं कविवरवचसां जीवनम् सज्जनानां
बीजं धर्मद्रुमस्य प्रभवतु भवतां भूतये रामनाम॥ ”



ॐ श्री समर्थ रामदास स्वामी प्रतिमांकित

“ श्रीरामनाम जपयंत्र ”

यंत्र संकल्पना, निर्मिती व हस्ताक्षर

वसंत गोडबोले
२०४, शनिवार पेठ (नेनेघाट), पुणे- ४११०३०


- श्रद्धांजली -




मोठ्या व्यथित अंतःकरणाने आम्ही नमूद करीत आहोत की, श्रीमती. कमलाबाई वासुदेव सातवळेकर तथा आमच्या सर्वांच्या मावशी यांना शुक्रवार दि. २६.१०.२००७ रोजी वयाच्या ९१ वर्षी देवाज्ञा झाली.

ओंकार न्यासाच्या स्थापनेत त्यांचा सिंहाचा वाटा होता. एक उद्दिष्ट समोर ठेवल्यावर ते साकार करण्यासाठी कसे परीश्रम घ्यावे हे म्हणजे मावशींचे उत्तम उदाहरण आहे. घरोघरी लोकांना कार्याचे महत्त्व पटवून देउन त्यांनी त्याकाळात न्यासासाठी रु. ७५,०००/- एवढी भरभक्कम पूंजी ज़मा करून ओंकार न्यासाला आर्थिक दृष्ट्या बळकट केले. त्याचा फायदा आज सुद्धा होत आहे. शेवटपर्यंत त्या कार्यरत होत्या. न्यासाच्या दैनंदीन कारभारात मोठ्या उत्साहाने त्या भाग घेत असत. त्या आध्यात्मिक व पुरोगामी वृत्तीच्या अतीशय टापटीप, रसीकवृत्तीच्या कवियत्री होत्या. कोणालाही विन्मुख न पाठवणे हे त्याचे व्रतच होते. अशा चतुरस्त्र बहुगुणी व्यक्तीमत्वाला आम्ही मुकलो आहोत. त्यांच्या आशिर्वादाच्या पाठबळावर आम्ही निश्चितच प्रगतीपथावर प्रवास करू.


प्रेम आदर कृतज्ञतापूर्वक आम्ही सर्व विश्वस्त त्यांना श्रंद्धाजली अर्पण करतो. त्यांना शांती लाभो. ही ईश्वरचरणी प्रार्थना.




समर्थांचे जन्मस्थान-ठोसरांचे घर



ठोसरांचे घरातील देव - श्रीराम पंचायतन




समर्थ दंडात बांधत असत तो मारुती



श्री हनुमान मंदिर जांब



श्रीसमर्थांचे विश्रांती स्थान(टाकळी)




श्रीसमर्थांचे हस्ताक्षर




श्रीसमर्थांनी स्थापिलेला
पहिला गोमयाचा मारुती (टाकळी)






चाफळचे श्रीराम मंदिर व या मंदिरातील श्रीराम मूर्ती



श्री सज्जनगड येथील मंदिरातील समर्थांची
चिंतनाची जागा



श्री सज्जनगड येथील समर्थांचे शेजघर



श्रीसमर्थ मठ चाफळ येथील वृंदावन
(यात समर्थांचा अस्थिकलश ठेवला होता.)



श्रीसमर्थांची समाधी

समर्थांचे राजकारण



- स्वामी गोविंददेवगिरी महाराज

एम. ए. [illegible] विद्यापीठ काशी [illegible] भारतीय [illegible] प्रवचन [illegible] ठिकाणी [illegible]

भारतीय संस्कृतीत धर्माचा विचार 'यतो अभ्युदय निःश्रेयस सिद्धीः' असा केला आहे. अभ्युदय अर्थात ऐहिक उन्नती व निःश्रेयस अर्थात पारमार्थिक कल्याण ह्या दोन्ही अंगांचा त्यात समान विचार आहे. ज्याप्रमाणे एखाद्या साधकाला आत्मसाक्षात्काराचा योगानुभव घेण्यासाठी आपल्या देहाचीही काळजी ज्याप्रमाणे घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे संपूर्ण समाजाचे परमकल्याण साधायचे असेल तर या संपूर्ण समाजाच्या ऐहिक उन्नतीची काळजी घेणेही तितकेच आवश्यक आहे, असा मूळ भारतीय विचार आहे.

म्हणूनच 'धर्मसंस्थापना' ह्या शब्दाचा अर्थ सांगताना माऊलींनी म्हटले आहे, 'मी दैत्यांची कुळे नाशी। साधुचा सन्मान गिवसी । धर्माची नीतीशी शेस भरी।' अर्थात धर्माचा नीतीशी संबंध जोडणे आणि ह्या ठिकाणी 'नीती' ह्या शब्दाचा अर्थ राजनीती हा आहे. धर्माचा राजनीतीशी जोड केल्याशिवाय अभ्युदय साधून प्रजेचे कल्याण साधता येत नाही. पण हे करायचे असेल तर 'मी विवेकदीप उजळी' असे भगवंताने सांगितले आहे. अर्थात धर्माचा राजनीतीशी जोड करून उत्थान साधण्यापूर्वी लोकांना उत्तम विचार देऊन प्रेरित करावे लागते. हेच कार्य समर्थांनी केले आहे. समर्थांचे राजकारण हे या धर्मसंस्थापनेच्या बृहद् संकल्पनेचे एक अंग आहे.

'मुख्य हरिकथा निरूपण । दुसरे ते राजकारण । तिसरे ते सावधपण । सर्व विषयी । चौथा अत्यंत साक्षेप । फेडावे नाना आक्षेप । समर्थांनी दिलेल्या ह्या चतुःसुत्रीचा मतितार्थही 'धर्मसंस्थापना' हाच आहे. पहिले सूत्र मुख्य हरिकथा निरूपण हे धर्मातील निश्रेयसाचा , मोक्षाचा विचार आहे तर पुढे येणारे राजकारण हा अभ्युदयाचा विचार आहे. समर्थांना 'देवकारण' व 'राजकारण' यांच्या एकत्रीकरणाने होणारे धर्मकारण अपेक्षित आहे आणि ह्या एकत्रित धर्मकारणाचे सार,'तिसरे ते सावधपण' या चरणात येते. महाभारतात यक्षाने धर्मराजाला प्रश्न विचारला, 'धर्मराजा, संपूर्ण धर्माचे सार एका शब्दात सांग-'' धर्मराजाने उत्तर दिले. 'दाक्षम् एकपदं धर्मं' अर्थात 'सावधानता' जो सावधान आहे तोच देवकारण करू शकेल जो सावधान आहे तोच राजकारण करू शकेल. चौथा अत्यंत साक्षेप / ह्या चरणातून समर्थ धर्माचा गाभा असलेला 'प्रयत्नवाद' विशद करतात. म्हणून 'धर्मसंस्थापनेसाठी असलेली ही चतुःसुत्री फार महत्त्वाची ठरते.

समर्थांचा अवतार 'धर्मसंस्थापनेसाठी' होता. त्यांनी केलेला सारा आटापीटा हा धर्मसंस्थापनेसाठीच होता व धर्मातील अभ्युदयाचे जे अंग आहे त्यासाठी जे काही करावे लागते त्या साऱ्याचा अंतर्भाव समर्थांच्या 'राजकारण' या शब्दात येतो. वेगवेगळे विचारवंत समर्थांच्या राजकारण या शब्दाचे चातुर्य, समाजकारण, प्रपंच विज्ञान, राष्ट्रकारण असे अर्थ सुचवितात. हे पूर्ण चूक नाही, कारण या प्रत्येक शब्दाचा अंतर्भाव समर्थांच्या राजकारणात झालेलाच आहे. तथापि हे शब्द एकटे असताना समर्थांच्या राजकारण या संकल्पनेचा व्यापक अर्थ अभिव्यक्त करायला असमर्थ ठरतात. समर्थांना राजकारणाने जीवनाचे उत्थान अपेक्षित आहे. त्यामुळे उत्तम जगण्यासाठी, व्यक्तीमत्वाच्या विकासासाठी, वैचारिक प्रबोधनासाठी, सामाजिक संघटनेसाठी, राष्ट्राच्या उभारणीसाठी, संक्षेपाने, धर्मसंस्थापनेसाठी जे जे काही करावे लागते त्यासाठीचे कौशल्य संपादन व व्यवस्थापन समर्थांनी राजकारण या संज्ञेने मांडले आहे.

सामाजिक उत्थानात 'सर्वे धर्माः राजधर्मः प्रधानः। ' या न्यायाने राजनीती प्रमुख भूमिका बजावते. 'राजा कालस्य कारणम्'। राजाचे एकंदर व्यक्तीत्व हे समाजाला प्रभावित करीत असते. उत्तम राजकारणामुळे समाजजीवन सुधारते तर राजकीय अनागोंदीने ते गढूळते. हे सर्व जाणून तसेच बालपणापासून अनुभवून समर्थांनी अभ्युदयासाठी राजकारणाचा विचार मांडला. समर्थ पक्के जाणून होते की दैन्यावस्थेत जगत असणारा समाज कधीही अभ्युदयाखेरीज, स्थिरतेखेरीज निश्रेयसाची प्राप्ती करून घेऊ शकणार नाही. मनुष्याचा मोक्षाकडे कल तेव्हाच होईल जेव्हा त्याला अस्त्र नीट असल्याचे दिसेल. समर्थांचा समकालिन समाज हा म्लेंच्छांच्या सुलतानी संकटाने नाडलेला होता. म्लेंच्छांचे सात प्रकारे काफिरांवर अत्याचार सुरू होते. मंदिरांचा विध्वंस करणे ,मूर्ती फोडणे, गोहत्या करणे, महिलांचे अपहरण करून बलात्कार करणे, मोठ्या संख्येने धर्मांतरे करणे, काफिरांना लुटणे आणि त्यांची अमानुष कत्तल करणे. अशा नागवलेल्या समाजात धर्म बुडाला होता. निश्रेयसाकडे नेण्यापूर्वी समाजाला स्थिरता प्रदान करून ऐहिक उत्कर्ष साधणे अग्रक्रमाचे होते. व ह्या उत्थानासाठीचा सारा विचार समर्थांच्या राजकारण या संकल्पनेने व्यापला आहे. ह्या गांजलेल्या समाजाचे पुनरूत्थान करून त्याला स्थिरता व शांती देण्यासाठी, त्याचे साहस व आत्मविश्वास वृद्धिंगत करण्यासाठी, संस्कृतीला पोषक असणाऱ्या स्वसत्तेच्या स्थापनेसाठी समर्थांनी तीन प्रकारे राजकारण चेतवले. त्यांनी आशीर्वादात्मक राजकारण केले, त्यांनी राजकारणाकरिता अत्यंत महत्त्वाचा उपदेशही केला, त्यांनी अप्रत्यक्षरीतीने राजकारणात सहभागही घेतला.

हे सारे करण्याची प्रेरणा त्यांना कुठून मिळाली? याचा विचार करता एक प्रसंग आपल्याला शिखांच्या साहित्यात दिसतो. स्वजनांच्या रक्षणासाठी शस्त्रसज्ज व अश्वारूढ झालेल्या शीख धर्मगुरू हरपालसिंग (हरगोविंदसिंग) ह्यांच्या भेटीने समर्थ प्रभावित झाले होते. धर्माच्या रक्षणासाठी व धर्मातल्या लोकांच्या रक्षणासाठी ते अध्यात्माचा निरासक्त उपदेशक असूनसुद्धा खड्ग उचलून सैन्य उभारत म्लेंच्छांशी झुंजत होते. त्यांनी प्रसाद म्हणून दिलेल्या गुप्तीच्या रूपाने समर्थांनी जणू त्यांच्याकडून शस्त्र दीक्षाच घेतली.

आपल्या प्रवासात समर्थांनी ओळखले की जोपर्यंत ह्या मृतप्राय समाजात राजकीय आकांक्षा जन्म घेत नाही, सत्ताधिशांना आपण बदलत नाही, किंवा ह्या सत्ताधिशांना बदलून टाकू असा विश्वास व साहस या समाजास प्राप्त होत नाही तोपर्यंत समाजाचे परिवर्तन शक्य नाही. समर्थांना अपेक्षित असणाऱ्या परिवर्तनाचे चित्र त्यांनी रामराज्याच्या रूपाने समाजासमोर ठेवले. वाल्मिकीरामायणातील बालकांडतील सहावा सर्ग आणि समर्थांचे रामराज्याचे वर्णन हे अगदी जसेच्या तसे आहे. कोठेही अनावृष्टी नाही, अतिवृष्टी नाही, कोणीही गरीब नाही की अज्ञानी नाही, कुठेही रोगराई नाही, अतिशय सुंदर आश्रम

आहेत. मठ, मंदिरे आहेत, सगळीकडे उपासना सुरू आहे. सगळे लोक भगवंताच्या भक्तीत व धर्मनिष्ठ प्रपंचामध्ये रममाण झाले आहेत. सर्वांनी रंगून जावे असे आदर्श रामराज्याचे चित्र समर्थांनी रेखाटले व निराशेने खचलेल्या समाजाला प्रेरक अशी आशावादी दृष्टी दिली. आनंदवनभुवनीमध्ये समर्थ म्हणतात, 'बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान बळावले । अभक्तांचा क्षयो झाला । आनंदवन भुवनी । बुडाला औरंग्या पापी । म्लेंच्छ संहार जाहला । मोडिली मांडिली क्षेत्रे । आनंदवनभुवनी ॥

समर्थांनी हे चित्र पूर्ण साकार झाले आहे अशा स्वरूपातच रेखाटले व त्याने लोकांचा उद्दिष्ट प्राप्तीविषयी आत्मविश्वास वाढला व ते अधिक जोमाने कार्यप्रवृत्त झाले. 'म्लेंच्छ दुर्जन उदंड' असून त्यांच्या प्रतिकारासाठी अगदी स्पष्टपणे कार्यदिशा देणारे मार्गदर्शन केले. समर्थ म्हणतात, 'बहुत लोक मेळवावे । एक विचारे भरावे । कष्टे करून घसरावे । म्लेंच्छांवरी । कुठलीही राज्यक्रांती शस्त्राने आरंभ होत नाही. तिची बीजे अशा प्रेरक विचारांमध्ये, वाङ्मयामध्ये असतात. समर्थ हे अशा क्रांतीकारक राजनैतिक विचारांचे उद्‌गाते होते.

अशा उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी अतिशय समर्पक असे ज्याचे जीवन होते, ज्याने अनेक पिढ्यांच्या अंधःकारानंतर आपल्या अतुल पराक्रमाने रावणाचा पाडाव करून देवांना मुक्त केले, ऋषीमुनींचे दैन्य हरण केले त्या कोदंडधारी प्रभु श्रीरामाची आराध्य देवता म्हणून स्थापना केली. 'रक्षिता देव देवांचा । त्याच उत्साव मांडीला ।' केवळ रामभक्तीचा प्रसार करून थांबले नाहीत तर रघुनाथाचा गुण घ्यावा ' म्हणून आग्रह धरला. ज्या काळी विद्या विभुषित समाज, 'दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा ' म्हणत म्लेंच्छांची आराधना करीत होता, क्षत्रीयांचे शौर्य मुघलांचे गुलाम झाले होते, त्यांच्याशी सोयरीक करण्यात सरदार धन्यता मानत होते. सामान्यांना तर वालीच नव्हता. अशा विदारक परिस्थितीत अशीच परिस्थिती आपल्या कर्तृत्वाने व पराक्रमाने उलथून टाकून धर्मसंस्थापना करणाऱ्या श्रीरामाचा आदर्श समर्थांनी समाजमनावर ठसवला व लोकांना प्रयत्नवादाची प्रेरणा दिली. 'तसेच आपला सगळा पुरुषार्थ देवासाठी समर्पित करणाऱ्या हनुमंतांना त्यांनी आदर्श म्हणून ठेवले कारण राष्ट्रासाठी, देवासाठी,धर्मासाठी पूर्णतः समर्पित अशा पुरुषार्थी लोकांची त्या वेळी समाजाला अत्यंत गरज होती.

समर्थांनी आपल्या दासबोधातून व इतर वाङ्मयातून, विजयाचा, राजकारण परिवर्तनाचा, संघटनेच्या उभारणीचा उपदेश केला. समाज भयभीत व पराभूत मनस्थितीत असताना त्यात विजयाचे स्फुरण भरणारा व त्यांना एकत्रित येऊन कार्यप्रेरित करणारा जय जय रघुवीर समर्थ असा जय जयकाराचा महामंत्र दिला.

समर्थांनी हे केवळ सांगितलेच नाही तर अनेक समर्पित कार्यकर्ते निर्माण करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेसाठी एक भूमिका निर्माण केली. 'महाराष्ट्र हा एकच प्रदेश मला असा दिसतो की जिथे लोकांना स्वतः पेक्षा राष्ट्राचा विचार अधिक महत्त्वाचा वाटतो ' असे वॉरन हेस्टिंगने लिहून ठेवले आहे. यावरून आपल्याला समर्थांच्या कार्याचा परिणाम स्पष्ट दिसतो. छत्रपती शिवरायांनी आपल्या पराक्रमाने समाजासमोर जो आदर्श ठेवला होता त्याला पूरक व पोषक अशी समाजिक मानसिकता घडविण्यात समर्थांचा हात होता. समर्थांनी बोट धरून छत्रपतींना राजकारणाचे पाठ दिले नाहीत. पण त्यांच्या कार्यासाठी आवश्यक असा प्रेरित, धैर्यवान, सामर्थ्यवान व पूर्णतः समर्पित असा कार्यकर्ता मावळा त्यांनी उभा करण्यात मोठे योगदान दिले. स्वराज्य स्थापनेसाठी आवश्यक विचारांनी त्यांनी समाज भारून टाकला. छत्रपती शिवाजी महाराजांचे अनेक जवळचे नातेवाईक त्यांच्या विरुद्ध असतानाही स्वराज्य स्थापनेचे कार्य सफल होण्यासाठी आपल्या घरदारावर तुळशीपत्र ठेवून जीवाची बाजी लावणारे अनेक लोक समाजातून पुढे सातत्याने येत होते. अगदी छ. संभाजी महाराजांच्या निधानानंतर पंचवीस वर्षे जंग जंग पछाडूनही औरंगजेब यशस्वी होऊ शकला नाही कारण जनतेने त्याला झुंजवले होते. अशी समर्पित समाजाची जडण घडण ही वैचारिक प्रेरणेतून व उपासनेनेच होते. समर्थांनी तत्कालिन समाजाला ही वैचारिक प्रेरणा व उपासना दिली.

सर्व संसार असार आहे. माया आहे. त्याचा विचार करीत बसण्यापेक्षा आपण व्यक्तिगत उपासना करून आत्मसाक्षात्कार करून घ्यावा असा विचार समर्थांनी कधीही दिला नाही. काळाची पावले ओळखून 'बहुत लोक मेळवावे । एक विचारे भरावे । कष्टे करून घसरावे । म्लेंच्छांवरी ।' असा स्पष्ट कृती आराखडाच त्यांनी समाजास दिला.

समर्थांचा राजकारण विचार हा संघटनेचा विचार आहे. समर्थांचा राजकारण विचार हा व्यवस्थापनाचा विचार आहे. त्यांच्या राजकारण विचाराला अनेक प्रकारचे रंग आहेत. समाजाची धारण बदलणारे राष्ट्रकारण त्यात आहे. समाजमनात परिवर्तन करणे हा त्यांच्या राजकारणाच मूळ हेतू आहे.

समर्थांनी समाजाला विजयाची आकांक्षा, विजयाचा देव, निरंतर विजयी होणारा आदर्श, विजयाचा महामंत्र, व विजयाचा ग्रंथ दासबोध दिला. समर्थ हे छत्रपती शिवाजी महाराजांचे सद्‌गुरु होते. छ. शिवरायांसारखे, चाणाक्ष, दक्ष, धार्मिक, शुचिश्मंत, प्रभावी असे राष्ट्रोत्धारक नेतृत्व पुनः निर्माण करायचे असेल तर समर्थांचे साहित्यच जास्त उपयुक्त ठरेल. समर्थ हे केवळ छत्रपती शिवाजी महाराज या व्यक्तीचे गुरू नव्हते तर छत्रपती शिवाजी महाराज ह्या प्रवृत्तीचे गुरू होते.

'धीर धरा, धीर धरा तकवा । हडबडू गडबडू नका ।' असा आश्वासक विचार व 'जय जय रघुवीर समर्थ ' हा विजयाचा मंत्र सांगत समर्थांचे अनेक महंत गल्लीबोळातून हिंडत होते. त्यामुळे समाजमनावर अभ्युदयाचा, उत्थानाचा, महाराष्ट्र धर्माचा संस्कार उमटला. समर्थांनी केवळ प्रेरक वाङ्मय निर्माण केले नाही तर त्याच्या प्रसारासाठी त्यांनी महंत नावाची त्यागी, तपस्वी संस्था निर्माण केली. 'महंते महंत करावे । युक्ती बुद्धीने भरावे । जाणते करून विखुरावे । देशोदेशी । समर्थ विचारांचे हे उपदेष्टे वातावरण भारून टाकत होते.

धर्मासाठी मरावे । मरोनि अवघ्यास मारावे । मारता मारता घ्यावे । राज्य आपुले । ह्या विचारात स्वराज्य निर्मितीची आकांक्षा समोर ठेवताना मूळ प्रेरणा 'धर्म' आहे. धर्मासाठी त्यागाचे आवाहन त्यात आहे व धर्म संस्थापनेसाठी स्वराज्यनिर्मिती आहे. अशी स्वच्छ त्यागाची धारणा त्यांनी समाजात रूजविली. 'वन्हि तो चेतवावा रे, चेतविताचि चेततो' असा कार्यप्रेरक आशावाद दिला व अशा भारावलेल्या निस्पृह सज्जनांचा त्यांनी गड उभा केला.

त्यासाठी त्यांनी 'महाराष्ट्र धर्म' हा परवलीचा शब्द वापरला. 'सहिष्णु हिंदू धर्माचे जयिष्णू रूप म्हणजे महाराष्ट्र धर्म होय.' अशा प्रकारे समर्थांनी हिंदू धर्माला विजयाची झळाळी प्राप्त करून दिली. व ही उत्थानाची प्रेरणा राष्ट्रभर पसरावी म्हणून त्यांनी आसेतु हिमाचल मठांची स्थापना करून विजयाचा 'महाराष्ट्र धर्म वाढवावा' असा उपदेश केला

राष्ट्र उत्थानाचे अलौकिक कार्य उभारणारे समर्थ हे एकमेवाद्वितीय असे राष्ट्रगुरू आहेत.

(पुणे येथे ४००व्या जयंती निमित्त झालेल्या व्याख्यानाचा सारांश जन्मोत्सव चतुःशताब्दी समितीच्या सौजन्याने.)

- प.पू. किशोरजी व्यास,
तथा स्वामी गोविंदगिरी महाराज,
मानसर, विद्यापीठ रस्ता, पुणे

•••

शिवसमर्थ योग

- प्राचार्य. राम शेवाळकर



लोकमान्य टिळक [illegible]

छ.शिवाजी महाराज फार मोठे होते. समर्थ त्याला कारणीभूत ठरलेत असे मी म्हणणार नाही. एकाच वेळी उदयाला आलेले हे फार मोठे तेजस्वी ग्रहगोल होते. त्याचा लाभ त्या काळच्या महाराष्ट्राला झाला आणि म्हणून आज आपण शिल्लक राहिलो आहोत.

उत्तर रामचरित्रातील चित्रदर्शन प्रसंगात दुर्मनायमान झालेल्या सीतेला चित्रमालिकेतील एका चित्राची ओळख पटत नाही. तेव्हा श्रीराम चित्रातील मारुतीचे वर्णन करताना म्हणतात

"यस्य वीर्येण कृतिनो वयंच भुवनानिच ।"

(सीते, हा तो आहे की ज्याच्या पराक्रमामुळे आपण व सर्व विश्वे कृतकृत्यतेचा आनंद उपभोगीत आहोत.)

समर्थांचे स्थान भारताच्या इतिहासात हेच आहे. ते नसते तर आपण कशाला हे शताब्दीचे सोहळे करायला शिल्लक राहिलो असतो?

स्वातंत्र्यवीर सावरकरांना त्यांच्या उमलत्या सळसळत्या तारुण्यात कार्यप्रेरित करण्यात सर्वांत मोठे योगदान जोसेफ मॅझिनी यांच्या चरित्राचे होते. त्यांचे चरित्र स्वा. सावरकरांनी भाषांतरीत केले व त्या चरित्राची जी प्रस्तावना आहे ती स्वातंत्र्यप्राप्तीच्या लढ्याची भगवतगीता ठरावी अशा योग्यतेची आहे. त्यात जोसेफ मॅझिनी यांच्या कर्तृत्वाची ओळख करून देताना स्वा. सावरकर अशा निष्कर्षावर येतात की, जोसेफ मॅझीनी हे इटलीचे समर्थ रामदास होते, व समर्थ रामदास हे भारताचे मॅझीनी होते.

छ.शिवाजी महाराज यांची तलवार, बाहूबल व समर्थ रामदासांचे अध्यात्मबल या दोघांचे जेव्हा मीलन झाले तेव्हा त्या मीलनातून आपल्या राष्ट्राचा भूतकाळ उर्जितावस्थेत आला.

धर्माची व्याख्या आपल्या शास्त्रांनी अशी केली आहे, "यतो अभ्युदय निश्रेयस सिद्धीः" जिथे अभ्युदय म्हणजे ऐहिक उत्कर्ष आणि निःश्रेयस म्हणजे पारलौकिक कल्याण ह्या दोन्ही गोष्टी साध्य होतात त्याला धर्म म्हणतात. सामान्यपणे आपण धर्माच्या बाबतीत पारलौकिक कल्याणावर, निःश्रेयसावर अधिक भर देतो. ऐहिक उत्कर्षाची आपण उपेक्षा करतो. पण ऐहिक उत्कर्ष सुद्धा तेवढाच महत्त्वाचा आहे, जेवढा मोक्ष महत्त्वाचा आहे. हेच धर्म या शब्दाने आपल्याला सांगितले आहे. आपले सगळे संत आणि समर्थ या मध्ये थोडासा वेगळेपणा आहे. परमेश्वराची साधना व मोक्षप्राप्ती हे सर्व संतांनी आपल्या आयुष्याच्या वस्तुपाठासह ठेवलेले उद्दिष्ट आहे. त्यातल्या ऐहिकाकडे आपण दुर्लक्ष करीत आलो आहोत. स्वामी विवेकानंद अमेरिकेत गेले असताना पलंगावर त्यांना झोप आली नाही; कारण मी इथे वैभवात लोळतोय व माझ्या देशातील लोक हे दारिद्र, अज्ञान व भीती यांनी त्रस्त झाले आहेत. त्यांना स्वातंत्र्य कसे मिळणार? स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आवश्यक गुणसंपदा आहे ती त्यांना देण्यात आम्हाला अपयश आले आहे. या विचारांनी ते अस्वस्थ झाले होते, त्यामुळे ते असे म्हणाले होते की, तरुण माणसांनी भगवदगीता पठणापेक्षा फुटबॉलचा खेळ जर खेळला तर तो मोक्षाच्या जास्त जवळ जाईल. यातले मर्म लक्षात घेतले पाहिजे. पूर्ण पोखरलेला देह व पूर्णपणे पोखरलेले मन हे राष्ट्राच्या अभ्युदयासाठी काय प्रयत्न करू शकेल? उर्मीच संपलेली असते, उमंग संपलेली असते, आवश्यक असणारी उष्णता, धग, दाहकता असते ती शिल्लक उरलेली नसते. अशी माणसे स्वतंत्र्यासाठी प्रयत्नही करू शकत नाहीत आणि स्वातंत्र्य जर प्रयत्नाविना मिळाले तर त्याची राखणही करू शकत नाहीत. म्हणून समर्थांनी अभ्युदयावर जोर दिला. टाकळीचे पुनश्चरण झाल्यावर समर्थांनी भारत भ्रमण केले व तत्कालीन देशाच्या प्रकृतीचे निरीक्षण आणि निदान केले आणि त्यानंतर आपल्या कार्याला काय स्वरूप द्यायचे याचा त्यांनी निर्णय केला. संत ज्ञानेश्वरांपासून संत तुकारामांपर्यंत सर्व संतांच्या आयुष्याचे अंतिम उद्दिष्ट एकच आहे. त्या उद्दिष्टापर्यंत जाण्याचे सगळ्यांचे मार्गही एकच आहेत, भिन्न नाहीत. 'साधू दिसती वेगळाले परि ते स्वरूपी मिळाले' साधू वेगवेगळे दिसत असले तरी ते वेगळे नसतात ते एकच असतात.

दासबोधामध्ये विषय आहे तो अध्यात्माचाच. दासबोधाची प्रतिज्ञाच अशी आहे, "ग्रंथा नाम दासबोध । गुरुशिष्यांचा संवाद । येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग ॥१-१-२॥ मी भक्तीमार्ग सांगितला आहे असे समर्थ म्हणतात. पण एकूण वीस दशकांमध्ये असणाऱ्या एकूण दोनशे समासांमध्ये भक्तीचे उल्लेख फक्त सात ठिकाणी आहेत, राजकारणाचे उल्लेख फक्त अकरा ठिकाणी आहेत. याचा अर्थ भक्ती व राजकारण यांना समर्थांच्या जीवनात अत्यल्प स्थान होते असा होतो का? रामदासांनी उल्लेख केला किंवा न केला हे फारसे महत्त्वाचे नाही. काही ठिकाणी उल्लेख होत नसतो, म्हणून तिथे काहीच नसते असे नाही. रामदास आणि छ. शिवाजी महाराज यांची भेट झाली की नाही? याचे उल्लेख कुठपर्यंत आहेत? इतिहास संशोधकांनी शोधून काढले की, १५९४ पूर्वी भेटच झाली नाही आणि अशी भेट झाली नाही की जेणे करून शिवरायांच्या उमलत्या विभूतीमत्त्वावर रामदासांच्या विभूतीमत्त्वाचा प्रभाव उमटावा. कशावरून झाली नाही? उत्तर असे आहे उल्लेखच नाही. रामायणाच्या अरण्यकांडात एक प्रसंग आहे. दुपारची वेळ होती. काही वन्य स्त्रिया सीतेला भेटायला आल्या होत्या. ती पर्णकुटीच्या दारात बसलेली होती व त्या अंगणात बसल्या होत्या. त्यांनी सीतेला असे विचारले की, "त्या दूरच्या शीळेवर बसलेला श्यामल वर्णाचा तेजस्वी तरुण तुझा कोण आहे ?" वाल्मिकी रामायणाचे अरण्यकांड म्हणते सीता काहीही बोलली नाही तिने मान खाली घातली. सीता काहीही बोलली नाही म्हणून त्या माणसाचा व तिचा काहीच संबंध नव्हता का? अनुल्लेख हा इतिहास संशोधन क्षेत्रातील पुरावा कसा असू शकतो ?

" पहिले हरिकथा निरूपण । दुसरे ते राजकारण । तिसरे ते सावधपण सर्व विषयी ॥"

ह्या तिनही गोष्टी राजकारणाला आवश्यक आहेत. जर हरिकथा निरूपणाचे महत्त्व जर आपणाला समजून घ्यायचे असेल तर जीवनात

कुठल्याही क्षेत्रात वावरणाऱ्या माणसाला गीतेला अभ्यास करायला हवा. कारण गीतेने एक मध्यवर्ती अशी मूर्ती आपल्या डोळ्यासमोर उभी केली आहे ती म्हणजे स्थितप्रज्ञाची. आयुष्यात आनंदाच्या लाटा येतात, दुःखाच्या लाटा येतात. आनंदाच्या लाटांनी फुलून जाणार नाही आणि दुःखाच्या लाटांनी खचून जाणार नाही असे मानस भगवदगीतेकडून संपादन करता येते. कारण राजकारणात लढाया कराव्या लागतात, कलह करावे लागतात, वादंग करावा लागतो. त्या वेळी आपल्याला मिळालेल्या यशाने हुरळून जाणार नाही आणि आपल्याला मिळालेल्या अपयशाने जो हिंमत हरणार नाही अशी मानसिकता तयार करायला पाहिजे जी स्थितप्रज्ञाची असते.

संतशिरोमणी श्री तुकाराम महाराजांचा एक अभंग आहे. एक रडतराऊ त होता. त्याला जबरदस्ती घोड्यावर बसविला. एका हातात ढाल व एका हातात तलवार दिली आणि सांगितले जा लढायला. तो रणांगणात गेला आणि तक्रार करायला लागला की या शत्रूपक्षाशी मी लढू कसा? कारण एक हात माझा ढालीत गुंतलाय आणि दुसरा तलवारीत. लढणारी तलवार नसते. लढणारी ढाल नसते, लढणारे मनगट असते. त्यात जर ताकद असेल तर तलवारीत सामर्थ्य येते आणि ढालीत संरक्षण सामर्थ्य येते. पण खरे पाहू गेले तर लढणारे मनगटसुद्धा नसते, तर त्या मनगटाच्या मागे जे प्रबळ आणि बलिष्ट असे जे मन असते ते लढत असते. ते मन बनविण्याचे काम स्वराज्य प्राप्तीसाठी, स्वराज्य संरक्षणासाठी अग्रक्रमाचे आहे. हे समर्थ रामदासांनी ओळखले. समर्थांनी सर्व परिस्थिती पाहिली. 'परचक्र निरूपण नावाचे प्रकरण लिहिले, अस्मानी सुलतानी नावाचे प्रकरण लिहिले. समर्थ उदवेगाने म्हणाले -

"ऐसे अवघेचि नासले । सत्यासत्य हरपले ।
अवघे अनायक जाहले । बहूकडे ।।
मतामतांचा गलबला । कोणी पुसेना कोणाला ।
जो जे मति सापडला । तयासी तेचि थोर ।

(ज्याला जे मत पटले त्याला ते सर्व गोष्टीत थोर वाटते.)

सांगोचि जाणते सर्वे । कर्ता कोणी दिसेचना ।।
करंटे मिळाले सर्वे । जो तो बुद्धीच सांगतो ।
आळसे चाळणा नाही । स्वतः बुद्धी कळेचिना ।।

आपल्याला बुद्धी नाही हे जर लक्षात आले नाही आणि म्हणूनच ज्याला बुद्धीवाद सांगण्याचा अधिकार लाभला असतो तो विचार करू शकत नाही, काम करू शकत नाही, आणि जगाचे नेतृत्व तर करूच शकत नाही.

असे दारूण चित्र समर्थांच्या काळातील त्यांनी रेखाटून ठेवले आहे. आपल्या वाङ्मयात ते वाचल्यानंतर आपल्याला लगेच कळते की एखाद्या देशाचे जे गडगडते पतन होते त्याची कारणे कोणती होती.

'यत्र सर्वे विनेतारः, सर्वे पण्डितमानिनः । सर्वे महत्त्वं इच्छन्ति । सुभाषित-कार म्हणतो ' तद् राष्ट्रं अवसीदति'।. ज्या देशामध्ये सगळेच फक्त नेतेचे आहेत, अनुयायी बनायला कोणी तयार नाही, सगळेच स्वतःला पण्डित म्हणजे शहाणे मानतात, दुसऱ्याचे ऐकून घ्यायला तयारच नाहीत आणि सगळेच महत्पदाची आकांक्षा बाळगून असतात, सामान्य जागेवर राहायला कोणीच तयार नसतो ; सुभाषितकार म्हणतो त्या देशाचा अधःपात अटळ आहे. ह्या अधःपाताच्या उंबरठ्यावर देश उभा असताना सुदैवाने समर्थांचा लाभ झाला आणि त्यांनी त्या अवस्थेत सर्वांना धीर दिला.

"धीर धरा धीर धरा तकवा हडबडू गडबडू नका काळ पहोनि वर्तावे. सांडावे भय पोटिचे."

आपल्या अंतःकरणातील सगळे भय सोडून द्या. आपल्या अंतःकरणात जो न्यूनगंड आहे तो सोडून द्या. आपल्या अंतःकरणात आत्महीनतेची जी भावना आहे ती सोडून द्या. आपल्याला अजूनही ह्या परिस्थितीवर मात करता येईल आणि त्या परिस्थितीवर मात करण्याचे जे आश्वासन आहे ते समर्थांनी अध्यात्माच्या छत्राखाली सक्रिय करण्याचा प्रयत्न केला, क्रियाशाली करण्याचा प्रयत्न केला.

समर्थांनी शिष्य केले, मठस्थापना केली आणि त्या मठस्थापनेतून तरुण तरि निरभिलाषि शिवाय अविवाहित आणि प्रखर स्वाभिमान असलेल्या लोकांची संघटना त्यांनी बांधली महंतांच्या रूपाने. यापैकी कुणालाही वैयक्तिक स्वार्थ नव्हता, आकांक्षा नव्हती आणि त्याच्यामुळे ज्यांच्या आकांक्षा न मागता पूर्ण झाल्या आहेत त्यांचा द्वेष करण्याचेही कारण नव्हते. समर्थांनी अशी शूर मर्दांची पिढी निर्माण केली आणि शिवाय समर्पित वृत्तीची. आपल्याला काही नको. जे करेल ते सगळे 'करोमि यद् यद् सकलं परस्मै' जे मी करेन ते सगळे जगाकरिता करेन.

अशी पिढी समर्थांनी उत्पन्न केली आणि त्यांच्याकडून त्यांनी काम करून घेतले.

समर्थांच्या मठाचा उपयोग काय झाला समाजाला? आपण समर्थांबद्दल खूप गैरसमज बाळगतो. स्त्री मुक्तीचा पहिला कैवार जर महाराष्ट्राच्या इतिहासात जर कोणी घेतला असेल तर तो समर्थांनी घेतला. मिरजेच्या मठाची अधिपती कोण होती माहिती आहे? वेणाबाई. त्या वेळी पुरुष महंत नव्हते का? मराठवाड्यातील मठांचा अधिपती होता वली महंमद जो समर्थांचा शिष्य होता, भक्त होता. केवढा व्यापक दृष्टीकोन असेल त्यांचा याची कल्पना करा. त्यांना बाकीचे भेद पाहायचेच नव्हते. सामान्य माणसामधले असामान्य असे जे सामर्थ्य असते त्याचा स्फोट त्यांना अनुभवायचा होता. त्यामुळे आपोआप इतर निर्बल अंतःकरणांमध्ये सामर्थ्यांचे स्फुल्लिंग उत्पन्न होईल याचा त्यांना आत्मविश्वास होता. ते समर्थांनी केले आणि ते करण्यासाठी त्यांनी आपला सगळा युक्तीवाद दासबोधाच्या समासांमधून वेगवेगळ्या नावाखाली वापरला.

समर्थांनी भक्ती हा शब्द फक्त सात ठिकाणी वापरला असेल आणि एका दशकात वापरला असेल नवविधा भक्तीच्या पण समर्थांनी संपूर्ण दासबोधामध्ये सगळी कामे आम्ही उत्कृष्ट करण्यासाठी जो मंत्र आम्हाला दिला तो भक्तीचा होता. तसे समर्थांनी राजकारणाचा उल्लेख फक्त अकरा ठिकाणी केला. पण संपूर्ण दासबोधातून जर काही सांगितले असेल वेगवेगळ्या नावाखाली ते राजकारणच सांगितले. मराठीतले एक फार तपस्वी अभ्यासक, संशोधक, प्राध्यापक नरहर रघुनाथ फाटक. फार मोठी तपश्चर्या आहे त्या माणसाची. त्यांनी समर्थांनी राजकारण केले नाही असा पक्ष मांडला. त्याबद्दल मतभेद नाहीत. पण राजकारण शब्द दासबोधामध्ये जिथे कुठे आला त्यातून त्यांनी एक फार सोपा अर्थ काढला तो म्हणजे राजकारण म्हणजे समर्थांना फक्त व्यवहार चातुर्य अभिप्रेत होते. जर केवळ व्यवहार चातुर्यच अभिप्रेत होते तर समर्थांना राजकारण हा शब्द वापरण्याची गरज का पडली? व्यवहार चातुर्य वापरले असते तर आम्हाला कळले नसते का? पटकन आमचा फायदा झाला असता. हे व्यवहार चातुर्य प्रपंचापुरते नसते. हे व्यवहार चातुर्य आपल्या जमातीपुरते नसते. हे विशाल समाजाच्या आणि त्यापेक्षाही विराट राष्ट्राच्या कल्याणाचे असते. म्हणून ते महत्त्वाचे असते. ते समर्थांनी केले. ते राजकारण समर्थांनी केले. बोलले नाहीत. आता बोलून दाखविले नाही म्हणून होतच नसते असे नाही. पूर्वीच्या काळी आर्य स्त्री आपल्या नवऱ्याचे नाव घेत नसे म्हणून त्याला नावच नसायचे का ?

इतिहास संशोधन हे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण त्यामुळे तुम्हाला मला आपला अतीत काळ समजतो. आपला भूतकाळ समजतो. त्या भूतकाळातील रोमहर्षक प्रसंग कळतात. त्या भूतकाळातले खाली मान

घालायला लावणारे असे अपमान जनक प्रसंगही आठवतात. त्या इतिहासाला त्याचे सोयरसुतक नसते. इतिहास अत्यंत निर्लेप मनाने ह्या दोन्ही गोष्टी सांगत असतो. संशोधकाच्या दृष्टीने ही तलवार छ. शिवाजी महाराजांची आहे की औरंगजेबाची आहे हे महत्त्वाचे नसते. ही तलवार सोळाव्या शतकातील आहे हेच महत्त्वाचे असते. कोणाच्या हातात होती याचे त्यांना काही देणे घेणे नसते. पण संशोधक इतिहास कशासाठी उघडकीस आणतात? तुमच्या माझ्या प्रेरणेसाठी आत्मपरीक्षणाच्या संधीसाठी, तुम्हाला आम्हाला अंतर्मुख व्हायला लागावं आणि त्यातून काहीतरी बोध आपल्याला घेता यावा यासाठी इतिहासाचा उपयोग सामान्य माणूस करीत असतो. तेव्हा संशोधकांनी ठरविले की शिवाजी रामदास यांची भेट झाली नाही. १५९४ पर्यंत म्हणजे ते ब्रह्मलिखित समजणाचे कारण नाही. ते आपण गृहित धरायचे, की संशोधकांच्या मते १५९४ पूर्वी पुरावे उपलब्ध न झाल्यामुळे १५९४ च्या अगोदर छ. शिवाजी व समर्थ रामदास यांची भेट झाली नाही. असे आपण धरायचे पण सारखी नवी नवी साधने उपलब्ध होतात. नवी नवी उत्खनने उपलब्ध होतात. नवे नवे निष्कर्ष त्यावरून बांधावे लागतात आणि त्यावरून या सगळ्या मतांचा फेरविचार करावा लागतो.

आमचे मित्र पुरुषोत्तम भास्कर भावे हे नौखालीच्या प्रसंगानंतर नौखालील गेले होते, बघायला काय आहे ते. ते अंतःकरण धगधगत होते. त्यांना राहावत नव्हते. ते गेले तिथे आणि त्यांनी ते सगळे पाहिले आणि पाहिले आणि त्यांनी सांगितले की आम्ही जे पाहिले ते वेगळे होते आणि अमृत बझार पत्रिकेमध्ये जे डिसपॅचेस् प्रसिद्ध होते ते वेगळे होते. कारण ते डिसपॅचेस् शासन-मान्य होते. आम्ही आज लायब्ररीमध्ये अभ्यास करतो तो त्या कागदपत्रांचा करतो की जो त्या काळामध्ये शासन-मान्य होता. आणि त्यावरून आम्ही आमच्या इतिहासाचे अंदाज बांधतो, ते आमचे सत्वहरण करणारे अंदाज असतात. हे आपल्या लक्षात आले पाहिजे.

एकूण आयुष्यमध्ये छ.शिवाजी आणि समर्थ यांच्या प्रत्यक्ष भेटी सातपेक्षा कमी झाल्या नाहीत आणि त्यातल्या किमान चार तरी भेटी १५९४ पूर्वीच्या आहेत. इतिहास संशोधकांच्या दुर्दैवामुळे देश कुळकर्णी कुडाळकर यांच्या नोंदी आपल्याला त्या नंतर सापडल्या. त्या कुडाळकर देश कुळकर्ण्यांनी नोंदी केल्या होत्या. समर्थांच्या आयुष्यातल्या प्रमुख घटनांच्या तारखांसकट आणि त्यामध्ये एक घटना होती शिंगणवाडीला घडलेली. माघ शु. नवमीला समर्थांचा छ. शिवाजी महाराजांनी घेतलेला अनुग्रह ही ती घटना होती. आणि समर्थांच्या चरित्रातून सगळ्या त्या निवडक घटना निवडून त्या एका वहीत नोंदवून ठेवण्याचे काम फक्त कुडाळकर देश कुळकर्णींनी केले होते, अंताजी कुळकर्णी-कुडाळकर आणि मग त्यावरून आपल्या लक्षात येते की समर्थ व छ. शिवाजी यांचा संबंध किमान १५७१ पासून आहे. आणि १५७१ मध्ये छ. शिवाजींसारख्या राजाला समर्थांसारख्या माणसाचा अनुग्रह घ्यावासा वाटतो इतका मोठा प्रभाव तो पर्यंत छ. शिवाजी महाराजांच्या मनावर अर्थातच सगळ्या जनतेवर जमायला किती काळ लागला असेल, तितक्या अगोदर छ. शिवाजी आणि समर्थांच्या भेटीचा काळ आपल्याला न्यावा लागेल. १५७१ मध्ये त्यांची भेट झाली. १५७६ मध्ये समर्थांनी आपले कार्यक्षेत्र बदलले व ते कृष्णेच्या काठावर आले आहेत. मुख्य म्हणजे छ.शिवाजी महाराजांनी समर्थांना सनद दिली आहे. शके १६०० मध्ये सनद दिली आहे आणि त्या सनदेद्वारे समर्थांना त्यांनी अकरा गावे इनाम दिली आहेत; त्यांच्या मठांच्या संगोपनाकरिता आणि त्यात त्यांनी समर्थांना लिहिलेल्या सनदेत असे म्हटले आहे की, आयुष्यात जे जे करायचे ठरविले होते ते ते आपल्या कृपेने हे तडीला गेले. ही सगळी आपली कृपा आहे. असे त्यांचे वाक्यच आहे, पहिल्याच परिच्छेदात छ. शिवाजी महाराजांना समर्थांनी तीन आदेश दिलेत. राज्य कसे चालवायचे या बद्दलचे, त्याचेही शक आपल्याला उपलब्ध आहे. छ.शिवाजींनी समर्थांना एक रामबाण नावाचा घोडा अर्पण केला, (१६७९) मध्ये - तोही एक आपल्याजवळ, उपलब्ध आहे. साधी गोष्ट आहे; समर्थ कृष्णातीरी आले. त्यानंतर ते गेलेत दासबोध लिहिण्याकरिता आणि जवळजवळ १० वर्षे शके १५५६ ते १५६६ ते शिवथरला होते. तो पर्यंत समर्थांच्या कार्याचा गवगवा सर्वत्र झाला होता आणि त्यांच्या प्रभावाच्या दुंदुभी सर्वत्र निनादत होत्या. आदिलशहापर्यंत त्याचा आवाज पोचावा आणि शिवथर घळीपासून फक्त १२ मैलावर असलेल्या रायगडावर पोचू नये? का? उल्लेख नाही म्हणून. काही गोष्टी आपल्याला समजून घ्याव्या लागतात. त्याचा उल्लेख नसतो. त्या त्या संस्कृतीच्या काही धारणा असतात. त्या शब्दांच्या अर्थातून प्रतीत होत असतात. आम्हाला त्या त्या शब्दाची त्या त्या भाषेची प्रकृती लक्षात घेतली पाहिजे, आणि तिचे हृद्गत समजावून घेण्याची तयारी ठेवली पाहिजे. तेव्हा कुठे ह्या सगळ्या गोष्टी उलगडतात.

समर्थ राजकारणी होते, राजकारणाचे अभ्यासक होते आणि उपदेशकसुद्धा होते. समर्थांनी राजकारणाच्या समासामध्ये हे म्हटले नाही. त्यांनी राजधर्म नावाचे प्रकरण लिहिले. त्यांनी मुख्य पुरुष निरूपण नावाचे प्रकरण लिहिले ही सगळी प्रकरणे राजकारणाचे विवेचन करणारी आहेत. त्यात समासांमध्ये किंवा दशकांमध्ये किंवा प्रकरणामध्ये राजकारण शब्द आला असेल किंवा नसेल. पण समर्थ जेव्हा सांगतात, ''इशारतीचे बोलो नये'' जे खुणेनी सांगायचे असते ते कधी बोलून दाखवायचे नसते आणि खुणेने सांगितलेले जर समजले नाही तर हात पाय झाडायचे नसतात. आमच्या संस्कृत साहित्यामध्ये एक अलंकार आहे सूक्ष्म नावाचा. तो सांगताना एक उदाहरण आहे. ती नायिका जेवण झाल्यानंतर शिळोप्याच्या गप्पा करीत अंगणात बसली होती. हातात तिच्या एका कमळाचे फूल होते, त्याच्याशी ती खेळत होती आणि बोलत होती. इतक्यात एक पुरुष असा तिथून गेला. गेल्यानंतर तिने नुसती तिर्यक नजर अशी टाकली त्याच्याकडे तिला कळले तो काय विचारतोय? कशाकरिता आला आहे? आणि एक तिर्यक कटाक्ष त्याच्याकडे टाकल्यानंतर हातातील कमळाचे फूल तिने मिटून टाकले. तो समजला आणि निघून गेला. तो आला होता विचारायला भेटीची वेळ? हिने कमळाचे फूल मिटवून सांगितले, सूर्य अस्ताला गेल्यावर कमळ मिटते तेव्हा आपण भेटू निवांतपणे सुदैवाने हे समजण्यासारखा तो प्रियकर होता. इशारतीचे बोलो नये जे बोलून दाखवितो ते लिहिता नये आणि जे लिहिले ते सांगो नये जबाबीने. जे खुणांनी सांगायचे ते बोलून दाखवायचे नसते, जे बोलून दाखवायचे ते लिहून ठेवायचे नसते, जे लिहून ठेवायचे असते ते सांगायचे नसते.

तिसरे ते सावधपण सर्व विषयी. कशा करिता? सर्व विषयी सावधपणा कशा करिता? आपल्यापुरते सावधपण असले झाले. सर्व विषयी कशाकरिता? आम्हाला सगळ्या जगाचे अधिराज्य चालवायचे आहे, आणि त्यामुळे प्रत्येक गोष्टीबद्दल सावध असायला पाहिजे. चाणक्य तर सांगतो की राजपुरुषांनी स्वतःच्या लाडक्या बायकोबद्दल संशय बाळगला पाहिजे. चाणक्य म्हणतो की त्याचा जो लाडका राजपुत्र असेल त्याच्यापासून त्याने सावध राहिले पाहिजे.

अविश्वास नसतो झाला सावधगिरी म्हणतात. तिसरे ते सावधपण सर्व विषयी. दुसऱ्या कुणी सांगितले आहे राजकारण आपल्याला.

छ. शिवाजी आणि समर्थ ह्यांच्या भेटी झाल्या आहेत. ज्या वेळी आग्र्याला गेले आहेत. छ. शिवाजी महाराज तेव्हा ते जातांना समर्थांना भेटून गेले. समर्थांना त्यांनी विचारले '' दिल्ली जाणे आहे जावे की नाही?'' समर्थांनी सांगितले' ''जाणे प्राप्त आहे जावे फत्ते पावाल'' तुमचा विजय होईल

पण तूर्त जाणे प्राप्त आहे. जाणे तुम्हाला टाळता येणार नाही. आणि छ. शिवाजी महाराजांनी आग्र्याची दिशा धरली. हे बखरीमध्ये आले आहे. सप्तप्रकरणात्मक चरित्रात आले आहे. म्हणून तुम्ही नाकारणार की हे सगळे काल्पनिक आहे. पण त्याच वेळेला एका पोर्तुगीज लेखकाने, आस्म द गार्ड नावाचा लेखक, त्यानी पोर्तुगीज भाषेमध्ये छ. शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिले आहे त्यात हा उल्लेख केलाच आहे, की जयसिंगाच्या परवानगीने छ. शिवाजी महाराजांनी आग्र्याला जाताना एक रामदासी आपल्याबरोबर घेतलेला होता. छ. शिवाजी महाराज, आग्र्याहून निघतात आणि एक दिवशी रायगडावर प्रकट होतात. मध्ये कुठे होते? कसे होते? पकडले कसे गेले नाहीत? औरंगजेबाची हेर यंत्रणा इतकी जबरदस्त असताना ठिकठिकाणी स्थापना झालेले समर्थांचे मठ हे त्याचे उत्तर. समर्थांच्या मठांनी जी कामगिरी बजावली त्यामुळे महाराष्ट्राचा राजा बचावला. हे इतिहास सांगत नाही. इतिहास त्याबद्दल मौन बाळगतो. पण त्याच्या मौनाचेही जे अर्थ आहेत, ते सांगण्याइतका, जाणून घेण्याइतका तर्क आपल्याजवळ असावा लागतो. तेव्हा इतिहास आपल्याला क्षमा करतो. नाही तर उपयोग काहीच नाही. मित्रांनो इतिहासाने सांगितले असेल नसेल. पण समर्थ आणि छ. शिवाजी यांचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे होते. छ.शिवाजी महाराजांनी फक्त समर्थांच्याच मठांना त्यांनी मदत केली असे नाही. जवळजवळ बारा सत्पुरुषांना आणि त्यांच्या मठांना त्यांनी मदत केली. आपल्या इथे सासवडच्या सोपानदेवांच्या समाधीला, आळंदीच्या ज्ञानदेवांच्या समाधीला सुद्धा त्यांनी मदत केली आणि ज्यांनी देश पेटविण्याचा प्रयत्न केला त्यांना विसरून जाणार ते ? बारा मैलाच्या अंतरावर. 'शक्तीने मिळती राज्ये । युक्तीने कार्य होतसे । शक्ती युक्ती जये ठायी । तेथे श्रीमंत नांदती ।' 'देवद्रोही जितुके कुत्ते । मारोनि घालावे परते । देवासाठी मरावे । मरोनि अवघ्यास मारावे ।' असे एक नव्या युगातील उपयुक्त अध्यात्म सांगणारा राष्ट्रप्रबोधक जो आहे. त्याला तुम्ही विसराल? उल्लेख नाही असे म्हणू आपण. पुरावा नाही, असे म्हणू आपण. काही कामे अशी असतात की जिथे साक्षीदार ठेवून चालत नाही. एकट्यानेच पार पाडावी लागतात आणि ती शेवटपर्यंत लपलेलीच राहतात उघडकीला येत नाहीत. 'सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील त्याचे आपण जितके आठवाल तितके कमी आहे. 'वन्ही तो चेतवावा रे । चेतविताचि चेततो,' 'केल्याने होत आहे रे । आधि केलेचि पाहिजे ।'' अशी जी कर्तृत्वाला, पुरुषार्थाला अत्यंत ज्वलंत अशा रीतीची प्रेरणा देणारा जो विरक्त पुरुष आहे. त्या विरक्त पुरुषाचा विसर छ. शिवाजी महाराजांना पडला असेल असे अभ्यासासाठी पण का होईना गृहित धरणे ह्या सारखा छ. शिवाजी महाराजांचा अपमान दुसरा नाही, आणि भक्त म्हणविणाऱ्याने तो करू नये कधीही. कागद काय बोलतो ते महत्त्वाचे आहे. वातावरण काय बोलते ते जास्त महत्त्वाचे आहे. रायगडावर महाराजांनी समाधी घेतली. त्यांचा आवडता, विश्वासाचा जो कुत्रा होता त्याने त्या चितेमध्ये उडी टाकली. पुरावा नाही त्याला. म्हणून त्या कुत्र्याबद्दल आपण कृतघ्न राहायचे? आणि कोण कशाला अशा अफवा पिकवेल? आपल्या राजकारणासाठी अमुक अमुक गोष्टीचा उपयोग होऊ शकतो हे ज्ञान अर्वाचीन काळाइतके प्राचीन काळी नव्हते. आपण जास्ती पुढारलेले आहोत. कशाला ते इतिहासाची मोडतोड करतील? त्याच्याशी खोटेपणा, सत्यापलाप करतील? केवळ आपल्या वंशजांना भविष्यकाळामध्ये सुखाचे दिवस यावेत म्हणून? तसे जर केले असते तर वर्तमान काळामध्ये एवढा मोठा पुरुषार्थ त्यांच्या हातून घडला नसता आणि त्या पुरुषार्थाची प्रचीती महाराष्ट्रामध्ये स्थापन झालेल्या शिवप्रभूंच्या स्वराज्याच्याद्वारे मिळू शकली नसती. छ. शिवाजी महाराज आणि समर्थ हे एकाच वेळी, एकाच कार्यानी, प्रदीप्त झालेले दोन देह होते, दोन हृदये होती, दोन मस्तिष्के होती, एकच कार्य. समर्थांना सत्ता करायची नव्हती. पण त्याच्यासाठी आवश्यक ती अशी परिस्थिती आणि वातावरण त्यांना अनुकुल करून ठेवायचे होते. त्याची जाहिरात करायची नव्हती. हे सगळे तुम्ही कशाकरिता करता आहात? त्याची जाहिरात करायची नव्हती. ते आम्हाला ओळखता आले पाहिजे. त्या काळच्या इतिहासावरून आम्हाला ओळखता आले पाहिजे की, हे कसे झाले असले पाहिजे? हे कुणी केले असले पाहिजे? कशामुळे झाले असले पाहिजे? हे मला ओळखता आले पाहिजे? महाराज आणि समर्थ एकाच वेळी महाराष्ट्रात वावरत होते, त्याच वेळी तुकाराम महाराज होते. तुकाराम महाराजांची आणि छ. शिवाजी महाराजांची भेट झाली तेव्हा त्यांनी छ. शिवाजी महाराजांना सांगितले की मला काहीच नकोय तुझ्याकडून. काही नको मला. अरे ज्याला परमात्म्यासारखा सावकार लाभला आहे तो तुझ्याकडे कशाला येईल बेटा ? मला नको काही ! आणि त्या वेळी त्याला सांगितले आहे. की तू समर्थांकडे जा. समर्थांसारखा उदार सज्जन, त्याची तू सतत आठवण ठेव, त्याला विसरू नकोस, बुद्धी चळू देऊ नको. त्याच अभंगामध्ये महाराजांनी सांगितले आहे. ह्याच्यातून आपल्याला काही बोध घेता येऊ नये? संशोधक तर असे म्हणतात की छ. शिवाजी, तुकाराम महाराज आणि समर्थ रामदास यांची ओळख देखही नव्हती. पण तुकाराम महाराजांचा समर्थांवर एक पूर्ण अभंग आहे. त्यात त्यांचे वर्णन केले आहे. त्यांच्या हुरमुजी रंगाचे वगैरे. आपल्याला सांगतो की कविता करण्याकरता जशी प्रतिभा लागते ना तसा इतिहासाचा अर्थ लावताना सुद्धा प्रतिभा लागते. इतिहास सांगतो तसा अर्थ आपल्याला निर्बुद्धपणे स्वीकारता येत नाही. त्याच्याही करिता प्रतिभा लाभते. नाही तर मग चमत्कारांचे गारूड त्यातून उत्पन्न होते. समर्थ गेलेत आपल्या पुतण्याचा नवस फेडण्याकरिता तुळजादेवीकडे 'एकचि मागणे आता । मागतो मज कारणे । तुझा तू वाढवी राजा । शीघ्र आम्हासि देखता ।' मला दुसरे काही मागायचे नाही. तुला पण माझ्या या देशामध्ये तू तुझा राजा निर्माण कर आणि वाढव मला ते पहाण्याचे सौभाग्य लाभू दे. एवढीच माझी इच्छा आहे. तो राजा हा तुळजा देवींनी उत्पन्न केला नाही, जन्माला घातला नाही. तो होता तिथे तो फक्त लक्षात आला समर्थांच्या लक्षात आला. निर्माण झाला नाही. त्याचे वैभवशाली दैदिप्यमान चित्र समर्थांनी आपल्या अलोटसामान्य प्रतिभेच्याद्वारे आपल्या समोर रेखाटले. त्या चित्राचे ठसे दासबोधामध्ये उमटले. त्या चित्राचे ठसे संपूर्ण समग्र समर्थ साहित्यावर उमटले . तो कागद यायचा पूर्वी कोरा, आपण धरायचो उन्हामध्ये, त्याच्यामध्ये आतमध्ये कुठे हत्ती वगैरे रेखाटलेला असायचा तसे हे सगळे ठसे, हे सगळे वाङ्मय वाचताना तुमच्या माझ्या अंतःकरणात स्पंदित झाले पाहिजेत. तेव्हा ते वाङ्मय तुमच्या माझ्यावर आवश्यक तो परिणाम करील. नाहीतर असे स्फूर्तीदायक वाङ्मय वाचणे काय ? आणि रोजचे वर्तमानपत्र वाचणे काय? सारखेच आहे. वाचणे झाल्याबरोबर ज्याचे आयुष्य संपते; त्याच्याशी अशा साहित्याची आपण बरोबरी करता कामा नये. हे साहित्यही तुमच्याकडून पात्रतेच्या काही अपेक्षा बाळगित असते. आता आम्ही जेवढे सांगतो तेवढेच विसंबून राहू नका, विश्वास ठेवू नका. त्याच्या आधारानी तुमच्या कल्पकतेला पंख फुटतील आणि मग तुम्हालाही काही सांगता येईल जे भविष्यकाळात इतरांना उपयुक्त ठरेल; असे आवाहन तो मुक इतिहास प्रत्येकाला करीत असतो. तो ज्यांना समजला ते समर्थ रामदास होतात; ज्यांना समजला नाही ते टीकाकार होतात. कोणाची मेजॉरिटी करायची ह्याचा निर्णय आपल्यावरच सोपवून मी आपल्याला धन्यवाद देतो.

- प्राचार्य राम शेवाळकर

(पुणे येथे ४०० व्या जयंती निमित्त झालेल्या व्याख्यानाचा सारांश जन्मोत्सव चतु:शताब्दी समितीच्या सौजन्याने)

'श्रीसमर्थांचा महाराष्ट्र धर्म'



- श्री. चं.प.भिशीकर

श्रीसमर्थ रामदास स्वामी यांनी एक छोटेसे प्रकरण लिहिले आहे. त्यात त्यांनी 'क्षात्रधर्म' सांगितला आहे. दुसऱ्या एका प्रकरणात त्यांनी 'राजधर्मही' सांगितला आहे. ब्राह्मणांची कर्तव्ये, सेवकांची कर्तव्ये ही देखील त्यांनी निरनिराळ्या प्रकरणात सांगितली आहेत. त्यापैकी क्षात्रधर्म प्रकरणातील एक ओवी -

मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा ।

ये विषयी न करिता तकवा । पूर्वज हासती ॥ अशी आहे.

समर्थांनी महाराष्ट्राची कर्मभूमी म्हणून निवड केली. येथेच परकीय इस्लामी सत्तेला आव्हान देण्यासाठी लोकजागृतीची व लोकसंघटनेची एक सर्वंकष योजना सिद्ध केली. 'महाराष्ट्र धर्माची' शिकवण या योजनेच्या केंद्रस्थानी होती. सध्या 'मराठा' शब्द उच्चारला की लोकांना एका विशिष्ट जातीचा बोध होतो. हिन्दू समाजात ज्या अनेक जाती आहेत, त्यापैकी मराठा ही एक जात समजली जाते. या जातीचे प्राबल्यही सध्याच्या महाराष्ट्रात आहे.

मराठा कोण ?

पण सुमारे साडेतीनशे वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील गुलाम, पीडित आणि स्वत्वशून्य होऊन गेलेल्या लोकांना स्वातंत्र्यासाठी, स्वधर्माच्या रक्षणासाठी झुंजण्याची शिकवण देताना क्षुद्र, संकुचित, जातिगत विचार समर्थांच्या मनात असणे शक्य नाही. त्यांच्या दृष्टीने महाराष्ट्रात निवास करणारा प्रत्येक माणूस हा मराठाच. अशा या यच्चयावत मराठ्यांना एकत्र आणणे (मेळवावा) आणि 'महाराष्ट्र' धर्माची शिकवणूक त्यांना देणे, हा क्षात्रधर्माचा एक भाग म्हणून त्यांनी या प्रकरणात उल्लेखिला आहे. त्यांनी असेही म्हटले आहे की, या बाबतीत जर उत्साह आणि साक्षेप नसेल, हिरीरीने कार्य करण्याची प्रवृत्ती नसेल, तर आपले पूर्वज आपल्याला हसतील. ते आपला उपहास करतील. याचा अर्थ असा होतो की, महाराष्ट्रातील प्रत्येक रहिवाश्याने, म्हणजे मराठ्याने आपल्या पूर्वजांविषयीचे कर्तव्य या नात्याने महाराष्ट्र धर्माचे उत्साहाने पालन, पोषण आणि संवर्धन केले पाहिजे. या धर्मानुसार कर्तव्यांचा निर्वाह करण्यासाठी एकत्र आले पाहिजे. हा धर्म पुस्तकी नाही. तो जीवनात हिरीरीने आचरावयाचा धर्म आहे. त्याचा प्रत्यक्ष संबंध आपल्या जीवनात आपण जी कर्मे करतो त्यांच्याशी आहे. या कर्मातून आपली मानसिकता व्यक्त होत असते. कशासाठी आपण जगतो हे दिसत असते. कोणत्याही समाजाचे उत्थान अथवा पतन त्या समाजाच्या मानसिकतेवर अवलंबून असते. कारण जशी मानसिकता असेल तशी कृती असते.

समाजाची मानसिकता :

मानसिकता जर पराभूततेची असेल, परक्या, आक्रमकांपुढे अगतिक वागण्याची असेल, परानुकरणाची असेल, विकारग्रस्त असेल, स्वत्वशून्य असेल, तर तो समाज कधीही डोके वर काढू शकणार नाही. परक्यांकडून तो लाथाच खाईल. त्याचे शोषण होईल. गुलामीच त्याच्या वाट्याला येईल. अशा समाजाचा कोणत्या पूर्वजांना अभिमान वाटेल? कोणते पूर्वज अशा समाजावर कृपाशीर्वादाचा वरदहस्त ठेवतील? प्रत्येक व्यक्तीवर आणि समाजावर पूर्वजांचे काही ऋण असते. असे आपली हिंदू परंपरा शिकविते. ही ऋण कल्पना सामाजिक दृष्ट्या फार महत्त्वाची आहे. ज्यांचे ऋण आपण फेडावयास पाहिजे ती परंपरा खरोखरच फार थोर आहे, दिव्य आहे, आपल्या भारत-मातेच्या 'ब्रह्म - राजर्षि-रत्नाढ्या' असे संबोधण्यात आलेले आहे. त्यांनी आपल्याला जीवन विचारधन दिले, जगावे कसे याचे आदर्श आपल्यापुढे ठेवले, भारत-मातेचा गौरव जगात वाढविला. अशा पूर्वजांचे ऋण आपल्याला फेडावयाचे आहे. त्यांच्या संबंधीची आपली कृतज्ञता कृतीतून, म्हणजे पूर्वजांची अलौकिक गुणवत्ता आपल्याही जीवनात प्रकट करून व्यक्त करावयाची आहे. ताठ मानेने आणि दिमाखाने आपला प्राचीन समाज जगात वावरेल अशी अवस्था कायम टिकवावयाची आहे.

महाराष्ट्र धर्माचे आवाहन

'मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा'असे जे क्षात्रधर्म प्रकरणात श्रीसमर्थांनी सांगितले, त्यातील मुख्य आशय यातून लक्षात यावा. ही पराक्रमाच्या बळावर सभोवारच्या परिस्थितीत क्रांती घडवून आणण्याची, पुरुषार्थ गाजवून परिस्थितीत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याची निकराची हाक आहे. ही हाक श्रीसमर्थांना का द्यावी लागली? समर्थांपूर्वी शेकडो वर्षे कोणीही इतक्या स्पष्ट आणि सडेतोड शब्दात अशी हाक दिली नव्हती. समाजावर मारा होत होता तो पराकाष्ठेच्या सोशिकतेचा. संसाराच्या अशाश्वततेचा व त्यातून मुक्त होण्यासाठी करावयाच्या व्यक्तिगत साधनमार्गाच्या उपदेशाचा भौतिक जीवनातील सुखदुःखाची, मानापमानांची उपेक्षा करून निवृत्तीपरतेचे जीवन जगण्याचा. निःश्रेयसाची चिंता व अभ्युदयाची सर्वस्वी उपेक्षा असा तोल ढळण्याचे चित्र समाजात दिसत होते. यातून दांभिकपणाही वाढलेला होता. गुरू व बुवा यांची चलती झाली होती. असे भोंदू गुरू अडक्याचे तीन मिळाले तरी ते त्यजावे असे सांगण्याची पाळी समर्थांसारख्या निःस्पृह व वैराग्यशील संतपुरुषावर आली होती. ना अस्त्र, ना परत्र अशा कैचीत सामान्यजन सापडले होते. समर्थांची महाराष्ट्रधर्माची शिकवणूक समाजाची ही कुंठित अवस्था दूर करण्यासाठी होती.

अर्थातच समर्थांनी जो महाराष्ट्र धर्म - म्हणजे - महाराष्ट्रातील निवासी लोकांनी कशा प्रकारे प्राप्त - परिस्थितीचा सामना करुन गौरवशाली जीवन उभे करावे याचा कर्तव्यरूप मार्ग - सांगितला, त्याला तत्कालीन परिस्थितीचा संदर्भ आहे. महाराष्ट्र धर्म हा व्यापक अर्थाने राष्ट्रधर्मच आहे. श्रीसमर्थांना महाराष्ट्रात कृष्णातीरी, शहाजीराजांच्या जहागिरीत येऊन या राष्ट्र धर्माचा उपदेश समाजाला द्यावा लागला. कारण अन्यत्र कोठेही महाराष्ट्रा एवढी अनुकूलता त्यांना लाभण्यासारखी नव्हती. शहाजी महाराजांचीही इच्छा हिंदूंच्या परिस्थितीत क्रांती व्हावी अशीच होती. क्रांतीचा प्रयत्न करावयाचा झाल्यास तो प्रथम महाराष्ट्रातच केला पाहिजे असे त्यांनी हेरले होते व शिवाजी महाराजांनी हिन्दवी स्वराज्याच्या स्थापनेचा सुरू केलेला उद्योगही त्यांच्या

दृष्टीतून सुटलेला नव्हता. दासबोधाच्या १५ व्या दशकातील दुसऱ्या समासात श्रीसमर्थ म्हणतात :-

'महाराष्ट्र देश थोडा उरला । राजकारणे लोक रुधिला ।
अवकाश नाही जेवायाला । उदंड कामें ॥ (६-२-४)

श्री शिवाजी महाराजांना समर्थांनी शके १५७१ साली जे पत्र लिहिले, त्या पत्रातही स्पष्ट उल्लेख आहे.

'या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाही ।
महाराष्ट्र धर्म राहिला काही । तुम्हां करिता ॥

म्हणजे महाराष्ट्र धर्म वाढविण्यात, धर्मरक्षणाचा भाग प्रमुख होता. त्यासाठी मोंगली सत्ता परास्त करून देश, धर्म आणि आपल्या समाजाचे स्वत्व यांचे रक्षण करू शकणारी लोकशक्ती आवश्यक होती. या शक्तीच्या दिशेने लोकजागृती व लोकसंघटना कर्मांनी, कर्तव्यांच्या पालनाने होईल, असे समर्थांना ठामपणे वाटले, त्याला त्यांनी महाराष्ट्र धर्म असे सुटसुटीत नाव दिले. या धर्माचे पालन छत्रपती शिवाजी महाराज कसोशीने करीत होते, याचा आनंद समर्थांना वाटला होता.

भारत-भ्रमण

स्थूल मानाने येवढे म्हटल्यानंतर महाराष्ट्र धर्माची निकड, त्याच्या मागचा विचार आणि तो वाढविण्याची समर्थांनी सांगितलेली पद्धती याकडेही जरा लक्ष पुरवावयास पाहिजे. सर्वांना ठाऊकच आहे की टाकळी (नाशिक) येथील बारा वर्षांची कठोर साधना पूर्ण झाल्यानंतर श्रीसमर्थ सतत १२ वर्षे भारतभ्रमण करीत होते. पूर्व-पश्चिम-उत्तर-दक्षिण असा उभा देश त्यांनी पदयात्रा करून पायाखाली घातला. देशस्थिती अवलोकन केली. त्यांना भारत मातेचे जे चित्र दिसले, ते अत्यंत विदारक होते. त्याचे मोठे प्रत्ययोत्पादक व हृदय पिळवटून टाकणारे वर्णन त्यांच्या 'अस्मानी सुलतानी' यासारख्या प्रकरणातून वाचावयास मिळते. ही जी सर्वस्वी दयनीय, अंतःकरणाला पीळ पाडणारी व झोप उडविणारी परिस्थिती त्यांनी येथील परंपरागत हिन्दू समाजाची पाहिली, तिने त्यांच्या चित्तात घोर वादळ निर्माण केले. देशात राज्यक्रांती होण्याची, म्हणजे जुलमी आणि धर्मांध इस्लामी सत्ता जाऊन धर्मनिष्ठ हिंदू सत्ता येण्याची अपरिहार्यता त्यांनी जाणवली काय करावयास हवे ते ठरल्यानंतर ते घडवून आणण्याचा मार्गही स्वाभाविकपणेच शोधावा लागतो. हा मार्ग शोधत असता, कार्याचा किंवा क्रांतीचा टप्पा महाराष्ट्रात सुरू होऊ शकेल, असा विचारांती त्यांचा निर्णय ठरला आणि ते कृष्णाकाठी आले.

समर्थ रामदास हे परमार्थी संत परमार्थाचा उपदेश देण्यास ते कुठेही कमी पडलेले नाहीत. मोक्षप्राप्तीचे जे सर्वश्रेष्ठ जीवनध्येय प्रत्येकापुढे असावयास हवे, त्याचीही उपेक्षा त्यांनी केली नाही. याला त्यांचा 'दासबोध' हा अद्वैत - तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणारा ग्रंथ साक्षी आहे. पण दासबोधावरूनच असेही दिसते की, केवळ परमार्थ सांगून ते थांबलेले नाहीत. लोकस्थितीतील परिवर्तन हे राजकीय परिवर्तनावर अवलंबून असल्याचे स्पष्टपणे निदर्शनास आल्यावर ते परिवर्तन घडवून आणण्यास समर्थ अशी लोकशक्ती उभी करण्याचा विचारही त्यांना करावाच लागला.

दोष आपलाच

लोकजीवनातील एक सत्य समर्थांच्या ध्यानात अर्थातच आले होते. ते सत्य हे की, ज्या वेळी धर्मांध आक्रमक येऊन पाशवी बळावर एखाद्या समाजाला पराभूत करतात आणि त्याला गुलाम बनवितात तेव्हा खरा दोष आक्रमकांचा नसतो तर पराभूत झालेल्या, तुडविला गेलेल्या, निराधार बनलेल्या समाजाचाच असतो. हे विधान ऐकावयास जरा चमत्कारिक वाटते. पण ते शंभर टक्के सत्य आहे. भारतातील हिन्दू समाजाने हजारो वर्षे वैभव भोगले, जगभर संचार केला, आपल्या श्रेष्ठत्वाची छाप जगावर पाडली, थोर तत्त्वविचार जगाला दिला. मानवी विकासाची दिशा दर्शविली. ग्रीक, हूण, शक इत्यादीना पाणी पाजले व अखेर, आत्मज्ञान दिले, तो मुसलमानी आक्रमकांकडून सर्वस्वी पराभूत झालाच कसा? आज आठशे वर्षे इस्लामी सत्ता दिमाखाने हिंदूंना पायदळी तुडवीत येथे नांदूच कशी शकली? याचे उत्तर एकच. ते असे की, येथील समाज दुबळा, सामर्थ्यहीन बनला. राष्ट्रीय सन्मानाला व विजयाला मारक अशा गुणांच्या आहारी गेला. छिन्न-विच्छिन्न झाला. व हा मऊ घास परक्यांनी सहज गिळला. स्वराज्य जाऊन येथे इंग्रजी राजवट आली, तेव्हा हेच घडले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात अडथळे निर्माण करणारे स्वकीयच होते. महाराजा जयसिंग कोण होते? महाराष्ट्रातील मोंगली हस्तक कोण होते? चंद्रराव मोरे कोण होता?

या अवगुणातील सर्वांत मोठे अवगुण म्हणून व्यक्तिगत संकुचित (जात पात वगैरे) स्वार्थ, सत्ताभिलाषा, मानापमानाच्या खोट्या कल्पना, दुर्निवार उपभोग लालसा व अहंकार इत्यादींचा उल्लेख करावा लागेल. ज्या समाजातील लोक समाजाच्या निरोगी धारणेचा विचार न करता स्वार्थात रत होतात, अंतःकलहात भूषण मानतात, आपल्याच मस्तीत राहातात, तो समाज विघटित, प्रभावहीन व दुबळा बनतो अशी इतिहासाची साक्ष आहे. स्वकीयांच्या विरोधात क्षुद्र अहंकारापायी, परक्यांना साहाय्य करणारे देशद्रोही अशा समाजात निर्माण होतात. फितुरीचा व भ्रष्टाचाराचा सुळसुळाट होतो. असा समाज परक्यांचे भक्ष्य बनतो. परक्यांकडून तुडविला जातो. भारतात हेच झाले. तेव्हा समर्थांनी जाणले की, या समाजातील अवगुण दूर करून काही श्रेष्ठ ध्येयाने त्याला प्रेरित केले पाहिजे. त्याग, बलिदान, विजयाकांक्षा, स्वत्त्वाभिमान यांची दीक्षा समाजाला दिली पाहिजे. त्यासाठी मोहीम मांडली पाहिजे. दुर्गुणांचे निर्मूलन व समाजधारणेला आवश्यक सद्गुणांचे संवर्धन हा जो समर्थांच्या महाराष्ट्र धर्माचा विशेष, त्याची ही पार्श्वभूमी आहे.

प्रपंच आणि परमार्थ

समर्थकाळींच महाराष्ट्रांत असमतोल निर्माण झाला होता, असा उल्लेख मी वर केला आहे. हा असमतोल अशा अर्थाने होता की, पुष्कळसा समाज व्यक्तिगत मोक्षाच्या इच्छेपायी ऐहिकाची उपेक्षा करू लागला होता. संसार असार आहे, जीवनास ऐहिकाची मातब्बरी नाही, परमेश्वर ठेवील तसे रहावे, सोसावे लागेल ते सोसावे, व मुक्ती मात्र मिळवावी अशी निवृत्तिपरता वाढली होती. धर्माने अभ्युदय आणि निःश्रेयस या दोहोंकडेही लक्ष देऊन सार्थ जीवन, श्रेष्ठ जीवन उभे करावयास सांगितले आहे या गोष्टीची उपेक्षा झाली. धर्माचरण व साधना-उपासना यांनाही लौकिक दृष्ट्या काही अनुकूल वातावरणाची गरज असते, या सत्याचा विसर पडला. छत्रपतींच्या स्वराज्य-संस्थापने -नंतर 'उदंड जाहले पाणी । स्नानसंध्या करावया' असा उल्लेख 'आनंदवन भुवन' या प्रसिद्ध प्रकरणात श्रीसमर्थांनी केला आहे. या उल्लेखाचा आशय असा की, मोगली वरवंट्याखाली निर्धास्तपणे धर्माचरण किंवा उपासना करणेही कठिण झाले होते. संपूर्ण हिन्दू जीवनच असुरक्षित होऊन गेले होते. संपत्तीची भयानक लूट झाली होती. खायची प्यायची भ्रांत निर्माण झाली होती. म्हणून आव्हान होते ते ऐहिकात अत्री. जे आव्हान स्वीकारण्यासाठी गरज होती शक्तीची, तेजस्वितेची, विजिगीषेची, पराकाष्ठेच्या प्रयत्नवादाची, कर्तव्य-जागृतीची. थोडक्यात केवळ परत्राचा विचार न करता अत्रीच्या जीवनाची घडी सुव्यवस्थित बसविण्याची हीच गोष्ट शेकडो वर्षे उपेक्षिली गेली व तिचा परिणाम सामाजिक पराभव आणि पराकाष्ठेची दुर्दशा यांच्या रूपाने दिसला.

ऐहिकाकडे मोहरा

म्हणून स्वतःचा प्रपंच नसलेल्या, विरक्तवृत्तिच्या निःसंग श्रीसमर्थांनी महाराष्ट्र धर्म लोकांना सांगितला. त्यांचा मोहरा ऐहिकाकडे वळविला. महाराष्ट्र धर्माचे हे ठळक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. 'आधी प्रपंच करावा नेटका' हे या नव्या प्रवृत्तीपर शिकवणूकीचे सूत्र होते. ही प्रवृत्ती परमार्थ विरोधी नव्हती, तर तिला भगवंताचे शाश्वत अधिष्ठान होते. मानवी कर्तृत्व,पुरूषार्थ, समाज धारणेसाठी प्रापंचिकाने आचरावयाची कर्तव्ये, यांची महाराष्ट्र - धर्मात शिकवण होती. समाजाला हे भान समर्थांनी प्रथम आणून दिले हे राष्ट्रजीवनाला त्यांचे योगदान स्मरावयास पाहिजे आणि तद्नुसार युगानुकूल व्यवहार केला पाहिजे. पण त्याच वेळी एका गोष्टीचे भानही ठेवावयास पाहिजे, ते हे की, त्यांनी समाजाला एकत्र आणण्याच्या, एका ध्येयसूत्रात त्याला बांधण्याच्या आणि तो एकात्म बनविण्याच्या कामी आधार घेतला तो भक्तिमार्गाचा आणि उपासनेचा. 'मनासज्जना भक्तिपंथेचि जावे' आणि 'उपासनेचा मोठा आश्रयो' हे सांगण्यास ते कधी कंटाळले नाहीत. उपास्य दैवते म्हणून प्रभु श्रीराम आणि हनुमंत ही दैवते त्यांनी लोकांपुढे ठेवली. रामकथा ब्रह्मांड भेदून पैलीकडे न्या असे सांगितले. महाराष्ट्र - धर्माचा हा भाग त्यांनी स्वतः आचरला व सर्व शिष्य-शिष्यिणींना आचरावयास लावला. समर्थ स्वतः भजन, कीर्तन करीत असत. रामाचा उत्सव करीत असत. ठिकठिकाणी राम मंदिरे व मारुती मंदिरे त्यांनी स्थापन केली. रामाचा उत्सव कशासाठी ? तर उत्तर आहे, 'रक्षिता देव देवांचा । त्याचा उच्छाव इच्छिला । पराक्रमी, रावणाला ठार मारणारा, देवांचे रक्षण करणारा राम हे पतित समाजाचे प्रेरणा दैवत त्यांनी बनविले. रामाची सगळी गुणवत्ता अनुकरणीय म्हणून समाजापुढे ठेवली. महाराष्ट्र - धर्माच्या प्रवर्तनाचा हा महत्त्वाचा पैलू उपेक्षित राहाता कामा नये.

धर्म संस्थापनेचे कार्य

पूजा - अर्चा, ध्यान-धारणा, दैनंदिन उपासना यांना समर्थ अवश्य महत्त्व देत. पण रूढार्थाने लोक ज्याला धर्म समजत असत त्या कर्मकांडाला त्यांनी धर्म मानले नाही. महाराष्ट्र - धर्म म्हणजे वर्णाश्रम-धर्म नव्हे. प्रत्यक्ष संबंध त्यांनी समाजाच्या ऐहिक जीवनातील लौकिक व पारलौकिक कर्तव्यांशी आणि जीवनात प्राप्त करून घ्यावयाच्या गुणवत्तेशी जोडला. म्हणूनच गृहस्थाश्रमाची महती त्यांनी गायिली.

याकारणे गृहस्थाश्रम । सकळांमध्ये उत्तमोत्तम ।
परंतु तेथे पाहिजे स्वधर्म । आणि भूतदया ॥

ब्रह्मचर्य, वानप्रस्थ आणि संन्यास या तिन्ही आश्रमांचा आधार गृहस्थाश्रम हाच आहे, म्हणून तो नेटका, संपन्न कर्तव्याभिमुख असावा, ही समर्थांच्या महाराष्ट्र - धर्माची आग्रही शिकवणूक होती. रडक्या संसाराचा त्यांनी उपहास केला आहे. स्पृहणीय प्रपंचाची चित्रे रंगविली आहेत. पण संसाराची आसक्ती, कांचन व कामिनी यापायी कर्तव्याची उपेक्षा यांचा त्यांनी निषेध केला आहे. ''आधी लगीन कोंडाण्याचे, मग माझ्या रायाचे'' असे म्हणणारा तानाजी मालुसरे, ''तोफेआधी न मरे बाजी, सांगा मृत्युला'' असे म्हणणारा बाजी प्रभु देशपांडे ही महाराष्ट्र-धर्माचीच निष्पत्ती होती. हा जो समर्थांचा महाराष्ट्र-धर्म आपण म्हणतो, त्याच्या मुळाशी मनुष्याचा एक सहज स्वभाव-गुण आहे, तो समर्थ कधीही विसरले नाहीत. मानवी स्वभावगुण हा की, त्याचा जो संकुचित 'स्व'असतो, तो विशाल करीत गेले म्हणजे महान् त्यागाला तो तयार होतो आणि अचंबित करणारी महत्कार्ये त्याच्या हातून घडतात. 'स्व' ची व्याप्ती स्वदेश, स्वधर्म, स्वराज्य म्हणजेच स्वराज्याचे स्वत्त्व यापर्यंत पोचविली की, समाजात तेज, पराक्रम, मातृ-भूमीची भक्ती, गौरव यांची ओढ बळावते. विजिगीषा प्रकट होते. देशभक्तीचा भाव प्रसृत होतो. शत्रू निर्दाळिले जातात. हिंदुत्वाला अभिप्रेत असलेली, भगवंताला हवी असलेली धर्म-संस्थापना होते. साधूंचे परित्राण होते. महाराष्ट्र -धर्माच्या शिकवणुकीचीच परिणती हिन्दूंचे सार्वभौम सिंहासन निर्माण होण्यात झाली. यात अभ्युदय आणि निःश्रेयसाचा मार्ग सुरक्षित झाल्याची ग्वाही देखील आहे.

महंते महंत करावे


शेवटी, महाराष्ट्र धर्माच्या शिकवणुकीने महाराष्ट्राला भारून टाकण्याचे जे कार्य समर्थांनी केले ते ते एकटेच कधीच करू शकले नसते. 'राज-धर्माच्या' प्रकरणात त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे, ''कार्यकर्त्यांच्या गुणें । कार्यभाग होतो'' ॥ म्हणजे कार्य व्हायचे तर गुणवत्तेचा व सर्वस्व झोकून देणारा कार्यकर्ता हवा. कार्यकर्त्यांची गणुवत्ताच त्यांच्या कार्यातही प्रतिबिंबित होते. म्हणून समर्थांनी प्रयत्नपूर्वक, कठोर शिस्तीचे धडे देऊन कार्यकर्ते घडविले. सर्वत्र विखुरले. मठांच्या रूपाने कार्याची केंद्रे उभी केली. या कार्यकर्त्यांना त्यांनी महंत अशी संज्ञा दिली. 'महंते महंत करावे' अशी जबाबदारी या महंतांवर सोपविली. संघटनेचे व महाराष्ट्र धर्माच्या प्रसाराचे एक तंत्रच निर्माण केले. असा समाजाभिमुख आणि स्वत्वजागृतीचा भगीरथ प्रयास ३०० वर्षांत कोणी चिवटपणे तपानुतपे केला नव्हता. समाजाच्या पराभूत मानसिकतेऐवजी तेजस्वी विजिगीषा निर्माण केली नव्हती. समर्थांचे हे कार्य खरोखर अजोड आहे. म्हणूनच शिव-समर्थ-योग हा महाराष्ट्रांच्या इतिहासातील एक अद्वितीय भाग्य- योग ठरला.

दुर्दैवाने शिवछत्रपतींच्या अकाली झालेल्या मृत्यूनंतर त्यांनी व श्रीसमर्थांनी जी शिकवणूक दिली तिची उपेक्षा होत गेली. अंतःकलह व संकुचित स्वार्थ यांनी डोके वर काढले. तरीही औरंगजेबाचे थडगे येथे बांधले गेले. पण वाढलेल्या अवगुणांमुळे शिवाजी महाराज व श्रीसमर्थ यांचे स्वप्न साकार होऊ शकले नाही. इंग्रजी राजवट येथे आली. आपली मानसिकता पुन्हा पराभूततेची, न्यूनगंडाची, आत्म-विस्मृतीची बनली. आज हिंदू समाज सर्व बाजूंनी संकटग्रस्त आहे. राष्ट्र अत्यंत भय-ग्रस्त व असुरक्षित बनले आहे. अंतःकलहाचा व स्वार्थ, मूल्य-निष्ठेचा अभाव, चारित्र्यहीनता इत्यादी अवगुणांनी जोरात डोके वर काढले आहे. आज पुन्हा समर्थांच्या शिकवणुकीचे स्मरण केले पाहिजे. छत्रपतींच्या ठायी होती तशी विजयाकांक्षा फुलविली पाहिजे. देशाचा गौरवशाली इतिहास यथातथ्य स्वरूपात लोकांना सांगितला पाहिजे. सडके, भ्रष्ट राजकारण गाडून टाकले पाहिजे.

'महाराष्ट्र-धर्माचे' म्हणजेच व्यापक अर्थाने समर्थांनी सांगितलेल्या राष्ट्र-धर्माचे पुनःस्मरण या कामी निश्चितच साहाय्यभूत ठरेल. हे कार्य समर्थ गुणगान करताना विस्मृतीत जाणार नाही असा विश्वास आहे.

- श्री. चं. प. भिशीकर
९१७/८, गणेशवाडी,
पुणे - ४११ ००४

● ● ●



श्रीसमर्थांची हिंदी कविता

- डॉ. स.म. परळीकर



हिंदी ही आज जरी राष्ट्रभाषा म्हणून ओळखली जात असाली तरी ती सुमारे सातशे वर्षांपूर्वीपासूनच आंतरप्रांतीय व्यवहाराची भाषा होती. निरनिराळ्या ठिकाणी भ्रमण करणारे व्यापारी, लढाईच्या निमित्ताने भारतभर संचार करणारे सैनिक आणि तीर्थयात्रेनिमित्त हिंडणारे भाविक आणि मुख्यतः संत महंत विचारांच्या आदानप्रदानासाठी मुख्यतः हिंदीचा वापर करीत असत. संतांनी हिंदीचे महत्त्व ओळखले होते. म्हणून त्यांनी जशी स्वतःच्या मातृभाषेतून काव्यरचना केली आहे तशीच ती हिंदीतून केली आहे. मराठी संतांनी मातृभाषेतून लिहिलेल्या काव्याच्या तुलनेत त्यांचे हिंदी काव्य संख्येने कमी असले तरी त्यांच्या हिंदी काव्यातून सर्व भारतभर आपले विचार पोहोचावेत ही तळमळ व्यक्त झाली आहे. सर्वच मराठी संतांनी कमीअधिक प्रमाणात हिंदीतून काव्यरचना केली आहे. डॉ. विनयमोहन शर्मा यांनी 'हिंदी को मराठी संतोंकी देन' या आपल्या संशोधनपर प्रबंधात मराठी संतांनी केलेल्या हिंदी काव्याचे मार्मिक विवेचनही केले आहे. त्यांच्या या ग्रंथामुळेच मराठी संतांनी केलेल्या हिंदी काव्याची अधिक व्यापक प्रमाणावर शोध घ्यावा अशी प्रेरणा अनेक संशोधकांना मिळाली.

मराठी संतांचे हिंदी काव्य हा विषय अत्यंत व्यापक आहे. मराठी संतांमध्ये संत नामदेवांच्या हिंदी पदांची संख्या इतर संतांच्या तुलनेने अधिक आहे, याचे मुख्य कारण म्हणजे संत नामदेव जवळ जवळ पंचवीस - तीस वर्षे उत्तर भारतातच राहिले होते. नामदेवांच्या खालोखाल संत एकनाथांच्या हिंदी पदांची संख्या लक्षणीय आहे. संत एकनाथसुध्दा या ना त्या कारणाने उत्तर भारतात गेले होते आणि काशीमध्ये तर ते एक वर्षाहून अधिक काळ राहिलेही होते. हिंदीत लिहिलेल्या पदांच्या संख्येचा विचार करून जर कोणाचे नाव घ्यावयाचे असेल तर संत एकनाथांनंतर समर्थ रामदासांचेच नाव घ्यावे लागेल. इतर मराठी संतांच्या तुलनेने समर्थांच्या हिंदी पदांची संख्या अधिक आहे. त्यांनी लिहिलेल्या हिंदी पदांची संख्या दोनशेहून अधिक आहे. यांपैकी काही पदे अनंतदास रामदासी यांच्या 'श्री समर्थांचा गाथा' या संग्रहात समाविष्ट करण्यात आली आहेत आणि त्यांची संख्या ७६ आहे यातील प्रत्येक पदावर राग आणि ताल यांचा उल्लेख करण्यात आला आहे.

समर्थांची हिंदी पदे फार मोठ्या संख्येने हस्तलिखित सामग्रीत विखुरलेली आढळून येतात. प्रा. रा.तु. भगत यांनी धुळ्याच्या श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरातील जवळ जवळ सर्व बाडांचा ढांढोळा घेऊन सुमारे २३ बाडांतून समर्थांची अशी २०७ हिंदी पदे शोधून काढली आहेत की जी आजपर्यंत फारशी उपलब्ध नव्हती. या २०७ पदांमध्ये समर्थांची पूर्वी उपलब्ध असलेली ८ पदे जोडून प्रा.भगत यांनी 'समर्थ रामदासांची हिंदी पदावली' हा ग्रंथ सिद्ध केला आहे. हा ग्रंथ सन १९९७ मध्ये कोल्हापूरच्या 'अजब पुस्तकालय' या प्रकाशन संस्थेतर्फे श्री.अनिल मेहता यांनी प्रकाशित केला आहे. या ग्रंथास डॉ. यू. म. पठाण यांनी मराठीतून तर डॉ. भगीरथ मिश्र आणि डॉ. कमलाकांत पाठक यांनी हिंदीतून अशा तीन मार्मिक प्रस्तावना लिहिल्या असून संबंधित विद्वानांनी प्रा. रा.तु भगत यांच्या संशोधनाचे यथोचित कौतुक केले असून समर्थांच्या हिंदी काव्याची वैशिष्टेही सांगितली आहेत.

समर्थांना हिंदीतून काव्यरचना करण्याची प्रेरणा कशी मिळाली असावी याचा शोध घेण्यासाठी त्यांच्या चरित्रातील काही घडामोडींचा मागोवा घेणे आवश्यक आहे. विवाहमंडपातून पळून गेल्यावर समर्थांनी गोदावरी आणि नंदिनी यांच्या संगमात उभे राहून सतत बारा वर्षे पुरश्चरण केले. त्यानंतर ते देशभ्रमणासाठी नाशकातून बाहेर पडले. सतत बारा वर्षे हिंडत राहून त्यांनी संपूर्ण भारत पालथा घातला. हे देशभ्रमण चालू असताना त्यांचा एकूण स्वभाव पाहाता ते काहीही न करता नुसते फिरत राहिले असतील असे वाटत नाही. लोकांना उपदेश करताना समर्थांनी लोकांनी लिहिले वाचले पाहिजे असे आवर्जून सांगितले आहे. त्यांच्या शब्दांत सांगायचे झाले तर 'दिसामाजी काही तरी ते लिहावे आणि प्रसंगी अखंडीत वाचीत जावे.' हे त्यांनी जसे इतरांना सांगितले आहे. तसेच स्वतःसाठी सुद्धा हे अमलात आणले असले पाहिजे. समर्थ हे नुसते बोलघेवडे संत नव्हते. त्यांनी इतरांना जो उपदेश केला आहे तो स्वतःही त्यांनी तंतोतंत पाळला आहे. 'आधी केले मग सांगितले' असा आदर्श इतरांना घालून देणारे ते साधुपुरुष होते. साधुपुरुष हा शब्द येथे हेतुपूर्वक योजिला आहे. साधुपुरूषाचे एक प्रधान लक्षण संस्कृतातील एका सुभाषितात सांगितले आहे. ते म्हणजे चित्ते वाची क्रियायांच साधूनाम् एकरूपता. याचाच अर्थ असा की एकीकडे भटकंती चालू असताना देखिल ते नित्य काही तरी लिहीत असावेत. या भटकंतीतसुद्धा ते अयोध्येत आणि काशीत दीर्घ काळ राहिले आहेत. हिंदी प्रदेशातील या दोन मुख्य तीर्थक्षेत्रांतील वास्तव्यात त्यांना हिंदीतून काव्य करण्याची प्रेरणा मिळाली असावी. समर्थांच्या समकालीन असा कोणी महान हिंदी कवी नव्हता. तथापि कबीरदास, तुलसीदास, सूरदास, मीराबाई यांचे काव्य त्यांच्या वाचनात आले असावे आणि त्यामुळे हिंदीतून आपणही काव्य करावे अशी प्रेरणा त्यांना मिळाली असावी. याला काही ऐतिहासिक आधार किंवा पुरावे उपलब्ध नसले तरी अनुमानाने आपण त्यांच्या हिंदी काव्यामागची प्रेरणा ओळखू शकतो. समर्थांची आज जरी फक्त २१५ हिंदी पदे उपलब्ध असली तरी बारा वर्षांच्या देशभ्रमणाच्या प्रदीर्घ काळात त्यांनी एवढीच पदे लिहिली असावीत असे संभवत नाही. त्यांनी याहूनही अधिक पदे लिहिली असावीत आणि त्यांचाही शोध घेणे गरजेचे आहे.

समर्थांनी हिंदीतून ज्या विषयांवर पदे लिहिली आहेत त्याचे स्थूल वर्गीकरण करून त्यांची तोंडओळख करून देणे एवढाच मर्यादित हेतू डोळ्या समोर ठेवून हा लेख लिहीला आहे. हिंदी पदांतून समर्थांनी जे विषय मांडले आहेत त्यांच्यावर त्यांनी आपल्या मराठीतून लिहिलेल्या काव्यातही थोडे फार लिहिले आहे. तथापि भाषेची मर्यादा आणि ज्या ज्या प्रांतांतून ते हिंडले तेथील परिस्थिती यांचा प्रभाव त्यांच्या हिंदी काव्यावर दिसून येतो. त्यांच्या हिंदी आणि मराठी काव्यात काही साम्य स्थळे असली (आणि तशी ती असणे हे

अगदी स्वाभाविक मानले पाहिजे) तरी समर्थांच्या हिंदी काव्याचा बाज हा थोडा निराळा आहे.

उदाहरणार्थ, समर्थांनी हिंदीतून जे 'श्रीकृष्णलीला वर्णन' केले आहे तशा प्रकारचे वर्णन त्यांच्या मराठी काव्यात आढळून येत नाही. हे काव्य त्यांनी बहुधा गोकुळ - वृंदावनात केलेल्या मुक्कामाच्या काळात किंवा आग्रा आणि मथुरा या भागातून प्रवास करताना लिहिले असावे. तुलसीदासांची आणि रामदासांची भेट होण्याची शक्यता मुळीच नव्हती. कारण तुलसीदासांच्या मृत्यूनंतर दहाबारा वर्षांनी समर्थ काशीत दाखल झाले. तथापि तुलसीदासांच्या काव्याचा आणि विशेषतः तुलसीरामायणाचा प्रभाव जनमानसावर अगदी ताजा होता. बहुधा यामुळेच समर्थांच्या हिंदी काव्यावर काही ठिकाणी तुलसीदासांचा प्रभाव पडल्याचे जाणवते.

समर्थांच्या हिंदी पदांचे सूक्ष्म अवलोकन केल्यावर त्यांनी जे विषय आपल्या पदांतून मांडले आहेत त्यांचे वर्गीकरण खाली दिल्याप्रमाणे केले आहे.

१. समर्थांच्या हिंदी पदांतून वर्णिलेले श्रीराम आणि रामनामाचे महत्त्व.
२. समर्थांची भक्तिपर हिंदी पदे
३. हिंदी पदांतून समर्थांनी केलेले परमेश्वराचे वर्णन
४. हिंदी पदांतून समर्थांनी केलेले श्रीकृष्णलीला वर्णन
५. हिंदी पदांतून समर्थांनी केलेला उपदेश

वरील प्रत्येक विषयासंबंधी संक्षिप्त माहिती या लेखाखाली दिली आहे.

श्रीराम हे समर्थांचे आराध्य दैवत आहे. त्यांच्या कुळात रामाची उपासना परंपरेने चालत आली होती. स्वतः समर्थांचा जन्मच मुळी रामनवमीचा. त्या दिवशी समर्थांचे वडील सूर्याजीपंत हे रामनवमीचे कीर्तन करीत होते आणि ते रामजन्माची कथा रंगवून सांगत होते. इतक्यात पुत्रजन्म झाल्याची सुवार्ता त्यांच्या कानावर पडली. पुढे श्रीसमर्थांना प्रत्यक्ष श्रीरामांनीच गुरुमंत्र दिल्याची हकीगत बखरीतून वाचावयास मिळते. आपले आई-वडीलांनी ठेवलेले नारायण हे नाव बदलून समर्थांनी रामदास हे नाव धारण केले. त्यांनी आपल्या काव्यात श्रीरामांचा उल्लेख समर्थ या नावाने केला आहे तथापि लोकांनी रामदासांची महान योग्यता पाहून त्यांना समर्थ ही उपाधी बहाल केली आणि ते समर्थ रामदास किंवा नुसते समर्थ या नावाने ओळखले जाऊ लागले.

समर्थांनी आपल्या हिंदी काव्यात रामाच्या सगुण आणि निर्गुण अशा दोन्ही रूपांचे वर्णन केले आहे. त्यांच्या दृष्टीने निर्गुण राम हा चराचर सृष्टी व्यापून राहिला आहे. म्हणून समर्थ म्हणतात-

जीत देखो तीत राम हि राम ।
जीत देखौं तीत पूरन काम ॥ (बाड/क्र.२५६)

अशाच प्रकारचा भाव एका अन्य पदात व्यक्त करताना समर्थ म्हणतात -

रामदास बंदा उठि चले ।
जहाँ जावे तहाँ राम मिले ॥ (बाड/क्र.६६८)

येथे संत तुकारामांच्या 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती' या अभंगाची आठवण होते.

रामावर समर्थांचा इतका ठाम विश्वास आहे की आपल्याजवळ अष्टौ प्रहर राहून आपला उद्धार करणारा रामाशिवाय अन्य कोणीही नाही हे आवर्जून सांगताना समर्थ एका सुंदर हिंदी पदात म्हणतात-

कोउ न आवे सात ।
रामबीन कोउ न आवे सात ॥धृ॥
योही मेरा योही मेरा ।
झूठी है सब बात ॥१॥
जो कुछ है सो झूठा है रे।
दो दिन का सांगात ॥२॥
दास कहे सुन हो जन चातुर ।
छोरी चले एक गात ॥३॥

या पदाचा अर्थ सोपा आहे. जीवनातील एक शाश्वत सत्य पटवून देताना समर्थांनी वापरलेले शब्द तर मार्मिक आहेतच. शिवाय या पदात अगदी स्वाभाविक गेयता आहे.

ज्याप्रमाणे समर्थांनी मराठीतील आपल्या सर्व काव्यांतून रामनामाचा महिमा गाईला आहे त्याचप्रमाणे काही हिंदी पदांतूनही त्यांनी नामस्मरणाचे महत्त्व सोदाहरण पटवून दिले आहे. एका पदात ते म्हणतात-

रामभजेन कुं ढील न करियें ।
काल कसाई कुं धरि धरि डरियें ॥धृ॥
ढील झोरी ढीवरा राम उचारे ।
पतीत व्याध वैकुंठ सीधारे ॥१॥
ढील छोरि रामदास राम ही गावे ।
रसना रयन दीन राम जपावे ॥२॥ बाड. क्र. ३९९

वरील पदाचा भावार्थ हा आहे की, रामाचे भजन करण्यात आळस करू नका. कालरूपी कसाई तुम्हाला मारायला टपला आहे म्हणून त्याची भीती बाळगून आळस न करता रामाचे नामस्मरण करीत राहा. शृंगबेरपुरात राम, लक्ष्मण आणि सीता यांना आपल्या नावेतून गंगेच्या पैलतिरावर पोहोचविणारा नावाडी (ढीवरा) सतत रामाचे नाव जपतो. वाल्या कोळी (पतीत व्याध) नामस्मरणामुळे तरला आणि या दोघांनाही नामस्मरणामुळे वैकुंठात स्थान मिळाले. रामदाससुद्धा थोडासुद्धा आळस न करता रात्रंदिवस (रयन दीन) आपल्या जिभेने रामनाम उच्चारतात म्हणून राम त्यांचाही उद्धार करील यात तिळमात्र शंका नाही.

अशा प्रकारे रामदासांनी आपल्या काही हिंदी पदांतून रामाच्या अलौकिक रूपाचे, त्याच्या असामान्य गुणांचे आणि सामर्थ्यांचे वर्णन केले आहे आणि अशा रामाचे नामस्मरण केल्यामुळे जीवनाचे सार्थक कसे होईल हे काही भक्तांच्या उदाहरणांवरून समजावून सांगितले आहे.

ज्याप्रमाणे नामस्मरणावर समर्थांनी भर दिला आहे. त्याचप्रमाणे त्यांनी भक्तीवरही भर दिला आहे. नारदीय सूत्रात भक्तीची सुंदर व्याख्या केली आहे. ईश्वर विषयक अनन्य प्रेम म्हणजे भक्ती. नारदांच्या शब्दांत 'सा तु अस्मिन परमप्रेमरूपा ।' समर्थांच्या हिंदी पदांतून दोन पातळीवर भक्तीचे निरूपण केलेले आढळते. एक म्हणजे वैयक्तिक पातळीवर आणि दुसरे म्हणजे समाजाला उद्देशून केलेले भक्तिनिरूपण वैयक्तिक पातळीवर जी भक्तिभावना त्यांनी व्यक्त केली आहे. त्यामध्ये रामाविषयी अनन्य प्रेमभाव व्यक्त झाला आहे. रामाच्या शक्तीचे, सौंदर्याचे आणि शीलाचे वर्णन करून त्यांनी रामाविषयीचे आपले अनन्य प्रेम प्रकट केले आहे. ते म्हणतात-

सुंदर शाम मनोहर मूरत
राम बिना कछु और न भावत ॥ (बाड.क्र.१)

राम हेच आपले सर्वस्व आहे हे सांगताना समर्थ म्हणतात-

मेरे तो ग्यान ध्यान सब राम
केवल दुई अछर के नाम ॥ (बा.क्र.१)

ज्याप्रमाणे समर्थांनी व्यक्तिगत पातळीवर रामाविषयी अनन्य

भक्तिभावना प्रकट केली आहे त्याचप्रमाणे त्यांनी आपल्या काही हिंदी पदांतून रामावर अनन्य श्रद्धा ठेवून त्याची भक्ती करा असा उपदेशही लोकांना केला आहे. ते म्हणतात -

प्रेम धरो रे रामचरन पर ॥

काम धाम और दाम कहा तब जब सम काल के हात परा रे ॥ (बा.क्र.१)

अर्थात रामावर प्रेम करा. काम म्हणजे उपभोग, धाम म्हणजे घरदार आणि दाम म्हणजे संपत्ती हे सर्व कालाधीन म्हणजे नश्वर आहे. मग शाश्वत काय आहे? शाश्वत श्रीराम आहेत. म्हणून त्यांच्यावरच तुमचे प्रेम, तुमची भक्ती अढळ राहू द्या. समर्थांच्या मते इतर सर्व गोष्टी किंवा व्यक्ती आपल्यापासून दूर गेल्या तरी राम आपल्याला सोडून कधीही दूर जाणार नाही म्हणून समर्थ म्हणतात-

कोउ न आवे सात

राम बीन कोउ न आवे सात ॥ (बाड. क्र. १३७)

अशा प्रकारे ज्याप्रमाणे समर्थांच्या मराठी काव्यात व्यक्तिगत स्तरावरील भक्तीची अभिव्यक्ती आणि समजाला समजावून सांगितलेले भक्तीचे महात्म्य अशा दोन्ही स्तरांवर भक्तीचे निरूपण केल्याचे दिसून येते त्याचप्रमाणे त्यांच्या हिंदी पदांतूनही या दोन्ही स्तरावर भक्तीचे निरूपण केल्याचे आढळून येते.

समर्थांनी आपल्या काही हिंदी पदांतून परमेश्वराच्या सर्व व्यापकतेचे आणि निर्गुण निराकार रूपाचे वर्णन केले आहे. खरे तर समर्थांनी रामाचे वर्णन करताना तो विश्वव्यापक आहे हे सांगितलेच आहे. तथापि परमेश्वर हे परब्रह्माचे रामाहुनही अधिक व्यापक रूप असल्यामुळे त्या विषयी त्यांनी आपल्या हिंदी पदांत काय सांगितले आहे ते जाणून घेतले पाहिजे. आपल्या एका हिंदी पदात समर्थ स्वतःच ईश्वराच्या स्वरूपासंबंधी प्रश्न करताहेत ' आलख वो निरंजन कैसा हय रे ?' (तो अदृश्य (अलख) परमात्मा (निरंजन) कसा आहे?) आणि स्वतःच या प्रश्नाचे उत्तर देताना म्हणतात. 'किसेहि सरिखा नहिं' म्हणजे तो कोणाहीसारखा नाही. वेदांत ज्याचे वर्णन 'नेति नेति' म्हणून केलेले आहे तेच येथे समर्थांनी सोप्या शब्दांत सांगितले आहे. याच पदांत ते पुढे म्हणतात-

क्या कहुं रे ! नहिं रंग ना रूप रेखा कछु हि

मुसेंहि कहेसा नहिं वो ईलाहि ॥१॥ (बाड क्र. ६६८)

म्हणजे या परमेश्वरास रंग, रूप, आकार यापैकी काहीही नाही आणि त्याचे वर्णन शब्दांत करता येणार नाही म्हणजे तो अनिर्वचनीय आहे. (मुसेंहि कहेसा नहीं वो ईलाही) या ठिकाणी परमेश्वरासाठी समर्थांनी ईलाही हा शब्द वापरला आहे. निर्गुण निराकार परमेश्वराचे ज्ञान करून देण्यासाठी संत सज्जन आणि सद्‌गुरू यांच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असते. म्हणून समर्थ म्हणतात -

हमारे पिरोंने अकल से बताया ।

निराकार अलाई से मो मिलाया ॥(बाड क्र. ६६८)

पिरोंने म्हणजे संतांनी (लक्ष्यार्थाने सद्‌गुरूने) हे ज्ञानाने (अकल से) समजावून सांगितले आणि त्या निर्गुण निराकार परमेश्वराचा साक्षात्कार घडविला. या ठिकाणी समर्थांनी परमेश्वराचा उल्लेख अल्ला या शब्दाने केला आहे. त्याकाळी अनेक मराठी संतांनी परमेश्वराचा उल्लेख अल्ला या नावानेच केला आहे.

त्याकाळी कबीरपंथी साधूंच्यात हिंदू आणि मुसलमानांतील ऐक्य साधण्याची जी विचारधारा प्रचलित होती तिचा थोडा फार प्रभाव समर्थांच्या हिंदी काव्यावरही पडलेला दिसून येतो. उदाहरणार्थ एका पदात ते म्हणतात -

अल्ला निरंजन दो नहि रे ।

समज्यत समज्याना हरि ।

दास कहे जो समज्या रे भाइ।

सोई खुदा मीया का प्यारा ॥ (बाड क्र.५३)

याचा अभिप्राय असा आहे की निर्गुण निराकार परमात्मा (निरंजन) आणि अल्ला हे एकच आहेत. हे समजावून सांगणारे थकले तरी लोकांना ते समजत नाही. रामदास म्हणतात (दास कहे) ज्याला सर्व विश्वात व्यापून राहिलेल्या परमतत्त्वाचे ज्ञान झाले तोच परमेश्वराचा खरा भक्त समजावा.

समर्थ सर्व माणसांच्या देहांत परमेश्वराचे अस्तित्व आहे हे समजावून सांगताना म्हणतात- सब घट माई रे खुदाई (सर्वांच्या शरीरात परमात्मा आहे.) एवढेच नव्हे तर तो परमात्मा साऱ्या विश्वातही व्यापून राहिला आहे. या जगात अशी एकही जागा दाखविता येणार नाही की जेथे परमेश्वराचे अस्तित्व नाही. समर्थांच्या शब्दांत सांगायचे तर -

खालि ज्यागा नाहिं रे

खुदा बिन जानत नाहिं । (बाड क्र.५३)

अशा प्रकारे समर्थांनी आपल्या हिंदी पदांतून परब्रह्म परमेश्वराचे वर्णन केले आहे. हे वर्णन समर्थांनी मराठीतून प्रतिपादित केलेल्या अद्वैत तत्त्वज्ञानाशी जवळीक सांगणारे असले तरी या हिंदी कवितेवर हिंदीभाषी निर्गुणमार्गी कबीरादि संतांच्या विचारांचा आणि भाषाशैलीचा प्रभाव दिसून येतो.

महाराष्ट्रात ज्या देवांची पूजा किंवा उपासना केली जाते त्या सर्वांवर समर्थांनी मराठीत कमीअधिक प्रमाणात काव्य केले आहे. तरी सुद्धा मराठीत त्यांनी श्रीकृष्णावर का काव्य केले नसावे हा प्रश्न अनुत्तरीतच राहातो. ही उणीव त्यांनी आपल्या हिंदी पदांतून भरून काढली आहे. प्रा. रा. तु. भगत यांनी समर्थांची जी दोनशेहून अधिक हिंदी पदे संकलित केली आहेत त्यांमध्ये जवळ जवळ ३६ पदे कृष्णाच्या निरनिराळ्या लीलांवर त्यांनी लिहिली आहेत. बहुधा मथुरा-वृंदावनात त्यांनी जो मुक्काम केला असेल त्या काळात त्यांनी ही हिंदी पदे लिहिली असावीत.

कृष्णभक्तांना सर्वाधिक आकर्षण श्रीकृष्णाच्या सुंदर रूपाचेच असते. समर्थांनी सुद्धा श्रीकृष्णाच्या सुंदर रुपाचे वर्णन केले आहे. एका पदात ते म्हणतात-

नवरस नागर शाम मनोहर ।

सुंदर मूरत गुपाला ॥ (बाड क्र. १)

अशाच प्रकारचे वर्णन त्यांनी अन्य एका पदात केले आहे -

बिलसत ब्रिंदावन नंदलाल

मोहन मदन गुपाळा ॥धृ॥

मोर मुकुट सिरकेसर तिलक झमकत कुंडल लोल ॥१॥ (बाड क्र.१)

श्रीकृष्णाच्या सौदर्याची मोहिनी तर सर्वांनाच आहे पण या सौदर्यांतही ज्यांचा प्रभाव पाहाणारावर प्रकर्षाने पडतो ते म्हणजे श्रीकृष्णाचे सुंदर टपोरे डोळे. त्या डोळ्यांतील जादू काही न्यारीच आहे. समर्थ त्या सुंदर डोळ्यांचे वर्णन करताना म्हणतात-

तेरे नयने में कछु है रे ।

तेरे नयने में कछु है रे ॥धृ॥

मन की बात नयन में आवै।

नयन की बयन बतावै ॥ (बाड क्र. ५३)

म्हणजे श्रीकृष्णाच्या सुंदर डोळ्यांत अपूर्व आकर्षण आहे. त्यांच्या मनातील सर्व प्रेमभाव त्यांच्या डोळ्यात एकवटलेले आहेत. जणू काही डोळे

हे त्यांच्या वाणीचेच (बयन) माध्यम बनले आहेत. (श्रीकृष्ण शब्दांनी न बोलता जणू काही डोळ्यांनीच बोलत आहेत.)

श्रीकृष्णाचे रूप ज्याप्रमाणे मनास मोहून टाकणारे आहे त्याचप्रमाणे त्यांचे गाणे आणि मुरली वाजविणे हे सुद्धा मनास मोहून टाकणारे आहे. समर्थांना संगीताचे वेड असल्यामुळे सर्वांना मोहून टाकणाऱ्या श्रीकृष्णाच्या संगीताचा प्रभाव किती आहे याचे वर्णन करताना समर्थ म्हणतात-

ऐसा है सारंग रे भाई ॥धृ॥
संगित गावे गावे बजावे ।
गावे सबको रिझावे ॥१॥
तन मन की सुधि गयो है ।
बिकल भये हैवान रे ॥२॥ (समर्थ गाथा पद क्र. १६६४)

वरील पदाचा अर्थ सोपा आहे. शेवटच्या ओळीत श्रीकृष्णाच्या संगीताच्या अद्भूत प्रभावाचे वर्णन करताना समर्थ म्हणतात की हैवानाला सुद्धा पाझर फोडणारे हे संगीत आहे. संगीताप्रमाणेच श्रीकृष्णाच्या मुरलीची जादु सुद्धा काही न्यारीच आहे. एका पदात समर्थ म्हणतात -

धुनि सुनि मन राचि रह्यो री नीको न लागत काज्यो ।

(मुरलीची मधुर धून कानावर पडली आणि मन त्याच्यात गुंतून पडले. त्यामुळे कामधाम सुचेनासे झाले.) अशा प्रकारे श्रीकृष्णलीलामृताचे दर्शन त्यांनी आपल्या हिंदी पदांतून घडविले आहे.

ज्याप्रमाणे समर्थांनी आपल्या मराठी काव्यातून लोकांना उपदेश केला आहे. त्याचप्रमाणे त्यांनी तो हिंदी पदांतूनही केला आहे. समर्थांच्या हिंदी पदावलीत ३१५ पदे आहेत. त्यांपैकी ३२ पदांतून त्यांनी प्रत्यक्ष उपदेश केला आहे. या शिवाय अन्य पदांतून अप्रत्यक्ष उपदेशही केला आहे. त्यांच्या उपदेशाचे सार सूत्र रूपाने सांगावयाचे झाले तर खाली दिलेल्या प्रमुख बाबींवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. १. जीवन व्यर्थ घालवू नका. २.कोणतेही काम करण्यात ढिलाई दाखवू नका. ३. मूर्खाची संगत धरू नका. ४.माणसाने दुःख करू नये. कारण दुःख हे जीवनाचे अविभाज्य अंग आहे. ५.जीवनाची नश्वरता ओळखून वागावे. ६. पाण्यात राहून तहानेले राहू नका. ७. दुसऱ्याला दुःख देऊ नका. ८. अहंकाराचा त्याग करा. ९. विचाराने वागा. १०. परमेश्वर हा सर्व जाति - धर्मापासून वेगळा आहे हे ओळखा.

समर्थांच्या हिंदी पदांतून व्यक्त झालेले काही महत्त्वाचे विचार वर सांगितले आहेत. एकाच लेखात सर्वच्या सर्व विचारांचा उहापोह करणे शक्य नाही. तथापि या लेखातील विवेचनाचे सार हेच की समर्थांनी मराठीतून जे प्रबोधन केले आहे तसेच ते हिंदी पदांतूनही केले आहे. दोघांचीही जातकुळी एकच आहे कारण हा उपदेश करणारा महात्मा एकच आहे.

- डॉ. स.म.परळीकर,
'श्रीराम' १८ क्षिप्रा सहनिवास,
कर्वेनगर, पुणे - ४११ ०५२.
दूरभाष : २५४३२३८६

• • •

[redacted]

संत रामदास । मारुती अवतार
कराया उद्धार । जगी आला ॥
बालपणीच ती । अंतरी विरक्ती ।
वैराग्याची मूर्ति । जणू काही ॥
तपश्चर्या थोर । केली ती कठोर
चित्ति निरंतर । रामध्यान ॥
कपाळी आवाळू । शिरी जटाभार ।
तेज मुखावर । आध्यात्माचे ॥
श्री रघुनाथ । प्रसन्न जाहला ।
अनुग्रह दिला । प्रत्यक्ष तो॥
अलौकिक ऐसे । केले तिर्थाटन ।
काढिला पिंजून । देश सारा ॥
भिक्षा मिसे घेई । जन पारखून ।
घेतले वेचून । शिष्य थोर ॥
शिष्योत्तम त्यांचा । शोभला कल्याण ।
काय उपमान । द्यावे त्यासी ॥
पवित्र ते मन । मधुर कीर्तन ।
करी उद्बोधन । भाविकांना ॥
सागरासमान । वाङ्मय विशाल ।
चित्ती तळमळ । उद्धाराची ॥
अमोल ऐसा । केला उपदेश ।
रामनाम घोष । करूनिया ॥
त्यजुनी आसक्ति । स्वये संसाराची ।
चिंता ती विश्वाची । अंतरात ॥
विवेक वैराग्य । भक्ति आणि ज्ञान ।
ऐसा अप्रतीम । संगम हा ॥
भक्ति-साम्राज्याचा । स्वामी रामदास ।
वंदना तयास । नम्रभावे ।

- सौ. प्रभाताई टेंभेकर

• • •

समर्थांची राम उपासना

- प्रा. म.अ. कुलकर्णी तथा
स्वामी प्रज्ञानंद



॥ राघवाची भक्ती ज्ञानाचे मंडण ॥
॥ भक्ताचे भूषण राम एक ॥

समर्थांची कुलपरंपरा व सूर्योपासना

समर्थ रामदास म्हणजेच नारायण ज्या कुल परंपरेत जन्माला आले ते घराणे ठोसर या आडनावाने प्रसिद्ध आहे. या घराण्याचा मूळपुरुष कृष्णाजीपंत. त्यांच्यापासून एकविसावे पुरुष त्र्यंबकपंत. हे रामदासाचे - नारायणाचे आजोबा. सूर्याजीपंत हे नारायणाचे वडील. कृष्णाजीपंतापासून या घराण्यात सूर्योपासना - रामउपासना चालत आलेली होती. जप,तप,ध्यान,उत्सव इत्यादी गोष्टी या कुटुंबामध्ये मनःपूर्वक केल्या जात असत. श्री हनुमानस्वामींच्या बखरीमध्ये या घराण्याविषयी बरीचशी सविस्तर माहिती दिलेली आहे. नारायणाच्या मातोश्रींचे नाव राणूबाई असे होते. सूर्याजीपंत आणि राणूबाई ही दोन्ही नावेही श्रीराम उपासना सूर्य उपासना या घराण्यात पूर्वापार चालत आलेली होती या श्रद्धेस बळकटी देणारी आहेत. जांब - क्षेत्रात हे घराणे मानमान्यता पावलेले होते. गृहस्थाश्रमातील कर्तव्ये निष्ठेने पार पाडावीत तसेच परमार्थ साधना करून धर्माचरणी रममाण व्हावे ही कुळाची रीत होती. भगवान विष्णुची पूजा-अर्चा करावी, अन्नदान करावे सर्वांभूती दया दाखवावी, साधुसंतांचा आदर करावा, पुराण श्रवण करावे, हरिकीर्तनात रममाण व्हावे. हे संस्कार पिढ्यान् पिढ्या या घराण्यात चालत आले होते. सूर्याजीपंत व राणूबाई यांनी निष्ठेने केलेल्या उपासनेचे फळ म्हणून त्यांच्यावर सूर्यनारायणाची पूर्ण कृपा झाली. ब्राह्मणरूपाने भगवंताने त्यांना दर्शन दिले व 'परम भागवत राम उपासक असे दोन पुत्र त्यांना प्राप्त होतील' असा आशीर्वाद दिला होता.

समर्थ रामदासांच्या श्रीरामोपासनेला या कुळपरंपरेने चालत आलेल्या उपासना - संस्कारांची पार्श्वभूमी निश्चितच आहे. बालवयात नारायण बुद्धिमान होता. रानावनातून हिंडत खेळत होता. आई वडीलांची आज्ञा पाळत होता. तसेच आई चिंता करितो विश्वाची' हे सांगण्याइतपत प्रगल्भही होता हे आपण ध्यानी घेतले पाहिजे, निर्मळ, निश्चल, निरंजनी रममाण होण्याचा ध्यास स्वाभाविकपणे त्याला लागला होता म्हणून गृहस्थाश्रमाचा त्याग करून तो नाना पुरःश्चरणे, अनुष्ठाने करीत विरक्तीच्या मार्गाने देव शोधनार्थ घराबाहेर पडला! नाशिकजवळ टाकळी येथे श्रीगंगातीरी बारा वर्षे त्याने तपःश्चर्या केली. गायत्री पुरःश्चरण केले. कडकडीत सूर्योपना केली! इतर कोणाही देव देवतेच्या उपासनेपेक्षा रामदासांना सूर्योपासना अधिक आवडते, श्रेष्ठ वाटते, पटते, हे सुद्धा ध्यानात घेण्यासारखे आहे.

विश्वचःक्षु हा भास्कर । ऐसे जाणती लहान थोर ।
या कारणे दिवाकर । श्रेष्ठाहून श्रेष्ठ ॥
अपार नभमार्ग क्रमणे । ऐसेचि प्रत्यही येणे जाणे ।
या लोकोपकाराकारणे । आज्ञा समर्थांची ॥

सकळ दोषाचा परिहार । करिता सूर्यासी नमस्कार ।
स्फूर्ती वाढे निरंतर । सूर्यदर्शन घेता ॥

या सूर्य गौरवाच्या ओव्या दासबोधामध्ये (द.१६/२स) पुढे येतात त्याचाही संदर्भ या कुलपरंपरेच्या उपासनेमध्ये आढळतो असे म्हणावयास हरकत नाही!....

या सूर्य-उपासनेमुळे स्वतः रामदास तेजोराशी झाले. व्यक्ती - कुटुंब - समाज व राष्ट्र जीवनातील अज्ञान अंधःकार नष्ट करावा हा ध्यास त्यांना लागला. नित्य नवे चिंतन, मनन, नित्य नवी स्फूर्ती - प्रेरणा रूपाने त्यांना मिळे व ते, ही स्फूर्ती, प्रेरणा समस्त समाजाला देऊ पाहात होते, सूर्य जसा लोकोपकारासाठी नभमार्ग आक्रमित असतो तसे आपणही लोकोपकाराकरिताच जीवन जगावे हा दृढनिश्चय रामदासांनी केला. हा सूर्योपासनेचाच परिणाम होता!...

॥ ऐसा हा सविता सकळांचा । पूर्वज होय रघुनाथाचा ।
अगाध महिमा, मानवी वाचा । काय म्हणोनी वर्णावी ॥

असा गौरव समर्थांनी केलेला आहे. सूर्याला 'सविता' असेही एक नाव आहे. सूयते - प्रसूयते सः= ज्याच्यापासून सृष्टी निर्माण होते तो सविता. साहजिकच सूर्योपासना करणाऱ्याचे अंगी नवसृष्टी निर्माण करण्याची शक्ती प्राप्त होते. समर्थांचे अंगी अशी या राष्ट्रजीवनात नव-सृष्टी निर्माण करण्याची शक्यती आली ती या सूर्योपासनेमुळेच!.... अशा अनेक गोष्टी ध्यानात घेतल्यानंतर समर्थांनी 'श्रीराम उपासनेवर' का भर दिला याचेही उत्तर आपल्याला मिळू शकते. रामदासांनी आपली कुलपरंपरा सांगताना - आदिनारायण - विष्णु, ब्रह्मदेव, वसिष्ठ, दाशरथी राम अशीच सांगितलेली आहे. 'श्रीराम' हे दैवत उपासनेसाठी त्यांना विशेष प्रिय वाटावे, हे स्वाभाविकच होते!

उपासनेचे वर्म समर्थ सांगतात।
उपासना सकळा ठायी । आत्माराम कोठे नाही ।
या कारणे ठाई ठाई । रामे आटोपले ॥
ऐसी माझी उपासना । आणिता न ये अनुमाना ।
नेऊनी घाली निरंजना । पैलिकडे ॥

उपासना म्हणजे विश्वरूप अंतरात्म्याची सेवा होय. तिच्या व्यापकतेचे अनुमान बुद्धीला करता येत नाही. उपासनेतील भूमिका व्यापक होत गेली पाहिजे. तसेच उपासकही व्यापक, विराट, होत गेला पाहिजे. ईश्वराची उपासना करता करता परात्पर परमेश्वर कोण आहे? कसा आहे? हे अनुभवता आले पाहिजे. जिवात्मा, शिवात्मा, परमात्मा, जगदात्मा, असा व्यापक विचार करीत गेले पाहिजे. तोच आत्माराम आहे. नादरूप, ज्योतिरूप, साक्षरूप, सत्तारूप, चैतन्यरूप, स्व-रूप सारे एकच आहे, हे ज्याला कळते तो आत्मज्ञानी होय.

साधकाने नित्य श्रवण, मनन, चिंतन करीत करीत स्वस्वरूपाच्या

साक्षात्काराचा ध्यास घ्यावा असे समर्थ आज्ञापितात. आत्मज्ञान हे सर्वश्रेष्ठ. त्यासारखे अन्य काहीही श्रेष्ठ नाही. ''सर्व सांडून, निरंजन धुंडित जावे'' असे समर्थांचे आग्रही सांगणे आहे. उपासनेने त्या निरंजनाला मिठी घालता आली पाहिजे. निर्गुण, निर्मळ, निश्चल अशा त्या शाश्वत तत्त्वाला भिडले पाहिजे, हे अध्यात्माचे सार आहे असे समर्थ म्हणतात.

अशा त्या परब्रह्माची प्राप्ती आपल्याला कशी होईल ? .... समर्थांनी एक युक्ती सांगितली आहे. निर्गुण अनुभवास आणावा । गुणाचेन योगे ॥ ..! गुण नाशवंत आहेत, निर्गुण तत्त्व हे अविनाशी आहे हे मान्य. त्याला सूक्ष्म दृष्टीने जाणायचे असते. श्रवण मनन त्यासाठी आवश्यक आहे. जे अंतरनिष्ठ, ज्ञानी-त्यांच्याकडून हे समजून घ्यावे. सत्शास्त्रांचे श्रवण करीत, सत्संग साधून जे परमार्थात रमतात, त्यांना हे सारे कळते, समजते. संसार बंधनापासून जो मुक्त होतो त्या उपासकाला उपासनेच्या शेवटी त्या खऱ्या देवाची व भक्ताची अखंड भेटी होते. असा सिद्धांत रामदासांनी दासबोधामध्ये मांडला आहे. या सांगण्याप्रमाणे त्यांची शास्त्रप्रचीती तशीच आत्मप्रचीतीही आहे.

समर्थांची टाकळी येथील उपासना - अलभ्याचा लाभ -

समर्थांनी सांगितलेली श्रीरामाची उपासना या दृष्टीने अभ्यासण्यासारखी आहे.

सदुपासना, सत्कर्म, सत्क्रिया, स्वधर्म ।
सत्संग आणि नित्यनेम निरंतर ॥
ऐसे हे अवघेचि मिळे । तरीच विमलज्ञान निवळे ।
नाहीतरी पाखांड संचरे बळे । समुदाई ॥

हाही क्रम साधकाने ध्यानात ठेवावयास हवा.

समर्थांनी टाकळी येथे बारा वर्षे विशेषरुपाने साधना उपासना केली, अनंत जन्माचे, त्यायोगे । दुरित दहन होऊन ब्रह्मप्राप्ती व्हावी, मोक्षप्राप्त व्हावा हा मुख्य उद्देश होता. नव्हे तोच त्यांचा ध्यास होता. 'जन्मास येऊनि अध्यात्म साधावे । नित्य विवरावे सारासार ॥' या भूमिकेनेच ते गृहत्याग करून टाकळीस साधनेकरिता आले होते. सूर्योपासना, गायत्री मंत्र उपासना, या बरोबरच नित्यानित्य विचारणा चाललेली होती. उदासीन वृत्ती, विवेक, वैराग्य, यांचा अभ्यास चालू होता. निरूपणे, कीर्तने याबरोबर वेद पारायणे, चर्चा याही होत होत्या. पंचीकरण, महावाक्यांचे चिंतन सतत चाललेले असे. यातून अमाप पुण्याच्या राशी जोडल्या गेल्या. सुकृताने सीमा ओलांडली. त्यांना आपल्या स्वरूपाचा शोध लागला. ज्ञानियाचे रूप ते प्राप्त झाले. पूर्ण समाधानाची प्राप्ती झाली. समर्थांनी एका अभंगांत हा अनुभव फार सुरेख शब्दांत मांडला आहे.

आलभ्याचा लाभ आकस्मात झाला ।
देव हा ओळला एका एकी ॥१॥
एका एकी सुख जाहले एकट ।
व्यर्थ खटपट साधनांची ॥२॥
साधनाची चिंता तुटली पाहाता ।
वस्तूरूप होता वेळ नाही ॥३॥
वेळ नाही मज देव दरुशणा ।
सन्मुख की जाणा बहुकडे ॥४॥
बहुकडे मज देवाचे स्वरूप ।
तेथे माझे रूप हारपले ॥५॥
हारपले चित्त देवासी चिंतिता ।
दास म्हणे आता कोठे आहे ॥६॥

दुसऱ्या एका अभंगामध्ये समर्थ आपली अवस्था सांगतात-

धन्य माझे भाग्य झाले सफळीत ।
देव सप्रचीत जेथे तेथे ॥१॥
जेथे तेथे देव येर सर्व भाव ।
माझा अंतर्भाव नीवाळला ॥२॥
निवळला भाव निर्गुणी लागता ।
विवेके जाणता नित्यानित्य ॥३॥
नित्यानित्य ते बरे शोधुनि पाहिले ।
मन हे राहिले समाधाने ॥४॥
समाधाने मन जाहाले उन्मन ।
शुध ब्रह्मज्ञान रामदासी ॥५॥

अशी त्या स्वरूपाची, परब्रह्माची रोकडी प्रचीती रामदासांना आली. सर्व संदेह संपून गेले. राम भक्तीने अशी ज्ञानाचीही प्राप्ती झाली. त्याना खरा आत्माराम सापडला.

आपणचि देव आपणाचि भक्त ।
संतसंगे मुक्त आपणची ॥

अशा मुक्त अवस्थेत ते वावरत होते. सर्वत्र असणारे, शाश्वत, निरंतर त्या परब्रह्माशी ते एकरूप होऊन राहीले. समर्थ या अनुभवातील निजगूज सांगतात.

१. रोकडी प्रचीती होते गुरूमुखे ।
फुका सर्व सुखे हाता येती ॥
२. हाता येती बीजे सज्जनाची गुजे ।
प्रचीतीच्या भोजे आनंदला ॥
३. सर्व काही कळे सद्गुरू करिता ।
दास म्हणे आता गुरू करी ॥

अशा श्रेष्ठ अनुभवानी प्राप्ती हीच राघवाची कृपा असे ते सांगतात.

४. राघवाची कृपा सद्य मोक्षफळ ।
तुटे तळमळ चमत्कारे ॥

श्रीरामाच्या उपासनेने हा अलभ्य लाभ झाला असे समर्थांनी आपल्या अनेक अभंगांतून सांगितले आहे. म्हणून श्रीरामाबद्दल त्यांच्या मनी मानसी अपार श्रद्धा आहे. श्रीरामाची कृपा हेच त्यांना आपले वैभव वाटते.

दासाची संपत्ती राम सीतापती ।
जीवाचा सांगाती राम येक ॥१॥
राम एक माता राम एक पिता ।
राम सर्व भ्राता सहोदरू ॥२॥
सोहोदरू विद्या वैभव कांचन ।
सर्वही स्वजन राम एक ॥३॥
राम एक स्वामी रामची कैवारी ।
लाभ तो संसारी राम एक ॥४॥
राम एक ज्ञान राम एक ध्यान ।
रामे समाधान रामदासी ॥५॥

या दिव्य अनुभवामुळे रामदास साधकांना, भक्तांना सांगतात.

क्षण एक राम ह्रदई धरीजे ।
संसारी तरीजे हेळामात्रे ॥१॥
हेळामात्रे राम-नाम होये गती ।
भाग्यवंत घेती सर्वकाळ ॥२॥
सर्वकाळ राम मानसी धरावा ।
वाचे उच्चाराचा नाम घोष ॥३॥

श्रीरामाचे खरे स्वरूप -

असा हा राम अनाथांचा नाथ आहे. भक्तांचा कैवारी आहे. तो सिंहासनी विराजमान झाला आहे. तो महाप्रतापी आहे. सात्त्विकांकरिता तो सत्त्वगुणी आहे आणि दुर्जनांकरिता तो संतापून, क्रोधायमान होऊन त्यांचा संहारही करतो. सज्जनांना तो आधार देतो. त्यांना भवसिंधू पार करतो. तो पतीतांना पावन करतो. योगियासवे लीला करतो. साक्षात शिवशंकरही त्याचे नामस्मरण करतात त्यामुळे शंकराला समाधान प्राप्त होते. महाभय निवारण करण्याचे सामर्थ्य एका रामनामामध्ये आहे. हे रामनाम हरिभक्तांच्या कोटी कुळांचा उद्धार करते। समर्थ सांगतात.

रामनाम कथा श्रवणी पडता ।
होये सार्थकता श्रवणाची ॥१॥
मुखे नाम घेता रूप आठवले ।
प्रेम दुणावले पाहावया ॥२॥
राम माझे मनी शोभे सिंहासनी ।
येकायकी ध्यानी सापडला ॥३॥
रामदास म्हणजे विश्रांती मागेन ।
जीवेचे सांगेन राघवासी ॥४॥

अशा त्या श्रीरामाच्या भेटीसाठी रामदास किती हळवे, व्याकुळ होतात ते पाहाण्यासारखे आहे.

का वो राममाये दुरी धरियेले ।
कठीण कैसे जाले चित्त तुझे ॥१॥
देउनी आलिंगन प्रीती पडिभरे ।
कै मुख पीतांबरे पुससील ॥२॥
घेउनी कडीये धरूनी हनुवटी ।
कै गुजगोष्टी सांगशील ॥३॥
रामदास म्हणे केव्हा संमोखिसी ।
प्रेमपान्हा देसी जननीये ॥४॥

मातेला भेटू इच्छिणाऱ्या पण तिच्यापासून दुरावलेल्या बालकाची आर्तता, व्याकुळता या अभंगांत प्रकट झाली आहे. ती वाचताना आपले चित्त हेलावून जाते. संत नामदेव संत तुकाराम यांच्या अभंगातील कळवळा रामदासांच्याही काही अभंगात आढळतो.

रामदासांची रामोपासना उच्च दर्जाची होती. भजन पूजन, चिंतन मनन याद्वारा त्यांची उपासना उपास्य दैवताच्या विश्वात्मक अनुभूतीचा सोहळा बनून जाते. पतीताला पावन करणाऱ्या जानकी जीवन रामाला, वेगी माझ्या मना पालटावे अशी प्रार्थना ते सतत करतात.

भावनेचा देव भावार्थे भाविला । देव भक्त जाला भावनेचा ।
भावनेचा भक्त भावनेचा देव । भावनेने मुक्त भावितसे ॥
भावितसे मन त्याहुनि तो भिन्न दास म्हणे ज्ञान वोळखावे ॥

हे भक्तीतील वर्मही त्यांनी साधना काळातच जाणलेले दिसते. सगुण राममूर्ती त्यांना प्रिय वाटतेच पण त्याहीपेक्षा रामाचे अमोघ अपरंपार रूप ते त्यांना अधिक प्रिय वाटते.

करी घेता न ये टाकिता न जाये ।
ऐसे रूप आहे राघवाचे ॥
राघवाचे रूप पाहता न दिसे ।
डोळा भरलेसे सर्वकाळ ॥
सर्वकाळ भेटी कदा नाही तुटी ।
रामदासी लुटी स्वरूपाची ॥......

असाही अनुभव ते सांगतात. रामाचा शोध व स्वरुपाचा शोध एकच ठरतो. भक्त जेव्हा द्वैत टाकून देऊन देवासी एकरूप होत जातो. तेव्हा तो व्यापक सुखाच्या, आनंदाच्या शाश्वत सत्तेत मिळून जातो. ही खरी भक्ती, उपासना त्यांच्या हातून घडली होती.

राघवाचे रूप ते माझे स्वरुप ।
तेणे सुखरूप निरंतर ॥

असे धन्यतेचे, कृतार्थतेचे उद्‌गार त्यांनी अनेक अभंगामधून लिहिलेले, सांगितलेले आहेत.

राममाझी माये कै भेटईल ।
वोरसे देईल आळींगण ॥
संसारीचे दुःख दाटले मानसी ।
ते मी तुजपासी सांगईन ॥
उतावेळ चित्त उभारुनी बाहे ।
रामदास पाहे वाट तुझी ॥

असा लडिवाळ हट्ट करणारे, ध्यास घेणारे रामदासच पुढे

देव निराकार । नाही ज्या आकार ।
आकार संव्हार होत असे ॥
परब्रह्म नाही ऐसा ठाव कैसा ।
धन्य तो दैवाचा आत्मज्ञानी ॥

असा सिद्धांत स्वानुभवानेच मांडतात. साधकाने असत्याचा त्याग करून सत्याकडे जायचे असते. आसक्ती टाकून देऊन विरक्तीकडे जायचे असते. तसेच अज्ञान टाकून ज्ञानाचा उपासक व्हायचे असते. समर्थांची एक स्फुट रचना आहे.

अज्ञान जनाचे देव नानापरी ।
त्याची संख्या करी कोण आता ॥
कोण आता देव पावेल तयासी ।
जन्म मरणासी चुकविता ॥
निरंतर देव फुटेना तुटेना ।
चळेना ढळेना कदाकाळी ॥
कदाकाळी देव रचेना खचेना ।
येईना जाईना - तो निरंजन ॥
निरंजन देवा पाहाता दिसेना ।
परी तो नासेना कल्पकोटी ॥
कल्पकोटी गेले देवासी नेणता ।
यातना भोगिता जन्मोजन्मी ॥
जन्मोजन्मी देव जवळी, चुकला ।
प्राणी भांबावला मायाजाळी ॥
सार्थकाचा देव तरीच सापडे ।
जरी काही घडे संत सेवा ॥
परब्रह्म आहे सर्वत्र व्यापक ।
तोचि एक पाहे गुरुमुखे ॥
वस्तुरूप झाला जो कोणी साधक ।
धन्य तोचि एक लोकांमध्ये ॥.....

समर्थांची राम उपासना अशी डोळस, विवेकी आहे. त्यामागे भाविकता, सात्त्विकता, प्रेमळपणा आहे. तशीच ज्ञानसंपन्नता, पांडित्य आणि तपस्वी अनुभवही भरलेला आहे.

नाशिकच्या परिसरात राहून, तपश्चर्या करून रामदास सर्वार्थाने

'योगीराज' झाले. सिद्ध, साक्षात्कारी झाले. या समग्र सृष्टीत सत् चित् आनंदरूपी परब्रह्मच भरून राहिलेले आहे हेच ते नित्य अनुभवीत होते. त्यांचा गौरव, पूर्णकाम, ब्रह्मनिष्ठ, ज्ञानी, नित्यसत्त्वस्थ अशा अर्थपूर्ण शब्दांनी करावा लागेल, 'जग मिथ्या साच आत्मा । सर्वापर तो परमात्मा । अंतर्बाह्य परमात्मा व्यापून असे ॥.... हे त्यांनी जाणले अनुभवले. अशा श्रेष्ठ अधिकार प्राप्तीनंतर तीर्थाटणासाठी भारत भ्रमणासाठी ते बाहेर पडले. सुमारे बारा वर्षे त्यांनी चारही दिशांनी भारत भ्रमण केले. देश, समाज उघड्या डोळ्यांनी पाहिला. त्यामुळे 'चिंतने ऊ र फाटतो' अशी या विरक्त महायोग्यांचीही अवस्था होऊन गेली!

भारत भ्रमणात काय पाहिले?

सर्वत्र धर्माचा लोप झाला होता. लहान थोर सारेच अधर्माने वागत होते. सारा समाज हीन, दीन, दुबळा, स्वार्थी झालेला होता. सारेजण दुर्दशेच्या फेऱ्यात सापडले होते. जाळपोळी लुटालुटी होत. परकीय आक्रमणे येत. मंदिरे, देतदेवता फोडली जात. 'अस्मानी सुलतानी' हे प्रकरण वाचले तरी तत्कालीन अन्याय अत्याचारांचे भयंकर रूप आपल्या ध्यानी येते. समाज मनातील शूरत्वाची भावनाच नष्ट झाली होती. प्रतिकार करावा, अन्याय दूर करावा, धैर्याने संकटावर मात करावी हे लोक विसनच गेले होते. अर्थहीन, कळाहीन असे भोगार्थी पशुजीवनच लोक जगत राहिले होते. रामदास या अवलोकनाने अस्वस्थ होऊन गेले! अवस्था मनीची नाना परीची । किती काय सांगो गती अंतरीची ' - ही मनाची अवस्था ते प्रभु रामचंद्रापुढे मांडतात. 'निशिदिनी जनचिंता लागलीसे उदारा' ही चिंता त्यांच्या अंतर्यामी जागी होतीच. विरक्तानेही जगन्मित्र झाले पाहिजे. सकल जनाच्या सुखाचा विचार केला पाहिजे हे तत्त्वज्ञान त्यांना ज्ञात होतेच. संत पदाला पोहोचलेला महात्मा समुदायाच्या हिताची चिंता वाहात असतो. म्हणून मग त्यांनी सकल समाजाच्या उद्धारार्थ श्रीरामाची, श्रीहनुमानाची उपासना साऱ्यांकरिता व्यापक, स्वरुपात सांगितली. 'राघवाचा वर पावले सत्वर । जनाचा उध्दार करावया ॥ या शब्दात त्यांनी आपले जीवितकार्य स्पष्टपणे मांडले आहे.

श्रीराम व श्री हनुमानाची उपासना -

समर्थांचा श्रीराम हा राजीव लोचन, भवभय मोचन, पतीत पावन असा आहे. संसार खंडन, दानव दंडन, रामदास मंडण हे काम तो करतो. तो भक्तकैवारी, अनाथाचा नाथ आहे. तो दुर्जनांचा संव्हार करतो. राक्षस कंदन, दशकंठ छेदनही करतो हेच त्याचे आगळेपण आहे. श्री वाल्मिकींनी त्या प्रभू रामचंद्राचे अद्भुत चरित्र गायन करून श्रीरामाला भारतीय धर्म-संस्कृतीचा अमूल्य ठेवा बनविले आहे. वाल्मिकींनी आपल्या दिव्य प्रतिभेने लिहिलेले ते अमृतमधुर महाकाव्य आहे...... कोणत्याही काळात आपली तेजस्विता, तपस्विता, तत्परता न सोडता यशस्वी जीवन कसे जगावे याचा विवेक श्रीरामरूपाने सर्वांपुढे आदर्श स्वरूपात उभा राहातो. निरासक्त राहून उत्तम कर्मे कशी करावीत. स्वधर्माचरणच कसे साध्य करावे व त्याद्वारा ईश्वरीय जीवनाची प्राप्ती कशी करून घ्यावी हे प्रभु रामचंद्राच्या आचार - विचार तत्त्वज्ञानामधून कळते म्हणून रामदासांना तो प्रभु श्रीराम अधिक प्रिय वाटतो. आदर्श वाटतो समर्थांचा श्रीराम हा केवळ घनःश्याम हा राम लावण्यरूपी एवढाच नाही. त्यापेक्षा तो कोदंडधारी आहे. महावीर आहे. महाप्रतापी आहे. तो काळाचाही काळ आहे. तो भय निवारण करतो. तो कधीही त्याच्या उपासकांची उपेक्षा करीत नाही. त्याच्या उपासनेने दुश्चितता संपून जाते. तो धर्माचे रक्षण करतो. तो देवादिकांनाही बंदिवासातून सोडवतो. म्हणून रामदासांना तो जिवीचा जिव्हाळा वाटतो. जगत्रय जीवन वाटतो. त्याचे विराट व्यापक रूप वर्णन करताना रामदास सांगतात.

राम आकाशी पाताळी । राम नांदे भूमंडळी ।
राम योगियांचे मेळी । सर्व काळी शोभतो ॥१॥
राम नित्य निरंतरी । राम सबाह्य अभ्यंतरी ।
राम विवेकाचे घरी । भक्ती घरी सापडे ॥२॥
राम भावे ठायी पडे । राम भक्तीशी आतुडे ।
राम ऐक्यरूपी जोडे । मौन पडे श्रुतीसी ॥३॥
राम योग्याचे मंडण । राम भक्ताचे भूषण ।
राम आनंदाचा घन । संरक्षण दासाचे ॥४॥

श्रीरामाइतकीच श्रीहनुमानाची भक्ती समर्थांना प्रिय आहे.

समर्थांचा हनुमान हा वज्रदेही आहे. बुद्धिमंतामध्ये तो सर्वश्रेष्ठ आहे. यश, वैभव खेचून आणणारा आहे. तो कृतांत काळालाही नमवणारा आहे. तो महारुद्र आहे. दुस्तर भव सागर तरून जाण्यास मदत करणारा आहे. तो विरागी, विवेकी, जनहित तत्पर आहे... अशा या दोन वीर दैवतांची पूजा समाजाने करावी म्हणून रामदासांनी त्यांची चरित्रे, आरत्या समाजापुढे भजनकीर्तन, उपासनेसाठी मांडल्या. समर्थांनी -लघुरामायण, सुंदर कांड, युद्धकांड .. एवढाच रामायणातील भाग लिहिला. त्यातून त्यांनी वीरनायक रामकथा विलक्षण प्रभावी शब्दांत मांडली आहे. रामकथा आणि हनुमान कथा यामधून त्यांना समाजाला विवेकवाद, प्रयत्नवाद शिकवावयाचा होता. आत्मकल्याण, समाजकल्याण आणि विश्वकल्याण या कल्पना वेगवेगळ्या नाहीत. त्या परस्परावलंबी आहेत हे समाज मनाला पटवून द्यावयाचे होते. परमार्थ करायचा म्हणजे केवळ पूजा, अर्चा, ध्यानधारणा, जप जाप्य एवढ्याच गोष्टी करीत बसायचे नाही. साधकाने 'नारायण असे विश्वी। त्याची पूजा करीत जावी' असे समर्थ सांगतात. त्याचा अर्थ साधकही विश्वव्यापक झाला पाहिजे. 'पुण्य करावे करवावे । ज्ञान धरावे धरवावे । स्वतः तरावे तरवावे । एकमेका॥... ही समर्थांची शिकवणूक आहे. 'महंते महंत करावे। युक्ती बुद्धीने भरावे । जाणते करूनी विवरावे । नाना देशी ॥ .. हे त्यांनी महंतांना आदेश म्हणून सांगितले आहे. 'पतीत हे जन करावे पावन । तेथे अनुमान करू नये' -हाच समर्थांचा बाणा आहे.

सगुणाची उपासना करीत करीत निर्गुणप्राप्ती करून घ्यावी. व निर्गुणप्राप्तीनंतर कर्तव्य म्हणून विश्वजन उद्धारासाठी प्रयत्न करावेत केले पाहिजेत हा रामदासी बाणा आहे. ही रामसेवा आहे. तरतेन बुडो नेदावे । बुडतयासी'' हे विसरता कामा नये. विश्वाला आत्मवत् पाहणारा महात्मा विश्वकल्याणासाठी तळमळतो. धडपडतो याचेच आदर्श उदाहरण म्हणजे समर्थांचे चरित्र आहे. राघवाची पदे मानसी धरीन । विश्व उद्धरीन हेळामात्रे । हेळामात्रे मुक्त करीन या जना । तरीच पावन राघवाचा ॥ तरीच दास मी झालो पावन । पतीत तो कोण उरो शके ।

राघवाचा वर पावलो सत्वर । जनाचा उद्धार करावया॥

हे व्रत समर्थांनी घेतलेले होते. समर्थांच्या अनुयायांनी तेच पुढे चालविले पाहिजे!...

- म.अ.कुलकर्णी तथा स्वामी प्रज्ञानंद,
२६२, भाग्यश्री को.ऑ.हौ.सोसायटी,
'ई' ताराबाई पार्क, कोल्हापूर ३.
फोन नं. २६५२०२५

● ● ●

आत्मज्ञानप्राप्तीसाठी नामस्मरणात्मक भक्तियोग श्रीगुरूदेव रानडे प्रणित श्रीरामदासांचे भक्तिशास्त्र

- प्रा.डॉ. नरेंद्र सदाशिव कुंटे



निंबरगी संप्रदाय आणि समर्थ संप्रदाय यांचा फार घनिष्ट संबंध असून उभय संप्रदायांचा प्रमाणग्रंथ 'दासबोध' असून 'मनाचे श्लोक' आणि करूणाष्टकेही उपासनेत म्हटली जातात. समर्थ रामदासस्वामी यांनी दासबोध ग्रंथात 'पहावे आपणासी आपण । या नाव आत्मज्ञान' हा जो परमार्थबोध केला आहे त्याची प्रचिती निंबरगी संप्रदायातील गुरूपरंपरेनेः विशेषतः श्रीनिंबरगीमहाराज, श्री भाऊसाहेबमहाराज, श्री अंबुराव महाराज, श्रीगुरूदेव रानडे यांनी घेतली आहेत. पण या सर्वांचे 'दासबोध-मनाचे श्लोक' या दोन्ही विषयक निरूपण आणि चिंतनही प्रसिद्ध आहे. त्यातही श्रीगुरूदेव रानडे यांनी 'रामदास वचनामृत' हा ग्रंथ संपादित / संग्रहित करून त्यातील निवडक ओवीवेचे काढून त्यावर सूत्रभाष्यवजा शीर्षके देऊन, तसेच त्यास विवेचक प्रस्तावना लिहून निंबरगी संप्रदायाचा आध्यात्मिक दृष्टिकोणही उलगडून दाखविला आहे. त्यामुळे 'श्रीरामदासांचे भक्तिशास्त्र' कळून यायला मदत होते. म्हणून त्यांच्या प्रस्तावनेवर आधारित असा लेख इथे नम्रपणाने लिहिला आहे. तसेच दासबोधातील एका अध्यात्मनिरूपणाचा ओवीबंध घेऊन तोही विशद करून दाखविला आहे. अभ्यासकउपासक यांना तो प्रेरक-पूरक-उपकारक होईल.

पूर्वपीठिका -

निंबरगी संप्रदायातील गुरूपरंपरेकडून कोणत्या प्रकारे समर्थ रामदासांच्या दासबोध-मनोबोध-करुणाष्टके यांच्या विषयीचा विचार केला गेला आहे तो अभ्यासक-उपासक यांना पाहता यावा म्हणून त्याविषयीचे एक नोंदवजा-टिपण इथे केले असून नंतर श्री गुरूदेवरानडे यांनी प्रस्तावनेतून उलगडून दाखविलेले भक्तिशास्त्र विशद केले आहे.

निंबरगी संप्रदायाची परंपरा पुढीलप्रमाणे आहेः नवनाथांपैकी रेवणनाथ - मस्त्येंद्रनाथ - रेवणासिद्ध - मरूसिद्ध -काळसिद्ध - निंबरगी महाराज - रघुनाथप्रिय महाराज - भाऊसाहेब महाराज उमदीकर - अंबुराव महाराज - श्रीगुरूदेव रानडे - अशी ही परंपरा आहे. त्यापैकी कोल्हापूरजवळील सिद्धटेकच्या डोंगरावर काडसिद्धांची गुहा आहे.

(१) निंबरगी महाराज (जन्म इ.स.१७८९ सोलापूर व निर्वाण १८८५ निंबरगी) यांनी लिहिलेले (त्यांनी सांगितलेले व रघुनाथाचार्य आद्य व बाबाचार्य काव्य यांनी लिहून घेऊन संपादित केलेले) 'महाराजवरवचन' हे ग्रंथस्वरूपात प्रसिद्ध झाले आहे. त्यात दासबोध व मनाचे श्लोक उधृत केले गेले आहेत. मुळात हा ग्रंथ कानडी भाषेत असून त्याचा अनुवाद श्रीमती पद्माताई कुलकर्णी यांनी केला आहे. शीर्षकासह एकूण ४३ प्रकरणे त्यांत असून हा नाम आणि नीती यावरील उपदेशात्मकवचन-स्वरूपाचा ग्रंथ आहे. (२) श्री रघुनाथप्रिय तथा साधुबुवा (जन्म इ.स.१८२९-निर्वाण इ.स.१८७९) त्यांनी भक्ती प्रसाराचे बहुथोर कार्य केले. (३) भाऊसाहेब महाराज उमदीकर (जन्म इ.स. १८४३ - निर्वाण १९१४) यांनी इंचगेरी मठाची स्थापना करून फार मोठ्या प्रमाणावर भक्तिप्रसाराचे कार्य केले. त्यांनी दासबोध व मनाचे श्लोक यावर निरूपण केले असून ते लक्ष्मणभटजी यांनी त्यांची टिपणे केली होती. त्यावर आधारित ग्रंथ 'दासबोधसुधा' व 'मनोबोधामृत' असून हे दोन्ही ग्रंथ विवेचक प्रस्तावनेसह संपादित केलेले आहेत. संपादन - प्रल्हादराव कुलकर्णी -हे ग्रंथ श्रीगुरूदेव रानडे आश्रम, निंबाळ येथे उपलब्ध आहेत. त्यात दासबोधातील निवडक ओव्यांवर निरूपण केले गेले आहे.(३.१)निंबरगी महाराजांचे आणखी एक शिष्य रामभाऊ यरगट्टीकर हे होते. ते चिन्मडला होते. त्यांचीही अनेक पदे 'कैवल्य वैभव' या ग्रंथात असून समर्थांच्या अध्यात्म विचारांचा त्यात प्रभाव दिसतो. (४) अंबुराव महाराज (जन्म इ.स.१८५७ निर्वाण इ.स.१९३३) इंचगेरीमठात राहून खूप भक्तिप्रसार केला. त्यांनी दासबोधातील निवडक समासावर केलेले विवरण 'दासबोध विवरण' या ग्रंथात त्यांचे शिष्य श्री. रामण्णा कुलकर्णी यांनी विशद केले आहे. हा ग्रंथ गुरूदेव रानडे आश्रमात उपलब्ध आहे. (५) श्रीगुरूदेव रानडे (जन्म इ.स.१८८६-निर्वाण इ.स.१९५७) त्यांनी 'मराठी संत वाङ्मयातील परमार्थमार्ग' या ग्रंथात, तसेच 'रामदास वचनामृत' या ग्रंथात रामदास स्वामींचे कार्य आणि तत्त्वज्ञान हे विशद केले आहे. त्यांचे सर्वच ग्रंथ निंबाळ येथील आश्रमात उपलब्ध आहेत.

निंबरगी संप्रदायातील गुरूपरंपरा व गुरूपदी असलेले साक्षात्कारी संत यांनी 'दासबोध-मनाचे श्लोक' मध्ये सांगितलेले अध्यात्मतत्त्व साधनयोगे जगून दाखविले. ईश्वरदर्शन प्राप्त करून घेतले. भक्तिप्रसार करून आत्मोद्धाराबरोबरच जगतोद्धाराचेही कार्य केले. त्यांच्या समाधिस्थानी / मठात - मंदिरात/ त्रिकाल नामस्मरण, भजन, दासबोध वाचन चालते. पुण्यतिथी-सप्ताहात दासबोध ग्रंथाचे पारायण होऊन ग्रंथसमाप्तीने उत्सवाची सांगता होऊन पुन्हा ग्रंथारंभ केला जातो. दासबोध वाचनानंतर दहा मनाचे श्लोक वाचले जातात. रात्रीच्या भजनात करूणाष्टकेही म्हटली जातात. त्यामुळे या संप्रदायाला स्वरूप संप्रदाय असेही बिरूद लावले जाते. संप्रदायाच्या उपासनेचे स्वरूप 'नित्यनेमावली' या भजनावलीत असून त्यात आत्मप्रचितीच्या खुणा असलेले अभंग व पदे असल्याने सांप्रदायिक-समन्वयही उत्तम रीतीने साधला गेला आहे.

'रामदासवचनामृत'

डॉ. रा.द.तथा श्रीगुरूदेव रानडे यांनी 'अध्यात्मग्रंथमाला' प्रकाशित केली असून त्यात ज्ञानदेव, तुकाराम, एकनाथ, रामदास अशी चार व संतवचनामृत असे पाचवे या स्वरूपात ग्रंथ संपादित/संग्रहित केले असून त्या

सर्वांस विवेचक-प्रस्तावना लिहिली आहे. रामदासवचनामृत हा ग्रंथ त्यांनी १९२६ साली प्रसिद्ध केला. या ग्रंथाची चौथी आवृत्ती आता (इ.स.२०००) प्रसिद्ध झाली आहे. ग्रंथमालेचे प्रयोजन कोणते ? तर श्रीगुरूदेव रानडे सांगतात की, 'लोकांस परमार्थाचे उज्ज्वल स्वरूप महाराष्ट्र वाङ्मयातून उघड करून सांगणे हे होय.' परमार्थाबद्दलच्या निरनिराळ्या भ्रामक कल्पनांचे निरसन करून शुद्ध परमार्थाचे स्वरूप समजावून देणे हे या वाङ्मयाचे पवित्र कर्तव्य आहे, अशी पुष्टीही त्यांनी जोडली आहे. धर्माधर्मातील लढे केवळ अज्ञानामुळे उत्पन्न होतात. पण परमार्थाचे शुद्ध स्वरूप कळल्यास ते लढे नाहीसे करण्याचे सामर्थ्य त्यात असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेत प्रथम त्यांनी चरित्रविषयक पुरावे दिले असून पुढे समर्थांच्या चरित्राचा महत्त्वपूर्ण घटनांच्या आधारे त्रोटक-आढावा घेतला आहे. नंतर मात्र पुढे दासबोध विवरण, संकीर्ण ग्रंथविवरण (जुना दासबोध, मनाचे श्लोक, पंचसमासी, जनस्वभाव गोसावी, करुणाष्टके, काही पदे व अभंग) केले आहे.

ग्रंथरचना त्यांनी दोन भागात (त्याच पुस्तकात)केली आहे. 'भाग पहिला' मध्ये (१) प्रासंगिक (२)तात्त्विक (३) साक्षात्कार (४) कर्मयोग (५)उपसंहार असे भाग करून ओवीबंध उधृत करून त्यास समर्पक शीर्षके दिली आहेत. 'भाग दुसरा' मध्ये (१) जुना दासबोध, (२) मनाचे श्लोक (३)पंचसमासी (४) मानपंचक, (५)निर्गुण ध्यान, (६) जनस्वभाव गोसावी, (७) राममंत्राचे श्लोक (८) करुणाष्टके (९) ऐतिहासिके (१०) सांप्रदायिक अभंग - पदे वगैरे (११) स्फुट प्रकरणे असे भाग करून ओवीबंध शीर्षकासह उधृत केले आहेत.

श्रीगुरूदेवांनी आपल्या लहानपणी शाळेत असताना खाऊला मिळालेल्या पैशातून सर्वप्रथम 'मनाचे श्लोक' हे पुस्तक सज्जनगडावरून मागविले होते. तसेच त्यांनी जमखंडी येथे मारुतीरायाच्या दर्शनोपासनेतून आपल्या सगुणभक्तीला प्रारंभ केला होता. नंतर त्यांनी निर्गुणभक्ती करून आत्मारामाचे दर्शन प्राप्त करून घेतले, हा त्यांच्या जीवनातील संदर्भ उभय सांप्रदायिकांना आनंद देणारा आहे, हे नक्कीच!

'दासबोधविवरण' नामक प्रकरणातून प्रथम समर्थ रामदासांच्या ओवी बंधातून प्रकटलेल्या स्वरूपज्ञानाविषयीची चर्चा श्रीगुरुदेवांनी केली आहे. समर्थांची विश्वस्वरूपदेवाची कल्पना म्हणजे सगुणाकार ईश्वर ही नसून 'आत्माराम' ही आहे. तो आत्माराम कशाने प्राप्त होतो? तर, महावाक्याचा जप केल्याने प्राप्त होतो. महावाक्य म्हणजे काय? तर सद्गुरूमुखातून / सद्गुरूकरवी /समाधिस्थानावरून प्राप्त झालेली नामदीक्षा किंवा मंत्रदीक्षा ही मिळणे म्हणजे ज्ञान होय. नामरूपी ज्ञानाची प्राप्ती झाल्यावर त्याचे अहर्निश-स्मरण करणे ही मुख्य उपासना असून त्यामार्गे 'स्वरूपदर्शन' होऊ शकते. निर्गुण स्वरूपाचे अनुभव / रूप-रंग-तेज-नाद-आकार-रस इ./ येणे म्हणजे ज्ञानप्राप्ती (स्वरूपज्ञान) होणे होय. ' सर्व संतांचे गुह्यज्ञान ते हेच होय, असे भाष्य/ सूत्र त्यांनी नमूद केले आहे. (प्रस्ता.पृ.१६)

'स्वामी कृपेसहित अंतःकरणात वसल्यास त्याला ज्ञान म्हणावे' असे ' ईश्वरदर्शन सापेक्ष ज्ञान' त्यांनी प्रतिपादिले आहे. निंबरगी संप्रदायातील गुरूपरंपरेतील सर्व सत्पुरूष हे याच अर्थाने 'आत्मज्ञानी' म्हणून संबोधिले गेले आहेत. श्री गुरूदेवांनीही त्यांचे सद्गुरू श्रीभाऊसाहेबमहाराज यांना 'आत्मज्ञानी' असे संबोधिले आहे. त्यामुळेच आणि श्रीसमर्थ रामदासांनीही प्रतिपादिले आहे. त्यानुसार 'नाना प्रकारच्या मूर्ती म्हणजे देव या नावास योग्य नसून फक्त अंतरात्माच देव आहे' याची सिद्धता त्यांनी नोंदविली आहे. (तत्रैव) 'जगामध्ये चार प्रकारचे देव प्रसिद्ध आहेत. एक प्रतिमादेव, दुसरा अवतारदेव, तिसरा अंतरात्मादेव व चौथा निर्विकारीदेव असून त्यामध्ये निर्विकारीदेवासच देव म्हणावे' हे समर्थ रामदासस्वामी कथित वचन श्रीगुरूदेवांनी ओवीबंध उधृत करून प्रतिपादिले आहे. कारण त्यांनाही निर्गुण देवाच्या प्रचितीनेच 'देव-प्राप्ती' झाली आहे. त्याला ते 'खरा-देव' म्हणतात; तर समर्थांनी त्यालाच 'रोकडी प्रचिती' असे संबोधून साक्षात्काराच्या संदर्भाने व स्वानुभूतीच्या साक्षित्वाने विशद करून दाखविले आहे.

सद्गुरूकृपा आणि नामसाधन :-

'खरा-देव' कशाने प्राप्त होतो? हा प्रश्न समर्थांनी उपस्थित केला असून तो 'सद्गुरूच्या योगानेच प्राप्त होतो' असे उत्तरही त्यांनी दिले आहे. तो ओवीबंध असाः 'देवासी नाही भानमान । कोठे करावे भजन । हा विचार पाहता अनुमान । होत जातो ॥ भूमंडळी देव नाना । त्याची भीड उल्लंघेना । मुख्यदेव तो कळेना। कांही केल्या ॥ हे ज्ञानदृष्टीने पाहावे । पाहोनि तेथेचि राहावे। निजध्यासे तद्रूप व्हावे । संगत्यागे ॥ ऐसी सूक्ष्मस्थितीगती । कळता चुके अधोगती । सद्गुरूचेनि सद्गती । तात्काळ होते ॥ (दा.१९-५-२१,२३,२८,३०) ''मुख्य देवास शोधून काढणे हेच तत्त्वज्ञानाचे लक्षण होय' या समर्थांच्या वचनाशी श्रीगुरूदेवांची सहमती आहे. कारण त्यांनी तत्त्वज्ञानाचा अभ्यासही देवशोधनासाठीच केला आहे. शिवाय अभ्यासास साधनाची जोड देऊन मुख्यदेव आत्मज्ञान त्यांनी प्राप्त करून घेतले. म्हणूनच 'ज्यास सुख पाहिजे असेल त्याने केवळ रघुनाथभजन केले पाहिजे' असे प्रतिपादन उभयतांनी केले आहे. (प्रस्ता. पृष्ठ १८) रघुनाथभजन केव्हा करता येते? तर सद्गुरूकडून नाममंत्रस्वरूप कृपेची प्राप्ती झाली म्हणजे नामस्मरणाने साधना करून मग ईश्वरदर्शनाने प्राप्त होणारे सुख हाती येते, हा त्यातील मर्थितार्थ होय. त्यासाठी एक समर्पक ओवीबंध सांगता येईल तो असाः 'आता मनासि जे अप्राप्त । ते कैसे होईल प्राप्त । ऐसे म्हणाल तरी कृत्य । सद्गुरूविण नाही ॥ भांडारगृहे भरली । परी असती आडकली । हातास न येता किली। सर्वही अप्राप्त / तरी ते किली ते कवण / मज करावी निरूपण । ऐसा श्रोता पुसे खूण । वक्तयासी ॥ सद्गुरूकृपा तेचि किली । जेणे बुद्धी प्रकाशली / द्वैतकपाटे उघडली । येकसरी ॥ दा.(७-२-१२,१३,१४,१५)

सद्गुरूकडून प्राप्त होणारे 'नाम' ही पहिली कृपा, नामस्मरणाने दिसणारा 'ईश्वर' ही दुसरी कृपा असे दोन्ही अर्थ त्यात समाविष्ठित आहेत. अप्राप्त काय आहे? तर देवच आहे! तो कशाने प्राप्त होईल? तर सद्गुरूकृपांकित नाम प्राप्तीने !! भांडारगृह म्हणजे ईश्वर-दर्शन होय!!! त्यासाठी 'गुरूमंत्र' हा सर्वाधिक महत्त्वाचा आहे असे उभयतांनी प्रतिपादिले आहे. आता, हे रघुनाथ भजन कसे करायचे? तर, नामस्मरणात्मक - भक्तियोगाने होय. तो भक्तियोग समर्थांनी पुढील ओवीबंधात नमूद केला आहे. तो ओवीबंध असाः 'स्मरण देवाचे करावे । अखंड नाम जपत जावे । नामस्मरणे पावावे । समाधान ॥ नित्यनेम प्रातःकाळी । माध्यन्हकाळी सायंकाळी । नामस्मरण सर्वकाळी । करीत जावे ॥ सुख दुःख उद्वेगचिंता । अथवा आनंदरूप असता । नामस्मरणेविण सर्वथा । राहोच नये ॥ हरुष काळी विषमकाळी । पर्वकाळी प्रस्तावकाळी । विश्रांतीकाळी निद्राकाळी । नामस्मरण करावे ॥ चालता बोलता धंदा करता । खाता जेविता सुखी होता । नाना उपभोग भोगिता । नाम विसरो नये ॥ बालपणी तारूण्यकाळी । कठिणकाळी वृद्धाप्यकाळी । सर्वकाळी अंतकाळी । नामस्मरण असावे ॥ सहस्त्र नामामध्ये कोणी एक । म्हणता होतसे सार्थक । नामस्मरता पुण्यश्लोक । होइजे स्वये ॥ नाम स्मरे निरंतर । ते जाणावे पुण्यशरीर । माहादोषांचे गिरीवर । रामनामे नासती ॥ चहू वर्णा नामाधिकार । नामी नाही लहानथोर । जडमूढ पैलपार । पावती नामे ॥' (दा.४.३.२ ते५,७,१४,२० आणि २४) यात नामस्मरण केव्हा करावे? कोणते नाम घ्यावे? ते घेतल्याने काय होते? ते

कोणास घेता येते? इ. प्रश्नांची उत्तरे दिली आहेत.

'नामजप केल्यास चक्रपाणी संतुष्ट होऊन भक्तास सांभाळतो' (प्रस्ता.पृ.२०) अशी फलश्रुती उभयतांनी प्रतिपादिली आहे. सद्गुरूकृपा आणि नामसाधना या दोन्हीशिवाय परमार्थ घडतच नाही, ही उभयतांची दृढ श्रद्धा असल्याने त्यांनी याविषयीचा उहापोह केला आहे. स्वानुभव हाच उभयतांचा निकष आहे.

ज्ञानदृष्टीचे देखणे आत्मदर्शन -

खऱ्या ध्यानाचा मार्ग म्हणजेच अहर्निशी- नामसाधना करून ईश्वराचे दर्शन घेणे होय. त्यायोगे हळूहळू देव व भक्त यांच्यात सख्यत्व घडून येते. सख्यत्वाची परिणती कशात होते? तर, 'देवाच्या इच्छेने वर्तावे । देव करील ते मानावे । मग सहजचि स्वभावे । कृपाळू देव ॥ १ (दा.४-८-२३) इथे निंबरगी महाराजांच्या वचनबोधातील विचार सांगण्यायोग्य आहे. तो म्हणजे: 'आपण कोणतेही कार्य करताना त्यात यश आले, तर ती देवाची कृपा मानावी. अपयश आले तर ती देवाची इच्छा मानावी. म्हणजे कांहीही घडून आले तरी दुःख- निराशा न होता श्रद्धा दृढ होऊन राहते.' आपण देवाचे चिंतन केले असता देव आपली चिंता करतो, या कृपाळू देवाच्या कार्यावर उभयतांचा विश्वास आहे. (प्रस्ता.पृ.२१) संतांचे जीवन ईश्वराधीन असते.

ज्या सद्गुरू कृपांकित नामप्राप्तीने आणि नामस्मरणात्मक भक्तीने ईश्वरदर्शन घडून येते, त्यालाच परब्रह्म म्हटले गेले आहे. परब्रह्माचे स्वरूप कोणते? तर, 'जे चर्मदृष्टीचे देखणे नसून ज्ञानदृष्टीचे देखणे आहे, तेंच परब्रह्म होय' (प्रस्ता.पृ.२२-२३) नामध्यानाने ईश्वरदर्शन घडून येते, त्यालाच साक्षात्कार म्हणतात. त्याचे स्वरूप पुढील ओवीबंधात प्रकटले आहे. तो ओवीबंध असा: 'तैसे आपुलेनि अनुभवे । ज्ञाने जागृतीसी यावे । मग माईक स्वभावे । कळू लागे ॥ दा. ७-४-१३ ॥ ब्रह्म ब्रह्मांडी कालवले । पदार्थासी व्यापोन ठेले । सर्वांमध्ये विस्तारले । अंशमात्रे ॥१५॥ तेजी असे परी जळेना । पवने असे परी चळेना । गगनी असे परी कळेना । परब्रह्म ते ॥३२॥ सन्मुखाची चहुकडे । तयामध्ये पाहणे घडे । बाह्याभ्यंतरी रोकडे । सिद्धचि आहे ॥३४॥ जो जो पदार्थ दृष्टी पडे । ते त्या पदार्थां ऐलिकडे । अनुभवे हे कुवाडे । उकलावे॥३७॥ पोथी वाचू जाता पाहे । मातृकामध्येचि आहे । नेत्री निघोनि राहे । मूदपणे ॥४२॥ चरणे चालता मार्गी । जे आढळे सर्वांगी । करे घेता वस्तुलागी। आडवे ब्रह्म ॥४४॥ ज्ञानदृष्टीचे देखणे । चर्मदृष्टी पाहो नेणे । अंतरवृत्तीचिये खुणे । अंतरवृत्ती साक्ष ॥४८॥' (ब्रह्माचे सर्वांगत अस्तित्व कसे आहे, हे जिज्ञासूंनी दा. २०.१०-१ ते २३ ओव्यातून जरूर पाहावे.) 'हे परब्रह्म वाम-सव्य, अध-ऊर्ध्व; सन्मुख-विन्मुख सर्वत्र एकदम दिसते' (प्रस्ता. पृ. २३) असे श्रीगुरूदेवांनी ओवीबंध देऊन नमूद केले आहे.

समर्थ हे कर्मयोगीसंत आहेत, असे श्रीगुरूदेवांनी म्हटले असून 'आपण करूनि करवावे। आपण विवरून विवरवावे ।' अशी त्यांची कार्यपद्धती आहे (प्रस्ता.पृ.२३) नरजन्मास येऊन । देव पाहून । जन्माचे सार्थक करावे, हा समर्थांचा उपदेश निंबरगी संप्रदायातील उपासकांसाठी गुरूपरंपरेने सांगितला आहेच ! आत्मदर्शनासाठी ज्ञानदृष्टीने पाहणे हवे म्हणजेच नामस्मरणाने निर्गुण देवाचे दर्शन घेणे होय !!

'सगुणाचेनि आधारे । निर्गुण पाविजे निधरि' या समर्थांच्या वचानाचा निंबरगी संप्रदायातील सर्व सत्पुरुषांनी केलेला अर्थ थोडा वेगळा आहे. तो असा की, सगुणभक्तीने परमार्थपथावर वाटचाल करीत करीत निर्गुणभक्ती कडे वळावे हा एक अर्थ रूढ आहेच. पण सगुणाचा आधार कोणता? तर सद्गुरू हेच निर्गुण देवाचे सगुणावतार असून त्यांनी दिलेल्या नाममंत्राच्या आधारे निर्गुण देवाचे अनुभव घ्यावेत. तसेच ईश्वरदर्शन घडून येणे म्हणजे निर्गुण - परब्रह्म ओळखणे होय. त्यासाठी सगुणाधार म्हणजे नामस्मरण, पोथीवाचन- प्रवचन, कीर्तन- भजन, पालखी- प्रदक्षिणा इ. होय. त्याला भाऊसाहेब महाराज उमदीकर यांनी भक्ती - उपाधी असे म्हटले आहे. मुख्य भक्ती म्हणजे नामस्मरण व त्याला पूरक जे सर्व काही ती उपाधी होय. त्यातही उपाधीस सोडू नये आणि उपाधीचे अवडंबर माजवू नये, अशी विवेकदृष्टी ठेवण्याचाही बोध त्यांनी केला आहे. अर्थात भक्तीला प्रारंभ करायचा तर तो सगुण उपासनेनेच केला पाहिजे. मग हळूहळू निर्गुण देवाच्या खुणा कळून येऊ शकतील, हे तर खरेच आहे. देवघर, मठ-मंदिरे येथील मूर्ती-प्रतिमा ही सगुणरूपातच असते. पुढे जसजसे अधिकाधिक नामस्मरण होईल, तसतसे देवाचे दर्शन सर्वत्र आणि सदैव घडून येऊ लागते, ही पारमार्थिक प्रगतीतील उन्नतावस्था होय, हे वेगळे सांगायला नकोच !

आत्मज्ञानी, तोच सद्गुरू -

'जुना दासबोध'चा मागोवा घेताना श्रीगुरूदेवांनी त्यातील 'देह पडो का देव जोडो' अशा भावनेने देवाच्या पाठीशी लागल्यावाचून देवाचे दर्शन व्हावयाचे नाही, या समर्थवचनाला पूर्णत्वाने ग्राह्य मानले आहे. कारण अशी तीव्र-तळमळ आणि साधन-सातत्य असल्याशिवाय ईश्वरप्राप्ती होणे शक्य नाही, अशी त्यांची धारणा आहे. प्रपंच आणि परमार्थ या दोन्ही गोष्टी चालविणे हाच विवेक होय. हा बोध महत्त्वपूर्ण मानण्याचे कारण असे की, निंबरगी महाराज आणि भाऊ साहेब महाराज या दोघांनीही अनुक्रमे वचनबोधात आणि निरूपणात 'प्रपंच आणि परमार्थ हा देवाच्या मनेने / इच्छेने चालतो. म्हणून प्रपंच न सोडता परमार्थ करावा. परमार्थ केल्याने देव प्रपंचही चालवितो' असे स्पष्टपणे सांगितले आहे.

'मनाचे श्लोक' मधील 'प्रभाते रामचिंतन करावे' हा साधनमार्गही उभयतांनी प्रतिपादिला आहे. 'मुख्यदेव जगात चोरला असल्याने तो सद्गुरूवाचून कळत नाही/ दिसत नाही' (प्रस्ता. पृष्ठ २५) असे श्रीगुरूदेवांनी समर्थांचा बोध उधृत करून प्रतिपादिले आहे. देव तर सर्वत्र आणि सदोदित आहेच. पण उपासकाला तो गुरूकृपांकित नामाच्या स्मरणाने कळतो/दिसतो. इतरांना तो दिसत नाही. म्हणून देव चोरला गेला आहे असे अज्ञानीजन म्हणतात. ज्ञानदेवांनीही अमृतानुभवात ' देव प्रकट, ना लपला' असे म्हटले आहे. तिथेही उपासकांना तो साधनयोगे प्रकट आहे. इतरांसाठी तो लपल्याप्रमाणेच आहे. म्हणून सद्गुरूबोध आणि नामसाधना यांचे महत्त्व परमार्थात सर्वाधिक आहे.

'जनस्वभाव गोसावी' नामक प्रकरणात समर्थांनी भोंदू गुरूंची लक्षणे सांगितली आहेत. ईश्वरानुभूतीवाचून बोलणारे ते भोंदू गुरूच होत. 'पण तोच गुरू खरा की जयास अध्यात्मविद्या कळली. व जो आत्मज्ञान पारंगत झाला' असे उभयतांनी म्हटले आहे. (प्रस्ता.पृ.२७) 'समर्थ हे बुद्धिवादी होते, तरी त्यांच्या अंतःकरणात करूणेचा पाझर होता' (प्रस्ता.पृ.२७) असे श्रीगुरूदेवांनी नमूद केले. असून 'करुणाष्टके' ही त्या भाववृत्तीची प्रतिक आहेत असे सूचित केले आहे. विशेष म्हणजे 'करुणाष्टकातील उदगार फार हृदयस्पर्शी आहेत. या करुणावचनांवरून ज्ञान व भक्ती यांची रामदासांत किती उत्तम सांगड होती हे दिसून येईल' (प्रस्ता.पृ.२६) असे श्रीगुरूदेवांनी भाष्य केले आहे, ते अत्यंत समर्पक आहे. समर्थांनी संप्रदाय वाढविण्यासाठी महंतांना आज्ञा केली होती. समुदाय करणे हा त्यांच्या कर्मयोगपर शिकवणुकीचा मुख्य धडा होता. शिव-समर्थ भेटीचा वृत्तांतही महाराष्ट्र धर्म वाढविण्याच्या संदर्भात महत्त्वपूर्ण होता.

समर्थांचे गुरू कोण? असा प्रश्न नेहमी विचारला जातो. पण त्याचे उत्तर समर्थांनी स्वतःच दिले आहे. रामचंद्रांचा दृष्टांत होऊनत्यांना गुरूमंत्र मिळाला

कोणास घेता येते? इ. प्रश्नांची उत्तरे दिली आहेत.

'नामजप केल्यास चक्रपाणी संतुष्ट होऊन भक्तास सांभाळतो' (प्रस्ता.पृ.२०) अशी फलश्रुती उभयतांनी प्रतिपादिली आहे. सद्गुरूकृपा आणि नामसाधना या दोन्हीशिवाय परमार्थ घडतच नाही, ही उभयतांची दृढ श्रद्धा असल्याने त्यांनी याविषयीचा उहापोह केला आहे. स्वानुभव हाच उभयतांचा निकष आहे.

ज्ञानदृष्टीचे देखणे आत्मदर्शन -

खऱ्या ध्यानाचा मार्ग म्हणजेच अहर्निशी- नामसाधना करून ईश्वराचे दर्शन घेणे होय. त्यायोगे हळूहळू देव व भक्त यांच्यात सख्यत्व घडून येते. सख्यत्वाची परिणती कशात होते? तर, 'देवाच्या इच्छेने वर्तावे । देव करील ते मानावे । मग सहजचि स्वभावे । कृपाळू देव ॥ १ (दा.४-८-२३) इथे निंबरगी महाराजांच्या वचनबोधातील विचार सांगण्यायोग्य आहे. तो म्हणजे: 'आपण कोणतेही कार्य करताना त्यात यश आले, तर ती देवाची कृपा मानावी. अपयश आले तर ती देवाची इच्छा मानावी. म्हणजे कांहीही घडून आले तरी दुःख-निराशा न होता श्रद्धा दृढ होऊन राहते.' आपण देवाचे चिंतन केले असता देव आपली चिंता करतो, या कृपाळू देवाच्या कार्यावर उभयतांचा विश्वास आहे. (प्रस्ता.पृ.२१) संतांचे जीवन ईश्वराधीन असते.

ज्या सद्गुरू कृपांकित नामप्राप्तीने आणि नामस्मरणात्मक भक्तीने ईश्वरदर्शन घडून येते, त्यालाच परब्रह्म म्हटले गेले आहे. परब्रह्माचे स्वरूप कोणते? तर ,'जे चर्मदृष्टीचे देखणे नसून ज्ञानदृष्टीचे देखणे आहे, तेंच परब्रह्म होय' (प्रस्ता.पृ.२२-२३) नामध्यानाने ईश्वरदर्शन घडून येते, त्यालाच साक्षात्कार म्हणतात. त्याचे स्वरूप पुढील ओवीबंधात प्रकटले आहे. तो ओवीबंध असा: 'तैसे आपुलेनि अनुभवे । ज्ञाने जागृतीसी यावे । मग माईक स्वभावे । कळू लागे ॥ दा. ७-४-१३ ॥ ब्रह्म ब्रह्मांडी कालवले । पदार्थासी व्यापोन ठेले । सर्वांमध्ये विस्तारले । अंशमात्रे ॥१५॥ तेची असे परी कळेना । पवने असे परी चळेना । गगनी असे परी कळेना । परब्रह्म ते ॥३२॥ सन्मुखाची चहुकडे । तथामध्ये पाहणे घडे । बाह्याभ्यंतरी रोकडे । सिद्धचि आहे ॥३४॥ जो जो पदार्थ दृष्टी पडे । ते त्या पदार्थां ऐलिकडे । अनुभवे हे कुवाडे । उकलावे॥३७॥ पोथी वाचू जाता पाहे । मातृकामध्येचि आहे । नेत्री निघोनि राहे । सूक्ष्मपणे ॥४२॥ चरणे चालता मार्गी । खे आढळे सर्वांगी । करे घेता वस्तुलागी। आडवे ब्रह्म ॥४४॥ ज्ञानदृष्टीचे देखणे । चर्मदृष्टी पाहो नेणे । अंतरवृत्तीचिये खुणे । अंतरवृत्ती साक्ष ॥४८॥' (ब्रह्माचे सर्वांगत अस्तित्व कसे आहे, हे जिज्ञासूंनी दा. २०.१०-१ ते २३ ओव्यातून जरूर पाहावे.) 'हे परब्रह्म वाम-सव्य, अध-ऊर्ध्व; सन्मुख-विन्मुख सर्वत्र एकदम दिसते' (प्रस्ता. पृ.२३) असे श्रीगुरूदेवांनी ओवीबंध देऊन नमूद केले आहे.

समर्थ हे कर्मयोगीसंत आहेत, असे श्रीगुरूदेवांनी म्हटले असून 'आपण करूनि करवावे। आपण विवरून विवरवावे ।' अशी त्यांची कार्यपद्धती आहे (प्रस्ता.पृ.२३) नरजन्मास येऊन । देव पाहून । जन्माचे सार्थक करावे, हा समर्थांचा उपदेश निंबरगी संप्रदायातील उपासकांसाठी गुरूपरंपरेने सांगितला आहेच ! आत्मदर्शनासाठी ज्ञानदृष्टीने पाहणे हवे म्हणजेच नामस्मरणाने निर्गुण देवाचे दर्शन घेणे होय !!

'सगुणाचेनि आधारे । निर्गुण पाविजे निधारें' या समर्थांच्या वचानाचा निंबरगी संप्रदायातील सर्व सत्पुरुषांनी केलेला अर्थ थोडा वेगळा आहे. तो असा की, सगुणभक्तीने परमार्थपथावर वाटचाल करीत करीत निर्गुणभक्ती कडे वळावे हा एक अर्थ रूढ आहेच. पण सगुणाचा आधार कोणता? तर सद्गुरू हेच निर्गुण देवाचे सगुणावतार असून त्यांनी दिलेल्या नाममंत्राच्या आधारे निर्गुण देवाचे अनुभव घ्यावेत. तसेच ईश्वरदर्शन घडून येणे म्हणजे निर्गुण - परब्रह्म ओळखणे होय. त्यासाठी सगुणाधार म्हणजे नामस्मरण, पोथीवाचन- प्रवचन, कीर्तन- भजन, पालखी- प्रदक्षिणा इ. होय. त्याला भाऊसाहेब महाराज उमदीकर यांनी भक्ती - उपाधी असे म्हटले आहे. मुख्य भक्ती म्हणजे नामस्मरण व त्याला पूरक जे सर्व काही ती उपाधी होय. त्यातही उपाधीस सोडू नये आणि उपाधीचे अवडंबर माजवू नये, अशी विवेकदृष्टी ठेवण्याचाही बोध त्यांनी केला आहे. अर्थात भक्तीला प्रारंभ करायचा तर तो सगुण उपासनेनेच केला पाहिजे. मग हळूहळू निर्गुण देवाच्या खुणा कळून येऊ शकतील, हे तर खरेच आहे. देवघर, मठ-मंदिरे येथील मूर्ती-प्रतिमा ही सगुणरूपातच असते. पुढे जसजसे अधिकाधिक नामस्मरण होईल, तसतसे देवाचे दर्शन सर्वत्र आणि सदैव घडून येऊ लागते, ही पारमार्थिक प्रगतीतील उन्नतावस्था होय, हे वेगळे सांगायला नकोच !

आत्मज्ञानी, तोच सद्गुरू -

'जुना दासबोध'चा मागोवा घेताना श्रीगुरूदेवांनी त्यातील 'देह पडो का देव जोडो' अशा भावनेने देवाच्या पाठीशी लागल्यावाचून देवाचे दर्शन व्हावयाचे नाही, या समर्थवचनाला पूर्णत्वाने ग्राह्य मानले आहे. कारण अशी तीव्र-तळमळ आणि साधन-सातत्य असल्याशिवाय ईश्वरप्राप्ती होणे शक्य नाही, अशी त्यांची धारणा आहे. प्रपंच आणि परमार्थ या दोन्ही गोष्टी चालविणे हाच विवेक होय. हा बोध महत्वपूर्ण मानण्याचे कारण असे की, निंबरगी महाराज आणि भाऊ साहेब महाराज या दोघांनीही अनुक्रमे वचनबोधात आणि निरूपणात 'प्रपंच आणि परमार्थ हा देवाच्या सत्तेने / इच्छेने चालतो. म्हणून प्रपंच न सोडता परमार्थ करावा. परमार्थ केल्याने देव प्रपंचही चालवितो' असे स्पष्टपणे सांगितले आहे.

'मनाचे श्लोक' मधील 'प्रभाते रामचिंतन करावे' हा साधनमार्गही उभयतांनी प्रतिपादिला आहे. 'मुख्यदेव जगात चोरला असल्याने तो सद्गुरूवाचून कळत नाही/ दिसत नाही' (प्रस्ता. पृष्ठ २५) असे श्रीगुरूदेवांनी समर्थांचा बोध उधृत करून प्रतिपादिले आहे. देव तर सर्वत्र आणि सदोदित आहेच. पण उपासकाला तो गुरूकृपांकित नामाच्या स्मरणाने कळतो/दिसतो. इतरांना तो दिसत नाही. म्हणून देव चोरला गेला आहे असे अज्ञानीजन म्हणतात. ज्ञानदेवांनीही अमृतानुभवात ' देव प्रकट, ना लपला' असे म्हटले आहे. तिथेही उपासकांना तो साधनयोगे प्रकट आहे. इतरांसाठी तो लपल्याप्रमाणेच आहे. म्हणून सद्गुरूबोध आणि नामसाधना यांचे महत्त्व परमार्थात सर्वाधिक आहे.

'जनस्वभाव गोसावी' नामक प्रकरणात समर्थांनी भोंदू गुरूची लक्षणे सांगितली आहेत. ईश्वरानुभूतीवाचून बोलणारे ते भोंदू गुरूच होत. 'पण तोच गुरू खरा की जयास अध्यात्मविद्या कळली. व जो आत्मज्ञान पारंगत झाला' असे उभयतांनी म्हटले आहे. (प्रस्ता.पृ.२७) 'समर्थ हे बुद्धिवादी होते, तरी त्यांच्या अंतःकरणात करूणेचा पाझर होता' (प्रस्ता.पृ.२७) असे श्रीगुरूदेवांनी नमूद केले. असून 'करुणाष्टके' ही त्या भाववृत्तीची प्रतिक आहेत असे सूचित केले आहे. विशेष म्हणजे 'करुणाष्टकातील उदगार फार हृदयस्पर्शी आहेत. या करुणावचनांवरून ज्ञान व भक्ती यांची रामदासांत किती उत्तम सांगड होती हे दिसून येईल' (प्रस्ता.पृ.२६) असे श्रीगुरूदेवांनी भाष्य केले आहे, ते अत्यंत समर्पक आहे. समर्थांनी संप्रदाय वाढविण्यासाठी महंतांना आज्ञा केली होती. समुदाय करणे हा त्यांच्या कर्मयोगपर शिकवणुकीचा मुख्य धडा होता. शिव-समर्थ भेटीचा वृत्तांतही महाराष्ट्र धर्म वाढविण्याच्या संदर्भात महत्त्वपूर्ण होता.

समर्थांचे गुरू कोण? असा प्रश्न नेहमी विचारला जातो. पण त्याचे उत्तर समर्थांनी स्वतःच दिले आहे. रामचंद्रांचा दृष्टांत होऊनत्यांना गुरूमंत्र मिळाला

होता, असे दिसते. 'वसिष्ठ उपदेशी श्रीरामरायासी । रामें रामदासी उपदेशिले।।' (स्फुटकविता) असे समर्थांनी म्हटले आहे.

'श्री राम जय राम जय जय राम' या तेरा अक्षरी मंत्राचा तेरा कोटी जप केल्यास देवाचे दर्शन होईल, असे अभिवचन समर्थांनी दिले आहे.

अभंग, पदे अशीही समर्थांची काव्यरचना आहे. त्यांत ' एकदा रामाचे दर्शन झाल्यावर पुन्हा राम विन्मुख होत नाही' तसेच 'जसा भाव तसा देव' असेही समर्थांनी प्रतिपादिले आहे. (प्रस्ता.पृ.३०) श्रीगुरूदेवांनी यासंदर्भात असे म्हटले आहे की, एकदा देवाचे स्वरूपदर्शन झाले की, तो साधक मुक्तिमार्गाकडे वाटचाल करीत निघाला हे नक्की ! असे स्वरूपदर्शन सदैव आणि सर्वत्र होऊ लागले की, तो साधक परमार्थात स्थिर झाला.

श्रीगुरूदेवांनी समर्थांच्या अशा निवडक वेच्यातून त्यांच्या अध्यात्मविचारांचे स्वरूप तर स्पष्ट केले आहेच. पण (१)गुरू (२) नाम (३) साधना (४) संप्रदाय (५) प्रचिती ही परमार्थाची पंचपदी अन्य 'वचनामृत' स्वरूप ग्रंथातही नमूद केली आहे. मुख्य गोष्ट म्हणजे माणसाने साधक व्हावे; नाम घेऊ न गुरूपुत्र व्हावे, साधना करावी, साक्षात्काराच्या खुणा अनुभवण्यात, ईश्वराशी एकरूप होऊन जावे. हीच नरदेहाच्या सार्थकतेची खूणगाठ आहे. समर्थांनीही हेच तत्त्व प्रतिपादिले आहे. उभय संतांनी साक्षात्कार पर्यवसायी नामसाधना प्रतिपादिली असून परमार्थात सद्गुरूंचे असलेले महत्त्व पदोपदी विशद केले आहे, असे दिसून येते.

'राघवाचा धर्म जागो'

समर्थांची जी अनेक पदे आहेत, त्यापैकी 'राघवाचा धर्म जागो' ही पांगुळ-रचना मोठी बहारीची आहे. श्रीगुरूदेवांनी 'रामदास वचनामृत' ग्रंथात शेवटी हे पद घेतले असून त्याविषयी त्यांनी म्हटले आहे की, ' अशा रीतीचे हे पद करून देवास '' मागणे निरसी जेणे । ऐसे देगा रामराया'' अशा प्रकारचे एकच मागणे मागितले आहे. हे सर्व पद बहारीचे असल्याने रामदासांच्या निष्कामभक्तीचा येथे कळसच झाला आहे. (प्रस्ता.पृ.३१) जिज्ञासूंनी मुळात हे पद वाचावे. इथे फक्त त्यातील पारमार्थिक - उपदेशाचा आढावा घेतला आहे. एक प्रकारे ही पसाय - प्रार्थनाच आहे. 'भरत गा खंडामाजी । शरयू तीर बा गांव । धर्माचे नगर तेथे । राज्य करी रामराव ।।' अशी या पदाची सुरुवात आहे. या नरजन्मात देहातील अंतःकरणात आत्माराम राहतो, राज्य करतो, देवास पाहणे हाच धर्म असून तो मन-बुद्धी-शरीरासह साधकाने पाळावयाचा आहे. सांसारिक अहंकाराने मी पारमार्थिक वाटचाल करण्यास असमर्थ आहे, हेच माझे पांगुळपण आहे. परंतु ही वाटचाल करण्याचे बळ मला माझे सद्गुरू (प्रभू श्रीरामचंद्र) देतील आणि मी त्यांच्या धर्म नगरीपर्यंत चाऊन पोहोचू शकेन. माझे मागणे एवढेच आहे की, 'राघवाचा धर्म जागो । सर्व अधर्म भागो । अज्ञान निरसोनिया । विज्ञानी लक्ष लागो ।।धृ.।। भक्तिमार्गी होता यावे यासाठी अधर्म म्हणजे परमार्थविरहित जे जे काही ते ते नाहीसे होवो. माझे अज्ञानही नाहीसे होवो. साधनाधीष्ठित नामस्मरण आसनासिद्ध होऊन मला करता यावे, म्हणजे 'प्रयोगाअंती - दर्शनप्राप्ती' हे विज्ञान मला साध्य होईल. ज्ञान म्हणजे गुरूमंत्र, अज्ञान म्हणजे भक्तिविरहित गोष्टी नष्ट होणे, विज्ञान म्हणजे ईश्वरदर्शनाची प्राप्ती होणे, असा त्यातील भावार्थ आहे. 'मीपणाचे मोडले पाय। म्हणून पांगुळ जाहलो' ही गोष्ट खरी पण आता ' तुपणाची कीर्ति देई । ऐकोनिया शरण आलो ।।' भक्तीसाठी मी 'भजनभिंतीवर' बसलो आहे. ही भजनभिंत म्हणजे नामस्मरणासहित भजन-कीर्तन, निरूपण-प्रवचन,पोथीवाचन, पूजा, प्रदक्षिणा, पालखी इ. होत. म्हणजेच 'भक्ती-उपाधीसह' मी परमार्थमार्गावरील वाटचाल करण्यास सिद्ध झालो आहे. 'प्रेमफडके' पसरून मी त्यावर बसलो आहे. 'कृपादान' मागत आहे.

नवविधाभक्ती हा माझा भक्तीमार्ग असून भावशुद्धी हे बळ आहे. ज्ञानकाठीचा आधार घेऊन मी वैराग्याचे कांबळे पांघरले आहे. मला दासीहातीचे दान म्हणजेच रिद्धी-सिद्धीच्या हातून कामनापूर्ती नको आहे., तुझ्याशिवाय/दर्शनसुखाशिवाय मला दुसरे तिसरे कांहीच नको आहे. तुझी कृपाच मला फक्त हवी आहे. मायारूपी थंडी आणि मोहरूपी ताप मला नको आहे. गुरूबोधाचे ताक मला दे. निष्कामतेची भाकरी दे. हे मागणे मागितल्यावर 'रामदास पांगुळासी । रामे दीधलिया दान । घेणेचि निरसले । कैसी मागण्याची खूण ।। देणे घेणे निरसोनिया । पूर्ण केले परिपूर्ण ।। दाता ना याचक तेथे । सहजीसहज संपूर्ण ।' अशी सद्गुरूच्याविषयीची कृतज्ञता समर्थांनी प्रकट केली आहे. सांप्रदायिक उपासनेत सज्जनगडावर तसेच अन्य सर्वत्र समर्थांचे उपासक '' 'कल्याण करी रामराया' हे मागणे मागतात. समर्थांनी हेच मागणे श्रीरामाजवळ / सद्गुरूंजवळ मागितले आहे. आपणही त्यांचेजवळ हेच मागणे मागू या ! आत्मकल्याण आणि जनकल्याण होऊन जीवन आनंददायी व शांती पर्यवसायी व्हावे, म्हणजे त्यात आपोआपच सुख-समाधान-तृप्ती भरून राहील, असे आपल्याला म्हणता येईल.

समर्थांनी आपल्या 'ओवी - अभंग - पदे' यामधून प्रकट केलेल्या 'आत्मज्ञान प्राप्तीचा-भक्तिमार्ग' निंबरगी संप्रदायाने साधनाधिष्ठित आसनासिद्ध'नामस्मरणात्मक - भक्तियोगाने' आचरिला आहे, हा उभय संप्रदायातील फार मोठा ऋणानुबंध आहे. ।। जय जय रघुवीर समर्थ ।।

- प्रा.डॉ. नरेंद्र सदाशिव कुंटे

'प्रज्ञा' अ-७४ आसरा सोसायटी,

होटगी रस्ता, सोलापूर - ४१३ ००३

• • •

समर्थ रामदास आणि महापुरुष शंकरदेव

- डॉ. सौ. रजनी पतकी



भारतीय तत्त्वज्ञान व संस्कृती यांचा मागोवा घेता असे निदर्शनास येते की, ज्या ज्या वेळी समाज-जीवनात नैतिक मूल्यांची घसरण होते व वैचारिक पातळी अत्यंत खालावते, त्या त्या वेळी संतांनी जीवनदर्जा उंचाविण्यासाठी, मूल्यवर्धनासाठी व वैचारिक सुतल निर्मितीसाठी मार्गदर्शन केले आहे. हाच अनुभव पुन्हा एकदा ख्रिस्ताब्दाच्या सुरुवातीस जेव्हा भारत एका गुंतागुंतीच्या परिस्थितीतून मार्गक्रमण करीत होता, तेंव्हा आला. त्यावेळी नाथ, वैष्णव, शैव, वारकरी आणि शिख धर्म - संप्रदायांनी नैतिक आणि निष्काम भावनेने कर्तव्य कर्माचे आचरण यांची शिकवण देऊन देशास गुंतागुंतीच्या परिस्थितीतून बाहेर काढले व सुमार्गावर आणले आणि भक्तिमार्गाकडे वळविले. वैष्णवसंतांनी म्हणजे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर (इ.स.१२७३-१२९५), नामदेव (इ.स.१२७०-१३५०), रामानंद (इ.स.१४०० ते १४७०), कबीर (इ.स.१४४०) वल्लभाचार्य (इ.स.१४७९ ते १५३१), चैतन्यदेव (इ.स.१४८५-१५३३), विशेष गुण संपन्न शंकरदेव (इ.स.१४४९-१५६९) आणि समर्थ रामदास (इ.स.१६०६ - १६८०) या सर्वांनी समाजाचे अवमूल्यन थांबवून त्यास उन्नत केले व त्यासाठी त्यांनी लोकांना त्यांच्या त्यांच्या बोलीभाषेतून ज्ञान दिले. या संतांपैकी समर्थ रामदास आणि महापुरुष शंकरदेव यांच्या कार्यप्रणालीत व तत्त्वज्ञानात अनेक साम्यस्थळे आढळतात. त्याबाबत कांही चिंतन करणे आजच्या विचार परिवर्तनाच्या लाटेच्या दृष्टीने सुयोग्य होईल.

समर्थ रामदास आणि महापुरुष शंकरदेव यांच्या काळातील सामाजिक परिस्थिती -

श्रीमंत शंकरदेवांचा जन्म आसाम प्रदेशात अशा वेळी झाला की जेव्हा देशामध्ये फार मोठी सामाजिक असामंजस्यता होती. तंत्रमार्ग, पशुबळी, अंधश्रद्धा जाती - जमाती संकल्पना इत्यादींचा प्रभाव सर्वत्र होता. सर्वव्यापक परमात्मा हा सर्वसामान्यांच्या अवाक्याबाहेर होता. ईश्वरभक्ती ही फक्त सण-समारंभांशी जोडली गेली होती. खरा धर्म लोकांना ज्ञात नव्हता. शंकरदेवांनी लोकांना अशी भक्ती शिकविली की ज्यामध्ये जात - पातीची मर्यादा नव्हती, सण - समारंभांचे तसेच संप्रदायाचे बंधन नव्हते; तद्वत् त्यांनी सर्व लोकांना त्यांच्या 'एकशरणनामधर्म' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नव-वैष्णव प्रणालीकडे आकर्षित करणारे, फलद्रुप होणारे प्रचंड वाङ्मय निर्माण केले.

महाराष्ट्रातील समर्थ रामदासांचा जन्मही अशा वेळी झाला की ज्या वेळी राजकीय आणि सामाजिक परिस्थिती अत्यंत बिकट होती. मुस्लीम राजवटीने प्रदेश जिंकला होता. ब्राह्मण कर्तव्यच्युत झाले होते. स्त्रियांची स्थिती अत्यंत वाईट होती, त्या आपल्या घरातही सुरक्षित राहिल्या नव्हत्या. शेतकऱ्यांना त्यांच्या तयार धान्यांची शाश्वती वाटत नव्हती. कारण शत्रुसैन्य कधी लुटमार करेल ते सांगता येत नव्हते. ते दिवस अनिश्चिततेचे होते. समर्थ (महाराष्ट्रात रामदास समर्थ या नावाने सुपरिचित आहेत) बारा वर्षे कडक तपाचरण करून सर्व भारतभर तीर्थाटनास गेले होते. त्यावेळी त्यांनी स्वाभिमान हरवून बसलेल्या समाजाचे अत्यंत जवळून निरीक्षण केले. त्यांनी समाजात शक्ती जागृती करण्याचा निर्णय घेतला त्याचबरोबर शत्रूशी लढण्याची उर्मी निर्माण करण्याचाही विचार केला. अर्थातच हे सर्व त्यांनी भक्तीच्या ठोस पायावर उभारायचे ठरविले. ते म्हणतात ''पहिले ते हरिकथा निरुपण । दुसरे ते राजकारण । तिसरे ते सावधपण सर्वविषयी ॥'' (दासबोध -११.५.४) हरिकीर्तनास त्यांनी प्रथम स्थान दिले व विधायक राजकारणास दुसरे तर सतर्कता तृतीय स्थानावर ठेवली. पण या त्रीसूत्रीवर त्यांनी अवघ्या महाराष्ट्रचे स्वत्त्व जागृत केले. याचबरोबर समर्थांनी दैनंदिन गृहस्थी कर्तव्यासही भक्तीचे अधिष्ठान दिले. समर्थांनी छत्रपती शिवाजी महाराजांना हिंदवी स्वराज्य स्थापन करण्यास मोठा आधार दिला. त्यांच्या या राजकारणातील कार्यामुळे संतांच्या नाम - घोषातः निवृत्ति - ज्ञानदेव - सोपान - मुक्ताबाई - नामदेव - एकनाथ - तुकाराम त्यांचे नाव समाविष्ट केले गेले नसावे. यद्यपि ते संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे समकालीन असले तरी ! तरीही ते एक प्रभावी संत म्हणून सर्व महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत, अनुकरणीय व अभ्यसनीय आहेत. सर्व सामान्य जनतेने या दोन महनीय संतांना प्रदान केलेली उपाधी - मानवधर्माचा प्रचारक, तत्त्वज्ञ, सामाजिक, नव-निर्माण कर्ता, कलाकार, संगीतकार, नाटककार, कवि, रंगकर्मी आणि भाषा शास्त्रज्ञ इ. गुण ज्यांच्यामध्ये एकत्रित झाले होते त्या शंकरदेवांना लोक 'महापुरुष' म्हणू लागले. 'श्रीमंत' म्हणू लागले. राजकारणी, कवी, तत्त्वज्ञ, समाजघडण करणारा, संगीतकार, गायक, लेखक, मानसशास्त्रज्ञ, शिक्षक इ. गुण ज्यांच्यामध्ये एकत्रित झाले होते त्या रामदासांना लोक 'समर्थ' म्हणू लागले. हे दोन महात्मे जरी विभिन्न काळात होऊन गेले असले तरी त्यांच्यामध्ये साधर्म्य आहे आणि त्यांचे कार्यही विलक्षण आहे.

कौटुंबिक परिस्थिती -

जमीनदार, प्रतिष्ठित व सर्व प्रकारची राजकीय मदत मिळणाऱ्या भूयान या प्रसिद्ध कायस्थ कुटुंबात शंकरदेवांचा जन्म झाला होता. समर्थ रामदासही सुसंस्कारित, विद्याविभूषित अशा ब्राह्मण कुटुंबात जन्मले होते. या कुटुंबात सूर्योपासना व रामभक्ती परंपरागत सुरू होती.

भ्रमणयात्रा -

शंकरदेवांनी त्यांच्या आयुष्यात दोन वेळा यात्रा केली. त्यांनी जगन्नाथ पुरीस भेट दिली. त्या वेळी त्यांचा वैष्णव संप्रदायाशी जवळून संबंध आला, व ते भक्ति तत्त्वामुळे जास्त प्रभावित झाले. समर्थ रामदासांनी आयुष्यात एकदाच पण सलग बारा वर्षे भारत भ्रमण केले आणि नंतर महाराष्ट्र ही कर्मभूमी निवडून तेथेच जनहितासाठी प्रसार व प्रचार करण्यासाठी भ्रमंती केली. त्यांनी भक्ती तत्त्वज्ञान व बलोपासनेसाठी हनुमान उपासना यांची शिकवण दिली. त्यांना एकांतवास रूचत असे. त्यांनी चिंतन व लेखनासाठी डोंगरातील घळींमध्ये वास केला. त्यांच्या निवासामुळे पवित्र क्षेत्र बनलेली शिवथरघळ आज उपासकांचे श्रद्धा व साधना स्थान आहे.

वाङ्मयीन कार्य -

महापुरुष शंकरदेव व समर्थ रामदास दोघेही महान् लेखक म्हणून ज्ञात आहेत. शंकरदेवांनी आसामी भाषेत तीस मोठे ग्रंथ लिहिले आहेत. यामध्ये नाटकांचा समावेश असून भागवत महापुराणाच्या सहा स्कंधांचे भाषांतर आहे. याशिवाय रामायण उत्तर कांड व रामविजय यांचेही लेखन बोली भाषेत केले आहे. त्यांची अतिशय प्रसिद्ध अशी रचना म्हणजे ''कीर्तन घोष'' ही होय. त्यांनी 'बार-गीते' म्हणजे शास्त्रीय गायनावर आधारित अशी भक्तिगीतेही लिहिली आहेत. त्यांनी संस्कृत भाषेत 'भक्तीरत्नाकर' हा ग्रंथ लिहिला असून त्यामध्ये वैष्णव संप्रदायाची नैतिक तत्त्वे व भक्ति तत्त्व यांचे विवेचन स्वतःच्या नव-वैष्णव प्रणालीनुसार केले आहे. त्यांच्या गद्य लेखनाबरोबरच १५,००० काव्यांचे लेखनही नेत्रदीपक आहे. (Shankardev Studies in culture by Sri. Bhalachandra Chaudhari P.44,45).

समर्थांनी गुरु-शिष्य संवादात्मक 'दासबोध', तत्त्वविवेचन करणारा ग्रंथ ''आत्माराम'' मानसशिक्षण देणारे 'मनाचे श्लोक' आणि विविध विषयांना स्पर्श करणारे 'स्फुट काव्य' हे ग्रंथ लिहिले ते आज अभ्यासकांचे श्रद्धा स्थान आहेत. हे ग्रंथ समर्थांची वाङ्मयपूर्ती आहेत. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी राजे यांना लिहिलेली पत्रे प्रसिद्ध आहेत. त्यांनी लिहिलेले 'मारुती स्तोत्र' हे लोकांच्या नित्यपठणात आहे. त्यांनी विविध देवतांच्या उदाहरणार्थ, गणपती, शंकर, खंडोबा, हनुमान, श्रीराम इत्यादींच्या आरत्या लिहिल्या आहेत त्या नित्य पूजेत म्हटल्या जातात. त्यांची प्रसिद्ध रचना 'कल्याण करी रामराया' ही ज्ञानेश्वरांच्या पसायदानाप्रमाणेच स्वीकृत झालेली आहे. त्यांची 'करुणाष्टके' म्हणजे अंतःकरणपूर्वक ईश्वर प्राप्तीचे उत्कृष्ट निदर्शक आहेत. ही प्राप्ती शंकरदेवांनीही स्वीकारली आहे. समर्थांनी रामायणातील किष्किंधाकांड, सुंदरकांड व युद्धकांड यांच्यावर भाष्य केले आहे.

वैष्णव संप्रदाय आणि तत्त्वज्ञान -

शंकरदेवांनी भागवत महापुराण आणि त्यावरील श्रीधर स्वामी यांनी लिहिलेल्या टीकेचा सखोल अभ्यास केला होता. त्यांनी भागवत महापुराण हाच ग्रंथ संप्रदायाचा प्रमुख अथवा मूळ ग्रंथ म्हणून निवडला. ते संस्कृत पंडित असल्याने त्यांना भारतीय तत्त्वज्ञान अवगत होते. विश्वनिर्मिती संबंधात त्यांनी स्वतःचे वेगळे विवेचन दिले. त्यांच्या 'कुरुक्षेत्र' आणि 'अनादिपातन' या रचनेत योगतत्त्वज्ञानही दिसते. शंकरदेवांच्या तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने 'पुरुष हा निराकार, तेजस्वी एकमेवाद्वितीय व सर्व जीवांचा शास्ता आहे, तोच भगवान कृष्ण आहे. पुरुष हा ईश्वर असून 'माया' ही त्याचा एक विभाग आहे. त्यांचे तत्त्व अथवा मायावाद म्हणजे ' सर्व व्यक्तिगत 'जीव हे ईश्वराचे विभाग आहेत' हे सांगणे हे रामानुजाचार्यांच्या परिणामवादावर आधारित आहे. व्यक्तिसापेक्ष जीव हरिभक्तीने माया दूर करू शकतो, असे ते म्हणतात. त्यांनी भक्तीरत्नाकर या ग्रंथात ईश्वराचा म्हणजेच विष्णु-कृष्णाच्या सगुण रूपाचे जे वर्णन केले आहे. त्याच रूपाचा साक्षात्कार होतो असे त्यांनी ठामपणे सांगितले आहे. (वर उध्दृत पृष्ठ क्र. ८९-९२)

रामानुजाचार्यांप्रमाणेच शंकरदेव असे मानतात की परमेश्वर हाच सत्यतत्त्वाचा मध्यवर्ती केंद्र आहे, त्याच्याविना काहीही अस्तित्वात राहू शकत नाही. जीव व जड त्याच्यामध्ये अस्तित्वात असून ते अविभाज्य आहेत. कीर्तनघोषात ते म्हणतात.

तुमी परमात्मा जगतर ईश एक ।
एको वस्तु नाहीके तोमात् व्यतिरेक ॥

तद्वत् -

कृष्णर चरण चिंतरेक हृदयत ।
आसन्त ईश्वर हरि समस्त भूतत् ॥

शंकरदेवांनी अद्वैत असे मांडले आहे -

प्रकृति पुरुष दुईरो नियन्ता माधव ।
समस्तरे आत्मा हरि परम बांधव ॥

शंकरदेवांनी तीन मूलतत्त्वे मांडली आहेत; अचित् (जड) चित्(जीव) किंवा आत्मा ईश्वर. ते म्हणतात आत्मा अमर आहे. त्यास भूतकाळात अथवा वर्तमानकाळात जन्म नाही. जन्म-मृत्यू शरीराशी निगडित असतात. मन हे मायेचे उत्पादन आहे. जोपर्यंत आत्मा शरीर, मन व इंद्रिये यांचेशी संलग्न राहतो तो पर्यंत तो त्रास व दुःख भोगतो. पण ज्याक्षणी तो त्यांच्याशी फारकत घेतो त्याक्षणी तो मूळ ब्रह्मस्वरूपात येतो मात्र तो वेदान्ताप्रमाणे परब्रह्मात विलीन होत नाही. शंकरदेवांच्या मतानुसार आत्मा जरी परमात्म्यापासून प्रकट होत असला तरी उभयतांचे स्वतंत्र स्थान आहे व ते एकमेकांशी जोडलेले आहेत. ईश्वराच्या नामावर सतत अनुसंधान ठेवल्याने जीवात्मा स्वतःला शुद्ध करून घेऊ शकतो.

एकान्तिक भक्ती, वासुदेव कृष्ण जो विष्णू, नारायण, राम, हरी म्हणून जाणला जातो त्याच्या ठायी पूर्ण शरणागती यावर शंकरदेवांचा भर आहे; म्हणून त्यांच्या शिकवणुकीस 'एकशरणनामधर्म' असे ओळखले जाते. त्यांनी अन्य देवतांची उपासना पूर्णतः नाकारली आहे. भक्ति प्रदीपमध्ये ते म्हणतात.

एकचित्त तुमि मोके मात्र करा सेवा
परिहरा दुर ते यतेक आन देवा
हुयोक शरणपन्न एक मोते मात्र
मोके भजा हुइबा तेवे मुकुतिर पात्र
नाम न शुनिबा तुमि आन देवतार

येने मते नुहिबे भकति व्यभिचार ॥(Shankaradeva : Vaishnava saint of Asama)शंकरदेव 'ईश्वराचे अवतार' मानतात. ते याच जीवनात मुक्त होता येते असे मानतात. (जीवन्मुक्ती). 'जीवन्मुक्त अवस्थेत मनुष्य ईश्वरेच्छेने शरीरधारणा करतो' असे ते म्हणतात. ते भक्तीला मुक्तीपेक्षा श्रेष्ठ समजतात. त्यांच्या दृष्टीने पूजा, जप, धार्मिक, विधी हे महत्त्वाचे नसून फक्त नाम हे पुरेसे आहे, हरिनाम म्हणजेच स्वतः हरी व भक्ती म्हणजेच मुक्ती होय; असे ते सांगतात.

शंकरदेवांच्या मते भक्ताने काही गुणांचा अवलंब केला पाहिजे. दया, करुणा, क्षमा, हृदयाची मृदुता, वासनांवर जय. ते म्हणतात वय, जात, आश्रम, वेळ, स्थान यांच्या बंधनाव्यतिरिक्त प्रत्येकजण हरीनाम घेऊ शकतो. हरी हा आपल्या नामाची संगत कधीही सोडत नाही.

शंकरदेवांनी भागवतातील अजामिलोपाख्यानासारख्या अनेक कथा लिहिल्या आहेत. त्यात त्यांनी हरिनामाचे उद्‌गान केले आहे. शंकरदेवांनी श्रवण, कीर्तन, दास्य आणि मधुराभक्ती अशी चतुर्विध भक्ती स्वीकारली आहे. त्यास ते रसमयी भक्ती म्हणतात. ते गोपी-कृष्ण, रुक्मिणी-कृष्ण, सीता-राम अशी जोड-प्रतिमा स्वीकारत नाहीत ते एकप्रतिमा स्वीकारतात, ते म्हणतात.

प्रकृति पुरुष दुशरो नित्यन्त माधव ।
समस्तरे आत्मा हरि परम बांधव ॥

शंकरदेवांच्या मताप्रमाणे नाम हे निरंजन आहे. त्यांनी त्यांच्या 'नामघर' मध्ये देवाची प्रतिमा ठेवलेली नाही. त्याऐवजी ते वेदीवर श्रीमद्‌भागवत महापुराण ठेवतात.

समर्थ शंकरदेवांप्रमाणेच अत्यंत विद्वान होते. दासबोधात प्रथम दशकाच्या प्रथम समासात (ओव्या १८-२०) उल्लेखिलेल्या ग्रंथांचा त्यांनी अभ्यास केला होता. त्यामुळे योगेश्वराच्या ज्ञानाबाबत त्यांची वसिष्ठ ऋषींशी तुलना केली जाते. त्यांच्यावर वाल्मिकी रामायण व इतर रामायण ग्रंथांचा (अध्यात्म रामायण इ.) प्रभाव होता. त्यांनी सीता-रामासह हनुमानाच्या उपासनेचा स्वीकार केला. त्यांचा संप्रदाय ते असा सांगतात

स्वरूप संप्रदाय अयोध्या मठ । जानकी देवी रघुनाथ दैवत । मारुती उपासना नेमस्त । वाढविला परमार्थ रामदासी ॥

याचा अवलंब करीत समर्थांनी मारुती उपासनेचा प्रसार करून समाजात शक्तिजागरण केले व व्यवहार व परमार्थ यासाठी लोकांचे मन प्रवृत्त केले.

समर्थांनी नवविधा भक्तीबाबत दासबोधाच्या चौथ्या दशकामध्ये यद्यपि विस्तृत विवेचन केले असले तरी त्यांनी आत्मनिवेदन भक्तीवर जास्त भर दिला आहे, या भक्तीचे वर्णन दासबोधात श्रेष्ठ भक्ती म्हणून केले आहे. त्यांनी स्वतः 'श्रीराम जय राम जय जय राम' असा नामजप केला व सर्वत्र त्याचा प्रसारही केला. हा त्रयोदशाक्षरी मंत्र आज महाराष्ट्रात, वारकरी संप्रदायाच्या 'राम कृष्ण हरि' नाममंत्राप्रमाणेच प्रसिद्ध आहे, तो लोकांच्या मुखी अखंड आहे.

शंकरदेवांप्रमाणेच समर्थांनी 'राम' या देवतेचा एकमेव व श्रेष्ठतम देवता म्हणून स्वीकार केला आहे. तथापि हा राम लौकिक अर्थाने दशरथपुत्र श्रीराम हे सगुण रूप नव्हे तर तो 'अनंतयुगीचा आत्माराम'आहे. एकदा इ.स.१६४९ च्या आषाढ महिन्यात ते पंढरपूरला गेले होते. पंढरपूर हे संतांचे, वारकरी संप्रदायाचे भक्तिपीठ असून अवघ्या महाराष्ट्राचे दैवत श्रीविठ्ठल तेथे या अठ्ठाविसाव्या युगामध्ये उभे आहे. समर्थांनी विठुरायाचे दर्शन घेऊन पुढील उद्‌गार काढले -

काय केली अयोध्यापुरी येथे वसविली पंढरी ।
काय केली शरयुगंगा येथे आणिली चंद्रभागा ।
धनुष्यबाण काय केले कर कटावरी ठेविले ।
काय केले वानरदल येथे मिळविले गोपाळ ।
रामी रामदासी भाव तैसा होय पंढरीराव ॥

असे म्हणतात की समर्थांच्या मनातील भाव जाणून पंढरीराव रामरायाच्या रूपात प्रकट झाले !

तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने विचार करता समर्थ आणि शंकरदेव यांच्यामध्ये काही साम्य आढळते. शंकरदेवांप्रमाणेच समर्थांनीही तीन मूलभूत तत्त्वे मानली आहेतः जड,चंचल, निश्चल. दासबोधात समर्थ म्हणतात. 'जड तितुके पडते । चञ्चल ते निघोन गेले । यापरते उरले ते निश्चलतत्त्व ॥'' (२०-७-१५) जड विरून जाते, चंचल जीव- तो जातो - येतो - निघून जातो. राहते ते निश्चल असे परब्रह्मतत्त्व. ते पुढे म्हणतात जड, शरीर, चंचल हे सर्व मायेचे बनले आहे. (१२.३.८)निर्गुण - निराकार तेवढेच शाश्वत आहे. (१२.३.९) ब्रह्म आणि माया यांचा खुलासा करताना ते वेदान्त तत्त्वज्ञान अनुसरतात. वेदान्तात विवेचन केल्याप्रमाणे विवेकाने प्रकृतीचा निरास करायला हवा. (२.६.५४) तसेच महावाक्याचे (''तत्त्वमसि'' इ.) चिंतन करायला हवे (११.९.१९) दासबोधातच ते असे सांगतात, ''मृत्यू अटळ आहे म्हणून भक्ती कधीही विसरू नये. (१२.१०.१३) मात्र शंकरदेवांपेक्षा निराळे म्हणजे ते द्वैत व अद्वैताचा दोन्हीचा स्वीकार करतात व असे सांगतात'सगुणाच्या आधारे निर्गुणाकडे पोहोचावे.'

शंकरदेवांप्रमाणे समर्थ हरिकथा श्रवण व कीर्तन यांना महत्त्व देतात. दासबोधात त्यांनी श्रवणासंबंधी चार समास लिहिले आहेत. (४.१-७,८,९,१७-३) त्यांनी उत्कृष्ट श्रोत्याची लक्षणे अत्यंत सुलभतेने सांगितली आहेत. श्रवण करताना मन एकाग्र असावे. स्त्रीयांकडे पाहू नये, झोपू नये, सभागृहाच्या बाहेर काढून ठेवलेल्या पादत्राणाचा विचार करू नये, बहिर्दिशेला जाऊ नये कारण नेमका त्याच वेळी एखादा महत्त्वाचा मुद्दा ऐकायचा राहून जाईल, वक्त्याच्या व्याख्यानाकडे सतत लक्ष असले पाहिजे म्हणजेच इतर अन्य कोणत्याही गोष्टीकडे लक्ष असता कामा नये, इत्यादी.

उपनिषदातील शिकवणूकीचा, तत्त्वज्ञानाचा अवलंब करीत असताना, ते स्वतः परिव्राजक असले तरी, जो गृहस्थ आपली कर्तव्ये चोखपणे पार पाडत आहे व त्याचबरोबर आध्यात्मिक जीवन व्यतीत करीत आहे अशा गृहस्थाचा ते आदर करीत असत.

शंकरदेवांप्रमाणे समर्थ रामकथेवर भर देतात. रामकथा ब्रह्माण्ड भेदून पार न्यावी असे ते सांगतात. (दा.१२.९.२६) हरिकथेला या दोघा महात्म्यांनी तरी महत्त्व दिले असले तरी समर्थांनी शंकरदेवांप्रमाणे स्वतःला एकाच ईशरूपाशी बांधून ठेवले नाही तर त्यांनी गणेश, शिव, खंडोबा या देवतांचीही स्तुतीगीते, आरत्या रचल्या आहेत. महाराष्ट्रातील अनेक कुटुंबांच्या या देवता कुलदेवता आहेत. समर्थांनी शिवराजाचे, शिवाजी महाराजांचे रक्षण करण्याचे साकडे तुळजाभवानीलाही घातले आहे. ती त्यांची 'रामवरदायिनी' आहे.

समर्थांच्या मते साधु-संत जरी व्यक्तिमत्वाने वेगळे असले, त्यांची शिकवण्याची पद्धती जरी विभिन्न असली, त्यांचा कार्यकाल जरी वेगळा असला तरी त्यांचा ब्रह्मभाव, ब्रह्मस्थिती एकच असते कारण ते ब्रह्मस्वरुप झालेले असतात. ओवी अशी -

साधु दिसती वेगळाले । परि ते स्वरूपी मिळाले ।
अवघे मिळोनि झाले । देहातीत वस्तु ॥८ दा. ७.२.३१॥

मठस्थापना -

भक्तांना धार्मिक शिक्षण देण्यासाठी तसेच त्यांना संन्यस्त जीवनाचे धडे देण्यासाठी व मठांचे व्यवस्थापन शिकविण्यासाठी शंकरदेवांनी सत्रे व नामघरे बांधली. मात्र पुढील व्यवस्थापन शिस्तीत होण्यासाठीची कार्यप्रणाली शंकरदेवांचे शिष्य महापुरुष माधवदेव यांनी निश्चित केली. सत्रांना वेगवेगळी महंत परंपरा व व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांची निश्चिती करून दिली. यामध्ये ब्राह्मणांच्या बरोबरीने पुजारी म्हणून व सामाजिक प्रतिष्ठा म्हणून शूद्रांना स्थान दिले आहे. याशिवाय सत्रांमध्ये संतांची पूजा करण्याचा तसेच पादशीलांची पूजा करण्याचा प्रघात ठेवला. सत्रांमध्ये एक विशेष अधिकारी असत त्यांना 'भागवती' म्हणत. हे भागवती श्रीमद् भागवत महापुराणाचे वाचन करत असत. महाप्रसादाची व्यवस्था करत असत. धार्मिक कार्यक्रमात नाट्य व संगीत यांचे कार्यक्रम ठरविण्यासाठी अधिकारी नेमलेले असतात. हे सादर करणारे कलाकार महापुरुष शंकरदेव, माधवदेव व सत्रांचे महंत यांनी रचलेले रचनाच फक्त सादर करतात. सत्रे ही निवासी शाळा म्हणूनही काम करतात. या संस्था (सत्रे) म्हणजे सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्य करणारी केंद्रे असतात.

शंकरदेवांच्या सत्र व नामग्रहांप्रमाणेच समर्थांनीही मठ स्थापन केले आहेत. टाकळी, सज्जनगड, डोमगाव, तिसगाव,मिरज, बीड या ठिकाणी त्यांचे मठ आहेत. यामध्ये समर्थांच्या संप्रदायाप्रमाणे शिष्यांना शिक्षण दिले जाते. यांना रामदासी म्हणतात. रामदासींनी समाजात भक्ति तथा समाज व राजकीय परिस्थितीचे भान ठेऊन कर्म करण्याची शिक्षणप्रणाली राबवावी, त्याचा प्रसार करावा; अशी पद्धती घालून दिली आहे. महन्त अथवा मठाधिपती यांची तसेच मठातील शिष्यांची आचार संहिता समर्थांनी मांडली आहे. समर्थांनी दासबोधात सांगितलेली महन्त लक्षणे ही भगवद्‌गीतेतील ज्ञानी भक्तांच्या लक्षणाशी मिळति - जुळती आहेत. ही लक्षणे निःस्पृह लक्षण

समासामध्ये (दा.१२.१०.१४) आहेत. समर्थ म्हणतात, 'महन्त हा क्रियावान, ताकदवान, सुयोग्य व्यवस्थापक, चांगला शिक्षक, राजकारण ज्ञाता, संन्यस्त व भक्त असावा. महन्तानी समाजाला सुव्यवस्थित राखावे आणि समर्थांना अपेक्षित असलेल्या आनंदवनभुवनाची पूर्तता करावी. समर्थ म्हणतात

वढि तो चेतवावा रे । चेतविल्याने चेततो ॥
विवेक आणिजे तैसा । वाढविल्याने वाढतो ॥

समर्थांनी विशेषतः विवेकावर जास्त भर दिलेला दिसतो, तद्वत् वैराग्य हा गुणही त्यांनी तेवढाच महत्वाचा मानला आहे. समर्थ बालपणापासूनच 'विश्वाची चिंता' करणारे होते. त्यांनी राजकीय घडामोडींवरही बारीक लक्ष ठेवले होते. कारण राजकारणातील घडामोडींचा समाजातील सर्व स्तरांवर परिणाम होतो आणि हे आजही अनुभवाला येते. आजपर्यंतचा इतिहास पाहता असे दिसते की ज्या वेळी देश सुस्थिर स्थितीत असतो त्यावेळीच सांस्कृतिक प्रगती होत असते, अन्यथा लोकांना घाबरूनच राहावे लागते. त्यामुळे राजा व प्रजा यांनी सुस्थिरतेबाबत दक्ष असावे. शंकरदेवांच्या चरित्रातही असे दिसते की त्यांना राजकीय अस्थिरतेला तोंड द्यावे लागले होते. (Shankardeva: Vaishnava Saint of Asama by - Birinci Kumar Barua - Page 6)

समाजावरील प्रभाव -

समर्थ रामदास आणि महापुरुष शंकरदेव या दोन्ही संतांचा समाजावर बराच प्रभाव पडला होता. शंकरदेवांनी उभी केलेली सत्रे व नामघरे आणि समर्थांनी स्थापन केलेले मठ यांचा समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी व सांस्कृतिक प्रगतीसाठी उपयुक्तता असल्याने त्याचा जनमानसावर खूपच प्रभाव पडला होता. त्यांचे उन्नतीसाठी साहाय्य झाले होते. धरिन्द्र चक्रवर्ती आपल्या ''Srimanta Shankaradeva: Great Unifier of Eastern India'' या ग्रंथात म्हणतात. ''श्री. शंकरदेव, एक उत्तम समन्वयक, यांना त्यांच्या नामधर्माद्वारे फक्त भक्तितत्त्वच शिकवायचे नव्हते तर ते आसामी संस्कृतीची रेशीम वीण गुंफणारे बनले व या संस्कृतीचे एक नवीन जरतारी वस्त्र त्यांनी गुंफले व सादर केले व त्यायोगे ते आसामचे एक महान व्यक्तिमत्त्व बनले. त्यांनी उभी केलेली सत्रे व नामघरे यांचे व्यवस्थापन उत्तम असल्याने त्याद्वारा विभिन्न सांस्कृतिक घटक आजही एकत्र जोडले आहेत.

सत्रे ही सामाजिक धर्मप्रवाह सांभाळणारी तर नामघरे ही विभिन्न खेडेगावातून त्या त्या ठिकाणच्या प्रार्थनागृह, सांस्कृतिक भवन यांच्या अपेक्षापूर्ती करणारी केंद्रे बनली. त्या ठिकाणी वाचनालये, स्नेह मेळावे भरू लागले. एक महान द्रष्टा या बिरूदाने ओळखावे असे शंकरदेव नवीन पद्धतीच्या विचार सरणीतून लोकांना 'सामाजिक वाद-विवाद जाणत्या व अधिकारी व्यक्तींचे मताने कसे मिटवावेत' याचे शिक्षण याद्वारा देते झाले.'' (वर उद्धृत - पान नं १०२-१०७)

शंकरदेवांनी हरिश्चंद्रोपाख्यान, रुक्मिणी हरण इत्यादी वाङ्मयीन कलाकृतीतून मूळ आसामी कवितेची नस पकडली त्यामुळे त्यांचे वाङ्मय लोकांनी फार आवडीने स्वीकारले, त्यावर प्रेम केले म्हणून शंकरदेव समाजाची नवीन बांधणी करण्यात यशस्वी झाले. त्यांनी समाजाला एक नवीन वळण दिले. त्यांनी जात - संप्रदाय निरपेक्ष असे हरिनाम लोकांना शिकविले. त्यामुळे लहान लहान टोळ्यातून विखुरलेल्या समाजाला आध्यात्मिक बैठक मिळाली आणि ते रामनामाद्वारा प्रत्यक्ष भक्तितत्त्व जाणू लागले, रामनाम जपू लागले.

शंकरदेवांनी भक्ती ईश्वराच्या स्थूल रूपाशी निगडित ठेवली नाही. त्यांनी निर्गुण तत्त्वाचा स्वीकार केला त्यामुळे त्यांनी सत्रांमध्ये पूजावेदीवर भगवंताच्या प्रतिमेऐवजी भागवत महापुराणाची स्थापना केली. शंकरदेवांचे श्रेष्ठ शिष्य माधवदेव यांनी पुढे या नामघरातून त्यांच्या नामधर्माचा विस्तार केला.

समर्थ रामदासांनी लोकांमध्ये आत्मविश्वासाची जागृती केली. त्यांनी तरुणांसाठी बलोपासनेचा पुरस्कार केला. ते स्वतः उत्तम शरीरयष्टीचे होते. त्यांनी बलोपासनेसाठी ठिकठिकाणी - अकरा गावांतून मारुती मंदिरांची स्थापना केली. मसुर, शहापूर, उंब्रज, बहे, माजगाव, मनपाडळे, पारगाव, शिराळे, शिंगणवाडी, चाफळ येथे दोन त्यांच्या मनातील आनंदवनभुवनाचे स्वप्न पूर्ण झालेले त्यांना पाहायला मिळाले. छत्रपती शिवाजी महाराज यांनी त्यांचे ते स्वप्न साकार केले. याचा त्यांना फार आनंद झाला.

समर्थांनी लोकांच्या मनातील ईश्वराबद्दलची अज्ञानामुळे ठसलेली समजूत दूर करून त्यांना खरा देव कोणता याचे ज्ञान करून दिले. ते म्हणतात- 'दगडापासून बनवलेली देवाची मूर्ती भंगू शकते; सुवर्णकाराने घडवलेली देवाची सुवर्णमूर्ती अथवा अन्य तांबे - पितळ या धातूंच्या मूर्ती चोरीला जाऊ शकतात. एखादा दुष्ट माणूस देवमूर्तींची अवहेलना करू शकतो; देवमूर्तींचे भक्ताकडून संरक्षण होत नाही हे केवढे दुर्दैव ! देव खरोखरच असा स्थितीत असू शकतो का? जर तसे नसेल तर मग खरेच देव म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर म्हणून समर्थांनी खालील श्लोक उद्धृत केला आहे -

नाना शास्त्रविदो लोकः नाना दैवत पूजकः ।
आत्मज्ञानंविना पार्थ सर्वकर्मांनिरर्थकम् ॥ (दा.दशक ५)

समर्थ विवेचन करतात 'ईश्वर पंचमहाभूतांपलीकडे आहे, तो विश्वनिर्मितीपूर्वी होता, विश्वस्थितीमध्ये तो आहे आणि विश्वाचा लय झाल्यानंतरही तो आहे !' (दासबोध-५.६.३२.-४८). ईश्वराचे स्वरूप - ज्ञान देऊन समर्थांनी लोकांच्या मनात खरा भाव जागृत केला. समर्थांनी तसेच अन्य संतांनीही अंधश्रद्धा नाहीशी करण्याचे प्रयत्न केले आहेत. समर्थांनी 'खरा देव तो ओळखावा' असे जागृत करीत लोकांना विनंती केली की 'कृपया खऱ्या देवाला प्रथम ओळखा व मग योग्य ते कर्माचरण करा. त्यांनी लोकांना विश्वास दिला की राम सतत तुमच्यामध्ये आहे, म्हणून कोणालाही घाबरू नका, श्रीराम तुमचे रक्षण निश्चित करेल. उदा.

भवाच्या भये काय भितोस लंडी ।
धरी रे मना, धीर धाकास सांडी ।
रघुनायका सारिखा स्वामी शिरी ।
नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी ॥
दिनानाथ हा राम कोदंडधारी ।
पुढे देखता, काळ पोटी थरारी ।
मना वाक्य नेमस्त हे सत्य मानी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥
उपेक्षा कधी रामरूपी असेना ।
जिवा मानवा निश्चयो तो वसेना ।
शिरी भार वाहेन बोले पुराणी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ (मनाचे श्लोक - २७,२८,३४)

उपसंहार -

समर्थ रामदास आणि महापुरुष शंकरदेव या संतांच्या तौलनिक अभ्यासावरून, देशाची सांस्कृतिक जडण घडण करण्यामध्ये संतांचे किती योगदान असते; ते लक्षात येते. मनुष्य हा प्रथम एका कुटुंबाचा घटक असतो.

त्याच्या आचरणाचे बरे वाईट परिणाम त्या त्या कुटुंबास भोगावे लागतात. तद्वत् तो समाजाचा घटक आहे. एकसारख्या आचरणाच्या मनुष्यांच्या वागणुकीचे बरे-वाईट परिणाम समाजावर होत असतात. याचा विस्तार करता समाज त्यानंतर प्रदेश, राष्ट्र अशा क्रमाने मनुष्याच्या वर्तनाचा परिणाम दृष्टीस येतो. त्यामुळे कोणत्याही देशाची उन्नत अवस्था ही त्या त्या देशातील मनुष्यांच्या वर्तनामुळे ठरते. म्हणून संतांनी हातात तलवार घेऊन लढाया मारून देश जिंकत जाण्यापेक्षा मूलभूत पायाकडे म्हणजे मनुष्याच्या वर्तनाकडे जास्त लक्ष दिले आणि वेळोवेळी समाजाला पर्यायाने देशाला अवनतीपासून वाचवले. आज भौतिक प्रगती झपाट्याने होत असली तरी त्याचा परिणाम मनुष्याच्या बाह्य आचरणावर तेवढाच झाला आहे व त्याच्या आंतरिक विवेकाकडे दुर्लक्ष होऊ लागले आहे. याचा परिणाम म्हणून पुन्हा तो पाशवी वृत्तीकडे झुकू लागलेला आहे. कौटुंबिक जिव्हाळा कमी होऊ लागला आहे त्यामुळे त्यास मानसिक आधारासाठी इतरत्र धाव घ्यावी लागत आहे. परिणामतः वैचारिक व त्यामुळे सांस्कृतिक अवनतीकडे हळू हळू मार्गक्रमण होत आहे. या पासून बचाव करावयाचा असेल तर आपल्याला संतांनी दर्शविलेल्या मार्गाने वाटचाल करणे क्रमप्राप्त आहे हे मागील इतिहासावरून स्पष्टपणे निदर्शनास येते. म्हणून समर्थ रामदास व महापुरुष शंकरदेव यांच्या चरित्राची व वाङ्मयाची सद्य काळातही महत्ता आहे. या दोन महान् संतांप्रमाणेच समाज बांधणी व समाजाचे पुनरुत्थान करणाऱ्या सर्व संतांच्या चरणी नम्रतापूर्वक प्रणाम।

- डॉ. सौ. रजनी पतकी,
१२, मधुबन; बी,
३८/२, कर्वेनगर, पुणे - ४११ ०५२
फोन नं. ०२०-२५४६०८१५

• • •

समर्थांची भारूडे

- डॉ. मुकुंद दातार



राष्ट्रगुरुंचे वाङ्मय :-

सतराव्या शतकात शिवकाळाशी, पूर्णपणे समरस झालेले संतश्रेष्ठ, म्हणजे समर्थ रामदास स्वामी होत. त्यांनी भगवद्‌भक्तियोगाला, परमपुरुषार्थाचे अधिष्ठान दिले. त्यांनी बदलता काळ आणि भोवतालची परिस्थिती लक्षात घेतली आणि परमार्थ चिंतनाबरोबर प्रपंचविज्ञानही सांगितले. त्यांनी वारकरीप्रणीत भागवत धर्माला, महाराष्ट्र धर्माचे रूप दिले. वारकरी संप्रदायातील हरिभक्तीचे सूत्र त्यांनी सुटू दिले नाही. मात्र त्याचबरोबर, महाराष्ट्र देशी, प्रपंचपुरुषार्थाची मुहूर्तमेढ़ही रोवली. त्यांचे स्वतःचे मन सदैव निवृत्तीच्या माहेराकडे ओढ घेत होते. पण त्यांनी आपल्या जीवितकार्यात, प्रवृत्तीचे सासर कधीही सुटू दिले नाही. 'करंटा दैववाद आणि निष्क्रीय उदासीनता फेकून देऊन, प्रवृत्तीपर प्रयत्नवाद अंगिकारा 'असा ओजस्वी संदेश समर्थ रामदास स्वामींनी, उभ्या भारतवर्षाला दिला. या दृष्टीने ते सर्वार्थाने राष्ट्रगुरू ठरतात.

समर्थांची सर्व वाङ्मयसंपदा ही प्रकृतीने गंभीर आहे. मांडणीमध्ये सुस्पष्ट आहे. आशयाच्या बाबतीत तर्कशुद्ध आहे आणि प्रभावाच्या बाबतीत निश्चयात्मक आहे. समर्थांचे सारे विचारसामर्थ्य, त्यांच्या वाङ्मयात अप्रतिम रीतीने उमटले आहे. बहुपैलूंनी प्रकटले आहे. हे वाङ्मयधन विविधस्वरूपी आहे. त्यात ग्रंथरचना आहे, प्रकरण ग्रंथ आहेत, स्फुट रचना आहेत आणि अभंगगाथा आहे. समर्थांचे मनाचे श्लोक (मनोबोध) प्रसिद्ध आहेत. 'आत्माराम' यासारखी आध्यात्मिक प्रकरणेही प्रसिद्ध आहेत. समर्थांचा 'दासबोध' हा महान ग्रंथ तर, प्रपंच आणि परमार्थाचा ज्ञानकोशच आहे. तसेच समर्थांनी लिहिलेली लघु आणि दीर्घ रामायणे, ही तर त्यांची जीवननिष्ठाच सांगतात. समर्थांचे वाङ्मय म्हणजे जणू उसळता सागर आहे.

अभंगगाथेचे वैशिष्ट्य -

या वाङ्मयसंपदेमध्ये, समर्थांची अभंग - गाथा ही अत्यंत महत्त्वाची आहे. समर्थ रामदास स्वामींच्या ठायी 'संत' आणि 'समर्थ' ही दोन्ही व्यक्तिमत्त्वे एकवटलेली होती त्याचे नेमके आणि नेटके दर्शन, त्यांच्या अभंगगाथेत घडते. समर्थांची एकूण अभंग काव्य संपदा, १७५० एवढ्या संख्येची आणि अभंगात्मक, पदात्मक रचनांची आहे. त्यात विविध देवताविषयक अभंग आहेत आणि पदेही आहेत. नवविधा भक्तीचे रूप - स्वरूप सांगणारे अभंग आहेत. तशीच पदेही आहेत. या गाथेत अध्यात्मचिंतनपर, तत्त्वचिंतनपर अनेक अभंग आहेत आणि पदेही आहेत. 'समर्थांची भारुडे' हे दालन तर खास वैशिष्ट्यपूर्ण आहे. तसेच समर्थांचे उपदेशपर अभंगही, संख्येने विपुल आणि मर्मभेदी शब्दकळेचे आहेत. याचबरोबर समर्थांनी आपल्या विलक्षण निरीक्षण शक्तीतून लिहीलेले विविध विषयपर अभंग (उदा., कलिप्रभाव ते संतसंग) आणि विविध विषयपर पदे (उदा., निंदकजन ते गुरू शिष्य) खरोखरच परिणामकारी आहेत.

समर्थांचे एकूण पदवाङ्मय तर अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण, अनन्यसाधारण स्वरूपाचे आहे. ही पदे विविध रागदारीत निबध्द आहेत. 'धन्य ते गायनी कला, या समर्थोक्त सूत्राचा आधार घेणारे, हे अप्रतिम अध्यात्म - चिंतन आहे. समर्थांची 'करूणापर पदांची रचनाही, अविस्मरणीय आहे. विशेष गोष्ट म्हणजे समर्थांनी हिंदी भाषेचा खास आदर केलेला आहे. समर्थांची हिंदी भारूडे आणि हिंदी पदेही, खास लक्षात घेण्यासारखी आहेत. समर्थांनी लिहिलेल्या विविध देवतांच्या आरत्याही लक्षणीय आहेत. समर्थांच्या काही प्रासंगिक रचनाही उल्लेखनीय आहेत. एकूण समर्थांचे अभंगगाथा ही, संतांची आणि समर्थांची 'वाङ्मयी' मूर्ती आहे.

भारुड रचनेचे रूप - स्वरूप -

'भारूडे' हा शब्द उच्चारला की सर्वांना, सर्वप्रथम आठवण होते ती एकनाथांची. संतश्रेष्ठ एकनाथांची भारूडे म्हणजे एकूण मराठी भाषेलाच लाभलेला, अत्यंत तेजस्वी अलंकार आहे. समर्थांची भारूड-रचनाही एकनाथांच्या भारूड-रचनेचा वारसा पुढे चालविते. पांगुळ, कानफाट्या, खेळिया, कापडी, गोंधळ, जागल्या, बाळसंतोष वाघ्या, सौरी, झडपणी - इत्यादी रचना याची साक्ष देतात. एकनाथ किंवा समर्थ यांनी भारूडे का लिहीली? तर हे संत श्रेष्ठ लोकशिक्षक आहेत. दोघांच्याही भारुड-निर्मितीचा हेतू परमार्थ प्रसार आणि सदाचारविचार हा आहे. जनसामान्यांच्या लौकिक अनुभवविश्वाचे, त्यांना पारलौकिक अनुभवविश्वात, रूपांतर करावयाचे होते. त्यासाठी त्यांनी लोकभाषेचे, लोककलेचे, लोकधर्मी नाट्याचे -माध्यम स्वीकारले. नाथ किंवा समर्थ दोघेही आपली ज्ञानी भक्ताची भूमिका कायम ठेवतात, पण आपल्या भारूड रचनेत नाना भूमिका घेतात. ते अनंतवेषे, अनंतरूपे नटतात पण त्यांना आपल्या 'आत्मरूपाचा' कधीच विसर पडत नाही. प्रत्येक सोंग उत्तम वठवितात, पण परमार्थचिंतन विसरत नाहीत.

या संतांच्या भारूडाचे आणखी एक मोठे वैशिष्ट्य आहे ते म्हणजे इथे परमार्थचिंतनाबरोबरच नीतीच्या उपदेशाला मोठे महत्त्व आहे. नैतिक उन्नतीची मातबरी मोठी आहे. नाथ किंवा समर्थ या दोघांचा पूर्ण कटाक्ष सदाचार आणि नीतिप्रसार यांच्यावर आहे. अखेर नीतीची अभिवृद्धी हीच, समाजाची खरी समृद्धी असते. यासाठी अध्यात्माला नीतीच्या समवेत आणावे लागते आणि दोघांचा समयोचित संयोग घडवावा लागतो. हे स्पष्ट आहे की - अध्यात्माची शिकवण विसरलेला समाज रसातळाला जातो. आणि नीती नसलेल्या समाजातून अध्यात्म अस्तंगत होते. हे मर्मवाक्य पूर्ण लक्षात ठेऊन, एकनाथ आणि समर्थ दोघांनीही, आपल्या भारूडांतून अध्यात्मचिंतन आणि नीतिशिकवण या दोन्ही गोष्टी साधल्या, परमार्थाचे चिंतन आणि सुनीतीचे वैभव, लोकांना पटणाऱ्या प्रापंचिक कल्पनावलयात

लपेटून, ही भारूडे सादर होतात. हे भारूडांचे मोठे वैशिष्ट्य आहे.

भारूड - व्याख्या आणि व्याप्ती -

भारूड ही संज्ञा कशी जन्मास आली? तिची व्युत्पत्ती कोणती? नेमके अर्थ कोणते? तर

१. प्रा.कृ. पां.कुलकर्णी यांच्या व्युत्पती कोशात, भारूडाचे अर्थ, लांब गुंतागुतीचे गाणे, कथा अवघड कूटकाव्य असे दिले आहेत.

२. भार म्हणजे जनसंभार आणि हाडू म्हणजे गीत. यांच्या मिलाफाने, 'ग्रामीण गीतं' या अर्थाने, भारूड हा शब्द आला आहे. अशीही व्युत्पत्ती दिली गेली आहे.

३. 'भा' म्हणजे दीप्ती किंवा प्रतिभा - त्यावर आरूढ ते भारूड. तेजस्विता, शीघ्र कवित्व धारण करणारे गीत, असाही अर्थ सुचविला गेला आहे.

४.भारूड म्हणजे भार+गूढ = भारलेले गूढ, भारी गूढ, कूट शैलीचे गाणे - असा व्युत्पीत्तीचा अर्थ, आचार्य विनोबा भावे यांनी सुचविला आहे.

५. महाराष्ट्रात 'भराडी' किंवा कर्नाटकात 'भरवाड' ही जनजाती आहे जी शिवोपासक आहे. या लोकसमूहाचे - परमेश्वरी उपासनेचे जे गीत-ते भारूड, असाही अर्थ सुचवला गेला आहे. (परमेश्वराची) स्तुती ज्यात असते, ते गीत म्हणजे भारूड असू शकेल. मध्ययुगीन मराठीत (उदा. सामराज यांचे रुक्मिणीहरण काव्य) बराडी - भराडी -स्तुतिपाठक असा शब्दप्रयोग येतो.

६. मात्र या सर्व व्युत्पत्तीपेक्षा भारूड हा शब्द, 'बहुरूढ' पासून झाला असणे सहज शक्य वाटते. बहुरूढ म्हणजे लोकसमुदायातील, लोकप्रिय गीत, लोकांचे गीत, लोकगीत बहुरूपीपासून भोरपी हा शब्द तयार होते. बहुगुणी (भांडे) पासून 'भगुणे' हा शब्द येतो. त्याप्रमाणे बहुरूढपासून भारूड हा शब्द तयार होऊ शकेल. हीच व्युत्पत्ती अधिक पटणारी आहे.

७. याचप्रमाणे आणखी एक व्युत्पत्ती विचारार्ह वाटते. भारूंड म्हणजे एका देहाचा, पण दोन चोचींचा पक्षी. असा पक्षी प्राकृत ग्रंथात उल्लेखिला गेला आहे. पंचतंत्रातही असा पक्षी आला आहे. भारूड या शब्दातील अनुस्वार, जनसमुदायाच्या नेहेमीच्या उच्चारणातून, लोप पावू शकतो. त्यातून भारूड ही संज्ञा येऊ शकेल. भारुंड आणि भारूड यात साम्य असे की - भारूंड पक्षी दोन चोचींचा, तर भारूडातही सामान्यपणे दोन अर्थ असतात. एक प्रापंचिक, लौकिक अर्थ असतो तर दुसरा पारमार्थिक, अलौकिक अर्थ असतो.

८. थोडक्यात भारूडामध्ये सामान्यपणे पुढील तीन गुण असतात. (अ) मनोरंजन (ब) दुर्गुणभंजन (क) गूढगुंजन (तत्त्वचिंतन)

समर्थांच्या भारूडांची विविधता -

समर्थ रामदास स्वामींची जी प्रसिद्ध अभंगगाथा आहे (उदा., श्री संत साहित्य सेवा संघ, सोलापूरतर्फे प्रकाशित, पृष्ठे ४९६) त्यामध्ये अभंग क्र. ८९५ ते १००७ म्हणजे ११३ अभंगात्मक रचनांत, समर्थांची भारूड -गाथा येते. यात ४८ विषयांवर भारुड रचना अवतरली आहे. एवढी ही विषयांची, लक्षणीय विविधता आहे. त्यात अंजन, आंबा, उंदीर, उमाणा (उखाणा), कापडी (यात्रेकरू) कुत्रे, कुळवाडी, कोडे, खेळ, खेळिया, गोंधळ, चेटूक, चेंडू, जागल्या, झडपणी, टिपरी, ठकडे, (धूर्त) डवरी, डांका, (मोठा नगारा) दिवटा (मशालधारी), नवल, पांगुळ, पिंगळा, फूल, बहुरूपी, बाळसंतोष, बिजवर, रजक, लपंडाव, वाघ्या, वासुदेव, वृत्ती, वोसाण(ओसाड) शिलंगण, सावज, सौरी, (स्वैरिणी) सर्प, स्वप्न, हंडीबाग, (सर्पधारी गारुडी) होळी - यासारखी भारूडे अवतरतात.

तसेच कानफाट्या (दोहवे) कुंटण, जागल्या, जोगी, पांडे (गावचा कारभारी) बहुरूपी,बीर (वीर) बैरागी - इत्यादी काही रचना हिंदी - हिंदुस्थानी - दःखनी यासारख्या भाषेत आहेत. समर्थांनी केलेला हा हिंदी भाषेचा आदर फार महत्त्वाचा आहे. परमार्थ प्रसारासाठी आणि रामभक्ती जागविण्यासाठी, महाराष्ट्र प्रांतीच नव्हे तर, अवघ्या भारत देशी उठाव करण्याची ही भूमिका आहे. राष्ट्रगुरू रामदासांची ही भूमिका फार महत्त्वाची आहे.

'समर्थांच्या या भारूडात आंबा, कापडी, खेळ, खेळिया, चौक, ठकडे, पांगुळ, सौरी, हंडीबाग' ही अशी पदात्मक रचना असून ती रसाळ आणि परिणामकारी स्वरूपात अवतरली आहे. तर 'कुळवाडी, गोंधळ, चेटूक, जागल्या, जोगी, टिपरी, डबरी, डांका, नवल, बहुरूपी, बाळसंतोष, रजक, लपंडाव, वाघ्या, वासुदेव आणि स्वप्न' ही भारूडे अधिकच उत्तम रीतीने पदबद्ध झाली आहेत. या सर्व पदांसमवेत समर्थांनी त्या त्या पदांसंबंधीचा राग, आणि तालही साक्षेपाने नोंदविला आहे. प्रत्येक उत्तम पदात्मक भारूडाबद्दल ही स्थिती आहे. ही गोष्टही समर्थांच्या प्रसिद्ध अशा साक्षेपप्रियतेची निदर्शक आहे. समर्थांना प्रिय असणारी 'धन्य ती गायनी कला', त्यांचे संगीतप्रेम, खरोबरच विलक्षण आहे. या 'नादब्रह्मस्वरूपी कलेचेही साहाय्य, ते परमार्थप्रसारासाठी घेतात. तोच त्यांच्या जीवनाचा ध्रुवतारा आहे.

समर्थांच्या भारूडांतील मार्मिकता :-

समर्थांनी आपल्या 'अंजन' या भारूडात, सर्वांनी विवेकनिष्ठेचे अंजन आपल्या डोळ्यात घालावे, असे आवाहन केले आहे. तरच 'निजधन आत्माराम' प्राप्त होईल. 'आंबा' या भारूडात त्यांच्या सूक्ष्मतिसूक्ष्म अशा निरीक्षणकौशल्याचे दर्शन घडते. आम्रफलाचे विविधरंगी, नानाविध प्रकार सांगताना त्यांनी, माणसांची आणि माणसांच्या स्वभावाचीच विविधता, अधोरेखित केली आहे आणि 'भोक्ता जगदीश आपण । सकळां ठायीं ॥' याचेही स्मरण दिले आहे. समर्थांचे 'उंदीर' हे भारूड मिस्किल, विनोदी रंगांनी रंगलेले आहे. सर्वभक्षक काळाचा आणि उंदराचा पराक्रमही सारखाच - पण उंदीर हे श्रीगणरायाचे वाहन ना? त्यामुळे त्याला धक्का लावला तर विघ्नहर्ता गणरायाला राग येईल, याचीही आठवण समर्थांनी दिली आहे. 'उमाण (उखाणा)' हा अभंग कूटरचना साधत, पुरुष - प्रकृतीची लीला म्हणजे या जगत्रयाचा विलास, या गोष्टीचे नेमकेपण सांगतो, 'कापडी'(यात्रेकरू) हे भारूड, चौऱ्यांशीच्या आडवाटा टाकून, वैराग्याचा खेचर मार्ग धरावयाची, विनंती करते.

समर्थांनी तशा दुर्लक्षित आणि उपेक्षित श्वानालाही आपल्या दोन भारूडांतून लक्ष्य केले आहे. बोलकेही केले आहे. हे भारूड सर्वांना देहापलीकडे आत्म्यास ओळखावयास सांगते. तसेच समर्थांचे 'कुळवाडी' हे भारूड कृषिवलाच्या भाषेत, अध्यात्म 'क्षेत्राची' समग्र ओळख करून देऊ पाहाते. ते अज्ञानाचे तृण काढायला आणि ज्ञानइक्षू पेरायला सांगते आणि अखेर श्रीराम या मोकाशाला, शरण जायला सांगते. त्याचा कौल मिळाला तर, स्वानंदाचे पीक हाती येते. याची खात्री देते. समर्थांनी 'कोडे' ही नऊ अभंगांची भारूड मालिका सादर केली आहे. त्यातील 'संख्याशास्त्रीय अध्यात्म चिंतन,' बुद्धीला चांगलेच खाद्य पुरविणारे आहे. समर्थांची भूमिका, प्रपंच आणि परमार्थ हे दोन्ही, आपण नेटकेपणाने करावेत अशी आहे. साहजिकच त्यांची 'खेळ आणि खेळिया' यासारखी भारूडे, सर्वांनाच सावधानतेने आणि समरसतेनेही जीवन जगायला सांगते. इथे समर्थ रामदासांनी भगवान गोपालकृष्णाला विनंती केली आहे की, देवा, तूच माझ्या इंद्रियांच्या गायी राख. समर्थ म्हणतात-

'..अशा ममता तृष्णा कल्पना । त्या मज नावरती खडाणा ।

कामक्रोध यादवराया । बैल राख लागेन पायां ।.....

कान्हो राख माझ्या गायी । पुढति पुढति लागेन पायी ।।'

समर्थांना तुळजाभवानीची कृपा सदैव प्रिय आहे. 'तुझा तू वाढवी राजा । शीघ्र आम्हासी देखतां ॥ असे त्यांनी रामवरदायिनी तुळजामातेकडे वरदान मागितले आहे. त्या दृष्टीने त्यांची 'देवीचा गोंधळ, चौक' अशी भारूडे महत्त्वाची आहेत. देवीच्या मनोहारी विविध रूपांना, विनम्रपणे वंदन करून समर्थ स्मरण देतात की- 'पवित्र ठाणे माहूर । दुसरे तुळजापूर । तेथे नांदते सुंदर । साऱ्या संतांचे माहेर ।।' साऱ्या विश्वाची आदिकारण, हीच भवानी आहे. तिचा मला सदैव 'लो' लागला आहे, असेही ते म्हणतात. समर्थ आपल्या भारूडांतून देवीची पूजा बांधतात, चौक भरतात 'फुलवरा निर्देशितात. समर्थांच्या या भारूडांतील विविध फुलांची आणि पूजा द्रव्यांची तपशिलवार वर्णने, त्यांचे अपार निरीक्षणच प्रकट करतात. याचप्रमाणे समर्थांनी जागल्याचे चित्रण करणारी भारूडे लिहीली आहेत हा दिवटा किंवा हा जागल्या सर्वांना संसारात सदैव 'जागे' राहायला सांगतो. या भारूडांत सुंदर रूपक - परंपरा आहे. काम क्रोधादी चोरटे जिवाजी पाटील, मनाजी कुलकर्णी, डोळसवाडी, कानपूर, दंताळवाडी नगद नारायण हे सारे सांगून अखेर, चौऱ्यांशीचा फेरा चुकविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

याचप्रमाणे समर्थ आपल्या काही भारूडांतून, या विश्वात, पंचभूतांची झडपणी ही जीवमात्राची कापणीच कशी करते ते सविस्तर सांगतात आणि त्यापासून सुटका हवी असेल तर, पंचाक्षरी संतांनाच बोलाविले पाहिजे असे म्हणतात. अहो, हा दुःखमूळ संसार संपवावयाचा तर त्यावर वैराग्याचा विवेकाचाच मारा हवा. नाहीतरी या लोकविलक्षण मायेचे घुमारे, सर्वांच्या अंगी वारे भरतात आणि या जगात लहान थोर उदंड शरीरे नाचवितात. अशा स्थितीत कशाचे स्मरण करायचे? तर श्रीसमर्थ निश्चयात्मक शब्दांत स्मरण देतात की -

''एको विष्णो महद्‌भूत । पृथक भूतें अनेकभूत ।
ऐसे बोलिलें भगवंत । गीतेमध्ये अर्जुना ।।
जें जें जयाला ध्याती । तें तें तया लोकां जाती ।
संतसंगे सुखी होती । महानुभाव सज्जन ।।
भूतें भूत तें झाडिलें । दासें आत्मनिवेदिलें ।
पंचभौतिक सरलें । निवारिलें भवभय ।।''

भारूडे : काव्यात्म तात्त्विकता -

अशा तऱ्हेने समर्थांची भारूडे ही अध्यात्मचिंतन, काव्यात्मता, रूपक श्रीमंती, नेटका तपशील आणि ठोस उपदेश या पंचविध गुणांनी युक्त असतात. त्यात दुर्गुणांचा धिक्कार असतो आणि नीतिमत्तेचा आग्रह असतो. या दृष्टीने समर्थांच्या अधिक सरस अशा भारूडांचा उल्लेख करायचा तर 'डांका, पांगुळ, रजक, वाघ्या, शिलंगण आणि सर्प या विषयांवरील भारूडांचा उल्लेख करता येईल. त्याचबरोबर समर्थांच्या अनेक भारूडांत, भारूडरचनेसाठी अत्यावश्यक असलेली काव्यात्मक तात्त्विकता आणि मनाला भिडणारी व्यंजक शैली, पुरेपूर अवतरलेली दिसते. उदा., 'नवल टिपरी ठकडे' यासारखी कूटात्मक भारूडे, अगा जे घडणार नाही' त्याचेच परोपरीने वर्णन करतात आणि नश्वरामागचेही शाश्वत सांगतात. आणि अखेर कृतज्ञतेने म्हणतात - 'रामी रामदास म्हणे हे गुज । संतांनी निवडले हो ।।'

पुढे समर्थांनी आपल्या भारूडांतून, डंका पिटून आणि दिवटा बोलावून, आपणाला सांगितले आहे की, ' पहिला भक्त तो कायेचा । दुसरा भक्त तो वाचेचा । तिसरा भक्त तो मनाचा । चौथा भक्त मात्र तो वेगळा ।। अगम्य त्याची लीला ।।' हे जनलोक हो, नीट लक्षात घ्या. सुरेल स्वरात आणि पूर्ण समरसून, समर्थांनी पुनःपुन्हा विनम्र आवाहन केले आहे की, 'रंगा येई वो रघुनाथे । शंकर कुळदेवते ।।' इथे समर्थ तद्रूप होतात. पुढे सदाचाराचा आणि नीतिमत्तेचा आग्रह धरून, अनेक भारूडांतून, मदन देवतेचे सर्वसंचारीपण आणि सर्वग्रासीपण लक्षात आणून देतात. तसेच विषय - वासनेचे, कामभावनेचे विलक्षण रूप अगदी थोर -थोरांच्या अधःपाताला कसे कारण झाले, त्याच्या कहाण्या सविस्तर निर्देशितात आणि मनःपूर्वक आवाहन करतात की, 'हुश्शार भाई हुश्शार । सर्वांनी असावे खबरदार ।।'

समर्थांचे सर्वप्रसिद्ध असे पांगूळ भारूड -

''धर्म जागो राघवाचा । अधर्म भागो रे । अज्ञान निरसुनिया । विज्ञानी लक्ष लागो रे ।।' असे नेमकेपणाने आणि नेटकेपणाने मागणे मागते. समर्थांनी रंगविलेली 'पिंगळा' आणि 'बहुरूपी' ही भारूडेही अशी सात्त्विक मागणी करतात. त्यांनी रंगविलेला 'वासुदेवही' प्रभातकाळी रामप्रहरी श्रीरामाचे स्मरण देऊन तीच सात्त्विक मागणी करतो. ही भारूडे भाकणूक गातात. भविष्य वर्तवितात. संतसभेचा आणि देवसभेचा दुवा सर्वांसाठी मागतात. समर्थांचे ''बाळसंतोष'' हे भारूड प्रसिद्ध आहे. यात त्यांनी आजपर्यंत कोणकोणते असे बालपणीच अध्यात्मशिखर गाठलेले, 'बाळसंत' होऊन गेले ते सांगितले आहेत. आणि त्यांचेच अनुकरण तुम्ही प्रौढपणी तरी करा, असे आवर्जून म्हटले आहे ते सांगतात.

''बाळसंत ध्रुव जाला । भगवंतासी शरण आला ।
सघनांबरे गौरविला । अढळ अधिष्ठानीं केला ।।''

समर्थांनी रंगविलेला 'रजक, हा तर देहबुद्धीची मळकी आणि फाटकी वस्त्रे, नेटकी धुऊन देऊ पाहातो आणि जिथे भक्ती आहे - तिथे जातपात कशी उरेल ? असा थेट प्रश्न विचारून, ग्वाही देतो की - 'रामदास रे । राम त्यास रे । यातिकूळ आठवेना । भेदभास रे ।।' हेच अत्यंत महत्त्वाचे आहे.

श्रीसमर्थांनी रंगविलेला 'वाघ्या' हा ही सद्‌गुरु मार्तंडासाठी, विवेक खंडा (खड्ग) हाती घेऊन उभा आहे. तो स्वसामर्थ्याने द्वैत भाजतो, निश्चयाचा रोडगा देवाला वाहतो आणि साऱ्या संसाराचा येळकोट करीत, देहभंडारा उधळू पाहतो. तसेच मोह - ममतेचा साखळदंड तोडून, श्वान - जीवाची सुटका करू पाहतो आणि अखेर म्हणतो 'रामदासही वाघ्या । सोऽहं भुंकी स्वरूपी जागा ।।' अशी ही स्थिती आहे. समर्थांनी वर्णिलेला 'सर्पही' अज्ञानाच्या बिळात राहणारा आहे. देहभावाचा किंवा अहंभावाचा दंश करणारा आहे. परिणामी सुखदुःखाचे दारूण वेग येतात. तेव्हा विषयाचा निंब गोड लागतो आणि हरिनाम कडू लागते. अशा वेळी वरवर झाडून काय उपयोग? अभ्यंतरच शोधले पाहिजे आणि त्याहीपेक्षा खरे तर अशावेळी 'वैद्य पाचारा गोपाळ । किंवा 'जवळी करा वैद्य रघुवीर ।' असे समर्थांचे आपणा सर्वांना सांगणे आहे.

अशा तऱ्हेने समर्थांच्या एकूण भारूड रचनेचा विचार करताना, काव्यात्म तात्त्विकतेच्या दृष्टीने कोणते भारूड, प्रातिनिधिक स्वरूपात सादर करता येईल? तर त्यासाठी 'शिलंगण' (सीमोल्लंघन) या भारूडाचा निर्देश करता येईल. समर्थ म्हणतात.

''द्वैता अद्वैताची सीमा । सीमा होती त्या निःसीमा ।।१।।
जालें सीमा उल्लंघन । साधुमुखें समाधान ।।२।।
कार्याकारणापरतें । मनें पाहिलें निरुतें ।।३।।
भक्ति नवविधाभजन । पुढें आत्मनिवेदन ।।४।।
निरूपणीं निजध्यास ।। जाला वस्तूचा विश्वास ।।५।।

रामी रामदास म्हणे । संतसंगाचे नि गुणें ॥६॥

अशा तऱ्हेने समर्थांची भारूड सृष्टी ही मनोरंजन, दुर्गुणभंजन आणि गूढगुंजन या तीन्ही कसोट्यांवर पुरेपूर उतरणारी आहे. वरील तीन्ही गुणांचा तिच्या ठायी संगम झाला आहे. असे दिसते की, समर्थांच्या भारूड रचनेत नाट्य आहे, काव्य आहे. उद्बोधन आहे, रंजन आहे, प्रपंच आहे, परमार्थ आहे, लौकिक आहे आणि पारलौकिक आहे. या साऱ्या समर्थांच्या भारूडांच्या कक्षा आहेत. आणि त्या मनोहारी स्वरूपाच्या आहेत. या साऱ्या कक्षा, भारूड वाचताना आपल्या मनात उजळत जातात आणि 'जनीं आहे जगन्नायक । कळला पाहिजे विवेक ॥' याचे आपणाला सदैव स्मरण देतात. अशा तऱ्हेने, समर्थांची भारूडे लोकरंजनातून तत्त्वचिंतन साधतात. आणि पुढे जाऊन सद्धर्मजागरणही साधतात - हे खचित !

– डॉ. मुकुंद दातार
ग्रॅनाडा ए ३०४, फोर्टीलिझा,
कल्याणीनगर, पुणे - ६

• • •



सहावे सिक्ख गुरु हरीगोविंद आणि समर्थ रामदास

- डॉ. अशोक कामत



सिक्खेतिहास आणि मराठी संतभक्त साहित्य परंपरा यांच्या अतूट अनुबंधाचे पहिले पृष्ठ संत नामदेवरायांच्या घुमान निवासाने लिहिले गेले. नामदेवराय एकटेच नव्हते. त्यांच्या शिष्य - समाजात अनेक सत्शील व्यक्ती होत्या. त्यांपैकी त्रिलोचन आणि परमानंद या मराठी मुलखातूनच आल्या असे दिसते. कारण त्यांचे उपलब्ध काव्य मराठीमिश्रित आहे. नामदेवरायांच्या या शिष्यवर्गाने सिक्ख-मराठा स्नेहबंधाचे दुसरे पृष्ठ लिहिले. नानकदेवांचा उदय नामदेवरायांच्या निर्वाणानंतर जवळपास सव्वाशे वर्षांनी झाला. पुढे श्रीगुरुग्रंथसाहिबाची निर्मिती तर नानकदेवांच्या निर्वाणानंतर सुमारे शतकभराने झाली. या एकूण दोन-सव्वादोनशे वर्षांत ज्या संतभक्त लोकगायकांनी 'भक्त नामदेवजी की मुखबानी' पंचनद्यांच्या प्रदेशात नित्य गाऊन दाखविली / लोकगंगेच्या मनीमानसी मुरविली ते अनाम जननायक हे या गौरवमयी अनुबंधाचे तिसरे पृष्ठ लिहून गेले. पुढे मराठीला धर्मभाषेचे स्थान मिळवून देणारे महात्मा चक्रधरस्वामींचे भक्तमहंत वायव्य भारतात गेले आणि त्यांनी तेथे जयकृष्णी समाजाची निर्मिती केली, हे चौथे पृष्ठ म्हणता येईल.

सिक्ख - महाराष्ट्र बंधुतेचे पाचवे पृष्ठ फार महत्त्वाचे ठरते. कारण त्यानंतर महाराष्ट्राचा सारा इतिहासच बदलून गेला असा इतिहासकारांचा दाखला दिसतो.

हे सुवर्णक्षरांकित पृष्ठ हरिगोविंद आणि मर्यादापुरुषोत्तमाचे आणि त्याच्या सर्वोत्तम दासाचे निस्सीम भक्त समर्थ रामदास यांच्या स्नेहभेटीचे आहे. या मीलनातून रामदासांना लढाऊ वृत्तीचे महत्त्व जाणता आले, पुढील कार्याची दिशाही प्राप्त झाली, अशी सिक्ख अभ्यासकांची भावना आहे आणि उपासकांची तर तशी श्रद्धाच आहे.

भेटीची हकीगत -

समर्थ रामदासांचा जीवनकाळ इसवी सन १६०८ ते १६८१ असा सर्वसाधारणपणे सर्वमान्य आहे. वयाच्या बाराव्या वर्षी ते मराठवाड्यातील आपल्या जांब या खेड्यातून निघून गेले आणि नाशिकनजीक टाकळी येथे दक्षिणगंगा गोदावरीच्या किनारी बारा वर्षे पुरश्चरण करीत राहिल्याची पारंपरिक भावना आहे. पुढे प्रत्यक्ष प्रभू रामचंद्रांचा साक्षात्कार होऊन ते समर्थ बनले आणि समाजाचे जवळून अवलोकन करावे, लोकस्थितीचे निदान करावे, अशा विशिष्ट इराद्याने देशाटनासाठी निघाले. इसवी सन १६३२ ते १६४४ या काळात ते उत्तर भारतात प्रवास करीत होते, असेही समर्थ चरित्रकार सांगतात. या काळात सहावे सिक्ख गुरु हरिगोविंद आपल्या पंथाचे नेतृत्व करीत होते.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध विचारवंत आणि पंडित तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना रामदास - हरिगोविंद भेट आणि त्यांचा विचारविनिमय मान्य आहे, असे त्यांच्या लेखनावरुन जाणवते. त्यांनी या भेटीचे प्रमाणे या तपशील दिलेला नाही; पण या संदर्भात त्यांनी जे लिहिले आहे, त्यांपैकी काही बाबी लक्षणीय वाटतात. तर्कतीर्थांच्या लेखनाचा आशय असा आहे.'

लाहोर येथून मोगल सरदाराचा अंमल चाले. गुरु हरिगोविंदाना एकदा काबूलहून भेट म्हणून दोन घोडे मिळाले. त्या उमद्या आणि जातिवंत घोड्यांचा मोह मोगल सुभेदाराला पडला. मग ती घोड्यांची जोडी हिरावून घेण्याकरिता त्याने आपल्या लष्कराची एक संपूर्ण तुकडीच तैनात केली. गुरुंवर हल्ला करण्यासाठी आलेल्या सैन्याला चोख उत्तर मिळाले. गुरुसैन्याने त्या तुकडीचा फडशा पाडला.

या वेळी झालेल्या लढायात दोन्ही बाजूंचे बरेच शिपाई कामास आले; पण गुरुजींची नेहमीच फत्ते होत गेली. गुरुसैन्याचा आत्मविश्वास दुणावला. मोगल सुभेदाराच्या सैन्यामध्ये निराशा वाढली. सपाट प्रदेशापेक्षा डोंगरी भागात राहून लढण्याने मोगलांना अधिक संत्रस्त करता येईल, अशा योजनेने गुरुजी कांगडा आणि चंबा या पर्वतीय प्रदेशात आले. त्या ठिकाणी राजा ताराचंद आणि काही राजपूत सरदारांची सत्ता होती. या मंडळींनी शहाजहानाची केंद्रीय मुस्लिम हुकूमत नाकारून आपली स्वतंत्र राज्ये राखली होती. गुरुजींशी त्यांचा थोडा संघर्षही झाला; पण नंतर दिलजमाई झाली, कारण उभयतांची उद्दिष्टे सारखीच होती. शत्रूही समान होते.

गुरु हरिगोविंदजींबद्दल तर्कतीर्थ लिहितात -

'आयुष्याची शेवटची दोन वर्षे मुसलमानांना हिंदू धर्माची दीक्षा देण्यात घालविली. तिबेट आणि खोतान यांच्या सरहद्दीपर्यंत पसरलेल्या या डोंगरी विभागात मुसलमान हे नावही ऐकू येईनासे झाले, असे मोहसीन फनीहा ही परिस्थिती प्रत्यक्ष पाहून लिहितो. मोहसीन फनीहा कीरतपुर येथे गुरुंना भेटला त्याने स्वतः पाहिलेलीच हकीगत लिहिलेली आहे.

..... राजकीय गुलामगिरीतून मुक्त करून घेण्याकरिता काय केले पाहिजे, ही गोष्ट गुरु हरिगोविंद यांनी स्वतःच्या आचरणाने हिंदूंना दाखवून दिली.'

तर्कतीर्थांचे हे प्रतिपादन अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण त्यासाठी त्यांनी घेतलेला आधार मोहसीन फनीहाचा आहे. गुरु हरिगोविंद हे शस्त्रसज्ज झाले ते मुसलमानी असहिष्णुतेचा कणखरपणे प्रतिकार करण्यासाठी ! कारण, त्यांना वयाच्या अकराव्या वर्षी ज्या दुर्दैवी स्थितीत गुरुगादी घ्यावी लागली तशी परिस्थिती पुन्हा उद्भवू नये, अशी त्यांची स्वाभाविक आकांक्षाच होती. हिंदू काय नि सिक्ख काय परधर्माचे द्वेष्टे नव्हते. उलटपक्षी त्यांची जन्मजात श्रद्धाच वैश्विकता मानणारी होती. त्यांच्यापैकी काही कर्मकाण्डप्रिय असतीलही; पण ते किंवा त्यांचा आचार इतरांना बलाच्या आधारावर छळावे किंवा त्यांचा नायनाट करावा म्हणून नव्हता.

तर्कतीर्थ पुढे असेही म्हणतात :

"जगातील एका तत्कालीन वरिष्ठ बादशाहीशी अविश्रांतपणे एक भक्तिमार्गी संत लढत राहतो, ही गोष्ट शतकानुशतके हिंमत गमावलेल्या

हिंदूंच्या मनात फार उशिरा प्रथम लक्षात आली. समर्थ स्वामी रामदास गुरु हरिगोविंदांच्या समयी पंजाबमध्ये यात्रा करीत होते. त्यांना पहिल्यांदा सशस्त्र भक्तिमार्गी हे दृश्यच विसंगत वाटले; परंतु गुरुंशी चर्चा केल्यानंतर त्यांना त्यातील सत्य पटले हे महाराष्ट्राच्या समर्थकालीन इतिहासावरून नीट लक्षात येते.''

तर्कतीर्थांनी वर कथन केलेली हकीगत विलक्षणच म्हणायला हवी. वस्तुतः तर्कतीर्थ काही हिंदुत्ववादी नव्हेत. अप्रस्तुत अभिनिवेशाने समर्थ संप्रदायाची भलावण करणारेही नव्हेत. या ठिकाणी तर त्यांनी मोहसीन फनीहासारख्या फारसी इतिहासकाराची प्रत्यक्ष 'गवाही' साक्षच प्रस्तुत केली आहे. त्यांच्या लेखनात केवळ अनुमानही नाही. अत्यंत स्पष्ट शब्दांत त्यांचे म्हणणे प्रकट झालेले आहे.

गुरु हरिगोविंद आणि समर्थ रामदास यांची इ.स.१६४४ पूर्वी प्रत्यक्ष भेट घडून त्यांच्यात विचारविनिमय होणे आणि त्याचे स्पष्ट पडसाद शिवसमर्थकालीन मराठी इतिहासावर पडल्याचे तर्कतीर्थांनी नमूद करणे खचितच लक्षणीय आहे.

भेटीचे एक महत्त्वाचे प्रमाण -

हरिगोविंद - समर्थ भेट १६३४ मध्ये श्रीनगर येथे झाली आणि त्याबद्दलची हकीगत एका जुन्या 'पंजाबीसाखी' हस्तलेखात एकोणचाळिसावा प्रसंग म्हणून नमूद आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळातील साक्षेपी अभ्यासक नेते आणि पंजाबचे माजी राज्यपाल काकासाहेब गाडगीळ हे स्पष्टोक्तीसाठी विशेष प्रसिद्ध होते. त्यांनी पंजाबमध्ये असताना अनेक साधने मिळवून, अभ्यासपूर्वक सिक्खइतिहास तयार केला. काकासाहेब गाडगीळ यांनी हा पंजाबी साखीग्रंथ प्रमाण मानला आहे. मूळ हकीगत अशी :

''एक बैर गुरुजी काश्मीर में टीके थे। ताहां एक साधू दीदार को आया। दक्खनी था। नाम रामदास। तब गुरुजी शिकार खेलता आवते थे। घोडेपर सवार। संत शिख संगत बहुत थी। प्रशन कीता हा सुनिया था। गुरु नानककी गद्दीपर बैठा था। नानक गुरु तापसी साधू थे। तुम शास्तर धारण करे हैं। घोडे फौज राखी है। सच्चा पातशाह कहावत है। कैसा साधू है। गुरु हरिगोबिंद किया बतन फकीरो जहर अमीरी शास्तर गरीबकी रक्षा जखीनेकी भाकिया। बाबा नानक संसार नहीं किया गया। माया तियागी थी। रामदास परसन होय किया एल हमारे मन भावी है।''

अर्थात् गुरुजी त्या वेळी काश्मीर भागात होते. दक्षिणेतून आलेला एक साधू त्यांना भेटायला आला. त्याचे नाव रामदास होते. गुरु हरिगोविंद घोड्यावर बसून आले होते. शिकारीहून नुकतेच परतले होते. बरेचसे सिक्ख त्यांच्या समवेत होते. रामदासांनी तो सारा प्रकार पाहून म्हटले, ''तुम्ही गुरु नानकदेवांच्या गादीवर विराजमान आहात. नानकदेव हे तर त्यागी साधू. त्यांनी संसारही सोडला होता. तुम्ही तर सशस्त्रही आहात. घोडेस्वार आहेत. तुमचे सैन्यबळ मोठे आहे. 'सच्चा पातशाह' म्हणवून घेता. तुम्हाला साधू कसे बरे मानावे ?''

यावर गुरु हरिगोविंद उतरले,''अंतर्यामी मीही साधूच आहे.फकिरी पत्करली आहे. बाहेरून मी धनदौलतवान वाटतो खरा. शस्त्रे ही गरिबांच्या संरक्षणासाठी आणि दुष्टांच्या निर्दालनासाठी धारण केलेली आहेत. नानकदेवांनीही संसाराचा त्याग केलेला नव्हता. मायामोह आणि अहंकार मात्र सोडले होते.''

हे निवेदन ऐकून रामदास संतुष्ट झाले आणि म्हणाले, ''मी तुमचे हे म्हणणे ऐकून प्रसन्न होऊन गेलो आहे. तुमचे बोलणे पटण्यासारखेच आहे.''

समर्थांना गुप्ती -

याच भेटीच्या वेळी गुरु हरिगोविंदांनी रामदासांना प्रेमपूर्वक एक तलवार भेट म्हणून दिली आणि ती तलवार पुढे रामदासांनी शिवाजीमहाराजांना दिली असे सिक्ख बांधव एकमुखाने सांगत असतात. या संदर्भात समर्थसांप्रदायिकांनी फारसे काही लिहून ठेवल्याचे आढळत नाही. परंतु सज्जनगडावर समर्थसमाधी शेजारी त्यांच्या ज्या नित्यवापराच्या वस्तू श्रद्धापूर्वक जतन करून ठेवलेल्या आहेत, त्यांत एक शस्त्रगर्भ कुबडी मात्र आहे.

सुमारे दीड मीटर उंचीच्या या कुबडीमध्ये एक गुप्ती लपविण्यात आलेली आहे. ही कुबडी शिवाजीमहाराजांनी समर्थांना दिली असे समर्थसांप्रदायिक सांगतात. वस्तुस्थिती त्यांनाही नेमकेपणाने ठाऊक नसावी. शिवाजीराजांनी समर्थ रामदासांना सशस्त्र कुबडी कशासाठी दिली ? केव्हा दिली ? आत्मसंरक्षणासाठी जर दिली तर शिवकाळात समर्थांवर असे कोणते संकट आले होते ? या प्रश्नांची उत्तरे नीट मिळू शकत नाहीत. याउलट सिक्खेतिहासातील प्रमाणे बरीच जुनी आणि विपुल आहेत. त्यामागे लोकश्रद्धाविश्वांचे बळही आहे. ते आम्हांला अधिक महत्त्वाचे वाटते. ही श्रद्धा केवळ विभूतिपूजक नाही, आपल्याच संप्रदायाचे हितरक्षण करणारी नाही. उलट त्यात एक औदार्य आहे. विनयशीलता आणि स्नेहभाव आहे.

ज्या वेळी रामदास उत्तरेस परिभ्रमण करीत होते, त्या वेळी त्यांनी आपला संप्रदाय स्थापिलेला नव्हता. त्यांचा शिवाजीराजांशीही संपर्क आलेला नव्हता. त्यांनी उग्र कठोर तपःसाधना करून साक्षात्काराची अनुभूती मिळवली होती. ते तेजस्वी परिव्राजक अवश्य होते, पण त्याच वेळी सिक्ख गुरुगादीवर विराजमान असणारे गुरु हरिगोविंद हे अनेक अर्थांनी प्रतिष्ठित होते. ते साधुपुरुष तर होतेच; पण एक मोठा संप्रदाय त्यांच्या मागे होता. या संप्रदायाची पूर्वपरंपरा विलक्षण कर्तृत्वाची होती. रामदासांना त्यांची सहजपणाने भेट घेता आली, त्यांच्याबरोबर मनमोकळेपणाने बोलता आले हेच नवलाईचे वाटते. अशा भेटीच्या वेळी शस्त्रप्रिय गुरुजींनी रामदासांना एखादे शस्त्रच आपली स्मृतिभेट म्हणून देणे औचित्यपूर्ण वाटते. शिवाय दोहोंत झालेला वार्तालाप शस्त्रसज्जतेविषयीचा आणि स्वातंत्र्यसंबंधीचा होता.

सिक्ख बांधव तलवार म्हणतात अशी ती तलवार नसावी. गुप्ती असणे आणि ती देखील साधूच्या कुबडीत दडविण्यासारखी असणे स्वाभाविक वाटते. एक तर रामदास भ्रमण करीत होते. साधुवेशात परप्रांतांत / तेही मुसलमान राज्यात फिरत असताना स्वसंरक्षणाची मोठीच आवश्यकता होती. अशा नित्य रात्रंदिन युद्धाचा प्रसंग असणाऱ्या वातावरणात साधू - संन्याशाजवळ सहज दिसेल असे तलवारीसारखे शस्त्र असणे अवघडच नव्हे, तर अडचणीचे होणार, त्याऐवजी कुबडीत लपविलेली गुप्ती ठेवणेच सोईचे आणि हिताचे ठरणार. म्हणून असे म्हणावेसे वाटते : गुरु हरिगोविंदांनी विचारपूर्वक रामदासांना सहज दडविता येईल आणि प्रसंगाला एकदम बेमालूम रीतीने काढता येईल अशी गुप्तीच बाळगणे हे प्रसंगोपात्त आणि योग्य असल्याचे समर्थांच्या ध्यानी आणून दिले असल्याचे दिसते. अशी गुप्तीची प्रथा यापूर्वी आपल्या मराठी प्रदेशात दिसत नाही.

समर्थविचारावर प्रभाव

उदंड देशाटन करून समर्थांनी आपल्या समाजावरील आस्मानी - सुलतानी संकटांची प्रत्यक्ष माहिती करून घेतली आणि पुढे ती 'अस्मानी - सुलतानी' अशाच शीर्षकाने प्रभावी मराठीत सर्वांसमोर मांडली हे सत्य आहे; पण स्वतः बालपणापासून विरक्तवृत्तीने वागणारे, विश्वाची चिंता करणारे, बोहल्यावरून पळून जाऊन सर्वसंगपरित्याग करणारे, बारा वर्षे एकांतवास स्वीकारून अत्यंत उग्र तपःसाधना करणारे, साक्षात प्रभूरामचंद्राचे दर्शन दिल्यानंतर देशाटनासाठी निघणारे समर्थ पुढे प्रपंच आणि परमार्थ यांचा मेळ

घालून व्यावहारिक शिक्षणूक देतात, हरिकथानिरूपणाबरोबरच राजकारण महत्वाचे आणि त्यासाठी सर्व प्रकारे सावधपण हवे असे निर्धाराने सांगत राहतात. 'सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें । असे प्रखर उद्गार का काढतात? 'धटाशीं धट असावे'! 'हुंब्याशी हुंबा लावावी' अशी प्रतिक्रियात्मक तिखट भाषा का वापरीत राहतात? 'बुडाला औरंग्या पापी म्लेंच्छसंहार जाहला' अशी उद्वेगाची अभिव्यक्ती का करतात? शोधक (वर्तमान) पत्रकारितेचे समर्थ रामदास हे जनक होते, असे म्हणता येईल, इतपत या गोष्टी स्पष्ट दिसतात.

वस्तुतः रामदासांपूर्वी मराठी भक्तिपरंपरा श्रीकृष्णांच्या विठ्ठलरूपाची भक्ती करणारी आहे. वारीची सामूहिक साधना स्वीकारून श्रीक्षेत्र पंढरपुराकडे नियमाने जाणारी आणि चंद्रभागेच्या वाळवंटात दिंड्या - पताका खांद्यावर मिरवीत हरिनामाचा उद्घोष करणारी आहे. ज्ञानदेव - नामदेवांनी यादवकाळात या भक्तभागवतांना 'नाम कंठी धरून' राहायला सांगितले. 'ठेविलें अनंते तैसेचि राहावें । चित्ती असों द्यावें समाधान' हे शिकविले, असे म्हणण्याची प्रथा आहे. पुढील काळात एकनाथ महाराजांनी उत्तर यात्रा केली; पण 'सगुणचरित्रें परमपवित्रें सादर वर्णावी' असेच म्हटले. उदंड काव्यरचना केली आणि जनमनजागरणाचे कार्य केले.

समर्थ रामदासांचे ज्येष्ठ समकालीन संत तुकाराम महाराज- त्यांना वारकरी मराठी भागवतधर्म मंदिराचे कलश म्हटले जाते. 'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा,' 'आम्ही वैकुंठवासी आलों याचि कारणांशी' असे त्यांचे परोपरीचे आत्मविश्वासपूर्ण उद्गार आहेत.

ज्ञानदेव -नामदेवांच्या यादव काळात अल्लाउद्दीन खिलजीची धाड महाराष्ट्रावर पडली होती. पुढे मुसलमानी राजवट इथे स्थिरावली त्या काळात एकनाथपंचकाचे कार्य झाले. तुकारामबोवांच्या काळात तर मर्दमराठे मुसलमानी सत्तांच्या सेवेत राहून स्वकीयांशी प्रतारणा करीत होते. अतिरेकी, अत्याचारी आणि असहिष्णू मुसलमान सत्ताधीश एतद्देशीयांच्या सहकार्यानेच आपले उपभोगविलास यथेच्छ करीत होते आणि सर्वसामान्य माणूस पारतंत्र्यात होता.

या सर्व काळात 'पहिलें तें हरिकथा निरुपण ।' अशीच संतमंडळाची सांगी राहिली. रामदासांनी 'दुसरें तें राजकारण' अशी काळानुरूप घोषण करीत 'तिसरें तें सावधपण सर्व विषयी.' असा निश्चयाचा लढाच पुकारला. हे एकदम कसे झाले? एकाएकी झाले काय?

समारोप -

समर्थ रामदासांनी जी नवी वाट मळली त्याचे काही परिणाम सर्वमान्य आहेत. प्रतिष्ठाप्राप्त कुळातील आणि सुस्थितीत असणारे ज्ञानवंतही समाजनस्क असू शकतात. त्यांनाही जनांचा उद्धार करण्याची आकांक्षा असू शकते, हे समर्थ - कर्तृत्वामुळे सिद्ध झाले. एरवी देवदेवालयात राहून केवळ ईश्वराची पूजाअर्चा करणारे, भिक्षुक समाजाचे लोकही समाजोद्धाराच्या कार्यासाठी कटिबद्ध झाले. सोवळा आणि मावळा नव्या प्रेरणा घेऊन एके ठाई आला आणि शिवछत्रपतींच्या स्वातंत्र्यलढ्यात तो तनमनधनपूर्वक उतरला. त्याने प्रदेशाचा चेहरामोहरा पालटून टाकला. 'अगर सिवाजी न होने तो सुन्ति होती सबकी' असे उत्तरेतील भूषण कवीने म्हणण्याइतपत कडवी प्रतिकारशक्ती महाराष्ट्रात खडी झाली.

समर्थ रामदासांनी भक्तिपरंपरा आणि समाजकारण या दोन्ही क्षेत्रात जे क्रांतदर्शी नेतृत्व दिले ते छत्रपती पदापर्यंत पोचलेल्या शिवरायांना सतत प्रभावित करीत राहिले. परळीचा किल्ला 'सज्जनगड' बनला. एक नवे लढाऊ तीर्थक्षेत्र महाराष्ट्रात नांदू लागले. हे सारे होण्यात सिक्ख परंपरेतून समर्थांनी जे समयोचित स्वीकारले त्याची महत्ता नाकारण्यात आम्हांला हशील वाटत नाही.

- डॉ. अशोक कामत
शिवश्री सहकारनगर नं. २, पुणे . ४११ ००९

..... १ - शिखांचा पंथ व इतिहास, सदाशिवराव बागाईतकर

● ● ●

समर्थ पंचायतन

- श्री. सुनील चिंचोलकर



पूज्यपाद शंकराचार्यांनी 'पंचायतन' ही संकल्पना निर्माण केली आणि पुढे ती चांगलीच लोकप्रिय झाली. शंकराचार्यांच्या काळात विविध देवतांच्या उपासकांमध्ये आपआपसात तीव्र मतभेद सुरू झाले. त्यामुळे आध्यात्मिक संघटनांना धोका निर्माण झाला.

उपासकांमधील द्वैत नाहीसे व्हावे म्हणून शंकराचार्यांनी गणेश, सूर्य, शिव, विष्णू आणि देवी या पाच देवतांचे पंचायतन निर्माण करून प्रत्येकाने आपल्या घरात या पाचही देवता, देवघरात ठेवाव्यात असा दंडक घातला. त्यामुळे शैव, वैष्णव, गणेश आणि देवी यांचे उपासक सार्वजनिक जीवनात गुण्यागोविंदाने नांदू लागले. त्यातूनच रामपंचायतन, श्रीकृष्णपंचायतन ज्ञानेश्वरपंचायतन, समर्थपंचायतन अशी विविध पंचायतने समाजात रूढ झाली. ज्या व्यक्तीचे नाव पंचायतनाला दिले जाते ती व्यक्ती प्रमुख प्रेमास्पद असते आणि त्याच्या भोवती त्याच्यावर प्रेम करणाऱ्या प्रेमींचा अंतर्भाव होतो. रामपंचायतनात राम हा केंद्रबिंदू असून लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न आणि हनुमान हे रामाचे प्रेमी होत. ज्ञानेश्वर पंचायतनात ज्ञानेश्वर केंद्रबिंदू असून निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई आणि चांगदेव हे त्यांचे प्रेमी होत. समर्थ पंचायतनात समर्थ केंद्रबिंदू असून जयराम स्वामी वडगावकर, रंगनाथ स्वामी निगडीकर, केशव स्वामी भागानगरकर आणि आनंदमूर्ती ब्रह्मनाळकर हे चार समर्थांना मानणारे, समर्थांना भेटलेले आणि समर्थांना समकालीन असलेले संत होत.

समर्थांनी त्या काळातील अनेक सत्पुरुषांच्या भेटीगाठी घेतल्या आणि हिंदूसमाज संघटित करताना तत्कालीन सर्व संप्रदाय आणि सर्व देवतांचे भक्त एकत्र आणले. पाटगावचे मौनीबाबा, चिंचवडचे मोरया देव, देहूचे तुकाराम महाराज, करवीर आणि श्रृंगेरी पीठांचे शंकराचार्य या सर्व सत्पुरुषांना समर्थ भेटले होते. पण, समर्थ पंचायतनात यांचा अंतर्भाव होत नाही. ज्या चौघांचा अंतर्भाव पंचायतनात केला आहे त्या चौघांचा आणि समर्थांचा वारंवार संबंध आला असून त्यांच्याबद्दल समर्थांच्या संदर्भात बऱ्याच कथा उपलब्ध आहेत. त्यातील केशव स्वामी फक्त हैद्राबादचे असल्यामुळे जरा दूर होते.

मात्र जयराम, रंगनाथ स्वामी आणि आनंदमूर्ती हे सातारा, सांगली जिल्ह्यातील असल्यामुळे समर्थांना जवळही होत आणि त्यांच्या वारंवार भेटी होत.

जयराम स्वामी समर्थांपेक्षा नऊ वर्षांनी मोठे होते. पंचायतनात आनंदमूर्ती सर्वात लहान होते. या सर्व जणांचे परस्परांवर विलक्षण प्रेम होते. सारे जण एकमेकांच्या सांप्रदायिक उत्सवाला उपस्थित राहात असत. ही सर्व संत मंडळी एकत्रित जमल्यावर त्यांच्यामध्ये खूप चांगली चर्चा होत असे. त्या निमित्ताने जणू एखादे संतसंमेलनच भरत असे. एकदा समर्थ, जयराम, रंगनाथ आणि आनंदमूर्ती यांना म्हणाले की, आपण चौघे मिळून एक श्लोक तयार करू. प्रत्येकाने एकेक चरण तयार करायचा. प्रारंभ समर्थांनी केला आणि शेवट आनंदमूर्तींनी केला. चौघांनी मिळून पुढील श्लोक तयार केला.

समर्थ – मुक्तासि काही तनुभाव नाही ।
जयराम – असोनि देही परि तो विदेही ।
रंगनाथ – प्रारब्धकर्मास्तव देही जाले ।
आनंदमूर्ती – वायूसवे पादप जेवि डोले ।

या एका श्लोकावरूनच हे चौघे ऐकमेकांशी किती एकरूप झाले होते ते ध्यानात येते. केशवस्वामी दूर राहात असल्याने त्यांच्या भेटीचे प्रसंग कमी घडत असत.

हे पाचही जण एकाच देवताचे भक्त होते असे नाही. पण दैवत बदलले म्हणून त्यांच्या मैत्रीत अंतर पडले नाही. सर्वांचे परस्परांवर अकृत्रिम प्रेम होते. रंगनाथ स्वामी उत्तम गात. त्यांचा आवाजही अत्यंत गोड होता. त्यांच्यात आपापसात स्पर्धा अथवा मत्सर अजिबात नव्हता. केशवस्वामी दूर राहत असल्यामुळे त्यांच्या काव्यात समर्थ दर्शनाची ओढ अथवा तळमळ वारंवार दिसून येते. जयरामस्वामी कृष्णभक्त होते तर समर्थ रामभक्त होते. जयरामस्वामी रामनवमीला चाफळला येत तर समर्थ गोकुळष्टमीला वडगावला जात. आनंदमूर्ती आपल्या सद्गुरूंची पुण्यतिथी साजरी करत तेव्हा सारे जण एकत्र जमत. अशा वेळी सारे जण सात-आठ दिवस तरी एकत्र राहत असत. भजन - संकीर्तनात हे सारे जण आपापल्या भक्तांसह रंगून जात. समर्थांचे चरित्र आपण पाहत आहोतच. तेव्हा समर्थांचा या संदर्भात या चौघांचा विचार संक्षेपाने का होईना पण करू.

जयराम स्वामी वडगावकर -

जयरामस्वामी नगर जिल्ह्यातील मांडवगण येथील होते. ते लहान असतांनाच त्यांचे वडील मरण पावले. आईबरोबर ते पंढरपूरला आले. पण उपनयन संस्कार झाल्यावर त्यांची आईदेखील मरण पावली. आई-वडील गेल्यावर जयरामने पंढरपूरला प्रचंड अनुष्ठान केले. पांडुरंगाने त्यांना दृष्टांत दिला आणि त्यांना वडगावला जायला सांगितले. वडगाव येथे कृष्णाप्पा नावाचे अधिकारी सत्पुरुष होते. त्यांचा अनुग्रह लिंगायत परंपरेतला होता. वस्तुतः कृष्णाप्पा शैव होते आणि जयराम कृष्णभक्त म्हणजेच वैष्णव होते. परंतु गुरूशिष्य या नात्याने ते दोघे एकरूप होते. कृष्णाप्पांनी देखिल आपली शिवोपासना जयरामवर लादली नाही. कृष्णाप्पांनी १६२४ च्या माघ पौर्णिमेस देह ठेवला. त्यांचा पुण्यतिथी उत्सव वडगावला साजरा होत असे. त्या वेळी पंचायतन एकत्र येत असे. आपण पाहिले की समर्थांनी चाफळच्या रामनवमी उत्सवात रथोत्सवाची पद्धत सुरू केली. हीच पद्धत समर्थांनी वडगावला कृष्णप्पांच्या उत्सवात सुरू केली. बोरूच्या झाडाची भेंडे आणि वेत यांच्या साहाय्याने स्वतः समर्थांनी मिरवणुकीसाठीचा रथ तयार केला आणि फुलापानांनी सजवला. समर्थ प्रतापात गिरिधर स्वामी म्हणतात.

समर्थे जयरामयोगियाचा मोहोछह वाढविला ।
प्रथम वडगावी समर्थे रथ काढविला ।

ग्रामपक्कान्नमार्ग मोडविला ।
सिद्धान्न स्वयंपाक करविले ।

या मठात समर्थांनी स्वयंपाकसुद्धा साग्रसंगीत करायला लावला असे दिसते. जयराम स्वामी आणि रामदास स्वामी एकमेकांशी किती एकरूप होते त्याच्यावर प्रकाश टाकणारी एक घटना उपलब्ध आहे. एका गोकुळाष्टमीच्या उत्सवासाठी चिंचा तोडाव्यात म्हणून जयराम झाडावर चढले. मनात समर्थांचे चिंतन सुरू होते. स्थूल असल्यामुळे त्यांना शरीराचा तोल सांभाळता येत नसे. चिंचा तोडताना ते झाडावरून खाली पडले. इकडे चाफळला समर्थांचे अंग ठणकायला लागले. समर्थ मोठ्यांदा कण्हायला लागले. 'काय झाले' म्हणून शिष्यांनी विचारले. तेव्हा समर्थ म्हणाले, 'जयराम झाडावरून पडला' शिष्यांनी इकडे समर्थांची पाठ चोळून दिली आणि तिकडे जयरामांना आराम पडू लागला. या एका घटनेवरून त्या दोघांची अभेद प्रीती दिसून येते.

रंगनाथ स्वामी निगडीकर

रंगनाथ स्वामी मांड नदीच्या काठचे. त्यांचे वडील बोपाजीपंत आणि आई बयाबाई. त्यांचे वडील नाझरे गावचे कुलकर्णी असले तरी पशूंच्या आजारावरती ते प्रभावी औषध देत. कुलकर्णीपणापेक्षा पशूरोगचिकित्सेबद्दलच ते जास्त प्रसिद्ध होते. विजापूरच्या बादशहाचा आवडता घोडा आजारी पडला होता. तो त्यांच्या वडिलांनी बरा केला म्हणून बादशहाने यांना एक अरबी घोडा बक्षीस दिला. तेव्हापासून लोक त्यांना घोडके म्हणू लागले. आई - वडील त्यांचे जबरदस्तीने लग्न करणार होते. म्हणून रंगनाथ स्वामी घरातून बाहेर पडले. उत्तर भारतातील व्यास गुहेत त्यांनी कठोर साधना केली. पुढे टेहरीच्या राजाने त्यांच्याकडून अनुग्रह घेतला. त्यांनी रंगनाथ स्वामींना भरजरी पोशाख सुंदर निळा घोडा आणि भरपूर द्रव्य दिले.

या रंगनाथ स्वामींना राजयोग होता. वैभव त्यांचा पाठलाग करत होते. एकदा ते समर्थांना भेटायला चाफळच्या डोंगरात आले. समर्थ त्यांना म्हणाले, आता आलाच आहात तर जेवण करून जा.' समर्थांच्या काही शिष्यांना रंगनाथ स्वामींचा हेवा वाटे. त्यांना वाटले की, आज रंगनाथ स्वामींना भिक्षेत जे मिळेल ते गुपचूप खावे लागेल. शिष्य भिक्षेला गेले. पण रंगनाथ स्वामींना जेवायला उशीर व्हावा म्हणून मुद्दाम भिक्षा उशीरा घेऊन आले. पण पाहतात तर डोंगरात एक श्रीमंत व्यापारी आला होता. त्याने येताना पंचपक्वान्नांचे जेवण आणले होते. अखेर जिथे रंगनाथ स्वामी तेथे वैभव असणारच हे त्या शिष्यांना पटले. रंगनाथ स्वामी आणि रामदास स्वामी यांच्यात झालेला आध्यात्मिक संवाद 'दास - विश्रामधाम' या ग्रंथात नोंदला आहे. समर्थ शिवाजी महाराजांचे गुरू आहेत तेव्हा त्यांनी देखील आपल्याप्रमाणेच वैभवात राहावे असे रंगनाथ स्वामींना वाटत असे. त्याप्रमाणे त्यांनी समर्थांना सांगितले देखील. पण समर्थ म्हणाले, 'सामान्य माणसाला स्वभावतःच विषयांचे आकर्षण असते. मी जर वैभवात राहू लागलो तर शिष्य माझे अनुकरण करतील. तुम्ही वैभवात राहता याचा अर्थ तुम्हाला वैभवाचे आकर्षण आहे असे नाही. पण सामान्य माणूस तुमच्यामागे लपून विषयसेवन करू शकेल. माझ्यापुरते मी असे ठरवले आहे की, लोकांच्या - समोर साध्या राहाणीचाच आदर्श ठेवावा' समर्थांचे हे म्हणणे रंगनाथ स्वामींना पटले. पण रंगनाथ स्वामींनी साधे राहण्याचा प्रयत्न केला तरीही वैभव हातपाय धुऊनत्यांच्या मागे लागत असे. चाफळच्या रामनवमी उत्सवाला रंगनाथ स्वामी नियमितपणे येत असत.

रंगनाथ स्वामींच्या जीवनातील दोन अद्भुत कथा सांगितल्या जातात.

१) दर माघ पौर्णिमेला कृष्णाप्पा स्वामींच्या उत्सवाला रंगनाथ स्वामी येत असत. त्या दिवशी रात्री त्यांचे कीर्तन असे; परंतु लक्षात न राहिल्यामुळे एका माघ पौर्णिमेला रंगनाथ स्वामी हैद्राबादला केशव स्वामींकडे होते. सकाळी स्नानसंध्या करताना त्यांना वडगावच्या उत्सवाची आठवण झाली. ते तत्काळ घोड्यावर बसले आणि वडगावच्या दिशेने निघाले. सायंकाळपर्यंत ते वडगावला पोचले पण त्यांचा घोडा मात्र वडगावला पोहचल्यावर मरण पावला. तेव्हा दिवसभरात ते वडगावला पोचले याचे सर्वांना आश्चर्य वाटले. समर्थांनी दुसऱ्या दिवशी त्या घोड्याला हाक मारली तेव्हा घोडा उठून चालू लागला. समर्थांच्या या अधिकारामुळे पंचायतनातील बाकीचे संत समर्थांना खूप मान देत. या घटनेसबंधी आनंदमूर्ती लिहीतात.

जडजिवा तारिले बहुतांही । परी न सजिवा बहुतांही ।
अश्व हे उठ म्हणे उठताहे । धन्य कीर्ती पाहता गहुताहे ॥

समर्थांबद्दल रंगनाथ स्वामी लिहीतात -

रामरूप रामचि अवतरला । रामदास म्हणता पर तरला ।
निर्जिवा करितसे सजीवा । धन्य कीर्ती स्मरता जिवशिवा ॥

जयराम स्वामीदेखील समर्थांचे स्तवन करताना म्हणतात-

श्रीगुरू समर्थ परकीला । काय येक न करी पर लीला ।
सत्वरूप सत्वाचिहि मूर्ती । रामदास म्हणता बहु कीर्ती ।

यावरून समर्थांनी रंगनाथ स्वामींचा घोडा उठवला ही घटना खरी घटलेली असावी.

२) दुसऱ्या कथेनुसार रंगनाथ स्वामी पंढरपूरला होते. त्यांचा पुतण्या खंडोबा त्यांच्याबरोबर होता. हा खंडोबा जरा बुद्धिमंद होता. त्यामुळे सारे लोक त्याची टिंगल करत. पंढरपूरात रंगनाथ स्वामींची कीर्तने होती. एक दिवस कीर्तनाला थोडा उशीर होणार होता. रंगनाथ स्वामींनी तसा निरोप खंडोबाबरोबर धाडला. पण सगळ्या श्रोत्यांनी खंडोबाची रेवडी उडवली. आणि 'तूच कीर्तन कर' असे त्याला म्हणू लागले. खंडोबा रडत घरी आला आणि त्याने घडलेला प्रकार रंगनाथ स्वामींना सांगितला. रंगनाथ स्वामींनी आपला डावा हात त्यांच्या मस्तकावर ठेवला आणि उजव्या हाताने त्याच्या जिभेवर ॐ लिहीले. त्याने खंडोबाचे नाव श्रीधर ठेवले आणि त्या दिवशीचे कीर्तन त्याला करायला सांगितले. त्या दिवशी श्रीधराने तीन तास कथा करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. याच श्रीधर स्वामींनी रामविजय, हरिविजय आणि पांडवप्रताप हे ग्रंथ लिहीले.

आनंदमूर्ती ब्रह्मनाळकर

आनंदमूर्ती यांचे मूळ गाव आगळगाव असे होते. सद्गुरूमुळे ते ब्रह्मनाळ येथे स्थायिक झाले. म्हणून त्यांना ब्रह्मनाळकर ही उपाधी लागली.

त्यांचा जन्म अतिशय थोर अशा वैदिक घराण्यात झाला. स्वतः आनंदमूर्ती फार मोठे वैदिक होते. त्यांचे मूळ नाव अनंतभट असे होते. त्यांना आनंदमूर्ती हे नाव सद्गुरूने दिले. त्यांचे सद्गुरू रघुनाथ स्वामी यांनी दरवर्षी गंगोत्रीची गंगा रामेश्वरी न्यावी आणि रामेश्वरचा सेतू गंगोत्रीसी न्यावा. अशा पद्धतीने यात्रा चालू असताना त्यांची आणि अनंतभट यांची भेट झाली. अनंतभट यांनी रघुनाथ स्वामींकडून अनुग्रह घेतला. मात्र ही गोष्ट त्यांचे वडील बाळभट यांना आवडली नाही. वडिलांनीच मुलाला अनुग्रह द्यायचा अशी त्यांची वैदिक परंपरा होती. आपल्या मुलाने असे एखाद्या गुरूच्या नादी लागणे बाळंभट यांना अजिबात रूचले नाही. रागाच्या भरात त्यांनी मुलाला घराबाहेर काढले. आनंदमूर्ती यांचे लग्न झाले होते. त्यांची पत्नी दोन महिन्यांची बाळंतीण होती. पण अशा अवस्थेत हे दोघे पती-पत्नी गुरूच्या सेवेसाठी घरातून बाहेर पडले. अखेर गुरूंना आपल्या शिष्याचा संसार चालविण्याची वेळ आली. रघुनाथ स्वामींनी वसगडे या गावी एका वाड्यात अनंतभट आणि

त्यांची पत्नी यांना ठेवले. ते स्वतः त्यांच्याबरोबर राहू लागले.

एक दिवस रघुनाथ स्वामी अचानक निघून गेले. अनंतभटांची गुरूभक्ती एवढी विलक्षण होती की, ते गुरूच्या शोधार्थ सतत तीन वर्षे फिरत राहिले. ही तीन वर्षे त्यांची पत्नी एकटी वसकडे येथे आपल्या बाळाला सांभाळत होती. तीन वर्षांनी सद्‌गुरू दर्शन झाल्याने अनंतभट यांना अतिशय आनंद झाला त्या वेळी सद्‌गुरूंनी त्यांचे नाव आनंदमूर्ती असे ठेवले. रघुनाथ स्वामींनी देह ठेवल्यावर ब्रह्मनाळ येथे त्यांचे समाधी मंदिर आनंदमूर्तींनी बांधले. दोघे पती-पत्नी आयुष्यभर सद्‌गुरूंची सेवा करत राहिले. आनंदमूर्ती म्हणजे मूर्तीमंत गुरूभक्ती. ते जेव्हा सद्‌गुरूची आरती करत किंवा पूजा करत त्या वेळी त्या समाधी वृंदावनाचा डोल होत असे. समर्थ रामदास जेव्हा ब्रह्मनाळ येथे आले तेव्हा त्यांनीदेखील ती समाधी डोलताना पाहिली. समर्थांनी आपल्या काव्यात आनंदमूर्ती यांच्या गुरूभक्तीचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे अभिनव जगि तुझी कीर्ती आनंदमूर्ती ।

अचळ दगड प्रेमे डोलती थोर ख्याति ।।
तव चरणरजाते वांछिती देव मोठे ।
विबुधजन विरक्ता थोर कौतुक वाटे ।
म्हणवुनि पदछाया मस्तकी रामदासा ।
करूनि अभय देणे फार तुझीच आशा ।।

समर्थ रामदासांनी जेव्हा आनंदमूर्तींची स्तुती केली तेव्हा ते म्हणाले, मी आपुले लेकरू आहे. या स्तुतीला मी पात्र नाही. आपणामध्ये मी आमचे सद्‌गुरू रघुनाथ स्वामी पाहतो, आनंद मूर्तींनी एका श्लोकामध्ये समर्थांचे स्तवन केले आहे. या श्लोकात ते म्हणतात-

समर्थ हे नामचि सत्य मानू । समर्थ हे नाम दुसऱ्या न मानू ।
समर्थ कृपेने जडजीव तरती । समर्थ हे नाव सदय प्रतीति ।।

आनंदमूर्तींच्या गुरूभक्तीची एक विलक्षण कथा उपलब्ध आहे. हे आनंदमूर्ती रोज आपल्या सद्‌गुरूंच्या जोड्यांची पूजा करत असत. जेव्हा ते प्रवासात असत त्या वेळी त्यांनी रेशमी कापड्यात हे जोडे गुंडाळावेत आणि रोज स्नान झाल्यावर त्या जोड्यांची पूजा करावी.

एकदा वडगाव येथे जयराम स्वामींच्या सद्‌गुरूंच्या उत्सवाला आनंदमूर्ती समर्थांबरोबर आले होते. त्या वेळी दुपारी भोजनाची पंगत बसायची वेळ झाली होती. परंतु एका गृहस्थांचा रोज गीता - वाचनाचा नेम होता. गीता वाचल्याशिवाय ते जेवायला बसत नसत. पण त्या दिवशी ते नेमके पोथी विसरले होते. केशव स्वामी स्नानास गेले होते. त्यांच्या सामानातील रेशमी वस्त्रात कदाचित भगवत्‌गीता असेल असे समजून त्या गृहस्थांनी ते रेशमी वस्त्र सोडले. आश्चर्य म्हणजे त्या पायातील जोड्यांचे भगवद्‌गीतेत रूपांतर झाले. ते गृहस्थ पोथी वाचत असताना आनंदमूर्ती आणि समर्थ आले. आनंदमूर्तींनी सद्‌गुरूंच्या जोड्याचे रेशमीवस्त्र सोडलेले पाहिले. प्रथम त्यांना संकोच वाटला. परंतु आपल्या सद्‌गुरूंच्या जोड्यांचे धर्मग्रंथात रूपांतर झालेले पाहून त्यांना खूप आश्चर्य वाटले. समर्थ त्यांना म्हणाले, " आपली गुरुभक्ती धन्य आहे. आपली ही गुरूभक्ती जगात अमर होईल."

या आनंदमूर्तींनी ब्रह्मनाळ येथेच इ.स. १६९६ साली देह ठेवला. त्यांच्या सद्‌गुरूंच्या समाधी जवळच आनंदमूर्तींच्या समाधीचे वृंदावन आहे. आजदेखील आनंदमूर्तींनी सद्‌गुरूचा पूजनात ठेवलेला जोडा त्या समाधीस्थानी पाहायला मिळतो. या आनंदमूर्तींची गुरूपरंपरा आद्य शंकराचार्यांपासून सुरू होते.

केशवस्वामी भागानगरकर

मराठवाड्यात लातूरच्या दक्षिणेस कल्याणी नावाचे गाव आहे. केशवस्वामी मूळचे कल्याणीचेच. त्यांचे वडील आत्मारामपंत हे कल्याणी येथील कुलकर्णी होते. त्यांची पत्नी गंगाबाई. आश्चर्याची गोष्ट अशी की, या गंगाबाईंना ऐंशीव्या वर्षापर्यंत मूलबाळ झाले नाही. मात्र ऐंशीव्या वर्षी मुलगा झाला. हा मुलगा म्हणजेच केशवस्वामी होय. या केशवस्वामींना वयाच्या पाचव्या वर्षापर्यंत बोलता येत नव्हते. आपला मुलगा आता मुकाच राहणार की काय अशी शंका गंगाबाई आणि आत्माराम यांना येऊ लागली, परंतु एकदा शंकराचार्यांचे आगमन कल्याणी येथे झाले.

त्यांनी दिलेला प्रसाद खाताच केशवांना वाचा आली. आश्चर्यांची गोष्ट अशी की ते बोलू लागले ते एकदम भगवतांचे नामच घेऊ लागले. हे केशवस्वामी पुढे उत्तम कीर्तनकार झाले. त्यांचे काव्यही भरपूर आहे. त्यांचा अधिकार एवढा मोठा होता की त्यांचे कीर्तन संपत आले म्हणजे प्रत्यक्ष भगवंताच्या गळ्यातील हार त्यांच्या गळ्यात पडत असे. एकदा एका यवन अधिकाऱ्याने मुद्दाम भगवंताचा हार भगवंताच्या पोषाखाला शिवून ठेवला. परंतु आश्चर्य असे की दोरा तुटून तो हार केशवस्वामींच्या गळ्यात पडला या यवन अधिकाऱ्याने केशवस्वामींना गुरू केले. एकदा तर कीर्तन एवढे रंगात आले की, भींतीवरील कृष्णाच्या चित्राने तोंड फिरवून राधेच्या हातचा विडा खाल्ला. एवढेच नव्हे तर कृष्णाच्या मुखातून गळालेला रस भिंतीवर उमटला.

समर्थ जेव्हा हैद्राबादला गेले तेव्हा त्यांची आणि केशवस्वामींची भेट झाली. केशवस्वामी आपल्या शिष्यांना समर्थांच्या कथा वारंवार सांगत असत. समर्थ खूप दूर राहत असल्यामुळे त्यांची समर्थ दर्शनाची तळमळ खूप वाढे. एकदा चाफळला निघालेल्या शिष्याजवळ त्यांनी आपली तळमळ पत्राद्वारे व्यक्त केली. त्यांच्या पत्राला उत्तर लिहीताना समर्थांनी त्यांना निर्गुणात राहायला सांगितले. समर्थ लिहीतात-

पदातीत वाक्यार्थ शोधी समाधी ।
क्षयातीत जो निर्विकल्पावबोधी ।
जया उगमी जन्म नाही जिवाशी ।
मिळे दास त्या संगमी केशवासी ।।

केशवस्वामी शंकराचार्यांचे शिष्य होते तरीदेखील समर्थ रामदासांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण प्रेम होते. त्यांनी समर्थांवर काही पदे केली आहेत. पुढील अभंगातून त्यांचे समर्थांबद्दलचे प्रेम कसे व्यक्त होते ते पाहा-

रामदास माऊली ।।धृ।।
सच्चित्सुखघन वरद प्रतापी । शांतीची साऊली ।।१।।
अनन्य जे नर शरण रिघाले । तयालागी पावली ।।२।।
केशवि केशव निजसुख सेवी । आठविता चि धावली ।।३।।

जीवनाच्या शेवटी शेवटी हे केशवस्वामी आजारी असत. समर्थांना भेटण्याची तीव्र ओढ त्यांना लागली. ते आपल्या पत्नीबरोबर सज्जनगडावर येण्यास निघाले. त्यांची पत्नीसुद्धा अशक्त होती. एवढे सामानाचे ओझे घेऊन चालणे त्यांना झेपेना. पण आश्चर्य असे की प्रत्यक्ष मारुतिरायाने एका तरुण मुलाचे रूप घेतले आणि संपूर्ण प्रवासात केशवस्वामी व त्यांची पत्नी यांची सेवा केली. मारुतिराय त्यांचे सामान तर वाहून नेतच पण त्याहीपेक्षा जेव्हा केशवस्वामींच्या पत्नी प्रवासात थकून जात तेव्हा मारुतिरायाने त्यांना चक्क खांद्यावर घ्यावे. केशवस्वामी सज्जनगडावर पोचल्यावर तो तरुण गुप्त झाला. केशवस्वामींची पत्नी खूप शोक करू लागली. तेव्हा मारुतीराय प्रगट होऊन म्हणाले, "आता मी तुम्हाला समर्थांच्या रूपातच भेटेन." केशवस्वामींना

पाहून समर्थांना खूप आनंद झाला. या केशवस्वामींना गांजा ओढण्याचे व्यसन होते, पण गडावर आल्यावर समर्थांसमोर गांजा ओढता येईना, सज्जनगडावरील भक्तांना केशवस्वामींचे कीर्तन ऐकायचे होते. पण गांजाशिवाय कीर्तन रंगणार कसे ? शेवटी एक दिवस खुद्द समर्थांनी त्यांना गांजा भरून दिला. आणि कीर्तनसेवा करायला सांगितले. त्या दिवशीचे केशवस्वामींचे कीर्तन खूपच रंगले. सर्व भक्तमंडळी तृप्त झाली. केशवस्वामींनी पुन्हा मात्र आयुष्यात कधीही गांजा ओढला नाही. समर्थांच्या पाठोपाठ दोन वर्षात त्यांनी देह ठेवला. हैद्राबाद येथे आजही नदीकाठी केशवस्वामींची समाधी पाहायला मिळते. अशा प्रकारे दैवत आणि गुरूपरंपरा भिन्न भिन्न असूनदेखील हे पाचही संत मोठ्या प्रेमाने आणि गुण्यागोविंदाने नांदले. समर्थांनी त्या सर्वांना आपल्या संप्रदायात सामावून घेतले.

– श्री. सुनीलजी चिंचोलकर
अजिंक्य नगर, हिंगणे खुर्द

• • •



समर्थ रामदास आणि व्यक्तिमत्व विकास

- श्री. विवेक घळसासी



संत साहित्याकडे आस्थेने, श्रद्धेने व भावुकतेने पाहिले जाते. पारमार्थिक आयुष्यासाठी ते आवश्यकही असते. परंतु वर्तमानातील अस्वस्थ करणारे चित्र आहे ते चित्र जर दुरुस्त करायचे असेल किंवा नव्याने रेखाटायचे असेल तर या सगळ्याच रूढार्थाने धार्मिक म्हटल्या जाणाऱ्या परंपरेमध्ये तरुणांच्या हृदयाची भाषा झाली पाहिजे.

समर्थ रामदासांचे सारे तत्त्वज्ञान मरणोत्तर मला मोक्ष आणि सुख देणारे असेल तर ते प्राधान्य क्रमात पहिल्या पातळीवर आज माझ्या जीवनात येत नाही. त्याचे कारण उद्या विदेशात जाण्यासाठी पारपत्रावर लागणारी त्या त्या वकिलातीची अनुमती मिळवायची आहे; ती कशी मिळविता येईल? हा माझा प्राधान्याचा प्रश्न आहे. निष्णात पदवी असूनही उपाजीविकेचे साधन द्यायला ती पात्र ठरू शकत नाही हा अस्वस्थ करणारा प्रश्न प्राधान्य क्रमावर वरच्याश्रेणीत आहे. अतिशय प्रामाणिकपणे जगूनही मध्यवर्ती भागात मला दोन खोल्यांचे घरसुद्धा मिळत नाहीये माझी वेदना प्राधान्य क्रमावर आहे.

मेल्यानंतर मिळणाऱ्या सुख व दुःखांचा विचार करीत मला आत्ता समोर भेडसाविणाऱ्या समस्यांकडे डोळेझाक करता येत नाही. ही अतिशय ठसठसणारी वेदना तरुणांच्या मनात आहे. त्याला दिसतेय भीषण स्पर्धा, त्याला दिसतेय विसंगती, त्याला दिसतेय विषमता, त्याला दिसतेय सारे प्रयत्न करून हाती येणारे अपयश, अतिशय स्वप्न डोळ्यात भरून चालायला सुरुवात करतो, तेव्हा त्याच्या लक्षात येते की पहिल्याच पावलावरती काटे अंथरले आहेत आणि ज्यांनी स्वप्नेच पाहिली नाहीत त्यांच्या तोंडात मात्र सोन्या चांदीचे चमचे आहेत. हे सगळे पाहिल्यानंतर जेव्हा त्यांना सांगण्यात येते की, संत साहित्याच्या वाचनाने मनास शांती मिळते व मेल्यानंतर स्वर्ग दिसतो तेव्हा तो म्हणतो की जीवंतपणी नरकयातना भोगून मेल्यावर मिळणाऱ्या स्वर्गावर विश्वास ठेवायला मी तयार नाही. म्हणून त्याची वेदना, आकांक्षा, अपेक्षा लक्षात घेऊन त्याला अध्यात्माची ओळख करून दिली पाहिजे ज्या योगे तो त्याकडे केवळ धर्मकार्य असे पाहता, त्या विषयीच्या केवळ कर्मकांडानी कृतकृत्य न होता. त्यातील सिद्धांताच्या ओळखीने अस्वस्थ होऊन त्याचे मनन, चिंतन करून ते आत्मसात करेल.

गेल्या शंभर वर्षांमध्ये जगभरात 'व्यक्तिमत्त्व विकास' ह्या विषयावर जोरदार चर्चा आहे. मी अतिशय विकसित, संतुलित व सर्वसमावेशक अशा प्रभावी व्यक्तिमत्वाचा असलो पाहिजे अशी प्रत्येकाची आकांक्षा आहे. गेल्या ५०-६० वर्षांत आपल्या देशात व्यवस्थापनाचे, युवकांच्या आकांक्षांचे, व्यक्तिमत्त्व विकासाचे विषय, आपल्या जीवनामध्ये भौतिक सुख प्राप्त करून घेण्यासाठी संतांच्या साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हे सारे वेगाने सुरू झाले आहे. हे सगळे नवीन विषय व दृष्टीकोन घेऊन जेव्हा संतांच्या साहित्याकडे पाहिले जाते तेव्हा समाजात दोन तऱ्हेच्या प्रतिक्रिया प्रस्फुटित होतात. जेव्हा संतसाहित्यातील सिद्धांत वर्तमानातील समस्येच्या अनुशंगाने मांडले जातात तेव्हा संतांना अपेक्षित नसलेले संतांच्या बोकांडी बसविण्याचे हे पाप तुम्ही का करता? असे विचारले जाते.

पण हे संतांच्या मानगुटीवर काही मारणे नाहीये. कारण संतांना जर मुलांच्या मनापर्यंत घेऊन जायचे असेल तर मुलांच्या मनातली भाषा आणि संतांचा आविष्कार हा किती समान आहे ते दाखविणे अनिवार्य आहे. संत आपल्यापेक्षा समर्थ आहेत ते इतके समर्थ आहेत की या नव्या पिढीचे बोट एकदा का त्यांच्या हातात दिले की त्यांना ते उत्तम घडवू शकतात.

पण समाजात दोन ध्रुवांवरील विलक्षण चिंतन सतत सुरू असते. अगदी आधुनिक विचारवंतांनी मांडलेला सिद्धांत आमच्याकडे अगदी वेदांपासून सांगितला आहे असे म्हणून त्याकडे दुर्लक्ष करणारा एक गट असतो. जे जे काही नवे येते ते पूर्वीपासूनच आमच्याकडे आहे, अशी त्यांची धारणा असते. नव्याला श्रेय देण्यासाठी लागणारी मनाची उदात्तता, उदारता व धैर्य यांचा त्यांच्याकडे अभाव असतो. नव्याला खळखळून श्रेय देण्याने आपला मोठेपणा कमी होणार नाही उलट वाढेल हा आत्मविश्वास नसतो आणि म्हणून हे सारे आमच्याकडे आहेच अशी पळवाट शोधली जाते. दुसरा एक प्रवाह याला जोडून असतो तो असा की जुने सगळेच वाईट आहे. जुन्या काळात माणसाची कौशल्ये विकसित झाली नव्हती. किंबहुना त्यांना त्याची गरजही नव्हती व त्यांच्याकडे तेवढी अक्कलही नव्हती. जे काही चांगले आहे ते नवेच आहे. हा दुसऱ्या ध्रुवावरील विचार आहे.

जेव्हा व्यक्तिमत्त्व विकास आणि समर्थ रामदास ह्या विषयी चर्चा केली जाते तेव्हा एक मतप्रवाह असे मानतो की हे मारून मुटकून मुसलमान बनविण्याचा प्रकार आहे; कारण समर्थ हे छाटी, लंगोटीवाले बैरागी होते, ते बिचारे राष्ट्रकार्य करायचे, धर्मकार्य करायचे आणि तो कोसळणारा धबधबा बघत कविता बिविता करायचे. समर्थांना काय पडलंय व्यक्तिमत्त्व विकासाचे? असे नव्या पिढीला वाटते आणि समर्थांच्या वाटेलाच नवी पिढी जात नाही. आणि समर्थ हे आपल्या पिढीलाच कळू शकतात ह्या नवीन ठोंब्यांना काय कळणार असा विचार करून जुनी पिढी नव्यांना त्यांच्या जवळ नेत नाही. ह्या दोन टोकाच्या विचारात समन्वय घडविला पाहिजे.

कोणतीही संकल्पना आपण जेवढी मानतो तेवढी नवी नसते. या संकल्पनेची बीजे कधी ना कधी मानवी चिंतनाच्या नांगरलेल्या जमिनीवर पडत असतात आणि मानवी समाज जीवन जेवढे प्रगल्भ व्हायला लागते तेवढी तेवढी ती संकल्पना अधिक स्पष्ट व्हायला लागते, अधिक सबल व्हायला लागते, अधिक सहज प्राप्त व्हायला लागते. तिचे हे सुस्पष्ट कालानुरूप

आविष्करण हा मानवी जीवन उन्नतीचा एक सहज टप्पा आहे. मुळात अंतरंगात दडून असलेले ज्ञान आविष्कृत करण्यासाठी ज्या ज्या कालखंडात जे जे प्रयास केले जातात; ते ते त्या कालखंडाची परिभाषा घेऊन येतात आणि ती परिभाषा त्या काळात अत्यंत अनुकुल असते म्हणून गेल्या काळातील परिभाषा एकदम निकामी नसते. हे कळायला लागल्यावर त्यातील सुंदर समन्वय आपल्याला मोहून टाकायला लागतो. कारण ह्या सर्व संकल्पना व्यक्त करण्यात अंततोगत्वाभाव एकच आहे, की आम्हाला एका उन्नत आयुष्याकडे जायचे आहे. चांगल्या वाईटाची ही सरमिसळ असते आणि हा गोफ गुंफत समाज उन्नत आयुष्याकडे जात असतो. सकृतदर्शनी वाईट व ह्या गतीस अवरोध करण्याच्या गोष्टीही ही वाटचाल अधिक समर्पित व गतिमान करण्यात साहाय्यभूतच होत असतात. चांगले, वाईट हे आपल्याला आपल्या तात्कालिक मनोभूमिकेमुळे भासते, प्रत्यक्षात ते तसे नसते. परंतु जसजसा समाज प्रगल्भ होत जातो तसतसा ह्या चांगल्या वाईटातून तो काही ना काही उपयुक्त असणारे उचलत असतो आणि हे मुळात असलेले ज्ञान नव्या रूपामध्ये जेव्हा तो मांडतो; तेव्हा तो म्हणतो नवं आहे पण ते फक्त नेटकं असतं व समाजाला उन्नत आयुष्याकडील गतिमान करायला ते ज्ञान प्रकट केलेले असते. अनुकुलतेच्या थोड्याफार वर्षावाने त्याला अंकुर फुटायला लागतात, अधिक अनुकुलता प्राप्त झाली तर त्या अंकुराचा वृक्ष होतो. अधिक अनुकुलता प्राप्त झाली तर ह्या वृक्षावर अनेक प्रकारचे पक्षी येऊन बसतात आणि त्याहीपेक्षा अनुकुलता प्राप्त झाली तर हा वृक्षच वटवृक्ष बनून सगळ्या समाजाला आधार देतो.

समर्थांच्या तत्त्वज्ञानामध्ये आणि मांडणीमध्ये ह्याच एका उन्नत आयुष्याकडे जाण्याचा आग्रह आहे. समर्थांच्या विचारधारेत आधुनिक वाटणाऱ्या ह्या संकल्पनांची ठळक अशी पदचिन्हे सापडतात. व्यक्तीमत्व विकास ही जशी आपण अलीकडची कल्पना मानायला लागलो आहोत ती जशीच्या तशी आपल्याला समर्थांच्या साहित्यामध्ये सापडते. किंबहूना भौतिक आयुष्याशी निगडीत असणारी सर्व शास्त्रे जशी जशी खोलात उतरत सत्याच्या जवळ जाऊ लागली आहेत; तशी तशी ती अध्यात्माच्या जवळ जाऊ लागली आहेत. कोणतेही शास्त्र जेवढे प्रगत, प्रगल्भ आणि समाजकल्याणकारी होत आहे. तेवढे ते अध्यात्माच्या जवळ जात आहे, धार्मिकतेच्या जवळ कदाचित जात नसेल. कारण रूढार्थाने धार्मिकता अनेकदा संकीर्णतेला जन्माला घालते. पण अध्यात्मिकता हे ऋत आहे, त्यामुळे सत्याचा शोध घेणारे सर्व मार्ग तेथेच जाऊन थांबतात.

व्यवस्थापन क्षेत्रातील महागुरू स्टीफन कव्हे, जे त्यांच्या सात प्रभावी परिपाठांसाठी जगप्रसिद्ध आहेत, अलीकडेच म्हणाले आहेत की, आधुनिक व्यवस्थापनशास्त्र हे केवळ व्यक्तीमत्व ह्याच घटकाचा विचार करीत आहे. पण मानवी मनाचा सखोल विचार करता केवळ व्यक्तीमत्वाचा विचार ही फार अलीकडची मर्यादा आहे. अधिक प्रगल्भतेसाठी व्यक्तिमत्व केंद्रित तत्त्वचिंतनाऐवजी 'चरित्र' केंद्रित तत्त्वचिंतन आवश्यक आहे. आधुनिक व्यवस्थापन क्षेत्रातील हा दृष्टीकोन थोडा व्यापक होताच तो संत साहित्याच्या अधिक जवळ येताना दिसतो. कारण हे आठवे मूल्य अस्सल भारतीय आहे. ते भारतीयांच्या नसानसात भरलेले आहे. त्यांची व्यक्तिमत्व विकासाविषयीची सात मूल्ये आम्हाला जड वाटतात आणि आठवे मूल्य सांगितल्यावर ते शास्त्र अधिक सुगम होते. स्टीफन कव्हे पुढे जाऊन असे म्हणाले की तुम्ही 'चरित्र निर्माण' ह्या आठव्याच मूल्यावर लक्ष केंद्रित करा. आधिची सातही मूल्ये तुम्हास सहज प्राप्त होतील, व तुमचे व्यक्तिमत्व विकसित होत आहे याचे प्रत्यंतर येईल. मग भारतीयांना ही संकल्पना एकदम सोपी वाटायला लागते. मग जर भारतीयांना ही सोपी वाटत असेल तर स्टीफन कव्हेचे शब्द वापरून, समर्थांच्या तत्वज्ञानाच्या शेजारी ते नेऊन समर्थ आणि स्टीफन दोन्ही एकदम जर तरुण पिढीला दिले तर तरुण पिढी ते खरोखर आत्मसात करेल आणि त्यांना संत ओझे वाटणार नाहीत. एका दृष्टांताचा विचार करु या. एकदा एक मुलगा आपल्या जरा दूरच्या गावी रहाणाऱ्या मित्राला भेटायला सकाळीच पायी निघाला. त्याच्या आईने त्याच्या संभाव्य भुकेचा विचार करून त्यांच्या इच्छेविरुद्ध आग्रहाने त्यास शिदोरी बांधून दिली होती. कलंदरपणे मौज करत जाताना सांभाळावे लागत असल्याने त्यास शिदोरीचे मोठे ओझे वाटत होते; सध्या आपल्याला संत साहित्याचे वाटते ना; तसे. पुढे भूक लागल्यावर एका झाडाखाली बसून त्याने ती सर्व शिदोरी संपवली व रुमालाची घडी करून मोकळेपणाने पुढे निघाला. पुढे चालताना त्याच्या मनात विचार आला की मी शिदोरी फेकून दिली का? नाही. मग आता तिचे ओझे का वाटत नाही? संस्कारित अन्नाने घडणारा पिंड निश्चितच चांगला विचार करायला बाध्य करतो. त्याच्या अंतर्मनाने त्याला सांगितले की जो पर्यंत तू शिदोरी खांद्यावरून नेत होतास तो पर्यंत ओझ्याने कारण होती पण जेव्हा ती तू आत्मसात केलीस तेव्हा एकदम हलकी झाली.

आत्मसात करणे, आत्मसात करायला लावणे व आत्समात करण्यासाठी अनुकुलता निर्माण करणे यासाठी मुलांची भाषा बोलायलाच पाहिजे. त्यामुळे धर्म खरोखरच बुडत नाही आणि जर एखादा नवा पारिभाषिक शब्द बोलून जर धर्म बुडणार असेल तर बुडू लागलेला हा धर्म निःसंकोच बुडू द्यावा. नवा धर्म निर्माण करायला आपण मनु म्हणून उभं रहावं.

जर मुलांच्या कल्याणासाठी मुलांना समर्थ सांगायचे असतील तर आधी मुलांना विचारायला हवे की आधुनिक व्यक्तित्व विकासाच्या विचाराचे मुद्दे काय आहेत? त्यांचा संक्षिप्त परामर्श घेऊ या.

आधुनिक व्यक्तिमत्व विकास व व्यवस्थापन शास्त्र प्रथम आपल्या मनातील दोष काढून टाकायला सांगते. दुसऱ्या पायरीवर ते आपल्याला स्वतःतील गुणांचा शोध घेऊन ते वृद्धींगत करणे व आवश्यक असलेले नवीन गुण ग्रहण करून त्यांची जोपासना करणे. आणि ह्या तीन गोष्टीद्वारे आपला आत्मविश्वास, क्षमता वाढवून नेतृत्व व सर्वसमावेशक सहजीवनासाठी स्वतःस तयार करणे. हे शिकवित असतांना आधुनिक शास्त्र हे वर्तन शास्त्र, संवाद शास्त्र यातील बारकाव्यांचे धडे गिरवून घेऊन व्यक्तित्व विकसनाचे उद्दिष्ट साध्य करते.

मुलांनी असे उत्तर दिल्यानंतर समर्थांनी आपल्या वाङ्मयात ह्याच गुणवैशिष्ट्यांचे किती सूक्ष्म व वैशिष्ट्यपूर्ण वर्णन केले आहे ते आपण मुलांना दाखवू शकतो. जेणे करून ते स्वतःचा विकास साधण्याच्या दृष्टीकोनातून संतसाहित्याकडे आकर्षित होतील. आता समर्थांच्या व्यक्तित्व विकासाचा विचार पाहू या.

समर्थांनी करुणाष्टकांमधून उत्तम वैगुण्य दिग्दर्शन केले आहे. आपल्यातील दुर्बलता, उणीवा अगदी स्पष्टपणे मांडल्या आहेत. या सगळ्या उणीवा लक्षात आल्या की मग त्या दूर करण्यासाठी कोणत्या मार्गाने जायला हवे ते लक्षात येते. आपली उणीवच जर आपल्याला कळली नाही तर कोणत्या उणीवा दूर करायच्या आहेत याचा मार्ग सापडत नाही व आपण उणीवासह जगत राहातो. म्हणून हे दोष निष्कासन महत्त्वाचे आहे.

करुणाष्टकात समर्थ मनाची चंचलता सांगतात, उपलब्ध होत नसलेल्या गोष्टींची तर यादीच देतात. 'अचपळ मन माझे नावरे आवरिता' हे माझ्या मनाच्या चंचलतेचे लक्षण आहे. हे दुसऱ्या बाजूने मांडायचे झाले तर माझे मन स्थिर नाही, माझे मन प्रसन्न नाही. 'मन करा रे प्रसन्न। सर्व सिद्धीचे साधन' असे संत तुकाराम महाराज त्याच वेळी सांगतात. माऊलींनी तर हे

आधीच सांगून ठेवले आहे, 'अवधान एकले दीजे । मग सर्व सुखासी पात्र होईजे ।' स्थिरता, अवधान, एकाग्रता ह्या गुणांची आवश्यकता येथे अधोरेखित होते. पण मनाला एकाग्र हो असे सांगून मन एकाग्र होत नाही, कारण मन अचपळ आहे. मनाचे श्लोक तर याबाबतीत अत्यंत उपयुक्त आहेत. त्या या दोष निष्कासनाचा, व्यक्तित्व विकासाचा, गुणवत्ता नियंत्रणाचा सांगोपांग विचार झाला आहे. विस्तारभयास्तव येथे त्यांचा तपशीलात शिरणे अशक्य आहे.

कधी कधी आपण परंपरेच्या धारेतील काही बोलतो. हे अगदी अचूक असते. जसे 'मी' चा निरास व्हायला पाहिजे. अहंकार गेला पाहिजे. मला नाही पटत. तुम्हाला पटतय असे तुम्ही उगीच म्हणता. पण खरंच सांगा मी पण गेलच पाहिजे का? तर नाहीच जात 'मी' पणा. मग हळूहळू समाज प्रगल्भ झाला आणि त्यांनी त्याला एक नवा आयाम जोडला- संतांसह सगळ्यांनी, की तुला कोण सांगतय, की मीपणा टाकून दे. तुझा मी फक्त विस्तारित कर.

हे विश्वचि माझे घर। आहे ना माझे पण. 'हे विश्वचि माझे घर।' ऐशी मति जयाचि स्थिर। किंबहुना चराचर आपणचि झाला।'

तू तुझा 'मी' विसरूच नको बेट्या. तू तुझा मी इतका विस्तारित करून टाक की सगळं जग तुला त्यात समावलेले दिसेल. मग तूलांना वाटत की हो. 'मी' सोडायचा नाहीये. मी मोठ्ठा करायचा आहे आणि मोठा करण्याचाच अर्थ आहे विकसित करायचा आहे. पुढे समर्थ असे म्हणतात, ' काही तरी धरावी सोय आगन्तुक गुणाची ।' दोष निष्कासन, स्वगुण वर्धन, नुतन गुणारोपण ह्या आधुनिक व्यक्तिमत्व विकासाच्या तीन पायऱ्या समर्थांच्या मार्गदर्शनात स्पष्टपणे दिसतात.

पण आपल्यातील दोष शोधायचे कसे? त्यासाठी समर्थ उपाय सांगतात. 'एकांती बसून चाळणा करावी' एकांतामध्ये बसून विवेक करत असताना यत्नामध्ये कुठे खंड पडला हे पण कळते आणि आपल्याला यत्न कसे करायला पाहिजेत हे पण कळते. आणि एकांतामध्ये जो विवेक प्राप्त होतो त्यानंतर आपल्याला जगामध्ये मागे फिरून बघायची गरजच नाही. इतक्या आत्मविश्वासानी समर्थ सांगतात. समर्थ सांगतात एकांती चाळणा करताना तुझे दोष जातील व तुला आत्माराम कळेल. ही काय भानगड आहे आत्माराम ? आत्माराम म्हणजे दुसरे तिसरे काही नाही तर माझ्यातील जेवढ्या सकारात्मक क्षमता आहेत तो माझा आत्माराम आहे. जर मला सहा तास उभे राहून काम करता येत असेल तर सहा तास काम करण्याची माझ्यातील उर्जा हा आत्माराम आहे.

माझ्यातील निसर्गदत्त दैवी क्षमता हाच ईश्वर असतो. 'मौको कहाँ ढुंडते हो बंदे मै तो तेरे पास मे । ना मै मंदीर ना मै मस्जीद ना मै काबे कैलास मे । आणि माझ्यातील महत्त्वाची क्षमता कोणती तर मी माझ्यात लहान दिसणाऱ्या क्षमता पराकोटीच्या विकसित करू शकतो. हाच व्यक्तिमत्व विकास. यत्न तो देव का जाणावा? तर आतल्या देवाला या देवानेच हाक मारता येते. आतला देव दुसऱ्या कुठल्याही पूजापाठांनी प्रसन्न होत नाही. पण व्रत वैकल्य व पूजापाठाचे अनुशासन कशासाठी आहे? तर यत्न देवाच्या प्राप्तीसाठी आहे. पण प्रयत्नाच्या देवाची प्राप्ती कशासाठी आहे? तर आत्माराम मिळण्यासाठी आहे. समर्थ सांगतात, आत्माराम ओळखणे म्हणजे आपल्यातील क्षमता विकसित करणे आणि हे विकसन कुठपर्यंत व्हावं? तर ह्या माझ्या क्षमतांसाठी पडाव्या जीवलगांच्या तुटी हे कळेपर्यंत. माझ्या ह्या आत्मारामाला जर परिपूर्ण विकसित करायचे आहे ना तर त्यासाठी माझे जे कोणी जीवलग आहेत त्यांच्या तुटी पडू द्यायच्या आहेत. त्यातील सगळ्यात मोठे जीवलग आहेत आळस, दैववाद. कित्येक चांगली व कर्तृत्वमान माणसेही बऱ्याचदा दैववादाच्या आहारी गेलेली दिसतात. हे योग्य नाही. जेव्हा अशा माणसांना या फुटकळ दैववादाचा आधार घ्यावासा वाटतो तेव्हा समर्थ म्हणतात की, तुला 'चळवळीचे सामर्थ्य' कळालेले नाही. 'सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ।' चळवळ म्हणजे एकदम पंचवीस वर्षांनी आपला पुतळाच उभा राहीला पाहिजे याच दर्जाची चळवळ का? नाही. माझ्यातल्याच उणीवांशी, माझ्यातल्याच दुर्गुणांशी माझा निरंतर चाललेला संघर्ष म्हणजे चळवळ. 'रात्रं' दिन आम्हा युद्धाचा प्रसंग' म्हणजे काय? संत तुकाराम महाराजांचे काय गावकऱ्यांशी पटत नव्हते? पटत होते. पण तुकाराम महाराजांचा संघर्ष बाहेरच्या कुणाशी नव्हताच. तो स्वतःशी होता आणि हा स्वतःशी चाललेला संघर्ष हीच व्यक्तिमत्व विकासाची चळवळ आहे. समर्थांनी नेटक्या शब्दामध्ये ह्याचा एक पाया आपल्यासाठी करून दिला.

आता आधुनिक व्यक्तिमत्व विकासाच्या कार्यशाळेत चर्चिल्या जाणाऱ्या प्रमुख एकादश गुणांकडे पाहू या. त्यात प्रथम येते रूबाबदार दिसणे, प्रभावी बोलणे, बोलण्याला व दिसण्याला सुसंगत चिंतन, हे तिनही गुण 'सहजीवनासाठी पूरक असले पाहिजेत, या सगळ्यासाठी त्याच्यात 'आत्मविश्वास' असला पाहिजे. या सगळ्याच्या बरोबरीने जीवनाविषयी आस्था, श्रद्धा असली पाहिजे. त्याचे 'आस्वादन' कौशल्य उत्तम असले पाहिजे, 'अभिव्यक्ती' प्रगल्भ असली पाहिजे. उत्तम 'नियोजन' करता आले पाहिजे. 'नेतृत्व गुण' अंगी हवा आणि हे सारे करताना निरामय 'आरोग्य' जोपासता आले पाहिजे आणि मग ह्या तऱ्हेच्या सगळ्या गुणांनी आतून हळूहळू विकसनाला सुरुवात केली की, आपले व्यक्तित्व विकसित होते. आधुनिक व्यवस्थापन शास्त्र हे केवळ बाह्य व व्यावहारीक अंगाने ह्या गुणांचा विचार करीत असल्याने ते थोडे मर्यादित होते. स्टीफन कव्हे हल्ली परिपूर्णतेसाठी ज्या 'चरित्र्य' ह्या पैलूच्या आग्रह धरू लागले आहेत; त्याच्या जडणघडणी विषयी सखोल मार्गदर्शन आपल्याला समर्थांच्या साहित्यात स्पष्टपणे दिसते.

समर्थांनी कीर्तन कसे असावे? प्रवचन कसे असावे? हे सांगताना तसेच सामाजिक घडामोडींकडे बघण्याचा दृष्टीकोन कसा असावा हे सांगताना उत्तम 'आस्वादन' कसे असावे याविषयी मार्गदर्शन केले आहे. 'सावधानता' ह्या शब्दाने त्यांनी संपूर्ण साहित्यात जे जे सांगितले आहे ते 'नियोजनांसाठी' उत्तम मार्गदर्शक आहे. शिवाय त्यांनी बाग प्रकरण, कारखाने प्रकरण यातून विशिष्ट नियोजन विचार सांगितला आहे. महंत लक्षणे, संत लक्षणे सांगताना त्यांनी विकसित व्यक्तिमत्वांना आवश्यक गुणांची यादीच दिली आहे. त्यात त्यांच्या चरित्र्याचे सूक्ष्म विवेचन आढळते. येथे समर्थांच्या सखोल लेखनाची केवळ अनुक्रमणिकाच देता येणे शक्य आहे. ह्या सर्व दैनंदिन व्यवहारातील गुणांविषयी अतिशय सविस्तर व सूक्ष्मपणे दासबोधात सांगितले आहे आणि हे सोवळ्यात बसून वाचण्याची गरज नाही हे आपल्याला जेव्हा पटायला लागेल तेव्हा आपण मुलांना सांगू की हे सगळे तुझ्या व्यक्तिमत्व विकसनाचे आहे. दोन माणसे बोलत असताना दुसऱ्याने जाऊ नये ह्यात कुठे आहे उपवास ? चार लोकात बसल्यावर डोके खाजवू नये. ह्यात कुठे आहे ओलेत्याने फेऱ्या मारणे? नख कुरतडू नये, अनोळखी ठिकाणी जाऊ नये. ह्यात कुठे आहेत एकादशण्या ? कुठे आहेत महाशिवरात्र आहे? कुठे तीर्थ यात्रा आहे? हे व्यक्तीमत्व विकासासाठी असणारे रोकड्या प्रचितीचे समर्थांचे सांगणे आहे.

समर्थांनी जो नेटकेपणाने प्रपंच करून अस्त्र सांभाळणार नाही त्याचे परत्रही धड नाही हे निक्षून सांगितले. प्रपंच नेटका म्हणजे काय? प्रपंच तुम्ही संसार ह्या अर्थाने घ्या किंवा व्यापक अर्थाने घ्या; जिथे आपली आवश्यकता नाही अशी रचना करून निघून जाणे म्हणजे नेटकेपणा.

आता पूर्वनिर्देशित एकादश गुणांपैकी काही गुणांचा समर्थांच्या साहित्यात कसा उल्लेख आला आहे ते संक्षेपणाने पाहू या. **दिसणे, देहविचारः** ह्रदयस्थ श्रीरामाला कर्ता धर्ता मानणाऱ्या समर्थांनी नरदेहाचा दुर्मिळपणा व महत्त्व स्पष्टपणे सांगितले आहे. समर्थ म्हणतात, 'बहुता जन्माचा शेवट नरदेह सापडे अवचट ।' आदर्श देह कसा असावा? ह्याची प्रेरणा मिळण्यासाठी त्यांनी श्रीरामाच्या मोहक लावण्याचे, श्री हनुमंताच्या सौष्ठवाचे आकर्षक चित्र आपल्या वाङ्मयात रेखाटले व त्यांच्यासमान देह धारणेची प्रेरणा देत मारुती मंदिरांची व व्यायामशाळांची स्थापना केली. उत्तम, देखणे व नितान्त प्रभावी असे रूप संपादन करणे हे व्यक्तिमत्व विकसनाचे एक अंग आहे. छ. शिवाजी महाराजांना लिहिलेल्या पत्राच्या पहिल्याच चरणात समर्थ म्हणतात. 'शिवरायांचे आठवावे रुप' ह्या प्रभावी 'रूप' संपादनासाठी त्यांनी व्यायाम सांगितला. समर्थांनी तरुणांचे जे संघटन निर्माण केले त्याचा आधार व्यायाम होता. समर्थ सांगत, व्यायामाने तुझे शरीर जेवढे लवकर निरोगी होईल तेवढे लवकर मन निरोगी होईल आणि शरीर व मन जेवढ्या वेगाने निरोगी होईल तेवढ्या चटकन तुझा विकास तुला साधेल.

बोलणे :- समर्थ सांगतात, ' फड नासोनि नेदावा । पडिला प्रसंग सावरावा' कधीही एकत्र आलेल्या माणसांच्या चिंतनात विवाद निर्माण होईल असे बोलू नये. आपले बोलणे मधूर, सर्वांना सांभाळून घेणारे व समाधान देणारे असावे. शब्दांच्या वाच्यार्थापेक्षा अंतरंगातील भाव महत्त्वाचा जाणावा व त्या अनुशंगानेच बोलावे. 'अति वाद न करावा कोणे एकासी । 'वादे वादे जायाते तत्त्वबोधः' यातला वाद वेगळा आहे. विकसित होणाऱ्या व्यक्तिमत्वास खूप माणसे जोडून घेता आली पाहिजेत. म्हणून माणसे तोडणारा वाद टाळावा असे समर्थ सांगतात.

चिंतन :- 'एकांती विवेक ठायी पडे । एकांती यत्न सापडे ।' समर्थांनी एकान्तात विवेक प्राप्त करून घेऊन चिंतन करण्यास सांगितले आहे. समर्थ वारंवार सांगतात की तू जितके बाह्यजगताचे चिंतन करशील तितका तू आपल्या प्रयत्नापासून हटशील Circle of Concern, Circle of influence ह्या आधुनिक शास्त्रातील संकल्पना ह्या समर्थांच्या विचारांच्या जवळच्या आहेत. समर्थ सांगतात 'प्रभाते मनी राम चिंतीत जावा' आयुष्यातील पुढे टाकले जाणारे प्रत्येक पाऊल ही साधकासाठी प्रभात घरिका असते व त्या वेळी श्रीरामाचे त्याने स्मरण ठेवावे. कार्यारंभी राम म्हणावे. कार्यामध्ये राम म्हणावे व कार्यान्तिसुद्धा राम म्हणावे म्हणजे राम न्यून पुरते करून घेतो. याचा अर्थ जळी, स्थळी, काष्ठी पाषाणी तो जर भरला आहे; तर खाता, पिता, विषय सेविता त्याचेच चिंतन करावे आणि त्याचे चिंतन करावे याचा अर्थ असाच आहे की आपल्या सद्सत् विवेक बुद्धीशी अनुसंधान कायम ठेवावे. समर्थ सांगतात की ज्याचे व्यक्तित्व समग्र विकसित झाले असते ते स्वतःच्या आत्मारामाशीच संलग्न असतात. इतरांच्या टीकेने ते दुःखी होत नाहीत. 'सत्यासत्याशी मन केले नाही। मानियले नाही बहुमता ।' 'आम्ही काय कुणाचे खातो रे । प्रभु राम आम्हाला देतो रे ।' हे सारे संतसाहित्यातील प्रतिध्वनी आहेत. समर्थ सांगतात, जेव्हा तू आत्मविवेकाने वागशील तेव्हा तुझे व्यक्तिमत्व खऱ्या अर्थाने विकसित होईल.

आधुनिक व्यक्तिमत्व बाहेरच्या विकसनाचा विचार करते, थोडे फार आतल्या विकसनाचा विचार करते ते सुद्धा आत्मविश्वास, अंतःउर्जा ह्या अंगांनी करते. पण समर्थ मात्र अशा एकेका पायरीवरती व्यक्तित्वाचा विकास करतात. ते असे म्हणतात. तुझा अन्नमय कोष विकसित व्हायला पाहिजे. म्हणून व्यायाम. पण तुझा मनोमय कोषही विकसित झाला पाहिजे म्हणून मनाचे श्लोक आणि तुझा ज्ञानमय कोषही विकसित झाला पाहिजे म्हणून एकांतामध्ये चाळणा करायची आहे व साधन देणाऱ्या सदगुरूला शरण जायचे आहे. त्यामुळे तुला जीवनाचे ज्ञान विज्ञान कळेल. तुझा प्राणमय कोष विकसित व्हायचा असेल तर ते साधन तू केले पाहिजेस आणि मग आनंदमय कोषाच्या विकसनामध्ये जाणे म्हणजे काय होणे तर तुझ्या संगतीमध्ये येणाऱ्या प्रत्येकाला परम आनंदाचीच अनुभुती असली पाहिजे जे आधुनिक व्यक्तिमत्व विकासवाले सांगू शकत नाहीत.

या तीनच गोष्टींकडे नुसते बधितले तरी लक्षात येते की दिसणे, बोलणे, आणि वागणे. यावर समर्थांनी एकाग्र लक्ष केल्याने समर्थांनी छ. संभाजी महाराजांना लिहिलेल्या पत्रात ह्या तीन पैलूंचा आग्रहाने विचार केला आहे.

'शिवरायांचे आठवावे रूप । शिवरायांचा आठवावा प्रताप
शिवरायांचा आठवावा साक्षेप । भूमंडळी ॥
शिवरायांचे कैसे बोलणे । शिवरायांचे कैसे चालणे ।
शिवरायांचे सलगी करणे । कैसे असे ॥

शिवरायांचे रूप, त्यांचा प्रताप, त्यांनी केलेली माणसांची पारख, माणसे जोडून त्यांच्या समोर उदात्त ध्येय ठेवून उभारलेले कार्य हा साक्षेप, त्यांचे संवाद कौशल्य, त्यांचे वर्तन, त्यांचे माणसांशी जवळीक साधणे, संघटन करणे. आदि अत्यंत समग्र विकसित व्यक्तिमत्वाचे गुण कसे होते हे स्मरणात आणायला सांगून त्याप्रमाणे होण्याचा समर्थ छ. संभाजीराजांना उपदेश करतात.

मला अशा पद्धतीनेच वर्तन करता आले पाहिजे की जे वर्तन माझ्या आतल्या उत्तमतेलाच प्रकट करेल. उदा. मला भाजी नाही आवडली, मीठ जरा कमी झालय, तर माझे वर्तन कसे असेल? तर मी असे चेहऱ्यावर सुद्धा दिसू न देणे हे विकसित अवस्थेचे लक्षण आहे. मला एखादी गोष्ट आवडली किंवा न आवडली तर मी प्रतिक्रिया कशी व्यक्त करतो. यावरून माझे व्यक्तित्व किती विकसित आहे ते कळते.

आपले चालणे आणि बोलणे हे आपल्या विकसित व्यक्तिमत्वाचे दूत आहेत. ज्याला संघटन करायचे आहे. समाजाचे अथवा स्वतःच्या व्यक्तिमत्वाचे, त्याला स्वतःला नीट संघटित करण्यासाठीसुद्धा आपले चालणे व बोलणे दुरुस्त करून घ्यावे लागेल आणि सातत्याने हे सगळे करणारा मी कोणी ऐरागैरा नथ्थुखैरा नसून मी आत्मरूप आहे. कारण ज्या पंचमहाभूतांचा हा देह बनला आहे, ती पंचमहाभूते एरवी विश्वात एकमेकांच्या विरुद्ध वागत आहेत, पण आत्म्याच्या संनिध आल्यानंतर एकमेकाला पूरक होऊन देहरुपाने राहात आहेत. हे जसे आत्म्याच्या व्यक्तित्वाचे लक्षण आहे, प्रभावाचे लक्षण आहे, तसा तू ह्या संपूर्ण समाजाला व स्वतःला संघटित करणारा होशील का ? समर्थांनी आपल्याला व्यक्तित्व विकासाचा असा गुरूमंत्र दिला आहे. त्यांनी रचलेले सगळे समास तत्त्वज्ञानाची रचना ही आधुनिक व्यक्तित्व विकासाच्या अत्यंत जवळची आहे. नव्हे नव्हे हे शास्त्र जेवढे जेवढे प्रगल्भ होत आहे तेवढे तेवढे ते समर्थांच्या शिकवणुकीच्या जवळ चालले आहे. अर्थात हे खरे की संतांच्या शिकवणुकीचा हेतू व्यक्तिमत्व विकासाचे वर्ग चालविण्याचा नव्हता.

विकसित होता होता हे सनातन हिंदूराष्ट्र अशा अवस्थेला जावे की व्यक्ती व्यक्तीचे विकसन राष्ट्राच्या विकसनेमध्ये व्हावे आणि हे विकसित राष्ट्र जगाच्या गुरूपदी जाऊन बसावे एवढा विकासाचा पल्ला गाठविण्याचे तत्त्वज्ञान संतांनी आपल्याला अध्यात्माच्या मार्गाने दिले आहे. ह्या लेखाद्वारे एक छोटीशी खिडकी किलकिली करून त्याची तोंडओळख करून देण्याचा प्रयत्न आहे. वस्तुतः हे सारे समग्र तत्त्वज्ञान आत्मसात करण्याचीच खरी गरज आहे. येथे त्या दृष्टीने चिंतनाची एक दिशा समोर ठेवली आहे.

नव्या पिढीला कळेल व रूचेल अशा प्रकारे ह्या सगळ्या साहित्याची मांडणी, त्याचे श्रेष्ठत्व व पावित्र्य नष्ट होऊ न देता आपल्याला करायची आहे. माझी हजारो मुला मुलींशी जेव्हा भेटी होतात; तेव्हा मला कळते त्यांनाही खूप तहान लागली आहे. त्यांनाही शुद्ध अमृताचा आस्वाद घ्यायचाय. पण त्यांच्या दुर्दैवाने त्यांच्या हाताशी थम्स अप आणि पेप्सी आहे; त्यामुळे तेच ते पितात आणि पुन्हा आपण असे म्हणतो की या पिढीला तर अमृताची चव नाही. थम्स अप आणि पेप्सीच पिते. थम्स अप आणि पेप्सी तिला प्यायचे नाहीये, कॅडबरी आणि केक्स खायचे नाहीयेत. पण जेव्हा आई भाकरी करायला विसरते तेव्हा पोरांना उपाशी तर राहता येत नाही ना आणि म्हणून तुम्ही आणि मी आई बनून पोरांच्या तोंडी हे संतसाहित्याचे घास त्यांना आवडतील त्या पॅकेजमध्ये देऊया पॅकिंगचा विचार न करता कंटेण्टचा विचार आपण करूया

श्री. विवेक घळसासी
पत्रकार, सोलापूर
(पुणे येथे ४००व्या जयंती निमित्त झालेल्या व्याख्यानाचा सारांश जन्मोत्सव चतुःशताब्दी समितीच्या सौजन्याने)

• • •



समर्थ रचित युद्धकांड

- डॉ.सौ सुनंदा लोहकरे
(M.A.M.Ed.PH.d)



समर्थांनी रामायणाची दोन कांडे लिहिली आहेत. त्यांची श्लोकसंख्या चौदाशे बासष्ट आहे. या दोनपैकी सुंदर कांडाचा उल्लेख 'सीताशुद्धी' नावानेही ज्या बाडांत आढळतो. त्यापैकी ५९७ हे एक आहे. याच सीताशुद्धी नावाचा उल्लेख तंजावर २०१२ बाडात येतो. सुंदर कांडानंतर युद्ध कांडाची रचना झाली. या दोन कांडांप्रमाणेच किष्किंधाकांडही आहे. पण काही लोकांच्या मते ते समर्थांचे नाही. पण त्याची भाषा, धाटणी पाहून काही लोकांचे मत आहे ते समर्थांनी रचलेले आहे.

संदर्भ - समग्र समर्थ साहित्य

डॉ. म.रा.जोशी पान. नं. ४२.

समर्थांनी जे युद्ध कांड रचले त्यात तेरा प्रसंग आहेत. व एकूण तेराशे बासष्ट श्लोक आहेत. समर्थांनी रामायणाची रचना केली ती प्रामुख्याने रामाचे कार्य वर्णन करण्याकरिता. ''देवांची मुक्तता करणे हेच रामाचे प्रमुख कार्य होते, असे समर्थभक्त नानासाहेब देवांचे मत आहे. समर्थरचित रामायणाच्या सुंदर व युद्ध काडांची संहिता डोमगाव प्रतीवरून नानासाहेब देवांनी प्रसिद्ध केलेली आहे. याच्या अखेरीस ''इति श्री युद्ध कांडरामायेण श्लोकबद्ध शत त्रयोदश ''१३शे एकूण संख्या चौदाशे बासष्टी'' असा उल्लेख आहे.

देवांच्या पूर्वी ज्यांनी ज्यांनी रामायणाची संहिता प्रसिद्ध केली त्यांनी त्यांनी मांडगावकर संपादणीतील संहिताच जशीच्या तशी घेतली आहे. ह्या सगळ्या संहिता प्रामुख्याने डोमगाव परंपरेतील प्रतीवर आधारलेल्या आहेत व यापैकी देवसंपादणीला ज्या प्रतीचा आधार आहे त्याविषयी देव लिहितात, 'डोमगाव मठातील खुदू श्री कल्याण स्वामींच्या हातच्या बाडावरून हे बाड धुळे येथे ५१ क्रमांकाचे असून ते सुमारे शके १६०१ मधील आहे.

सुंदर कांड व युद्ध कांड या रामायणाच्या अनेक प्रती उपलब्ध आहेत. कारण त्या काळी मुद्रणकला नसल्यामुळे समर्थांचे महंत हाताने ग्रंथाच्या नकला करीत असत. त्यामुळे वेगवेगळ्या मठात अनेक हस्तलिखित प्रती होत्या.

समर्थांचे रामायण एकदा वाचायला सुरूवात केली की संपेपर्यंत थांबायची इच्छाच होत नाही. समर्थांचे शब्द इतके प्रभावी आहेत की ते जो प्रसंग वर्णन करतात तो प्रसंग जशाच्या तसा वाचणाऱ्याच्या डोळ्यासमोर उभा राहातो.

विनोबांनी ज्याप्रमाणे गीतेच्या श्लोकांचे मराठीत अनुवाद करून गीताई लिहिली त्याचप्रमाणे समर्थांनी संस्कृतमधील रामायण श्लोकबद्ध रीतीने मराठीत आणले. समर्थांची भाषा अतिशय सोपी व सरळ आहे. काही शब्द हे समर्थांचे खास शब्द आहेत व त्याची रचना ही विशेष प्रकारची आहे. उदा. युद्ध कांडात युद्धाचे प्रत्यक्ष वर्णन करताना समर्थ अशी शब्द योजना करतात.

फडाडा खडाडा गडाडा घडाडा
तडाडा थडाडा दडाडा घडाडा
बहुतांपरीचे बहु घोष जाले
ग्रहा चंद्रसूर्यादिका कंप आले (प्रसंग ७/१९)

त्या शब्दांवरून आपल्याला आवाजाची कल्पना येऊ शकते. समर्थांना अन्यायाची अतिशय चीड होती. व त्या अन्यायाविरुद्ध लढणाऱ्यांबद्दल आदर होता. राम हा 'बंधविमोचन' करणारा असल्यामुळे समर्थांना जास्त प्रिय होता. रामाने देवांना रावणाच्या बंदीखान्यातून सोडविले होते. समर्थांच्या काळी असाच एक रावण माजला होता त्याला ठार करण्यासाठी समर्थांना एक राजा हवा होता. तो त्यांना छत्रपती शिवरायाच्या स्वरूपात मिळाला होता. लोकांसमोर रामायणातील युद्ध कांड ठेऊन लोकांमध्ये वीरश्री संचारली पाहिजे हा समर्थांचा रामायण लिहिण्यामागील उद्देश असावा. त्याचप्रमाणे लोकांमध्ये बल संवर्धन व्हावे ह्याकरिता हनुमंताचा आदर्श समर्थांनी ठेवला होता. समर्थांनी लिहिलेल्या रामायणातील युद्ध कांडाचा आपण ह्या लेखात विचार करणार आहोत.

हनुमंताने लंकेत जाऊन सीतेचा शोध लावला त्याला अतिशय आनंद झाला. ही आनंदाची बातमी राम लक्ष्मणांना सांगण्याकरिता तो ऋषी पर्वतावर आला. समर्थ वर्णन करतात,

ऋषी पर्वती राम सौमित्र होते ।
अकस्मात आला हनुमंत तेथे ।
म्हणे जानकी देखिली रामचंद्रा ।
क्षमारूप लंकेसि आहे नरेंद्रा ॥१।१२

हनुमंत पुढे सांगू लागला, ''सीतेला रावणाने वाटीकेत ठेवले आहे. मी स्वतः तिला बघून आलो. तिच्या भोवती कर्कशा राक्षसिणींचा वेढा आहे. ''हनुमंताचे हे बोलणे ऐकून रामाने सुग्रीवाशी सल्लामसलत केली व दक्षिण दिशेला जाण्याची ते तयारी करू लागले.

सगळे वानर दल एकत्र झाले. ''सीता दिसली'' हा हनुमंताचा आनंद सगळ्या वानरांना आनंदित करून गेला. सगळे लंकेवर स्वारी करायला अगदी उतावीळ झाले होते. सगळे समुद्रकिनारी जायला निघाले. हनुमंताने अति आदराने रामांना खांद्यावर घेतले व सगळे समुद्रकिनारी निघाले.

सगळे वानर सैन्य सभोवती व मध्ये ''श्रीराम''ह्याचे वर्णन समर्थ करतात.

अपारे क्रुरे वानरे सैर मेळा । कठोरे करे फोडिती चंड शीळा ।
रिसे कर्कशे भीस भिंगोळवाणी ।
मध्ये सावळा राम कोदंडपाणी ॥१।१८

वानरांचे शस्त्र म्हणजे शिला, पाषाण. ते सगळे वानर रस्त्याने जाताना त्या मोठ्या मोठ्या शिळा फोडत होते. ती वानर सेना विध्याचलाजवळच्या घनदाट जंगलात पोहोचली तेव्हा ते वानर झाडावर चढले. त्यांनी तिथली फळे खाण्यास सुरूवात केली. खाता खाता ते जोरजोरात भुभुकार करत होते.

स्वइच्छा फळे भक्षिती आदरेसी ।
बहु वाटती येकमेका त्वरेसी ।
फळे तोडिती टाकिती ते अपारे ।
वनामाजि ते क्रीडती भुभुकारे ॥१।२४

अशा प्रकारे रस्त्याने कधी चालत कधी उडत ही वानर सेना समुद्राच्या दक्षिण किनारी येऊन पोहोचली.

ते सगळे तो समुद्र बघून आश्चर्यचकित झाले. तो समुद्र खवळलेला होता. त्यांची ती गर्जना ऐकून असे वाटत होते की आकाशात मेघच गडगडाट करीत आहेत. ती सगळी सेना त्या समुद्रकिनारी गोळा झाली. एकीकडे जलाचा समुद्र होता तर दुसरीकडे त्या वानरांचा समुद्र दिसत होता.

तिकडे लंकेमध्ये अक्षयाच्या मृत्यूने दुःखी झालेल्या मंदोदरीने आपल्या दिराला म्हणजे बिभीषणाला बोलाविले व ती त्याला म्हणाली.

(म्हणे) देवरालागी बिभिषणा हो ।
(तुम्ही) आजि वेगी सभेमाजी जा हो ।
मदोन्मत तो अंकुशे आवरावा ।
विवेके बळे राव तैसा वळावा ॥१।३६

मंदोदरीने आपल्या दिराला सांगितले तुम्ही राजसभेत जा व उन्मत्त झालेल्या रावणाला थोडा आवर घाला. त्याला विवेकाच्या काही गोष्टी सांगा.

बिभीषण हा धर्ममूर्ती होता. मंदोदरी अगदी त्याच्या मनातलेच बोलली. त्यामुळे त्याला आनंद झाला. रावणाच्या घरी जाऊन त्याला समजावून सांगितले व दोघेही राजसभेत आले. त्या सभेत सगळे वीर, रावणाचे पुत्र व त्याचा बंधू कुंभकर्ण होता. सगळे मंत्री होते. त्या सगळ्यांना रावण म्हणतो.

सितेकारणे म्या बहु कपट केले ।
परी पाहता सर्वही वेर्थ गेले ।
मनी चिंतिले कोड काही पुरेना ।
उरे शीणे ते शोक पोटी धरेना ॥१।४१

हे रावणाचे बोलणे ऐकून वीर पारस्व रावणाला म्हणतो.

सितेची बहु प्रार्थना का करावी ।
प्रभु सांगतो बुद्धी पोटी धरावी ।
ह्मणे वीर पारश्व त्या रावणाला ।
बलात्कार राया करावा सीतेला ॥१।५७

तू सीतेवर बळजबरी कर असे पारश्व रावणाला म्हणतो पण रावण त्याला सांगतो.

ह्मणे रावण धन्य गा बुध्दीवंता ।
तुझे बोलणे मानले दृढ चित्ता ।
परी शाप आहे मज ब्रह्म याचा।
करीना बलात्कार हे सत्यवाचा ॥१।५३

रावणाला ब्रह्मयाने शाप दिला होता की तू जर बळजबरीने एखाद्या स्त्रीचा उपभोग घेण्याचा प्रयत्न केला तर तुझा विनाश ठरलेला आहे. त्यामुळे रावण सीतेवर बळजबरी करू शकत नव्हता. पारस्वाचे बोलणे बिभिषणाने ऐकले. बिभिषणाला दुःख झाले. खूप क्रोध आला. तो रावणाला सांगतो,

''अरे रामचंद्र पूर्ण प्रतापी आहेत. तुम्ही सगळे चांडाळ पापी आहात. तुम्ही राक्षस सगळे बुद्धीहीन आहात. तुमची बुद्धी पापे करून मंद झाली आहे. राम हा देवांना बंधनमुक्त करण्याकरिता येत आहे. पण ''हे रावणा तू अहंकाराने इतका ग्रासून गेला आहेस की तुला श्रीरामांची ओळख होत नाही.''

जो पर्यंत माणसात अहंकार असतो तो पर्यंत तो परमेश्वराला ओळखू शकत नाही. रावणाचे तसेच झाले होते. बिभिषण पुढे सांगू लागला सगळे कपी वीर एकत्र झाले आहेत. तेंव्हा हा विनाश जर टाळायचा असेल तर हे रावणा, तू सीतेला रामाच्या स्वाधीन करून दे. तुमचे युद्ध जर रामाशी झाले तर रामाच्या बाणापुढे तुमचा टिकाव लागणार नाही. तुमची त्याच्या समोर उभे राहाण्याची लायकी नाही. तेंव्हा तुम्ही सीतेला रामाच्या स्वाधीन करा. पुढे बिभीषण म्हणतो

रुपे कर्कशे कोपला वीर गाढा ।
रणमंडळी राम थाईल मेढा ।
तया देखता काळ भीडो शकेना ।
तुम्ही मश्यके राक्षेसे सर्व सेना ॥१।५७

इतका उपहास बिभीषणाने केल्यामुळे सगळी सभा बिभीषणावर चिडली, संतापली. रावणाला खूप राग आला व तो बिभिषणाला खूप टाकून बोलला.

ह्या सगळ्या राक्षसांमध्ये एक बिभीषणच धर्ममूर्ती होता. तो बिचारा खूप उदासीन झाला. शेवटी तो आपल्या चार मंत्र्यांसह तिथून निघाला. समर्थ वर्णन करतात.

मनू भंगला हो तया धार्मिकाचा
पुढे त्याग तत्काळ केला सभेचा
उडाला नभमंडळामाजि वेगी
पुरोहित घतवार ते पृष्ठिभागी ॥१।६१

समुद्राला ओलांडून ते सगळे जिथे वानरसेना होती तिथे आले. सुग्रीवाने त्यांना ओळखले. ते पाच जण जेव्हा खाली उतरले तेव्हा वानर विचार करू लागले व बिभिषणाला म्हणतात, तू कोण ? त्यावर बिभिषण म्हणतो

म्हणे बंधु मी होय लंकापतीचा
परी दास अंकीत या राघवाचा ॥१।६५

मी लंकापती रावणाचा बंधू आहे. पण आता रामाच्या आश्रयाला आलो आहे. मी लंकापुरीचा त्याग केला आहे. तुम्ही काहीही करा पण माझी रामाशी गाठ घालून द्या. मी नेहमी सत्य बोलणारा आहे आणि माझे नाव बिभीषण आहे. एका कपीने जाऊन रामांना निरोप दिला. रामाने बिभीषणाला घेऊन येण्याची आज्ञा दिली. बिभीषण रामाजवळ येताच त्याने रामाच्या पायाला मिठीच मारली. त्याच्या डोळ्यातून घळघळ अश्रू वाहू लागले समर्थ वर्णन करतात,

उभे राहिले भाग्य बिभीषणाचे
करी अंतरी ध्यान पादांबुजाचे
भिजे दिव्य सर्वांग त्या अश्रुबिंदी
मिठी घातली राम पादारविंदी ॥१।६१

कृपासिंधु रामाने बिभीषणाच्या मस्तकावर आपला हस्त ठेवला व त्याला आशीर्वाद दिला तू आता लंकापती होशील. त्याला रामाने उठवले. तो बिभीषण रामापुढे दोन्ही हात जोडून उभा राहिला.

बिभीषणाने रामाची स्तुती केली. तेव्हा राम म्हणतात, ''बिभीषणा आता माझी स्तुती पुरे. तू आता चिंतारहीत हो.'' रामाने लक्ष्मणाला सांगून बिभिषणाला मंगल स्नान घातले व त्याचा लंकापती म्हणून अभिषेक केला.

बिभीषणाचे भाग्य किती थोर की तो रामाचा आवडता झाला. राम त्याच्यावर प्रसन्न झाले. रामाने बिभिषणाला आदराने सन्मानाने मंत्र्यांमध्ये बसविले. श्रीराम बिभीषणाला लंकेतील हालचालींविषयी विचारू लागले. नंतर रामाने बिभीषणाला समुद्र कसा उल्लंघून जायचा ते विचारले तेव्हा बिभीषण म्हणतो,

समुद्रासी देऊनिया श्रेष्ठ मानू ।
करावा अती आदरे सुप्रसन्नु ।
मनी बोलणे सत्य मानूनि देवे ।
समुद्रातिरी बैसिजे शुद्ध भावे ॥१।८३

बिभिषण कुठे गेला हे बघण्यासाठी रावणाने शार्दुल नावाचा आपला हेर पाठवला। त्याने रावणाला सांगितले की राम आपली सर्व वानर सेना घेवून तयारीला लागला आहे. तो रावणाला पुढे सांगतो की, रामाच्या त्या सेनेत कोट्यानकोटी कपी आहेत. समुद्राच्या किनारी त्यांची खूप दाटी झाली आहे. ते सगळे वानर हातात शिळा घेवून आहेत व जोर जोरात ते गर्जना करीत आहेत. त्या सगळ्यांचा राजा सुग्रीव आहे.

हे सर्व ऐकून रावण जरा अस्वस्थ झाला. शार्दुल सांगतो त्याची खात्री करावी म्हणून त्याने शुक नावाचा हेराला पाचारण केल व सांगितले.

पुढे शुक बोलाविला आदरेसी ।
ह्मणे जाय रे बोल त्या सुग्रिवासी ।
म्हणावे कपी तू सखा आमुचा रें ।
अनुचीत हे वाऊगे कासया रे ॥१।८९

तू सुग्रीवाकडे जा त्याला सांग, ''तू आमचा मित्र आहेस तेव्हा असे लंकेवर चाल करून येऊ नकोस.''

शुकाने सुग्रीवाला रावणाचा निरोप सांगितला व म्हणाला ''उगाच कशाला मरायला तुम्ही लंकेत येता. त्यापेक्षा तुम्ही मागे फिरा व आपापल्या घरी जा.

पुढे तो सुग्रीवाला म्हणतो ।
त्रिकुटाचला राम कांतेसि नेले ।
कपी सांग पारे तुझे काय गेले ।
तया मानवा साह्य जालासि कैसा ।
मनी नेणता चालिला मूर्ख जैसा ॥१।९३

अरे रावणाने सीतेला पळवून आपले त्यात तुझे काय जाते? तू त्या रामाच्या मदतीला कशाला आलास? तू अगदी मूर्ख आहेस. तू तुझे हित लक्षात घे व त्या रामाला मदत करू नको व आपापल्या घरी परत जा.

आतापर्यंत त्या शुकाचे बोलणे ऐकणाऱ्या वानरांनी त्याला पकडले व ते त्याचे पंख ओरबाडू लागले. त्यावर सुग्रीव म्हणाला, तुम्ही ह्याला सोडून द्या. तो शुक तिथून उडाला व सुग्रीवाला म्हणाला मी रावणाला काय निरोप देऊ ?

त्यावर सुग्रीव म्हणतो, ''त्याला सांग तू माझा मित्र नाहीस म्हणून दयेस पात्र नाही. माझ्यावर उपकार करणारा नाही म्हणून प्रिय नाही. तू रामाचा शत्रू आहे. त्यामुळे वधासच पात्र आहे. मी तुझा वध करीन'' येवढे बोलणे ऐकून शुक तिथून चालता झाला.

समुद्र तरून जाण्याकरिता रामाने तीन दिवस समुद्राची आराधना केली. तरीही समुद्राने दर्शन दिले नाही. त्यावर राम खूप क्रुद्ध झाला व लक्ष्मणाला म्हणाला, ''मी सज्जनपणे ह्या समुद्राची प्रार्थना करतो आहे, पण हा अतिशय उद्दाम झालेला समुद्र दर्शन देत नाही. आता मी माझ्या बाणांनी ह्याला शुष्क करतो.

समर्थ वर्णन करतात.

बहु क्षोभला राम जाळू निघाला ।
पुढे सिंधू भेटावया सीघ्र आला ।
म्हणे स्वामीया थोर अन्याय जाला ।
समुद्रासि हो सीघ्र पाल्हाण घाला ॥२।५

रामाचा क्रोध बघून सागर वर आला व रामाला म्हणाला, 'रामा मला क्षमा कर रामा, वानरांना तरुन जाण्याकरिता मी त्याना स्थळ करून आणि सेना तरून जाई. पर्यंत मगर वगैरे प्राणी वानरांना त्रास देणार नाही.

नंतर रामाने नळाला सेतुबंधनाची आज्ञा केली. सर्व वानरांनी मोठी मोठी झाडे मूळविरहित तिथे आणली त्या झाडांच्या टोकांना मोठमोठे दगड वेलींनी बांधले व सेतू तयार केला. समर्थ वर्णन करतात.

कपी मोडति वाड झाडे कडाडा
कडे पाडिती पर्वतांचे खडाडा
उड्या घेती आकाशपंथे धडाडा
बळे टाकिती सिंधूमध्ये पडाडा ॥२।१२

हा सेतू बांधण्याकरिता त्यांना पाच दिवस लागले. कार्यपूर्तीचा आनंद सगळ्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडत होता.

कपी सर्व आनंदले कार्य जाले ।
बळे गर्जती चीत सुखे निवाले।
सुवेळाचला स्वेत बांधोनि नेला
नळा वानराला जयो प्राप्त झाला ॥२।१६

स्वेत म्हणजे सेतू

ह्मणे रामराजा तया सुग्रीवाते ।
दळे चालवा सागराचेनि पंथे ।
निरोपी कपी सीघ्र सेनापतीला ।
निळे सर्व सैन्यासि संकेत केला ॥२।१९

सगळे कपीसैन्य त्या पूलावरून परतीराला पोहोचले, त्यांना बघून लंकेतील सैन्य दुंदुभी व मृदंग ह्यांचा जोरात आवाज करू लागले. त्यांचा आवाज ऐकून वानर सेना त्याहीपेक्षा जोरात आवाज करू लागली. रामाने सर्व सेनेची व्यवस्थित व्यूह रचना केली व सर्वांत समोर रामासह लक्ष्मण उभा राहिला. वानरांचे आयुध म्हणजे पर्वत शिखरे व मोठमोठे वृक्ष.

ह्या लंकेवर केव्हा पर्वत शिखरे फेकायला मिळतात. ह्याची ते वाट पाहात होते. सगळ्यांमध्ये एक प्रकारचे स्फुरण चढले होते. इकडे शुकपक्षी रावणाला येऊन भेटला. त्याच्या पंखाकडे बघून रावण विचारतो, 'अरे तुझ्या पंखांना काय झाले ? त्यावर वानरांनी त्याला कसा त्रास दिला ते त्याने सांगितले व सगळी वानरसेवा सेतुबंधन करून लंकेसमीप येऊन पोहोचल्याचे त्याने सांगितले. व तो रावणाला म्हणाला''तू सीता रामाला सत्वर देऊन टाक किंवा युद्धाला तयार हो. समर्थ वर्णन करतात,

प्रभु सांगतो बुद्धी ऐसी करावी ।
बरे जानकी राघवा भेटवावी ।
सीता पाठविता बरे लंकनाथा ।
न होता असे प्राप्त होईल व्यथा ॥२।३५

शुकाने असे म्हटल्यावर रावणाला खूप राग आला. तो म्हणे मी या नरा वानराला कांही महत्त्व देत नाही.

शुका सांगता रावण कोप आला ।
म्हणजे कोण लेखा नरा वानराला ।
रणमंडळी सोडिता बाणसृष्टी ।
बळे आपुला सर्व जाळीन सृष्टी ॥२।३६

जिथे देव, दैत्य, गंधर्व मला घाबरतात तिथे या नरावानराची काय कथा? माझ्या बाणांच्या वृष्टीने मी सृष्टी सगळी जाळून टाकीन. सागराप्रमाणे माझा वेग आहे, वायुप्रमाणे माझे सामर्थ्य आहे, विषयुक्त भुजंगाप्रमाणे माझे बाण आहेत हे रामाला माहिती नाही म्हणून तो माझ्याशी युद्ध करायला आला. असे अहंकारयुक्त भाषण रावणाने केले. नंतर रावणाने शुक सारणांना बोलाविले व सांगितले तुम्ही वानर सैन्यात प्रवेश करा व ते किती आहेत? त्यांचे कोणकोण सेनापती आहेत? ते सगळे मला येऊन सांगा. ह्याप्रमाणे ते शुक सारण वानरांचा वेष घेऊन गेले. त्यांनी ती अजस्त्र सेना बघितली. ते त्या सेनेत घुसणार तोच बिभिषणाने त्यांना ओळखले व पकडून रामाकडे आणले. त्यावर हसत हसत राम म्हणाले. तुम्ही सर्व सेना बघितली काही राहिले असेल तर बिभिषण तुम्हाला दाखवेल. दूताला ठार मारणे आमचा धर्म नाही.

रावणाला निरोप सांगा ज्या बळाचे अवलंबन करून तू सीतेचा उपहार केलास ते बळ तू उद्या दाखव. उद्या सकाळी लंकेचा व तुझा विध्वंस झालेला बघ. असे राम म्हणाले असता शुक सारणांनी त्यांचा जयजयकार केला व ते रावणाकडे आले व रामाची स्तुती करू लागले.

निरोपेचि तत्काळ ते हेर गेले ।
तया रावणाला नमस्कार केले ।
प्रभु मृत्यु आला बळे लागवेग ।
परी सूतिका जाहली सर्व भाग्ये ॥२।४६
दळामाजि बिभिषणे ओळखिले
धरुनी बळे ते सभेमाजी नेले ।
उदारे रघुनायके सोडविले ।
कृपाळूपणे नृपति मुक्त केले ॥२।४७
मनी वाटते बुद्धी ऐसी करावी ।
सीता आदरे रावण भेटवावी ।
तया बोलता कोपला गर्भरासी ।
म्हणे ताडिले काय नेणो तुम्हासी ॥२।५०

शुक सारणाने सीता परत कर हे सांगितल्यावर रावण खूप संतापला. म्हणाला, ''तुम्हाला त्या वानरांनी फारच त्रास दिलेला दिसतो. त्यामुळे तुम्ही असे बोलता. तुम्ही घाबरू नका. मला युद्धात कोणीही पराजित करू शकत नाही.'' नंतर रावण शुक सारणाबरोबर शुभ्र अशा प्रसादावर आरुढ झाले. त्याने समोर पाहिले तर जणू काही वानरांचा समुद्रच त्यांच्या दृष्टीस पडला. तो शुकाला म्हणाला, ''ह्यातील प्रमुख प्रमुख वानर कोण आहेत ते तू मला दाखव. तेव्हा शुकाने अंगद, नील, हनुमंत, नळ इत्यादी वानर दाखवले. तसेच इतरही कपीप्रमुख दाखवले. शुक सर्वांच्या शौर्याचे वर्णन करत होता. ते ऐकून रावण चिडला व म्हणाला.

म्हणे रावणू सारणा मूर्ख होसी
मज देखता मर्कटा वर्णितोसी ॥२।६८
असो दे रिसे मर्कटे ये प्रसंगी
रिपू दाखवी राम तो मुख्य वेगी
अभिप्राय जाणोनि लंकापतीचा
वदे सारणू मागुती रम्य वाचा ॥२।६९

रावणांनी राम दाखव म्हटल्यावर सारणाने सांगितले

ह्मणे राम तो पैल कोदंडपाणी ।
रूपे सावळा रम्य लावण्यखाणी ।
रतीच्या पती तूळिता तुच्छ होये ।
विराजे रिसावानरामाजि पाहे ॥२।७०
पहा राम विश्राम आत्मा जगाचा ।
बळे काळहर्ता विवर्ता अघांचा ।
तुणीरांबरे कास माथा लपेटा ।
झणत्कारिती वाजता घ्यापघंटा ॥२।७१

सारण पुढे सांगू लागला, ''राम धर्माचे अतिक्रमण करीत नाही. तो वेदवेत्त्यांमध्ये श्रेष्ठ आहे. तो ब्रह्मास्त्र जाणतो. बाणांच्या साहाय्याने जो पृथ्वी व गगन भेदू शकतो. ज्याचा क्रोध मृत्युप्रमाणे व पराक्रम इंद्राप्रमाणे व ज्याची भार्या तू हरण करून आणलीस तो हा श्रीराम'' असे म्हणून त्याने रावणाला श्रीराम दाखवले व तो सगळ्यांच्या पराक्रमाचे कौतुक करत होता ते ऐकून रावणाला खूप संताप आला. तो सारणाच्या अंगावर खड्ग घेवून धावला व त्याला मारू लागला. त्यावर सारण म्हणतो, ''तुम्ही मला का मारता. मी जे तुम्हाला सांगितले ते सगळ सत्य आहे.

काही वेळाने रावणाचा राग शांत झाला व त्याने शार्दुल नामक हेराला बोलाविले व राम सैन्याची माहिती काढून आणायला सांगितली. शार्दुल गेला त्याने सगळी माहिती काढली व तो शीघ्रगतीने रावणाकडे परत आला व तो सांगू लागला.

बहु दाटलीसे असंभाव्य सेना ।
नसे रीग तेथे कदा जाववेना ।
परी मी तयामाजि तैसाच गेलो ।
बहु ताडिले पाडिले कुस्त केले ॥२।८६

शार्दुल सांगू लागला, रामाचे अफाट सैन्य मी बघितले. ते बघून माझी तर भीतीने गाळणच उडाली. बिभिषणाने मला ओळखले, परंतु रामाने मला सोडून दिले. तो रामाचे वर्णन करू लागला.

ह्मणे धन्य तो रामराजा दयाळू
मज देखता सीघ्र सोडी कृपाळू
मनी माझिये वाटते निश्चयेसी
रघुनायका भेटवावे सितेसी ॥२।८९

रावण शत्रूची स्तुती ऐकून संतापला व म्हणाला देव, गंधर्व, दानव जरी युद्ध करायला आले तरी मी सीता परत देणार नाही. रामाने सुवेळ पर्वतावर तळ दिल्याचे रावणाला हेरांकडून समजले. रावण उद्‌विग्न झाला. त्याने सर्व सेनापतींना बोलाविले व विद्युजिव्ह नामक मायावी राक्षसाने रामाचे मायावी मस्तक तयार केले व ते घेऊन रावण सीतेकडे गेला व म्हणाला, ''रामाचे सैन्य समुद्र ओलांडून आले ते रात्री थकून गेले होते. तेव्हा मी रात्री रामाला ठार केले व त्याचे हे मस्तक आणले तेव्हा तू आता माझी भार्या हो. त्याचप्रमाणे रामाचे धनुष्य त्याने सीतेला दाखवले. हे ऐकताच सीतेची स्थिती कशी झाली त्याचे समर्थ वर्णन करतात.

रिपू सांगता ते भयातूर जाली ।
भये जानकी शोकसिंधू बुडाली ।
सिरा देखता मृच्छना सीघ्र आली ।
देहे सावरेना भूमी आग घाली ॥ २/९३

रामाचे ते मस्तक बघून सीता शोक विव्हल झाली. ती रावणाला म्हणाली, ''तू माझाही शिरच्छेद कर म्हणजे मी रामाबरोबर चालू लागेन.'' इतक्यात एका दूताने येऊन प्रहस्त आपली भेट घेऊ इच्छित आहे हे सांगितले. रावण तडक निघून गेला. इकडे रावण निघून जातात ते मस्तक व ते धनुष्य जेथल्या तेथेच गुप्त झाले.

रावणाने आपल्या सैनाची जमवाजमव करायला सुरूवात केली. रामाने आपल्या सैन्याची नीट आखणी केली. लंकेवर चढाई करण्याकरता रामाच्या

सैन्याने सुवेळ पर्वतावर आरोहण केले व तेथून ते लंका बघू लागले. ती रात्र ते तेथेच राहिले.

सकाळी सर्वजण लंकेचे निरीक्षण करीत असताना सुग्रीवाला एका मनोऱ्यावर रावण बसलेला दिसला. मागचा पुढचा काही विचार न करता तो रावण बसला तेथे थेट उड्डाण करून गेला. त्याने रावणाचा मुकुट पाडला व ते बघून रावण म्हणाला, ''माझ्या समोर आलास तेव्हा सुग्रीव (चांगला कंठ असलेला) होतास थोड्याच वेळा तू हीनग्रीव होशील. समर्थ वर्णन करतात.

पुढे देखता रावणा कोप आला ।
पदा झाडिले ताडिले रावणाला ।
मदे मातले दूरि टाकूनि शंका ।
कळा लाविती नीकुटे एकमेका ॥३/५
बहु कोपले मल्ल युध्यासि आले ।
रिपू पीडता आंग आंगी मिळाले ।
बळे हाणती पुष्टिसी वज्रमुष्टी ।
दणाणीतसे त्रिकुटी सर्व सृष्टी ॥ ३/६

दोन मांजरे ज्याप्रमाणे एखाद्या खाद्यावर टपून बसलेली असतात. त्याप्रमाणे ते दोघे सुग्रीव व रावण एकमेकांचा वध करण्याकरिता एकमेकांच्या जवळ जात होते. दोघेही तुल्यबळ असल्यामुळे कोणीच हार मानत नव्हते. इतक्यात त्या राक्षसाने आपले मायाबळ स्वीकारण्याचा उपक्रम केला. तोच त्याला ओळखून सुग्रीवाने आकाशात उड्डाण केले. रावण मात्र तेथेच उभा राहिला.

सुग्रीव उड्डाण करून रामासमीप येऊन उभा राहीला. रामाने सुग्रीवाला असे पुन्हा न करण्याबद्दल सांगितले. नंतर ते सगळे लंकेकडे कूच करू लागले.

रामाने पुन्हा एकदा रावणाला समजाविण्याचा प्रयत्न केला. त्याने अंगदाला बोलावले व सांगितले तू रावणाकडे जा व सांग, 'रावणा, समुद्राचे उल्लंघन करून आणि भीती सोडून मी स्वस्थपणे लंका नगरीप्रत आलो आहे. तुझा गर्व मी आज नाहीसा करणार आहे. स्त्रीचा अपहार करण्याऱ्यास मी आज दंड देणार आहे. तेव्हा धैर्य धरून व शौर्याचे अवलंबन करून तू माझ्याशी युद्ध कर. संग्रामामध्ये माझ्या बाणांनी तुझा अंत झाला असता तू पापापासून मुक्त होशील.''

अशा प्रकारे तारापुत्र अंगद रावणासमीप पोहोचला व त्याने रामाचा निरोप सांगितला. तो ऐकून रावण संतप्त झाला. त्याने अंगदाला पकडून ठार करायला आपल्या राक्षसांना सांगितले. त्या राक्षसांनी अंगदाला धरले. अंगद त्यांच्या स्वाधीन झाला व त्या दोन्ही राक्षसांना हाताने सर्पाप्रमाणे धरून त्याने पर्वतप्राय प्रासादावर उडी घेतली. तेव्हा ते राक्षस उड्डाणाच्या योगाने धक्का बसून धाडकन खाली रावणासमोर पडले. रावणाच्या वाड्याचे शिखर रावणाच्या समक्ष विदीर्ण झाले. समर्थ वर्णन करतात-

विरे अंगदे त्रीकुटी ख्याति केली ।
नभी अंतराळे बळे झेप गेली ।
बळाचे भुजी मल्ल राक्षेस कैसे ।
गळाले तळी मारिले सर्प जैसे ॥३/२५

अशा प्रकारे पराक्रम गाजवून अंगद परत आला.

पुढे अंगदू भेटला रामचंद्रा ।
नमस्कारिले आदरे त्या नरेंद्रा ।
कपी वर्तला तो समाचार सांगे ।
म्हणे शत्रुचा गर्व ताठा न भंगे ॥३/३६

अंगद रामचंद्रांना सांगू लागला 'ज्याप्रमाणे पाषाण पाण्यात टाकला तर तो भिजत नाही तसा रावण आहे. मी त्याला परोपरीने समजविण्याचा प्रयत्न केला पण त्याच्यावर काहीही परिणाम झाला नाही.'

आता राम रावण युद्ध होणार हे अटळ आहे. रावणाचा अंतिम समय जवळ आलेला आहे. दोन्हीकडचे सैन्य आता अगदी हातघाईवर आले. युद्धाला सुरूवात झाली. उभयतांमध्ये अती अद्‌भुत व तुमुल युद्ध होऊन रक्तामासाचा चिखल होऊन गेला. समर्थ वर्णन करतात-

रणी पाडीला मारुते जंबुमाळी ।
सुखेणे विधुणा पुढे तेचि काळी ।
विरे सुग्रीवे क्षीप्रघटांसिहृंद्रे ।
बळे झाडिले वज्रमुष्टिसी मैंदे ॥३/४८
दळी राक्षसांचे हाहाकार जाला ।
दळेसी बळे विरुपाक्षु निमाला ।
कपी राक्षसांची बहुसाल सेना ।
रण माजले युद्ध ते वोहटेना ॥ ३ /५०
कपी तापले कोपले वीर जेठी ।
बळे ताडिले दैत्य कोट्यानकोटी ।
समरंगणी आटली सर्व सेना ।
रणी राक्षसा येश येता दिसेना ॥३/५४

अशा प्रकारे तुमुळ युद्ध सुरू झाले. रामासमोर जो येत होता तो नष्टच होत होता.

पुढे राक्षसांनी मायावी रूपे घेऊन युद्धाला सुरूवात केली. इंद्राजिताने नागपाशाने राम लक्ष्मणांना बद्ध केले. राम लक्ष्मण मृत झाले असे वानरांना वाटले. त्यामुळे ते सैरभैर झाले. परंतु बिभिषणाला माहीत होते राम लक्ष्मण मृत झालेले नाहीत. तेव्हा त्यानी सुग्रीवाला सांगितले, ''सैन्याला काबूत ठेव राम लक्ष्मण मृत झालेले नाहीत.''

इकडे इंद्रजित आपला पराक्रम सांगण्याकरिता रावणाकडे गेला. रावणाला राम लक्ष्मण ठार झाल्याचे सांगितले. रावणाला खूप आनंद झाला. त्यांनी सीतेच्या संरक्षणात असलेल्या त्रिजटेला बोलावले व सांगितले सीतेला विमानात बसव व मृत झालेले राम लक्ष्मण दाखवून आण. समर्थ वर्णन करतात.

रणी त्रिजटा दाखवी जानकीसी ।
महावीर ते पाडिले नागफासी ।
दिसे राम सौमित्र तोही निमाला ।
पुढे जानकीने महा शोक केला ॥३/८१

त्रिजटा सीतेला समजावू लागली. राम लक्ष्मण मृत झालेले नाहीत. तू शोक करू नको. गरुडाच्या साहाय्याने राम लक्ष्मण नागपाशातून मुक्त झाले सर्व वानरांना आनंद झाला.

पुढे धूम्राक्षाला हनुमानाने व वज्रदंष्ट्राला अंगदाने ठार केले. रावणाचे मोठमोठे सेनापती गारद झाले. तेव्हा रावण स्वतःयुद्धाला तयार झाला.

पुढे रावण चालिला लागवेगे ।
तयालागि मंदोदरी नितीसांगे ।
न मानीत तो चालिला आवरेना ।
बळे लोटली ते असंभाव्य सेना ॥३/९४

रावण युद्धाला जायला निघाला. मंदोदरीने त्याला समजाविण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ. रावण काहीही ऐकणाच्या मनःस्थितीत नव्हता. तो रणांगणात दाखल झाला.

प्रथम त्याचे हनुमानाशी युद्ध झाले. नंतर नीळाबरोबर व नंतर

लक्ष्मणाबरोबर त्याने युद्ध केले. लढत असताना लक्ष्मणाला शक्तिने बेजार केले. नंतर राम स्वतः युद्धाला तयार झाले.

उभा राहिला राम ब्रजांग ठाणे ।
करी साजिले च्याप चंद्रार्धबाणे ।
दहा हेम मुकुट छत्रे धनुष्ये
बळे तोडिली पाडिली ते निमिष्ये ।। ४/९

रामानी रावणाचे दहाही मुकुट, दहाही धनुष्यबाण नष्ट केले. रावणाच्या वक्षस्थळावर रामाने प्रहार केला. रावण मूर्च्छित झाला. त्याने हातातले धनुष्य टाकून दिले.

राम खरे उदार आहेत. ते रावणाला म्हणतात, तू आता थकला असशील. आताच मी तुला मृत्युच्या स्वाधीन करत नाही. तू आता लंकेत जावून विश्रांती घे व ताजातवाना होवून परत ये. मग मी तुला ठार करेन.

पुढे रावणू तो भयातूर जाला ।
बहुतापरी राघवे सिकवीला ।
ह्मणे जाइ रे रक्षिले आजि तुला ।
रिपू प्राण घेऊनी तैसा पळाला ।।४/१०

स्वतःचा पराभव झाला त्याचे दुःख रावणाला झाले. नंतर त्याने कुंभकर्णाचे साहाय्य घेतले. कुंभकर्ण येताना बघून राम बिभीषणाला विचारतात हा कोण आहे? त्यावर बिभीषण सांगतो.

बळे आगळा वीर हा कुंभकर्णू ।
महापर्वतासारिखा मेघवर्णू ।
समरंगणी काळ भिडो शकेना ।
सखा बंधु हा रावणा होय साना ।।४/२८

कुंभकर्णाने रावणाला आश्वस्त केले की मी आज युद्धात रामाचा पराभव करतो व त्याला ठार करतो. मग सीता तुझीच होईल असे म्हणून तो रणांगणावर आला.

त्याने बराच पराक्रम दाखवला. परंतु रामाने शेवटी त्याचा शिरच्छेद केला व तो महाप्रचंड राक्षस समुद्रात पडला. कुंभकर्णाचा वध झालेला पाहून देवांना आनंद झाला. अशा प्रकारे बलाढ्य व भयंकर शत्रूचा वध झाल्याचे बघून वानर सैन्यात आनंद पसरला. कुंभकर्णाचा वध झाल्याचे रावणाला समजले. रावण शोक संतप्त झाला. नंतर रावणाचे सहा पुत्र युद्धाला बाहेर पडले. पण त्या सर्व पुत्रांचा नाश रामाच्या सेनेने केला. पुत्रांच्या वधाने दुःखित झालेल्या रावणाला इंद्रजिताने समजाविले. मी आजच युद्धात जातो व रामाचा वध करून परत येतो.

इंद्रजिताने वानर सैन्याचा पराजय केला. इंद्रजिताने ब्रह्मास्त्राने आपला रथ सुरक्षित केलेला होता. त्यामुळे तो अजिंक्य होता. तो अदृश्य होवून राम लक्ष्मणांवर व वानर सैन्यावर बाणांचा वर्षाव करीत होता.

त्याच्या बाणाच्या वर्षावाने सगळे जर्जर झाले. राम लक्ष्मणासहित सगळे सैन्य मूर्च्छित झाले. फक्त हनुमान व बिभिषण शुद्धीवर होते. ते आपले मृत झालेले सैन्य बघत असतांना त्यांना जांबुवान दिसला. तो अगदी मरणाच्या पंथाला लागला होता. तो बिभिषणाला म्हणाला, हनुमानाला ताबडतोब इकडे घेवून ये. हनुमान आल्यानंतर जांबुवानाने हिमालयातून संजीवनी औषधी आणल्यास सांगितले. हनुमंत ताबडतोब निघाला.

अकस्मात तो ओमपंथे उडाला ।
मही झोंकली पन्नगा भार जाला ।
बहु धोकले कूर्म वाराह दंती ।
झडा घांचरे ते धरा सावरीती ।।५/२

स्फुरद्रुप सर्वांग वाजे झडाडा ।
उडाले नभी वृक्ष याते फडाडा ।
असंभाव्य पिंजारले पुच्छ मागे ।
नभमंडळी जातुसे लागवेगे ।।५/३

हनुमंताने उड्डाण केल्याबरोबर सर्व वृक्ष हालायला लागले. त्यांच्या हालण्याचा मोठा आवाज व्हायला लागला. उड्डाण करून तो हिमालयात पोहोचला. परंतु त्या वनस्पती गुप्त झाल्या. हनुमंताला राग आला. त्याने पर्वताचे शिखरच उपटले व तो ते घेवून आला. समर्थ वर्णन करतात.

तयाचे तिरी उंच आकाशपंथे ।
गिरे देखिले रम्य द्रोणाचलाते ।
तया मस्तकी दिव्य वल्ली अपारा ।
प्रभा फाकली तेज कल्लोळ सैरा ।।५/५

पुढे देखता मारुता सावरेना ।
धरीता बळे तेज हाता चढेना ।
महाऔषधी दिव्य शैल्यानिशैल्य ।
कपी देखता सर्वही गुप्त झाल्या ।।५/६

तया पर्वताची बहु स्तुती केली ।
परी नायेके सर्वही व्यर्थ गेली ।
बहुसाल त्या आचले गर्व केला ।
पुढे मारुती कोप तत्काळ आला ।।५/७

महाथोर धीकार केला तयासी ।
बळे शीघ्र उत्पाटिले पर्वतासी ।
गिरी घेतला पुच्छ वेष्टीत माथा ।
कपीराज तो चालिला व्योमपंथा ।।५/८

हनुमंत परत युद्धस्थळी आला. त्याने राम लक्ष्मण व इतर वानर सैन्य सगळ्यांवर औषधीचा प्रयोग केला व त्यांना जिवंत केले. पुन्हा हनुमंताने ते पर्वत शिखर जागेवर नेऊन ठेवले. इकडे रावणाचे बंधु, पुत्र युद्धात मारले गेल्यामुळे रावण बाहेर येणार नाही म्हणून सर्व वानर सैन्य लंकेवर चालून गेले. त्यांनी लंका जाळायला सुरूवात केली. रामाने आपल्या बाणाने लंकानगरीचे द्वार तोडून टाकले.

पुन्हा इंद्रजित युद्धाकरता आला. आता त्याने एक मायावी सीता आणली व तिला ठार मारली. ते बघून सगळे वानर सैन्य हतबल झाले.

हनुमंताने ही बातमी रामांना सांगितली. राम मूर्च्छित होवून पडले. पण तेवढ्यात तेथे बिभीषण आला व त्याने सांगितले की ती मायावी सीता होती. सीतेला तो मारू शकत नाही. बिभीषण पुढे सांगतो आज इंद्रजित त्रिकुंभिला संज्ञक देवालयामध्ये होम करण्यास जाईल. त्याचा होम जर पूर्ण झाला तर तो कधीच कुणाला हार जाणार नाही. तेव्हा त्याचा होम पूर्ण होणार नाही अशी व्यवस्था आपल्याला करावी लागेल.

त्याप्रमाणे सगळी व्यवस्था झाली व इंद्रजित व लक्ष्मणाचे युद्ध जुंपले. ते दोघेही सिंहासारखे एकमेकांशी युद्ध करू लागले. दोघेही तुल्यबळ होते. परंतु एका प्रभावी बाणाने लक्ष्मणाने इंद्रजिताचा वध केला. समर्थ वर्णन करतात.

सुमित्रासुते थोर अद्भुत केले ।
जनालां गमे आणि कल्पांत आले ।
बुडो लागले भार त्या राक्षसांचे ।
बहुसाल ते धीर गेले वीराचे ।। ७/३५
महावीर दोघे रणी तेचि काळे ।
पुन्हा सोडिते जाहले बाणजाळे ।

रणामाजि ते भेदिती येकमेका ।
नभी सोडिल्या बाण भाली अनेका ॥ ७/५४
सुमित्रासुते सीघ्र संधान केले ।
रणी रावणी सीर छेदुनि नेले ।
समस्ता सुरांलागि आनंदविले ।
सुरेशा मनीचे बहु शैल्य गेले ।
रणामाजि तो इंद्रजितु निमाला ।
समस्ता सुरांलागि आनंद जाला ।
महाकंटकू थोर संव्हार केला ।
त्रिलोकी बहु किर्तीचा घोष गेला ॥७/१०

इंद्रजिताचा वध झालेला पाहून सगळ्या देवांना आनंद झाला. सगळे रामाकडे आले. रामाने लक्ष्मणाचे अभिनंदन केले व आता ते रावणाची वाट पाहू लागले.

इंद्रजिताच्या वधाची बातमी रावणाला समजली. तो अतिशय क्रोधाविष्ट झाला व युद्धावर जाण्याची तयारी करू लागला.

रावण रथारुढ झाला व युद्धभूमीवर दाखल झाला. राम रावणाचे घनघोर युद्ध झाले. रावण जे जे अस्त्र सोडायचा त्याचा प्रतिकार करण्याकरिता राम त्याहून तेजस्वी अस्त्राचा प्रयोग करायचा. रावणाच्या एका शक्तीने लक्ष्मण भूमीवर कोसळला. ते बघून राम खिन्न झाला. रामाने ती शक्ती उपसून काढली आणि मोडून टाकिली. राम शक्ती ओढून काढत आहे. हे बघून रावणाने त्याला बाणाने विद्ध केले. तेंव्हा लक्ष्मणाला कवटाळून असलेला राम हनुमान व सुग्रीवाला म्हणाला, तुम्ही लक्ष्मणाभोवती कडे करून उभे रहा. पुष्कळ दिवसांपासून पराक्रम करण्याचा काळ आता प्राप्त झाला आहे. समर्थ वर्णन करतात

नभी सोडिले बाण कोट्यान कोटी ।
असंभाव्य ते जाहली थोर दाटी ।
महामेघ तो मोकली मेघधारा ।
रघुनायके छेदिले ते सरारा ॥ ७/५२
पुढे रावणू थोर कोपे भडाडी ।
करी गर्जना मेघ जैसा धडाडी ।
बहु कोपला तो असुरास्त्र सोडी ।
तेणे घालिल्या त्या नभी चक्रकोडी ॥ ७/५३

राम इतके क्रुद्ध झाले होते की रावणाला आपला कर्दन काळ समोर उभा ठाकला असे वाटले. संपूर्ण भूगोलच रामाच्या रागात भस्मसात होईल की काय असे वाटत होते. समर्थ वर्णन करतात

करी बाण कोदंड चंड प्रतापी ।
रणी रावणा भासला काळरुपी ।
पुढे देखता पातली कंपवेळा ।
उभा राम ग्रासील नेणो भूगोला ॥८/७३
पळू सुटला रावणा कंप देही ।
भये भुलला न स्मरे युद्ध कांही ।
पडे चाचरे धांवता थोर धाके ।
पुढे पाहता राम सर्वत्र देखे ॥ ८ /७४

रावणाला सगळीकडे रामच दिसू लागला. त्यामुळे तो अतिशय भयकंपित झाला. रावणाचा सगळा ताठाच संपला. तो भयासुर अवस्थेत मंदोदरीच्या महालात आला व तिला सांगू लागला. आज युद्धात खूप कष्ट झाले. रावण मंदोदरीला म्हणतो. तू मला युद्ध न करण्याचा सल्ला दिला होता पण मी तो ऐकला नाही. नंतर तो होमाला बसला.

त्यानंतर पुन्हा राम रावण युद्ध सुरू झाले. राम भूमीवर व रावण रथावर होता. तेंव्हा इंद्राने मातळी सारथ्याबरोबर रामाकरिता आपला रथ पाठवला. रणांगणावर राम रावणाला म्हणतो

म्हणे राम रे रावणा वीरधर्मे ।
रणामाजि मी तूज मारोन नेमे ।
पळालासि कोठे तन्ही हे सुटेना ।
तुझी मृत्युवेळा कदा पालटेना ॥ ९ /४६

तुझा मृत्यू झाल्यावर बिभीषणाला मी राज्य देणार आहे. तू कपट केलेस म्हणून तुझे सर्व राज्य हिराकून घेतले जाईल.

रिपु जाण रे तुजला मृत्यु आला ।
दिले अक्षै राज्य बिभिषणाला ।
सीतेकारणे थोर कापट्य केले ।
अभाग्या तुझे सर्व ही राज्य गेले ॥९ / ४७
कडाडीत घोषे रवि तेथि काळी ।
रघूनायेका बैसले बाण भाळी ।
असंभाव्य तो कोपला चापपाणी ।
दशग्रीव तो भेदिला सीघ्र बाणी ॥ ९ / ४९

रामाने बाणवर्षावाने व वानरसेनेने पाषाण वर्षावाने रावणाला जेरीस आणले.

त्याच वेळी अगस्त्यमुनी रामाला म्हणतात तू तीन वेळा आदित्यहृदय स्तोत्र म्हण.

अगस्ती रुसी तो रणामाजि आला ।
रवीमंत्र सांगे रघूनायकाला ।
जपे राम तो आदरे मूळ मंत्रे ।
रवी सीघ्र येऊन दे सार शस्त्रे ॥९/५६

प्रत्यक्ष सूर्यनारायणाने रामाला शस्त्रे दिली व त्या शस्त्रांनी रामाने रावणाचा वध केला. रावण वध झाल्याचे समजताच सर्व देवांना खूप आनंद झाला. समर्थ वर्णन करतात

नभी दुंदुभी वाजती येक नादे ।
बहुतांपरीची बहुसाल वाद्ये ।
ध्वनी दाटले पूर्ण ब्रह्मांड घोषे ।
कपी गर्जती नामघोषे विशेषे ॥१३/८४
सुखानंद आनंदली जीवसृष्टी
विमानीतुनी जाहली पुष्पवृष्टी ।
रुसी देव गंधर्व सर्वे मिळाले ।
विणज वाहुनी नारदादिक आले ॥९/८५

रावणाच्या वधाची बातमी त्याच्या राजवाड्यात पोहोचली. एकच हलकल्लोळ माजला. त्याच्या सर्व स्त्रिया रणांगणावर आल्या. त्यांनी खूप आंकांत केला. रामाने बिभीषणाला त्यांची समजूत घालायला पाठविले. राम म्हणतो मरणाने वैर संपते. रावणाला अग्नी देण्याचे कार्य बिभीषणाला करायला सांगितले.

नंतर बिभिषणाचा राज्याभिषेक झाला. समर्थ वर्णन करतात.

धमामा नभी दुंदुभी नाद जाला ।
सुरी अंबरी पुष्प वर्षाव केला ।
रघुनायका सेवका राज्य दिल्हे ।
सुरा सोडिले थोर आनंदविले ॥१०/३०

नंतर रामाने हनुमंताला अशोक वाटिकेत जावून सीतेला रावण वधाची बातमी द्यायला सांगितली. रावण वध झालेला ऐकून सीतेला खूप आनंद झाला. हनुमंत सांगतो

दशग्रीव संहारिला लंकवासी ।
प्रतापे दिल्हे राज्य बिभीषणासी ।
प्रभूने समाचार हा सांगविला ।
तेणे जानकी थोर आनंद झाला ॥१०/३६

सर्व देव रामाला बघण्याकरिता किती आतुर झाले ह्याचे वर्णन समर्थांनी युद्धकांड प्रसंग १० मध्ये खूप छान केले आहे.

सीतेला मंगल स्नान घालून तिला रामाजवळ आणण्यात आले. तिला बघण्याकरिता वानरांनी एकच गर्दी केली.

मिळाले कपी रीस कोट्यानकोटी ।
सीता आणिता जाहली थोर दाटी ।
शतांची शते धांवती वेत्रपाणी ।
दळे वारिती गर्जती घोरवाणी ॥१०/७५

सीता सिबिकेत बसून असल्यामुळे वानरांना ती काही दिसत नव्हती, ते तिला बघायला खूप आतूर झाले होते. शेवटी सीतेला सिबिकेतून खाली उतरवले तेव्हा ती सगळ्यांच्या दृष्टीस पडली.

सीता देखती जाहली रामचंद्रा ।
नमस्कार तैसाचि केला महेंद्रा ।
तया राघवे पाहिले जानकीला ।
पुढे भृल्लता वक्र आव्हेर केला ॥१०/८०

ती जवळ आल्यानंतर राम म्हणाला, आज माझी प्रतिज्ञा पूर्ण झाली. रावणाचा वध केला. आज माझ्या क्रोधाची समाप्ती झाली. सगळ्या श्रमाचे चीज झाले.

हे ऐकत असताना सीतेला डोळ्यांतून घळघळ अश्रू वाहू लागले. रामाचे हृदय लोकापवादाच्या भीतीने द्विधा झाले. राम सीतेला म्हणाले, "हा जो मी संग्राम केला तो मी तुझ्याकरिता केला नाही. आपले वर्तन कायम राखण्याकरिता अपवाद सर्वस्वी टाळण्याकरिता व वंशाला आलेला कमीपणा नाहीसा करण्याकरिता मी हे केले.

तू परपुरुषाच्या घरी राहीली. माझ्या मनात संदेह निर्माण झाला आहे. म्हणून मी तुला अनुज्ञा देतो तू आज वाटेल तिकडे चालती हो. दाही दिशा तुला मोकळ्या आहेत.

म्हणे राम तो जानकी लागि जावे
स्वइच्छा सुखे तां विगंती भ्रमावे ॥१०/९२

रामाचे हे शब्द तप्त लोहरसाप्रमाणे सीतेच्या कानात पडले. तिला अश्रू आवरणे कठीण झाले. तिने लक्ष्मणाला सांगितले माझ्याकरिता चिता तयार कर. मी आता अग्नीत प्रवेश करणार.

मनामाजि पूजा येथे सांग केली ।
पुढे जानकी पावकामाजि गेली ।
तये स्पर्शता पावकू शुध्द जाला ।
प्रसंगे तये शांत जाला निवाळा ॥१०/१००

अग्नीत प्रवेश करूनही सीता शुद्ध असल्यामुळे अग्नी तिच्याकरिता शितल झाला व त्यातून सीता बाहेर पडली. समर्थ वर्णन करतात.

सीता मुख्य ते पावकामाजि होती ।
वृथा रावणे चोरिली हे वदती ।
रमा सागरातून नेली हरीने ।
तयाचे परी जानकी राघवाने ।

खरी सीता ही अग्नित होती. रावणाने नेली ती तिची सावली होती. अग्नी प्रदीप्त झाल्यावर त्यातून ती बाहेर पडली. ज्याप्रमाणे विष्णुने सागरातून लक्ष्मी बाहेर काढली. त्याप्रमाणे रामाने सीतेला अग्नितून मिळविले.

पुढे जानकी राम अंकी विराजे ।
रमा आदिनारायेणी जेवि साजे ।
असंभाव्य तो वाद्यकल्लोळ गाजे ।
कपी वाहिनीमाजी आनंद माजे ॥११/१०५

बंदीत पडलेले सर्व देव मुक्त झाले. सगळे रामाची स्तुती करू लागले. 'बंधविमोचन' राम हे नाव रामाने सिद्ध केले. रामाने मातलीला इंद्राचा रथ परत घेवून जाण्याविषयी सांगितले. इंद्राला सांगितले जे वानर, ऋक्ष, गोलांगुळ मृत झालेले आहेत त्यांना जिवंत करावे. इंद्राच्या कृपा प्रसादाने सगळे वानर सैन्य जिवंत झाले. इंद्र रामाला म्हणतो

तुम्ही हो अयोध्यापुरामाजि जावे ।
प्रजापालके राज्य सुखे करावे ॥११/३३
प्रती उत्तरी राम बोले समस्ता ।
बरे हो म्हणे जाईजे सीघ्र आता ।
समस्ता तुम्ही भुवनामाजि जावे ।
विलासे बहु राज्य सुखे करावे ॥११/३४

इंद्राचे म्हणणे रामाने मान्य केले व राम बिभिषणाला म्हणाला, आता मला लवकरात लवकर भरताला भेटायचे आहे. तेव्हा आमच्या जाण्याची तू व्यवस्था कर

बिभिषणाने पुष्पक विमान बोलाविले. त्यात राम, लक्ष्मण व सीता आरुढ झाले. सगळ्यांना रामाने निरोप दिला. पण सगळ्यांची इच्छा अयोध्येला जाऊन रामाचा राज्यभिषेक बघण्याची होती. म्हणून त्यांनी रामाला विनंती केली. रामाने सगळ्यांना विमानात बसवले व ते अयोध्येला प्रस्थान करते झाले.

रस्त्यात ते भरताला भेटले. समर्थ भरत - राम भेटीचे वर्णन असे करतात

बहु राम लावण्य कामावतारी ।
महावीर दोघे रुपे योगधारी ।
तया देखता रोम आंगी भरारी ।
सुखे पाहता सर्व सेना थरारी ॥११/८७
रुपे सारिखे वीर दोघे मिळाले ।
सुखाचे बहु कंप रोमांच आले ।
पदी ठेविला मस्तकू बांधवाने ।
तया उठविले त्वरे राघवाने ॥११/८८

नंतर सगळे पुष्पक विमानात बसून अयोध्येत आले. रामाच्या स्वागताकरिता अयोध्या नटून थटून तयार होती. सगळे अयोध्यावासी रामाची आतुरतेने वाट बघत होते.

राम अयोध्येत आल्याबरोबर शत्रुघ्नाने रामाला नमस्कार केला. नंतर सगळ्या मंत्र्यांनी रामाला नमस्कार केला. रामाने पुढे बघितले. सर्व जेष्ठ श्रेष्ठ मंडळी त्याला सामोरी आली. समर्थ वर्णन करतात

पुढे देखिला तो रुसी ब्रह्मनिष्ठु ।
कुळ रक्षिता तो कुलामाजि श्रेष्ठु ।
रघुनाथ तेथे नमस्कार घाली ।
स्तुती उत्तरे आदरे भेटी जाली ॥११/१०३
प्रसंगे नमस्कारिली मुख्य माता ।

बहु सौख्य जाले तया भेटि होता ।
समस्ताजणीला नमस्कार केले ।
तया देखता प्राण त्यांचे निवाले ॥११/१०४

युद्धकांडाच्या बाराव्या प्रसंगात समर्थांनी अयोध्यापुरीचे खूप तपशिलात वर्णन केलेले आहे. अयोध्येचे वैभव इतके थोर आहे की माझी शब्दशक्ती ते वर्णन करायला कमी पडते असे समर्थ म्हणतात.

नंतर रामाला अभ्यंगस्नान घालण्यात आले. रामाचा राज्यभिषेक खूप थाटामाटाने करण्यात आला. राज्यभिषेकाच्या निमित्ताने खूप दानधर्म करण्यात आला.

सुग्रीव, जांबुवंत, अंगद, मारुती सगळ्यांचा रामाने सत्कार केला. राम त्यांना म्हणतो.

तुम्ही कष्ट केले जिवे सर्व भावे ।
तुम्हालागी उत्तीर्ण म्या काय व्हावे ॥१२/६२

सर्वांना निरोप देण्याची वेळ आली.

समस्ताकडे पाहिले राघवाने ।
तया सर्व रोमांच आले स्फुराणे ।
नमस्कारिले स्वामी देवाधिदेवा ।
म्हणे राम तो लोभ आता असावा ॥१२/६५

त्यांनी सुध्दा रामाची स्तुती केली. त्यांना रामाचा वियोग सहन होत नव्हता.

सवे लागली राघवाची सुटेना ।
प्रिती गुंतली तोडिताही तुटेना ।
बहु दिस गेले सुखाचेनि योगे ।
अकस्मात ते दुःख जाले वियोगे ॥१३/७३
प्रभु संगतीची सवे दृढ केली ।
अकस्मात का सर्व छेदूनि नेली ।
तया बोलता जाहला रावणारी ।
तुम्ही भेटी देईन कृष्णावतारी ॥१३/७४

रामाने त्यांना आश्वासन दिले की कृष्णावतारात पुन्हा आपली भेट होईल. अशा प्रकारे रामाचा निरोप घेवून ते स्वस्थानी निघाले.

रामांनी सगळ्यांवर सारखेच प्रेम केले. रामाजवळ लहान मोठा भेद नाही. म्हणून समर्थ म्हणतात.

सदासर्वदा देव दासाभिमानी ।
कृपा भाकिता सीघ्र पावे निदानी ।
तया अंतरी थोर लहान नाही ।
परी पाहिजे दृढ भावार्थ काही ॥१३/८०

सर्व लोक आपापल्या स्थानी परतले. पण हनुमंत रामाजवळच राहिला.

शेवटी समर्थ म्हणतात. अशा प्रकारे रामाची कथा सांगितली व ही कथा जे ऐकतील त्यांचे महादोष जातील. त्यांची दुःखे नाहीशी होतील व त्यांचे जीवन धन्य होईल.

असो हे कथा बोलिली राघवाची ।
जनी सर्वदा ऐकती धन्य त्यांची ।
कथा ऐकता ते महादोष जाती ।
दुखे नासती लोक ते धन्य होती ॥१३/९२

युद्धकांडाच्या तेराव्या प्रसंगात समर्थांनी पुन्हा एकेका प्रसंगात काय सांगितले ते सारांश रूपाने सांगितले आहे व शेवटी म्हणतात

करी राम तो राज नाना विलासी ।
जनामाजी उपासना रामदासी ।
यथासांग तेराशते श्लोक जाले ।
गुणी ऐकता सर्व सुखे निवाले ॥१३/१११

अशा प्रकारे जवळपास तेराशे त्रेसष्ट श्लोकांचे हे युद्धकांड थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न केला तरी ते बरेच लांबले.

समर्थांचे रामायण इतर त्यांच्या साहित्यापेक्षा जरा दुर्लक्षीत राहिले. वाचकांचे लक्ष तिकडे वळावे व वाचकांनी समर्थांचे रामायण मूळातून वाचावे व त्याचा आनंद घ्यावा. विपरित परिस्थितीत, साधन संपत्ती नसताही शत्रुवर कसा विजय मिळविता येतो ते युद्धकांड सांगते. संघटनेचे महत्त्व त्यातून दिसते. आजच्याही काळात ह्या सर्व गोष्टींची नितांत आवश्यकता आहे. तेंव्हा सर्व वाचकांनी समर्थांचे रामायण सुंदर कांड व युद्धकांड अवश्य वाचावे. (लेखातील श्लोकाच्या समोर दोन क्रमांक आहे. त्यातील पहिला क्रमांक युद्धकांडातील प्रसंगांचा आहे व दुसरा क्रमांक त्या प्रसंगातील श्लोकाचा आहे याची वाचकांनी नोंद घ्यावी.)

- डॉ. सौ. सुनंदा लोहकरे
८९, साकेत, स्नेहनगर,
वर्धा - ४४२ ००१

•••

श्रीसमर्थ रामदास स्वामींचा शैक्षणिक दृष्टिकोन

- प्राचार्य डॉ. सो. त्र्यं. जोशी



[illegible]

ज्ञानेवीण जी जी कळा । ती ती जाणावी अवकळा
एक ज्ञानची सार्थक । सर्व कर्म निरर्थक
दास म्हणे ज्ञानेवीण । प्राणी जन्मला पाषाण ।।

अशी ज्ञानसाधना हे जीवनाचे अत्यंत आवश्यक अंग जीवनोदिष्ट दर्शविणारा राष्ट्रसंत समर्थ रामदास स्वामी हे आगळेच संत आहेत.

ज्या ज्या वेळी आपला भारत देश घोर आपत्तींनी ग्रस्त झाला, समाज जीवन संभ्रमीत, गोंधळलेले व वैफल्यग्रस्त होऊन निराशेचे सावट जनजीवन झाकोळून टाकू लागले विजिगिषा लुप्तप्राय होऊन लोक आत्मभान विसरले; त्या त्या वेळी या पुण्यदेशात सन्तांनी अवतरून आपापल्या ज्ञान व भक्ती साधनेने आत्मप्रचिती प्राप्त करून भारतीय समाजात सत्यज्ञानाचा अरुणोदय केला. अज्ञानांधःकाराचा नाश केला, समाजास नवचैतन्य प्रदान केले. म्हणूनच संतांचे स्मरण चैतन्यदायी आहे.

श्रीसमर्थ वाग्देवता मंदिराचे (धुळे) संस्थापक, प.पू. नानासाहेब तथा शंकर श्रीकृष्ण देव म्हणत असत की, ''श्री समर्थांचे विस्मरण हेच राष्ट्राचे मरण.''

इतका समर्थांच्या कार्यावर त्यांचा दृढ विश्वास होता. समर्थांचे जीवनकार्य महाराष्ट्राबरोबरच अखिल भारतीय जीवनाशी निगडीत झाले होते. समर्थ रामदास केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर अखिल भारतीय राष्ट्रसंत झाले होते. राष्ट्रसन्त राष्ट्रगुरू या बिरुदावलीने ते ओळखले जातात. ऐहिक व पारमार्थिक उन्नती करण्याबाबत मूलभूत ध्येयदृष्टी दिली आहे.

आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका ।।

प्रपंच नीट करीतच परमार्थ साधावा असा समर्थांचा आग्रही दृष्टिकोन होता. माण्डुक्य उपनिषदात सांगितलेला धर्म, ''यतःश्रेयश्च प्रेयश्च स धर्मः।'' असाच समर्थांचा धर्म - दृष्टिकोन होता व याच धर्माच्या प्रसारासाठी समर्थांनी आपले आयुष्य वेचले. '' पृथ्वीवरी जेवढी शरीरे, तितुकी भगवंताची घरे''असा विश्वव्यापक दृष्टिकोन हा संत खरा समाजप्रबोधक होता.

श्री समर्थांच्या वेळेची समाजस्थिती व आजची समाजस्थिती मानसिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीने पाहता एकाच पातळीवर असल्याचे दृग्गोचर होते. केवळ काही भौतिक प्रगतिमुळे राहणीमानात आज फरक झालेला आहे एवढेच. ''प्रयत्न, प्रचिती व श्रम'' या समर्थांच्या मूलभूत विचारबिंदूंना समाज विसरल्याने आत्मविश्वास व स्वकर्तव्यनिष्ठा विरहित झाला आहे. त्या वेळी समाज असाच स्वत्व विसरलेला, विघटित, असुरक्षित, ''प्रयत्न, प्रचिती व श्रम'' यांची कास सोडून आत्मभान विसरलेला होता. बारा वर्षे स्वाध्याय व त्यानंतर बारा वर्षे भारत भ्रमणात लोक जीवनाचे सर्वेक्षणातील प्रचिती व घटनांचे अवलोकन, चिंतन व मनन करीत समाज शिक्षणाची कार्यदिशा समर्थांनी ठरविली. मनुष्य हा परमेश्वराचा अंश आहे. म्हणून त्याची प्रगती निश्चित आहे; असा समर्थांचा दृढ विश्वास होता.

धन्य धन्य नर देहो । येथील अपूर्वता पाहो ।
जो जो कीजे परमार्थ । तो तो पावे निश्चिते ।।

त्यामुळे या नरात आत्मभान आणून त्याच्या सहज प्रवृत्तीचे उदात्तीकरण करून त्याच्या आवडीनिवडी भावभावना, ज्ञानार्जन पद्धती, विचारशक्ती, इच्छा शक्ती, कृतिशीलता यांची प्रबोधनाने म्हणजेच सुशिक्षणाने योग्य समज घडवून आणणे अगत्याचे आहे. प्रत्येक व्यक्ती परमात्म्याचा अंश असली तरी तिच्यात काही असत् प्रवृत्ती (अहंकार, स्वार्थ, लहरीपणा, आळस, संकुचितपणा) असल्याने दुर्गुण, दुराचार निर्माण झाले आहेत. त्यापासून नराला अलिप्त करण्यासाठी योग्य प्रयत्न झाला तर 'नरदेह श्रेष्ठो' प्रत्ययास येईल; ज्ञान म्हणजे आत्मज्ञान. ते प्राप्त करण्यासाठी संगठन, सुसंस्काराधिष्ठित समाजप्रबोधनाच्या लोकसंग्रह व जनजागृतीच्या चळवळी, साधना भक्ती व श्रद्धा वाढीसाठी मठरूपी विद्यालये निर्मिती असे मार्ग अवलंबून सुशिक्षणाची कास धरावी. आधुनिक शास्त्राप्रमाणे शिक्षणाची जी व्याख्या केली जाते ती अशी - **Education is the transmission of knowledge for its utility.**

Dictionary of Education

उपयोगाच्या अनुषंगाने केलेले ज्ञानाचे संक्रमण. श्री समर्थांनी आपल्या अनुभवसंपन्न ज्ञानाचा उपयोग महाराष्ट्र धर्म वाढविण्याकरिता केला, सुसंघटित समाज निर्माण करण्याकरिता केला, महंताचे व्यक्तिमत्व घडविण्यासाठी केला. त्यामुळेच त्यांची सर्व शिकवण शिक्षणच आहे. सांप्रतच्या शिक्षणप्रणालीत पुढील तीन घटक (ढोबळमानाने) समाविष्ट होतात.

आशय, शिक्षण, विद्यार्थी.

आशय - समाजाच्या समस्या, गरजा, विकासाची दिशा ज्यातून व्यक्त होतात व त्या दिशेने त्या पूर्ण केल्या जातात असे एकमात्र साधन म्हणजे शैक्षणिक आशय. त्यासच शिक्षणाचा आशय, गाभा, ज्ञान इत्यादी नावांनी आपण ओळखतो.

शिक्षक - वर सांगितलेला आशय जो प्रदान करतो तो शिक्षक.

विद्यार्थी - आशय ज्यास दिला जातो व या आशयाच्या माध्यमातून त्याच्याकडून अपेक्षित परिवर्तन घडून यावे अशी अपेक्षा ती व्यक्ती विद्यार्थी होय. विद्यार्थी हा लहान बालकही असू शकतो किंवा मोठे स्त्रीपुरूषही असू शकतात.

सांप्रत शिक्षणातील वरील तीन घटकांचा व शिक्षणाच्या व्याख्येचा व डिक्शनरीतील वर दिलेली व्याख्या विचारात घेतली असता समर्थांचे सारे जीवनकार्य शिक्षणच होते असे प्रत्ययास येते. मात्र त्यांच्या काळी आतासारखी शाळा, शिक्षक, विद्यार्थी, शैक्षणिक साधने अशी रचना नव्हती. शिक्षणप्रणालीत ज्या परिभाषेचा विचार आज आपण करतो त्याच

परिभाषेप्रमाणे समर्थांची कार्यशैलीपण पाहू शकतो. आजच्या शैक्षणिक परिभाषेचा विचार प्रथम करू व नंतर त्याच परिभाषेप्रमाणे समर्थांचे कार्य कसे झाले याचा विचार करू.

सद्य:शिक्षणाची परिभाषा :-

शिक्षणाची मूलग्राही नीती -

१. शिक्षणाचे ध्येय कोणते ?

२. शिक्षणाचे उद्दिष्टे कोणती ?

३. शिक्षक कसा असावा ?

४. शिक्षणाचा आशय कसा असावा?

५. विद्यार्थी कसा असावा ?

६. शिक्षण प्रदान करण्याची पद्धती कोणती व कशी असावी?

७. शिक्षणाचे मूल्यमापन कसे व्हावे ?

सामाजिक समस्यांचा विचार कसा करावा ?

समस्या अडथळे निस्सारण नीती -

८. कोणती नीतिमूल्ये असावीत?

९. शिक्षकांचा समाजाशी व समाजातील व्यक्तींचा अन्योन्य संबंध (आपापसातील संबंध) व आंतरक्रिया कशा असाव्यात ?

१०. लोकसंख्या शिक्षणासंबंधी जाणीव.

११. स्त्रीशिक्षण समस्या

१२. शिस्तपालन समस्या

विकास नीती

१३. मानसशास्त्रीय आधार

१४. अध्ययनक्षमता - विकास

१५. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

१६. वर्धिष्णू, वैभवशाली समाज, आदर्श समाज नीती.

अर्थातच शिक्षणाने केवळ आशय, शिक्षक, विद्यार्थी या मर्यादेत राहून चालणार नाही. तर आपले विचार क्षेत्र वाढवून मूलग्राही दृष्टिकोन, सामाजिक समस्या निर्मूलन उद्दिष्ट, विकासनीती, इत्यादी मुद्यांचा ही विचार आजच्या शिक्षणप्रणालीत केलेला असतो. श्री समर्थांचे मठ एक प्रकारे विद्यालये व ज्ञानपीठेच होती. त्यांनी आतासारखी इन्फ्रास्ट्रक्चरल (Infrastructural) विशिष्ट चौकटीत शिक्षणाची मांडणी केली नाही. पण सूक्ष्म व दूरगामी परिणाम करणारी शिक्षण कार्यशैली समर्थांनी स्वीकारली व अनुसरली होती. अतः ते शिक्षणातील दीपस्तंभच होते. सामाजिक शिक्षणाबाबत ते दिवा व दुवा होते. नुसते शिक्षण शास्त्री नव्हते तर दार्शनिक होते. म्हणूनच आजच्या शैक्षणिक परिभाषतेच श्री समर्थांचे शैक्षणिक विचार मांडण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

(श्री) शैक्षणिक ध्येय :- शैक्षणिक तत्त्वज्ञान शैक्षणिक सिद्धान्त अशा परिभाषेत आपण हा मुद्दा चर्चित असतो. ज्या विचारांच्या पाठपुराव्याकरिता शिक्षण दिले जाते त्यास आपण शैक्षणिक तत्त्वज्ञान म्हणतो. समाजाचा व समाजद्रष्ट्यांचा वैचारिक दृष्टिकोन शैक्षणिक तत्त्वज्ञानातून व्यक्त होतो. पाश्चात्यांचा ऐहिक दृष्टिकोन उपयुक्तता (utility) प्रधान तर भारतीय दृष्टिकोन ऐहिक व पारमार्थिक असल्याचे स्पष्ट होते. ऐहिक प्रगती पारमार्थिक प्रगतीचा मूलाधार असली पाहिजे हा भारतीय शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा मूलभूत दृष्टिकोन आहे. दुर्दैववशांत आज शासन व्यवस्थेवर पाश्चिमात्य विचारसरणीचा पगडा असल्याने शिक्षणाचे तत्त्वज्ञान एकांगी बनले आहे. या उलट आधीचा भारतीय दृष्टिकोन परिपूर्ण वाटतो नव्हे परिपूर्णच आहे. ऐहिक प्रगतीला आत्मिक उन्नतीचे ध्येय गाठणे आवश्यक आहे. अन्यथा ती अमर्याद व अनियंत्रित होत तिच्या मृगजळामागे व्यक्ति धावत राहील, वैफल्यग्रस्त होईल. आजच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाच्या भाषेतच बोलावयाचे म्हणजे श्री समर्थ आदर्शवादी (Idealistic) अध्यात्मवादी (Spiritualistic) व प्राप्त सद्यः परिस्थितीचे भान ठेवून वागणारे (Realistic) होते. ''जे जे भेटे भूत ते ते मानिजे भगवंत ।'' सर्व चराचर सृष्टी व्यापून भगवंत उरला आहे. मनुष्यसुद्धा परमेश्वरी अंशच आहे.

'नराचा नारायण' होणे ही आदर्शवादी, अध्यात्मवादी विचारसरणी सर्व साधुसंतांप्रमाणे समर्थांचीही होती. ज्ञान म्हणजे आत्मज्ञान । पहावे आपणाशी आपण ॥ ही त्यांची शिकवण होती, प्रचितीचे बोल होते. तसेच प्रपंच सुखे करावे । परि काही परमार्थ साधावा. (दा.बो.प्र.३.१०)

म्हणजे निव्वळ ऐहिक दृष्टिकोन नसावा तर अध्यात्मिक उन्नतीसाठी (आत्मोन्नतीसाठी) ऐहिक विकाससाधन व्हावा असा समर्थांचा मूलभूत विचार होता. त्यांच्या विचारात अध्यात्म व ऐहिक विचार परस्पर पूरक असावेत. ''ज्ञान'' या शब्दाचा अध्यात्मज्ञान व प्रपंचज्ञान असा यथार्थ उपयोग समर्थांच्या विचारसरणीत प्रत्ययास येतो. शिक्षणशास्त्रीय दृष्टिने पाहता आजच्या शैक्षणिक दृष्टिपेक्षा समर्थांची शैक्षणिक दृष्टी वेगळी पण समृद्ध होती; भारतीय परंपरेतील होती. (श्रेयस् +प्रेयस् धर्मःमाण्डुक्य उपनिषद.)

(स) शैक्षणिक उद्दिष्टे :- शैक्षणिक ध्येयपूर्ती करिता केलेले लहान लहान घटक म्हणजे शैक्षणिक उद्दिष्टे. शिक्षण प्रक्रियेची दिशा दर्शविणारे थांबे म्हणजे शिक्षणाची उद्दिष्टे. शिक्षणाच्या सर्व उद्दिष्टांची परिपूर्ती म्हणजेच शैक्षणिक ध्येयाची परिपूर्ती होय. संपूर्ण समाजाचे प्रबोधन करणे. आपण प्रत्येकजण दैवी अंश आहोत अशी जाणीव देऊन आत्मविश्वास नि आत्मभान निर्माण करणे. विकसनशील असणे, कामक्रोधादि तमोगुणांचा, दुष्प्रवृत्ती, दुराचार यांचा नाश करणे व सत्त्वगुण अंगी बाणणे यासाठी आत्मचिंतन व आत्मपरिवर्तनासाठी नैष्ठिक प्रयत्न करणे कर्तव्य आहे. समर्थांच्या दृष्टीने हीच शैक्षणिक उद्दिष्टे होती.

''तैसे निंदा ते सोडून द्यावे । वंद्य ते हृदयी धरावे
सत्कार्तीने भरावे । भूमंडळ (१३.१०.२०)
जनी निंद्य ते सोडून द्यावे । जनी वंद्य ते सर्व भावे करावे.

स्वतःच्या विचाराबरोबर समाजाचा ही विचार करणे समर्थांना अपेक्षित आहे.

(म) शैक्षणिक आशय :- आजच्या शिक्षणात प्राथमिक शिक्षण पातळीवर (3'R'- Reading, Writing, Arithmetics) वाचन लेखन व गणित या त्रयी, प्राधान्य दिले आहे. श्री समर्थांनी पण या तीन मुद्यांना प्राधान्य दिले आहे. लिखाणा करिता एक समास खर्ची घातला आहे. लेखन, वाचन, या बरोबरच श्रवण या मुद्यावर समर्थांनी लक्ष केंद्रित केले आहे.

अक्षर सुंदर, वाचणे सुंदर । बोलणे सुंदर चालणे सुंदर ।
भक्ति, ज्ञान, वैराग्य, सुंदर । करून दावी॥(दा.बो.११-६)
''उत्तम तेची घ्यावे । मिळमिळत अवघे टाकावे

येथे उत्तम । सुंदर यासंबंधी विशेष विचार आहे. सौंदर्य । उत्तम - सक्षम, अचूक कृती म्हणजे सुंदर वा उत्तम.

जीवनाची प्रत्येक गोष्ट मग ती ऐहिक ज्ञानाबाबत वा अध्यात्मिक असो ती उत्तमच असावी हे अभिप्रेत होते. ऐहिक ज्ञानास जरी पोटविद्या, अविद्या असे म्हटले असले तरी या विद्या नेटक्या प्रपंचाकरिता, व्यवसायाकरिता अत्यंत आवश्यक आहेत असे 'ईशोपनिषदात प्रतिपादन केलेले आहे. मानवी

बुद्धीचे संदर्भात श्री समर्थांनी तिच्या देहबुद्धी व आत्मबुद्धी अशा दोन पातळ्या मानल्या आहेत. देहबुध्दी ऐहिकज्ञाना (प्रापंचिक ज्ञाना) संबंधात विचार करण्यास कारणीभूत होते तर आत्मबुद्धीचा संबंध अध्यात्मविद्येशी येतो. भौतिक शास्त्र व अध्यात्मशास्त्र दोन्हीही शास्त्रे शैक्षणिक अभ्यासक्रमाचे विषय असावेत असे समर्थांना अभिप्रेत आहे. मात्र भौतिकशास्त्राचा अभ्यास हा अध्यात्मशास्त्राचा पूर्वाभ्यास असावा हा त्यांचा आग्रही दृष्टिकोन होता. म्हणूनच तौलनिकदृष्टीने अध्यात्मिक शास्त्राच्या अध्यापन - अध्ययनाकरिता मौलिक गुण संपदेला समर्थ रामदासांनी प्राधान्य दिले. त्यांचे प्रत्येक गोष्टीबाबत विवेचन सुस्पष्ट आहे.

१. लेखन - ''वाटोळे सरळ मोकळे । बोलले मसीचे काळे ।
कुळकुळीत वळी चालील्या डाळे । मुक्त माला जरा ॥

अक्षरे, शब्द, ओळी कशा असाव्यात हे प्रचिती रूपाने सांगितले. केवळ लेखन चांगले असावे एवढ्यावरच न थांबता ते चांगले यावे या कामी कोणता लेखन सरंजाम असावा व त्यासाठी काय प्रयत्न करावा हे याच समासात स्पष्टपणे निर्देशित केले आहे. अक्षर व ओळी शब्दांचे वर्णन आहे. याच प्रमाणे ते लेखन सौंदर्य, अचुकता, सघन आशय यांचा हृदयंगम मिलाफ असावा; असा उपदेश केला आहे. जसे सुंदर लेखनासंबंधी तसेच वाचनासंबंधी समर्थ आग्रही आहेत.

२.वाचन दिसामाजी काहीतरी लिहावे ।
प्रसंगी अखंडित वाचीत जावे ॥ स.ग्रंथ भां. २४
तसेच, प्रसंगी थोडे वाचावे । चटका लावून सोडावे ॥२।१९।१२

शब्द न वगळता शुद्ध वाचन, स्पष्ट उच्चार समर्थांना अपेक्षित होते. एकाग्र वाचनाबरोबर पाठांतर अपेक्षित होते. मात्र पाठांतर अर्थयुक्त असावे याबाबत ते आग्रही होते. 'अर्थावीण पाठ कासया करावे । व्यर्थ का मरावे घोकोनिया॥ (१५.१०.१)

३. बोलणे : मुद्देसूद, अर्थपूर्ण विश्वासार्ह असावे. कर्कश, विकारयुक्त बोलणे त्यांना आवडत नसे.

'सत्यवचनी शुभवचनी । कोमल वचनी येकवचनी ।
निश्चयवचनी सौख्यवचनी । सर्वकाळी ॥ (२.८.७)

असे बोलण्यासंबंधी आदर्श होते. आपल्या पुतण्यांना उपदेश करताना ते लिहितात.

'बरे सत्य बोला । यथा तथ्य चाला ।

कोमल वाचा दे रे राम ' असा आग्रह व देवाजवळ प्रार्थना होती. जगामध्ये जगन्मित्र । जिव्हेपाशी असे सूत्र असे गोड बोलण्याचे महत्त्व ते जाणून होते. (१९/२/१०)

४. श्रवण : शाळेत येण्यापूर्वी ज्या साधनामुळे (बहुश्रुतता) बालकाचे निम्मे अधिक (५०टक्केपेक्षा अधिक) व्यक्तिमत्त्व तयार होते ते साधन म्हणजे ऐकणे. मूल केवळ आई वडील-नातेवाईक, सगेसोबती, शेजारी-पाजारी यांचे बोलणे ऐकून व निरीक्षणाने ऐकल्याचे पुनरूच्चारणाने सर्व शिकते. अशा त्या श्रवणाचे महत्त्व पाश्चात्य शिक्षा - शास्त्रींना अजिबात जमले नाही. फक्त 'विद्याभारती' या शिक्षण क्षेत्रातील संस्थेने मुलाच्या पाच वर्षे वयापर्यंत फक्त श्रवणाने कृत्तिद्वारा शिकवावे असा आग्रह धरला, जगात तो कुठेही नाही.

तैसा ज्ञान होता मलीन । अज्ञान प्रबळ जाण ।
या कारणे श्रवण जाण । अखंड असावे ॥४२॥

श्रवण, मनन व चिंतन ही ज्ञानाची व्यापक साधने. **Enrichment of Knowledge & Understanding of Knowledge -**

मर्मग्राही (मूलभूत) ज्ञानास वरील तीनही गोष्टी आवश्यक असल्याचा आज प्रभाव.

५. संगीत - रागज्ञान, तालज्ञान, नृत्यज्ञान, वाद्यज्ञान हे अभ्यासावे व ऐकावे 'धन्य ती गायनकला' या शब्दांनी संगीताचे शिक्षणातील महत्त्व समर्थांनी ओळखले होते. म्हणून संगीताचा त्यांनी सढळ हाताने वापर केला. आजच्या शिक्षण पद्धतीत याचा थोडा थोडा वापर आता होऊ लागला आहे. पूर्वी फक्त कविता, गीते, बडबड गीते, इत्यादींचा समावेश शिक्षणात होता. गीतांबरोबर संगीत, वाद्यांचाही उपयोग मानसशास्त्रीय दृष्टीने आवश्यक आहे अशी त्यांची जाण होती. तसा प्रयत्नही त्यांनी केला.

आधुनिक काळात संगीतोपचार **(Music therapy)** व मानसोपचार **(Stress Strain Elimination)** हे एकाग्रतेकरिता कसे आवश्यक आहेत ते आपण पाहतो. म्हणून कीर्तन, अभिनय, संगीतयुक्त भजन याविषयी समर्थ आग्रही होते. इतकेच नव्हे तर ही सर्व शिक्षणाचे आवश्यक अंगेच आहेत असे समर्थ मानत. कृति केंद्रित, बालकेंद्रित असाच शिक्षणाचा आशय असावा असे समर्थांचे म्हणणे होते.

(थ) शिक्षक - National Policy of Education (N.P.E.1986) मध्ये शिक्षकास शिक्षणाची गुरुकिल्ली **(Teacher is a Key of Education)** असे म्हटले आहे. कोठारी आयोग शाळाच विद्यार्थ्यांस आकार देऊ शकतात असे म्हटले आहे. **(Students are Shaped in Class)** समर्थांचेही हेच मत होते.

सद्गुरुवीण ज्ञान काही । सर्वथा होणार नाही
अज्ञानी प्राणी प्रवाही । वाहतची गेले ॥ ४-१-२॥

दासबोधात पाचव्या अध्यायात सद्गुरु लक्षण व महंत लक्षण विषद करताना शिक्षकांचे महत्त्व व तो कसा असावा यासंबंधी समर्थ सांगतात.

जैसे बोलणे बोलावे । तैसेची चालणे चालावे ॥५-२-२३॥
बोलण्यासारखे करणे । स्वये करून मग बोलावे
तयांची वचने प्रमाण । मानती जनी ५-२-२४
क्रियेवीण शब्दज्ञान । ते श्वानाचे वमन ५-२-७४
महंत सदा विद्यार्थीच असावा
आधी सिकावी मग सिकवावी ।
तोच पावे श्रेष्ठ पदवी ॥५-२-७५॥
महंते महंत करावे । युक्ती बुद्धीने भरावे ।
जाणते करूनी विवरावे । नाना देसी ॥ ११-६-२५॥

अशी असंख्य लक्षणे गुरुंबाबत (शिक्षकाबाबत) (महंत म्हणून) सांगितली आहेत. नमुन्यादाखल अत्यल्प वर उधृत केली आहेत.

(रा.) विद्यार्थी - ज्याप्रमाणे शिक्षक आपल्या व्यवसायात कार्यात तत्पर व पात्र असावा त्याचप्रमाणे विद्यार्थी कुशाग्र बुद्धीचा, चपळ, विश्वासू, कामसू, व्यापकव्यक्ती असलेला असा असावा. एकांगी नो व्हावे, बहुढंगी व बहुरंगी व्हावे असे समर्थांना वाटत होते. नुसत्या ठोंब्या, बुद्धीजड विद्यार्थ्यास त्यांनी ''म्हैस मंगळू'' म्हटले आहे. परिस्थितीचे अचूक निरीक्षण करणारा प्रामाणिक नम्र, व्यापकदृष्टीचा सावध सर्वांचा 'मित्र असावा. संशोधक वृत्तीचा, धीरवृत्तीचा संयमी असावा. बुध्दीवान, शुद्धचारित्र्याचा सर्मपणवृत्तीचा तर्कशुद्ध विचार करणारा, देवभक्त असावा.

(म) शिक्षण पद्धती - शिक्षणात सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षणपद्धती सर्वांत जास्त प्रयोग या घटकावरच होत असतात. मठांद्वारा महंतांकडून पूर्णपणे अशिक्षित असा त्यावेळेचा साराच समाज प्रबोधनाद्वारे एका सूत्रात बांधावयाचा होता. व्यक्ती आणि समाजाचा एक समयावच्छेदेकरून विकास घडवून आणण्यासाठी चिंतन मनन करून समर्थांनी

शिक्षणपद्धती वापरल्या. त्याच शिक्षणपद्धती आज आपण आधुनिक शिक्षण पद्धती म्हणून वापरतो. 'सूक्ष्म निरीक्षण, आनंद - आधारित, मानसशास्त्रीय, कृतियुक्त, बालक केंद्रित, अनुभवाधिष्ठित अशा शिक्षणपद्धतींची योजना समर्थांनी केली.

अज्ञानीजनास शिकवावे, अशी सर्व सुशिक्षित, सुज्ञजनास समर्थ विनंती करतात.

१. समाज शिक्षण - जे जे आपणासि ठावे । ते ते दुसऱ्याशी द्यावे
शहाणे करून सोडावे । सकल जन ॥१३-१०-८५॥
मानसशास्त्रीय भाषेत समर्थांचे म्हणणे.
मुलाच्या चालीने चालावे । मुलांच्या मनोगते बोलावे ।
तैसे जनांसी सिकवावे । हळुहळु ॥१३-१०-८६॥

आजही मुलाच्या आवडी निवडीप्रमाणे व त्याच्या क्षमतेप्रमाणेच शिकवावे असेच शिक्षण पद्धती सांगतात.

२. दुसरी महत्त्वाची पद्धत म्हणजे 'संवाद' (Communication) समर्थांनी अवलंबिली. साक्रेटिसाने केवल प्रश्न कौशल्याने लोकांना बोलते केले व ज्ञान दिले. असे इतिहासात आपण वाचतो. पण संवादात गुरु, शिष्य एकमेकांना प्रश्न विचारून ज्ञानात भर पडते. (शिष्याच्या) श्री समर्थ आपल्या शिष्यांना प्रश्न विचारावयास प्रोत्साहन देतात.

जरी तू भिडेने दाटसी । आणि तोंडी हो म्हणसी ।
तरी उभय अर्थनाशिशी । माझेही काही चालेना ॥ समर्थ ग्रंथ भा.
अरे शिष्या आशंका उद्भवली । ते अगत्य पाहिजे पुसली
हे आशा आम्ही दिधली । पहिलीच तुज । ६।६।२
जरी माझी मर्यादा धरिसी । तरी तू स्वहिता अंतरिसी ।
या कारणे मानसी । शंका धरू नको ॥१७-३-४॥

संवाद पद्धती जाणीवपूर्वक योग्य रीतीने अवलंबिली तर तीमुळे ज्ञानदान होते व विद्यार्थ्यांची परीक्षाहि घेता येते. या पद्धतीमुळे वक्तृत्वावर, विषयावर व बोलण्यावर प्रभुत्त्व निर्माण होते. संवाद पद्धतीचे असे महत्त्व समर्थांना ज्ञात होते. समार्थांची सारी साहित्यसृष्टी संवाद पद्धतीवरच आधारली आहे.

३. पाठांतर - आधुनिक शिक्षणपद्धती ज्या 'पाठांतर' पद्धतीचा आज निषेध करतात त्याच पाठांतर पद्धतीचा समर्थ पुरस्कार करतात. वेदकाळापासून आपल्याकडे काही घनपाठी विद्यार्थी आहेत. सारे सृष्टीज्ञान या पाठांतराधारेच आपण परंपरेने वाहून आणले. पाठांतर कसे करावे? याच्या सूचना होत्या. अर्थाशिवाय पाठांतर व्यर्थ आहे. अशा पाठांतरास सक्त विरोध होता, पाठांतर उदंडची असावे । सर्वकाळ उजळीत जावे ॥४३

पण अर्थाशिवाय कासया करावे । व्यर्थ का मरावे घोकून ॥

४. कीर्तन - मनोरंजनप्रधान, ज्ञानाधिष्ठित पद्धत म्हणजे कीर्तन. गायन, अभिनय व नृत्य यामुळे चांगली रूची निर्माण करता येते. चांगले चारित्र्य, तत्त्वज्ञान समाजात रुजवता येते. कीर्तन अवगामी पद्धती Deductive Methodoligy (सिध्दान्त-दृष्टान्त-विवेचन) सर्व सामान्यांच्या पचनी ज्ञान पडू शकते. पूर्वरंग -सिद्धान्त व उत्तररंगात दृष्टान्त. उदाहरण - कथा या साखळीमुळे ज्ञान भिनते. व्यक्ती व समाज चारित्र्यवान होतात, समाज संघटित होतो. क्रीडा, करमणूक अभिनय, नृत्य या चारी कौशल्यांचा सुमेळ असल्याने ज्ञान - प्रसार चांगला होतो.

५. क्रीडन पद्धती - (Play way Method) बऱ्याच लोकांची अशी समजूत आहे की, क्रीडा पद्धती ही फक्त पाश्चात्यांनाच माहिती होती. मॅंटिसरीबाई, पेस्टॉलजी, किंडर गार्टन यांनी या पद्धती शोधल्या व वापरल्या आपण त्यांचे अनुकरण करतो. पण समर्थांनी या पद्धतीचा अवलंबही केला.

''कंटाळा दुरी करावा । मजामध्ये त्रासो नये ।
सांगता सांगता तसे । हासे खेळे अहर्निशी ॥

त्याकरिता विविध गाणी रचली, डफगाणी, पोवाडे, साची, सवया अशा वैविध्यपूर्ण शब्द योजना केल्या. संगीत, कोडी अभिनय व मर्मविनोद यांचा वापर केला. एकूणच श्री स्वामी समर्थ हे स्वयं प्रेरक, कल्पक, संशोधक वृत्तीचे शिक्षक होते.

(दा)(७) अध्ययन संकल्पना - (Concept of Learning) अध्ययन हा शिक्षण व्यवस्थेचा गाभा, ज्ञान प्राप्तीचा एकमेव मार्ग. त्यामळे शिक्षण क्षेत्रातील सर्वांचा अध्ययन संकल्पनेच्या अभ्यासावर भर असतो. या संकल्पनेचा समर्थांनी विचार केला होता.

अध्ययन प्रक्रियेत खालील घटकांचा विचार होतो -

पायऱ्या - ज्ञान मिळविणे + स्वीकारणे + समजणे +स्पष्ट करणे

१. अध्ययनात विषय व व्यक्ती याबद्दल आत्मीयता प्रतिबध्दता **(attachment)** हवी.

शिकले शब्द ते थोडे । जिव्हाळा पाहिजे बरा ।

२. अध्ययन संकल्पनेचे पुनर्परीक्षण **(Verification)** समर्थग्रंथ माला

शब्द रत्न परीक्षावी । प्रत्ययाची पाहोन घ्यावी ।
येर ती अवघी सांडावे । येकीकडे

जे वाचले ते नीट पारखून घ्यावे. त्याचा प्रत्यय पाहावा अनुभव घ्यावा, फोलपट टाकून द्यावे.असे आधुनिक शिक्षण तज्ज्ञ म्हणतात. समर्थ ही -

''घासामागे घास घेतला । अवकाशनाही चावायला अवघा बोकाणा मारला । पुढे कैसे २-७५-१३२

चावून, पचवून झाल्यावर पुढचा घास घेणे आवश्यक अन्यथा भक्षिलेले अन्न व्यर्थ. - तसेच ज्ञानाचेही समजून आत्मसात केले तरच ज्ञान उपयुक्त हेच सांगत आहेत.

४. निःसंदिग्ध ज्ञान- संदेहरहित ज्ञान । निश्चयाचे समाधान जे ज्ञान मिळवायचे ते स्पष्ट, निःसंदेह असावे.

(स)(८) शिष्य - गुरु - संबंध - आंतरक्रिया (Interaction) गुरुशिष्याचे संबंध पितापुत्राप्रमाणे असावेत. आपल्या सर्व संतांचे असे म्हणणे आहे. पिता - पुत्राचे पुर्वीच्या काळचे संबंध समन्वय युक्त, जिव्हाळ्याचे विनम्र श्रद्धायुक्त असावेत. आजच्यासारखे लेन देन (Commercial) सारखेसंबंध नसावेत असे समर्थांचे आग्रही प्रतिपादन होते. गुरूनिष्ठा व विद्यार्थी प्रेम असेच संबंध असावे. शिष्य - गुरुसंबंध चातकपक्षी मेघ यांच्या सारखा असावा. असे श्री समर्थांचे मत होते.

(स्वा)(९) शिस्त - समर्थ रामदास शिस्तीचे अतिशय भोक्ते होते. ''नीतिनियमांप्रमाणे काटेकोर आचरण करणे म्हणजे शिस्त. शिस्तीशिवाय कार्यहानी होते, अपयश येते, विकास होत नाही असे त्यांचे मत होते. शिक्षक - विद्यार्थी, सामाजिक राजकीय कार्यकर्ते तसेच कुटुंबीयात स्वयं अनुशासन असावे. ''स्मरणाचा बंद गेला । तो प्राणी मनुष्यातून उठला'' (बंद म्हणजे नियम, नियमितपणा शिस्त) समर्थांचे राजधर्म, क्षत्रियधर्म, महंतधर्म म्हणजे कर्तव्य, नियम, शिस्त यांची गाथा. उदाहरणार्थ, योग्य सवयीतून शिस्त निर्माण होते. म्हणून चांगल्या सवयीवर समर्थांचा भर होता. धर्म शब्दाने कर्तव्य / शिस्त यासंबंधीचे शास्त्र समर्थांना अभिप्रेत आहे. महंतधर्म सांगतांना ते म्हणतात,

आचारभ्रष्ट होऊ नये । बहुत भीक्षा घेऊ नये ।
ज्ञान मळीन होऊ नये । केल्याविणा सांगो नये ॥(१४.१.)

(मी) (१०) मूल्यशिक्षण (नीतिशिक्षण) Value Education शासकीय अध्यादेशाने सर्व शाळात आज नीतिशिक्षण एक अत्यावश्यक विषय घेतला जातो. सर्व समाजात आज दुराचार, भ्रष्टाचार, मद, मोह, मत्सर आदींनी पशुवृत्ती फैलावून समाज विस्कळीत झाला आहे. नैतिक अधःपतन हेच त्याचे कारण आहे. म्हणूनच योग्य संस्कारावर भर देण्याचा समर्थांचा मूलतः प्रयत्न होता. डॉ. सौ. लोहकरे (१९८०) यांनी दासबोधान्तर्गत समर्थ जी मूल्ये मांडतात त्याचे तीन भागात वर्गीकरण केले आहे.

१. व्यक्तिगत मूल्ये (२) सामाजिक मूल्ये (३) अध्यात्मिक मूल्ये

१. व्यक्तिगत मूल्ये - उद्योगशीलता, निःस्वार्थीपणा, निर्भयता, आत्मविश्वास, सदाचरणी, आदरभाव, स्वच्छता, स्वयंनियंत्रण, शचिता, साधेपणा, स्वयंमूल्यांकनक्षमता, नेतृत्वक्षमता, श्रमनिष्ठा, न्यायीप्रवृत्ती सहजशीलता, विवेक, वैराग्यशीलता, प्रयत्नवादी वृत्ती (आज शाळेत परिपाठात शिकविली जाणारी मूल्ये (10 N.C.E.R.T.) सांगितली जातात त्यापेक्षा व्यापक आहेत.) कर्तव्यदक्षता, सत्यवादीपणा, करुणाशीलता, दयाशीलता निसर्गप्रेमी ह्या मूल्यांना नैतिक मूल त्याना नैतिकमूल्ये पण संबोधली आहेत.

२. सामाजिक मूल्ये - व्यापकता, समता, मैत्री, व्यागीवृत्ती, सर्वधर्म समभाव, बंधुता, सहनशीलता, चांगले शिष्टाचार

३. अध्यात्मिक मूल्ये - ईश्वरनिष्ठा, सौंदर्याभिरुची, अलिप्तता, व्यवस्थितपणा, सत्यवचनी.

लौकिक दृष्ट्या :- धर्माचरण व त्यावर आधारित त्यांची मूल्य-दृष्टी होती. त्यांचे बारकाईने निरीक्षण केल्यास हीच मूल्ये शासकीय मूल्यांपेक्षा अधिक व्यापक, सर्वसमावेशक, म्हणूनच विश्वसंवादी (युनिव्हर्सल) वृत्तीची आहेत. दुर्दैवाने पाश्चात्य लोकांनी पांथिक आचरणातच धर्म मानले व धर्मात संकुचित रुप द्यावयाचा प्रयत्न केला. धर्म ही पांथिक उपासना नसून सर्व विश्वाचे कल्याण करणारी कर्तव्याधिष्ठित मूल्यरचना आहे असे समर्थांचे म्हणणे आहे. म्हणून धर्मात व्यक्तिगत मूल्ये व सामाजिक मूल्ये यात संघर्ष नाही. समर्थांच्या मूल्य पद्धतीत व्यक्ती, समष्टी, सृष्टी, परमेष्टी यांचे संतुलन असून विकसित होत जाणाऱ्या समकेंद्रित (Concentric Circles) वर्तुळाप्रमाणे, सहजता त्यात आहे. म्हणून समर्थ हेच खरे धर्मनिरपेक्ष. त्यांनी विवेक व प्रयत्न यावर भर दिला; कष्ट उदंड आटोपावे । तर मग पुढे सुखी व्हावे. यत्न तो देव जाणावा. अशी मौलिक विचाररत्ने दिलीत.

९. शैक्षणिक मानसशास्त्र :- समर्थ आणि मानसशास्त्र या संदर्भात विचार करता पाश्चिमात्य लोकमानसशास्त्र हा शब्द वापरतात. आपणास ही कल्पना अप्रस्तुत वाटते. वस्तुतः पाश्चिमात्य मानसशास्त्र हे मनाचे शास्त्र नाहीच. कारण Psychology is a science of behaviour ते मानवी वर्तनाचे शास्त्र आहे. विविध प्रसंगी होणारे मानवी वर्तन, सामाजिक वर्तन ह्यांचा व्यक्ती विकासातील स्थिती सापेक्ष अभ्यास म्हणजे मानसशास्त्र (Psychology) स्पष्टपणे विषय मांडला जातो. मन हे प्रथमपासूनच सहावे इंद्रिय आपण मानतो. मन हेच माणसाच्या उन्नतिचे वा अधोगतीचे कारण मानले आहे. (मनःएव मनुष्याणां कारणं बंध मोक्षयो, गीता :) असे मानले आहे. आयुर्वेद, योगशास्त्र, उपनिषदे, सर्व दर्शनाने व बौद्ध, जैन, पंथातसुद्धां मनाचा सखोल अभ्यास केला आहे. त्यामुळे भारतीय मानसशास्त्र हे वस्तुतः मनाचाच अभ्यास करते. समर्थांइतका मनाचा दांडगा अभ्यास अभावानेच आढळतो. मनाच्या भिन्न अवस्थेत मानवी कृती व व्यवहार यावर काय परिणाम होतो याचे पुरेपूर चिंतन केलेले आहे. मन - बुद्धी, चित्त व अहंकार यांचा संघात म्हणजे मन असा भारतीय दृष्टिकोन आहे.

मन - श्री समर्थांनी मनाची व्याख्या अशी केली आहे.

अंतः करण आठवले । पुढे होय नव्हेसे गमले ।

करू न करू ऐसे वाटले । ते मन. १७-८-५

संकल्प, विकल्प तेची मन. १७-८-६

मन 'चांचल्याचे प्रतीक' म्हणून स्थिर होत नाही, लवकर एकाग्र होत नाही. म्हणून कार्यसिद्धी नाही. अतःमन स्थिर करणे अत्यावश्यक आहे. त्याकरिता विविध तऱ्हेनी प्रयत्न करावयास समर्थ सांगतात. कारण मन 'अभ्यासयोगेन' च स्थिर होऊ शकेल. मन जाणीवेचे कार्य करीत असल्याने मनाच्या संयम निग्रह यावर समर्थांनी भर दिला आहे. ''मनाचे श्लोक'' म्हणजे मनाचे लक्षण, त्याची स्थिती व त्यावर उपाय यांचा अभ्यास आहे. कारण मन हे फारच सामर्थ्यशाली असून त्याच्यामुळे सर्व कार्ये होत असतात.

बुद्धी :- करिन घ अथवा न करी । ऐसा निश्चयोचि करी

तेची बुद्धी हे अंतरी । विवेकी जाणावी ॥ ७.२.७

स्थिर अंतःकरण म्हणजे बुद्धी ती विवेकाशी संबंधित आहे. पण समर्थांनी बुद्धीचे हि वर्गीकरण केले. प्रपंचाचे संबंधात विचार करणारी बुद्धी ही देहबुद्धी व प्रपंचात व परमार्थाचा विचार करणारी ती आत्मबुद्धी. देहबुद्धीकडून आत्मबुद्धीकडे गेल्यास विकास होतो, अशी समर्थांची धारणा होती.

चित्त मनाचा तिसरा भाग म्हणजे चित्तस्मृती स्मरणाचे कार्य हा भाग उरतो. मनाची ही उक्ती जी पूर्व स्मृतीच्या साह्याने कार्यास साहाय्यभूत होते. माणसात असणारे हे इतर प्राण्यापेक्षा वेगळे सामर्थ्य.

अहंकार - मनाचे हे वैशिष्ट्य पाश्चात्य लोकांनी पण मानले. त्यास त्यांनी EGO, मी मीपणा, आस्मिता या नावाने संबोधिले आहे. देहबुद्धीचा वातावरणाशी असलेला संबंध व्यक्त करणे म्हणजे अहंकार किंवा मीपणा असे भारतीय मत. समर्थांच्या मते देहबुद्धी ज्या वेळी व्यक्तीहिताचा केवळ सर्वांच्या संबंधात विचार करते. अर्थात व्यक्ति हिताच्या हिताच्या सबंधात सर्वांचा विचार करत व स्वतःला मात्र या चराचर सृष्टीपेक्षा वेगळी समजते त्या वेळी अहंकार, अभिमान निर्माण होतो. अहंकार ही अभिमानाचीच विकृती आहे. अहंतेमुळेच मनुष्यनाशास, अधोगतीस जातो. म्हणून त्यावर नियंत्रण असावे, असे श्री समर्थ मनाचे श्लोकात सांगतात.

१२. व्यक्तिमत्व (Personality) - व्यक्तिमत्व ही माणसाने प्राप्त केलेली व त्याला लाभलेली गुणसंपदा असते. समर्थांनी व्यक्तिमत्वाचे तीन प्रकारात वर्गीकरण केले आहे.

१. सत्वगुणी व्यक्तिमत्व - चांगले व्यक्तिमत्व

२. रजोगुणी व्यक्तिमत्व - कार्यकारी पण स्वार्थी

३. तमोगुणी व्यक्तिमत्व - मूढ, आळशी व्यक्तिमत्व तमोगुण कमी करत जायचे व त्याच वेळी सत्वगुण जाणणे म्हणजे मानवाचा विकास होय.

पाश्चात्य दृष्टीने केवळ गुणसंघात व्यक्तिमत्व भारतीय दृष्टीने केवळ गुणसंघात व्यक्तिमत्व नव्हे.

(ड) (१३) व्यक्तित्व भिन्नता - (Individual differences) सत्व, रज, तमोगुणांच्या विविध मात्रांमुळे व अन्य गुणसंपदेमुळे व्यक्तींना विकासात भिन्नावस्था प्राप्त होते. म्हणून सर्व व्यक्ती समान नसतात. असे आजच्या प्रमाणे समर्थ ही मानीत.

मानवात शारीरिक, भावनिक, मानसिक, बौद्धीक दृष्ट्या भिन्नस्तर व गुणविशेष असतात. व्यक्तीच्या पात्रतेप्रमाणे शिकवावे (क्षमतेप्रमाणे शिकवावे) असे समर्थ प्रतिपादन करतात. तेच आजच्या शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे.

(थी)(१४) स्त्री शिक्षण - श्री समर्थांसारखा सर्व समाजाविरुध्द जाऊन / ठाम उभा राहून स्त्री शिक्षणाचा पुरस्कार व प्रसार करणारा सन्तनेता अद्याप झाला नाही. आज आया बहिणीवरच्या अत्याचाराच्या कहाण्या आपण नित्य ऐकत असतो. 'समानता' मूल्य म्हणून सांगतो पण विषमता जोपासतो. स्त्रीच्या दूरवस्थेची कारणे शोधून तिला सबळ करण्यासाठी स्त्री शिक्षणाची सुरूवात केली. त्या वेळी समाजाकडून त्यांना तीव्र विरोध झाला. पण समाजहितैषी वृत्ती असल्याने समर्थांनी त्यावर मात करून स्त्री प्रबोधनाचे कार्य सुरू ठेवले. त्यांच्या अकरा प्रमुख शिष्या होत्या. तत्कालीन परिस्थितीवर मात करून त्यांनी त्या शिष्यांचे शिक्षण घडवून आणले. त्या स्त्री शिष्यांना समर्थ केले. कार्यक्षम केले व गुरूपदी नेऊन बसविले. महंतपद दिले. एक स्त्री सार्थ नेतृत्व करू शकते. दीक्षा देऊ शकते. असे 'स्त्री' समर्थत्व अपूर्वच झाले. समर्थ स्त्री शिक्षणाबद्दल इतके जागृत होते. समाजास नवी दृष्टी देऊन चारशे वर्षांपूर्वीच स्त्रीशिक्षण सुरू केले.

को. (१५) शारीरिक शिक्षण व आरोग्य (Physical Education) माणसाने काहीही करावयाचे ठरविले तर ज्या साधनाने ते कार्य करावयाचे ते साधन म्हणजे माणसाचा देह होय. शरीर हे साधन कार्यक्षम असेल तर कार्य यशस्वी होऊ शकेल. म्हणून शरीर कार्यक्षम, शक्तीसंपन्न असणे अत्यावश्यक आहे व त्यांच्या प्रवृत्तिप्रमाणे समर्थांनी आधी केले मग सांगितले. त्यांचे निरीक्षण इतके सूक्ष्म व व्यापक होते. ह्या शक्तीचे पैलू शोधून समग्र जीवन सुव्यवस्थित विकसित करण्यास ते कसे आवश्यक हे - समर्थांनी सिद्ध केले.

डॉ.गोगटे (२००५) 'राघवाचा धर्म जागो' यात ती सुसूत्रतेने मांडली आहेत. (१) देहशक्ती (मानवी बळ) (२) बुद्धी शक्ती (३) समुदाय शक्ती (४) राज शक्ती (५) धर्म शक्ती (६) क्रिया शक्ती (७) वैराग्य शक्ती (८) उपासना शक्ती (९) अर्थ शक्ती (१०) आत्म शक्ती. शरीराच्या सक्षम कार्यक्षमतेकरिता लागणाऱ्या शक्तीपैलूंचा इतका सखोल विचार अद्याप कोणीच केला नव्हता. समर्थांचे हे एक शैक्षणिक योगदानच आहे. या शक्तींचा पूर्ण विकास योग्य वेळी व योग्य प्रमाणात त्यांचा उपयोग हे यशाचे मुख्य कारण (गमक) आहे. असे समर्थांचे आग्रही मत आहे. 'सामर्थ्यवान व्हा' 'बलवान व्हा' असे त्यांचे आवाहन होते. म्हणून ''राम'' ''हनुमान'' व देवी भवानी'' ह्या शक्ती देवतांची त्यांनी उपासना सुरू केली व शिष्यांना, भक्तांना व समाजास करावयास लावली.

ऐश्वर्य सर्व शक्तींचे । विवेकी प्रत्यये पहा ।
त्रिलोकी जितके प्राणी । शक्तीवीण वृथा वृथा ।
शक्तीने मिळती राज्ये । युक्तीने यत्न होतसे ।
शक्ती युक्ती जये ठायी । तेथे श्रीमंत योगी ।

को (१६) लोकसंख्या शिक्षण (Population Education) शिक्षणशास्त्रांत गेल्या ३० वर्षांपासून ही कल्पना रुजू होत आहे. समर्थांना त्या काळात या शिक्षणाची आवश्यकता जाणवली आवश्यकतेपेक्षा जास्त मुले असू नयेत. आपल्या कुटुंबाच्या स्थितीच्या संदर्भात वंशवृद्धी व्हावी.

लेकुरे उदंड झाली । तो ती लक्ष्मी निघून गेली ।।
बापडी भिकेस लागली । काही खाया मिळेना ।।

असा ऐहिक विचार परखडपणे मांडला. 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव'' हा आशीर्वाद ज्याकाळी दिला जात होता त्याच काळात संयमाचा, संख्येपेक्षा गुणवान संततीचा - लोकशिक्षणाचा प्रचार समर्थांनी केला. हे त्यांचे वेगळेपण आहे.

को (१७) मूल्यमापन - (Evaluation) समर्थांनी परीक्षा (पारख) करून घेऊनच माणसे निवडली. शलाकापद्धतीने, चर्चासत्र, परिषदाद्वारे ते परीक्षा करीत. दासबोधातील पाने उलटसुलट लावून त्यांना ती नीट क्रमवार लावण्यास सांगत. म्हणजे 'मूल्यमापन' ही संकल्पना त्या काळापासूनच होती. हल्लीप्रमाणे लेखी मूल्यमापनावर भर नव्हता.

(न)(१८) आदर्श समाज - 'आनंदवन भुवन' ही आदर्श समाजाची समर्थांची कल्पना होती. त्या काळी सर्व महाराष्ट्र जाती/उपजातीमध्ये विभागला गेला होता. नैतिक खालावला होता. उच्चनीचता होती. इतर संतांनी ही उच्चनीचता केवळ धार्मिक क्षेत्रात कमी करण्याचा प्रयत्न केला. समर्थांनी मात्र 'आनंदवन भुवन' समतायुक्त, बलशाली वैश्विक दृष्टी असलेला संपन्न समाज निर्मितीचे स्वप्न पाहिले. समर्थांचे आनंदवन भुवन आदर्श समाजाचे प्रतीक होते.

उद्वेग पाहता नाही । चिंता मात्र नये जनी ।
व्याधी नाही रोग नाही । लोक आरोग्य नांदती ।
बोलणे सत्य न्यायाचे । अन्याय सहसा नसे ।।
वढता वाढते प्रेमा । सुखानंद उंचावते ।
संतोष समस्त लोका । रामराज्य भूमंडळी ।।

समारोप - श्री समर्थ रामदास स्वामीसारख्या द्रष्ट्या राष्ट्र संताची शिक्षण क्षेत्रातील झेप आपण पाहत होतो. साऱ्या जगात जी प्रबोधनाची लाट १८ व्या शतकात आली ती समर्थांनी १७ व्याच शतकात भारतात आणली. त्यांनी केवळ वाचन, लेखन, आकडेमोड एवढाच शिक्षणाचा संकुचित अर्थ न घेता आपले मर्यादित आयुष्य, मर्यादित क्षमता लक्षात घेऊन जे चिरंतन आहे, अविनाशी आहे म्हणजेच टिकाऊ आहे त्याचा शोध घेण्याच्या उद्दिष्टाने करावयाची प्रक्रिया म्हणजे शिक्षण असा व्यापक अर्थ घेतला. केवळ इंद्रियविज्ञान व भोगलोलुप सुखासीनता असे न राहता समग्र दृष्टिकोनातुन शिक्षणाकडे पाहिले. सर्व चराचर सृष्टीचा विकास असा झाला. समर्थांची दृष्टी एकात्म शिक्षण - बालकेंद्रीत, कृतिप्रधान, आनंददायी होते. ध्येय व्यक्तिविकास - व्यक्ति - समष्टी-सृष्टी-परमेष्टी असा सन्तुलित एकात्म परिपूर्ण अशा दृष्टिकोनाचा व्यक्तीविकास समर्थांना अभिप्रेत होता. त्याकरिता -

(१) माहिती संकलन (२) निरीक्षण (३) परीक्षण (४) चालना (५) विवेचन (६) प्रयत्न (७) प्रचिती (८) पुनःप्रचिती (९) सिद्धान्त. श्रीसमर्थांनी ही अष्टांगे पेलून जी युक्त पद्धती वापरली तीच आजच्या परिभाषेत शास्त्रीय (वैज्ञानिक) Scientific Method होय.

अशा रीतीने समर्थ दूरदृष्टीचे शिक्षण शास्त्रात नवी भर घालणारे शिक्षण शास्त्री होते.

शिक्षणाचे पैलू

(१) श्री - ध्येय (२) स-उद्दिष्ट(३) म - आशय(४) र्थ - शिक्षक (५)रा - विद्यार्थी (६) म-शिक्षणपद्धती (७) दा.अध्ययन (८) स- गुरुशिष्यसंवाद (९) स्वा - शिस्त (१०) मी - मूल्यशिक्षण (११) शै - शैक्षणिक मानसशास्त्र (१२) क्ष - व्यक्तिमत्व (१३) णि - व्यक्तिभिन्नता (१४) क - स्त्री शिक्षण (१५) दृ - शारीरिक शिक्षण -आरोग्य(१६) ष्टी - लोकसंख्या शिक्षण (१७) को - मूल्यमापन (१८) न - आदर्श समाज

अशा अष्टादश बिंदूत श्री समर्थ रामदास स्वामींचे विचार त्यांच्याच प्रेरणेने व्यक्त केले आहेत. श्री समर्थ चरणी अर्पण. इदं न मम.

- प्रा.डॉ. सोमनाथ त्र्यंबक जोशी,
आशिष ८ अ विनयकॉलनी,
देवपूर धुळे - ४२४ ००२

● ● ●

श्री रामदासांचे लघुकाव्य 'अंतर्भाव'

- सौ. सुनंदा शाळीग्राम



समर्थ रामदासांचे वाङ्मय म्हणजे दासबोध, मनाचे श्लोक व करुणाष्टके! त्यांचा उपदेश या त्रयीत साठवलेला आहे. पण याशिवायही समर्थांचे काव्य विपुल आहे व ते उत्तम आहे. त्यातही काव्य तसेच अध्यात्म भरलेले आहे, याकडे मराठी साहित्यिकांचे, वाचकांचे व मुमुक्षूंचेही लक्ष गेलेले नाही.

समर्थांची अकरा लघुकाव्ये म्हणजे अकरा लघु अध्यात्मप्रकरणे होत. ही ओवीबद्ध असून यात विलक्षण गोडी आहे. वाचताना वाचकाचे चित्त वेधून घेण्याइतके सामर्थ्य, इतकी हृदयंगमता त्यात नक्की आहे. समर्थ म्हणतात - 'श्रवण करावे तेचि ग्रंथ । जेथे बोलिला परमार्थ। या अकरा लघु प्रकरणांची नुसती नावे जरी पाहिली तरी लक्षात येईल की, 'येथ बोलिला परमार्थ ।' नावे अशी आहेत - १)पूर्वारंभ २) जुनाटपुरुष ३) अंतर्भाव ४) आत्माराम ५)पंचसमासी ६) सप्तसमासी ७) सगुणध्यान ८) निर्गुणध्यान ९) मानसपूजा १०)एकवीससमासी (किंवा जुना दासबोध) ११) जनस्वभाव किंवा बहुधा गोसावी.

ही सर्व प्रकरणे 'गुरु-शिष्य संवादात्मक' आहेत. या संवादमयतेमुळेच ती स्वाभाविक आकर्षक झाली आहेत. गुरूची भूमिका इथे समर्थच घेताहेत. शिष्याचे प्रश्न हे आपलेच प्रश्न आहेत, असे वाचकाला वाटावे इतके ते प्रातिनिधिक आहेत. या गुरु-शिष्यांची भाषा लडिवाळपणाची आहे. गुरू इथे शिष्याला 'प्राणसखया, बाळा, बापा अशी संबोधने वापरतात. प्रसंगी प्रेमाची दटावणीही करतात. 'अंतर्भाव' मधील पाचव्या समासातील १५ वी ओवी -

> **''स्वामी म्हणती शिष्यासी । आता संदेह धरिसी ।**
> **तरी श्रीमुखावरी खासी । निश्चयेसी ॥''**

आत्मीयतेवाचून प्रेमावाचून कोण कोणाच्या श्रीमुखात मारील? असला लडिवाळपणा दासबोधात नाही. इथे ठायी ठायी आहे. त्यामुळे या काव्यात प्रेमळपणा भरून राहिला आहे. समर्थांनी या काव्यात शिष्याला आपल्या हृदयीचे गूज मोकळ्या मनाने सांगितले आहे. दासबोधात समर्थांनी शिष्याला जवळ बसवून घेतले आहे, तर या लघुकाव्यांमध्ये त्यांनी त्याला आपल्या मांडीवर घेतले आहे, आपल्या हृदयाशी धरले आहे. दासबोधात समर्थ संकेते बोलेले आहेत, तर इथे ते उघड बोलले आहेत. महत्त्वाचे म्हणजे इथे समर्थांनी साधनांवर विशेष व वारंवार भर दिला आहे. श्रीरामनाममहिमाही अनेकदा वर्णिला आहे. इथली भाषा जास्त जिव्हाळ्याची वाटते. ओवी ओवीत माधुर्य आहे. वाचकाला मंत्रमुग्ध करून सोडण्याचे सामर्थ्य आहे. सामान्यांना कळेल असाच उपदेश इथे केला आहे.

'अंतर्भाव' हे समर्थांचे लघुकाव्य आकाराने लहान म्हणजे फक्त ११९ ओव्यांचे पण गुणाने महान आहे. यात सहा समास असून त्यात समर्थांनी 'नित्यनेम' उपदेशिला आहे. ''मन मोकळे करून इतक्या खुलाशाने त्यांनी दुसरीकडे कोठे साधनमार्ग सांगितल्याचे आढळत नाही. 'समर्थांचे' म्हणविण्याऱ्यांनी हा नित्यनेम पाळला पाहिजे'' असे शंकर देव म्हणतात. ''ही लघुकाव्ये समजली व तदनुसार आपल्या आचारविचारात फरक पडला, तर गुरूकृपा झाली, असे निश्चित समजावे, असे शंकर देवांचे म्हणणे.

'अंतर्भाव' म्हणजे सगळ्या तत्त्वज्ञानाचा गाभा - निदिध्यास. 'भक्तीस लोक लावावे । पावावे परपार ते ॥' अशा कळवळ्याने जनास केलेला उपदेश.

प्रयत्न, प्रत्यय आणि प्रबोध ही समर्थ जीवनाची त्रिसूत्री आहे. त्यांच्या पारमार्थिक जीवनाच मर्म यात साठवलेल आहे. स्वतः प्रयत्न करायचे. प्रयत्नांनी प्रत्यय मिळवायचा. प्रत्यय आल्यावर प्रबोध घडवायचा. इतरांनाही प्रयत्नाला उद्युक्त करायचे. मोहरूपी निद्रेत असणाऱ्याला जागृत करायचे, प्रबोधित करायचे - प्रयत्न आणि प्रत्ययासाठी ! त्यांच्या प्रबोधाला स्वप्रयत्नाचे पाठबळ आहे आणि आत्मप्रत्ययाचा आधार आहे. म्हणूनच त्यांचे शब्द शिष्यमनात प्रबोध घडवू शकतात.

'अंतर्भाव' या लघुकाव्यामध्ये समर्थांच्या शिष्याबद्दलचा कळवळा, त्याचे अज्ञान दूर करण्याची त्यांना लागलेली तळमळ, साधनेचे अंतरंग सांगताना कमालीची प्रासादिकता, ज्ञानदेवांची आठवण व्हावी इतका ओवी - ओवीतील गोडवा, साधनमार्गाची निश्चितता आणि ध्येयप्राप्तीबद्दलचा ठाम विश्वास यामुळे शिष्याला साधनेसाठी उद्युक्त करण्यात समर्थ यशस्वी झाले आहेत.

पहिल्या समासात शिष्याची आर्तता प्रकट झाली आहे. संसारतापाने पोळलेल्या माणसाचा तो प्रतिनिधी आहे. त्याच्या उद्वेगपूर्ण मनःस्थितीचे चित्र समर्थांनी रेखाटले आहे. संसारदुःखातून सुटण्यासाठी तो गुरूंना शरणागत झाला आहे. इथे समर्थ हेच त्याचे सद्गुरू आहेत.

> **''जय जय जी सद्गुरू समर्था । जय जयाजी जी पूर्ण मनोरथा ।**
> **धरणी ठेवूनिया माथा । प्रार्थितसे ॥१॥''**

प्रथम सद्गुरूंचा जयजयकार केला आहे. सद्गुरूच समर्थ आहेत; शिष्यप्रबोधनी समर्थ आहेत. सद्गुरूच पूर्णकाम आहेत; शिष्याचे मनोरथ पूर्ण करणारे आहेत. किंबहुना त्याला पूर्णकाम करून सोडणारे आहेत. त्यांच्याच चरणी प्रार्थना करणे उचित आहे. म्हणून पूर्ण शरणभावाने माथा चरणी ठेवून शिष्य प्रार्थना करीत आहे. चरणी माथा ठेवणे म्हणजे बुद्धीशरण होणे - ज्याची परमार्थाला अत्यंत आवश्यकता आहे. शिष्य शरण आला, पण आजवर का नाही आला? ही शरणागती आजवर का नाही केली?

पुढील ओवीत सांगतात -

> **''मी एक संसारी गुंतला । स्वामी पदी वियोग जाला ।**
> **तेणे गुणे आळ आला । मज मीपणाचा ॥२॥''**

शिष्याला आता अनुताप झाला आहे. स्वामीपदी वियोग होण्याला कारण 'मी संसारी गुंतला' जोवर मनुष्य प्रपंचात गढलेला आहे, तोवर श्री

गुरूसेवा त्याच्या हातून नीट घडत नाही. आणि गुंतणे आहे, ते संसारातच आहे,मनुष्याला खरे बंधन संसाराचंच आहे. आणि ते इतके वाढत गेलं की, समर्थ त्याला गुणाकाराच्या पटीत वाढतं, असे म्हणतात. 'तेणे गुणे' तसेच 'मीपणा' काही संपत नाही. आणि मीपणा असेपर्यंत श्रीचरण भेटत नाहीत. शरणागतीला 'मीपणा' खपत नाही. इथे शिष्याने श्रीचरणांना, आपण का अंतरलो याचे आत्मपरीक्षण केले आहे.

'इच्छाबंधनी गुंतलो । तेणे गुणे अंतरलो ॥' इच्छा हेच बंधन. प्रपंच करायला काही कोणाला सांगावे लागत नाही. पण प्रपंचातला गुंता वाटू लागला की मग मात्र तो म्हणतो, 'आता येऊ नी सोडविलो पाहिजे दातारे ॥२॥'

खरा 'दातार' सद्गुरूच आहे. तोच आपली सुटका करील, असे त्याला वाटू लागते. त्याला अनुताप केव्हा होतो? 'तारुण्यवैभव निघोनि गेले । मग मानस पस्तावले हातीचे रत्न गळोनि पडिले । मग चरफडू लागे ॥' संसारप्रपंचाने मन उद्विग्न झाले; समाधान हरवून बसले. शिवाय कुळाभिमानासारखे अभिमान होतेच. त्यानी समाधान पार हरपले.

'प्रपंचसंसार उद्वेगे । क्षणक्षणा मानसभंगे ।
कुळाभिमान म्हणे,उगे समाधानासी ॥४॥'

शिष्याने केलेले आंतरनिरीक्षण विलक्षण आहे. मानस उद्विग्न झाले की काय होते ?

' तेणे समाधान चळे । विवेक उडोनिया पळे ।
बळेचि वृत्ति ढासळे । संगदोषे ॥५॥'

'मन करा रे प्रसन्न' म्हणून कितीही सांगितले तरी मनाचे समाधान चळे, टिकत नाही. विवेक कितीही केला तरीपळे, स्थिर होत नाही. बळे म्हणजे प्रयत्न पूर्वकवृत्ति स्थिर राखण्याचा अभ्यास केला तरी 'वृत्ति ढाळसळे' हाच अनुभव पुनःपुन्हा येतो. कारण काय? 'संगदोष'. संग म्हणजे अभियान आणि संग म्हणजे आसक्ती. कशाचा अभिमान आणि कशाची आसक्ती? देहाचा अभिमान व देहाची आसक्ती, हाच दोष. याचमुळे समाधान चळे, विवेक पळे, वृत्ती ढासळे. आत्मपरिक्षण करून शिष्य पुढे म्हणतो-

''स्वामी, प्रपंचाचेनि गुणे । परमार्थासी आले उणे ।
ईश्वर आज्ञेप्रमाणे । क्रिया न घडे ॥६॥''

प्रपंचच इतका वाढला की त्यामुळे परमार्थ उणा झाला. प्रपंचच इतका थोर वाटू लागला की त्यामुळे परमार्थाला जीवनात कमीपणा दिला गेला. 'गुणे' या शब्दाचा एक अर्थ 'वाढणे' असा आहे. तसाच दुसरा अर्थ गुण म्हणजे त्रिगुण - त्या सत्त्व,रज,तम या त्रिगुणांनुसार वर्तन घडत गेले; त्यामुळे परमार्थाला उणे आले. वास्तविक सात्त्विक कर्मेच करायला हवी होती आणि तीही ईश्वर आज्ञेप्रमाणे घडायला हवी होती. वेदविहित कर्मे या ईश्वराच्या आज्ञा आहेत. ती विहित कर्मे तशी घडली नाहीत. शिष्याने झालेल्या प्रमादाची ही कबुली दिली आहे.

गुरूपुढे हा प्रामाणिकपणा दाखविला पाहिजे. वेदविहित कर्मांचा कंटाळा करणे म्हणजे आळस हा तमोगुणाचे कार्य आहे. आपल्या ठिकाणच्या या दोषाची शिष्याने कबुली दिली आहे. तसेच आपल्या विक्षेपित मनोवृत्तीचे चित्रणही त्याने केले आहे. चित्तावर दुःखाचा झोका आदळला की चित्ताचे समाधान राखणे कठिवर जाते. चित्त विक्षेपीत म्हणजे चंचल होते. चित्तवृत्ती डळमळू लागते. शिष्य म्हणतो -

'याच्या दुःखे झोंका आदळे चित्ती ।
समाधान राखणे किती ।
विक्षेप होता चित्तवृत्ती । दंडळू लागे ॥७॥'

मनःस्वास्थ्य बिघडलं की सगळ बिघडतं. आधी जे गोड वाटत होतं, तेही कडू वाटतं. चित्ताचे हे झोके काहीवेळा इतके वेगाने येतात की, जीव कासावीस होतो. थोडीतरी विश्रांती, उसंत हवी अस वाटू लागत. पण तीही प्रपंचात मिळत नाही.

'प्रपंचे केले कासावीस । घेऊ नेदी उमस ।
तेणे गुणे उपजे त्रास । सर्वत्रांचा ॥२॥'

ज्याचा पूर्वी हव्यास केला, जे पूर्वी सुखावह होत होतं, त्याचाच आता त्रास वाटू लागला. ''आता असो हा संसार । जाले दुःखाचे डोंगर । अशी दुःखाने परमसीमा गाठली. संसाराबद्दल आसक्ती राहिली नाही.

'आता काही सार्थक करावे । देहे बुद्धीपासूनी सुटावे ॥' असे वाटू लागले. सद्गुरू हे सर्व जाणतात. ते अंतर्साक्षी आहेत. त्यांनीच काही विचार सांगावा.

''तरी आता काय जी करावे । कोण्या समाधाने असावे ।
हे मज दातारे सांगावे । कृपा करूनी ॥१०॥''

माझ्यावर दयाळू होऊन श्रीगुरूंनीच आता समाधानाचा उपाय सांगावा. शिष्य काकुळतीला येऊन प्रार्थना करू लागला.

''ऐसी शिष्याची करुणा । ऐकोनि बोले गुरुराणा ।
केली पाहिजे विचारणा । पुढिलिये समासी ॥''

पुढील समासात समर्थ विचारमार्ग सांगतात-

''ऐक शिष्या सावध । सिद्ध असता निजबोध ।
माईक हा देहसंबंध । तुज बाधी ॥१॥''

'देहबुद्धी दृढ जाली ॥ म्हणोनिया' तुला आजची बद्ध स्थिती प्राप्त झाली. 'देहबुद्धीचा सागरी तरले पाहिजे' असेल तर समर्थ 'उपाव' सुचवितात.

''विषयमोळ्या वाहो सांडी । मग त्यास कोण म्हणे काबाडी ।
तैसी पदार्थाची गोडी । सांडिता आत्मा ॥''

वास्तविक तो 'आत्मा'च आहे. पण विषय वस्तू - व्यक्ती - पदार्थांची गोडी म्हणजे आसक्ती तो सोडीत नाही. बुद्धी देहाकडेच लागून राहते. आत्म्याकडे लक्ष देत नाही.

'देहबुद्धीचे लक्षण । दिसेंदिस होता क्षीण ।
तदुपरी बाणे खूण । आत्मयाची ॥'

बुद्धीने फक्त आत्मविषयक माहिती मिळविणे म्हणजे आत्मबुद्धी होणे नव्हे. समर्थ म्हणतात-

''साधनेविण ज्ञानवार्ता । बोलोचि नये ॥
दसऱ्याचे सोने वाटिले । तेणे काय हातासी आले'
तैसे शब्दी ब्रह्मज्ञान । बोलता नव्हे समाधान ।
म्हणोनिया आधी साधन । केले पाहिजे ॥''

यासाठी समर्थ एक मार्मिक दृष्टान्त देतात-

''शब्दी जेविता तृप्ती जाली । हे तो वार्ता नाही ऐकिली ।
पाकनिष्पत्ती पाहिजे केली । साक्षेपे स्वये ॥''

श्रीगुरूंनी 'मां हे ब्रह्मज्ञान परम कठिण ।

साधनेविण केवी?' असे म्हणताच शिष्य विचारतो-

'शिष्य म्हणे जी सद्गुरू । साधन तरी काय करू समर्थ म्हणतात,

'आता पुढिलिये समासी ।
स्वामी सांगती साधनासी ॥'

तिसऱ्या समासात हे साधन समर्थांनी सांगितले आहे. पण ते 'अंगी बाणले पाहिजे पूर्ण' अशी ताकीद देऊन! या समासात समर्थ बद्ध, मुमुक्ष, साधक व सिद्ध असे माणसांचे चार प्रकार करतात.

'काहीच नेणे तो बद्ध ।' आणि
'भाव उठिला तो शुद्ध । मुमुक्ष जाणावा ॥'
तसेच ' कर्म त्यजून बाधक । शुद्ध वर्ते तो साधक ।'
क्रिया पालटे विवेक । पाहे, नित्यनवा ॥

आणि या साधकावरच समर्थांचा विशेष भर आहे. त्यालाच ते 'नित्यनेम' सांगतात.

"आधी स्वधर्मलक्षण । पुढे अद्वैतश्रवण केले पाहिजे॥' असेही बजावतात. नित्यनेमाचे महत्त्व समर्थांनी पाच ओव्यातून उत्तम प्रकारे वर्णिले आहे. आता तो 'नित्यनेम' कोणता ते समर्थ सांगतात-

"केले पाहिजे श्रवण । प्रत्यई स्वये ॥
मानसपूजा जपध्यान । एकाग्र करूनिया मन ।
त्रिकाळ घ्यावे दर्शन । मारुती सूर्याचे ॥
हरिकथा निरूपण । प्रत्यई करावे श्रवण
निरूपणी ऊणखूण । केली पाहिजे ॥
..... अंतरी पाच नामे । म्हणत जावी नित्यनेमे ।
..... साधनेविण ज्ञानप्राप्ती । होणार नाही ॥"

शिष्याला साधन मिळालं, पण सिद्ध होण्याची घाई आहे.

'कैसे येईल सिद्धपण । केव्हा तुटेल साधन ॥'

असं वाटणाऱ्या शिष्याला समर्थ बजावतात-

'सिद्ध होऊनि बैसला । दृष्टी नाही साधनाला ॥
सादर अशनशयनाला । अत्यादरे करूनी ॥
ऐसा जो विषयासक्त । अत्यंत विषई आसक्त
सिद्धपणे आपुला घात । तेणे केला ॥"

समर्थ श्रीशंकराचे उदाहरण देऊन सांगतात.

"जो सिद्धांचा मस्तकमणी । महातापसी शूळपाणी ।
त्याच्या 'अखंड वाचे रामनाम' आहे.
'तोही म्हणे मी साधक । तेथे मानव बापुडे रंक ।'

अशी ताकीद देऊन समर्थ आपले निर्णयात्मक मत सांगतात-

'साधनेसी जो सिद्ध । तोचि ज्ञाता परमशुद्ध
'साधनेविण वाष्कळता । तेचि जाणावी बद्धता ॥

विषयासक्त मनुष्य साधनेचा कंटाळा कसा करतो, याचे सुंदर चित्र समर्थांनी रेखाटले आहे -

"मन सुखावले जिकडे । आंग टाकिले तिकडे ।
साधन उपाय नावडे । अंतरातुनी ॥
चित्ती विषयांची आस । साधन म्हणता उपजे त्रास ॥
नेम धरिता कासावीस । परम वाटे ॥
दृढ देहाची आसक्ती । तेथे कैची पां विरक्ती ।
विरक्तीविण भक्ती । केवी घडे ॥"

भक्तीसाठी विरक्तीची अत्यंत आवश्यकता आहे, हे समर्थांनी चौथ्या समासात प्रतिपादिले आहे. ज्या साधकाला 'नेम' चालू नाही. त्याला अंती धोका आहे, हे समर्थांचे वचन ऐकून शिष्य धाबरला. 'अंती मती तेचि गती, असे म्हणतात. पण 'अंतसमयो येईल कैसा । हा तो न कळे भर्वसा । या शिष्याच्या म्हणण्यावर श्रीगुरू त्याला उपदेश करतात-

"तुवां पुशिले अनुसंधान । अंत समयीचे ॥
तरी अंत कोणास आला । कोण मृत्याते पावला ।
हा तुवां विचार केला । पाहिजे आता ॥"

आणि पुढे म्हणतात.

'सस्वरूपी मरणाची वार्ता । बोलोचि नये ॥
'स्वरूपी तो अंत नाही ।'
'आता मृत्य देहास घडे । तरी ते अचेतन बापुडे ।'
'आता मृत्य कोठे आहे । बरे शोधूनि पाहे ॥'

या ठिकाणचा गुरूशिष्यसंवाद लक्षणीय आहे. शिष्य विचारतो,

"देह चालवितो कोण । हे मज सांगावी खूण ।
येरु म्हणे हा प्राण । पंचकरूप ॥
प्राणास कोणाची सत्ता । येरु म्हणे स्वरूपसत्ता
सत्तारूपे तत्त्वता । माया जाण ॥
मायेची माईक स्थिती । ऐसे सर्वत्र बोलती ।
माया पाहता आदिअंती । कोठेचि नाही ॥
अज्ञानासी भ्रांती आली । तेणे दृष्टि तरळली ।
तेणे गुणे आडळली । नस्तीच माया ॥
शिष्या होई सावचित्त । मायेचा जो शुद्ध प्रांत ।
तोचि पैं देहाचा अंत । सद्गुरू बोधे ॥
चत्वार देहाचा अंती । उरली शुद्ध स्वरूपस्थिती ।
तेणे गुणे तुझी प्राप्ती । तुजचि जाली ॥
जन्मलाचि नाही अनंत । तयासी कैंचा येईल अंत
आदिअंती निवांत । तोचि तू आवघा ॥"

आपणच ज्ञानस्वरूप असताना संदेह का? यावर श्रीगुरू सांगतात-

"देहबुद्धीचेनि बळे । शुद्ध ज्ञान ते झाकोळे ।
भ्रांति हृदई प्रबळे । संदेहरूप ॥
म्हणोनि देहातीत जे सुख । त्याचा करावा विवेक ।
तेणे गुणे अविवेक । बाधू न शके ॥"

श्रीगुरू शिष्याला समजावतात -

"जे जन्मलेचि नाही । त्यासी मृत्य चिंतिसी काई ।
मृगजळाचां डोही । बुडोचि नको ॥
मनाचा करूनि जयो । याचा करावा निश्चयो ।
आपण देहाचा संबंधी । मुळीच नाही ॥"

तेव्हा " अस्ते करूनिभाव । नस्त्याचा पुसूनी ठाव ।"
दोहोतीत अंतर्भाव । अस्ते खुणेने असावे ॥

शिष्याच्या मनातील आशंका आता तुटली 'मार्ग फुटला विवेका ।' पण हा विवेक दृढ झाला पाहिजे, अंगी बाणला पाहिजे.

'निरूपणी वृत्ति गळे । शुद्ध ज्ञान प्रबळे ।
उठोनि जाता सवेचि मावळे । वृत्ति मागुती ॥

अशी आपली स्थिती वर्णन करून शिष्य विचारतो, ' सांगा यासी काय करू ?'

श्रीगुरू पुढील सहाव्या समासात सांगतात -

''निरावलंबी चित्त न्यावे । तरी ते राहेना स्वभावे ।।'

म्हणून

'' निरावलंबीचे साधन । देह असता सावधान ।
केले पाहिजे समाधान । संतसंगे विवेके ।।'

हे अनुसंधान आधी सतत केले पाहिजे. सतत केले तरच ते अंतकाळी घडते. शिष्य विचारतो, अंतकाळी अनुसंधान टिकले नाही तर? श्रीगुरू सांगतात -

तर सगुणमूर्तीचे ध्यान करावे. शिष्य म्हणतो, पण ध्यानालाही चित्तच हवे. चित्त दुश्चित्त झाल्यास ध्यान तरी कसे घडेल? श्री गुरू म्हणतात, मग रामचिंतन करावे. यावर शिष्य म्हणतो, पण वासना प्रपंचध्यान करते. कारण मन प्रपंची गुंतले आहे. वरवर नाम स्मरले तरी काय उपयोग ?

'तरि आता कायजी करावे । कोण्या उपाये तरावे ?'

श्री गुरू सांगतात -

''ऐका उपायाचे वर्म । दृढ लाविला नित्यनेम ।
हाचि उपाय परम । अंतसमईं ।।
पूर्वी पडला जो अभ्यास । तोचि अंती निजध्यास ।
म्हणोनिया सावकाश । नित्यनेम करावा।।
जयास ठाईचीच सवे । तयास नलगे सांगावे ।
म्हणोनिया नित्यनेम जीवे । विसंबू नये ।।''

आणि शेवटी समर्थांनी पुन्हा 'नित्यनेम' सांगितला आहे.

''एकाग्र करूनिया मन । अंतरी करावे ध्यान ।
सर्व सांग पूजाविधान । प्रत्यही करावे ।।
नित्य नेमिला जो जप । त्रिकाळ दर्शनी साक्षेप ।
आदित्य मारुतीचे रूप । अवलोकावे ।।
हरिकथा निरूपण । प्रत्यई करावे श्रवण ।
हेचि जाणती खूण । नित्यनेमाची ।।''

आता ज्या वेळी मनुष्य अशक्त होऊन पडतो, तेव्हा नित्यनेम घडत नाही. त्या वेळी काय करावे?

'तेणे बळेचि नेमाकडे । चित्त न्यावे ।।'

आपला नित्यनेम राहतो आहे, यामुळे तो कासावीस होत असेल तर तोच 'निजध्यास' आहे.

'अहा देवा जप राहिला । मारुती नाही देखिला '

'तद्विस्मरणे परमव्याकुलता' अशी अवस्था होते; याचा अर्थच 'मन लागे देवाकडे' हाच निजध्यास होय.

''वाचा खुंटता अंतर पडे ।
म्हणोनि अंतरीच जप घडे ।।'

अंतकाळी जर वाचा गेली तरी, त्याचा जप अंतरी चालू असतो.

शेवटी समर्थ रामनामाचा महिमा सांगतात. याच नामाने उद्धार होतो, असेही सांगतात.

''तेचि अंतरी धरावे । तेणेचि संकटी तरावे ।
कैलासनाथे सदाशिवे । उपाव केला ।।
इति श्री अंतर्भाव । जन्ममृत्य समूळ वाव ।
रामदासी गुरुराव । प्रसन्न जाला ।।''

- सौ. सुनंदा शालिग्राम
विश्वनाथ स्मृती
दत्तवाडी, पुणे - ४११ ०३०

• • •

तीन युग पुरुष - महर्षी याज्ञवल्क्य शंकराचार्य व समर्थ रामदास



- श्री. शिवाजी माधव चौधरी

वैदिक धर्माचे अधिष्ठान 'सत्य' असल्याने सत्य शोधनाचा प्रत्येक अनुयायाचा हक्क सदैव मान्य राहिला आहे. व्यक्ती आणि शास्त्र यांचा संबंध नेहमीच मध्यस्थाशिवाय असल्याने कोण्या मध्यवर्ती नियंत्रक संघटनेची किंवा संस्थेची गरज भासली नाही. धर्माला मध्यवर्ती असलेले तत्त्वज्ञान गतिमान असल्याने सामाजिक गरज, अनुभव व सोय लक्षात घेऊन त्या अनुषंगाने अध्यात्मिक, नैतिक, धार्मिक व सामाजिक दृष्टिकोनात परिवर्तने आत्मसात करण्यात आली. काही वेळा काही द्रष्ट्या लोकांना सामाजिक परिवर्तन विशिष्ट परिस्थितीमुळे समाजासाठी हितावह वाटते व मग ते आपली बुद्धी, ज्ञान व सर्व प्रकारच्या युक्त्या लढवून समाजाला नवा दृष्टिकोन अंगिकारण्यास उद्युक्त करतात असे परिवर्तन घडवून आणणारे युग-पुरुष समाजच नव्हे तर इतिहास घडवितात. वैदिक धर्माच्या इतिहासात न्याय, वैशेषिक, सांख्य योग आणि पूर्व मिमांसा या पारंपरिक लोकमान्य असणाऱ्या दर्शनशास्त्रांच्या अनुनयापासून अद्वैत वेदान्ताच्या तर्कशुद्ध, तर्कनिष्ठ व सत्याच्या जास्तीतजास्त सदृश नव्या तत्त्वज्ञानाकडे समाजाला वळविण्याचे महान कार्य ज्या महात्म्यांनी केले, त्यात महर्षी याज्ञवल्क्याचे नाव अग्रेसरच म्हणावे लागेल. तसेच कालांतराने बौद्ध धर्माचा उदय होवून अनेक परिस्थितीजन्य कारणांमुळे वैदिक धर्माचा भारतात अस्त होवू लागला तेव्हा अद्वैत वेदांताचे पुनरुत्थान करून, इतर सर्व आस्तिक व नास्तिक मतांचे खंडन करून वैदिक धर्म भारतभर पुनः प्रस्थापित करणारे शंकराचार्यही युग-पुरुषच म्हणावे लागतील. सरते शेवटी व्यक्तिंचा समूह म्हणून (समाज नव्हे) जगणाऱ्या हिंदुंना समाज म्हणून अनेकसंघ व बलवान समाज होवून आक्रमक प्रयत्न करून स्वतंत्र हिंदू राज्य स्थापनेची प्रेरणा देऊन कार्यप्रवण करणारे समर्थ रामदासही युग-पुरुषच म्हणावे लागतील. या तिन्ही युग-पुरुषांच्या जीवन व कार्याचे स्मरण करून या लेखात त्यांना श्रद्धांजली अर्पण करू.

भारतातील आर्यांत जवळजवळ सर्वसमावेशक व सर्वमान्य अशी विचारधारा रुजविण्याच्या प्रक्रियेत महर्षी कृष्णद्वैपायन वेदव्यासांचा सिंहाचा वाटा आहे. इतिहास म्हणून मान्यता पावलेले महाभारत तर त्यांनी ग्रथित केले पण अनेक लोककथांना एकत्रित करून पुराणेही रचली. तसेच ज्ञानाच्या क्षेत्रात अफाट अशा वेदवाङ्मयाला सुटसुटीत आकृतीबद्ध व सध्याचे सहजगम्य स्वरूप दिले. 'वेद व्यास हे त्यांच्या या कार्याबद्दल मिळालेले बिरुद आहे. नव्या स्वरूपात ज्ञानाचा एकमेव स्रोत म्हणून वेदांची ग्राह्यता एवढी वाढली की वेद म्हणजे ज्ञान व ज्ञान म्हणजे वेद असे समीकरण सर्वमान्य झाले. याही पुढे जाऊन वेदांना प्रमाण मानणारे ते आस्तिक व असे न करणार ते नास्तिक असेही समजण्यात येऊ लागले.

अध्यात्मिक स्तरावर भारतातील अंतिम सत्याच्या शोधात विचार मंथन चालूच राहिले परंतु ते आस्तिक व नास्तिक या दोन प्रवाहात विभागले नास्तिक प्रवाहात चार्वाक, बौद्ध व जैन तत्त्वज्ञानांचा समावेश होता. तर आस्तिक प्रवाहात गौतम ऋषीचे न्याय दर्शन, कणादांचे वैशेषिक दर्शन, कपिल मुनींचे सांख्यदर्शन पतंजलीचे योग दर्शन, जेमिनीचे पूर्व-मिमांसा दर्शन व बादरायणांचे (व्यासांचेच दुसरे नाव) उत्तर मिमांसा दर्शन याचा अंतर्भाव होता. कृष्णावताराचा व विशेष करून भगवद्गीतेचा भारतीयावर येवढा प्रभाव पडला की काही शतकातच संपूर्ण भारत आचारदृष्ट्या उत्तरमिमांसक बनला. याच काळांत वैचारिक स्तरावर वेदाशी इमान राखून उपनिषदिक विचारांचा मंथनातून विकास चालूच राहिला. नव्या नव्या द्रष्ट्यांनी आपल्या प्रज्ञेतून अद्वैत सिद्धान्ताला काटेकोरपणा, स्पष्टपणा .... प्रदान करून त्याला अंतिम स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. अशा महात्म्यात -महर्षी याज्ञवल्क्यांचे नाव अजरामर आहे.

महर्षी याज्ञवल्क्य : - याचा काल कोणत्याही ग्रंथात काळ गणनेनुसार उल्लेख नसल्याने इतर घटना व ग्रंथ यातील उल्लेखा वरून निश्चित करावा लागतो. हा युद्धीष्ठिराच्या सभेत उपस्थित असल्याचा उल्लेख (सभा पर्व ४-१२) महाभारतात आला आहे. जनकाच्या यज्ञात अतिभाग ऋषीनी याला परिक्षितीचे वंशज कोठे असतात असा प्रश्न केल्याचा उल्लेख आहे. (बृ.उ.अ.३) यावरून हा महर्षी महाभारतकालीन असून त्याला दीर्घायुष्य प्राप्त होते असा निष्कर्ष निघतो. हा अतिशय बुद्धिवान, ज्ञानी, निश्चयी स्वभावाचा व कांहीसा तापट होता असे दिसते. तत्कालीन ऋषीसमुदयात याची अलौकिक बहुप्रसवा प्रतिभा नावाजलेली होती. वादविवाद व वाङ्मय निर्मितीत त्याला तुल्यबळ असा एकही ऋषी नव्हता. याच्या नावे शुक्ल यजुर्वेदाची संहिता, ब्राह्मण, शतपथ बृह्दारण्यक, बृहदारण्यकोपनिषद, इशावास्योपनिषद व याज्ञवल्क्य स्मृती येवढी ग्रंथसंपदा आहे. येवढे मौलिक वाङ्मय निर्माण करणाऱ्यात याच्या पूर्वी यास व नंतर शंकराचार्य यांचाच उल्लेख करता येईल. याला युगकर्ता व शेवटचा महर्षी म्हणतात, ते योग्यच म्हणावे लागेल.

याचा स्वभाव सडेतोड, निश्चयी आणि अतिशय स्वाभिमानी होता. याच्या स्वाभिमानाच्या कक्षा काहीशा अंहकाराला स्पर्श करणाऱ्या होत्या याबद्दल खालील दोन कथा प्रसिद्ध आहेत :-

याज्ञवल्क्य आणि वैशंपायन - वैशंपायन ऋषी वेदव्यासांच्या प्रमुख शिष्यांपैकी एक होते. व्यासांनी वेदवाङ्मय चार वेदांत विभागल्यानंतर यजुर्वेदाच्या अध्ययन - अध्यापनाची जबाबदारी वैशंपायनाला दिली. एकदा परगावी जावयाचे असल्याने त्यांना विशिष्ट मुहुर्तावर करावे लागणारे प्रायश्चिताचे काम त्यानी सर्व शिष्यांना आपल्या गैरहजेरीत एकत्रितपणे करावयास सांगितले. याज्ञवल्क्य वैशंपायनाचा शिष्यच नव्हे तर भाचाही होता. त्याला आपल्या ज्ञानाचा एवढा अभिमान होता की त्याने आपल्या सहकारी शिष्यांना 'मी माझ्या योग्यतेच्या बलावर सर्व कर्म एकटाच करीन' असं म्हणून मोकळीक दिली. वैशंपायन आश्रमात परतल्यानंतर त्यांना समग्र वृतांत कळला. याज्ञवल्क्याच्या दर्पयुक्त वागणुकीचा त्यांना राग आला व तू आश्रमातून निघून जा व मी दिलेली विद्या परत कर अशी क्रोधाच्या भरात

त्यास आज्ञा दिली. यावर पश्चातापदग्ध होवून क्षमेची याचना करण्याऐवजी त्याने वैशंपायनाकडून शिकलेला यजुर्वेद ओकून टाकला व आश्रमातून निघून गेला. वैशंपायनाला याज्ञवल्क्याने ओकलेली वेद-विद्या वाया जाईल याबद्दल दुःख वाटून आपल्या सत्तावीस शिष्यांना त्यांनी तितिर रूप धारण करून याज्ञवल्क्याचे वमन वेचून घ्यावे अशी आज्ञा केली. तितिरानी टिपलेली विद्या म्हणून वैशंपायनाधीन यजुर्वेद संहितेला तैत्तिरीय संहिता असे म्हणतात. इकडे आपल्या मामाकडून निघून याज्ञवल्क्याने सूर्याची खडतर तपश्चर्या करून त्यास प्रसन्न करून घेतले व त्यात आपणास वेगळा (वैशंपायनाच्या यजुर्वेदाहून वेगळा) यजुर्वेद द्यावा असा वर प्राप्त करून घेतला. सूर्यापासून प्राप्त म्हणून या संहितेस 'शुक्ल यजुर्वेद'; सूर्य अश्वरूपात प्रगट झाला म्हणून या यजुर्वेद संहितेस वाजसनेयी व अश्वलायन संहिता असेही म्हणतात. याला 'शुक्ल' हे नामाभिधान प्राप्त झाल्याने वैशंपायनाच्या यजुर्वेदास कृष्ण यजुर्वेद म्हणण्याची प्रथा पडली असावी. (ही कथा महाभारत पर्व XIIअ ३१९ व विष्णु पुराण भाग III अ ५ या दोन्ही ग्रंथात थोड्या फार फरकाने आली आहे.) जुन्या काळी काही विद्वान आपला अभिमान अहंकाराच्या सीमेला नेऊन भिडवीत असे दिसते. श्रीमद्‌भागवताचे प्रसिद्ध टिकाकार श्रीधरस्वामी यांचा ''व्यासोवेत्ती शुकोवेत्ती राजा वेत्तिनवेत्तिवा । श्रीधर सकलं वेत्ती श्रीनृसिंहकृपा प्रसादन ॥ हा श्लोक किंवा श्रीज्ञानेश्वरांची (ज्ञा. अ. ६ ओ. १४) ''माझा मराठीची बोल कौतुके । अमृतातेही पैजा जिंकी । ऐसी अक्षरे रसिके मिळवीन॥ ही ओवी या मनोवृत्तीची उदाहरणे म्हणून देता येतील. इतर समकालीन विद्वानही या अधिकारी वाणीवर त्यातील बहुतांश सत्यामुळे आक्षेप घेऊ शकले नाहीत. याज्ञवल्क्याच्या बाबतीत त्याच्या अधिकारवाणीचे समर्थन पुढील कथेवरून अधिक स्पष्ट होईल.

विदेहराजा जनकाचा यज्ञ व गोग्रहण :- राजा जनकाने एकदा यज्ञ केला. यज्ञातील वादविवादात सर्वांत श्रेष्ठ वेदवेत्त्याला देण्यासाठी यज्ञमंडपाबाहेर शिंगाला प्रत्येकी दहा पद (त्याकाळचे सोन्याचे नाणे) बांधलेल्या एक हजार गायी उभ्या केल्या होत्या. तेथे याज्ञवल्क्य आला व या गायी येथे कोणासाठी आहेत अशी पृच्छा केली. यज्ञाचा होता अश्वल हा तेथेच होता. त्याने त्याला गायींचे प्रयोजन सांगितले. यावर शांतपणे याज्ञवल्क्य आपल्या शिष्यास म्हणाला. ''हे सामश्रवसा या गायी आपल्या आश्रमाकडे घेऊन चल.'' यावर यज्ञ होता अश्वल व आर्तभाग, भुज्यु, उषस्त चाक्रायण, कहोल, गार्गीवाच-वनवी, उद्यालक - आरुणी, शाकल्य इ. ज्ञानी ब्राह्मणांना याज्ञवल्क्याने शास्त्रार्थ करून हरविले. विशेष म्हणजे ऋषी उद्दालक आरुणी याज्ञवल्क्याचा प्रत्यक्ष गुरुच होता. अशा रीतीने याज्ञवल्क्याने ज्ञानाधिक्यातून अधिकारवाणीने सांगितलेला एक हजार गायी वरील आपला हक्क व्यर्थ वल्गना नसून सत्याधिष्ठित व सर्वतोपरी न्याय्य होता हे सिद्ध केले.

याज्ञवल्क्याचे अद्वैत सिद्धान्तास योगदान :- या विश्वाच्या मुळाशी सर्व शक्तिमान, सर्वस्थित, अविनाशी अशी एक शक्ती आहे या निष्कर्षाकडे जगातील सर्वच विचारवंत आकर्षित झाले. वैचारिक विकासाचे पुढील टप्पे म्हणजेच जीव - जगत-जगदीश्वर यांचे स्वरूप व संबंध येथेपर्यंत मात्र फारच कमी समाज पोचले. उदाहरण म्हणून ग्रीक तत्त्वज्ञांचा विचार करता येईल. ग्रीक तत्वज्ञ सृष्टीचा कर्ता, धर्ता व हर्ता कोणी एक सर्व शक्तिमान तत्त्व असू शकते. येथेपर्यंत पोचलेच नाहीत. उत्क्रान्तीच्या या वाटेवर मनुष्याला मन (PSYCHE) असते येथेच त्यांनी मुक्काम ठोकला. ईश्वर व परमेश्वर यांना समांतर असलेल्या त्यांच्या कल्पना अनेकत्वाने भरलेल्या होत्या. याउलट भारतीय विचारवंत मात्र सृष्टीच्या मुळाशी एकच तत्त्व आहे या निष्कर्षाकडे अतिप्राचीन काळापासून कललेले राहिले. या विचारांची परिणिती अेकेश्वर वादात झाली. दुसऱ्या बाजूने सृष्टीची दृश्य विविधता फसवी आहे; वस्तुस्थितीत ती एकाच तत्त्वापासून बनलेली असून तिला आदि वा अंत लागू असल्याने ती नाशवंत म्हणजेच मिथ्या आहे हा विचारही कालांतराने पक्व झाला. परंतु निर्माण व निर्मिती (परमेश्वर व सृष्टी) यांच्या संबंधाचे निश्चित स्वरूप काय याबद्दल मात्र फार काळ संदिग्धता राहिली. या संबंधाचा रूपकात्मक उल्लेख ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळातील 'अस्यवामिय' सूक्तातील या ऋचेत आला आहे.

द्वा सुपर्णा सयुजा सखाया ।
समानं वृक्षं परिषजाते ।
तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्य ।
नश्नन्नन्यो अभिचाकशीति ॥

अर्थ : 'सोनेरी पंखाचे, मैत्रिच्या बंधानी बद्ध दोन पक्षी एकाच वृक्षावर राहतात. त्यातील एक वृक्षाची स्वादिष्ट फळे (कर्म-फळे) भोगतो परंतु दुसरा फळ न खाणारा - गंभीरपणे (निरपेक्षपणे) केवळ पाहत असतो.' विद्वानांच्या मते वृक्ष हे संसार वृक्ष (गीता अ. १५ श्लोका 'अहं आणि वृक्षस्य रेवीव .....) असून पहिला पक्षी जीवात्मा - अविद्येत गुंतलेला व दुसरा परमात्मा (साक्षी) आहे. हे दोन पक्षी एक असून एकाच आत्म्याचा दोन अवस्था म्हणजेच जीवात्मा व परमात्मा दर्शवितात किंवा हे पक्षी दोन वेगवेगळी तत्त्वे दर्शवितात. यावर तीव्र ... मतभेद असून अद्वैत मत (शंकराचार्य) व द्वैतमत (मध्वाचार्य) यांचा उगम येथूनच झाला आहे. दुसऱ्या स्तरावर ब्रह्मात्म ऐक्य मान्य करणारे काही विद्वान सूक्ष्म ब्रह्म व जडविश्व यातील संबंध इतर अनेक रीतीने वर्णन करतात. एकूण जीव - जगत-जगदीश्वर याचे स्वरूप आणि संबंध याबद्दल भारतीय तत्त्वज्ञानात (आचार धर्मात नव्हे) विशेष करून उच्चस्तरीय तात्त्विक भूमिकेत अनिश्चिततेचे वातावरण होते. समस्या बौद्धिक नसून भावेची होती असे दिसते. जीव - जगत - ब्रह्म यांचे स्वरूप संबंध वर्णन महर्षी उद्दालक आरुणी व याज्ञवल्क्य या समकालीन (व गुरुशिष्य जोडीने) अतिशय समर्थपणे केले. त्यातल्या त्यात, याज्ञवल्क्याची शैली स्पष्ट काटेकोर व अतिशय निःसंदिग्ध असल्याने त्याचाच येथे प्रमुख्याने विचार करू.

ब्रह्म हे एकच आहे. कोणत्याही परिस्थितीत ते अनेक होत नाही. हा विचार अद्वैत मनात अतिशय महत्त्वाचा आहे. हा भाव 'नेह नानास्ति किंचन' (बृ.३५-४-४-१९) मध्ये याज्ञवल्क्याने मांडला आहे. हे वर्णन छांदोग्योपनिषदातील 'एकमेका द्वितिय' (६-२-१) पेक्षाही जास्त काटेकोर व प्रभावी वाटते.

अद्वैतवेदांतातील आत्म - ब्रह्माचा ऐक्याचे प्रभावी प्रतिपादन ऋग्वेदातील ऐतरेय, सामवेदातील छांदोग्य व अथर्व वेदातील मांडुक्योपनिषदात अनुक्रमे 'प्रज्ञानंब्रह्म' 'तत्वमसि' व 'अयमात्मा ब्रह्म' या महावाक्यांत आले आहे. या तिन्हीपेक्षा जास्त थेट, सुटसुटीत व ओजस्वी भाषेत याज्ञवल्क्याने बृ.उ. मध्ये 'अहंब्रह्मास्मि' या महावाक्यात (मधुकाण्ड अ४चा १० वा ब्राह्मण) केले आहे.

अद्वैत वेदांतात आवश्यक असणारा अजून एक मुद्दा म्हणजे विश्व व आत्म्याचे किंवा विश्व व ब्रह्माचे ऐक्य. बृहदारण्यक व ईशावास्योपनिषद सोडून इतरात या मुद्यावरील सर्वांत काटेकोर वचन म्हणजे 'सर्व खल्विदं ब्रह्म तज्जलाननिति'' (छान्दोग्योपनिषद ३-१४-१) होय. याचा अर्थ खरोखर हे सर्व विश्व ब्रह्मच आहे. त्यापासून हे जन्मते, त्यातच विलीन होते व त्यामुळेच याचे पोषण होते. बृहदारण्यकोपनिषदात यापेक्षा जास्त काटेकोरपणे ब्रह्म व विश्वाचा संबंध सांगितला आहे.'' हे वाच ब्रह्मणोरूपे - मूर्त चैवामूर्त च' हे वचन बृ १ अ २ प्रकरण ३ ब्रा १ मध्ये आले आहे व स्थूल व सूक्ष्म ह दोन्ही रूपे ब्रह्माचीच होत असा याचा अर्थ आहे. ब्रह्माचे स्वरूप सांगणे हे अद्वैत

सिद्धान्ताचे एक महत्त्वाचे कार्य आहे. बहुतेक उपनिषदांमध्ये शब्दच्छल करून निर्गुण ब्रह्माचे स्वरूप सगुणसाकाराच्या धर्तीवर सांगण्याची तारेवरील कसरत करण्यात आली आहे. उदाहरण म्हणून कठोपनिषदातील फक्त दोन मंत्रांचा उल्लेख करतो :-

(१) अणोरणीयान महतो महीयानात्मास्य जन्तोर्निहितो गुहायाम ।
तमक्रतुः पश्यतिवीतशोको धातुप्रसादात महिमानमात्मन : २ - २०
(२) तं दुर्दशं गुढमनुप्रविष्टं गुहादितं गह्वरेष्टं पुराणं ।
अध्यात्मयोगाधि गमेन देवं मत्वाधीर । हर्षशाकौ जहाति ॥१२॥

या उलट बृहदारण्यकोपनिषदातील अध्याय २,३ - १० मध्ये "अथात आदेश नेतिनेति ।" हे वचन आले आहे. अर्थ : "म्हणून हे (ब्रह्माचे) वर्णन हे नव्हे, हे नव्हे ! निर्गुण निराकार ब्रह्माच्या वर्णनासंदर्भात यापेक्षा स्पष्ट, सुटसुटीत व जोरदार वर्णन संपूर्ण भारतीय तत्त्वज्ञानपर वाङ्मयात दुसरे कोणतेच नाही. याज्ञवल्क्यकृत ईशावास्योपनिषदातील पहिल्याच मंत्रात (ईशावस्य इदंसर्वं यत्किंच्य जगत्याजगत । तेन त्यतयेन भुंजिथा माग्रधः कस्य खिन्न धनम ॥) हे सर्व विश्व ब्रह्माने वेष्टिले असून याचा लाभ त्यागातून घ्यावा' असे म्हटले आहे. या मंत्रातील त्याग व दुसऱ्या मंत्रातील "कर्मानि लिपाय मान व्हायचे नसेल तर कर्म करीत राहणं हा एकच उपाय आहे" हा आशय एकत्र केल्यास गीतेतील निष्काम कर्म योगाचा हेतू प्राप्त होतो. उपासनेच्या क्षेत्रात रुद्रातील "मा नस्तोके तनये मान आयुषी" (मला पुत्र, पौत्र, पशु,आरोग्य आयु इ. ऐहिक समृद्धी दे.) या मंत्राऐवजी याज्ञवल्क्याने" असतो मा सद्गमय, तमसो मा ज्योतिर्गमय, मत्योर्मामृतं गमय" हा आत्म्याला उन्नयनावस्थेला नेणारा (अभ्यारोह मंत्र) मंत्र बृ.उ.च्या मधुकाण्डातील प्र.३ ब्रा २७ मध्ये सांगून मनुष्याला प्राकृतापासून दिव्याकडे जाण्याचा खात्रीचा मार्ग दाखविला आहे. व याच कांडात "आत्मेत्येवोपासीत" (बृ.१,३,२८) हे विद्यासूत्र देऊन मानव जातीचा तमसाकडून ज्योतीकडे जाण्याचा मार्ग खुला केला आहे. नैतिकतेच्या क्षेत्रात राज्यकर्त्यांनी इंद्रियदमन करावे. पाशवी शक्ती असण्याऱ्यांनी दयेचा आवर आपल्या शक्तिवर घालावा व सामान्य माणसानी आपली संचयवृत्ती दान करून सामाजिक जीवन सुखी व निरामय करावे अशी औचित्यपूर्ण सूचना आपल्या 'दमं दानं दयामिती' या सूत्रात (बृ.५,२-३) देऊन समाजात सामर्थ्यवान, बलवान व धनवान यांनी आत्मसंयमातून सामाजिक संतुलन कसे स्थिर ठेवावे याबाद्दल यथोचित मार्गदर्शन केले आहे.

सामाजिक क्षेत्रात याज्ञवल्क्य स्मृती लिहून गतीमानतेसाठी लागणारी लवचिकता व स्थैर्य व दीर्घायुष्यासाठी आवश्यक असलेली शिस्तबद्धता या सर्व वरकरणी परस्पर विरोधी गुणात संतुलन साधून भारताला एक कार्यक्षम सामाजिक घटना दिली. याज्ञवल्क्य स्मृती बनारस- पूरी या दक्षिणोत्तर रेषेच्या पूर्वेकडील भारतखंडात हिंदु कोड बिल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कायद्यांचा संच अमलात येण्यापूर्वी पर्यंत म्हणजेच १९५८ पर्यंत वापरात होती. विशेष म्हणजे हिंदुकोड बिल अन्वये भारतीय स्त्रियांना व तिच्या इस्टेटीत देण्यात आलेला मुलांच्या बरोबरीचा वारसा हक्क याज्ञवल्क्याने आपल्या स्मृती अन्वये जवळ जवळ पाच हजार वर्षां पूर्वीच दिला होता.

याज्ञवल्क्याने वैचारिक क्षेत्रात पूर्णता, आचार धर्मात संयम व सामाजिक क्षेत्रात स्त्रियांना मानाचे स्थान प्राप्त करून देऊन भारतीय संस्कृतीवर आपला कायमचा ठसा मागे सोडला.

शंकराचार्य -

मानवी जीविताशी थेट संबंध असणाऱ्या 'दुःखे व दुःखाचे निवारण हा मुद्दा मध्यवर्ती असल्याने तसेच करुणेवर भर असल्याने बौद्ध धर्म सामान्य भारतियाला मनोमन भावला वेद केवळ त्रैवर्णी पुरुषांच्याच कानापर्यंत पोचत असल्याने स्त्री शूद्रादि बहुसंख्य हिंदू बौद्ध धर्माकडे आकर्षित झाले. वैदिक शास्त्रातील 'आत्मा-ब्रह्म' या सामान्यांना अनाकलनीय व दैनंदिन जीवनाशी थेट संबंध नसलेल्या विषयाबद्दल बौद्ध धर्माचे संपूर्ण मौन यामुळेही बौद्ध धर्माचा भारतात प्रसार झपाट्याने झाला व तो इसवी सनाच्या आठव्या शतकापर्यंत भारताचा प्रधान धर्म बनला. या उलट वैदिक धर्माचा अनुयायी म्हणविणाऱ्या हिंदू समाजात अनेक मतांतरे व पंथ माजले. शाक्त व तत्सम पंचमकारांचा (मद्य, मदिरा, मास, मैथुन इ.) उघड उघड पुरस्कार करणाऱ्या संप्रदायाचा सर्वत्र सुळसुळाट झाला. या परिस्थितीत शंकराचा जन्म इ.स.७८८ मध्ये अलवाई नदी तीरी असणाऱ्या कलाडी नामक गावात सध्याच्या केरळ प्रदेशात एका वेदशास्त्र संपन्न ब्राह्मण कुळात झाला. वयाच्या तिसऱ्या वर्षी त्यांचे विद्वान पिता शिवगुरू यांचा मृत्यू झाला शंकराचे संगोपन त्याची देवीसमान असणारी माता विशिष्ट देवी हिने केले. शंकराला अलौकिक बुद्धिमत्ता व वैराग्याकडे कल जन्मतःच प्राप होता. एकदा अलवाई नदीत स्थान करीत असता मगरीने याचा पाय धरला. मगर पाय सोडेना तेव्हा तू मला संन्यास घेण्याची परवानगी दिलीस तरच माझा पाय सुटेल असे शंकराने जवळच असलेल्या आईला सांगितले. आईने असहायतेतून शंकराला संन्यासाची परवानगी दिली व चमत्काराप्रमाणे शंकर मगरीच्या जबड्यातून मुक्त झाला. त्यांनतर शंकर गुरूच्या शोधात नर्मदातीरी असणाऱ्या ओंकारेश्वराला गेला. तेथे अनेक वर्षापासून एका गुहेत तप करीत असलेल्या समाधिस्त गुरू गोविंदपाद याना शरण गेला. तू कोण आहेस या गोविंदपादांच्या प्रश्नास शंकराने दिलेल्या उत्तराने अतिप्रसन्न होवून त्यांनी शंकराला पोटाशी धरले व शिष्य म्हणून स्वीकार केला. पहिल्या वर्षी हठयोग, दुसऱ्या वर्षी पातंजल योग व तिसऱ्या वर्षी ज्ञानयोग शिकवून त्यांनी शंकराला सर्व विद्यांत पारंगत केले. आपल्या गुरूबद्दल शंकराला अतिशय प्रेम व आदर होता हे त्याने पुढे चालून रचलेल्या 'भजगोविन्दम्' या द्वयर्थी स्तोस्त्रावरून दिसून येते. यतिन्द्र गोविंद पाद हे माण्डुक्योपनिषदावरील जगद्मान्य टीकाकार गौड पादाचार्यांचे पट्टशिष्य होत.

अध्ययन संपल्यानंतर कोठेतरी एकांत स्थळी राहून आनंदाने संन्यास धर्माचे पालन करावे असे शंकराच्या मनात होते. परंतु गोविंदपादाने यास वेगळीच आज्ञा दिली. वैदिक धर्माच्या पुनर्स्थापनेसाठी तुझा जन्म झालेला असून आस्तिक -नास्तिक हजारो मतांना तू अद्वैत ब्रह्मज्ञानात विलीन करशील. वेदव्यासांच्या ब्रह्मसूत्रांवर भाष्य लिहून अद्वैत वेदान्ताला तू सर्वोच्च स्थानी सुप्रतिष्ठित करशील याप्रमाणे गुरूआज्ञा व आशीर्वाद प्राप्त करून शंकर गोविंदपादांच्या आश्रमातून दिग्विजयासाठी बाहेर पडला. आपल्या गुरूच्या आज्ञेनुसार हा काशीस आला. येथे श्री विश्वेश्वराच्या दर्शनास जात असता चार कुत्र्यांचे दोर हातात धरलेला एक चांडाळ वाटेत आडवा आला. शंकराने त्याला वाटेतून दूर होण्यासाठी सांगितले असता त्याने उलट शंकरास विचारले की तुम्ही आत्म्यास बाजूस हो म्हणत आहात की जड शरीरास; एवढेच नव्हे तर सूक्ष्म आत्मा व जड देह यातील तात्विक फरकही त्याने शंकरास समजाऊन सांगितला. हा चांडाळ म्हणजे प्रत्यक्ष काशी विश्वेवर व त्याचे चार श्वान म्हणजे वेद हे ओळखून शंकराने त्यास साष्टांग दंडवत घातला. अशा रीतीने 'सर्वं खल्विदं ब्रह्म'' या छांदोग्यापनिषदातील (३-१४-१)

शांडिल्य वचनाचा साक्षात अनुभूतीचा नवा प्रकाश अंतरंगात पडून "महादेवमेके स्मरामि स्मरामि ।" हे अलौकिक स्तोत्र याच्या तोंडून बाहेर पडले.

यानंतर शंकराने हरिद्वार, हृषिकेश, व्यासाश्रम, श्रीनगर, रूद्रप्रयाग, बदरीकाश्रम केदारनाथ, ज्योतिधाम, उत्तराकाशी इ. सध्याच्या उत्तराखंड मधील दुर्गम तीर्थांची यात्रा केली. याच काळात त्याने बादरायणाचार्यांचे (वेद

व्यासांचेच दुसरे नाव) ब्रह्मसूत्र, बारा उपनिषदे, भगवद्गीता, विष्णुसहस्रनाम व सनत सुजातीय या सोळा सुप्रसिद्ध ग्रंथांवरील आपले भाष्य पूर्ण केले. या व्यतिरिक्त शंकराने अनेक स्तोत्रे व प्रकरण ग्रंथ नंतरच्या काळात लिहिली. एवढी ग्रंथ संपदा याने अवघ्या बत्तीस वर्षाच्या अल्पायुष्यात ग्रथित केली हा एक चमत्कारच म्हणावा लागेल. वेदव्यासानी उत्तर काशीत शंकराला प्रत्यक्ष दर्शन देऊन त्याकाळचे सुप्रसिद्ध पूर्व मिमांसक कुमारिक भट्ट याच्याशी शास्त्रार्थ करण्याची आज्ञा दिली अशी आख्यायिका आहे. व्यासाज्ञेनुसार शंकराचार्य कुमारिक भट्टापाशी पोचला. तेव्हा आपल्या हातून वादविवादात हरविल्या गेल्याने अनेक गुणी विद्वानांच्या मानभंगातून झालेल्या हिंसेचे प्रायश्चित म्हणून तो तुषाग्नीत प्रविष्ट झालेला होता. त्याने शंकराशी वादविवाद करण्याची शक्यता नाकारून त्याला आपला महिष्मती येथील पट्ट शिष्य मंडन मिश्राशी वादविवाद करण्यास सुचविले. तेथून शंकराचार्य महिष्मती येथे गेला व मंडन मिश्राशी वादविवाद करून त्यास हरविले. मंडन मिश्र सुरेश्वर हे नाव धारण करून शंकराचार्यांचा शिष्य बनला. या नंतर शंकराचार्यांने भारत भ्रमण करून इतर आस्तिक व नास्तिक अशा सर्व मतांतरांच्या ज्येष्ठ आचार्यांना शास्त्रार्थ करून हरविले व अद्वैत वेदान्ताचे श्रेष्ठत्व भारतभर पुनःप्रस्थापित केले.

शंकराचार्यांचे अद्वितीय कार्य -

तात्विक चिंतन - शंकराने मायावादाचा पुरस्कार करून मानवी दुःखाचे खरे कारण विश्वाचा निर्माता ब्रह्म नसून मायेमुळे मनुष्याला ग्रासणारे अज्ञान (अविद्या) होय हे बुद्धीला थक्क करणारा युक्तिवाद वापरून सिद्ध केले. असे केल्याने दुःखमय जगत निर्माण केल्याच्या आरोपापासून ब्रह्म मोकळे झाले व साक्षी म्हणून मांडुक्योपनिषदात वर्णिलेली ब्रह्माची अवस्था अबाधित राहिली. यातून बौद्ध धर्माच्या दुःख मिमांसेशी तुल्यबळ अशी दुःख निर्मितीचा दोष मनुष्य व माया यावर लादणारी नवी मिमांसा उभी राहिली. शंकराचार्यांनी त्यांच्या केवळ अद्वैत मताला 'केवळ अर्ध्या श्लोकात सूत्रबद्ध करून सामान्य माणसालासुद्धा कळेल अशा सुटसटीत शब्दात मांडले. याबद्दल त्यांच्या "ब्रह्मज्ञानवल्ली माला" या स्तोत्रातील खालील श्लोक प्रसिद्ध आहे.

> "श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तं ग्रंथकोटिभिः।
>
> ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या जीव ब्रह्मैव ना परः ॥

(२) भगवान गौतम बुद्धाला विष्णूचा नववा अवतार जाहीर करून बुद्ध विरोधकांना निष्प्रभ केले.

(३) हिंसेचा निषेध करून बौद्ध तत्वज्ञानातील करूणेला वैदिक धर्मात मानाचे स्थान प्राप्त करून दिले.

अशा रीतीने बौद्धधर्म व वैदिक हिंदुधर्म यातील तात्विक अंतर कमीतकमी करून धर्मांतर करून बौद्ध धर्मात प्रविष्ट झालेल्यांना परतीची वाट सोपी व मोकळी करून दिली. संन्यासाचे बौद्ध धर्मातील जाचक प्राबल्यही या उलट दिशेच्या लोंढ्याला कारणीभूत ठरले असे अनेक विद्वानांचे मत आहे.

धर्मसंघटना - हिंदू धर्माला कोणतीही संघटना नसल्याने त्यातील वैचारिक व लौकिक मतभेद विचार मंथनातून मिटण्याऐवजी नव्या पंथोपपंथाचे व संप्रदायाचे स्वरूप धारण करून मूळ समाजापासून फुटून निघतात. हिंदू समाजाचा हा घसारा थांबविण्यासाठी धर्माला तात्विक वैचारिक व लौकिक दृष्टिकोनातून एकात्म व एकसंधी बनविण्यासाठी शंकराचार्यांनी उत्तरेला ज्योर्तिमठ, पूर्वेला जगन्नाथ पूरी, पश्चिमेला द्वारका व दक्षिणेला रामेश्वर येथे शंकराचार्यांची ज्ञानपीठे निर्माण करून तेथे अनुक्रमे आपले ज्येष्ठ शिष्य वोटकाचार्य, पद्मपादाचार्य, सुरेश्वराचार्य व हस्तमलकाचार्यांची मठाधिपती म्हणून नेमणूक केली. हे चारही मठ मिळून आपापल्या क्षेत्रातील (एकूण सर्व भारत भूमीतील) लोकांच्या अधात्मिक, धार्मिक व सामाजिक जीवनात एकात्मता, धर्मपालन व अद्वैत वेदान्त निष्ठेचे कार्य अविरत चालू राहण्यासाठी झटणार होते. धर्म सुसंघटित व कार्यक्षम राहण्यासाठी शंकराचार्यांनी निर्मिलेली व्यवस्था तर आवश्यक असतेच परंतु त्या व्यवस्थेला लौकिक शक्ती (SECULAR POWER) ची साथही तितकीच जरुरी असते. शंकराचार्य हिंदू धर्माला संघटना देऊ शकले. परंतु हिंदुसमाज त्या संघटनेसाठी अत्यावश्यक अशी हिंदू राजसत्ता पुरवू शकला नाही. शंकराचार्यांचा इ.स. ८२० मध्ये मृत्यू झाल्यानंतर केवळ दीड शतकात भारतावर मुसलमानी राज्य आले. त्यांनी हिंदुंच्या धार्मिक, सामाजिक व लौकिक अशा सर्व संस्था नेस्तनाबूद केल्या. वीरवृत्तीचा अभाव, आपसातील दुही इ. कमजोऱ्यांमुळे हिंदू समाज विस्कळीत व मुसलमानाच्या दास्यत्वात भूषण मानणारा पुरुषार्थ शून्य असा माणसांचा जमाव बनला. अशा स्थितीत हिंदू धर्माच्या सुसंघटीत अवस्थेचे शंकराचार्यांचे स्वप्न अपुरेच राहून गेले. शंकराचार्यांची चार पीठें अजूनही नाममात्र शिल्लक आहेत. त्यांची सद्यस्थिती सोन्याचा मुलामा निघून गेलेल्या पितळी अलंकाराप्रमाणे निष्प्रभ व अंगास भार अशी झाली आहे.

सामाजिक सुधारणा : बौद्ध धर्मातील व्यक्तिगत शालीनतेवरील भरामुळे शंकराचार्य बरेच प्रभावित झालेले दिसतात. हिंदू समाजात यज्ञ नैमित्तिककर्म, रूढी इ. गोड नावाने शिरलेल्या अनेक क्रूर व अशिष्ट चालीरीतीना शंकराचार्यांनी पायबंद घातला. त्यांनी पाच अनिष्ट रूढी बंद केल्याबद्दल एक श्लोक प्रसिद्ध आहे तो असा :-

> अश्वालंभ गवालभं सन्यासं पल पैत्रकं ।
>
> देवराच्च सुतोत्पत्ती कलौ पंच विवर्जयेत ॥

यज्ञात अश्वबळी देण्याची क्रूर प्रथा आचार्यांनी बंद केली. लग्नानंतर जामात जेव्हा श्वशुरगृही पहिल्यांदा येई तेव्हा घराच्या उंबरठ्यावर त्याच्या हाती एक काल्हवड (गाईचे स्त्री लिंगी वासरू) बली देण्याचा प्रघात सर्वत्र होता; शंकराचार्यांनी तो बंद केला. केरळ प्रांतात आर्यांची (अय्यर संख्या) अगदीच कमी असल्याने व मातृक गोत्र विवाहसाठी तीन पिढ्या वर्ज्य असल्याने मुलांच्या लग्नात अडचणी येत. यावर इलाज म्हणून त्या प्रदेशात आर्य घरातील फक्त ज्येष्ठ पुत्रच (आर्य वधूशी) विवाह करीत. इतर पुत्र औपचारिक संन्यास दीक्षा घेत पण अनार्य कुळातील स्त्री अंगवस्त्र म्हणून ग्रहण करून संसार करीत. या संकरापासून प्राप्त संततीस नायर, पिल्ले मेनन अशी नावे पडली.ही प्रथा शंकराचार्यांनी बंद केली. पितरांचा नैवेद्य म्हणून श्राद्ध पक्षात ब्राह्मण कुळातही मद्य व मांस सेवन करण्याची प्रथा आचार्यांनी मोडीत काढली. विनापत्य विधवांना पितरांच्या मुक्तीसाठी आवश्यक म्हणून पुत्र प्राप्तीसाठी आपल्या दिराशी संग करण्याची प्रथा (नियोग) भारतात सर्वत्र प्रचलित होती तीही शंकराचार्यांनी बंद केली.

शंकराचार्यांनी भारतीय तत्त्वज्ञानाला समृद्ध केले, हिंदू समाजाला पुनरूज्जीवन प्रदान करून व्यक्तिगत आचार धर्माला शुद्ध शुचिर्भूत व निमित्तेच्या उच्चतम शिखरावर पोचविले. असा भक्ती, वैराग्य, ज्ञान-संपन्न सुपुत्र भारत मातेला यापूर्वी झाला नाही व कदाचित यापुढेही होणार नाही.

समर्थ रामदास स्वामी - नारायणांचा जन्म गोदावरी तीरावरील जांब मुक्कामी सूर्याजीपंत ठोसर व राणुबाई यांच्या उदरी दि. १४.३.१६०८ ला झाला. सूर्याजीपंताचे कुटुंब परंपरेने आदित्योपासक असून ते स्वतः जांबचे कुलकर्णी होते. शेतीवाडीमुळे घरची सुस्थिती होती व सूर्याजी व राणुबाई दोघेही गृहस्थ-धर्माचे काटेकोर पालन करणारे असल्याने घरात शुचि व श्री या दोहोंचेही वास्तव्य होते. नारायणाच्या मनाच्या जडण घडणीत घरातील वातावरणाचा स्पष्ट ठसा उमटला होता. आठ वर्षाचा असताना एका अंधाऱ्या खोलीत बसून कसचा विचार करतोस या मातोश्रीच्या प्रश्नास " चिंता करितो विश्वाची" या नारायणाच्या उत्तरात त्यांच्या पुढील जीवन व कार्याचे संपूर्ण

चित्र दिसते असे म्हटल्यास अतिशयोक्त होणार नाही. निकटवर्तीय कुटुंबियांव्यतिरिक्त इतर कुणी नारायणाचे बालपणी व्यक्तिमत्त्व घडविले याबद्दल त्याचे चरित्रकार मौन बाळगून आहेत. पण येवढे मात्र सूर्यप्रकाशाइतपत स्पष्ट दिसते की भक्ति-वैराग्य आणि ज्ञानाची लालसा कोवळ्या वयातच नारायणाच्या मनात मूळ धरून फोफावत होती. वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी स्वतःच्या लग्न मंडपातून मंगलाष्टकातील 'सावधान' चा घोष ऐकून तो खऱ्या अर्थाने सावधान झाला व पळून गेला.

गोदातीरी पायी चालत, हालअपेष्टा भोगत नारायण शेवटी नाशिक जवळील टाकळी मुक्कामी आला. तेथे १२ वर्षे तप केले व याकाळात नाशिकमधील निरनिराळ्या देवळात चालणाऱ्या ज्ञानसत्रातून श्रवण भक्तिने आपले ज्ञान पूर्णत्वाला पोचविले. नारायणाने कोणती व्यक्ती आपला गुरू म्हणून स्वीकारल्याचे दिसत नाही. प्रत्यक्ष रामच आपले गुरू आहेत अशी त्याची श्रद्धा होती व कदाचित म्हणूनच तो स्वतःच 'रामदास' या नावानेच उल्लेख करू लागला टाकळीत असतानाच त्याने 'करुणाष्टके' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पद्य-रचना केल्या. टाकळी येथील तपश्चर्या मनाप्रमाणे संपूर्ण झाल्यानंतर आपल्या जीवन कार्याची तयारी म्हणून रामदासांनी भारत-भर बारा वर्षे भ्रमंती केली. या समाज निरिक्षणात समाजाची सर्व सुख-दुःख, कमजोरी व सामर्थ्य व हिंदूंची वाईट अवस्था होण्याची कारणे त्यांनी समजून घेतली व परत महाराष्ट्रात येऊन पश्चिम महाराष्ट्राला आपली कर्मभूमी म्हणून निवडले. समर्थ रामदासांचं उर्वरीत छत्तीस वर्षांचे आयुष्य भक्ती, तप, समाज प्रबोधन राजकारण व ग्रंथनिर्मिती यासाठी चाफळ, शिवथरघळ व सज्जनगड येथेच वेचले गेले. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्यरुपी आनंदवनभुवनाचे साकार झालेले स्वप्न पाहून समर्थ रामदासांनी शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर अल्पकाळातच सज्जनगड मुक्कामी त्र्याहत्तराव्या वर्षी देह ठेवला.

ज्ञानेश्वर नामदेवापासून सुरू झालेली संत परंपरा पूर्ण भारतभर पसरली. मुसलमानी अमलाखाली भरडल्या जाणाऱ्या हिंदू जनतेला धीर देऊन हिंदू देवता धर्म व हिंदू जीवन पद्धतीवरील त्यांची निष्ठा व श्रद्धा अबाधित ठेवण्याचे अतिशय बिकट कार्य संतांनी अतिशय समर्थपणे केले. साधन म्हणून भक्ती व सदाचार या दोन सूत्रांचा प्रचार व प्रसार इतिहास थक्क होऊन जाईल इतक्या प्रभावी रीतीने केला. मुसलमानी बादशहांचे ऐश्वर्य व कतुर्मकर्तुम अशा सामर्थ्यांने डोळे दिपून हिंदू समाजातील दलित वर्ग मुसलमान बनता तर नवल वाटले नसते.

भारताच्या भोवतालच्या देशात असा प्रकार घडला आहे. संत प्रभावळ हे महान कार्य करीत असता देशाच्या स्वातंत्र्याकडे किंवा इतर सर्व आश्रमांचा पाया असणाऱ्या गृहस्थाश्रम धर्माचरणात झालेल्या अवनतीकडे लक्ष पुरविणे परिस्थिती दोषामुळे त्यांना शक्य झालेले दिसत नाही. समर्थ रामदासांनी मात्र समाजाची अध्यात्मिक उन्नती साधण्याबरोबरच धर्मरक्षण, समाजरक्षण आणि हिंदू जीवन पद्धतीचे जतन या सर्व निकडीच्या बाबींकडे प्रतिकूल परिस्थिती असूनसुद्धा लक्ष देऊन मरगळलेल्या हिंदू समाजाला पुनःचैतन्यमय, ज्वलंत व दिग्विजयी राष्ट्र बनविण्यासाठी महाराष्ट्रव्यापी चळवळ उभी केली.

समाज प्रबोधन - समर्थांनी आपल्या आयुष्यात सात हजाराच्यावर ओव्या असलेला ग्रंथराज दासबोध लिहिला. तसेच क्राऊन साइझची नऊशे छापील पाने भरतील येवढे इतर पद्यात्मक साहित्य निर्माण केले. हे सर्व साहित्य बोधपर आहे. संत परंपरेला अनुसरून यातील अर्धा भाग, भक्ती, ज्ञान, वैराग्य, मोक्षसाधन इ. विषयांना वाहिलेला असला तरी उर्वरित अर्धा भाग प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष ग्रहस्थ धर्म कसा नेटका पाळावा याबद्दलच्या सूचनानी भरलेला आहे. ''संसार करावा नेटका'' हे घोषवाक्य समर्थांनी घरोघरी पोचविले. गृहस्थाश्रम फलदायी होण्यासाठी अथक प्रयत्न आवश्यक असतात हा मुद्दाही समर्थांनी 'यत्न तो देव जाणावा' या घोषवाक्या करवी प्रत्येकाच्या मनात ठसविला.

हिंदू जीवन पद्धतीची बळकटी - हिंदूचे सामाजिक जीवन मंदिरांच्या भोवती गुंफलेले असते. महाराष्ट्रात मुसलमानी अंमल स्थिर झाल्यानंतर हिंदूंची मंदिरे व इतर धार्मिक संस्था पद्धतशीरपणे नष्ट करण्यात आल्या. अशा रीतीने संघ शक्तीनष्ट झाल्याने हिंदू समाज विस्कळीत व दुबळा बनला. गावोगावी पीरांच्या कबरी आल्या व हिंदू लोक मनोभावाने त्यांची पूजा व उरूस साजरे करू लागले. पीर गावचे ग्राम दैवत बनले. रामदास स्वामींना हे रूचले नाही. त्यांनी महाराष्ट्रभर प्रवास करून गावोगावी मारोतीची म्हणजे शक्तिदेवतेची मंदिरे व आखाडे स्थापन केले. समाज एकात्म बनविण्यासाठी या मारुती मंदिराचा व आखाड्याचा फार उपयोग झाला. समाज आपोआपच शक्तिउपासनेकडे वळला.

समाज जागृती - मुसलमान फौजांचे लागोपाठ यश व हिंदू सैन्याचा नित्य पराभव व शरणागती पाहून सामान्य हिंदुच्या मनात आपण कधीही मुसलमाना विरुद्ध युद्ध जिंकू शकणार नाही व हिंदू राज्य कधीच प्रस्थापित होऊ शकणार नाही असा न्यूनगंड निर्माण झाला होता. अशा मरगळ घेतलेल्या समाजात नवचैतन्य निर्माण करून छ. शिवाजी महाराजांच्या अपूर्व अशा यशस्वी स्वातंत्र्य संग्रामाला पूरक अशी विजिगीषू समाज निर्मितीची चळवळ महाराष्ट्रात सुरू करण्याचे श्रेय समर्थांना द्यावेच लागेल.

धार्मिक संघटन हिंदू समाजाला धार्मिक बाबतीत निर्णायक नेतृत्व देऊ शकेल, धर्माची एकात्मता उच्च स्तरावर राखू शकेल व सामान्य जनांचे दैनंदिन जीवन आचार धर्माच्या चौकटीत ठेवण्यास मार्गदर्शन करू शकेल अशी कोणतीही संघटना हिंदू धर्माला कधीच अभिप्रेत नव्हती. शंकराचार्यांनी अशी व्यवस्था निर्माण केली होती. परंतु राजाश्रयाविना ती अकार्यक्षम ठरली. समर्थांनी लवकरच केव्हा तरी स्वराज्याची स्थापना होईल या आशेवर पुन्हा एकदा हिंदू धर्मासाठी संघटना निर्माण केली. त्यांनी अल्पावधीत अकराशे मठ स्थापन करून तेथे निरनिराळ्या जातीचे व लिंगाचे महंत नेमले. मठांचे कार्य व महंताच्या जबाबदाऱ्या याबद्दलचे सविस्तर नियम बनविले व त्यांच्या काटेकोर पालनावर भर दिला. दुर्दैवाने स्वराज्याला शांतता व स्थैर्य न लाभल्याने व स्वतः रामदासांचे उत्तराधिकारी त्याच्यासारखे तडफदार व अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे नसल्याने या संघटनेला समाजाचा हार्दिक पाठिंबा मिळाला नाही व कार्यक्षमतेअभावी मठाचे चळवळ क्षीण होऊन जवळ जवळ नष्ट झाली.

समर्थांचे वैशिष्ट्य एवढेच नाही की त्यांनी संताच्या पारंपारिक कार्यक्षेत्राबाहेर जाऊन समाजाला व्यक्तिगत; जीवनात यशस्वी गृहस्थाश्रमाचे, धार्मिक जीवनात संघटित एकात्मतेचे व सामाजिक क्षेत्रात स्वराज्याचे महत्त्व पटवून देऊन कार्यप्रवण केले व चारशे वर्षांनंतरही जिचा जोर ओसरला नाही अशी चिरस्थायी चळवळ निर्माण केली ही चळवळ अशीच जोमदार रीतीने पुढे चालू राहील कारण त्यांच्याच शब्दात म्हणायचे तर, सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे । परंतु तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे ।।

- श्री शिवाजी माधव चौधरी
मधुबन प्लॉट क्र. ८ माजी सैनिक सोसायटी,
भारती विद्यापीठाजवळ पौड रोड,
पुणे - ४११ ०३८

• • •

रामदासांचा भक्तियोग

- डॉ.मंगला वैष्णव



रामदासांचे वेगळेपण -

संतसाहित्य परंपरेत समर्थ रामदासांचं साहित्य आणि संत म्हणून रामदासांचं वेगळेपण, संतांच्या मांदियाळीत प्रकर्षाने लक्षात येतं. रामदासांनी 'प्रपंच - परमार्थ एकेठायी बांधून' चांगलं जीवन जगण्याचं सुंदर रसायन लोकांना उपलब्ध करून दिलं. लोक समुदाय संघटित असणं, प्रयत्नांना देव मानणं, भोंदूगिरी आणि आळशीपणाची चीड आली पाहिजे ही विचारसरणी रामदास सांगतात. भक्ती मानवी जीवनाचा सहजभाव असावी, हे सांगणारे रामदास अध्यात्म, समाजकारण, राजकारण, शिक्षण, कला, शिस्त या विषयीही अतिशय तळमळीने आपले विचार व्यक्त करतात. वैयक्तिक प्रपंचात न अडकता ते विश्वप्रपंचाची चिंता लीलया वाहतात. सावधपण, निश्चय, विवेक वैराग्य, शक्ती, बल, संघटन या विषयी सखोल चिंतन करून त्याचं महत्त्व समाजासमोर तळमळीने मांडतात.

समर्थ रामदास बहुआयामी व्यक्तिमत्व होते. या व्यक्तिमत्वात इंद्रधनुष्याचे विविध रंग दडलेले आहेत. त्याची मोहकता, दिव्यता आणि तेजोमयता समाजावर त्या काळात मोहिनी घालताना दिसते. नराचा नारायण होऊ शकतो. त्या दृष्टीने आपण प्रयत्नशील राहिले पाहिजे असे त्यांना वाटते. त्यांचं जीवन कृती - उक्तीच्या साच्यातून घडलं गेलं आहे. रामदास हे मध्ययुगीन महाराष्ट्राला पडलेले एक लोभसवाणं स्वप्न आहे. त्या काळातील समाजातील भीती, दुःख, दारिद्र्य, उदासीनता, वैफल्य, निष्क्रियता, रामदासांना अस्वस्थ करते. त्यासाठी ते योजना आणि कृती यांची सांगड घालतात. समाज बदलावयाचा असेल, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करावयाचा असेल तर समाजाच्या डोळ्यावर असलेलं अज्ञान आणि कर्मकांड याचं झापड दूर करणं आवश्यक आहे याची जाणीव त्यांना झाली. समाजाचं अज्ञान दूर करणं आवश्यक होतं, समाजमनाचा आत्मविश्वास जागा करणं गरजेचं होतं, स्वतःच्या वागण्यातून लोकांना मार्ग दाखविण्याची गरज त्यांनी मान्य केली. आपल्या वागण्यातून, विचारातून आणि कृतीतून त्यांनी लोक जागे करण्याचा प्रयत्न केला. समाज शिक्षकाची भूमिका बजावली. स्वोद्धाराचा मार्ग लोकांसमोर ठेवला आणि लोकोद्धार करण्याचे ध्येय मनी बाळगले. यासाठी श्रद्धा आणि भक्ती यांची सांगड घातली पाहिजे हे जाणून घेतले. 'आधी केले मग सांगितले' असा आदर्श लोकांसमोर ठेवला. सर्वजनांना बरोबर घेण्यासाठी सर्वांना रुचेल, पचेल, आकलन होईल असा भक्तीचा मार्ग सांगितला. भक्ती ही वृत्ती झाली की मानवी जीवनात परिवर्तन होऊ शकते, समाजात बदल घडू शकतो. या निष्ठेने रामदासांनी 'भक्तीची' भलावण केली. त्या काळात समाजाला नवा विचार, नवी दिशा, दाखविणारा कुणी शिक्षक, नेता याची नितांत आवश्यकता होती. कारण परधर्मीय आणि परकीय राजांच्या मनमानी वागण्याने त्या काळातला समाज स्वतःस पूर्णपणे विसरला होता.

परिस्थितीची होरपळ -

रामदासकालीन समाज संपूर्णपणे पोखरला गेला होता. परधर्मीय आणि परकीय मूठभर लोकांच्या हातात सत्ता होती, ती स्वकीयांना भारी होती. स्वकीय मोकळेपणाने श्वासही घेऊ शकत नव्हते. आपला धर्म, कर्तव्य, इच्छा, विचार उघडपणे व्यक्त करू शकत नव्हता. धर्माला ग्लानी आल्यासारखी स्थिती झाली होती. राज्यकर्ते मनमानी करीत होते, धर्मप्रचार करण्याचा जणू चंग त्यांनी बांधला होता. स्त्रियांची अब्रू लुटणे, त्यांना जनानखान्यात दाखल करून घेणे यात त्यांना महनीय पुरुषार्थ वाटत होता. या अशा परिस्थितीचे अवलोकन रामदासांनी केले. हे बदलण्यासाठी काय करता येईल याचा विचार केला. माणसं संघटित झाली पाहिजेत ती प्रयत्नशील आणि कृतीप्रवण झाली पाहिजेत, त्यांच्यातील आत्मविश्वास जागा व्हायला पाहिजे त्यासाठी काय करता येईल याचा सखोल विचार समर्थ रामदासांनी केला. लोकांना एकत्र आणण्यासाठी देव, देश, धर्म आणि भाषा यापैकी कोणती तरी एक गोष्ट आवश्यक असते याची कल्पना रामदासांना असल्यामुळे त्यांनी लोकांना एकत्र आणण्यासाठी 'पहिले हरिकथा निरूपण' हे सांगितले. 'भक्तीचेनि योगे' सर्वजण एकत्र येऊ शकतील आणि आपण काही ठोस कार्य करू शकू असे त्यांना वाटल्यामुळे भक्तीयोगाचे स्पष्टीकरण रामदास 'दासबोधात' करतात. भक्तीचा महिमा सांगताना रामदासांना उचंबळ येतो. कारण रामदास भक्त होते. घराण्यात भक्तीची चालत आलेली परंपरा होती. मारुतीची उपासना ते करीत होते. रामरायाचा आपल्यावर अनुग्रह होईल असा विश्वास त्यांना वाटत होता. रामदासांनी नंदिनी आणि गोदावरीच्या संगमावर वसलेल्या टाकळी या गावी बारा वर्षे अविरत आणि निष्ठेने तपश्चर्या केली होती. रामरायाला आळविले होते. रामरायाने आपल्याला अनुग्रह द्यावा ही तळमळ त्यांच्या मनात होती. रामरायाच्या केवळ आठवानेही ते व्याकुळ होत असत. "तुजविण रघुनाथा लोचनी नीर लोटे" अशी त्यांची अवस्था होई. तुझ्या वियोगे सर्व व्याकुळ काया" असे म्हणणाऱ्या रामदासाना ज्या वेळी रामरायाने दर्शन दिले त्या वेळी त्यांचे मन पुलकित झाले.

सर्वांना समजाविण्यासाठी, स्वतःचे विचार लोकांपर्यंत नेणे सुलभ व्हावे म्हणून रामदासांनी 'दासबोध' हा ग्रंथ लिहिला. ह्या ग्रंथ निर्मितीचे प्रयोजन रामदासांनी सुरुवातीस सांगितले आहे. ते म्हणतात -

"ग्रंथा नाम दासबोध । गुरुशिष्याचा संवाद
येथे बोलिला विशद । भक्ति मार्ग ॥'१-१.२
"भक्तिचेनि योगे देव । निश्चये पावती मानव ।
ऐसा आहे अभिप्राव । इये ग्रंथी ॥१-१.४"

दासबोध या ग्रंथात 'मुख्य भक्तीचा निश्चयो सांगितला आहे. वर वर परखड विचारसरणीचे वाटणारे, बोलणे स्पष्ट असलेले रामदास भक्तीविषयी बोलताना, स्वानुभव कथन करताना अतिशय मृदू आणि ऋजू झाल्याचे जाणवतात. त्यांना देव सखा, जिवलग वाटतो, त्याच्या प्राप्तीसाठी वाटेल ते

प्रयत्न करण्यास ते तयार असतात. भक्तीच्या सूत्रात रामदासांनी वैराग्य, परमार्थ, शुद्धज्ञान, आत्मस्थिती, अध्यात्म - निरुपण, उपासना, साधना, तपश्चर्या, तीर्थयात्रा इत्यादी गोष्टी बांधल्या आहेत. भक्तीविषयी विवेचन करताना त्यांची वाणी, त्यांची लेखणी उत्साहाने काम करते.

दासबोधातील चौथा दशक भक्तीमाहात्म्य सांगणारा आहे. त्यासाठी महाभागवत पुराणातील एका श्लोकाचा आधार घेतला आहे आणि मुक्त भाष्य करतात. "श्रवणं, कीर्तनं, विष्णोः स्मरणं, पादसेवनम् अर्चनं, वंदनं, दास्यं, सख्यं, आत्मनिवेदनम्"

भक्तीचे दुसरे नाव आहे 'प्रेम'. नारद सर्वश्रेष्ठ भक्त मानले जातात. त्यांनी 'नारदीय भक्ति सूत्रात' "सा तु अस्मिन परम प्रेम रूपा" अशी भक्तीची व्याख्या केली आहे.

ईश्वर प्राप्तीचे चार मार्ग आहेत. १. कर्मयोग २. भक्तियोग ३.ज्ञानयोग ४. राजयोग. कर्मनिष्ठेत कर्मयोग आणि भक्तियोग अंतर्भूत आहेत तर ज्ञानयोग आणि राजयोग सांख्यनिष्ठेत अनुस्यूत आहेत. सर्वसामान्य माणूस भावनेच्या आधारावर प्रपंच करीत करीत जगत असतो. भावनेचे उदात्तीकरण भक्तीत होते. प्रपंच करीत, विहित कर्मे करीत करीत भक्तीची वाटचाल करता येते. संन्यासी ब्रह्मचारी यांना योगमार्ग लाभदायक ठरू शकतो. या चारही मार्गात 'मीपणाचा' निरास महत्त्वाचा आहे. अहंभावाचे विसर्जन, भक्तीचा मार्ग सुलभ करते. भक्ती म्हणजे काय ? भगवत भजन म्हणजे काय या श्रोत्यांच्या प्रश्नास उत्तर देताना रामदास म्हणतात, "नवविधा भजन, सावध होऊन ऐका." भक्तीचे विवरण करताना रामदास भजन म्हणजे भक्ती असे प्रतिपादन करतात. भज म्हणजे रस घेणे, तल्लीन होणे, ईश्वराचा तल्लीन होऊन रस घ्या म्हणजे भक्ती होय. तल्लीन याचा अर्थ त्याच्यात लीन, समरस व्हा म्हणजे आपले वेगळे स्वतंत्र अस्तित्वच विसरा. ईश्वराच्या कथा ऐकाव्या, त्याचे गुणगान गाताना स्वतःस विसरावे. ईश्वराचा गुण महिमा ऐकावा, मनात ठसवावा, कथा, कीर्तन, प्रवचन, भजन, पूजन यात रममाण व्हावे.

भजन म्हणजे भक्ती हे सिद्ध करताना रामदासांनी तल्लीन होण्यास सांगितले आहे. आणखी दोन प्रकारांनी भक्ती सिद्ध होऊ शकते.

भागो भक्ती -प्रत्येक व्यक्ती ईश्वराचाच एक भाग (अंश) आहे याची जाणीव ठेवणे म्हणजे भागो भक्ती. मी देवाचा आहे याचे विस्मरण होऊ देऊ नये. माझे स्वतःचे काही नाही, काही नसते याचे भान या भक्तीत असणे आवश्यक आहे. मी आणि ईश्वर वेगळे आहेत असे अज्ञानाने वाटत असते. त्यामुळे दुःख होते. ते अज्ञान दूर करून मी ईश्वराचाच आहे ही जाणीव भागो भक्तीत असते.

भंजन भक्ती -

ईश्वर चरणावर अहंपणाचा बळी देणे, अहंपणा भंजन करणे, फोडणे, तोडणे यात असते. जर सर्व विश्व ईश्वराचे आहे तर या विश्वातील अंश असलेला मी वेगळा असूच शकत नाही. याचे ज्ञान होणे म्हणजे भंजन भक्ती होय.

भक्तीविषयी सविस्तर विवेचन केल्यानंतर रामदास नवविधाभक्तीपैकी प्रत्येक भक्तीचे विवेचन स्वतंत्रपणे समजावतात. भक्तिमार्ग हा सर्वांनाच आत्मसात करता येण्यासारखा मार्ग आहे. वारकरी संप्रदायाने तर ह्याच मार्गाचा आधार घेतला, सर्वांना सामावून घेण्यासाठी भक्ती परीणही. रामदासांनीही भक्तीला उचलून धरले, तिचाच पुरस्कार केला.

संसार त्याग न करिता । प्रपंच उपाधि न सोडिता । जनामध्ये सार्थकता जविचारेचि होय ॥"

सर्वांनी भक्ती करावी. आपल्या स्वभावाप्रमाणे त्या त्या भक्तीचा स्वीकार करून स्वोद्धार करून घ्यावा. पण ईश्वरात तादात्म्य पावावयाचे असल्यास भक्तीच्या सोपानाच्या पायऱ्यांवरून साधकाने जाणे आवश्यक आहे. त्या ९ पायऱ्यांचा म्हणजेच ९ भक्तींचा विचार आपण आता समजून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

श्रवण -

"**श्रवणं कीर्तनम्**" हा श्लोक भागवत महापुराणात आहे. नवविधाभक्तीमध्ये श्रवणाला प्रथम क्रमांक दिला आहे. आध्यात्मिक उन्नती साधण्यासाठी 'श्रवण' फार महत्त्वाचे आहे. श्रवण भक्तीचा श्रेष्ठ भक्त म्हणून राजा परिक्षितीचा उल्लेख केला जातो. भागवत कथा कथन करणारे शुकमुनी आणि श्रोता परिक्षित अशी जोडी सर्वश्रुत आहे. श्रवणाने परिक्षितीला मोक्ष प्राप्त झाला. त्याचा उद्धार झाला. एवढी किमया श्रवणभक्तीची आहे.

"प्रथम श्रवण ऐसे जाण । हरिकथा, पुराण, श्रवण ।
नाना अध्यात्म निरुपण । ऐकत जावे ॥ दा. ४-१-७.

रामदासांनी श्रवणाला महत्त्व दिले आहे. श्रवणाने श्रोत्याची मानसिकता तयार होते, त्याचे मन एकाग्र होण्यास श्रवणाचा उपयोग होतो. श्रवणाने श्रोता बुहश्रुत होतो. श्रोता ज्ञान प्राप्त करून घेऊ शकतो. श्रवणाने श्रोत्यासाठी ज्ञानाची कवाडे खुली होतात. त्यासाठी रामदास श्रोत्यांना काय ऐकावे, काय श्रवण करावे यासाठी सूचना देतात. प्रवचन, कीर्तन, आध्यात्मिक निरूपण ऐकावे. यामुळे श्रवणाची गोडी लागते. त्यानंतर रामदास चौथ्या समासातल्या पहिल्या दशकात ओवी क्रमांक ८ ते ३२ व्या ओवी पर्यंत काय ऐकावे याचे सविस्तर वर्णन करतात. कर्म, उपासना, ज्ञान, योग, व्रत महिमा, तीर्थ महिमा, ललितकलाविषयीचे ज्ञान, सर्व ऐकावे. ऐकल्याने साधकाची बैठक तयार होते, त्याच्या ठिकाणी साधक -बाधक विचार करण्याची प्रवृत्ती निर्माण होते. हे सारे सांगताना रामदास श्रोत्यास एक मार्मिक अशी सूचनाही करतात.

"ऐसे हे अवघेचि ऐकावे । परंतु सार शोधुनि घ्यावे ।
असार ते जाणोनी त्यागावे । यास नाव श्रवण भक्ती ॥ दा.४-१-२९

श्रवणाच्या साह्याने साधक आध्यात्मिकतेच्या पहिल्या पायरीवर येतो. श्रवण आध्यात्माचा पाया आहे. पाया पक्का झाल्यावरच वरची आध्यात्माची इमारत उभी राहणार आहे असा दृढ विश्वास त्यांना होता. आध्यात्मिकतेची मानसिकता तयार करण्याचे काम श्रवण करते. सर्व ऐकावे पण आपल्याला काय आवश्यक आहे, याची कल्पना येणे साधकाला जरुरी आहे. म्हणून रामदास 'सार शोधुनि घ्यावे' असे म्हणतात. आवश्यक ते घ्यावे आणि अनावश्यक त्यजावे हा त्याचा अर्थ. आवश्यक अनावश्यकाची निवड करण्यासाठी, त्या गोष्टी व्यक्तिसापेक्ष असल्या तरीही विवेकाची आवश्यकता असते. सर्वसाधारण माणसास नको तेच हवे असते. माझ्या लहानपणी एका कीर्तनात ऐकलेली गोष्ट सांगण्याचा मोह मला इथे अनावर होत आहे. 'एक आजीबाई सतत पुराण, कीर्तन, ऐकायला जायच्या, त्यातल्या कथा त्यांना मुखोद्गत होत्या. त्यांचे आचरण फार चांगले होते. सकाळीच गंगेवर स्नान, पूजा, श्रवण नंतर भोजन असा त्यांचा दिनक्रम होता. एके दिवशी नात सुनेच्या आग्रहाखातर त्यांनी एक सिनेमा पाहिला. श्रवणाने त्यांचा कान तयार झाला होता आणि स्मरण शक्ती प्रखर झाली होती, त्यांना एकाग्रता साधली होती. त्या सिनेमात त्यांनी" कधी करिसी लग्न माझे तुज ठावे ईश्वरा" हे गाणं ऐकलं ते त्यांना एकदम पाठ झालं, स्मरणात राहिलं. दुसऱ्या दिवशी गंगेवर आंघोळीसाठी जाताना जपाऐवजी त्यांच्या तोंडातून तेच गाणे बाहेर येत होते. ऐकणारास ते विपरीत वाटले. एका ऐकणाराने आजीबाईस त्याची जाणीव करून दिली. आजीबाई ओशाळल्या. गोष्टीचा मथित अर्थ आज मला कळतो आहे की, सार घ्यावे आणि असार टाकावे. हे साधकाला जमले नाही तर "नळी फुंकिली सोनारे इकडून तिकडे गेले वारे" अशी गत होईल. म्हणजे श्रवणानंतर आपल्याला काय कळले या विषयी आत्मपरिक्षण करण्याची

आवश्यकता आहे, ही सूचना रामदास करतात.

श्रवणाचे महत्त्व एका ठिकाणी सांगून रामदास थांबत नाहीत. दासबोधात अनेक ठिकाणी ते येते. सातव्या दशकात आठ आणि नऊ या समासात श्रवणाने काय होते, आणि श्रवणाची फलश्रुती ते सांगतात.

''श्रवणे आतुडे भक्ती । श्रवणे उद्भवे विरक्ती ।
श्रवणे तुटे आसक्ती । विषयाची ॥ दा. ७-८-२
श्रवणे आवरे मन । श्रवणे घडे समाधान ।
श्रवणे तुटे बंधन । देह बुद्धीचे ॥ दा. ७-८-६

श्रवणकर्त्यास भक्तीविषयी आवड निर्माण झाली आहे. किंवा नाही ? सर्व विषयांची आसक्ती सुटून तो विरक्त झाला आहे किंवा नाही, त्याची देहबुद्धी गळून गेली आहे किंवा नाही. ह्या साऱ्या गोष्टी श्रवणकर्त्यांने स्वतःशी पडताळून पाहिल्या पाहिजेत. दररोज केवळ श्रवण करणे हा उपचार नसावा. श्रवण हा संस्कार झाला पाहिजे. संस्काराने माणूस संपन्न होतो. आजच्या काळात तंत्रज्ञान एवढे वाढले आहे, माणूस संपूर्णपणे घड्याळाच्या काट्यावर चालतो आहे, स्वतंत्र श्रवणासाठी तो तास दोन तास काढू शकत नाही पण तो टी.व्ही. पाहू शकतो, पुस्तके वाचू शकतो. त्यातून त्याचे व्यक्तिमत्व समृद्ध होऊ शकतो. या गोष्टींचाही समावेश श्रवणात करण्यास प्रत्यवाय नसावा. गुरुमुखातून मिळणाऱ्या ज्ञानाला पर्यायच नाही, आधुनिक काळात तंत्रज्ञानाच्या प्रगतीने मिळणारे ज्ञानही महत्त्वाचे मानले पाहिजे.

पूर्वी शिक्षणाचा प्रसार नव्हता, तरी श्रवणाने माणसे ज्ञान संपन्न आणि अनुभवसंपन्न व्हायची. श्रवणकर्त्यांच्या ठिकाणी कसा बदल व्हावा तर श्रवणाने व्यक्तीचे मन निर्लोभी व्हावे.

''श्रवणी लोभ उपजेल जेथे । विवेक कैचा असेल तेथे ।
बैसली दुराशेची भुते । तया अधोगती ॥ दा. ७-९-३७
श्रवणाचा अनादर । आळसे करील जो नर
त्याचा होय अपहार । स्वहित विषयी ॥ दा. ७-८-४८

श्रवणाचा आळस नसावा, पारायणाचे वावडे नसावे. एकाग्रतेने वारंवार श्रवण केल्याने पारायणाचा हेतू श्रवणकर्त्यास साध्य करता येतो.

पुन्हा पुन्हा ऐकल्याने, त्यास आत्मपरीक्षण करुन स्वतः तील बदल लक्षात घेऊन पुढे गेले पाहिजे हे श्रवण भक्तीचे विशेष मानावे.

२. कीर्तन :-

नवविधा भक्तीतील श्रवण आणि कीर्तन हे भक्तीचे दोन प्रकार उभयपक्षी महत्त्वाचे आहेत. सांगणारा जसा चांगला हवा तसाच ऐकणाराही त्याच तोडीचा हवा. सांगणाराच्या मुळे ऐकणारा श्रेष्ठ व्हावा. दोघेही तितक्याच योग्यतेचे असतील, अधिकारी असतील तर अपेक्षित असे परिवर्तन नक्कीच घडेल.

''सगुण हरिकथा करावी । भगवत्कीर्ती वाढवावी
अखंड वैखरी वदवावी । यथायोग्य ॥'' दा. ४-२-२

कोणाच्याही मनात अखंड हरिकथा का करावी असा प्रश्न येणे साहजिक आहे. त्याचे उत्तर रामदास लगेच देतात.

''आपुलिया सुख स्वार्था । केलीच करावी हरिकथा हरिकथेवीण
सर्वथा । राहोचि नये ॥ दा. ४-२-४

आपल्या जीवनात सुख हवे असेल तर नित्य हरिकथा करावी. ह्या ओवीत समर्थांनी सुख स्वार्थ हा शब्द जाणीवपूर्वक वापरला आहे. याचा आध्यात्मिक अर्थ फार गहन आहे. भौतिक जगातील वैयक्तिक सुख, आणि स्वार्थ इथे अपेक्षित नाही. तर इथे स्वार्थ म्हणजे आत्मिक उन्नतीचा ध्यास आणि सुख म्हणजे आध्यात्मिक चिरंतन सुख. ते प्राप्त करण्यासाठी अखंड, निरंतर हरिकथा करावी. कीर्तनाला समर्थ हरिकथा हा शब्द योजतात आणि कीर्तनकारासाठी हरिदास. ईश्वराला हरिकथा अति प्रिय आहे. समर्थ हरिकथा कशी असावी आणि हरिदास कसा असावा याचेही मार्मिक विवेचन करतात. कीर्तनाने ईश्वर तर प्रसन्न झालाच पाहिजे त्याचबरोबर सांगणारा आणि ऐकणारा यांना पण समाधान मिळाले पाहिजे. बहुजन समाज भक्तिप्रवण होण्यासाठी कीर्तनांसारखे सुंदर साधन नाही. कारण कीर्तन हा एकपात्री नाट्यप्रयोग आहे. कीर्तनात कीर्तनकार वेगळ्या वेगळ्या भूमिका निरनिराळ्या कलांच्या साह्याने साकारीत असतो. मनोरंजनातून ज्ञान देणे हा त्याचा प्रमुख उद्देश असतो. भक्तीचा मार्ग दाखविणे, लोकांना या मार्गाकडे आकृष्ट करणे हे कीर्तनाचे महत्त्वाचे उद्दिष्ट्य आहे. त्यामुळे भक्तीवर इतर कलांची कुरघोडी होणार नाही यासाठी कीर्तनकाराने जागरूक राहणे महत्त्वाचे आहे. कलियुगात कीर्तन अति महत्त्वाचे आहे.

''हरिकथा मांडली जेथे । सर्व सांडुनि धावे तेथे ।
आलस्य निद्रा दवडून स्वार्थे । हरिकथेसि सादर ॥ दा.१४-५-३९

साधक कीर्तनाच्या ओढीने आपले सर्व व्याप-ताप सोडून ऐकण्यासाठी जातो. कीर्तनाचे महत्त्व आणि आवश्यकता सांगत असताना, समर्थ कीर्तनकार कसा असावा हेही सविस्तरपणे सांगतात. कीर्तनभक्ती श्रोता आणि वक्ता उभयतांशी निगडीत आहे. दोघेही एकाच पातळीवर असतील तर त्या कीर्तनात अवीट गोडी निर्माण होते. हरिदास स्वतः भक्त असावा, तो बहुश्रुत आणि ज्ञानी असावा. त्याने आपल्या वक्तृत्वाने आणि क्षमतेने श्रोत्यांच्या मनात भक्तिभाव निर्माण करावा. ऐकणारांच्या मनात संदेह निर्माण होईल अशी कोणतीही वक्तव्ये त्याने करू नयेत. स्वतः भक्तिसाधनेत डुंबावे त्याचप्रमाणे श्रोत्यांनाही डुंबवावे. कीर्तनकाराची वाणी स्वच्छ, स्पष्ट आणि शुद्ध असावी, त्याचा परिणाम ऐकणारांवर सहज होऊ शकतो. ऐकत असताना कळत नकळत श्रोत्यांच्या मनात ईश्वराविषयी आवड निर्माण होते. कीर्तन करणे हा कीर्तनकाराचा सहजधर्म असावा, व्यवसाय नसावा. व्यवसाय म्हटला की त्यात नफा तोटा असतोच. कीर्तन असे असावे की त्यात 'अहंचा' तोटा आणि भक्तीचा नफा असावा. कीर्तनकाराचे लक्ष बिदागीवर नसावे. तसे असेल तर कीर्तनकार आणि श्रोता दोघांचीही अवस्था अस्थिर असते. या विषयी तुकारामांच्या ओळी फार बोलक्या आहेत.

''आशाबद्ध वक्ता धाक श्रोतेयाच्या चित्ता वाया गेले ते भजन उभयता लोभी मन'' तुका.

असे असेल तर कीर्तनात अर्थच नसेल. कीर्तन हे व्रत म्हणून स्वीकारले पाहिजे. भक्तकीर्तनकाराच्या कीर्तनाने श्रोत्यांच्या मनाचे आध्यात्मिक उन्नयन होते. या उन्नयनाला बाधा आणील असे स्त्रीविषयक अथवा शृंगाररसपूर्ण विवेचन टाळले पाहिजे. ज्या विवेचनाने वासना, विकार बळावतील तसे विवेचन करू नये.

'बोलविता धनी वेगळाचि' याचे भान सातत्याने कीर्तनकाराने ठेवावे. स्वतःची तसेच श्रोत्यांची आध्यात्मिक प्रगती, चिंतन आणि समाज प्रबोधन ही उद्दिष्टे समोर ठेवून कीर्तन करावे.

''करुणा कीर्तनाच्या लोटे । कथा करावी घडघडाटे
श्रोत्यांची श्रवण पुटे । आनंदे भरावी ॥ दा. १४ - ५ - १२

अशी कीर्तनभक्ती मानवी जीवनात रंग भरणारी असते. भगवत्भक्त नारद हे ह्या भक्तीचे शिरोमणी समजले जातात.

नामस्मरण -

अखंड देवाचे स्मरण ही तिसरी भक्ती. श्रवणाने, आणि कीर्तनाने साधकाची मानसिकता आपोआप नामस्मरणाकडे जाते. नामस्मरण ही अंतरंगाची साधना आहे. त्यात अंतर्मुखता असून ही स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण आहे. नामस्मरणासाठी कोणत्याही बाह्य साधनाची आवश्यकता नाही, भाव

मात्र हवा. मनाने एकदा कौल दिला की नामस्मरण सुरू होते. नाम कधी, केव्हा, कुठे, कसे घ्यावे यावर कसलेही बंधन नाही. उलट "आहो येता जाता उठत बसता कार्य करिता" नाम घेता येते.

नित्यनेम प्रातःकाळी, माध्यान्ह काळी सायंकाळी
नामस्मरण सर्व काळी । करीत जावे ।।दा.४-३-३

जीवनाच्या प्रत्येक अवस्थेत नामस्मरणाने आनंदच प्राप्त होतो म्हणून -

"हरुष काळी, विषमकाळी । पर्वकाळी प्रस्तावकाळी,,
विश्रांतिकाळी निद्राकाळी । नामस्मरण करावे ।।" दा. ४-३-५

नामस्मरणाने संकटांचा परिहार होतो, विघ्नाचे निवारण होते. आत्मोन्नतीसाठी नामस्मरणासारखे सोपे साधन नाही. वारकरी संप्रदायाने तर नामस्मरण भक्तीच्या साह्याने अवघा लोक संघटित केला, त्यांना दिलासा दिला आणि उध्दाराचा मार्ग दाखवला; त्या काळात जेव्हा समाज रुढी, संप्रदाय आणि कर्मकांड याच्या चक्रात फिरत होता त्याचवेळी वारकऱ्यांनी नामस्मरणाने समाजात आध्यात्मिक लोकशाही प्रस्थापित केली.

'नामा परते तत्त्व नाही रे अन्यथा'
'ते नाम सोपे रे रामकृष्ण गोविंद '
'आवडीने भावे हरिनाम घेशी'
'हरिबोला भांडता, हरिबोला कांडता'
'हरिमुखे म्हणा हरिमुखे म्हणा पुण्याची गणना कोण करी"
'दळिता कांडिता तुज गाईन अनंता'
'कांदा मुळाभाजी अवघी विठाबाई माझी'

वारकऱ्यांनी नामस्मरण हेच साधन आणि साध्य मानले. नामस्मरणाची महती समर्थ रामदासांनाही माहीत होती. नामाचा अधिकार साऱ्यांना आहे असे सांगून ते म्हणतात, सर्वांनी अंतःकरणातून नामजप करावा.

'मना मत्सरे नाम सांडू नको हो'
'मुखी राम विश्राम तेथेचि आहे'
'जनी भोजनी नाम वाचे वदावे'
'प्रभाते मनी राम चिंतीत जावा'
'जयाचेनि नामे महादोष जाती'

अशा रीतीने नामाचे महत्त्व मनाच्या श्लोकात समर्थ रामदास विशद करतात. नामाचा महिमा सांगताना प्रल्हाद, अजामेळ, गजेंद्र यांच्या कथा ऐकवून नामाची महती वाढवितात.

नामामुळे साधकाच्या चित्ताची एकाग्रता वाढते. नाम घेण्यासाठी आपले कोणतेही कर्म, स्वधर्म अथवा प्रपंच सोडण्याची आवश्यकता नाही. नामस्मरण साधकाच्या अंतःकरणाचा सहजधर्म झाला पाहिजे. नामाचे स्मरण असावे. कोणतेही काम करताना नाम आठवून काम केल्याने मिळणारा आनंद कोणत्याही मापाने मोजता येणार नाही. प्रत्येक कर्म ईश्वरार्पण बुद्धीने करणे हेच नामस्मरण. नामस्मरण केल्याने व्यक्तीच्या स्वभावात, वागण्या-बोलण्यात आपोआप बदल होतो. वाल्या कोळ्याचे उदाहरण आठवावे. नामस्मरणाची गोडी एकदा लागली की अखंड नामस्मरण होते, जणू ते त्या व्यक्तीचा श्वासो श्वास असावा. नामस्मरणाने साधकाला आपल्यातले दोष दिसतात. ते दूर करण्याचा तो प्रयत्न करतो. मनोभावे नामस्मरण करणे म्हणजे उच्च कोटीच्या साधकदशेत जाणे होय. नामस्मरणात आर्तता, ईश्वर भेटीची तळमळ, 'स्व' चा निरास होणे महत्त्वाचे असते. नामस्मरणात सर्व काही विसरल्याच्या अनेक संतांच्या कथा आहेत. नामस्मरणाने दोष जातात. वासनांचा क्षय होतो. वृत्ती बदलते. चारी वाणीने केलेला नामजप साधकास उर्ध्वगतीला नेतो. नामस्मरणभक्तीने भक्त प्रल्हाद अनेक संकटातून वाचला. या भक्तीचा श्रेष्ठतम प्रल्हाद होय.

'हरिनामे प्रल्हाद तरला । नाना अपघातापासून सुटला।
नारायण नामे पावन झाला । अजामेळ ।।४-३-१७

असे नामस्मरणभक्तीचे महत्त्व समर्थ सांगतात. आजच्या धकाधकीच्या जीवनात तर नामस्मरणभक्तीच तारक ठरू शकते. आजच्या काळातील गोंदवलेकर स्वामी सारखे संतही नामस्मरणाची महती सांगतात आणि नामजपास प्रवृत्त करतात.

पादसेवन :-

सद्‌गुरूस शरण जावे, त्यांच्या पायाशी राहावे. हा या भक्तीचा मथितार्थ आहे. नाना अभ्यासाने जी गोष्ट साध्य होणार नाही ती गोष्ट सद्‌गुरूकृपेने जमेल असा विश्वास समर्थ व्यक्त करतात. ज्ञान मार्ग आणि योग मार्गात सद्‌गुरूकृपेची नितांत आवश्यकता आहे. श्रवण, कीर्तन, नामस्मरण या भक्ती साधक आपल्या मनाने करीत असतो. 'मी' चे विसर्जन केल्याशिवाय भक्तीला आकार येत नाही. मीपण आणि भक्ती एका ठिकाणी वसत नसते. 'मीपणा' विसर्जित करण्याचे दोन मार्ग आहेत. एक परमेश्वरास शरण जाणे, आणि दुसरा आहे सद्‌गुरुस शरण जाणे. सद्‌गुरूच्या माध्यमातून परमेश्वरापर्यंत जाणे सुलभ होते. ज्ञान मार्गात सद्‌गुरूची नितांत आवश्यकता असते. पादसेवन भक्ती कशी करावयाची ह्या विषयी समर्थ सांगतात,

"पादसेवन तेथि जाणावे । काया वाचा मनोभावे ।
सद्‌गुरुचे पाय सेवावे । सद्‌गति कारणे ।।" दा. ४-४-२
"या नाव पादसेवन । सद्‌गुरु पदी अनन्यशरण
निरसावया जन्म मरण । याता याती ।। दा. ४-४-३

पादसेवन म्हणजे सद्‌गुरूंच्या पायाशी बसणे हा अर्थ अगदी वर वरचा आहे. सद्‌गुरूंच्या पायाची सेवा करावी. पण केवळ हाच अर्थ इथे अभिप्रेत नाही. तर सद्‌गुरूंनी जो मार्ग दाखविला असेल त्याला अनुसरणे म्हणजे कायिक, वाचिक आणि मानसिक स्थितीने गुरूंना आचरणे. शिष्याला स्वतः काही विचार करण्याची आवश्यकता ह्या भक्तीत उरत नाही. सद्‌गुरूंची इच्छा तीच त्याची इच्छा असते. सद्‌गुरू आणि सत्‌शिष्य यांची शरीरे भिन्न असली तरी ते मनाने एकरूपच असतात. "हृदया हृदय एक जाले । ये हृदयीचे ते हृदयी घातले' असे माऊली म्हणते. 'दोही डोळा एक पाहणे' अशी अवस्था असते. ज्ञानेश्वरीत तेराव्या अध्यायात " आचार्यो पासनम्" यावरील माऊलीचे भाष्य पादसेवन भक्तीचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

समर्थांनी पादसेवन भक्तीचा महिमा पराकोटीच्या उच्चासनावर ठेवला आहे. सद्‌गुरूच्या सहवासात राहून त्यांच्या चरणचिन्हांचे अनुसरण करणे म्हणजे उन्मनी अवस्थेत राहणे तीच भक्ती. वेगळे मन न राहणे.

"संग त्यागेविणयेना अनुभवासी ।।' ४-४-६
"अनुभव घेता संग त्याग नसे । संगत्यागे अनुभव न दिसे
हे अनुभवीयासीच भासे । येरा गथा गोवी ।। दा. ४-४-७

या स्थितीत परब्रह्मात लीन होणे आहे. सूक्ष्म अनुभवांवर ही गोष्ट अधिष्ठित आहे. आत्मज्ञानी गुरूसोबत आत्मज्ञान प्राप्त करणे म्हणजे पादसेवन. विष्णूपत्नी लक्ष्मी पादसेवन भक्तीचे श्रेष्ठ उदाहरण मानले जाते.

अर्चनभक्ती :-

"पाचवी भक्ती ते अर्चन । अर्चन म्हणजे देवतार्चन
शास्त्रोक्त पूजा विधान । केले पाहिजे ।। दा.४-५-२

देवाच्या प्रतिमांची षोडशोपचारे पूजा करणे म्हणजे अर्चना. त्या प्रतिमांमध्ये प्रत्यक्ष ईश्वर पाहणे आणि दिसणे म्हणजे अर्चनेची फलश्रुती. "प्रत्यक्ष चक्रपाणी पंढरपुरात आपल्या रक्षणासाठी उभा आहे." असे चोखा मेळ्यास ज्या वेळी वाटते त्या वेळी ती मूर्ती, विठ्ठलाची ती मूर्ती केवळ काळ्या पाषाणाची न राहता प्रत्यक्ष परमेश्वर रुपाने अवतरली असते अशी चोखा

मेळ्याची भावना असते. ''रुप पाहता लोचनी सुख झाले हो साजणी'' म्हणणाऱ्या माऊलीला चैतन्यरूपी ईश्वराचा साक्षात्कार झालेला असतो. तुकारामांनी तर 'सुंदर ते ध्यान' ह्या अभंगात विठ्ठलाचे अगदी यथायोग्य, सुंदर असे वर्णन केले आहे. विठ्ठल दर्शनाचा किंवा ईश्वर दर्शनाचा आनंद ज्याला अनुभवता येतो त्याची भक्ती सफल झाली असे मानावे. डोळे असूनही ईश्वराचे दर्शन होत नाही. आणि गुलाबराव महाराजांसारख्या जन्मांध संताला ईश्वर दिसतो. अंतःचक्षू ज्याचे चैतन्यमय असतील त्यांना ईश्वर जाणवतो, दिसतो. नामदेवांचा नैवेद्य पांडुरंग खातो यामागील प्रेरणाच भक्तिभाव आणि अर्चना याची आहे.

ज्या ईश्वराने आपल्याला सुंदर जन्म दिला आहे. मन, बुद्धचे अलंकार दिले आहेत त्याची कृतज्ञता व्यक्त करणे म्हणजे अर्चना.

ना तुडे मुख परमात्मा म्हणौनी करावी लागे प्रतिमा. आपण बाजारातून एखादी मूर्ती आणली असते. त्या वेळी ती वस्तू असते. पण जेव्हा तिची प्रतिष्ठापना देव्हाऱ्यात करावयाची असते, तेव्हा आवाहन अभिषेकाने तिच्यात देवत्व आणले जाते. भक्तास त्या मूर्तीत प्रत्यक्ष देव दिसत असतो. अर्चनीभक्ती म्हणजे आपले संपूर्ण जीवन ईश्वरार्पण करणे होय. पूजा कशी करावी-

''पंचामृते गंधाक्षते । पुष्पे परिमळद्रव्ये बहुते ।
धूपदीप असंख्याते । नीरांजने कर्पुराची ॥ दा. ४-५-१८
नाना खाद्य नैवेद्य सुंदर । नाना फळे तांबोळ प्रकार ।
दक्षणा नाना अलंकार । दिव्यांबरे वनमाळा ॥ दा. ४.५.१९

ही पूजामहती पुढे २८व्या ओवीपर्यंत सुरू ठेवतात आणि शेवटी अर्चन भक्तीचे सार सांगतात.

''काया वाचा आणि मने । चित्ते, वित्ते, जिवे प्राणे ।
सद्भावे भगवंत अर्चने । या नाव अर्चन भक्ती ॥ ४.५.२९
''ऐसेचि गुरूचे भजन । करूनि असावे अनन्य
या नाव भगवत्भजन । पाचवी भक्ती ॥४.५.३०

अशी अर्चना करता करता मानसिकतेची पातळी श्रेष्ठ होते. सगुणरूप निर्गुण रूपात परिवर्तित होते अशा वेळी आपणास पाहिजे ते कल्पून मानसपूजा करावी असे समर्थ म्हणतात.

''जे जे आपणास पाहिजे । ते ते कल्पून वाहिजे ।
येणे प्रकारे की जे । मानसपूजा ॥ दा. ४.५.३३

मानसपूजा एकाग्रतेची श्रेष्ठतम पायरी आहे. त्यात साधकाने मुळीच काटकसर करू नये. मानसपूजेत अखंड ध्यान आणि स्वतःचा निरास अपेक्षित असतो. मानसपूजेत प्रत्यक्ष वस्तू आणि कृती नसते पण मनाने त्या त्या वस्तूची कल्पना करून ती अर्पण करणे असते. अर्थात ही कृती सहज साध्य नाही. त्यासाठी एकाग्रता, समग्रता आणि साधना आवश्यक असते.

वंदन भक्ती :

वंदन म्हणजे नमस्कार करणे. नमस्कारासाठी अंतःकरणात श्रद्धा लागते. नम्रता अंगी यावी लागते. मनातला अहंभाव गेला की नम्रता आपोआप येते. सर्व साधूसंत ईश्वराला अत्यंत भक्तिभावाने नमस्कार करतात आणि आत्मसुख मिळवितात. वारकरी लोक एकमेकांना वाकून नमस्कार करतात. म्हणजे त्यांचे विचार श्रेष्ठता कनिष्ठतेच्या पलीकडे गेले आहेत हे लक्षात येते. सर्वांना नमस्कार करावा. नमस्काराने खूप मोठा चमत्कार होतो.

'नमस्कारे लीनता घडे । नमस्कारे विकल्प मोडे ।
नमस्कारने सख्य घडे । नाना सत्पात्रासी ॥ दा.४.६.१४
नमस्कारे दोष जाती । नमस्कारे अन्याय क्षमती ।
नमस्कारे मोडली जडती । समाधाने ॥ दा.४.६.१५
नमस्कारास वेचावे नलगे । नमस्कारास कष्टावे नलगे ।
नमस्कारास काहीच नलगे । उपकर्ण सामग्री ॥ दा.४.६.२२

नमस्कार कसा करावा, नमस्काराने काय साध्य होते हे अतिस्पष्टपणे समर्थ सांगतात. नमस्काराने ईश्वर कृपा करतो. वेगळ्या वेगळ्या मूर्तींना नमस्कार केला तरी त्या मागचे ईश्वर तत्त्व एकच आहे.

समर्थ रामदास पंढरपूरला गेले असतात. कटीवर हात आणि विटेवर उभा असलेला पांडुरंग त्यांना दिसलाच नाही. त्यांना दिसला तो राम, त्यासच त्यांनी नमस्कार केला.

इथे का रे उभा श्रीरामा
''मनमोहन मेघश्यामा''

अशी आर्त हाक त्यांनी दिली. 'नारायण असे विश्वी' हे तत्त्व समर्थ स्पष्ट करतात. संपूर्ण जग ईश्वराचे आहे ह्या अर्थाचा श्लोक ईशावास्योपनिषदात् आहे. मंदिरातील मूर्तीत ईश्वर दिसणे सर्वत्र ईश्वर दिसण्याची प्रक्रिया आहे. सर्वांना नमस्कार करावा. नमस्काराने पतित पावन होतात, नमस्काराने जन्म मरणाचा फेरा संपतो. नमस्कारासाठी काही खर्च येत नाही, कष्ट पडत नाहीत. फक्त शुद्ध आणि प्रसन्न अंतःकरण हवे. नमस्काराने मुख्य परमेश्वर कृपा करतो. अक्रूरावर भगवान श्रीकृष्णांची कायम कृपा राहिली आहे.

दास्य भक्ती :

दास्यभक्ती सातवी भक्ती मारूतीरायाची आठवण करून देणारी. दास्यभक्ती करावयाची असेल तर हनुमंतासारखे दास्य करावे. दास्यभाव हा सर्वश्रेष्ठ भाव आहे. भगवंताचा दास म्हणवून घेण्यात धन्यता मानावी. दासभावाने राहून ईश्वर आपलासा करावा. रामदास म्हणविणारा नारायण ठोसर समर्थ होऊ शकतो. जे काही मी करतो आहे. ते रामाच्या अनुज्ञेने ही त्यांची धारणा आहे. 'समर्थांचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे?' असा विश्वास फक्त रामदासच व्यक्त करू शकतात. दास्यभावात भक्त स्वतःचे सर्व कर्म ईश्वराचे कर्म म्हणूनच करीत असतो. दास्य ईश्वराचे, दास्य सद्गुरूचे रामाचा दास तो रामदास, निवृत्तिदास ज्ञानदेव, दासी जनी ही भूमिका घेतली की दास्यभक्तीची श्रेष्ठता वाढते. कायम सद्गुरू पाठीशी असणे ही दास्यभक्तीची परिणती आहे. नीच दास्यत्व करावे. ईश्वराचे किंवा सद्गुरूचे कोणतेही काम करण्यात दास्यभावात कमी वाटत नाही. 'पडिले कार्य तितुके करावे । सदासन्निधचि असावे देवद्वारी ॥' देवद्वारी राहिल्यानंतर कोणते कोणते काम करता येते याची यादीच समर्थ देतात ' भंगली देवळे सुधारावीत, धर्मशाळा बांधाव्यात, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, छत्र-चामरे, मेघडंबऱ्या द्याव्यात, गोशाळा, भोजनशाळा, धर्मशाळा, बांधाव्यात. देव देवतांचे उत्सव करावेत. देवाचे वैभव वाढवावे. स्वतः हलकी कामे करावीत. केलेल्या कामाचा उल्लेख करू नये. नाहीतर आजकाल मठामंदिराला ज्या कोणी देणगी दिली असेल त्याचेच नाव फार मोठ्या अक्षरात झळकताना दिसते. औरंगाबाद जवळ महेश माळ नावाचे स्थान आहे. तिथे गिरीजामातेचे ठाणे आहे. बालाजी भक्त (दास) प्राचार्य गादिया यांनी त्या डोंगरावर व्यंकटेशाचे मंदिर बांधले. मंदिर तिरुपती बालाजीच्या मंदिरासारखे आहे. दास्यभक्ती म्हणून मंदिर बांधणे, आदर्श पण तिथे गाभाऱ्याबाहेर प्राचार्यांचा भला मोठा देवतेच्या मूर्तिपेक्षाही मोठा फोटो मंदिराचे सौंदर्य आणि पावित्र्य यांना बाधा आणतो.

देवाचे दास्य कसे करावे या विषयी समर्थ सांगतात -

'चरण क्षाळणे स्नाने आचमने । गंधाक्षते वसने भूषणे
आसने जीवने नाना सुमने । धूप दीप नैवेद्य ॥
शयना कारणे उत्तम स्थळे । जळे ठेवावी सुशीतळे

तांबुल गायने रसाळे । रागरंगे करावी ॥ दा. ४.८.२१.२२

सडे संमार्जने करावी । उदक पात्रे उदकेभरावी ।

वसने प्रक्षाळून आणावी । उत्तमोत्तमे ॥

अशा रीतीने दास्य करावे. ईश्वराचे आणि सद्गुरूचे दास्य केल्याने जीवनात सुखाची परमावधी होते.

सख्यभक्ती :-

देवाला परमप्रीतीने बांधणे ते सख्य. 'धरिला पंढरीचा चोर प्रेमे बांधुनिया दोर' हे सख्य बंधन कसे करावे, ज्या ज्या परीने जसे जसे शक्य होईल तसे करावे. साधक ईश्वराचा दास झाला की ईश्वर त्याचा सखा, पाठीराखा होत असतो. सख्य भक्तीत ईश्वराची इच्छा तोच धर्म, तेच शास्त्र, तेच कर्तव्य, तोच व्यवहार असे होते. देवाच्या सख्यत्वासाठी आपल्या सौख्यावर पाणी सोडणे आवश्यक असते. कारण आपले भौतिक सौख्य क्षणभंगूर असते. जिथे सख्य तेथे भगवंत आपला जीव अनन्य भावाने ईश्वराला अर्पण करावा. ईश्वराशी जिवाभावाची प्रीती जोडावी. प्रसंगी सर्वस्व गमवावे लागले तरी सख्य सोडू नये. भक्ताचे रक्षण ईश्वर करीत असतो. शुद्ध सख्यात, प्रेमात स्वतःचा विचारच नसतो. भगवंत हाच एकमेव सखा, माता, पिता, बंधू, भगिनी, गणगोत, विद्या, लक्ष्मी, धन, संपत्ती असतो. देवाच्या इच्छेने प्रत्येक काम करावे. देव करील ते मानावे, त्याचा आनंदाने स्वीकार करावा. शरणागतास ईश्वर वर उचलत असतोच. सख्य भक्ती शुद्ध प्रेमाचे प्रतीक आहे. शुद्ध प्रेमात, कारणं, कंटाळा, आळस, तक्रार, चाल ढकल नसते. ईश्वरच माझा सखा त्याच्याशिवाय साऱ्या गोष्टी कंटाळवाण्या अशी स्थिती सख्य भक्तीत होते. पितामहांनी प्रतिज्ञा केली की उद्या अर्जुन या जगात असणार नाही. या प्रतिज्ञेने साऱ्या सैन्यात चिंतेचे काळे ढग पसरले. प्रत्येक जण उद्याचा विचार करु लागला. पण अर्जुन मात्र शांत झोपला होता. सखा कृष्ण रात्रभर जागा होता. सकाळी कृष्णाने अर्जुनाला विचारले, ''पार्था ! भीष्म प्रतिज्ञेने तुला चिंता वाटली नाही का? तू कसा शांतपणे झोपू शकलास ?'' यावरील पार्थाचे उत्तर फार बोलके आहे, पार्थ म्हणाला, ''वासुदेवा, या गोष्टीची चिंता मी कशाला करू. माझी चिंता वाहणारा तू आहेस याची मला खात्री आहे म्हणून मला शांत झोप लागली.'' सख्यभक्तीची परमावधी इथे दिसते.

''ऐसे परम सख्य धरिता । देवासि लागे भक्ताची चिंता पांडव

लाखाजोहरी जळता । विवरद्वारे काढले ॥ ४-८-११

''देव कृपेचा सागरू । देव करुणेचा जलधरू ।

देवासी भक्ताचा विसरू । पडणारा नाही ॥ ४-८-२८

म्हणून देवासी सख्य करावे, मनीचे गुज बोलावे आणि चिंतारहीत जगावे.

आत्मनिवेदन -

ही नववी भक्ती. अद्वैत न सोडता भक्ती कशी करावी याचे उदाहरण ही भक्ती होय. भक्ती आणि ज्ञान एकमेकासोबतच असते. ईश्वराबद्दल आत्मीयता आणि भक्ती निर्माण होते. ज्ञानामध्ये भक्ती उदय पावते. भक्ती ज्ञान देते. ज्ञान आणि भक्तीत अविद्येचा क्षय झाला असतो. भक्तीने अहंकाराचा ऱ्हास होतो आणि ज्ञान उचंबळते. देवास आपण स्वतःस समर्पित करावे. आपण ईश्वरापासून विभक्त होऊ नये. आपल्यातच असलेला देव शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा. आत्म्याचा शोध घ्यावा तिथेच देव असतो. देव आणि आपण वेगळे उरतच नाही. 'मी पणा' संपलेला असतो. भेद संपतो. आत्मनिवेदनामध्ये भक्त निर्गुण निराकार होतो. मी कोण आहे याचा शोध गुरूच्या साह्याने अंतर्यामी घ्यावा लागतो. भक्ताच्या अंतःकरणातून ईश्वराप्रत सारी स्पंदने जाऊ लागतात. त्याच्या जीवनातून अज्ञान, दुःख बाजूला झाले असते. त्याच्या वासना संपल्या असतात. मीपण संपलेले असते. तोपणात म्हणजे ईश्वर रुपात सामावले असते. सर्व बाह्य जग ईश्वरमय वाटू, भासू लागते. ईश्वरावरील निःस्वार्थ निष्काम प्रेमामुळे भक्त शुद्ध, सत्वमय दिसू लागतो. अभ्यासामुळे त्याच्या ठिकाणी सतत भगवत्चिंतन सुरु असते. तो ईश्वराशी अद्वैत राहू इच्छितो पण ईश्वराच्या दिव्य प्रेमाचा अनुभव घेण्यासाठी वेगळे अस्तित्व मानतो. त्याच्या देह बुद्धीची जागा आत्मबुध्दी घेते. हृदयस्थ भगवंताचे स्थान सच्चिदानंद आत्मा घेतो.

''आपण मिथ्या साच देव । देव भक्त अनन्य भाव ।

या वचनाचा अभिप्राव । अनुभवी जाणती ॥ दा.४.९.२२

या नाव आत्मनिवेदन । ज्ञानियाचे समाधान ।

नवमे भक्तीचे लक्षण । निरोपिले ॥ दा. ४.९.२३

पंचभूतामध्ये आकाश । सकळ देवामध्ये जगदीश ।

नवविधा भक्तीमध्ये विशेष । भक्ति नवमी ॥ दा. ४.९.२४

नवमी भक्ती आत्मनिवेदन । न होता न चुके जन्ममरण ।

हे वचन सत्य प्रमाण । अन्यथा नव्हे ॥ ४.९.२५

ऐसी हे नवविधा भक्ति । केल्या पाविजे सायोज्य मुक्ती ।

सायोज्य मुक्तीस कल्पांती । चळण नाही ॥ ४.९.२६

आत्मनिवेदन भक्ती साधली नाही तर जन्म-मरणाच्या फेऱ्यात फिरावे लागते. ही भक्ती जो आचरील त्यास सायुज्य मुक्ती साधेल. सायुज्य मुक्ती स्थिर, अढळ, अचल, अविनाशी आहे. सलोकता, समीपता, सरूपता, या तीन मुक्ती चल आहेत सलोकता मुक्तीत भगवंत ज्या लोकात राहतात त्या लोकात भक्त राहू शकतो. समीपतेत भक्ताला ईश्वरासमीप राहता येते. सरूपतेत भक्त ईश्वररूप होतो, सायुज्यतेत भक्ताला निर्गुण ब्रह्माचा साक्षात्कार होतो.

तीनही मुक्ती प्राप्त झाल्या तरी नाशिवंत आहेत. भक्ताला त्याचा पुण्यसंचय संपला की पुन्हा पृथ्वीवर जन्म घ्यावा लागतो. पण सायुज्यमुक्ती ते शाश्वत असल्याने तिच्यामुळे जन्म- मरणाचा फेरा चुकतो.

कर्ममार्ग, भक्तीमार्ग, ज्ञानमार्ग अथवा योगमार्ग असो ह्या साऱ्यांचे प्रयोजन मुक्ती हेच होय. मुक्ती म्हणजे मुक्त होणे. बंधनातून मुक्त होणे. कोणतीही भक्ती करून मुक्ती मिळवायची असेल तर साधकाला किंवा भक्ताला 'स्व' चे निर्वासन करावे लागेल.

भक्तियोगाचे विवेचन करीत असताना रामदास अतिशय तल्लीन होतात. याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे ते स्वतः भक्त आहेत. त्यांच्या मनाला ईश्वर भेटीची तळमळ आहे. मुक्तीची आस आहे. उन्नयनाचा ध्यास आहे. स्वोद्धार हवा आहे पण त्याच बरोबर लोकोद्धार महत्त्वाचा वाटतो म्हणून लोकांना मार्गदर्शन केले. भक्तीचे विविध मार्ग सांगितले. प्रत्येक साधकाने आपल्या वृत्तीला अनुसरून उद्धार करुन घेण्याचा मार्ग निवडावा असे त्यांना वाटते. सारे मार्ग चोखाळता आले.तर

सोने आणि परिमळे । इक्षुंदडा लागती फळे

गौल्य माधुर्य रसाळे । तरी ते अपूर्वता ''

होईल उद्धाराच्या इतर साधनांपेक्षा 'भक्ती' हे साधन सुलभ आणि सर्वमान्य आहे या विषयी त्यांना विश्वास वाटतो. म्हणून त्यांनी भक्तियोगाचे हे विवेचन, सविस्तरपणे, व्युमन्नतेने, निरनिराळ्या उदाहरणांच्या साह्याने समजावले आहे. त्यातून त्यांची आध्यात्माची तसेच अवघा लोक ज्ञानी, सजग करण्याची तळमळ दिसते. समर्थांचे हे विचार आजही तितकेच प्रेरणादायी आहेत.

- डॉ. मंगला वैष्णव

१, हेरिटेज ५।६।३१,३२, नवीन उस्मानपुरा,

औरंगाबाद - ४३१ ००५

दूरध्वनी क्रमांक - (०२४०) २३४५६५१, मोबा. ९८२२४३८६५७

समर्थांचे हृदय आत्माराम

- प्रा. डॉ. अजित कुलकर्णी



[illegible]

''आपल्या सर्व वाङ्मयामध्ये श्री समर्थांनी अंतःकरण ओतले. पण आत्मारामामध्ये त्यांचे हृदय सापडते. बध्दानेच नव्हे सिध्दानेसुद्धा आत्मारामापासून परमार्थ शिकावा.''

ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

समर्थ रामदासांचे साहित्य विपुल आहे. प्रत्येकाचे विशेष व स्वतंत्र्य मूल्य आहे. तथापि, समर्थांनी जीवनाच्या अखेरीस भक्तांना जे सांगितले ते असे-

माझी काया आणि वाणी । गेली म्हणाल अंतःकरणी
परि मी आहे जगज्जीवनी । निरंतर ।
आत्माराम दासबोध । माझे स्वरूप स्वतःसिध्द ।
असता न करावा हो खेद । भक्तजनी ॥
'आत्माराम दासबोध । माझे स्वरूप स्वतःसिद्ध ।'

हे समर्थ स्वतः व्यक्त करतात म्हणजे याचे 'मूल्यच अमूल्य' आहे असे म्हणावे लागेल.

आत्माराम ग्रंथाचा परिचय :

समर्थ रामदासांचा हा लोकमान्य आत्मविद्येचा ग्रंथ आहे. यात पाच प्रकरणे असून एकूण ओव्या १८३ आहेत याची रचना अत्यंत सोप्या सुटसुटीत शब्दांची असून, गहन अर्थांनी परिपूर्ण आहे. हा एक गुरु-शिष्यांचा सुखसंवाद आहे. यात परमार्थाच्या वाटचालीचे मार्गदर्शक चिंतन आहे. या ग्रंथाचे चिंतन, अभ्यास हा शुद्ध भावाने, पूर्ण श्रद्धेने, करणे आवश्यक आहे. साधकांनी याचा अभ्यास आत्मानात्मविवेकाने करणे योग्य होणार आहे. मनुष्याला जीवनाचा अर्थ कळणे आवश्यक आहे. यात असलेल्या आत्मवस्तुचे स्वरूप जाणून जीव शिव ऐक्याची अनुभूती मनुष्याला येणे आवश्यक आहे. यात ग्रंथातील विचारांनी तसेच, साधन मार्गांनी साधकांना आत्मारामाची आत्मबोधाची प्रचिती यावी हा उद्देश या ग्रंथात दिसून येतो.

त्याग निरूपण -

आत्माराम ग्रंथातील 'त्याग निरूपण' हे पहिले प्रकरण आहे. या प्रकरणात एकूण ३९ ओव्या आहेत. मनुष्याला जीवनात शांती समाधान लाभण्यासाठी आत्मचिंतनाची जिज्ञासा, तशी जीवाला मळमळ, सद्‌गुरु कृपा, यामुळे परमानंदाची प्राप्ती होऊ शकते.

या प्रकरणात ओवी १ ते १७ यात श्री गणेश वंदना, श्रीशारदा, श्रीसद्‌गुरु, श्रीराम, संत व सज्जन श्रोते यांना मंगल सूचक वंदन केले आहे. त्यानंतर ओवी १८ ते २९ यात हा ग्रंथ सांगण्याचे कारण सांगून, 'तू कोण?' या प्रश्नाचा वेध शिष्याने घ्यावा. या दृष्टीने उपदेशास प्रारंभ केला आहे. ओवी ३० ते ३९ यात मीपणाचा त्याग करावयास सांगून त्यागाचे विश्लेषण केले आहे.

ग्रंथारंभी निर्गुण गणेश स्वरूपाचे नमन केले आहे. हे निर्गुण स्वरूप सत्‌रूप ईश्वराचे आहे. येथे स्थळ, काळ व द्रव्य यांचा संबंध नाही. यात केवळ असणे जे आहे त्यात बदल नाही. विकार नाही. यात परिवर्तन नाही. म्हणून 'ते' आहे, ते 'असणे' यात आहे. जेथे 'क्रिया' आहे, तेथे 'होणे' हे क्रियापद आहे. जेथे 'होणे' वा 'क्रिया' काही नाही असा तो निर्गुण गणेश आहे. परंतु मायेने सर्व क्रिया घडविल्या असून, मनुष्य आरोप मात्र त्या निष्क्रिय परमेश्वरावर करीत असतो. याला जाणावयाचे असेल तर. त्याच्याशी तदरूप होवून ऐक्यभावाने जाणणे आवश्यक आहे. हे निर्गुण रूपरहित, आकाररहित असल्याने त्याला नावही नाही. येथे भावरूपाने म्हणजे ऐक्यभावनेने पाहणे आवश्यक आहे.

निर्गुण गणेशरूपाला सद्‌भावाने नमस्कार केला आहे. भावातही एक शक्ती आहे. भावरूपानेच मनुष्याला मूळरूपाशी तादात्म्य होता येते.

तसेच, याच्याच आधाराने, वेदशास्त्र, पुराणे, हे नानारूपातून आत्मज्ञानविषयी सांगतात. याचे सुखस्वरूप अनुभवतात. अखेर 'शब्द ही निःशब्द' होतात. म्हणजेच जे निर्विकार आहे ते ते 'निःशब्द' आहे. यासाठी प्रथम हे शब्द ज्ञानाने जाणून घ्यावे. नंतर निर्विकारात एकरूपतेचा जो अनुभव येतो त्यातून निःशब्द व्हावे. निर्गुणात कोणतेही कर्तृत्व नसून सगुणात माया प्रविष्ट आहे.

मनुष्याचे जीवन विवेकाने समृद्ध व्हावे. म्हणजे निःशब्दाचे ज्ञान त्वरित होते. 'शब्द' जो असतो. तो नाशवंताला असून नाशिवंतातून अविनाशी भाव हा ग्रहण करावा लागतो. तेव्हा 'स्वसुखाची' म्हणजे 'सुख स्वरूपाचा' अनुभव येतो. हाच अनुभव शब्दांच्या पलीकडचा असतो. म्हणून तो निःशब्द असतो. जेव्हा साधक ईश्वराच्या स्वरूपाशी तादाकार होतो, तेव्हा त्याला दिव्य अशी अर्थगर्भ प्रज्ञा लाभते. याने अनंताच्या निःशब्दाचा बोध होत असतो. यात एक मौज आहे ती म्हणजे जे स्वरूप वाणीला समजत नाही. तेथे 'मला कळणे' वा 'मला न कळणे' या दोन्ही गोष्टी मानवी स्वभावातील असतात. म्हणजे 'न कळणे' हे द्वैत आहे. 'कळणे' यात अद्वैत आहे.

शारदा ही शक्तीची देवता आहे. ईश्वर अनंत आहे. तीच ज्ञान शक्ती आहे. बरं! मला ज्ञान झालं हे सांगता येत नाही. हा अनुभव जाणीवरुपाने असतो, तर मला ज्ञान म्हटलं तर तेथे अहंता येते. तेव्हा साधकाने अत्यत सावध राहून निर्गुण निराकारांच्या स्वभावसिद्ध शक्ती ही शारदेच्या कृपेने सहजसिद्ध होते यासाठी तिला वंदन आहे. तसेच, शारदा शक्ती ही जगदंब शक्ती, वाणी, शब्द द्वारा प्रकट होत असते. हीच सद्‌विद्या, स्फूर्ती, जाणीव असते.

जे सत्‌रूप जाणतात व शिष्याला तेच रूप प्राप्त करून देतात, ते सद्‌गुरू होय. आपणा सारखे करीती तात्काळ । असे संतांचे वर्णन आहे. अशा सद्‌गुरुंना शिष्याने वा मनुष्याने शरण जावे. महत्त्वाचे शरण म्हणजे काय तर सद्‌गुरु ज्या मार्गाने जातात. त्या मार्गाने मनुष्याने श्रद्धेने जावे. त्या वेळी सद्‌गुरु शिष्याला सर्वस्व प्रदान करतात. असे असते जीव अल्पज्ञ असतो. तो स्वतःहून अज्ञान दूर करू शकत नाही, सबब मनुष्याला सद्‌गुरुचे मार्गदर्शन आवश्यक आहे. सद्‌गुरू मार्गदर्शनाने मनुष्याचे मन शुद्ध होते. गुरु सदैव सर्वांवर कृपा करीतच असतात.

पण या कृपेची जाणीव त्याच्याशी शरण गेल्याशिवाय प्राप्त होत नाही. तथापि, गुरु कृपेची जशी जाणीव होते तेव्हा अभ्यास हा दृढ होतो, मनुष्य अंतरंगातून मूळ स्वरूपाशी तद्रूप होतो. मग मनुष्याचे मन, अंतःकरण हे आनंदाने भरून जाते. सद्गुरूना शरण गेल्यामुळे मनुष्याचे ठिकाणी धैर्य, आत्मनिर्भरता वाढू शकते. यासाठी हे सद्गुरु वंदन समर्थ येथे करतात.

यानंतर या प्रकरणात श्रीराम वंदना आहे. हा राम कोणता? तर जो योगी लोकांचा राम ! जो हृदयस्थ ईश्वराचे निवासस्थान असते असा हा श्रीराम! या श्रीरामाच्या कृपेमुळे साधकांच्या साधनेतील येणाऱ्या अडचणी दूर होतात. हे रूप मायेहून अलिप्त असते. हे नामरूपातीत आहे. हे सत्यरूप आहे. येथे मनाचा, तर्क कुंठित होतो. बुद्धी व विवेकाची गती खुंटीत होते. शब्दांनी याचे वर्णन करता येत नाही. विवेक किंवा अनुमानाने मनुष्याला ज्ञान प्राप्त होवू शकते. तथापि श्रीरामस्वरूपात विवेक, अनुमान वा तर्क चालत नसून येथे मनुष्याने अनासक्त होवून हे जाणून घेणे आवश्यक आहे. हे ज्ञान व स्वरूप दर्शन सद्गुरू कृपेने होते, तेव्हा श्रीरामाची कृपा होते म्हणून या श्रीरामास वंदन आहे. तेव्हा येथे जो जाणावयाचा तो राम म्हणजे सर्वांचा अंतरात्मा, आत्माराम एकच आहे. हा राम पूर्णकाम आहे. पूर्णकाम म्हणजे जो वासना व मल विरहीत आहे तो ! हा सगुण वा निर्गुणही नाही. अशा श्रीरामास वंदन केले आहे.

समर्थांनी पुढे संत, सज्जन व श्रोते यांना वंदन केले आहे. हे अत्यंत कृपाळू तसेच, भावाचे आकलन करून देण्यास हेच समर्थ असल्याने समर्थ म्हणतात, परा वाणीतून हे जे चिंतन आहे ते उत्स्फूर्तपणे प्रकट होत आहे. हे सर्व यांच्या कृपाप्रसादाचे फळ आहे. यासाठी यांना वंदन करीत आहे.

समर्थांनी येथे ग्रंथ सांगण्याचे प्रयोजन व्यक्त केले आहे. साधकांना 'मी कोण आहे?' अशा स्वस्वरूपाचे ज्ञान व्हावे, मी तू पणाचा खेळ संपावा हे या ग्रंथाचे प्रयोजन आहे.

यासाठी समर्थ प्रथम सूचना करीत आहेत. शिष्याने अंतर्मुख व्हावे. मी - माझेपणातील आसक्ती सुटली पाहिजे. आसक्तीने मोहाचे बंधन निर्माण होते. याने जीवाला अभिमान निर्माण होतो. तेव्हा अहंता व ममता सुटली पाहिजे. जीवात्मा व शिवात्मा या भेदामुळे दुःखाची शृंखला निर्माण होते. यासाठी त्याग करणे आवश्यक आहे. मग त्यासाठी प्रथम साधक-शिष्याने श्रवण, मननाची कास धरावी. सद्गुरू जे सांगतात ते चातक पक्षी जसे आर्तपणे पावसाचा थेंब ग्रहण करतो. तसे सद्गुरू सांगतात ते सार-सार आत्मसात करावा. मग 'मी कोण?' 'कोठून आलो?' 'जे जाणून घ्यावे. यासाठी त्याग करावा' हे सद्गुरू सांगतात.

समर्थांनी हा 'आत्माराम' विषय गुरूशिष्य संवादातून मांडला आहे. येथे सदगुरू शिष्याला सांगतात, हे शिष्या, तुला हे जर जाणावयाचे असेल तर प्रथम जीवात्मा व शिवात्मा यात भेद न मानता, माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवून नाशवंताचा त्याग कर. लौकिक वैभवाचा, त्याग करावास.तेव्हा तुला स्वस्वरूप जाणवेल. यासाठी शाश्वत अशा स्वतःची ओळख करून घेवून जे अशाश्वत आहे, नाशवंत आहे. त्याचा त्याग कर.हे शिकण्यासाठी सद्गुरुंना शरण जावे. यासाठी शिष्य म्हणतो, 'मी काय करावे?' तेव्हा सद्गुरु सांगतात. 'नाशवंताचा त्याग करून ते मला देवून टाक?' याचे कारण एक आहे. श्रवण मननाच्या अभ्यासाने शिष्याची मनोभूमी निर्माण होते. नाशवंताचा त्याग म्हणजे लौकिक गोष्टींचा त्याग आहे. लौकिक गोष्टी मनुष्याचे मन चटकन चिकटून बसते. यासाठी मी, माझेपणाचा विसर.हा अभ्यासाने, ज्ञानाने पडला पाहिजे यासाठी येथे त्याग निरूपण सद्गुरू करीत आहेत.

तेव्हा शिष्य म्हणतो, हे गुरुदेव मी आपल्याला सर्वस्व अर्पण करतो. आता मजजवळ काहीही नाही. तेव्हा मला आत्मबोधाविषयी काही सांगावे थोडक्यात, मनुष्याचे दृश्याचे प्रेम कमी होवून आसक्ती कमी होऊन मनुष्याला शास्वताचे ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी हे त्याग निरूपण आहे.

माया निरूपण -

येथे शिष्य सद्गुरुंना आपण कल्याण कशात आहे ते सांगावे, ही विनंती करीत आहे. या निरूपणत ४३ ओव्या असून यात -

ओवी १ ते ४ शिष्य सदगुरूना विनंती करीत आहे. ओवी ५ ते ९ सदगुरूंनी यास उत्तर दिले आहे. ओवी १० ते १२ मायेचे लक्षण सांगितले आहे. ओवी २१ ते २६ माया ही स्वतंत्र की परतंत्र ? याबद्दल शिष्याचे मनात संभ्रम, शंका, ओवी २७ ते २९ गुरुंनी शंका निरसन केले. ओवी ३० ते ३८ मायेचे कल्याणकारी रूपाचे वर्णन. ओवी ३९ ते ४१ शिष्याला सावधानतेची सूचना, ओवी ४२-४३ पुढील निरूपणाचा उपोदधात यात आहे.

शिष्यांनी सद्गुरुंचा जयजयकार केला आहे. येथे सद्गुरुंना शिष्यांनी चार विशेषणे दिली आहेत. सदगुरू सच्चिदानंद, आनंदकंद, निजबोधरूप, व परमपुरुष अशी विशेषणे दिली आहेत. या चार अवस्था म्हणजे शिष्यांचे चार प्रकार आहेत. जडदेहरूपाने सच्चिदानंदाची अनुभूती देत असतात. अन्नमय, मनोमय, प्राणमय, विज्ञानमय व आनंदमयकोश या कोशात जीव असतो. तेव्हा सदगुरु कोशमाध्यमातूनही आनंदमय कोशाची अनुभूती देतात. शिष्य जेव्हा ज्ञानोपासक असेल तेव्हा ज्ञान वा बोधाची जाणीव करून देणारे सद्गुरु असतात आणि शिष्य जेव्हा निर्गुणाचा उपासक असतो तेव्हा सद्गुरु त्याची ओळख परमपुरुषाशी करून देत असतात. यादृष्टीने सद्गुरुचा हा जयजयकार केला आहे. परमात्मा हा अनंतरूपाने नटला असून त्याने असंख्य ब्रह्मांडे निर्माण केली आहेत. त्याची शक्ती अपार आहे. परंतु सदगुरु हे कृपेनेच माया नष्ट करून शिष्य स्वानंदाचे डोहात रमवू शकतात. परमार्थातही एक नाते असावे लागते, यासाठी शिष्य विनंती करतो मी आपणास नाशवंत देत आहे. मी आपणास शरण येत आहे. माझी उपेक्षा करू नका. शेवटी शिष्य म्हणजे नाशवंत हे मला सांगावे, आणि मला आपल्यासारखे करावे .

तेव्हा सदगुरूंनी सांगितले 'हे बाळा, मी सांगतो ते सावधपणे ऐकावे व स्वानंदपद तेव्हढे ओळखून घे. यासाठी प्रत्यक्ष संदेह सोडून दे. मन एकाग्र करावे.' अग्नी व लोखंडाचा संपर्क आल्यामुळे, लोखंडाचे मालिन्य जावू शकते. तसे सामान्य शिष्याला सदगुरुंचा लाभ झाला तर शिष्याचे लवकरच सुवर्णात परिवर्तन होवू शकते. यासाठी साधकानेही समाधान वाटेल असे साधन करावे. तसेच, माया अनादि आहे. तिच्यातील मलिनपणा हा नीटपणे समजून तिचा त्याग करावा. मालिन्याचा त्याग घडल्याशिवाय निजस्वरूपाचे साधकाला ज्ञान होत नाही.

सद्गुरुंनी मायेची लक्षणे सांगितली. माया ही अनादि अनंत आहे. तिच्या कक्षेत जे जे येते त्याला उत्पत्ती, स्थिती व लय असते. तिच्यामुळे या विश्वात सतत बदल घडत असतो. त्यामुळे ती व्यापिनी आहे. तथापि माया ही निर्गुणाची शक्ती आहे. या मायेकडे कसे पाहावे हे सद्गुरुंमुळेच समजू शकते. मनुष्याला अहंचे स्फूरण मायेमुळे येते. या मायेतच विश्वाचे बिज समावलेले आहे. ती क्रमाक्रमाने व्यक्त होत असते. ही माया सत्व, रज व तम या त्रिगुणात्मक होऊन या गुणमायेतून पंचमहाभूतादिक सृष्टी निर्माण होऊन, अष्टधा प्रकृतीरुपाने या विश्वाचा विस्तार झाला. पुढे चेतन-अचेतन असे विभाग झाले. ती शक्तीमानरूपात आहे. मनुष्याला अहंता व ममता यामुळे स्वस्वरूपाचे ज्ञान होत नाही.

मग प्रश्न उपस्थित होतो. माया स्वतंत्र का परतंत्र असते? असे आहे,

मायेचा प्रभाव हा व्यक्तीवर असतो. म्हणजे तिची स्वरूपसत्ता असते. ती ईश इच्छेने कार्यरत झाली पण पुढे ती स्वेच्छेने वागू लागते. तेव्हा ती स्वतंत्र असते. ईश परब्रह्म इच्छेने वागते तेव्हा ती परतंत्र असते. तथापी माया आवरण व विलेप निर्माण करते. जे जे मनाला कळते, अनुभवाला येते. तेच मुळी सोडले पाहिजे. परंतु जेव्हा मनुष्याला स्वस्वरूपाचे ज्ञान होते तेव्हा ती नष्ट होते. मायेचे अस्तित्व हे साधकांच्या स्वीकारावर अवलंबून असते. तेव्हा माया अविर्वचनीय होते. तसेच माया ही अज्ञान वाढवीत असते आणि अज्ञान कमी करण्याचे सामार्थ्य- शक्ती तिच्यात नसते. अज्ञान नष्ट करण्याचे सामर्थ्य हे केवळ ज्ञानात असते. तथापि, मायेमुळे देव व भक्त यांचा संबंध निर्माण होतो. तेव्हा भगवंताशी साधकांनी स्वामी, संबंधी, सेवक व सर्वस्व असा संबंध धरुन चालावे. माया मनुष्याला गुंतवितही असते. पण ज्याचा आत्मानात्मविवेक दृढ होतो त्याची ती ईश्वराची भेट घडवून देत असते. मायारूपी अंजनाने परमार्थही स्पष्ट होतो. तथापि साधकांनी स्वस्वरूपासाठी साक्षेपी व दक्ष असावे. साधकांचा मी माझा भ्रम नष्ट झाला पाहिजे. माया म्हणजे परमात्मस्वरूपाची सत्ता किंवा मी आहे हे जाणीवमय स्फूरण म्हणजे माया आहे. माया आहे पण व नाही पण. तथापि माया अनिवर्चनीय आहे.

माया ही कल्याणकारीही आहे. मनुष्याला जाणीव मायेमुळेच असते. तेव्हा हीच माया व्यक्त व अव्यक्ताचे ज्ञान करून देते. पारमार्थिक साधनेतही ती मदत करीत असते. ही साधकाला भवसागरहीतूनही तारू शकते. तशी ती पैलतिरीही घेवून जाते. मायेवाचून प्राणिमात्रांचा उद्धार होत नाही. माया केवळ बंधन करीत नसून ती जीवाचे कल्याणही करीत असते. तथापि, तिचा स्वीकार जीव कसा करतो यावर अवलंबून असते. या मायेनेच वेद, उपनिषदे निर्माण केली असून तिच्या सत्तेनेच मनुष्याला ज्ञान प्राप्त होते. मायेच्या साहाय्याने मनुष्य विवेकी व सूज्ञ बनतो. यामुळे मनुष्याचा अंतरंग बहिरंग विकास घडू शकतो. म्हणजे मूढ व्यक्तीही विवेकी होऊ शकते. त्यामुळे मायेशिवाय कोणतेही कार्य संपन्न होऊ शकत नाही. तिच्यामुळे मनुष्याला स्वरूपाची प्राप्ती होऊ शकते.

सदगुरुंनी शिष्याला सावधानतेची सूचना केली आहे. नाशवंत टाकावे. म्हणजे अशाश्वत गोष्टीत गुंतू नये. कशाचीही अभिलाषा धरू नये. तथापि नाशवंत ही आसक्ती असते. तेव्हा अनासक्त राहावे. परंतु नाशवंत व शाश्वत, आसक्त व अनासक्त या दोन्ही गोष्टी पलीकडे स्वस्वरूप आहे. त्याचे ज्ञान होणे आवश्यक आहे. असे हे मायेचे निरूपण आहे. तेव्हा निःसंग निरासक्त कसे व्हावे? हे सदगुरु पुढील प्रकरणात सांगत आहेत.

ब्रह्म निरूपण -

सद्गुरु शिष्याला प्रसन्न अंतःकरणाने, हळुवारपणे ज्ञान प्रदान करीत आहेत. माया काय? तिचे कार्य व लक्षणे काय सांगितल्यावर मनुष्याने निःसंग कसे व्हावे हे प्रथम या निरूपणात सांगत आहेत.

या प्रकरणात ३६ ओव्या आहेत. या प्रकरणात ओवी १ ते ६ संग, निःसंग बाबत विवेचन केले आहे. ओवी ७ ते १६ आत्मस्वरूपाचे विवेचन केले आहे. ओवी १७ ते २१ मायेचे वर्णन आहे, ओवी २२ ते २६ अहंकाराचे विवेचन आहे, ओवी २७ ते ३३ मायातीत कसे व्हावे हे सांगितले आहे, ओवी ३४ मध्ये प्रत्यक्ष स्वरूपनिर्देष, ओवी ३५ मध्ये साधनेची आवश्यकतेचे विवेचन ओवी ३६ मध्ये पुढील समासाचा उपोदधात केला आहे.

जीवाला ज्याची ओढ लागते, त्याचा त्याला संग घडतो. तथापि दृश्य व इंद्रिय गुणधर्माची ओढ, आसक्ती ही सर्व मायिक असते. याचा त्याग करावयाचा म्हणजे नाशवंतचा त्याग आहे. दृश्य सतत बदलत असते. त्याला उत्पत्ती, स्थिती, लय आहे. त्यामुळे ते नाशवंत! तसेच इंद्रिय गुणधर्माची आसक्तीही कायम राहात नाही. त्यामुळे तीही नाशवंत असते. तथापि शाश्वतापासून, शाश्वत आनंद असतो. थोडक्यात एक सांगता येईल की, मनुष्याचा बाह्यसंग हा मनावर अवलंबून असतो. त्यामुळे नाशवंताचा त्याग घडला पाहिजे. त्याचप्रमाणे कर्ता, कार्य व क्रिया या त्रिपुटी प्रमाणे 'मी पणाच्या' वृत्तीचा ध्यास ओढ लागत असते. परंतु स्वरूपाचे ज्ञान मात्र त्रिपुटीपेक्षा वेगळे असून, त्यात एकटेपणाची, मी पणाची जाणीव संपून जाते. यात 'आत्मा व ब्रह्म, 'अहम् ब्रह्मास्मि' हीच एक जाणीव म्हणजे ज्ञान राहते. आता स्वरूपाचा अनुभव ही एक जाणीव आहे. तेव्हा ज्ञान होणे वा जाणीव होणे. हे पण संपते तेव्हाच, परमशांत, सत्यस्वरूप असते, कारण जेव्हा सर्व वृत्ती मनासह विलीन होतात, तेव्हा उन्मनी अवस्था प्राप्त होते. त्यामुळे मनाच्या द्वारे निरतिशय शांतीचा अनुभव ही एक जाणीव असते. परंतु आत्मा मात्र अनुभवातीत असतो. पण येथे होते कसे? तर मानवी जीवन हे एक अनुभव क्षेत्र असून त्यात एक साखळी आहे. यात दुसरे असे असते की मनुष्याला प्रत्यक्ष स्वानुभवाचे वर्णन शब्दांनी करता येत नाही. कारण शब्दांनी वेद-शास्त्र पुराणे हे परमेश्वराचे गुणगान करतात व शेवटी 'नेति नेति' म्हणतात. तथापि, भाषा हे अनुभव सांगण्याचे प्रभावी साधन असले तरी त्याचा ठराविक मर्यादेपर्यंतच प्रभाव राहतो व पुढे हे साधनही अपुरे पडते. त्यामुळे आत्मस्वरूप हे अनुभवातीत, जाणीवेच्या पलीकडचे असून, माया त्याला स्पर्श करू शकत नाही. भाषा अथवा ग्रंथ हे सुद्धा मायेचा अविष्कार आहे.

तेव्हा आत्मस्वरूप कसे आहे तर ते मलरहित, निर्मळ, निर्घोट म्हणजे घनदाट, सर्व व्यापक आहे. ते शुद्ध व पवित्र असते. ते सद्रुप आहे. (दिसत नाही पण अस्तित्व आहे) हे आत्मस्वरूप अनंत व निःशब्द आहे. हे दृश्य - अदृश्य-अचेन-अचेतनाला व्यापून आहे. यात सर्वच एकच एक असते. ते जवळ व लांब एकच असते. माया त्याला मर्यादित आणित असते. त्यापुढे येथे अनेकत्त्व असले तरी एकत्वाची भावना असते. तथापि, येथील आत्मस्वरूपाचा अनुभव हा वेगळा असून हा सर्वांहून अलिप्त असून, तो स्वतंत्र आहे, त्याला कशाचाही स्पर्श होत नाही. हा एकत्वाने अखंड निरंतर असल्याने ते हलत नाही. चालत नाही. बोलत नाही. हे केवळ अतिंद्रिय शक्तीनेच समजू शकते. हे पंचमहाभूतात अतिसूक्ष्म, सर्वांत व्यापक आहे. हे आकाशाप्रमाणे सर्व - सर्वालाच व्यापून आहे. ते सर्वांत असून ते वेगळेपणाने राहू शकत नाही. ते आणखी कसे तर, ते अग्नित असून जळत नाही, वायूत असून हलत नाही. पाण्यात वाहून जात नाही. समरस होत नाही. याची चोरी होत नाही. याला अंत नाही. ते विश्वात असून विश्वापासून भिन्न आहे. तसेच हे आत्मस्वरूप ज्ञानानी जाणता येत नाही आकार गेला तरी ते राहते. त्यामुळे आत्मस्वरूपाविषयी काहीही सांगता येत नाही.

मग आत्मस्वरूप याला अनुभव एकच आहे, म्हणजे मायाच कारण असते. त्यामुळे हा अनुभव केवळ स्वस्वंवेद्य असतो. यात एक होते. मी ब्रह्म म्हणले की अभिमान येतो. देहबुद्धी येते. मग परमार्थ ज्ञान दूषित होते. ही माया ब्रह्मआड येते. यासाठी देहबुध्दिचा त्याग करावा यात माया स्फूरण दोन प्रकाराचे असते 'मी ब्रह्म' हे ज्ञानमय स्फूरण व मी देह हे अज्ञानमय स्फूरण, परंतु आत्मस्वरूप व ब्रह्माच्या अनुभूतीसाठी दोन्हीचा त्याग घडला पाहिजे.परंतु मायेपासून मिळालेल्या सामर्थ्याने जीवाला ब्रह्मज्ञान होते. यातूनच जीवाला शांती लाभते. हीच माया जीवाला बंधनात टाकते. परंतु मनुष्याला यातून सुटण्याची तळमळ लागली पाहिजे आणि प्रयत्नही केले पाहिजेत तेव्हाच तो मायेपासूनच मुक्त होऊ शकतो.

यावरून असे लक्षात येईल की, मायाच सर्व काही करीत आहे. ममत्वाने गुंतवते, जीवाच्या वृत्तीप्रमाणे त्यातून त्याला सोडवते. परंतु मनुष्य म्हणतो मी बद्ध झालो व ममत्वाचा अभिमानही होतो. यावर सदगुरुंनी

सारीपाटाचे उदाहरण दिले असून सोंगट्याचा डाव मांडून लोक खेळतात. त्यात सोंगट्या जिंकाल्या की, माझ्या म्हणून अभिमान होतो तर सोंगटी मेली की दुःखी होतो. वास्तविक सोंगट्या त्या ! त्या निर्जीव पण माझ्यातील ममत्वाने अभिमान येतो व मेल्या कल्पनेने दुःखीही होतो. तसे या संसार-खेळात सोंगट्या, स्त्री, कन्या, पुत्र माझा, माझा अभिमान असतो. जबाबदारी आपलीच समजून सुखदुःखादि भोग भोगतो व जीवनक्रमणा सुरू राहते.

या मायेतून कसे तरून जावे. यावर समर्थ सदगुरु उपाय सांगतात. जीव मायेत पूर्णपणे गुरफटलेला आहे. तेव्हा सारीपाटातील सोंगटीप्रमाणे सांगटीने सोंगटी मारावयाची तसे मायेनीच मायेला (गुरफटविणाऱ्या) दूर करावयाचे बरं मायेने मायेचा निरास करावा तर ती अधिकच चिकटते, पण जे हे सर्व समजून जे चिकटतात ते अज्ञानी होत. पण जे तिच्या बरोबर राहात नाहीत जे तिला चिकटत नाहीत ते तिच्या पासून सुटतात, हे वर्म समजले पाहिजे. यासाठी युक्तीने कर्म करावे लागते हे चक्रव्युह फोडण्यासाठी बाहेरून आत शिरणे व बाहेर हे चलाखीने व गतिने पडणे. या गोष्टी कराव्या लागतात. काट्याने काटा काढावा लागतो, त्याप्रमाणे योजना करावी लागते.(१) तेव्हा मायेचे वर्म ओळखून वागावे लागते. तथापि, माया ही काही पदार्थ वा वस्तू नसून केवळ विवेकानेच तिच्यावर मात करावी हे वर्म त्याचे आहे.(२) कारण ती अतिशय लाघवी आहे. अहंता लगेच येते, येताना ती समजत नाही. अहंतेने तिचा नाशही होत नाही. यासाठी 'आत्मानात्मविवेक' सदैव जागृत हवा. आत्मा नात्मविवेक म्हणजे चांगले काय - वाईट काय ! धर्म काय, अधर्म काय? याचे ज्ञान ?(३) माया मी बद्ध व मी मुक्त ही कल्पनाच असते. अनेकत्वातील एकत्वाचा वेध घेणे यातून जीव तरुन जावू शकतो.

यासाठी सदगुरुंनी एकत्व - अनेकत्व या कल्पना या परस्पर सापेक्ष आहेत. जेथे कल्पना विराम पावते तेथे अनेकत्व हे ज्यात विरून जाते. तेथे काहीही शिल्लक नाही. असे हे स्वरूप ते निःसंग निर्विकार स्वरूप होय. स्वरूप निर्देश सदगुरुंनी केला आहे.

हे सर्व जाणण्यासाठी प्रथम साधनेची गरज असून तुला साधनमार्ग पुढील प्रकरणात सांगणार असून तू स्वरूप प्राप्तीच्या स्वानंदाचा सोहळ्याचा अनुभव घ्याना असे सदगुरू शिष्याला पुढील प्रकरणात सांगत आहेत.

साधन निरूपण -

या प्रकरणात या आत्मस्वरूपाला जाणावयाचे असेल तर साधन काय व कोणती करावी ? हा विचार समर्थांनी मांडला आहे. या निरूपणात ३६ ओव्या आहेत.

ओवी १ ते ६ श्रवण, मनन, निदिध्यासाने आत्मनिवेदन सांगितले असून, ओवी ७ मध्ये ग्रंथ कोणते ऐकावेत, वाचावेत हे सांगितले आहे. ओवी ८ मध्ये शिष्याची साधनविषयी अनास्था वा भ्रांती कशी ते सांगितले असून ओवी ९ ते १३, शिष्यांची भ्रांती निरसन केली आहे. ओवी १४ ते १५ मध्ये शून्यत्वाचे खंडन केले आहे. ओवी १६ ते १७ मध्ये शून्यत्व का निर्माण होते हे सांगितले. ओवी १८ ते १९ दृश्य स्वरूपाबद्दल कथन ओवी २० ते २२ उपासनेविषयी शिष्याची शंका, ओवी २३ ते २९ शंका निरसन केले आहे. ओवी ३० ते ३१ अंतर्दृश्याचे निराकरण करून ओवी ३२ ते ३४ उपासनेचे महत्त्व कथन केले आहे. ओवी ३५ शिष्याचा अनुभव कथन असून ओवी ३६ पुढील प्रकरणाचा उपोदघात व्यक्त केला आहे.

सदगुरु शिष्यास म्हणाले, सर्व साधनांचे सारभूत साधन जे आहे, ज्या साधनांनी, मनुष्य अज्ञानसागर पार करू शकतो. ते साधन तुला सांगतो. असे सांगून सांगण्यास प्रारंभ केला. सर्व प्रथम साधकांनी आत्मस्वरूपाविषयी श्रवण करीत राहावे. सतत त्याचे ध्यान करावे. यामुळे आत्मस्वरूपाच्या ठिकाणी समाधी लागते. तसेच, जीव शांत, तृप्त व समाधानी होतो. श्रवणाला प्रारंभ करून समाधान, आनंदापर्यंत जाणारा हा साधन मार्ग असतो. आत्मज्ञानी संत सज्जनांशी आत्मस्वरूपाविषयी सुखसंवादरूपी पारमार्थिक चर्चा करावी. ही चर्चा मला काही समजले, या भावनेने करू नये. या चर्चेमुळे साधकांची वृत्ती शुद्ध होत जाते. साधक निर्मळ होतो, असे आहे. आत्मस्वरूप हे निर्मळ आहे, यासाठी दृश्याची आसक्ती क्षीण होणे आवश्यक आहे, त्यामुळे मन शुद्ध होत असते. येथे असा साधन मार्ग सांगितला. श्रवण, मनन करणे, निदिध्यास म्हणजे सततचा दृढने अभ्यास करावा. सतसंगतीत राहून अध्यात्मचर्चा करून मन शुद्ध व निर्मळ करावे. यात सातत्य वा प्रयत्नाची आवश्यकता निःसंशय आहे. यासाठी ग्रंथवाचनही करीत जावे.

सतसंगतीत ग्रंथ निरूपण ऐकावे व त्याचे एकट्याने वाचनही करावे. याने साधकावर संस्कार होतो. वृत्ती तादाकार होतात. ग्रंथातील विचारांशी तादाकार एकरूप होणे आवश्यक आहे. असे ग्रंथ वाचावेत की, ज्यामुळे भक्तिज्ञान वैराग्यविषयी परिपोष झाला पाहिजे.

शिष्य सदगुरुंना वंदन करून म्हणतो की, मी नाशवंत आपल्याला दिले, मग मला तर साधन करावयास लागाव त्रास नको.

सदगुरू म्हणतात, अरे बाबा, हे कधी होईल, जे तू नाशवंत दिले म्हणतोस ते तुला समजलं आहे का? त हे नीट समजून घे. म्हणजे तुला साधना करावी लागणार नाही. म्हणजे मनुष्याला नाशवंत समजले पाहिजे. पुढे सदगुरु सांगतात. जेव्हा तू नाशवंत दिले म्हणतोस, त्यातही परत तू शिल्लक राहतोस. सर्व दिल म्हणावे तर देणारा शिल्लक राहतो इतकेच काय पण मी नाशवंत दिले ही जाणीव राहते. म्हणून आत्मदर्शन होत नाही. म्हणजे जे ज्ञान आहे ते द्वैताचे असते त्याचे परिवर्तन अद्वैतात झाले पाहिजे. मी दिले हीच जाणीव पढत मूर्खपणाची आहे. असे मी नाशवंत दिले व घेतले हे दोन्ही शेवटी नाशवंताचेच आहे.

बरं! आता जे द्यावयाचे ते दिले तेव्हा आता मजजवळ काही नाही हे म्हणण्याची गरज नाही. यात शून्यपणाचा प्रत्यय अनुभव येणे आवश्यक आहे. अशा वेळी सर्व प्रकाशमान असणारा आत्मा सर्वत्र व्यापून आहे, यात साधक वा शिष्यपण संपून जातो. साधकावस्था संपते व जीव सिद्धावस्थेत पोहोचतो.

बर मग शून्यत्व का येते ! तर जेव्हा साधक आत्मस्वरूपाशी एकरूप होतो, तेव्हा साधनेचे ध्येय गाठले असे होते. तेव्हा ते शून्यत्व येते तथापि, आत्मस्वरूप पाहिले म्हटले तर द्वैत आले, तेव्हा तेथे द्वैतात मोक्ष नाही. म्हणजे असे की, मोक्ष म्हणजे शाश्वतपणा, संपूर्णता, एकमेवपणा असा आहे. येथे काय होते तर मन बुद्धी द्वारा सूक्ष्म वा अदृश्याचे ज्ञान होते, परंतु आत्मवस्तुचे ज्ञान मात्र त्याच्याशी एकरुप झाल्याशिवाय होत नाही. कारण इंद्रिये, मन, बुद्धी व चित्त ही या ज्ञानाची साधने आहेत पण ते आत्मस्वरुप पाहू शकत नाहीत. या आत्मस्वरूपात सर्व एक होते अस्तित्व संपून जाते तेव्हा स्वरूपाशी एकरूप होत. ही शून्य अवस्था होय.

आता पहा हं ! डोळ्यांना जे जे दिसते ते सारे पंचमहाभौतिक आहे. या पंचमहाभूतांला जे घट्ट धरून बसतात ते फसतात. त्यामुळे आत्म मात्र पंचमहाभूतात्मक नाही. त्यामुळे तो इंद्रियादि गोष्टींना दिसत नाही व दिसणारही नाही. तसेच जो दृश्यावर आसक्त होतो तो मायेत आडकतो व तो जन्ममृत्यूच्या फेऱ्यात सापडतो. याचे मुख्य कारण असे की मनुष्य सुख हे दृश्यात शोधत असतो व आत्मविस्मृतीमुळे तो दुःखी बनतो.

यामुळे शिष्य पुन्हा शंका विचारतो, बहुतेकांनी तर पंचमहाभूतांची सेवा केली आहे. सर्वत्र सामान्य माणसापासून संत महात्म्यापर्यंत पाषाणाच्या मूर्तीची उपासना केली आहे. मग या संत महात्म्यांना या चक्रात अडकावे

लागत नाही. का? ही शंका विचारली आहे.

शिष्याच्या मनातील भाव ओळखून सद्गुरु म्हणाले, साधकाचा सूक्ष्म अहंकार जाण्यासाठी समर्पण हेच साधन आहे. तसेच, ज्याअर्थी अशा मूलगामी शंका शिष्याचे मनात येत आहेत त्याअर्थी शिष्याचे मनात उपासनेविषयी प्रेम निर्माण झाले हे ओळखून गुरुंनी शंका निरसन केली आहे.

सद्गुरुंनी आपल्या गोड व प्रेमळ वाणीने सांगितले की, जीवाने जरी स्थूल देह सोडला तरी तो सूक्ष्म देहानी शिल्लक असतो. त्यामुळे उरलेल्या इच्छा, वासनासाठी त्याला पुन्हा जन्म हा घ्यावा लागतो. म्हणजे वासनादि विकाराचा सूक्ष्म देह हेच या स्थूल देहाचे मूळ आहे. त्यामुळे जीवाने सूक्ष्म देहात राहणे हे अज्ञान आहे. आता कारण देह हेही अज्ञान आहे. तर तो आत्मा मीच आहे हे ज्ञान होणे, हा महाकारण देह आहे. म्हणजे काय तर स्थूल, सूक्ष्म व कारण या देहाच्या अवस्था अज्ञानाच्या कक्षेतील असतात आणि ही केवळ आत्मविस्मृती आहे. म्हणजे अज्ञान व ज्ञान दोन्ही सापेक्ष आहे. तथापि ज्ञानात मी आत्मा ही भावना असावी या पार्श्वभूमीवर एकच वृत्ती अखंड राहते तो महाकारण देह समजावा. या सर्वांत काय आहे तर, मन मुख्य आहे. मनाचा आधार हा दृश्य पसारा असून तो नाहीसा झाला म्हणजे हा दृश्य पसाराही संपून जातो. मग मनुष्य जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटतो. असा मनोतारा झाला की, तो केवळ चिन्मय राहतो. तेव्हा तुर्यातीत अवस्था प्राप्त होणे हे भक्तीचे फळ आहे. भक्तीने संसाराचे मूळ व अज्ञान नाहीसे झाले की, बंधनरहित मायारहित आत्मस्वरूपाचा साक्षात्कार होतो.

आत्मस्मृतीसाठी काय करावयाचे तर सतत अभ्यास करावयास हवा. मग मी तुमचा आहे हे म्हणून सांभाळ कर सांगावे म्हणजे ज्ञानमार्गात वृत्ती जागृती असतात.

आता सद्गुरुंनी अंर्तदृश्याचे निराकरण केले आहे. ते म्हणतात, मोक्ष म्हणजे आसक्तीरहीत होणे. तेव्हा कोणतेही ध्येयाचे लक्ष्य राहात नाही. जेव्हा लक्ष्य अलक्ष्य संपून जाते. तेव्हा आत्मस्वस्वरुप प्राप्त होते. थोडक्यात, मनुष्याचा मीपणा गेला पाहिजे. हा आत्मा समजून दृश्याला धरले की मोक्ष प्राप्त होत नाही. यासाठी सदैव आत्मसमर्पण करावे म्हणजेच आत्मनिवेदन करावे. आत्मनिवेदनाची सवय साधकांनी ठेवावी ही एक उपासनेची पद्धती आहे. आत्मनिवेदनानी मी - पणा संपणे आवश्यक आहे. यात ज्ञान होणे ही जाणीव असते तर विज्ञान होणे म्हणजे अनुभव येणे हे आहे.

आता सद्गुरुंनी उपासनेचे महत्त्व सांगितले. एकदा का मी तेच आहे (अहम् ब्रह्मास्मि) असे अद्वैतज्ञान प्राप्त झाल्यानंतर मी व ते हे अतिसूक्ष्म, भिन्नत्व नष्ट होते व एकत्वाचा अनुभव येतो. तेव्हा येथे ज्ञानाचे विज्ञान होते. यालाच 'आत्मनिवेदन' म्हणतात. येथे मी व तू हा भेद नसतो. एकदा ही स्थिती प्राप्त झाली तर, त्या जीवाला पुनरावृत्ती होत नाही म्हणजेच त्याला जन्म नसतो. परंतु मी तोच आहे या भावनेने भक्ती केली की, तो मुक्त होतो. अशा ज्ञानी भक्तांची प्रभूस अत्यंत प्रीती असते. यासाठी प्रथम सगुण मूर्तीची दास्य भावाने भक्ती करावी ती सुफलित झाली की भक्तही ईश्वर होतो. सगुणात मूर्तीची उपासना, निर्गुणात, आत्मनिवेदन, ध्यानावस्था असते. भक्तीचे दोन प्रकार, एक साधन भक्ती दुसरी साध्य भक्ती. देहात राहून जी भक्ती, त्यात दास्यभाव असावा, याने देहबुद्धी क्षीण होते. जेव्हा निर्गुण ध्यानावस्थेत भक्ती घडू लागते. तेव्हा आत्मबुध्दि प्रकट होते. यात मी तू पणाचा विसर पडतो. थोडक्यात, उपासनाही सगुणाकडून निर्गुणाकडे जाणारी असावी.

आता सद्गुरू शिष्याला सांगतात, 'तू जे नाशवंत दिले म्हणतोस याचा तुझा तूच न्यायनिवाडा कर. नीट विचार कर व तुझा तू अनुभव घे. पुढच्या प्रकरणात शिष्य विचार करून काही अनुभव सांगत आहे. मग सद्गुरु त्यावर विवेचन करतील. यात आत्मज्ञानाचे वर्म सद्गुरु कथन करतील. येथे पूर्णकाम असा शब्द आहे. पूर्णकाम म्हणजे ज्याला वासनेचा मल नाही. असा आत्माराम होय.

स्वानुभवनिरूपण -

आत्माराम या ग्रंथातील अखेरचे प्रकरण यात २८ ओव्या असून स्वानुभवासाठी आवश्यक सूचना सद्गुरु करीत आहेत.

या प्रकरणात ओवी १ ते ६ शिष्य अनुभव सांगत आहे. ओवी ७ ते १८ सद्गुरू उपसंहारात्मक विवेचन करीत आहेत. ओवी १९ ते २२ परत उपदेश आहे. ओवी २३ मध्ये शिष्याला साक्षात्कार झाल्याची ग्वाही सद्गुरु देतात. ओवी २४ ते २५ गुरुशिष्य ऐक्य सोहळा आहे. ओवी २६ जो कोणी शरण जातो त्याला मोक्ष निश्चित आहे. हे सांगून ओवी २७ ते २८ ग्रंथ समाप्ती केली आहे.

आतापर्यंतचे सद्गुरुंचे निवेदन ऐकून शिष्य आपला स्वानुभव सांगू लागला. शिष्यानी प्रथम श्रीगुरुचरणी लागून गुरुंचा जयजयकार केला. आपण माझ्या जीवनाचे सार्थक केले आहे. मला जी आत्मप्रचिती आली ती केवळ आपल्या कृपा कटाक्षाने हे लक्षात घ्यावे. वासनादी गोष्टींमुळे मनाद्वारे मी अनेक जन्म घेतले. मायेने यात मी अडकलो होतो. म्हणजेच (मनाचे परिवर्तन झाले पाहिजे यातच परमार्थाचे सार दडलेले आहे.) पुढे शिष्य म्हणतो, मी सामान्य जीव होतो. परंतु या आत्मस्वरूपाच्या अनुभवामुळे अखेर ईश्वर झालो. आणि जन्ममृत्यूच्या शृंखलेतून मी सुटलो. तसेच मी कर्ता व भोक्ता हे पण संपल्यामुळे सर्वत्र चैतन्यरुपाने मीच व्यापून असल्यानी जाणीव आली. हे ठिकाण म्हणजे स्फूरणरूप असून परावाणी पलिकडे आहे. येथे देहबुद्धी संपून जाते. हे सर्व साक्षीभावाने मी पाहात असतो. मी ब्रह्म हा 'मीपणा' हा अत्यंत सूक्ष्म असून पण यातच आत्मस्वरूपाच्या अनुभवाचे मूळ आहे. आणि ही जाणीव संपते तेव्हा शुद्ध परमात्मस्वरूपाचा अनुभव येतो. असे शिष्य सांगत होता.

हे शिष्याचे बोलणे ऐकून सद्गुरुंनी ओळखले, शिष्याचा सर्व भाव संपून गेले आहेत. म्हणजेच आसक्ती व अभिमान संपला आहे हे सद्गुरु कृपेनेच शक्य असते. ज्याप्रमाणे लोखंडाला परिसाचा स्पर्श झाला की ते लोखंड सुवर्ण बनते, तसे सद्गुरुंच्या कृपाआशीर्वादाने सद्गुरुंच्या अंतःकरणातील अनुभूती सहजगत्या शिष्यही अनुभवू शकतो आणि येथे अधिक गोष्ट अशी होते सद्गुरुप्रमाणे शिष्यही परिस बनतो. शिष्यालाही गुरुत्वाचा अधिकार प्राप्त होतो. शिष्य क्रमाक्रमांनी अंतमुर्ख होतो. तसा इच्छा, वासना विरळ होतात व आत्मस्वरूपातच भाव स्थिर होतात. अशा भाव सामर्थ्याने आत्मदर्शन घडते. परमात्म्याचे स्वरूप हे वेद शास्त्र या सर्वांचे सारभूत तत्त्व आहे. हाच परमात्मा गुणातीत आहे. हा परमात्मा अतिंद्रियांनीच पाहता येतो. हा स्वयंभू असल्याने त्याला कोणी निर्माता नाही. हे स्थान म्हणजे ब्रह्मादि देवांचेही आश्रयस्थान आहे. हेच स्वात्मसुखाचे भांडार आहे. त्यामुळे हा दुर्गम संसारही आनंद सुखरूप होतो. यावेळी जीवपणाची बंधने संपून जातात. तथापि बंधन कोणती तर, जीवाची संदेह वृत्ती, स्थिरभाव नसणे, मन चंचल असते. हे सर्व नष्ट होणे तेव्हा सद्भाव स्थिर होतो. मग समाधान वाटू लागते. यासाठी दृश्याच प्रेम कमी करून मीपणा नष्ट करावा. म्हणजेच हे पाहताना आत्म्याचे ठिकाणी स्फूर्ती अंकुरत नाही हे लक्षात ठेवावे.

तथापि जे मायेत अडकतात त्यांना ईशदर्शन होत नाही. ते वासनादि बंधनात अडकतात. भाग्याने हे ज्ञान ज्याला होते त्याची बंधने संपून जातात व तो श्रीगुरुंना शरण जातो. तो निःसंग होतो म्हणजे त्याचा ज्ञानाचाही संग संपून जातो.

तेव्हा सद्‌गुरु सांगतात, या सर्वांत तूर्या अवस्था हीच शुद्ध सत्वमय असते. कारण जागृत अवस्था - ज्ञानमय असते, स्वप्नावस्था मूढत्वमय असते व सुषुप्ती ही ज्ञानअज्ञान मय असते. या जीव अवस्था आहेत. तर तूर्यात सर्व साक्षीभाव असतो. याला कोणताही संपर्क नसतो. ज्ञान-अज्ञान दोन्ही नाही. तेव्हा तुला सहजपणे निःसंगता आली असल्याने आता तुला कसलेच बंधन नाही. तसेच लक्षात घ्यावे की तू स्वतःला आत्माराम म्हणून ओळखले तरी पण हे जाणणार हा आत्माराम नव्हे. कारण आत्मारामात परमात्म्यात मीपणाला मुळीच वाव नसतो. येथे ज्ञाता ज्ञेय सर्व संपून जाते. तेथे केवळ निर्विकल्प स्थिती असते. आता शब्दांचे विवेचन थांबवितो. तू मला नाशिवंत सर्व दिले असल्याने तुझ्या पुनर्जन्माचे कारण संपले असल्याने तू मुक्त झाला आहेस.

आता नाशवंत दिल्याने मीपणा संपला असून केवळ शाश्वत असे अक्षयपद तुला प्राप्त झाल आहे. हे ऐकून शिष्यांनी गुरुंना लोटांगण घातले आणि दोघही स्वस्वरूपात लिन झाले. दोघांचीही उपाधी संपून गेली. आणि शिष्याला आत्मस्थितीचा अनुभव दिला. असा हा देवदुर्लभ आनंद सोहळा गुरुशिष्य अनुभवत होते. तेव्हा सदगुरुंना जो परिपूर्ण शरण जातो तेव्हा हा अनुभव शिष्य घेवू शकतो.

समर्थ म्हणतात, आता शिष्याने या आत्मारामाचा भावार्थ जाणून घ्यावा, निःसंदेहानी पूर्णकाम रूपी आत्मारामाचे दर्शन घ्यावे, त्याचा निर्मल अंतःकरणानी अनुभव घ्यावा. हे सर्व सद्‌गुरु चरणी समर्पण करीत आहे.

समारोप :-

अशा प्रकारे समर्थांनी आत्मारामाविषयी चिंतन साधकांसाठी सांगितले आहे. याचा सारांश असा आहे की,

(१) साधकाला मी कोण? कोठून आलो ? हे जाणून घेण्याची तळमळ लागली पाहिजे, जिज्ञासा हवी आहे.

(२) या जिज्ञासेच्या पूर्ततेसाठी, मनुष्याने नाशवंताचा त्याग (मायेचा) करून, सद्‌गुरुंना शरण जावे.

(३) माया काय आहे हे जाणून, तिच्यापासून सावध रहावे, ही माया जीवाला गुंतविते व बंधनातून मुक्तही करू शकते. तेव्हा सावध राहावे.

(४) ज्याला जाणावयाचे, त्या ब्रह्माचे, आत्म्याचे स्वरूप जाणून घ्यावे. यासाठी मीपणाचा त्याग केला पाहिजे. मायेतून तरून गेले पाहिजे.

(५) ही माया तरुन जाण्यासाठी श्रवण, मनन, निदीध्यासाचा व आत्मनिवेदनाचा अभ्यास सातत्याने व दृढतेने करावा. संत, सज्जन, ज्ञानी लोकांशी चर्चा करावी. सत्संगती धरावी. सद् ग्रंथांचे वाचन करावे, जेणे करून भक्ती, ज्ञान, वैराग्य विषयी परिपोष होऊ शकेल.

(६) सदगुरु सान्निध्यातही आत्मस्वरूपाचा अनुभव येतो. सर्वत्र एकत्वाची जाणीव होवून गुरु - शिष्य स्वानंद सोहळा अनुभवू शकतात. ही जाणीव स्वसंवेद्यच असते.

असा हा पारमार्थिक दृष्टीने परिपूर्ण ग्रंथ आहे. साधकांनी यातील विचारांशी एकरूप होवून शाश्वतचे ज्ञानानी आत्मारामाचा अनुभव घ्यावा ही समर्थांची इच्छा दिसते. समर्थांचे शब्दात म्हणू या -

इति श्री आत्माराम । रामदासी पूर्णकाम ।
निःसंदेह जाले अंतर्याम । सदगुरुचरणी ।।

- डॉ. अजित कुलकर्णी
३४६ शनिवार पेठ, नवीन मराठी शाळेसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन नं. ०२०-२४४८ ७०३०

टीप :- हे वाचताना आत्माराम या पुस्कातील मूळ ओव्याही वाचाव्यात अथवा आवश्यक तेथे संदर्भ पहावा.

• • •

समर्थ रामदासांचे संदेशप्रधान मानसशास्त्र

- डॉ. ग.वा. करंदीकर



[illegible] (सेवानिवृत्त) [illegible] प्राध्यापक.

एखादी हितचिंतक व्यक्ती आपणाला सांगते की, ''तुम्हाला खरे सुख हवे आहे का? तसे सुख हवे असेल तर तुम्ही आपल्या वासनांना आवर घाला. केवळ कल्पनांचे पतंग उडवू नका. मृगजळाच्या मागे धावू नका. अमर्याद स्वप्ने रंगवू नका'' हे त्या व्यक्तीचे बोलणे ऐकल्यावर आपण त्या व्यक्तीला सांगतो की, ''तुम्ही सांगता ते मला पटते. मला खरे सुख पाहिजे आहे; पण तुम्ही सांगता तशी कृती माझ्या हातून घडत नाही. तशी कृती घडावी, यासाठी एखादी युक्ती आहे का? ती युक्ती सांगाल का आपल्या बोलण्यातील कळकळ त्या व्यक्तीला जाणवली तरच ती युक्ती ती सांगेल. आपण आर्जव करून आग्रहाने पुन्हा पुन्हा विचारले तर ती व्यक्ती आपणास सांगेल,ती म्हणेल, ''अशी एकच युक्ती आहे, ती म्हणजे आपले मन आपणाला सांभाळावे लागेल. त्याच्या बेबंद प्रवृत्तीला आळा घालावा लागेल, मन चंचल आहे. सारखे धावत असते. त्याला बांधून ठेवले पाहिजे.....

खऱ्या सुखाच्या प्राप्तीसाठी ही युक्ती आहे, हे आपणाला समजले की, आपण आपले मन कसे आहे? ते कोठे आहे? ते इतके चंचल का आहे? यासंबंधी विचार करू लागतो. आपण मनाचा शोध घेऊ लागतो. मनाचा शोध ही शारीरिक प्रक्रिया नाही. ती व्यावहारिक प्रक्रिया नाही. प्राश्चात्य विचारवंतांनी आंतरमन, बाह्यमन, सुप्त मन, प्रसुप्त मन असे काही विभाग केले आहेत. मनाची शुद्धता आणि मनाची विकृती यासंबंधीही चर्चा केली आहे. काही शारीरिक विकार हे मनाच्या स्वास्थ्यावर अवलंबून असतात. मनोरुग्णही असतात. पण हा सारा तपशील समजला तरी मन ताब्यात ठेवण्याची, त्याची चंचलता थांबविण्यासाठी युक्ती समजतच नाही! मनाचा शोध घेण्यासाठी आपण भारतीय विचारदर्शनाचा मागोवा घेतला तर, सांख्य दर्शनातील,' प्रकृती पुरुष' संकल्पना प्रथम समजावून घ्याव्या लागतील. 'प्रकृती संबंधी दार्शनिक तपशीलही समजला. परा अपरा प्रकृतीचे विवेचन लक्षात घेतले तरी, मनाचा शोध पूर्णतया समजेलच असे नाही.

श्रीमद्‌भगवद्‌गीतेत अकराव्या अध्यायात भगवंताने अर्जुनाला विश्वरूप दाखविले. त्यापूर्वीच्या म्हणजे दहाव्या अध्यायात भगवंताने अर्जुनाला आपला विभूतियोग सांगितला. त्यातील बाविसाव्या श्लोकात

'इंद्रियाणां मनश्चास्मि भूतानामस्मि चेतना ॥(गीता १०.२२) हा उल्लेख आलेला आहे. ''इंद्रियांमध्ये मन मी आहे आणि भूतमात्राच्या ठिकाणी असलेली चेतना मी आहे.'' असे भगवंत म्हणाले. मनाचा समावेश इंद्रिय समूहात झाला. मन ही भगवंताची विभूती आहे. हे लक्षात घेतले तर, मनाचा शोध म्हणजे भगवंताच्या विभूतिमत्वाचा शोध आहे, हे अवघड आहे, असे वाटू लागते.....

खऱ्या सुखाच्या प्राप्तीसाठी आपला मनाचा शोध सुरूच असतो. मनाचा इंद्रियात समावेश करून त्याला विभूतिमत्व मिळालेले आहे, हे आपणाला समजले. पंच ज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये, आणि त्यांना होकार नकाराची प्रेरणा देणार मन, मनाला अकरावे इंद्रिय मानले, ते तेव्हा बाह्य असते, ते जेव्हा अंतःकरण पंचकात असते, तेव्हा बुद्धी, चित्त, अहंकार यांच्या समूहात असते. अंतःकरणे अन्तर्मुख असतात. मन हे इंद्रियांना आणि अंतःकरण पंचकांना जोडणारा दुवा आहे. ! जणू ते उंबरठ्यावर आहे. ते आत आणि बाहेर आहे, चंचल आहे. त्याला चांगले काय, आणि वाईट काय याचा निवाडा करता येत नसला तरी, जे चांगले आहे, ते त्याला नीट समाजले तर त्या मनाचा ओढा जे उत्तम आहे, त्याच्याकडेच असतो ! अशा मनाचा गीतेने अष्टधा प्रकृतीत समावेश केला आहे. पंचमहाभूतांचे पाच अंश आणि मन, बुद्धी, अहंकार अशी अष्टधा प्रकृती आहे. समर्थ रामदास अष्टधा प्रकृतीत पंचमहाभूते आणि सत्त्व, रज, तम (त्रिगुण) असे आठ घटक मानतात. आपला मनाचा शोध सुरूच असतो. इंद्रियावर हुकमत गाजविणारे, संकल्प - विकल्प करणारे, जे उत्तम आहे, त्याची समजून पटल्यावर त्याच्याकडे आकृष्ट होणारे असे आपले मन आहे. इतके समजले तरीही आपला शोध सुरूच असतो.

माणसाचा देह (प्रकृती) आणि तो देह ज्याच्या सत्तेने चालतो तो पुरुष यासंबंधी गीतेच्या तेराव्या अध्यायात 'क्षेत्र - क्षेत्रज्ञविचार' या नावाने विवेचन आलेले आहे. अनेक मतप्रणलींनी आणि वेदातील बृहत्‌सामसूत्रानेही देहावर कोणाची सत्ता आहे, याबद्दल निर्णायक असे मत दिलेले नाही. संतश्रेष्ठ ज्ञानदेवांनी तेराव्या अध्यायावर विस्तृत असे निरुपण आपल्या भावार्थ दीपिकेत (ज्ञानेश्वरीत) केले आहे. 'क्षेत्र' यासंबंधीचे विवेचन जिज्ञासूंनी अवश्य वाचावे. त्यातील 'मन' याबाबत संत ज्ञानदेवांचे निरुपण आपण पाहू.

जें इंद्रिया आणि बुद्धी । माझारिलेये संधी ।
रजोगुणाच्या खांदी । तरळत असे ॥(ज्ञाने.१३.१०४)
नीळिमा अंबरी । कां मृगतृष्णा लहरी ।
तैसे वायांचि फरारी । वावो जाहलें ॥(ज्ञाने.१३.१०५)
तें बुद्धीसी बाहेरी । अहंकाराचिया उरावरी ।
ऐसा ठायी माझारीं । बळियावलें ॥ (ज्ञाने.१३.१०९)
वाया मन हे नांव । एऱ्हवी कल्पनाचि सावेव ।
जयाचेनि संगे जीव । दशा वस्तू ॥ (ज्ञाने. १३.)

मनाच्या संगतीने वस्तूला म्हणजे ब्रह्माला जीवदशा प्राप्त झाली असे हे मन इंद्रिये आणि बुद्धी यांच्या मधील जागेत रजोगुणाच्या आश्रयाने चंचलभाव धरून वावरते. आकाशाचा निळा रंग जसा खरा नाही, मृगजळाच्या लाटा दिसल्या तरी त्यात जसे पाणी नाही, त्याप्रमाणे मनाश्रयी भाव असतात. हे मन, बुद्धी आणि अहंकार यांच्यामधील जागेत राहून अहंकाराला नित्य प्रेरणा देत असते, ते खरे तर चांचल्यच आहे. मन हे त्याचे नाव व्यर्थ आहे. ते प्रवृत्तीला बळ देते. अनेक इच्छांना मनाच्या पाठबळामुळे समूर्त होता येते. मन आशा वाढविते तसेच भयही निर्माण करते. मनामुळे अहंकार जागा होतो व द्वैत निर्माण होतें. अविद्या बलवान बनते. इंद्रियांना विषयसुखाची ते चटक लावते. मनाच्या

संकल्पाने सृष्टी उभारली जाते, त्याच्या विकल्पाने ती मोडते. मनोरथांची दौड सुरू राहते. सृष्टीची उतरंड किंवा रचना मनामुळेच होते. मन हे भ्रान्ती निर्माण करते. मनामुळे बुद्धीला बाहेर पडावयास वाट सापडत नाही. असे हे विलक्षण मन आहे ! (ज्ञाने. १०४ ते ११५) येथे आपला मनाचा शोध थांबतो.

पण अशा मनाला, समर्थ रामदासांनी 'सज्जन' म्हणून गौरविले, त्याला चुचकारून सत्त्वशीलतेच्या मार्गावर आणण्याचा मनोज्ञ प्रयत्न मनाच्या श्लोकात केला आहे. या दोनशेपाच मनाच्या श्लोकांपैकी कोणत्याही श्लोकाचे चार चरण वाचले किंवा ऐकले की, आपल्याला एक वेगळीच जाणीव होते. आपले आचरण सुधारावे यासाठीचे बौद्धिक रसायन मनाच्या श्लोकात आहे. प्रारंभी विघ्नहर्ता श्रीगजानन आणि चारी वाणींची देवता शारदा यांना वंदन करून मनाच्या श्लोकांचा भक्तीप्रवाह सुरू होतो. रामभक्तीच्या सुपंथावरून प्रत्येकाचे पदार्पण घडावे, असे समर्थांना वाटले आणि त्यांनी हे दोनशेपाच श्लोक लिहिले.

समर्थ रामदासांच्या साहित्यातील समर्थांच्या अंतरंगाचा शोध आस्वादक पद्धतीने आणि अथक परिश्रमांनी ज्यांनी घेतला, त्या समर्थ भक्त शं.श्री. तथा नानासाहेब देव यांनी सुमारे १०० वर्षांपूर्वी, मनाच्या श्लोकावरील आपली मते 'श्री रामदास आणि रामदासी' ग्रंथमालेतून प्रसिद्ध केली. मनाच्या २०५ श्लोकांचे त्यांनी केलेले वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे. ते म्हणतात,' हे श्लोक त्रिकांडात्मक आहेत. १ ते ६६ श्लोक बहुधा कर्मपर आहेत. ६७ ते १३५ श्लोक उपासनापर आहेत व १३६ ते २०५ हे श्लोक ज्ञानपर आहेत. पहिल्या विभागाने परमार्थाकडे मनाचा ओढा लावला आहे. दुसऱ्या विभागात श्रीरामाची थोरवी गाऊन नामस्मरण करावयास सांगितले आहे. १०२ ते ११५ वर्तनासंबंधीचे नियम ठरवून दिले आहेत. ११६ ते १३५ या श्लोकात श्रीरामाचे भक्त वात्सल्य मनावर प्रतिबिंबित केले आहे. १३६ ते २०५ या श्लोकांत आत्मज्ञानाचा बोध करून जीवास ज्ञानवैराग्य सामर्थ्यसंपन्न केले आहे.' (श्री रामदास आणि रामदासी ग्रंथमालेचा पाचवा भाग, प्रस्तावना, पृष्ठ १९ दुसरी आवृत्ती शके १८३२).

आजपर्यंत अनेक अभ्यासकांनी 'मनाच्या श्लोकांवर आपापली भाष्ये लिहिली आहेत. मनाचे श्लोक स्वतः म्हटले किंवा दुसऱ्याच्या तोंडून ऐकले तरी श्रोत्यांच्या मनावर परिणाम घडतो. मनाच्या श्लोकाची भाषेची विशेषता उल्लेखनीय आहे. या श्लोकात 'मना सज्जना' किंवा 'मना' ही संबोधने आहेत. 'तू अमूक कर' किंवा 'तू अमूक करावे' अशी आज्ञार्थी किंवा विध्यर्थी क्रियापदे आलेली आहेत, पण त्यातील आज्ञेचा भाव एखाद्या कठोर शासकाचा किंवा हुकुमशहाचा नाही, लहान बालकाचे हित जपणाऱ्या आईच्या आज्ञेसारखा त्यातील भाव आहे. तो गुरुमाऊलीचा आदेश आहे. शिष्य आपल्यासारखा तेजस्वी व्हावा, असा जिव्हाळा त्या आज्ञेच्या स्वरांतून पाझरत असतो. उपनिषदात गुरुशिष्य संवादासारखी ही उपदेश पद्धती आहे. मनाच्या श्लोकात 'रे' किंवा 'हो' अशा अक्षरांच्या उच्चरातून शिष्याबद्दल वाटणारी आपुलकी पाझरत असते. ती श्रोत्यांच्या अंतःकरणाला जाऊन भिडते. धीर गंभीर आवाजात मनाच्या श्लोकाचे पठण करताना, वेदऋचा किंवा मंत्र घोष ऐकत आहोत, असा प्रत्यय येतो.

''मना त्वा चि रे पूर्व संचित केले ।
तया सारिखे भोगणें प्राप्त झाले ॥''

असे घन गंभीर आवाजात कोणी म्हणून लागले, आपण ते ऐकले की आपल्या सुखदुःखाचा पडताळा घेणारी 'आकाशवाणीच आपण ऐकत आहोत, असे आपणाला वाटते.

समर्थ रामदासांना केवळ आपल्या जवळ असणाऱ्या शिष्यमंडळींना मार्गदर्शन करायचे नव्हते, त्यांना साऱ्या समाजमनावर सत्प्रवृत्तीचे संस्कार करायचे होते. सामान्य माणसाच्या सत्प्रवृत्त मनावर समर्थांचा विश्वास होता. त्यांनी त्या समाजपुरुषाच्या' सज्जन मनाला' हाकारले. 'मना सज्जना' हे एकवचनी संबोधन मानू नये.ते मानवसमूहासाठी उच्चारलेले बहुवचनी संबोधन आहे. ''मनाची शते'' म्हणजे शतशत मनांनी हे श्लोक वाचावे, ऐकावे, म्हणावे असा समर्थांचा आदेश आहे. केवळ समर्थकालीन वर्तमानाचा संबंध या श्लोकांना नाही. हे श्लोक सार्वकालिक आहेत, त्यांना भूतकाळाचे भय नाही. वर्तमानकाळाची तात्कालिकता किंवा क्षणभंगूरता नाही आणि त्यांना भविष्यकाळाची अनिश्चितता नाही. या श्लोकांना काळाचे मापन किंवा बंधन नाही. यातील आशय कालातील स्वरूपाचा आहे.

**नको रे मना द्रव्य ते पुढिलांचे ।
अति स्वार्थबुद्धी न रे पाप साचे ।**

एवढे दोन चरण केव्हाही, कोणीही म्हणावे. ते सतत आपल्या डोळ्यासमोर राहिले तर आजची बोकाळलेली भ्रष्टाचाराची अमंगलता नाहीशी होऊ शकेल!

मनाच्या श्लोकात प्रारंभीचे वंदन आणि रामभक्तीचा उद्देश सांगून झाल्यानंतर सुरूवातीच्या ४ ते १० श्लोकात समर्थांनी 'सदाचार' म्हणजे तो कसा असतो, हे स्पष्ट केले आहे. मनाचे श्लोक म्हणजे वास्तविक ही सदाचार -सूक्ते आहेत. सद्वर्तनांसंबधी सुमारे ७५ - ८० बोधवाक्ये मनाच्या श्लोकात गुंफलेली आहेत. ती जशी बोधवाक्ये आहेत तशीच ती अवखळ मनाला सरळ करणारी आहेत.

**मना वासना दुष्ट कामा न ये रे ।
मना सर्वथा पापबुद्धी नको रे ।
मना धर्मता नीति सोडूं नको हो ।
मना अंतरी सार विचार राहो ॥४॥**

असे हे आदेशफलक सद्वर्तनाच्या शाळेत लावून ठेवले, येता जाता नव्या पिढीने ते वाचले तर नकळत त्यांच्या वर्तनात बदल झालेला दिसून येईल. एखाद्या कथालेखकाने पंचतंत्र, हितोपदेश किंवा ईसापनीती यामधील बोधकथाप्रमाणे प्रत्येक चरणाचा तात्पर्य सांगणारी कथा रचली तर, तो कथासंग्रह,गोष्ट ऐकण्याचे जे वय असते त्या वयातील किशोरांवर चांगले संस्कार घडवू शकेल.मनाच्या श्लोकांत 'सुमानस ' कसे होईल यासंबंधीचे तत्त्वविचार प्रत्येक चरणात गुंफलेले आहेत. त्यामुळे समर्थ रामदासांची ही 'चिरंजीव' वाणी ठरली आहे. समर्थ रामदास उच्च रवाने सांगतात

''मना, सर्वथा 'सत्य' सोडू नको रे ॥''

सत्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे प्रभू रामचंद्राचे संपूर्ण चरित्र त्या रामाची भक्ती करण्यासाठी घेतलेले 'रामनाम' आपल्याला 'सत्याची' सतत जाणीव करून देईल. आपण आपला अहंकार दूर करावा, नम्रपणे रामप्रभूला शरण जावे. प्रभुराम आपल्या भक्ताची कधीही उपेक्षा करीत नाही. (श्लोक २८ ते ३७ आणि श्लोक ११६ ते १२५). आपण त्या सर्वोत्तमाचे दास होऊन राहावे. (श्लोक ४७ ते ५६) रामभक्ती ही कल्पतरूसारखी आहे. (श्लोक ६०). असा समर्थांचा प्रत्यक्ष अनुभव होता. आपणही प्रत्येक दिवसाचा प्रारंभ रामचिंतनाने करावा (श्लोक ६७ ते ७६). हे रामनाम कसे घ्यावे ? केव्हा केव्हा घ्यावे? याचेह सुस्पष्ट मार्गदर्शन समर्थांनी केले आहे. (श्लोक ८९ ते १०१). त्यासाठी पौराणिक दाखलेही दिलेले आहेत. आपल्या हातून सत्कर्म व्हावे म्हणून सदाचारांचा आग्रह करावा लागतो. आपणाला सर्वकाळी मैत्रभाव ठेवणारे लोक भेटतीलच असे नाही. विरुद्ध किंवा न पटणाऱ्या गोष्टी कोणी बोलू लागले की, शब्दाने शब्द वाढतो. वाद वाढतो. वादविवाद होतात. अशा प्रसंगी कसे

वागावे, यासाठी समर्थांनी एक हितकर सूचना केली आहे. वादविवाद वाढला की माणसे एकमेकांपासून दुरावतात म्हणून संवाद - सुसंवाद साधावा. तो उभयतांना मानवणारा असतो. (श्लोक १०८ ते ११५). वादाने अहंकाराचे पोषण होते तर संवादाने विवेकशक्ती वाढते. विवेकामुळे आपल्या आचरणात बदल होतो. त्यालाच समर्थ 'क्रियापालट' असे म्हणतात. (श्लोक १२८ ते १३२) संतांच्या सहवासात राहिल्याने आपली सद्‌बुद्धी वाढते, सन्मार्ग दिसू लागतात. आपल्या पूर्वसूरींनी आत्मज्ञान हे नित्य सुखदायक असते असा सिद्धान्त सांगितला आहे. तो सिद्धान्त हे आपले 'जुने ठेवणे' आहे. आपण अहंकारामुळे त्याच्याकडे दुर्लक्ष करतो. (श्लोक १३७ ते १४१). आपण सद्‌बुद्धी कायम ठेवून स्वरूपाचा शोध घ्यावा, तेथेच रमावे. हा समर्थांना गवसलेला 'अनंत' प्राप्तीचा मार्ग होता. त्या मार्गाकडे आपणही जावे (श्लोक १४६ ते १५०). मात्र त्यासाठी' सज्जन - सहवास' हा परवलीचा शब्द आहे. (श्लोक १६३ ते १६७).असे त्यांनी निक्षून सांगितले आहे.सज्जनांच्या सहवासात असल्याने आपणाला सद्‌गुरुही भेटतात. त्यासाठी सद्‌गुरुंची लक्षणे माहीत करून घ्यावीत. (श्लोक १८० ते १८३). सद्‌गुरु भेटले की आपली अहंता नाहीशी होते. मीपणा विरघळून जातो. ब्रह्मस्वरूप असलेला राम 'सदा सर्वदा आपल्या सान्निध आहे' असे जाणवू लागते. त्या परब्रह्मासंबंधीची १९२, व १९३ या श्लोकात स्पष्टता केलेली आहे. ब्रह्मज्ञानाने मनाचे उन्मन होते ! मग ''तो मी, आहे'' असे न मानता सर्वत्र ''तोच तो आहे'' हे जाणता येते.(श्लोक १९९ ते २००). त्यामुळे मनाला श्रेष्ठ धारिष्ट प्राप्त होते. असा मनाच्या श्लोकांचा वैचारिक प्रवास आहे.

मनाचे श्लोक हे मुख्यतः सदाचार-संपन्नतेसाठी आहेत. त्यासाठी सज्जन संगती आवश्यक आहे. सत्-जनांचा समूह सत्-जनांचा सहवास हेच समर्थांचे जीवनकार्य होते. साधनाकाळात त्यांनी नाशिक पंचवटी भागात गोदावरी नदीच्या संगमावर टाकळीला सूर्योपासना व बलोपासना केली. हनुमंताच्या कृपेने त्यांना प्रभू रामचंद्राचे साक्षात् दर्शन झाले. एक प्रकारचे आत्मिक समाधान त्यांना लाभले. त्यानंतर त्यांनी बारा वर्षे तीर्थयात्रेच्या निमित्ताने भारतभ्रमण केले. पराभूत मनोवृत्ती झालेला भारतीय समाज त्यांनी पाहिला. मंदिरे उध्वस्त झालेली आहेत. मूर्तींचे भजन होत आहे. मंदिराच्या जागी इस्लामी प्रार्थनास्थळे उभी राहात आहेत, हे त्यांनी पाहिले. आपल्या ह्रदयात 'राम' आहे याचा साक्षात्कार झालेला असला तरी समाज मनात 'राम' उरलेला नाही याची समर्थांना तीव्रतेने जाणीव झाली. तीर्थयात्रेनंतर गोदाकाठच्या टाकळीचा मठ, तेथील मारुतीच्या मूर्तीसह आपला पहिला शिष्य उद्धवस्वामी यांच्याकडे त्यांनी स्वाधीन केला आणि समर्थ रामदास कृष्णाकाठी मसूर येथे आले. तेथे रामजन्मोत्सव सुरू झाला. आसपासच्या स्थानिक गावकऱ्यांच्या मदतीने त्यांनी अकरा मारुतीची मंदिरे उभारली. त्यानंतर दोनचार वर्षांत चाफळ येथे नवे प्रभूरामाचे मंदिर स्थानिक जनतेच्या सहकार्याने उभारले. 'जय जय रघुवीर समर्थ' या तारक मंत्राचा घोष घुमू लागला. समर्थ रामदासांना अंगापूरच्या डोहात सापडलेली मूर्तीची प्राणप्रतिष्ठा चाफळच्या मंदिरात झाली. चाफळच्या उत्सवासाठी प्रथम काही वर्षे शासकीय मदत मिळाली होती. एका वर्षी अशी मदत वेळेवर आली नाही. त्यावेळी समर्थांच्या रामभक्तीच्या उमाळ्यातून मनाच्या श्लोकाची उत्स्फूर्त श्लोकवाणी, गावागावातील जनमानसाच्या कानावर पडू लागली. रामजन्मोत्सव मोठ्या प्रमाणात लोकांच्या सहकार्याने पार पडला. अशी मनाच्या श्लोकाची जन्मकथा सांगतात. मनाचे श्लोक ही सदाचार - सूक्ते आहेत. ती कालसापेक्ष नाहीत सार्वकालिक आहे. 'मनाचे श्लोक' ही समर्थांची चिरंजीव वाणी आहे. प्रभू रामचंद्राच्या चरणावर 'दास्य'भक्तीने विश्वास ठेवला तर ऐहिक स्वतंत्रता आणि पारलौकिक मुक्तीचा लाभ होईल असे या वाणीचे अलौकिक सामर्थ्य आहे.

- डॉ. ग.वा. करंदीकर
राहुल नगर, ६ब ९/१०,
कोथरुड,पुणे - ४११ ०३८

• • •


।। श्रीराम।।

।। श्रीराम जयराम जयजयराम ।।

अहिल्योधारक, ऋषिमुनीतारक । रघुकुलदीपक , त्रैलोक्यतारक ।।
जगउद्धारक , एकच नाम..... श्रीराम जयराम जयजयराम ।।१।।
आदर्श बंधू , आदर्श त्राता । आदर्श मित्र , आदर्श पिता ।।
आदर्शत्वाचे , एकच नाम..... श्रीराम जयराम जयजयराम ।।२।।
एकपत्निव्रती, एकबाणी । रघुकुलनंदन , सत्यभाषणी ।।
खलनिर्दालक , एकच नाम..... श्रीराम जयराम जयजयराम ।।३।।
पितृवचनी , आदर्श पुत्र । स्वयंप्रकाशी , हा भूमित्र
आनंददायक , एकच नाम ..... श्रीराम जयराम जयजयराम ।।४।।
सत्यवचनी , सदाचारी । शरसन्धाने , दूरीत वारी ।।
सद्‌धर्मपालक, एकच नाम ..... श्रीराम जयराम जयजयराम ।।५।।
क्षमासिंधू , कैवल्यदाता । भक्तमनोरथ , पूर्तीकर्ता ।।
सृजनउद्धारक, एकच नाम ..... श्रीराम जयराम जयजयराम ।।६।।
मानदंड हा, रघुकुलाचा । अटलमेरू हा , वचनपूर्तीचा ।।
दैन्यदुःखहारक, एकच नाम..... श्रीराम जयराम जयजयराम ।।७।।
भक्तसंरक्षक , आनंदघन । हरिहरांचे हे, एकच लक्षण ।।
मृत्यूभयहारक , एकच नाम ..... श्रीराम जयराम जयजयराम ।।८।।
हनुमंताचे हे , आराध्य जीवन । जानकीचे हे, पंचप्राण ।।
चैतन्यदायक, एकच नाम..... श्रीराम जयराम जयजयराम ।।९।।
सुग्रीवाचे हे, संरक्षकधन । बिभीषणाचे, सन्मित्रस्थान ।।
कृपाछत्राचे , एकच नाम ..... श्रीराम जयराम जयजयराम ।।१०।।
दशाननाचा , मृत्युदाता । अयोध्येचा , जनहीतकर्ता ।।
परमपवित्र , एकच नाम..... श्रीराम जयराम जयजयराम ।।११।।

- वसंत गोडबोले
१२४, शनिवारपेठ (नेनेघाट), पुणे - ३०

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥



शुकासारखे पूर्ण वैराग्य ज्याचे ।
वसिष्ठासम ज्ञान योगेश्वराचे ॥
कवी वाल्मिकीसारखा मान्य ऐसा ।
नमस्कार माझा सद्गुरू रामदासा ॥

ॐ श्रीरामदास स्वामी समर्थ प्रतिमायुक्त

"रामनाम सुदर्शन"

संकल्पना, निर्मिती व हस्ताक्षर

"वसंत गोडबोले

२२४, शनिवार पेठ (नेने घाट) पुणे-३०

श्री समर्थांचा उत्तम पुरुष

- डॉ. सौ. सरोज तपस्वी



श्रीसमर्थ रामदास स्वामींना आपण राष्ट्रगुरू म्हणतो. इतर सर्व संतांमध्ये समर्थांचे हे वेगळेपण प्रकर्षाने उठून दिसते. ह्याचे कारण त्यांनी सामान्य लोकांच्या आध्यात्मिक उन्नतीची जेवढी काळजी घेतली, उपदेश केला, मार्ग दाखवला. तेवढाच राष्ट्राच्या म्हणजे पर्यायाने लोकांच्या भौतिक व सांस्कृतिक प्रगतीचाही विचार केला.

१२ वर्षांच्या टाकळी येथील तपःश्चर्येनंतर त्यांनी जे भारतभ्रमण केले. त्यात देशकाल परिस्थितीचे अवलोकन केले. परसत्तेच्या जुलुमाने पीडलेल्या व दिशा हरवून बसलेल्या समाजाला त्यांनी योग्य मार्ग दाखवला. राष्ट्राच्या उद्धारासाठी व धर्माच्या संस्थापनेसाठी ते आयुष्यभर झटले.

हे सर्व कार्य करण्यासाठी त्यांना गरज होती उत्तम कार्यकर्त्यांची. असे लोक निवडून समर्थ त्यांना शिष्य करून घेत. त्यांना पारमार्थिक मार्गाकडे - आत्मसाक्षात्काराच्या ध्येयापर्यंत पोचण्यास मदत करीतच. पण ज्ञानप्राप्तीनंतर बैरागी होऊन समाजापासून विन्मुख होऊन दूर जाणे किंवा निष्क्रीय होणे त्यांना मान्य नव्हते. ह्या उलट अशा पुरुषांनी लोकनेतेपण स्वीकारून समाजाचा उद्धार करावा ही त्यांची अपेक्षा असे. आपल्या उच्च शिक्षित होण्यात, उत्कर्ष व यशात समाजाचेही योगदान आहे ही जाणीव ठेवून ते सामाजिक ऋण, आपल्या बांधवांच्या विकासासाठी प्रयत्न करून फेडायलाच हवे अशी समर्थांची धारणा आहे. त्याने स्वतः पुरतेच पाहू नये. समर्थ प्रथमच इशारा देतात

आपण यथेष्ट जेवणे । उरले ते अन्न वाटणे ।
परंतु वाया दवडणे । हा धर्म नव्हे ।।१२.१०.१।।
तैसे ज्ञाने तृप्त व्हावे । ते ज्ञान लोकांस सांगावे ।
तरतेन बुडो नेदावे । बुडतयासी ।।१२.१०.२।।

त्यासाठी समर्थ दृष्टांत देतात की आपण इष्ट असेल तेच पोटभर जेवून तृप्त व्हावे. पण उरलेले अन्न वाटावे. वाया जाऊ देऊ नये. पट्टीच्या पोहणाऱ्याने बुडत असलेल्या माणसाला तात्काळ उडी टाकून बाहेर काढायलाच हवे. तसे ज्ञानी माणसाने आपल्या ज्ञानाचा लोकांना उपयोग करून द्यावा.

स्वतः समर्थ हिमालयात देहत्याग करायला निघाले असता प्रत्यक्ष रामरायांनी त्यांना अडवले व 'तुम्हांस जगोद्धार करणे आहे । तुमची तनू ती आमची तनू पाहे ।'

ह्यासाठी आम्ही तुमचे रक्षण केले असे सांगून लोकोद्धारासाठी परत पाठवले.

भगवान रामकृष्णांनी स्वामी विवेकानंदांच्या निर्विकल्प समाधीची किल्ली स्वतःजवळ ठेवून त्यांना 'शिवभावे जीवसेवा' करायला सांगितले.

वयाच्या ८ व्या वर्षी 'चिंता करतो विश्वाची' असे आपल्या मातेला उत्तर देणाऱ्या समर्थांनी पुढे आयुष्यभर लोकांची चिंता केली. त्यांना उत्तम मार्ग दाखवला. त्यासाठी प्रचंड लोकसंग्रह केला. ११०० मठ स्थापले व महंत तयार केले. ही प्रचारकांची संघटना समर्थ संप्रदायाचा कणा आहे.

ह्या आत्मज्ञानी महंतांना समर्थांनी उत्तम पुरुष म्हटले आहे. अशा पुरुषांनी आदर्श गृहस्थाश्रम आचरून दाखवावा. त्यांनी सामान्य जनांच्या उन्नतीसाठी लोकांमध्ये राहून कसे वागावे, कसे बोलावे, कशी जनजागृती करावी ह्यासाठी एक आचारसंहिता श्री समर्थांनी सांगितली.

श्रीमत् दासबोधातील द.१२स.१० हा उत्तम पुरुष निरुपण समास ही लक्षणे सांगणारा आहे. तर द.११.१०,१८.३ व १४.१ ह्या ३ समासांमध्ये निस्पृह लक्षणे सांगितली आहेत. ह्याशिवाय द.११ स.६ हा महंत लक्षणे सांगणारा समास आहे. ह्या सर्वच समासांत समर्थांनी आपल्या महंतांना उपदेश केला आहे.

कॉंग्रेसचा आदर्श कार्यकर्ता कसा असावा याची आचार संहिता तयार करण्यासाठी श्री. गोपाळ कृष्ण गोखले ह्यांनी आपले सचिव समर्थभक्त शंकर श्रीकृष्ण देव ह्यांना दासबोधातील महंत लक्षणाची यादी करायला सांगितली होती.

श्री समर्थांना अपेक्षित असलेल्या उत्तम पुरुषाची लक्षणे आपण पाहू या.

१) आत्मज्ञानी - श्री समर्थांचा हा उत्तम पुरुष आत्मज्ञानसंपन्न आहे आपल्या जीवनाचे सार्थक करून घेतल्यावर लोकोद्धारासाठी हा ज्ञानी पुरुष आपले आयुष्य व्यतीत करतो आहे. नव्हे तशी श्री समर्थांची त्याला आज्ञाच आहे.

२) बोलण्यासारखे वागावे किंवा सदा बोलण्यासारखे चालताहे -

आधी केले मग सांगितले, क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे हे जाणून श्री समर्थांनी जो उपदेश शिष्यांना केला तसे ते स्वतः आधी वागले. म्हणून त्यांचा कटाक्ष होता की शिष्यांनी स्वतः उत्तम गुण अंगी बाणवावे, स्वतः भजन, पूजन, कथा, निरुपण, जपध्यान करावे . नीतीनियमाने, सदाचाराने वागावे, कोणाला दुखवू नये. दांभिकता, गर्व, अभिमान, क्रोध, कठिण वचन या गोष्टी आपल्या जीवनातून पूर्णपणे वर्ज्य करा. तेव्हाच दुसऱ्याला सांगण्याचा अधिकार प्राप्त होईल व लोक तुमचे ऐकतील.

उत्तम गुण स्वयें घ्यावे । ते बहुतांस सांगावे ।
वर्तल्याविण बोलावे । ते शब्द मिथ्या ।।१२.१०.३।।

ब्र. गोंदवलेकर महाराजांकडे एक स्त्री मुलाला घेऊन आली व ह्याला काही समजवा, हा फार गूळ खातो असे म्हणाली. तेव्हा महाराजांनी लगेच काहीही न सांगता आठ दिवस स्वतः गूळ, पुरणपोळी खाल्ली नाही व मग मुलाला गूळ फार खाऊ नको असे सांगितले.

पुढारी किंवा वक्ते व्यासपीठावरून जे उपदेश करतात त्याचा त्यांच्या व्यक्तीगत जीवनात अभाव असतो.ते परोपदेशे पांडित्य असते. त्यामुळे लोकही त्यांचे सांगणे मनावर घेत नाहीत. त्यामुळे त्याग बलीदानाच्या ऐवजी भोगवाद वाढत जातो. ह्या उलट महात्मा गांधी, स्वा. सावरकर, लोकमान्य टिळक जे सांगत त्याचे प्रतिबिंब त्यांच्या जीवनात दिसे.

३) **लोकांसाठी झिजावे** - समर्थ म्हणतात.

जवरि चंदन झिजेना । तव तो सुगंध कळेना ।
चंदन आणि वृक्ष नाना । सगट होती ।।
शरीर परोपकारी लावावे । बहुतांच्या कार्यास यावे ।
उणे पडो नेदावे । कोणी एकाचे ।।१२.१०.५।।

लोकांना आपलेसे करण्यासाठी त्यांच्या अडचणी सोडवाव्या लागतील. संकटसमयी धावून जाणे, मदतीला तत्पर असणे हे आवर्जून करावे लागेल. त्यांच्या अन्यायांना, चुकांना क्षमा करावी लागेल. आळसाला थारा न देता उदंड प्रयत्न करून, जनहिताच्या गोष्टी करून त्यांच्या हृदयात स्थान मिळवावे लागेल. लोकांमध्ये मिसळून विश्वास निर्माण करावा लागेल. म्हणून

स्वये आपण कष्टावे । बहुतांचे सोसीत जावे ।
झिजोन कीर्तीस उरवावे । नाना प्रकारे ।।१२.१०.१८।।
कीर्ती पाहो जाता सुख नाही । सुख पाहता कीर्ती नाही ।
विचारेवीण कोठेचि नाही । समाधान ।।१२.१०.१९।।
त्यासाठी - दुसऱ्याच्या दुःखे दुखवावे । परसंतोषे सुखी व्हावे ।
प्राणीमात्रास मेळवून घ्यावे । बऱ्या शब्दे ।।१२.१०.७।।

हा महत्त्वाचा कानमंत्र समर्थ देतात. दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी होणे, सहानुभूती वाटणे, त्याचे दुःख वाटून घेऊन हलके करणे कठिण नाही, ते जमेल पण दुसऱ्याच्या सुखाने, उत्कर्षाने मनापासून आनंद होणे अवघड असते. आपला मुलगा नापास किंवा जेमतेम पास झाला असताना शेजारचा मुलगा मेरिटमध्ये आला म्हणून पेढे वाटणे किंवा ऑफीसमध्ये सहकाऱ्यास प्रमोशन मिळाले व आपली संधी गेली तरी आनंद वाटणे अवघड असते, पण हे साधायला हवे. द्वेष मत्सराला थारा नको.

४) **सर्वांशी गोड बोलावे** - समाजात काम करणाऱ्याचा सतत लोकांशी संपर्क येणार. लोक जोडण्याचे महत्त्वाचे साधन म्हणजे मधुर वाणी. जिभेवर सतत जणू साखर असावी. (त्याने मधुमेह नक्कीच होणार नाही.) जशा बोलण्याने आपल्याला सुख होते तसेच आपण दुसऱ्याशी बोलावे. समर्थ म्हणतात

जगामध्ये जगमित्र । जिव्हेपाशी आहे सूत्र ।।

नम्रतेचे महत्त्व सांगताना सत्पुरुष लाओत्से आपल्या शिष्यांना सांगतो की, दात कठोर असल्याने दोन वेळा येऊन पडून गेले पण जीभ लवचिक नम्र असल्याने शेवटपर्यंत तोंडात राहिली.

महंताने बोलताना फार जपून बोलावे. शब्द हे दुधारी शस्त्र आहे हे लक्षात ठेवावे. त्याचे बोलणे मृदुमधूर, नम्र, आर्जवी असावे. बोलण्यासंबंधी फार सुंदर ओव्या समर्थांनी ह्या समासात सांगितल्या आहेत. संक्रांतीच्या भेटकार्डावर लिहिण्यासारख्या. समर्थ सांगतात

बरे बोलता सुख वाटते । हे तो प्रत्यक्ष कळते ।
आत्मवत परावे ते । मानीत जावे ।।१२.१०.२२।।
आपणास चिमोटा घेतला । तेणे कासावीस झाला ।
आपणावरून दुसऱ्याला । राखीत जावे ।।१२.१०.२४।।

दुसऱ्याला दुःख देणारे, हृदयाला टोचणारे शब्द बोलले तर ते त्याच्या कायम लक्षात राहतात व माणसे तुटतात. अरे म्हटले की कारे येणारच. हिंदी बोलणारे आपल्या मुलांना सुद्धा 'आप' म्हणून संबोधतात.

पेरिले ते उगवते । बोलण्यासारिखे उत्तर येते ।
तरी मग कर्कश बोलावे ते । काये निमित्त ।।१२.१०.२६।।

समर्थ इशारा देतात -

जे दुसऱ्यास दुःख करी । ते अपवित्र वैखरी ।
आपणास घात करी । कोणी येके प्रसंगी ।।१२.१०.२५।।

शिकारीस गेल्यावर चुकामूक झाल्याने राजाला शोधत आलेल्या शिपाई,सेनापती, प्रधान व प्रत्यक्ष राजाला त्यांच्या बोलण्यावरून अंध असलेला साधू बरोबर ओळखतो हे वाणीचे महात्म्य.

काही लोक स्पष्ट वक्तेपणाच्या नावाखाली 'एक घाव दोन तुकडे' असे कठोर शब्द बोलून मोकळे होतात. कटू सत्य सुद्धा वेगळ्या शब्दात शर्करावगुंठीत (Sugar Coated) भाषेत सांगता येते.

एकदा अकबराला स्वप्नात दिसले की, यमदूत त्याचे सर्व दात उपटताहेत. तोंड रक्तबंबाळ झाले आहे.एकच दात उरला आहे. राज ज्योतिषाला विचारल्यावर त्याने सांगितले तुमचे सर्व नातेवाईक तुमच्या आधी मरणार आहेत. त्याला हाकलून दिले. दुसऱ्या पंडिताने ही घटना शुभसूचक असल्याने सांगून तुम्ही दीर्घायुषी होणार आहात व सगळ्यांना आधार देणार आहात असे सांगितले. त्याला राजपंडित केले गेले. यासाठी शब्द अगदी निवडून बोलावे. उत्तम पुरुषाचा पुरुषार्थ दुसऱ्याला सुखी करण्यात आहे. दुःख देण्यात नाही.

५) **लोकनिंदा सहन करावी** - लोकनेत्याजवळ सहनशक्ती असायलाच हवी समर्थ सांगतात.

बहुतांचे अन्याय क्षमावे । बहुतांचे कार्यभाग करावे ।
आपल्यापरिस व्हावे । पारखे जन ।।१२.१०.८।।
उदंड धिःकारून बोलती । तरी चळो नेदावी शांति ।
दुर्जनास मिळोन जाती । धन्य ते साधू ।।१२.१०.१६।।

समाजात सर्वच लोक आपल्याला अनुकूल नसतात. लोक नावे ठेवतात. शिव्या देतात, नाही नाही ते आरोप करतात. मुद्दाम त्रास देतात. ह्यावेळी सहनशीलता फार महत्त्वाची आहे. समाजाचा नेता रागीट असून चालणार नाही. त्याने टीकेने विचलीत होता कामा नये. शांती ढळू देता कामा नये. आपल्या अंगीकृत कार्यावर निष्ठा ठेवून समाजप्रबोधन, परोपकार करीत राहावे. त्रास सोसावाच लागतो. उलट अशा दुर्जनांना हळूहळू आपलेसे करून घ्यावे. धिःकार केल्याने ज्याचा धिःकार होत नाही त्याला अ धिकारी म्हटले आहे. लोकनेत्याने डोक्यावर बर्फाची पिशवी, तोंडात साखर व पायाला चक्र असे वावरले पाहिजे.

संत एकनाथ महाराजांच्या अंगावर एकवीस वेळा यवन थुंकला तेवढ्या वेळा त्यांनी शांतपणे गंगास्नान केले. शेवटी तोच शरण आला.

सतीबाई शहापूरकरांनी समर्थांना पोतेरे मारून फेकले तरी समर्थांनी शांतपणे ते नदीत धुवून त्याच्या वाती करून त्यांना दिल्या. त्याच सतीबाई समर्थ शिष्या झाल्या. म्हणून समर्थ सांगतात - स्वयें आपण कष्टावे । बहुतांचे सोशीत जावे ।

मदर तेरेसा, बाबा आमटे ह्यांनी लोकनिंदा सहन करूनही आपले सेवाकार्य चालू ठेवले

६) **सामर्थ्याचा सदुपयोग** - माणसाजवळ सत्ता, सामर्थ्य, पैसा ह्या रूपाने शक्ती असते. तो त्याचा पुरुषार्थ असतो. त्याच्या जोरावर तो माजू शकतो व लोकांना उपद्रव देतो, ह्याला समर्थ राक्षसी क्रिया म्हणतात. ह्या उलट ही शक्ती त्याने लोकांच्या कल्याणासाठी वापरून त्यांना सुखी करावे. नाहीतर त्याची अवस्था -

बडा हुवा तो क्या हुवा जैसे पेड खजूर ।
पंथी को छाया नही फल लागे अती दूर ।

अशी होईल. समर्थ सांगतात.

आपल्या पुरुषार्थवैभवे । बहुतांस सुखी करावे ।
परंतु कष्टी करावे । हे राक्षसी क्रिया ॥१२.१०.२७॥

सत्तेच्या जोरावर लोकहितार्ची कामे, धनवंतांनी शाळा, रुग्णालये, धर्मशाळा बांधणे तसेच सामर्थ्याच्या उपयोगाने लोकांचे रक्षण करणे हे अपेक्षित आहे. डिझेल टंचाईच्या काळात रुग्णवाहिका वाटेत बंद पडली असता पोलिस इन्स्पेक्टरने स्वतः सरकारी कोट्यातून डिझेल आणून देणे हा सुखद अनुभव आहे.

७) पृथ्वीमध्ये भगवद्‌भजन वाढवावे - अशा अनेक गुणांनी लोकांना आपलेसे केल्यावर त्यांना सदाचार व भगवद्‌भक्तीचे महत्त्व सांगून भक्तीमार्गाला लावावे. प्रचाराचा व लोकसंग्रहाचा हा महत्त्वाचा उद्देश समर्थ विसरत नाहीत. श्रीसमर्थांनी मर्यादा पुरुषोत्तम, कोदंडधारी रामाचा आदर्श लोकांपुढे ठेवून रामभक्ती करायला सांगितली. ते म्हणतात-

भजाया जगी पाहता राम एकू । करी बाण एकू मुखी शब्द एकू।
क्रिया पाहता उद्धरे सर्व लोकू । धरा जानकी नायकाचा विवेकू
॥म.१३१ श्लोक॥

ह्यासाठी समुदाय निर्माण व्हायला पाहिजेत. लोक एकत्र येण्यासाठी देवाचे उत्सव करावे. महत्त्व वाढवावे. समर्थ म्हणतात - 'रामकथा ब्रह्मांड भेदून पैलाड न्यावी' तुकाराम महाराज म्हणतात.

तेणे आम्ही सुखी । म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखी ।

समर्थ सांगतात - **या कारणे समुदाय । झाला पाहिजे महोछाव।**
हातोपाती देवाधिदेव । वोळेसा करावा ॥१२.१०.३५॥

लोकमान्य टिळकांनी शिवजयंती, गणेशोत्सव लोकसंघटनेसाठी सुरू केले. श्री समर्थांनी रामनवमी उत्सव सुरू केला.

आता महत्त्वाच्या दोन गुणांचा समर्थ उल्लेख करतात.

८) प्रबोधशक्ती - समाज जागरणाचे व्रत स्वीकारलेल्या उत्तम पुरुषाजवळ लोकांना पटेल, रुचेल, त्यांच्या पचनी पडेल असा रीतीने सांगण्याची धाटी असली पाहिजे. त्याचा उत्तम अभ्यास, शास्त्रांचे ज्ञान असले पाहिजे. उत्तम वक्तृत्व पाहिजे. कथा कीर्तनाद्वारे लोकांमध्ये भक्तीची गोडी, राष्ट्रप्रेम उत्पन्न करता आले पाहिजे. समर्थ रोकडी प्रबोधशक्ती असा शब्द वापरतात.

जेणे बहुतांस घडे भक्ती । ते हे रोकडी प्रबोधशक्ती ।
बहुतांचे मनोगत हाती । घेतले पाहिजे ॥१२.१०.३७॥

९) मनोगत हाती घेणे -

दुसऱ्यांचे अंतर जाणावे । तदनुसारचि वर्तावे ।
लोकांस परिक्षीत जावे । नाना प्रकारे ॥१२.१०.९॥

प्रबोधन यशस्वी होण्यासाठी महत्त्वाचा मुद्दा समर्थ सांगतात, तो म्हणजे बहुतांचे मनोगत हाती घ्यावे. लोकांच्या अंतःकरणात शिरून, त्यांचे विचार समजून घेऊन त्यांची मनोवृत्ती पालटली पाहिजे. हे साध्य होण्यासाठी त्यांच्या कलाकलाने घेऊ न त्यांच्याशी विरोध निर्माण होऊ न देता, न भांडता, आपलाच हेका न चालवता, आपल्याकडे वळवता आले पाहिजे. हटनिग्रही पडला तर महंत एकटा पडेल. त्याचे कोणी ऐकणार नाही.

जे जे जनास मानेना । ते ते जनहि मानेना ।
आपण एकला जन नाना । सृष्टीमध्ये ॥१२.१०.४०॥
म्हणोन सांगाती असावे । मानत मानत शिकवावे ।
हळू हळू सेवटा न्यावे । विवेकाने ॥१२.१०.४१॥
' तुटे वाद संवाद तो हितकारी हे लक्षात ठेवावे.'

१०) प्रखर वैराग्य अगर निस्पृहता - हा गुण उत्तम पुरुषाच्या अंगी असणे अनिवार्य आहे. अत्यंत निस्वार्थीपणा, अलिप्तपणा, अनासक्ती फक्त सेवाभाव व समाजाविषयीची अंतःकरणापासूनची कळकळ ह्या गोष्टी उत्तम पुरुषाजवळ असल्या तरच अंगीकृत कार्यात यश येईल. समर्थ शिष्यांना बजावतात.

आमची प्रतिज्ञा ऐसी । कांही न मागावे शिष्यांसी ।
आपणामागे जगदीशासी । भजत जावे ॥१२.१०.३४॥

थोडक्यात असा उत्तम पुरुष स्वतः आत्मज्ञानी असून त्याची विशाल वृत्ती, संपूर्ण स्वार्थरहित कार्य, वैराग्य, निस्पृहता, प्रयत्नशीलता, साक्षेप, शांती, क्षमाशिलता, बोलण्याप्रमाणे वागणे, मृदू व नम्र बोलणे, आर्जवी वृत्ती, प्रबोध शक्ती, लोकांचे मनोगत ओळखून वागण्याची कला ह्या गुणांमुळे तो समाजात मान्यता पावतो. समर्थ म्हणतात.

जो उत्तम गुणे शोभला । तोचि पुरुष महाभला ।
कित्येक लोक तयाला । शोधीत फिरती ॥१२.१०.२९॥

लोक अशा पुरुषाला भेटतात, त्याचे अंकीत होतात व त्याच्याकडून मार्गदर्शनाची, उपदेशाची इच्छा करतात, तो सांगेल ते ऐकतात. भगवंताच्या भक्तीला लागतात. आपले लौकिक जीवन यशस्वी करतात व परमार्थही साधतात.

ही सर्व लक्षणे महंतांसाठी तर आहेतच परंतु ज्याला जीवनात यशस्वी व्हायचे आहे, प्रपंच परमार्थ दोन्ही उत्तम करायचे आहे. त्याला आयुष्यभर मार्गदर्शन करणारी आहेत. व्यक्तिमत्व विकासाबद्दल आजकाल एवढे बोलले जाते, पण त्याकाळी समर्थांनी व्यक्तिमत्व विकासाची मार्गदर्शनपर सूत्रे ह्या समासात सांगितली आहेत, ती पाहून मन थक्क होते. असे उत्तम पुरुष - लोकनेते जर तयार झाले तर राष्ट्राचे भवितव्य निश्चितच उज्ज्वल होईल.

- डॉ. सौ. सरोज तपस्वी,
सुश्रुषा हॉस्पिटल, सारंग सोसायटी
पुणे - ४११ ००९

•••

समर्थ रामदास - व्यक्ति दर्शन

-डॉ. कमलताई वैद्य



समर्थांसारख्या अलौकिक व्यक्तिचे शब्दांच्या माध्यमातून दर्शन घडविणे म्हणजे 'गागर में सागर' भरण्या इतके किंवा सूर्यबिंबाला बचकेत पकडण्याचा प्रयत्न करण्याप्रमाणे असंभाव्यच आहे. पण त्यांच्याविषयीची आत्मीयता, प्रेम व आदर यामुळे हे धाडस केले जात आहे. समर्थांचे स्मरण, चिंतन या निमित्ताने घडून चित्तशुद्धी व्हावी हा हेतुही यामागे आहेच. भगवंतांचे गुण जसे अनंत आहेत तसेच भगवतस्वरूप संतांचे गुणही अनंतच असतात. या छोट्याशा लेखांत त्यांच्या काही ठळक गुणांचेच वर्णन येऊ शकेल. काही महत्त्वाचे गुण राहाण्याचीही शक्यता आहे. हे वाचकांनी कृपया लक्षात घ्यावे.

'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' - पू. अनंतदास यांच्या 'दासायन' (पूर्वार्ध) या ग्रंथात ठोसर घराण्याच्या बावीस पिढ्यांच्या इतिहासाचा मागोवा घेण्यात आला असून सुमारे सव्वासहाशे वर्षांची संगतवार महिती पुराव्यासह प्राप्त झाल्याचा उल्लेख असून मूळ पुरुषापासून तेविसावे पुरुष सूर्याजीपंत हे समर्थांचे वडील होते असे नमूद केले आहे. या सर्व पूर्वजांमध्ये कर्तबगारी आणि भगवन्निष्ठा हे दोन गुण प्रामुख्याने आढळून येतात असे नमूद केले आहे.

समर्थांचे वडील श्री. सूर्याजीपंत हे सूर्योपासक आणि श्रीरामोपासकही होते. रोज बाराशे गायत्री जप, बाराशे सूर्यनमस्कार अर्घ्यप्रदान, सूर्यावलोकनपूर्वक आदित्यहृदयाचा पाठ, राम मंत्राचा जप अशी त्यांची नित्योपासना वयाच्या ३६ व्या वर्षापर्यंत अव्याहत सुरू होती. व्रताच्या सांगतेच्यावेळी तेजस्वी वृद्ध ब्राह्मणाच्या रूपात श्रीसूर्यनारायणांनी त्यांना दर्शन देऊन 'वरं ब्रूहि म्हणून वर मागण्यास सांगितले तेव्हा प्रल्हादाप्रमाणेच त्यांनी' देणेच असेल तर काहीही मागण्याची इच्छा राहू नये हेच मागणे मागितले. तेव्हा सूर्यनारायणांनी पत्नीस बोलावून तिची काय इच्छा आहे ते विचारण्यास सांगितले. त्यांची पत्नी त्यांना साजेशीच होती. तिनेही प्रथम काही इच्छा नाही असे म्हटले. पण परत आग्रह केल्यावर परम भगवद् भक्त एखादा पुत्र द्यावा. अशी प्रार्थना केली.

तेव्हा श्रीसूर्यनारायण संतुष्ट होऊन त्यांनी त्यांच्या अंशेकरून एक आणि हनुमंतांच्या अंशेकरून एक असे दोन पुत्र तुम्हास होतील. ते परम भागवत आणि श्रीराम उपासक होऊन मोठा गृहस्थाश्रमी होऊन गंगा (गोदावरी) तीरी राहील व दुसरा कृष्णातीरी राहून जगदोद्धार करील व तुम्हाला श्रीरामदर्शनही होईल असा वर दिला.

त्याप्रमाणे गंगाधर उर्फ श्रेष्ठ व नारायण उर्फ रामदास असे दोन पुत्र त्यांना झाले. श्री सूर्याजीपंत, श्रेष्ठ व नारायण या तिघांनाही श्रीराम प्रभूंनी स्वतः प्रकट होऊन अनुग्रह दिला ! यापरते भाग्य ते कोणते? नारायण - विधि-वसिष्ठ-राम अशी या सर्वांची गुरुपरंपरा आहे.

मातृ-पितृ भक्ती-भ्रातृ प्रेम - अशी मातापितरे आणि श्रेष्ठांसारखे जणू दुसरे सूर्यनारायणच असे बंधू - समर्थांना लाभले होते. या सर्वांचेच परस्परांच्यावर अतिशय प्रेम होते. पण समर्थांच्या ठिकाणी असलेल्या प्रखर वैराग्याने त्यांना घर सोडून जाण्यास भाग पाडले. समर्थांच्या वडीलांचे त्यांच्यावर खूप प्रेम होते. समर्थ लहानपणी फार अवखळ, हूड होते. त्यांच्या खोड्यांनी बेजार होऊन त्यांची आई कधी त्यांना मारण्यास वा बांधून घालण्यासही प्रवृत्त होई. पण वडील त्यांना पाठीशी घालत असत. पण तरी मातेवर त्यांचे फार प्रेम होते. स्वतःला विवाहाची इच्छा नसताही आईने 'तुझ्या मस्तकावर अक्षता पडलेल्या मला पाहू दे.' अंतरपाट धरेपर्यंत तू कांही बोलू नको. असे सांगितलेले त्यांनी मान्य केले आणि आपला शब्द पाळला. पण अंतरपाट धरुन शुभमंगल सावधान हे शब्द कानांवर पडताच त्यांनी मंडपातून इतक्या वेगाने सूं बाल्या केला की कुणालाही त्यांचा पत्ता लागला नाही.

पुढे तेवीस वर्षांनी मायलेकरांची, भावाभावांची भेट झाली. तेव्हा पुत्रशोकाने रडून रडून दृष्टी गेलेल्या आपल्या मातेच्या डोळ्यांवरून हात फिरवून तिला दृष्टी देऊन पुत्रदर्शनाची तिची इच्छा पूर्ण केली. तिला पुढे रामदर्शन घडविले. कपिलगीता सांगून ज्ञानोपदेश केला व तिच्या अंतकाळीही उपस्थित झाले.

जेव्हा श्रेष्ठ आणि त्यांच्या पत्नीस देवाज्ञा झाली तेव्हा त्यांच्या दोन्ही मुलांचाही समर्थांनीच नव्हे तर शिव छत्रपतीनीही योग्य परामर्श घेतला. येथे हेही नमूद करणे योग्य ठरेल की परस्त्री मातेसमान व परद्रव्य विषासमान समर्थ मानत होते. तसेच स्त्रियांच्या बाबतीत त्याचा दृष्टिकोन अत्यंत उदार होता. त्यांच्या ग्रंथात स्त्रियांची किंवा स्त्रीदेहाची निंदा केलेली आढळत नाही. योग्य अधिकार जाणून त्यांनी स्त्रियांना अनुग्रह तर दिलेच पण वेणाबाईचा अधिकार जाणून त्यांना महंत अर्थात मठाधिपतीही केले. त्या काळी ही गोष्ट फारच महत्त्वाची मानली गेली आणि ते योग्यही होते. मात्र मर्यादापालनाबद्दल त्यांचा कटाक्ष होताच.

अनन्य रामभक्ती - समर्थांचे स्मरण झाले की त्यांनी केलेला 'जय जय रघुवीर समर्थ' हा जयघोष आणि त्यांनी स्थापलेले अकराच नव्हे तर इतरही अनेक मारुती यांचे स्मरण होणे अनिवार्य आहे. तसेच एकमेकांची भेट झाल्यावर 'राम राम' म्हणण्याची प्रथाही त्यांनीच सुरू केली असे म्हणतात. उत्कट, भव्य ते घ्यावे असे म्हणणाऱ्या समर्थांच्यामुळे गावोगावी बलोपासना आणि राम - मारुती उपासना सुरू होऊन स्वधर्म व स्वसंस्कृती यांचे महत्त्व लोकांच्या अंतःकरणावर ठसले यात शंका नाही. दासबोधात समर्थांनी स्वतःच 'रघुनाथ भजने ज्ञान जाले । रघुनाथ भजने महत्त्व वाढले । म्हणोनियां तुवा केले । पाहिजे आधी ॥३१॥ हे तो आहे सप्रचीत । आणि तुज वाटेना प्रचीत । तरी साक्षात्कारे नेमस्त । प्रत्ययो करावा ॥३२॥ 'असे आपल्या अनुयायांना अनेक वेळा अनेक ठिकाणी ठासून सांगितले आहे.' समाधान झाले प्रत्ययासी आले । धन्य ते पाडले राघवाची ॥१०॥ राघवाची पदे मानसी धरीन । विश्व उद्धरीन हेळामात्रे । असे उद्गार समर्थांनी काढले आहेत. यावरून त्यांची भगवन्निष्ठा व्यक्त होते. पंढरपूरला

विठ्ठल दर्शन घेतांना येथे उभा का श्रीराम हे त्यांनी म्हटलेले पद व पांडुरंगाने त्यांना श्रीराम रूपात दर्शन दिल्याची हकिगत सर्वांना माहीतच आहे. पण ते अनन्य रामभक्त होते तरी सर्व देवांविषयी त्यांच्या अंतःकरणात समसमान प्रेमादर होता. 'सुखकर्ता दुखहर्ता' ही गणपतीची त्यांनी केलेली आरती, 'तुझा तू वाढवी राजा' ही त्यांनी केलेली देवीची प्रार्थना, लवथवती विक्राळा ही शंकराची आरती अशी अनेक उदाहरणे देता येतील. पण सर्वत्र ते स्वतःचा 'रामदास' असाच उल्लेख करतात. हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. गोस्वामी तुलसीदासांचीही सर्व देवतांच्या स्तुतिपर पदे असली तरी सर्व देवतांकडे त्यांनी 'रामचरणतिय' मागितली आहे. या दोन्ही परम रामभक्तांनी आपापले संप्रदाय वाढविले पण कुणाचाही द्वेष केला नाही.

एकांताची आवड - समर्थांना एकांताची अत्यंत आवड होती. ज्या टिकाणी दिवसाही जावयास भीती वाटेल, अशा दऱ्याखोऱ्यांतून, घळीतून ते राहात असत. अशा दहा बारा घळी तरी प्रसिद्ध आहेत. उदंड लोकसंग्रह करूनही ते त्यात गुंतून राहात नसत. अचानक केव्हा कुठे निघून जात त्याचा पत्ताच लागत नसे. 'निःस्पृहस्य तृणं जगत्' हे त्यांच्या बाबतीत अक्षरशः खरे आहे. एकांतात जाऊन ते ध्यानमग्न होऊन बसले की त्यांना लोक हुडकत जात असत. कारण आपल्या प्रेमळ वागणुकीने त्यांनी लोकांची मने इतकी आकर्षून घेतलेली होती ; की त्यांचे केव्हा दर्शन होते अशी उत्कंठा लोकांना लागून राहात असे.

जनहिताची कळकळ - अनंतदास महाराज म्हणतात की एका वाक्यात समर्थांच्या जीवनाचे सार सांगावयाचे तर 'विश्वहित चिंता' या एका शब्दात सांगता येईल. बालपणीही एकांतात बसून काय करतोस रे ? असे मातेने विचारले तेव्हा 'आई, चिंता करतो विश्वाची' हे उत्तर तिच्या बाळाने दिले होते. पुरश्चरण काळातही सकळ जन सुखावे तो कसा काळ फावे । भजनजन उकावे सर्व आनंद पावे,' अशी स्थिती कशी आणि केव्हा होईल हाच वेध त्यांना लागलेला होता. सुदैवांनी रामप्रभूंनी त्यांची प्रार्थना ऐकली म्हणून समर्थ म्हणाले 'राघवाचा वर पावलो सत्वर । जनांचा उद्धार करावया,' आणि प्रभूनीच त्यांना कृष्णातीरी जाऊन कार्य करण्याची आज्ञा केली.

अलौकिक विद्वत्ता - धर्मसंस्थापना करणारे जे लोकोत्तर पुरुष असतात ते ईश्वराचेच अवतार असतात. समर्थही बुद्धीमंतांमध्ये श्रेष्ठ अशा हनुमंतांचेच अवतार असल्याने त्यांच्या विद्वत्तेचे मूल्यमापन कोण आणि कसे करू शकेल ? केवळ 'दासबोध' हा ग्रंथराज जरी नुसता वाचला तरी त्यांची विद्वत्ता पाहून आपण आश्चर्यचकित होतो. प्रपंच आणि परमार्थ यांतील एकही महत्त्वाचा मुद्दा त्यांच्या विवेचनातून सुटला असेल असे वाटत नाही. त्यात त्यांनी दिलेल्या संदर्भ ग्रंथनामांवरूनही त्यांच्या प्रचंड व्यासंगाची आणि प्रकाण्ड पांडित्याची कल्पना येते. तसेच अवघड विषय सोपा करून सांगण्याचे त्यांचे कौशल्यही नजरेत भरते. अगदी लिहावे कसे, वाचावे कसे येथपासून इमारतींचे बांधकाम, वनस्पतिंचे ज्ञान इत्यादी पासून गड, कोट, किल्ले, राजकारणापर्यंत सर्व प्रापंचिक विषयाचे विवरण, 'अहं ब्रह्मास्मि' हे महावाक्य सांख्याची उभारणी, संहारिणी आणि भगवद् भक्तांची नवविधा भक्ती, पंचीकरण आदि सर्व अध्यात्मिक विषयांचे निरूपण वैराग्याची चर्चा, वगैरे सर्व विषय व्याप्ती पाहून मन थक्क होते आणि मुख्य म्हणजे शास्त्रप्रचिती, गुरुप्रचिती यांच्यापेक्षा आत्मप्रचितीवर समर्थांनी जो जोर दिला आहे. त्यामुळे सर्वच विवेचन अत्यंत परिणामकारक झाले आहे. समर्थ म्हणतात. 'भक्ताचेनि स्वाभिमाने । कृपा केली दाशरथीने । समर्थ कृपेची वचने । तो हा दासबोध ' ॥३०॥ या वीस दशकी दासबोधाचा श्रवणद्वारे शोध घेतला तर मनन करणारास परमार्थ प्राप्त होतो असे त्यांनी म्हणून सर्वश्रेय जगदीशाला, श्रीरामप्रभूंना दिले आहे व वाचकांनी प्रत्यय घेऊन पाहावा. असेही आत्मविश्वासाने म्हटले आहे.

भक्तीरसार्द्र अंतःकरण - ज्ञान आणि वैराग्याप्रमाणेच समर्थांच्या भक्ती रसार्द्रतेलाही तोड नाही. त्यांचे मनाचे श्लोक, करुणाष्टके, स्फुटरचना वगैरे वाचून वा ऐकून ज्याचे नेत्र अश्रूंनी डबडबणार नाही असा मनुष्य विरळाच सापडेल. त्यांची भाषा ही त्या त्या रसाचा परिपोष करणारी मृदू वा ओजस्वी जशी आवश्यक त्याप्रमाणेच साजेलशी असते. माधुर्य, प्रसाद, ओज कुठल्याही काव्यगुणामध्ये ती कमी पडत नाही !

जीवनांतील चतुःसूत्री - दासबोधात 'मुख्य हरिकथा निरूपण । दुसरे ते राजकारण । तिसरे ते सावधपण । सर्व विषयी' असे समर्थांनीच म्हटले आहे. श्री अनंतदास महाराज म्हणतात की 'देव - धर्म - गो - ब्राह्मण । करावया संरक्षण । हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली ।' या चार गोष्टींचे संरक्षण करण्याची प्रेरणा परमात्म्यांनी मला आणि तुम्हांला दिली व हाच महाराष्ट्र धर्म होय, असे ज्या अर्थी समर्थांनी शिवरायांना सांगितले आहे त्याअर्थी हीच समर्थांसारख्या ब्रह्मनिष्ठास आणि शिवाजीराजांसारख्या क्षत्रियोत्तमास महत्त्वाची वाटणारी चतुःसूत्री असून त्यासाठी आवश्यक ते राजकारण या दोघा महापुरुषांनी केले आहे. (मूळ दासायनांतील राजकारण कांडातील या चतुःसूत्रीवरील विवेचन पाहावे) अनंतदास महाराज म्हणतात की, श्री शिवछत्रपतींच्या गोब्राह्मणप्रतिपालक या बिरुदावलीतील गो आणि ब्राह्मण ही पदे ह्या चतुःसूत्रीची निदर्शक आहेत. असो हा खूप महत्त्वाचा विषय आहे. या छोट्याशा लेखात त्याचे सविस्तर विवेचन करता येत नाही. पण थोडक्यात असे म्हणता येईल की, प्रथम खरा देव जो आत्माराम त्याची ओळख मनुष्यांनी करून घ्यावी, वर्णाश्रम धर्मानुसार आपले जे कर्तव्य असेल ते उत्तम प्रकारे करीत असावे. म्हणूनच मानव धर्माचे (म्हणजे अहिंसा,सत्य, चोरी न करणे, शुद्धता, इंद्रियनिग्रह, दान,दया, मन संयम, सहनशीलता, आदि गुण आत्मसात करणे) परिपालन करावे व नंतर गो आणि ब्राह्मण यांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ते राजकारणही करावे. विद्या आणि चारित्र्यसंपन्न आणि सर्वत्र समदृष्टी ठेवणारे, तिन्ही वेदांचे मर्मज्ञ आणि आपल्या वर्णाश्रमधर्माचे निष्ठेने पालन करणारे ते ब्राह्मण होत असे तेथे म्हटले आहे असो -

समर्थांचा प्रयत्नवाद- 'दुसऱ्यांचे दुःखे दुखवे। दुसऱ्याच्या सुखे सुखावे । जग अवघेचि सुखी असावे ।' अशी समर्थांची वासना होती . त्यासाठी लोकांनी उद्योगाची कास धरावी अशी त्यांची अपेक्षा होती. 'यत्न तो देव जाणावा । अंतरी धरिता बळे' असे ते ठासून सांगतात. सावधपणा आणि प्रयत्नवाद यावर समर्थांनी जितका भर दिला आहे, तितका इतरांच्या साहित्यात फारसा आढळून येत नाही. प्रयत्नाने अवगुण त्याग करून सद्गुण संपादन करता येतात हे त्यांनी पुनःपुन्हा सांगितले आहे. 'तने मने झिजावे । तेणे भले म्हणोनि घ्यावे । दुसऱ्यास सुखी करावे । तेणे आपण सुखी व्हावे ।' असे ते म्हणतात . आळस टाकून माणसाने सतत उद्योगशील असावे म्हणजे यश मिळाल्याशिवाय राहात नाही. असे ते ठामपणे सांगतात. त्यांचे वाङ्‌मय म्हणजे त्यावेळच्या महंतांच्या आणि अर्वाचीन राष्ट्र सेवकांचा मार्गदर्शक ज्ञानकोश आहे असे श्री. अनंतदास महाराजांनी म्हटले आहे ते यथार्थच आहे.

संघटन कौशल्य : समर्थांच्या शिष्यवर्गात रावापासून रंकापर्यंत, अडाणी कुणबी, धनगरापासून महान् पंडितांपर्यंत, स्त्रिया, बाल, वृद्ध सर्वांचाच समावेश होता. समर्थांनी या सर्वांची मने इतकी जिंकली होती की त्यांच्या शब्दाखातर प्रसंगी ते प्राणत्यागासही तयार होते. अशा असंख्य शिष्यांतून महंतांची निवड करून सर्व भारतभर समर्थांनी जवळजवळ अकराशे मठ स्थापन केले होते. समर्थ लोकोत्तर पुरुष होते. प्रसंगी वज्रापेक्षा कठोर तर कधी पुष्पाहून कोमल असे त्यांचे

अंतःकरण होते. त्यांची शिस्त अत्यंत कडक होती. शिष्यांची ते निरनिराळ्या प्रकारे परीक्षाही पाहात. त्यांना धडा शिकवत. पण परत क्षमा करून कृपेचा प्रेमाचा वर्षावही करत. माणसे राजी कशी राखावी हे त्यांच्या इतके कुणाला जमत असेल असे वाटत नाही. निर्गुण जाणून सगुणास भजावे. ज्ञान झाल्यावरही साधन सुटता कामा नये. चारित्र्य शुद्ध हवे. निर्लोभ हवा. भिक्षेवर महंतांनी उदरनिर्वाह करावा. पण ती भिक्षाही मुष्टिभरच घ्यावी. अधिक घेऊ नये असे अनेक नियम त्यांनी घालून दिले होते व ते त्यांचे स्वतःही पालन करीत. शिवरायांकडून जास्त आलेली इनामे वतने त्यांनी कित्येकदा परत केली.

शिष्यवात्सल्य – 'आपणासारिखे करिती तात्काळ' अशी कृपा त्यांनी अनेकांवर केली, 'मोक्षप्रिया अलंकृत । ऐसे हे संत श्रीमंत । जीव दरिद्री असंख्यात । नृपती केले ॥' हे वर्णन त्यांनाच तंतोतंत लागू पडते. अशा परमार्थ मार्गात नृपती झालेल्या शिष्यांचे नामनिर्देश तरी किती जणांचे करणार? कल्याणस्वामी, उद्धवस्वामी, दिवाकर गोसावी, वेणाबाई, आक्काबाई, शिवाजी राजे व यांच्या सारख्या असंख्य शिष्यांची, ईश्वरनिष्ठांची मांदियाळीच त्यांनी निर्मिली. शिवाय समर्थ पंचक व तुकाराम महाराजांसारखे समकालीन संत यांच्याशीही त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते.

शिव – समर्थ – योग म्हणजे माणिकांचन योगच होता. दोघांचे देह भिन्न पण अंतःकरणाने ते अभिन्नच होते असे म्हणावे लागेल. त्यांचा जन्मच जणू एकमेकांसाठी झाला होता. एकमेकांच्या मुळे दुसऱ्याच्या कार्याची पूर्तता झाली. ब्रह्मतेज व क्षात्रतेज त्या उभयतांच्या रूपाने एकत्र आले आणि महाराष्ट्र धर्म वाढून महाराष्ट्राचा अभ्युदय झाला. समर्थ व शिवाजी राजे यांच्यातील पत्रव्यवहार पाहिला की त्यांच्यातील अन्योन्य विशुद्ध प्रेमाची थोडीफार कल्पना येते. श्रीमंत योगी म्हणून शिवरायाची जी प्रशंसा समर्थांनी केली आहे ती वाचण्यासारखी आहे. दासायतनांत उल्लेख आहे की शिवछत्रपतींना देवाज्ञा झाल्यावर ती वार्ता कळताच श्रीसमर्थ तीन महिने कुणाला भेटले नाहीत, कुणाशी बोलणेही सोडले. आहारही जवळजवळ सोडला होता. फारच कुणी आग्रह केला तर थोडे दूध फक्त घेत. या शिष्यवात्सल्याला कुठली उपमा द्यावी?

आणखी कित्येक महत्त्वाचे मुद्दे राहिले आहेत पण कुठेतरी लेखनमर्यादा घालायलाच हवी. समर्थांच्या समकालीन तुकाराम महाराजांनी जे समर्थांच्या रूपाचे वर्णन केले आहे ते पाहून या लेखाची समाप्ती करू या.

हुर्मुजी रूंगाचा उंच मोतीदाणा । रामदासी बाणा या रंगाचा ॥१॥
पीत वर्ण कांति तेज अघटित । आवाळू शोभत भृकुटि माजी ॥२॥
रामनाम मुद्रा द्वादश हे टिळे । पुच्छ ते वळवळे कटिमाजी ॥३॥
कोपिन परिधान मेखळा खांद्यावरी । तुंबा कुबडी करी समर्थांच्या ॥४॥
काष्ठाच्या खडावा स्वामींच्या पायात । स्मरणी हातात तुळशीची ॥५॥
कृष्णेच्या तटाकी जाहले दर्शन । वंदिले चरण तुका म्हणे ॥६॥

भावाचे भुकेले स्वामी समर्थ रामदास ही शब्दपुष्पांजली गोड मानून घेतील व कनवाळू स्वभावानुसार पूर्ण कृपाही करतील यात संशय नाही ! त्यांच्या चरणकमळी सादर सप्रेम कोटी कोटी कोटी प्रणाम !

हरि : ॐ तत् सत्

– डॉ. श्री. कमलताई बा. वैद्य,
'होली माऊंट' बंगला
श्रीशिल्प चिंतामणी सोसायटी
३५ विजयनगर, सांगली - मिरज रोड, पो. वानलेसवाडी, मिरज
जि. सांगली-४१६ ४१४,

• • •

''ओंकार'' न्यासातर्फे दरवर्षी ''वसुंधरा-कृतज्ञता पुरस्कार प्रदान करण्यात येतो. सन २००६ -२००७ व्या वर्षासाठी श्री व सौ. दांडेकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. त्यावेळी प्रदान करण्यात आलेले मानपत्र सर्वांच्या माहीतीसाठी याअंकामधे सादर केलेले आहे व दरवर्षी ही प्रथा चालू राहील.

वसुंधरा कृतज्ञता पुरस्कार २००६ - २००७
'डॉ. राजाराम गंगाधर दांडेकर व सौ. रेणू राजाराम दांडेकर'

गौरवपत्र

'अरे माणसा माणसा कधी होशील माणूस ?' बहिणाबाईंना पडलेला हा प्रश्न ! डॉ. राजाराम दांडेकर आणि सौ. रेणूताई दांडेकर आपणा उभयतांसारखी माणूस घडविणारी व्रतस्थ माणसे म्हणजेच बहिणाबाईंच्या प्रश्नाचे उत्तर होय.

'चिखलगाव' लोकमान्य टिळकांचे जन्मगाव. रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील हे निसर्गरम्य गाव. केवळ लोकमान्यांचे जन्मगाव म्हणूनच प्रसिद्ध. बाकी सोयीसुविधांना मुकलेले. आजूबाजूच्या चाळीस किलोमीटरच्या टापूत साधी शिक्षणाचीसुद्धा सोय नाही.

डॉक्टर, आपण गुडघे गावचे भूमिपुत्र. आपण पाहिले या गावात साधी पिठाची गिरणी नाही, की दवाखाना नाही आणि आपण ठरविलेत की, इथे काहीतरी करावयाचे, या गावाची ललाट रेषा बदलायची. देशासाठी सर्वस्व वाहिलेल्या लोकमान्यांच्या आत्म्याला संतोष होईल असे काहीतरी करावयाचे. आपल्या सारख्या ध्येयवेड्याला रेणूताईंसारख्या बुद्धिवंत जीवाची साथ लाभली.

रेणूताई, आपण प्रा. नरहर कुरूंदकरांसारख्या नामवंत विचारवंतांसह नांदेड येथे असलेले प्राध्यापक पद सोडून डॉक्टरांना साथ देण्यासाठी दुर्गम अशा खेड्यात २७ वर्षांपूर्वी आलात. स्वतःचा आणि गावाचा प्रपंच सुरू केलात. दहा-बारा मुलांसोबत एका गोठ्यात चिखलगावच्या शाळेचा श्रीगणेशा सुरू झाला. आपल्या उभयतांच्या समाजसेवेचे 'बीज' इथेच रुजले. 'लोकमान्य सार्वजनिक धर्मादाय न्यास' या आपल्या संस्थेने गेल्या पंचवीस वर्षात डेरेदार वृक्षाप्रमाणे विस्तार केला आहे. चिखलगावच्या परिसरातील पन्नास खेड्यांचा 'न्यास' एक आधारवड झाला आहे. बालवर्गापासून शालांत परिक्षेपर्यंतचा उत्तम शाळा समूह, व्यावसायिक शिक्षण प्रकल्प, उत्तम क्रीडा सुविधा, व्यायाम शाळा, कन्या छात्रालय, अभ्यासिका, ग्रंथालये, फिरते दवाखाने, फलोद्यान, दुग्ध शाला, विविध कृषि प्रकल्प इत्यादी अनेक कार्याद्वारे आपण आपले कार्य विस्तारित केले आहे. आपल्या कार्याची नोंद, आपल्या ग्रामविकासाचा आदर्श, जगन्मान्यता पावला आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने त्याचे कौतुक केले आहे.

डॉक्टर, आपल्या शैक्षणिक जीवनापासूनच आपण समाजसेवेत कार्यरत आहात. विद्यार्थी चळवळीत सहभागी होऊन आपण ते सिद्ध केले आहे. बी.ए.एम.एस. (आयुर्वेदाचार्य) पदवी संपादन केल्यानंतर वाकडी वाट करून कोकणातील ग्रामीण भागात वैद्यकीय व्यवसाय सुरू केलात. वेगवेगळ्या १५ संस्थांमधून आजही आपण आपल्या समाज सेवेचे कार्य सुरू ठेवले आहे. अमेरिका, कॅनडा, जर्मनी इ. ठिकाणी आपण अभ्यास दौरे केलेले आहेत. केसरी मराठा ट्रस्ट, पुणे यांच्या टिळक पुरस्कारासारख्या वेगवेगळ्या नऊ पुरस्कारांनी आपणास सन्मानित करण्यात आलेले आहे.

'We are made for each other' या इंग्रजी उक्तीप्रमाणे रेणूताई आपण खऱ्या अर्थाने डॉक्टरांच्या सहचारिणी झाल्या आहात. एम.ए.एम.एड. झाल्यानंतर शहरातील प्राध्यापकाचे काम सोडून आपण दुर्गम खेड्यात राहून डॉक्टरांना साथ दिली. महाराष्ट्र पाठ्य पुस्तक मंडळ, बालचित्रवाणी, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत महामंडळ यासारख्या सोळा संस्थांमधून आपली नियुक्ती झालेली आहे. काव्यसंग्रहापासून शैक्षणिक लेखापर्यंत आपली अकरा पुस्तके प्रकाशित झालेली आहे. आपण वृत्तपत्रीय संपादनही केलेले आहे. भारत व भारताबाहेरही आपण अभ्यास दौरे केलेले आहेत. महाराष्ट्र शासनाचा सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार यांसारख्या सोळा पुरस्कारांच्या आपण मानकरी आहात. आपल्या मुख्याध्यापक पदाचा कार्यभार सांभाळत असतानाच सध्या आपण भारतातील मुलींचे शिक्षण व अमेरिकेतील मुलींचे शिक्षण यांचे तुलनात्मक संशोधन करीत आहात.

महात्माजी म्हणाले होते, 'देशात रामराज्य आणायचे असेल तर गावाकडे वळा' तर लोकमान्य सांगून गेले, 'शिक्षणामुळेच साऱ्या समाजाचा आणि पर्यायाने देशाचा खरा विकास होतो.' या दोन महामानवांची शिकवण केवळ विचारमंथनाचा विषय न मानता आपण उभयतांनी आपल्या शुद्ध आचार धर्माने ती साकार करून दाखविली आहे. आपल्यासारखे समाजशिक्षकच समाजाचे स्वास्थ्य सर्वार्थाने समृद्ध करू शकतात.

आपणा उभयतांचे निष्कलंक चारित्र्य, समाज कार्याची तळमळ, त्याग, प्रामाणिकपणा या गुणांमुळे ओंकार न्यासाचे विश्वस्त मंडळ प्रभावित झाले आहे. त्याकरिता 'वसुंधरा कृतज्ञता पुरस्कार' आपणास समारंभपूर्वक प्रदान करताना ओंकार न्यासास आनंद व समाधान लाभत आहे. आपणास दीर्घायुरारोग्य, उत्तम प्रकृती लाभो व समाजाची सेवा घडो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

आपला

दिनांक :२१ एप्रिल २००७

(मधुसुदन सरदेशपांडे)
अध्यक्ष, ओंकार न्यास

समर्थ रामदासांचे विशेषत्व

- प्रा.डॉ. माधवराव दीक्षित



प्रस्तावना -

व्यक्ती आणि समाज यांच्या परस्पर संबंधांचा विचार केल्यास असे आढळते की दोघांचेही चरित्र (इतिहास) त्यांचे कर्तृत्व आणि त्यामुळे होणारी परिणती (कल्याण किंवा ऱ्हास) ही परस्परांवर अवलंबून आहे. ज्या कुटुंबात व्यक्ती जन्माला येते व ज्या समाजात ती राहाते व वाढते तिचे कल्याण स्वतःच्या प्रयत्नांवर व समाजाच्या पाठिंब्यावर अवलंबून असते. माणूस हा समाजप्रिय जीव आहे. (Man is a social being) त्याला समाजात राहूनच स्वतःचा व इतरांचा उद्धार साधता येतो. त्यासाठी जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण आणि त्यावरील चिंतन आवश्यक आहे. व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायाने काही चिंतनशील व्यक्तींना एकांत प्रिय असतो व त्या समाजापासून अलिप्त राहून जीवनावर चिंतन करतात आणि समाजोपयोगी तत्त्वज्ञान (भाष्य) निर्माण करतात. याउलट काही व्यक्तींच्या स्वभावानुसार त्यांना एकांतात राहाण्याऐवजी लोकसंग्रह करावासा वाटतो. समाजातील निरनिराळ्या स्तरातील लोकांशी ते संवाद करतात व समाजव्यवस्थेला पोषक अशी कृती (चळवळ) करतात आणि त्यासाठी समाजातील व्यक्तींच्या मनात सु-धाराणा (योग्य संकल्प व त्याची सिद्धता) निर्माण व्हावी म्हणून संघटन करून सामूहिक प्रयत्न करतात. हे करण्यात त्यांचा उद्देश स्वतःप्रमाणेच इतरांचाही अभ्युदय (प्रापंचिक व पारमार्थिक) व्हावा हा असतो. त्यासाठी चिंतनातून समजलेली व उमजलेली तत्त्वे इतरांना सांगावी असे त्यांना वाटते. कारण फक्त स्वतःपुरते पाहावे अशी त्यांची संकुचित वृत्ती नसते. संतांच्या विभूती जगाच्या कल्याणासाठी आपले जीवन जगतात. त्यांची जात कळवळ्याची असते.

समर्थ रामदास हे दुसऱ्या वर्गात मोडतात. जीवन जगत असताना सुखी होण्यासाठी व दुःखांचा परिहार करण्यासाठी इतरांना संत सज्जन मार्गदर्शन करतात. प्रपंच नेटका कसा करावा? व संसार करीत असताना परमार्थ साधन कसे करावे? याबाबतीत साक्षात्कारी संतांनी प्रवृत्तीपर किंवा निवृत्तीपर भाष्य केलेले आहे. परंतु सर्व संतांची एकाबाबतीत एकवाक्यता आढळते. ती अशी की, सर्वसामान्य लोकांसाठी प्रपंच सोडून परमार्थ साधन करावे असे कुणीही सांगितलेले नाही. कारण समाजात राहून स्वतःचा संसार करीत असतानाही परमार्थ साधन करता येते. प्रपंच साधन आणि परमार्थ साधन हे एकमेकास पूरक (Complementary) आहेत. ते एकमेकापासून अलग (Mutually exclusive) नाहीत हे अनेक संतांच्या चरित्रावरून अनुभवाने सिद्ध झालेले आहे. उदा. संत तुकारामांनी संसार करीत असतानाही परमार्थ साधन केले व ईश्वर उपासनेच्या मंदिराचे व भक्तीसंप्रदायाचे (भागवत-धर्माचे) ते कळस बनले.

सत्पुरुषाची जी लक्षणे सांगितली आहेत त्यांचे वर्णन 'बोले तैसा चाले' किंवा 'आधी केले, मग सांगितले', 'अनुभवावीण मान डोलवू नको रे' 'ज्या अंगी मोठेपण तया यातना कठिण' अशा व इतर वाक्यप्रचारात पाहायाला मिळते. शिवाय विवेक, वैराग्य, सर्वसंग परित्याग, सत्संग नम्रता, कृतज्ञता, अपरिग्रह, असंग्रह अशा दैवी गुणांचे दर्शन साक्षात्कारी पुरुषांच्या चरित्रामध्ये मिळते. साक्षात्कारी संतांच्या बोलामध्ये किंवा उपदेशामध्ये नुसते पुस्तकी पांडित्य किंवा अभिनिवेश नसतो तर प्रत्येक वचनामागे अनुभूतीचे पाठबळ असते. अनुभव आल्याशिवाय संत बोलत नाहीत. त्यांच्या उपदेशवचनात सहजता व उत्स्फूर्तपणा असतो. त्यांचे आचार विचार भगवद चिंतनाशिवाय नसतात. त्यांनी केलेला उपदेश नाटकी व उथळ नसतो. उपदेश ऐकणाऱ्या व्यक्तीचे कल्याण व्हावे ही तळमळ असते. शिवाय ह्यांच्या उपदेशाप्रमाणे वागून एखाद्या व्यक्तीचे श्रेयस व प्रेयस घडले तर त्याचे श्रेय ते स्वतः न घेता भगवंताकडे देतात. साक्षात्कारी संतांची जात कळवण्याची असते. उपदेश फळला गेलाच पाहिजे अशी आग्रही वृत्तीही संतांची नसते.

सत्पुरुषांचे हे सर्व गुण समर्थ रामदासांच्या व्यक्तिमत्वात आहेत, हे त्यांच्या लीला चरित्रातील प्रत्येक घटना सिद्ध करते. संत हा संसारी असू शकतो किंवा सर्वसंगपरित्याग करणारा विवेकी-विरागी असू शकतो. परंतु संसारी आणि विरागी संतांचे एक वैशिष्ट्य समान आहे ते असे की दोघेही 'ब्रह्मचारी' व 'संन्यासी' असतात. ब्रह्मचारी व संसारी या शब्दांचा रूढ व वरवरचा अर्थ इथे घेऊ नये. ब्रह्मचारी म्हणजे परब्रह्मास साक्षी ठेवून (ईश्वरी अधिष्ठान ठेवून) जो आपले सर्व आचार विचार ठेवतो तो सत्पुरुष. त्याचे आचरण सत्धर्माचरण असते. तसेच 'संन्यासी' या शब्दाची फोड 'संत्+न्यासी' अशी आहे. म्हणजेच ज्याचे आचार विचार अंतिम सत्यावर अधिष्ठित आहेत तो सज्जन. न्यास म्हणजे अधिष्ठान हा अर्थ लक्षात घेतला तर तुकाराम हे संसार करीत असतानाही संन्यासी व ब्रह्मचारी होते असे म्हणता येईल. तसेच रामदास हे सर्वसंगपरित्यागी असूनही त्यांनी स्वतःचाच संसार करण्याकडे लक्ष न देता समाजाचा व देशाचा संसार केला व त्यासाठी धर्मकारण व राजकारण केले. म्हणून ते विवेकी, विरागी असूनही संसारीच होते असे म्हणता येईल. तुकाराम व रामदास या दोघांच्याही जीवनाचे प्रयोजन व उद्दिष्ट केवळ स्वतःपुरताच व स्वतःचाच संसार करणे हे नव्हते. स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणायचे की, 'कावळ्या चिमण्यांचा संसार बरेचजण करतात आम्ही तसे करणारे नाही.' अशाच रीतीने समर्थ रामदास व तुकाराम यांचे जीवनध्येय 'चिंता करतो विश्वाची' हेच होते.

जगरहाटीतले मायावी जीवन इतके बहुरंगी व गतिमान (Dynamic) आहे की हे जीवन कसे जगावे? व ते धन्य आणि कृतार्थ बनवून स्वतःचा अभ्युदय कसा करावा ? यासंबंधी मार्गदर्शन करताना नेमके, स्पष्ट व फलदायी (result-oriented) काय सांगावे यासंबंधी मतांतरे उद्भवतात व वैचारिक गोंधळ निर्माण होऊ शकतो. जीवनातील समस्या व त्यावरील ठोस उपाय कोणता? हे स्पष्टपणे सांगता आले पाहिजे. त्यासाठी जीवनाविषयी (micro) सूक्ष्म विचाराप्रमाणेच समग्र (macro) विचारसरणीची गरज आहे. ठोस उपाय स्पष्टपणे सांगण्याचे कार्य समर्थ रामदासांनी केलेले आहे. जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण, व्यक्तींचे गुण आणि मर्यादा, व्यक्ती आणि समाज यांचे नाते, ऐहिक आणि पारलौकिक

अभ्युदय या संबंधीचे समर्थ रामदासांचे विचार स्पष्ट आणि ठोस कृतीला (प्रयत्नांना) अनुमोदन देणारे आहेत. समर्थांच्या तत्वज्ञानामध्ये वैचारिक गोंधळ नाही. साध्य व साधन या बद्दल स्पष्टता आहे व व्यावहारिकता आहे. समर्थांचे तत्त्वज्ञान कल्पनारम्य अतिरंजित व कशाच उत्तरदायित्व नसलेले (non-commital) नाही.

समर्थांचा दासबोध, त्यांचे मनाचे श्लोक व इतर वैचारिक आणि काव्य वाङ्मय यातील अनेक विधाने याची साक्ष देतात. यत्न तो देव जाणावा, सामर्थ्य आहे चळवळीचे, परंतु ईश्वराचे अधिष्ठान हवे, 'नुपेक्षीकदा रामदासाभिमानी,' 'प्रपंच करावा नेटका' अशी व इतर अनेक ठोस विधाने समर्थांच्या प्रपंचविषयक व परमार्थ विषयक तत्त्वज्ञानात मिळतात. असे म्हटल्यास तसे ते असू शकेल 'असेच काही म्हणता येणार नाही' 'साकल्याने विचार केल्यास असेच काही निश्चित सांगता येणार नाही' अशी लोंबती, मनाचा गोंधळ उडवणारी विधाने समर्थ रामदास करीत नाहीत. शिवाय द्वैत-अद्वैत, एक -अनेक, प्रवृत्ती -निवृत्ती, साक्षित्व व कृतीशिलता, सगुण-निर्गुण, सद्गुण - अवगुण, सदाचार-दुराचार, कल्याण व अकल्याण या संकल्पनांविषयीचा गोंधळ रामदासांच्या बोधात नाही. समर्थांच्या तत्त्वचिंतनात समस्या व उपाय, निष्क्रीयतेऐवजी ठोस निर्णय व कृती आणि मानवी सामर्थ्याला दैवी सामर्थ्यांची जोड कशी मिळवावी याविषयी निश्चित व स्पष्ट मार्गदर्शन आहे. वास्तवाचे भान न ठेवून केलेल्या कल्पना विलासाला व स्वप्नरंजनाला स्थान नाही. ज्ञानाप्रमाणेच वास्तवाचे भान व सावधानता यांचे ऐहिक व पारमार्थिक अभ्युदयासाठी असणारे महत्त्व समर्थांनी सूक्ष्म व व्यापक चिंतन करून व स्वतः अनुभव घेऊन जाणले होते. शिवाय नुसत्याच तटस्थ उपदेशकाची भूमिका घेऊन त्यांनी आपले तत्त्वज्ञान इतरांना सांगितले नाही. आधी सर्व स्वतः अनुभवले, स्वतः केले आणि मग सांगितले. उंटावरून शेळ्या हाकल्या नाहीत. लोकसंग्रह व लोकजागृती करण्यासाठी विवेक, वैराग्य, तरतम भाव (Sense of Proportion or discrimination) कसा अंगी बाणवावा याचे मार्गदर्शन दासबोधात आहे. त्यानेच समस्या सोडवण्यासाठी कोणी, कोणती गोष्ट केव्हा व किती प्रमाणात करावी याचे व्यावहारिक मार्गदर्शन समाजातील सर्व थरांमधील लोकांना त्यांच्या अभ्युदयासाठी मिळाले.

समर्थांच्या उपदेशाचे व बोधाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तो बोध जसा समोर असलेल्या व्यक्तीला आहे तसाच समोर दिसत नसणाऱ्या परंतु जीवनावर परिणाम करणाऱ्या अव्यक्त शक्तींनाही (बुद्धि, शक्ती, मन अहंकार इत्यादी) केलेला आहे. या उपदेशांमुळे समाजात भव्य, दिव्य व उदात्त मूल्यांचे (Values) जतन होते. ज्ञानाप्रमाणेच या मूल्यांची जोपासना केल्यामुळेच समाजाचे ऐहिक परमार्थी जीवन वैभवपूर्ण, संपन्न व आनंदी होते. समाजाचे परिवर्तन आनंदवनात करण्याचा समर्थांचा संकल्प होता. जीवनात श्रद्धा, सबूरी, धैर्य, निश्चय, युक्ती रसिकवृत्ती, कृतीशीलता, सावधान वृत्ती, बलोपासना, अशी उच्च मूल्ये निर्माण होण्यासाठी त्यांनी सामान्य लोकांसाठी देवस्थाने व दैवते लोकांसमोर ठेवली. श्रीराम (ईश्वरी अधिष्ठान) हनुमंत (शक्ती उपासना) देवी (स्त्रीबद्दलचा आदर व प्रेम) यांच्या उपासनेसाठी व सत्धर्माचरणासाठी अनुकूल (Congenial) वातावरण निर्माण करण्यासाठी समर्थांनी नवीन मठ मंदिरे बांधली व जुन्या देवस्थानांचा जीर्णोद्धार केला. देवतांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना केली. 'भाव तोचि देव' या पारमार्थिक न्यायाचा साक्षात् अनुभव कसा घ्यावा याची दृष्टी समर्थांनी समाजास दिली. हा 'भाव' - उगीच संकल्प, विकल्प किंवा निश्चय करणाऱ्या बुद्धीमध्ये, चंचल मनामध्ये व अहंकारी वृत्तीमध्ये निर्माण व्हावा म्हणून समर्थांचे अविरत प्रयत्न होते. सुष्ट व दुष्ट शक्ती कोणती हे ईश्वरी अनुसंधानाने व सगुणभक्तीने ओळखून, सावधान राहून प्रपंच निर्विघ्नपणे कसा करावा याचे ठोस मार्गदर्शन करणारे व्यावहारिक तत्त्वज्ञान समर्थांनी समाजास दिले. प्रपंच नेटका करावा, परमार्थ थोडा वाढवावा, त्याकडे अजिबात दुर्लक्ष नको असा इशारा समर्थांनी दिला. स्वराज्य व सत्धर्मस्थापनेचे उद्दिष्ट किंवा स्वप्न समर्थांनी प्रत्यक्षात आणले. गुणांचे कौतुक, सौम्य वृत्तीने बहुतांची अंतरे राखणे, दुर्गुणांचा निषेध आणि दुष्ट प्रवृतीचे निर्दालन असे जे कार्य समर्थांनी केले ते एका अवतारी पुरुषाचे कार्य आहे.

समर्थांचा उपदेश व्यवहारी, सर्वगामी व निरपेक्ष आहे. कारण ते स्वतः विवेकी विरागी आणि 'स्वेच्छाविहारी' आहेत. स्वतःचे स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे तसेच इतरांचेही राहिले पाहिजे ही त्यांच्या तत्त्वज्ञानाची समतोल भूमिका आहे. त्यात अकारण आग्रह, कर्मठपणा व सूडबुद्धी नाही. अपराधी जन चुकतच जाणार हे मार्मिक निरीक्षण आहे. पण त्यांना सावरण्यासाठी श्रीरामाला साकडे घालणे जरूर आहे. त्याच्या कृपेनेच सत्कार्य सिद्ध होईल ही कृतज्ञतेची जाणीव समर्थांच्या आचारात व विचारात होती. अढळ श्रद्धा, सबूरी व व्यावहारिक तडजोड ही समाजात टिकून राहाण्यासाठी (Survival) व अभ्युदयासाठी (Prosperity) आवश्यक आहे. ही समाजमनाची जागृती, अमंगळ भेदाभेद टाकून इतर संतांप्रमाणे समर्थांनी केली. पण आपल्या व्यक्तिमत्वाचा ठसा आपल्या स्वतंत्र विचारसरणीत समर्थांनी उमटविला. जिथे श्रीराम आहे आणि रामचादास रामदास आहे तिथे श्री विजय, अढळ नीति, व बुद्धी आहे याचे साक्षात् प्रत्यंतर समर्थांच्या लीळाचरित्रात मिळते. भगवद्वचनाची प्रचीती स्वतः घेऊन समाजाची मानसिकता तशी घडविणारे रामदास हे ईश्वराचे प्रेषित होते.

- प्रा. डॉ. माधवराव दीक्षित
वसंत तारा महात्मा फुले संग्रहालयाजवळ,
आपटे रोड, पुणे - ४११ ००४

• • •

मना सज्जना .....

- डॉ. सौ. माधवी संजय महाजन



श्रीसमर्थ रामदासस्वामी यांची वाङ्मय संपदा एखाद्या महासागराप्रमाणे 'विशाल आहे. या महासागराच्या ४०,००० ओव्यारूपी लाटा आहेत. या प्रत्येकी ओवीमध्ये जो गर्भित अर्थ लपला आहे तो त्यालाच जाणवतो जो त्या विचारांचे चिंतन, मनन करतो, जो त्या विचारांशी एकरूप होतो. समर्थांच्या या अमृत सागरातील एक जबरदस्त लाट म्हणजे त्यांचे 'मनाचे श्लोक.' प्रत्येक जीवाचे जीवन बदलवून टाकण्याचे सामर्थ्य या लाटेमध्ये आहे. समर्थांचे मनाचे श्लोक हा छोटेखानी ग्रंथ सर्वांनाच परिचयाचा आहे. किंबहुना समर्थ म्हटले की त्यांचा श्रीमद्दासबोध आणि त्यांचे मनाचे श्लोक याचेच पटकन स्मरण होते. परंतु या मनाच्या श्लोकांना आपण केवळ पाठांतराचे स्वरूप प्राप्त करून दिले आहे. केवळ २०५ च श्लोक पण हे २०५ श्लोकांचे अमृतकण टिपून जो आचरणात आणतो त्याचे जीवन पार बदलून जाते. म्हणूनच तर विनोबाजींनी या श्लोकांना 'मनोपनिषद' म्हणून गौरविले आहे. ज्या ग्रंथांची योग्यता उपनिषदाएवढी आहे ते श्लोक केवळ पाठांतरापुरतेच मर्यादित कसे राहतील?

समर्थांचे मनाचे श्लोक आत्मपरिक्षण करायला शिकवितात. स्वतःलाच शिकविण्याची पद्धत म्हणजे मनाचे श्लोक. इतरांना सुधारण्यापेक्षा स्वतःला सुधारणे हा जग सुधारण्याचा मोठा मार्ग आहे. समर्थांनी या श्लोकांमध्ये स्वतःलाच सुधारण्याचे तंत्र शिकविले आहे. स्वतःलाच जर सुधारायचे असेल तर त्यासाठी प्रथम आपले मन आपल्या ताब्यात असणे आवश्यक आहे. 'मन एव मनुष्याणां कारणं बंध मोक्षयोः' मानवी मन त्याच्या बंधनाला किंवा मोक्षाला कारणीभूत असते हे जाणूनच समर्थांनी मनाच्या श्लोकामध्ये मनाला उद्देशून उपदेश केला आहे. माणसाचे मन चंचल असते. मनाची ही चंचलता सर्वमान्य आहे. भगवद्गीतेत अर्जुनानेही ग्वाही दिली आहे.

'चंचल हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद् दृढम ।
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम ।। ६-३४।।

या चंचल मनाला आवरणे म्हणजे वाऱ्याची मोट बांधण्यासारखे अत्यंत कठिण आहे. असे असले तरीही या मनावर अंकुश असणे तेवढेच गरजेचे आहे. तसेच मनाची चंचलता हा जसा मनाचा दोष आहे तसेच मनाचे सामर्थ्य देखील तेवढेच अफाट असते ही त्याची दुसरी बाजू लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

मानवी मन कल्पनेमध्ये रमणारे आहे. खरेतर कल्पनेचेच दुसरे नाव म्हणजे मन. कल्पनांमध्ये रमणारे हे मन अनेक संकल्प करीत असते. पण त्याचबरोबर संकल्पाचे रचलेले मनोरे उध्वस्त करण्याचे सामर्थ्यदेखील यामध्ये असते. चंचल मनाला ज्यामध्ये रमवावे त्यामध्येच ते रमते हा त्याचा महत्त्वाचा गुण आहे. मनाचा हा गुणधर्म लक्षात घेऊनच समर्थ मनाला उपदेश करतात. मनातील विविध कल्पनांना जर आवर घालावयाचा असेल तर या मनावर मनानेच स्वार व्हायचे आहे. जसे हिरा हा अत्यंत कठिण असल्याने त्याला चिरण्यासाठी हिऱ्याचाच वापर करावा लागतो. त्याप्रमाणे अत्यंत चंचल अशा मनाला स्थिर करण्यासाठी मनाचाच वापर करावा लागतो. माणसाला चिंतन, मनन करण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले आहे. या सामर्थ्याचा वापर करून चंचल मनाला विवेकाने आवरून योग्य आचरण करण्यावर समर्थ भर देतात.

मनाच्या श्लोकांमध्ये कर्मभक्तीज्ञान हा त्रिवेणी संगम पाहायला मिळतो. या श्लोकांचा प्रारंभ नमनाने झाला आहे. स्तवनाच्या श्लोकात समर्थांनी या श्लोकापाठीमागील भूमिका स्पष्ट करताना म्हटले आहे. 'गमू पंथ आनंत या राघवाचा'. राघवाच्या या मार्गावर घेऊन जाताना समर्थांनी टप्प्या टप्प्याने मनाचे उदात्तीकरण कसे करावे याचे मार्गदर्शन केले आहे. आनंत राघवाचा हा मार्ग आचरणे सोपे नाही तरीही कठोर परिश्रमाने तो सहज साध्य होऊ शकतो. शुद्धज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी मानवी मनावर जो अज्ञानाचा पगडा आहे तो दूर होईपर्यंत हे शक्य नाही. खरे तर जीव आणि ईश्वर यामध्ये द्वैत नाही पण मायेमुळे जीवाला ईश्वराचे विस्मरण झाले. 'मी म्हणजे देह' आणि माझ्यापेक्षा ईश्वर काही वेगळा हा भ्रम जीवाला झाला. परंतु जीवशिव हे एकरूपच आहेत. हे एकरूपत्त्व जाणून घेण्यासाठी जीवाने भक्तिमार्गाचा अवलंब करावा याचे मार्गदर्शन समर्थ करतात.

मनाच्या श्लोकांची ढोबळ मानाने वर्गवारी केली तर पहिल्या २६ श्लोकांमधून समर्थ कर्मयोगावर भर देताना दिसतात. आपले आचरण कसे असावे, सदाचाराची वागणूक कशी असावी, आपली वाणी कशी असावी, याविषयी समर्थ मार्गदर्शन करतात. २७ ते १६० श्लोक हे भक्तीयोगावर आहेत. या सर्व श्लोकांमध्ये नव विधाभक्तीमधील 'नामस्मरण' भक्तीवर समर्थ अधिक भर देतात. तर १६१ ते २०० या श्लोकांमध्ये संपूर्ण वेदांत विचार त्यांनी स्पष्ट केला आहे. शेवटच्या ५ श्लोकांमध्ये फलश्रुती सांगितली आहे. या फलश्रुतिमध्ये समर्थांनी या ग्रंथ प्रपंचाचे प्रयोजन स्पष्ट केले आहे.

मनाची शते ऐकतां दोष जाती
मतीमंद ते साधना योग्य होती

हे या श्लोकांचे प्रयोजन आहे. या श्लोकांच्या श्रवणाने मतीमंद देखील साधनेस पात्र होतील हा समर्थांचा विश्वास आहे. आणि हे मतीमंद कोण ? तर याचे उत्तर देखील समर्थांनी यापूर्वीच्या श्लोकात देऊन ठेवले आहे. समर्थ म्हणतात. 'मतीमंद ते खेद मानी वियोगे' अशा या 'मतीमंद' जीवांसाठी समर्थांनी मनाच्या श्लोकांमधून मार्गदर्शन केले आहे.

समर्थांनी या ठिकाणी मनाला उपदेश करताना 'मना सज्जना' असे संबोधले आहे. स्थूल शरीर हे रजोगुणापासून बनलेले आहे. त्यातील मन हे सत्वगुणापासून बनलेले आहे. मुळातच मन हे सत जन आहे. त्यामध्ये सत्वांश आहे. सत्वगुणापासून उत्पन्न झालेल्या मनाला समर्थ सज्जन असे म्हणतात. रजोगुणापासून उत्पन्न झालेल्या

देहाला त्यांनी सज्जन म्हटलेले नाही. जन्माला आल्याक्षणापासून विकार उत्पन्न व्हायला लागतात. विकार उत्पन्न करणारा रजोगुण हा सात्विक नाही. विकार निर्माण करणाऱ्या या गुणामुळे मनामध्ये अनेक तरंग उमटतात. कोणाबद्दल राग निर्माण होतो तर कोणाबद्दल द्वेष वाटतो, तर कधी कोणाविषयी प्रेम उचंबळून येते. पण बुद्धी ताब्यात आल्यावर मात्र ते पुन्हा शांत होते. हे जाणूनच समर्थांनी मनला भक्तीपंथेची जावे हा उपदेश केला. तर देहाच्याद्वारे होणाऱ्या कोणत्याही क्रीयेला समर्थ भक्तीपंथ सांगत नाहीत. शरीराच्या माध्यमातून घडणाऱ्या क्रीयेबाबत मार्गदर्शन करताना समर्थ म्हणतात -

'जनी निंद्य ते सर्व सोडूनि द्यावे ।
जनी वंद्य ते सर्व भावे करावे ॥'

समर्थांच्या या श्लोकांचे नीट अवलोकन केले तर काही गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. त्या म्हणजे नेटका प्रपंच करायला सांगताना समर्थ जगावर प्रेम करायला शिकवितात पण परमार्थ करताना मात्र -

स्वये सर्वदा प्रीती रामी धरावी ।
सुखाची स्वये सांडी जीवी करावी ॥

असे स्पष्ट करतात. तसेच जेव्हा व्यवहारिक कर्माला दिशा देण्याचा प्रयत्न समर्थांनी केला तेव्हा त्यांनी सदा, सर्वदा या शब्दांचा वापर केला आणि सात्त्विक मनाला मात्र सतत भक्तीमार्गाने चालण्याचा संदेश दिला.

प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।

ही दिशा दाखवून प्रातःकाळापासून सतत भगवंताच्या स्मरणात राहण्याचे मार्गदर्शन समर्थ करतात. नामस्मरण या भक्तीवर समर्थ या ठिकाणी भर देतात. नामस्मरणामध्ये 'स्मरण' हा शब्द महत्त्वपूर्ण आहे. नामाच्या माध्यमातून सतत त्याचे स्मरण ठेवले तर मन आपोआपच सतत त्याच्याच चिंतनात राहणार आहे हे समर्थ या ठिकाणी सांगतात. खरे तर स्मरण कशाचे ठेवावे लागते ज्याचे विस्मरण होते त्याचे. मायेच्या प्रभावाखाली, जगावर प्रेम करणाऱ्या जीवाला सतत भगवंताचे विस्मरण होते. पण सतत त्याचे स्मरण हा जीवाला ध्यास लागला पाहिजे. पाप आणि पुण्य संकल्पना मांडताना संतांनी भगवंताचे विस्मरण ते पाप आणि त्याचे स्मरण म्हणजे पुण्य असे स्पष्ट केले आहे. सतत भगवंताच्या स्मरणात दंग असणाऱ्या संतांनी आपले प्रत्येक कर्म, आपला प्रत्येक श्वास भगवंताला अर्पण केला आहे. संत चोखामेळाने आपले सारे जीवन परमेश्वर चिंतनात घालवले त्यामुळे त्याच्या मृत्यूनंतरही त्याच्या अस्थीमधून विठ्ठलाच्या नामाचा गजर ऐकू येत होता. एक पळभर देखील त्या भगवंताचे विस्मरण होऊ नये असे संतांचे कळवळून सांगणे आहे. समर्थ म्हणतात -

चालता बोलता धंदा करितां । खाता जेविता सुखी होता ।
नाना उपभोग भोगिता । नाम विसरो नये ॥

रोजचे व्यवहार करत असताना सतत त्याचे स्मरण असावे असे त्यांचे सांगणे आहे. पण अशी स्थिती कधी प्राप्त होईल ? तर मनाला सतत नाम घेण्याची सवय लावली तरच. पण यासाठी साधनेची बैठक देखील तेवढीच आवश्यक आहे. म्हणूनच समर्थ या ठिकाणी पहाटेच्या वेळी भगवंताचे चिंतन करायला सांगतात. पहाटेची वेळ अशी आहे ज्या वेळी बाह्य परिस्थितीत शांतता असते तसेच आपल्या अंतरंगात देखील शांतता आणि स्थिरता असते. अशा वातावरणातील भगवंताचे चिंतन हे प्रभावी ठरते. समर्थांनी दिवसभरामध्ये सतत कर्म करत असताना भगवद्स्मरणाचे महत्त्व सांगितले आहे. पण या ठिकाणी मात्र चिंतनाला महत्त्व दिले आहे.

प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।
पुढे वैखरी राम आधी वदावा ॥

या समर्थांच्या सांगण्यामध्ये पहाटेचे भगवंताचे चिंतन करण्याची साधना महत्त्वपूर्ण ठरते. ज्याप्रमाणे शून्य स्वतंत्र लिहिला तर त्याला काहीच किंमत नसते. त्याच्यापुढे आणखी कितीही शून्य काढली तरीही त्याला काहीच अर्थ नसतो. परंतु या शून्याच्या पाठीमागे जर एक हा आकडा लिहिला तर मात्र त्या शून्यांची किंमत वाढते. त्याप्रमाणेच पहाटेची साधना या एक आकड्या प्रमाणे आहे. मनाला सतत ही सवय लावली तर या नामस्मरणाने मनावर सूक्ष्म संस्कार होतात. नामस्मरणाचे महत्त्वाचे फायदे हे होतात की, त्यामुळे चित्त शुद्ध होते, इंद्रियांवर संयम येतो, महत्त्वाचे म्हणजे बुद्धी स्थिर होते, आणि जीव परमात्म्यात रमतो.

समर्थांनी सहाव्या श्लोकात विकारांचा निषेध केला आहे. काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, मोह या विकारांपासून दूर राहायचे असेल तर भगवंताच्या स्मरणाचा छंद लावून घेतला पाहिजे. काम - क्रोधाने बरबटलेला माणूस चांगला असूच शकत नाही. असे समर्थांचे मत आहे. समर्थ दासबोधात म्हणतात-

कामक्रोधे लिथाडिला । तो कैसा म्हणावा भला'

काम, क्रोध, लोभ हे तीन दोष म्हणजे नरकाची तीन द्वारे आहेत आणि आत्म्याचा नाश करणारी आहेत म्हणून त्याचा त्याग करावा असे मार्गदर्शन भगवंतानी भगवद्गीतेत केले आहे. आजच्या २१ व्या जगतात मानवाने आपले जीवन सुखी होण्यासाठी अनेक क्षेत्रात प्रगती केलेली दिसते. आपल्या देहाला कमीत कमी कष्ट देऊन जास्तीत जास्त सुख कसे प्राप्त करून घेता येईल या दृष्टीने तो सतत प्रयत्नशील असतो.या बाह्य सजावटीकडे लक्ष देताना आपले मन देखील सुदृढ असावे याकडे मात्र त्याचे दुर्लक्ष झालेले दिसते. भोगवादीवृत्ती आणि मानसिक विकासाकडे दुर्लक्ष यामुळेच परस्परांविषयी राग, द्वेष, हेवेदावे, मत्सर या असुरी संपत्तीचा अधिकाधिक विकास होताना आपण पाहतो. माणसाचे माणूसपण हरविणाऱ्या या कामक्रोधाला ज्ञानेश्वर माऊली 'विषय दरीचे वाघ' म्हणून संबोधतात तसेच, भजनमार्गीचे 'माग' असा उल्लेख करतात.

जेथे काम आहे तेथे क्रोध हा स्वाभाविकपणे येतोच. व्यक्तीच्या मनामध्ये विषय तृप्तीच्या गोष्टीकडे धावणारे जे विचार येतात ते म्हणजे इच्छा, कामना. मग ही कामना शरीर भोगा विषयी असो अथवा कोणत्याही इंद्रीयाची तृप्ती करण्याविषयीची असो काम हा विकार आहे. जेव्हा शृंगारातील पावित्र्याची भावना संपुष्टात येते, एकात्म भाव- जीवनाचा व्यापक विचार नष्ट होतो. तेव्हा या विकारात विकृती निर्माण होते. या विकृतीतूनच लहान वयातील मुलींपासून वृद्ध स्त्रीयांपर्यंत अनेक जणींवर अत्याचार झाल्याचे वृत्त आपल्या कानावर येते. तरुण तरुणींवर याचा प्रभाव एवढा दिसतो की उघड्यावर होणारे मिलन ह्यामध्ये त्यांना काहीच गैर वाटत नाही. लोकांना ना भय, ना लज्जा. यामुळे अनाथालयाची वाढ, एड्ससारखे रोग उद्भवतात. विषय वासनांनी ग्रासलेल्या जीवाविषयी समर्थ म्हणतात, अतीविषई सर्वदा दैन्यवाणा । अशा या कामुक वृत्तीच्या लोकांच्या कामात जर अडथळा आला तर त्यांच्यामधील क्रोध बळावतो. यातूनच खुनाचे वाढते प्रमाण, एकतर्फी प्रेमाची अनेक उदाहरणे पाहावयास मिळतात. क्रोध हा विकार असा आहे की, ज्यामुळे फक्त शत्रूत्वच निर्माण होऊ शकते. क्रोध उत्पन्न करणारा या काम विकारावर विजय मिळवायचा असेल तर नामस्मरणाशिवाय पर्याय नाही. समर्थ म्हणतात,

मुखी राम त्या काम बाधू शकेना ।

जो या नामस्मरणामध्ये दंग आहे त्याच्या आसपास देखील हे विकार फिरकू शकत नाहीत. काही लोकांची अशी समजूत असते की विषय सेवनाने तृप्ती होते. महाभारतातील ययातीचे उदाहरण या संदर्भात पाहण्यासारखे आहे. ययातीला असे वाटते की आपले वृद्धपण कोणी घेतले तर आणखी काही काळ विषयांचे सेवन करता येईल. आपोआपच तृप्ती प्राप्त होईल. त्याची ही इच्छा त्याच्या मुलाने पूर्ण केली. मुलाने त्याचे वार्धक्य घेतले परंतु मुलाचे तारुण्य घेऊनही त्याला तृप्ती मिळाली नाही. शेवटी तो म्हणाला ते महत्त्वाचे, कामनांचा उपभोग घेतल्याने कधीही तृप्ती होत नाही. उलट अग्नीत तूप टाकल्यावर अग्नी शांत होत नाही.तो अधिकच भडकतो.

तसेच उपभोगाने कामनांची तृप्ती न होता त्या अधिकच प्रज्वलित होतात, अनेकदा असेही घडते कर्मेन्द्रिय आवरली तरी मन मात्र त्या विषयातच गुंतलेले असते. उपवासाच्या दिवशी त्या दिवसापुरती कर्मेंद्रिये आवरली जातात पण मन मात्र जेवणाच्या ताटाभोवती ठाण मांडून बसते हे देखील गैरच आहे.

संत आम्हाला विषयापासून दूर नेतात ते विषय खरेच एवढे वाईट आहेत का? खरेतर शब्द, स्पर्श, रूप, गंध आणि रस हे पंचज्ञानेंद्रियांचे विषय आपण नित्य भोगत असतो. म्हणजे विषय सेवन घडणारच आहे. पण समर्थ या ठिकाणी विषय सोडायला सांगत नाहीत तर विषयासक्ती सोडायला सांगतात. अत्यंत संयमीत जीवन जगायला समर्थ सांगतात. शास्त्रांनी ज्या मर्यादा घालून दिल्या आहेत त्या पाळून विषय सेवन मान्य आहे, पण त्या विषयांची आसक्ती मात्र नाशाला कारणीभूत ठरते असे त्यांचे सांगणे आहे.

काम क्रोधाविषयी समर्थ म्हणतात, 'नको काम हा क्रोध चांडाळ पापी' अशा या विकारांपासून दूर राहण्यासाठी मीच माझ्या मनाची समजूत घालणे महत्त्वपूर्ण ठरते. कोणीही मला चिडवले तरी मी चिडणार नाही. मी चिडावे म्हणून इतरांचे वर्तन घडले तरी मी इतका दुर्बल नाही, मी माझी वैचारिक पात्रता, विचारांची स्थिरता मी कोणासाठी गमावणार नाही. ही स्वतःची स्वतः घातलेली समजूत आपोआपच आपले मन, बुद्धी स्थिर करते. स्वतःमधील विवेक जागृत ठेवून विकारांवर मात करता आली पाहिजे हे समर्थांचे सांगणे आहे.

काम, क्रोधाप्रमाणे विखारी आहे तो लोभ. सतत एखाद्या विषयाचा आनंद घेऊनही माणसाच्या मनातील लालसा कमी होत नाही. लोभ हा गरजेपोटी नसतो तर वासनेपोटी असतो. त्यातून कधीच तृप्ती प्राप्त होत नाही. तृप्ती न होणे हाच लोभाचा स्वभाव आहे. माणसाला धनाची तीव्र वासना असते. कितीही धनप्राप्ती झाली तरी त्याच्या गरजा त्या पैशात भागत नाहीत. म्हणून तो अधिकाधिक धनप्राप्ती करून घेण्याच्या मागे लागतो. धनप्राप्तीसाठी आपण आपल्या कुटुंबापासून दूर गेलो हे त्याच्या लक्षात येत नाही. कुटुंबाच्या सुखासाठी धनप्राप्तीला अधिक प्राधान्य दिले जाते. त्यामुळे सतत गरजा वाढविणे, त्याची पूर्ती करण्यासाठी धनप्राप्तीच्या मागे लागणे या वर्तुळातून त्याची कधीच सुटका होत नाही. पुरेसे अन्न, वस्त्र, निवारा या प्रमुख गरजा भागल्या तरीही भोगवादाच्या आहारी गेलेल्या माणसांचा लोभ सुटत नाही. गरज नसताना नवनवीन वस्तू घरात येतच राहतात. पण त्याचबरोबर घरातल्या जुन्या वस्तुंचा मोह काही केल्या सुटत नाही. सर्वकाही प्राप्त करून देखील माणसाला सतत अपुरेपणाची जाणीव होते. त्यामुळे तो सतत अशांत आणि असमाधानीच राहतो. सतत अतृप्त ठेवणारा लोभ माणसाच्या दुःखालाच कारणीभूत ठरतो. सतत प्रपंचाचे तसेच मीच माझे याचेच चिंतन केल्याने आपल्या मनात लोभाचे कायमचे बस्तान बसते. असा हा लोभ मनात कायम क्षोभच निर्माण करतो. समर्थ म्हणतात.

पुरेना जनी लोभ रे क्षोभ त्यांते ।
म्हणोनी जनी मागुता जन्म घेते ॥

लोभामुळे 'पुनरपि जननं पुनरपि मरणं' मागे लागते. म्हणून समर्थ मनाला वारंवार सांगतात. सर्वांसाठी जे जे शक्य आहे तेवढे केले की त्यातून दूर हो, बा मना कशातही गुंतुन पडू नकोस. पण प्रत्यक्षात मात्र प्रपंचाची मिठी सुटत नाही. माणसाची सहज प्रवृत्ती अशी असते की, स्वतःच्या प्रपंचासाठी साठवता साठवता आपली मुलं नातवंड यांच्यासाठीही साठवून ठेवण्याची त्याची वृत्ती प्रबळ होत जाते. त्यामुळे आयुष्य संपत आले तरीही देहाचे कष्ट मात्र सुटत नाहीत. इतके कष्टात दिवस काढून मुलं मात्र म्हणतात, की मला घरातल्या अडचणींमुळे संधी मिळाली नाही नाहीतर माझे आयुष्य वेगळेच काही घडले असते. पण समर्थ मात्र सांगतात.

नको रे मना द्रव्य ते पुढिलांचे ''

परद्रव्याची अभिलाषा धरू नको सांगणारे समर्थ या ठिकाणी वडीलांच्या पैशांची अभिलाषा नको हे स्पष्ट करतात. या अपेक्षेतूनच निर्माण होणारे संघर्ष, होणारी घुसमट याचा अनेकांना प्रत्यय येतो. या प्रपंचातून मुक्त व्हायचे असेल तर पुढच्या पिढीकडे सूत्र सोपवून आपण निवृत्त होणे गरजेचे आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र पुढच्या पिढीचे संसार अर्धेवर आले तरी आधीच्या पिढीचा अंकुश त्यांच्यावर असतो. कारण या ठिकाणी विश्वासाचा अभाव असतो. म्हणूनच कितीही वय झाले तरी प्रपंच सुटत नाही आणि हरिनाम मुखात येत नाही. म्हणून समर्थ मनाला सांगतात.

मना सज्जना हीत माझे करावे ।
रघूनायका दृढ चित्ती धरावे ॥

समर्थांनी याठिकाणी मनालाच स्वतःचे हित करून घेण्याविषयी विनंती केली आहे. सतत श्रीरामाच्या चिंतनात मन रमावे यासाठी समर्थ म्हणतात.

मना राघवेवीण आशा नको रे ।
मना मानवाची नको किर्ती तूं रे ।
जया वर्णिती वेद शास्त्रे पूराणे।
तया वर्णिता सर्वही श्लाघ्यवाणे ।

मना राघवाशिवाय तू कोणाचीच आशा करू नकोस.

सदा सर्वदा नाम वाचे वसों दे ।
अहंता मनी पापिणी ते नसो दे ॥

सतत भगवंताचे स्मरण जर ठेवायचे असेल तर बा मना ती अहंता जी पापिणी आहे तीचा वारादेखील तुला लागू देऊ नको. खरेतर भगवंताचे कर्तृत्व विलक्षण आहे तसेच ही माया मोठी विचित्र आहे. या मायेमुळे सर्व काही घडून येत असते. या मायेचा महिमा भगवंताला पूर्ण ज्ञात असतो. भगवंताव्यतिरिक्त एखाद्याला मायेची करणी समजली तर लगेच त्याला पापिणी अहंता झपाटते. समर्थ म्हणतात, भगवंताचा शोध घ्यायचा असेल तर या पापिणीला पहिले नष्ट केले पाहिजे. कारण या अहंकाराने काय होते तर दुसऱ्याचे गुण जाणून घेण्याची तसेच त्याचे योग्य मूल्यमापन करण्याची वृत्ती नाहीशी होते. मुख्य म्हणजे या मीपणाने भक्ती नाहीशी होते. समर्थांनी दासबोधामध्ये याविषयी विचार व्यक्त करताना म्हटले आहे.

धन्य परमेश्वराची करणी । अनुमानेना अंत:करणी ।
उगीच अहंता पापिणी । वेढा लावी ॥
अहंता सांडून विवरणे। कित्येक देवाचे करणे ।
पाहतां मनुष्याचे जीणे । थोडे आहे ॥

भगवंताची करणी जाणून घेण्यासाठी सामान्य मानवाची बुद्धी अपुरी आहे. यासाठी समर्थ सांगतात आपली अहंता बाजूला सारून त्याच्या अनेक करणींचे मनन चिंतन करावे. कारण माणसाचे आयुष्य अत्यंत अल्प आहे तसेच त्याला प्राप्त झालेला देह हा देखिल क्षणभंगूर आहे. असे असताना माणूस निष्कारण गर्व का धारण करतो. समर्थ म्हणतात. या अहंकाराचा पुंडपणा मोडून काढावा आणि विवेकाने भगवंताचा शोध घ्यावा हे सर्वांत उत्तम.

भगवंताला शरण जा असे सांगणारे समर्थ या ठिकाणी मनाला ग्वाही देतात की त्याला शरण गेलेल्या जीवांची, आपल्या भक्तांची तो कधीच उपेक्षा करीत नाही. समर्थ म्हणतात.

समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।
असा सर्व भूमंडळी कोण आहे ?
जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥

आपल्या भक्तासाठी संकटात धावून जाणारे भगवंत ज्यांना पाहून काळाला

देखील कापरे भरते अशा या प्रभूंना तू शरण जा. कारण ज्या कोणावर या भगवंताची कृपा आहे त्याच्याकडे वक्रदृष्टीने पाहण्याचे सामर्थ्य कोणामध्येही नाही. अशा या कृपाळू दयाघनाला अनन्य भावाने शरण जाण्याची विनंती समर्थ मनाला करतात.

भगवंताच्या समीप जाण्यासाठी समर्थ देहबुद्धि सोडायला सांगतात आणि 'देहेबुध्दि ते आत्मबुध्दि करावी' असे सांगून देहासक्ती सोडायला सांगतात. कारण देह तोच मी अशी जी देहबुद्धि त्यामुळे अहंता बळकट होते. तसेच यामुळे दुःख, शोक, चिंता, उत्पन्न होतात त्यामुळे समर्थ वारंवार 'विवेके देहेबुध्दि सोडोनि द्यावी असे सांगतात. या देहबुद्धिमुळे जे मिथ्या आहे तेच सत्य वाटते आणि जे सत्य आहे ते मिथ्या वाटते. देहबुद्धिच्या आहारी गेल्याने मीपणाचा जन्म होतो आणि माणसामधला हा 'मी' त्याचा घात करतो. या मीपणाचे परिणाम अतिशय भयंकर असतात.

मीपणे वस्तु नाकळे । मीपणे भक्ति मावळे ।
मीपणे शक्ती गळे । वैराग्याची ॥

मीपणाने मनात वासना निर्माण होऊन दृष्य पदार्थावर मन जडते. या वृत्तीमुळे मन बंधनात अडकते आणि या बंधनामुळे मनाला जडत्त्व प्राप्त होते. या देहबुद्धिचे अनेक धोके आहेत.

देहबुद्धि जयापाशी । पाप वसे त्या मानसी ।
दोष जाणा अहंकार । तेणे सत्य हा संसार ।

देहबुद्धितून निर्माण झालेल्या अहंकाराने आपल्यातील प्रेमभाव नष्ट होतो. मीपणाने प्रपंच व परमार्थ दोन्ही साधत नाही. या अहंकारी वृत्तीमुळे यश, कीर्ती, प्रताप यापैकी काहीच मिळत नाही.

मी कर्ता ऐसे म्हणसी । तेणे तूं कष्टी होसी ।
राम कर्ता म्हणता पावसी । यश कीर्ती प्रताप ॥

सर्व सुखाचा सागर असणाऱ्या भगवंताला आपले सर्वस्व मानलेस तरच हे मना तुला खरा शाश्वत आनंद प्राप्त होणार आहे हे समर्थ वारंवार सांगतात.

या देहबुद्धितून सुटलेले आणि भगवंताचे जे धन्यता पावलेले दास आहेत अशा या दासाची लक्षणे समर्थांनी जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा मध्ये वर्णन केली आहेत. या दासाला या जगात आल्यानंतर आपले साध्य साधता आले. ज्याला खरा आनंद प्राप्त झाला, तसेच उपासना, साधनेच्या माध्यमातून शाश्वत आनंद प्राप्त झाला तो धन्यता पावलेला दास व्यावहारिक जगतात कसा वागतो या लक्षणांची यादीच समर्थ या ठिकाणी देतात.
समर्थ मनाला शुद्धज्ञान प्राप्त करून घेण्याची शिकवण देतात.

ऐक ज्ञानाचे लक्षण । ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान ।
पहावे आपणासि आपण । या नाव ज्ञान ॥

असे हे ज्ञान प्राप्त झालेला हा ज्ञानी पुरुष दृष्य जगतात वावरताना सर्वांशी प्रेमाने वागतो. त्यांचे संभाषण अतिशय मृदू असते. तो कोणाला दुखावत नाही. त्याला सर्वत्र भगवंताचेच दर्शन घडत असते. त्यामुळे तो मनाने भगवंताचे चिंतन करतो, डोळ्यांनी सर्वत्र त्याचे दर्शन घेतो, वाणीने सतत त्याचे नाम घेतो. त्याच्यामधील द्वैतभाव पूर्णपणे नष्ट झालेला असतो. भगवंताची सेवा करणे हा एकच भाव त्याच्या मनामध्ये रुजलेले असतो. त्याच्या मनातील द्वैतभाव नष्ट झाल्यामुळेच तो कोणाकडून कशाची अपेक्षा न करता, सर्वांसाठी प्रेमाने काहीही करू शकतो. भगवंताचा हा भक्त या जगतात जगताना 'जाणता' होऊ राहतो. त्याला सार काय आणि असार काय याची पूर्ण जाणीव असते. स्वस्वरूपाचे ज्ञान प्राप्त होऊनही हा जाणता भक्त अहंकार मनामध्ये न ठेवता सेवक भावनेने नम्रपणे आपले जीवन व्यतित करत असतो. तसेच सत्त्व, रज,तम या गुणांवर तो प्रेम करतो. रज, तमोगुण हे सत्त्वगुणाप्रमाणेच आवश्यक आहेत. याची जाणिव त्याला असल्यामुळे या तीनही गुणांचा तो आदर करतो. गुणांवर प्रेम करणारा हा रामभक्त साधनेचा क्रमही पाळतो. तो व्यवहारधर्म पाळतो पण कशात अडकत नाही. विश्वावर प्रेम करण्याची उपासना करतो आणि शुद्धज्ञान प्राप्त झाल्याने त्या आनंदातही रमतो. सेवाभाव मनात बाळगून भगवद्चिंतनात रमणारा दास स्वधर्माचे पालन करतो. 'सकळ धर्मामध्ये धर्म । स्वरूपी राहणे हा स्वधर्म ॥ त्यामुळे हा भक्त परमानंदात आपले जीवन व्यतित करतो. जग आणि ईश्वर याविषयी त्याच्या मनात संभ्रम नसतो. अत्यंत शांत, संयमी, दृढनिश्चयी अशा या दासाविषयी भगवंताला देखील अतिशय आनंद वाटतो. हा ज्ञानी भक्त आपला सर्व वेळ तत्त्वचिंतनात घालवतो. 'करी सुखसंवाद जो उगमाचा' हा ज्ञानी पुरुष प्रवाहाच्या उलट दिशेने पोहत जाऊन उगमाचा शोध घेतो. नित्य सत्याची कास धरणारा असा हा सत्यवादी असतो. समर्थांनी रेखाटलेला सर्वोत्तम दास हा केवळ ज्ञानी नसून तो ज्ञानी भक्त आहे. त्याच्या जीवनात ईश्वराचे ज्ञान आणि विश्वाचे निस्वार्थी प्रेम यांचा सुरेख संगम झालेला असतो.

या जाणत्या भक्ताप्रमाणे आनंदी जीवन जगता यावे यासाठी समर्थांनी या श्लोकांमधून मार्गदर्शन केले आहे. जाणत्या भक्ताप्रमाणे अवस्था प्राप्त होण्यासाठी सत्संग हा अतिशय महत्त्वाचा आहे. याचे दाखले त्यांनी या श्लोकांमधून अनेक ठिकाणी दिले आहेत. मनाला सत्संगात रमायला सांगताना समर्थ म्हणतात,

मना वासना वासुदेवी वसों दे ।
मना कामना कामसंगी नसो दे ।
या सत्संगतीमुळे काय घडते तर,
गती कारणे संगती सज्जनाची ।
मती पालटे समती दुर्जनाची ।

मनावर सतत चांगले संस्कार होत गेले की, मन आपोआपच चांगल्याच गोष्टींचा विचार करते. म्हणून समर्थ मनाला 'सदा संगती सज्जनाची धरावी' हे सांगत राहतात. वादापासून दूर राहायला सांगून सुसंवाद साधायला शिकवतात. माणसाला नेहमी आधाराची गरज भासते. त्यामुळे बाह्य जगातील आधार शोधण्याचा त्याचा कायम प्रयत्न राहतो. त्यामुळे तो भगवंताची मोघम स्वरूपातील भक्ती तो करू शकतो. पण हा भगवंत आपल्या अस्तित्वाचा एकमेव आधार आहे हे त्याला जाणवत नाही. जोपर्यंत भगवंताव्यतिरिक्त दुसरा आधार मनाला भरवशाचा वाटतो तो पर्यंत भगवंताचे नाम त्या तीव्र ओढीने घेतले जात नाही. त्याच्या स्मरणात ती तीव्रता नसल्यामुळे नामस्मरणाची साधना देखील एकाग्रपूर्वक होत नाही. ही तीव्रता निर्माण होण्यासाठीच समर्थ मनाला मार्गदर्शन करतात. कारण मुळातच सात्विक असलेले हे मन सतत सत्संगात राहिले तर आपोआपच ते भगवंताचे स्वरूप म्हणजे स्वस्वरूप जाणून घेऊ शकणार आहे.

समर्थांच्या या २०५ अमृतकणांमध्ये सामान्य जीवामध्ये चैतन्य निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे. या नरदेहाच्या माध्यमातून काय काय करता येणे शक्य आहे हे समर्थ स्पष्ट करतात. तसेच मनाचे सामर्थ्य ओळखूनच समर्थ मनाला विवेकाने आवर घालून त्याला रामरूपी कसे भरावे याचे मार्गदर्शन करतात. मनाचे श्लोक हा अमृताचा ठेवा आहे. मन हे सर्व सिद्धीचे कारण आहे. या मनाच्या प्रसन्नतेवरच अनेक गोष्टी अवलंबून आहेत हे जाणून मनाला प्रसन्न करून घेणे महत्त्वाचे आहे. मनात येईल त्याप्रमाणे वागणे यापेक्षा मनाला बुद्धी आणि विवेकाच्या आधारे योग्य प्रकारे कसे आवरावे याचे मार्गदर्शन करणारे हे मनाचे श्लोक एखाद्या दिपस्तंभाप्रमाणे आपल्या जीवनाला योग्य दिशा दाखवितात. आपल्या आयुष्याला सोन्याप्रमाणे झळाळी येण्यासाठी मनाचे श्लोकरूपी परिस प्रत्येकाने आपल्या अंतःकरणात जपून ठेवावा.

- डॉ. माधवी संजय महाजन
ओंकार सेक्टर २७, प्लॉट नं. १३५, निगडी प्राधिकरण,
पुणे - ४११ ०४४

● ● ●

स्वामी रामदास

'जय जय रघुवीर समर्थ'
नामघोष येता श्रवणी,
रामदास स्वामी तुमची
प्रकटावी मूर्ती नयनीं !
बलदण्ड देहयष्टी ती -
परिधानित भगवी कफनी,
हातांत रुळे जपमाळ
रामनाम पावन वदनीं !
नेत्रांत प्रभा प्रज्ञेची-
गंध, भस्म लेपित कांती,
गर्जती खडावा पायी
घन जटा शोभती माथीं !
शुकमुनिसम विराग तुमचा-
ऋषि वसिष्ठापरि ज्ञान,
वाल्मिकिसम सुरस कवित्वीं
अक्षरलें आत्मज्ञान !
देशावर यवनी अंमल -
धर्मावर येइ अरिष्ट,
छळ, गोवध, अत्याचार
रयतेस बाटविति दुष्ट !

गायत्री पुरश्चरणासह -
परिभ्रमण करित देशांत,
पाहिले स्वजन अनेक
भयग्रस्त, व्यथित अशांत !
स्थिती हवालदिल देखुनिया -
कढ पोळत होते चित्ता
जनहिताय आयु वेंचियले
विश्वाची वाहींत चिंता !
आदर्श राम रघुवीर -
भक्तिमार्ग सुगम दाखविला
जनिं बलोपासना कथिली,
धर्माभिमान जागविला !
ध्वंसिली राजवट जुलुमी -
शिवप्रभू इथें अवतरलें,
हे अवघे भारत वर्ष
'आनंदवनभुवन' घडलें !
शिवभूपातें तुम्हि केला -
उपदेश राजधर्माचा,
अन् प्रापंचिक आम्हातें
आचार-धर्म-कर्माचा !

हिंदवी स्वराज्यातिल ह्या -
तुम्हि परमवंद्य राजगुरू !
ह्या सनातनी राष्ट्राचें
परमपूज्य तुम्हि राष्ट्रगुरू !
दासबोध ग्रंथ सुबोध
हा चिदादित्य साक्षात,
अज्ञानतिमिर भेदुनिया
उजळितसे जीवनपंथ !
जनमनां तुम्ही बोधियलें -
अनमोल 'मनाचे श्लोक'
श्लोकार्थ जाणुनी घ्यावा...
शमवावी दुःखे, शोक !
अजि देशिचिये ह्या पृथ्वीं -
मातले दुरित अनिवार !
हे समर्थ स्वामिन् ! आतां
तव हवा पुन्हा अवतार !!

- विश्वनाथ जोशी
नदी वेस, २ श्रीराम सदनिका, ब २१,
इचलकरंजी - ४१६ ११५

समर्थांची जनसामान्यांस शिकवण

- सौ. रेखाताई पटवर्धन



''धन्य धन्य हा नरदेहो। येथील अपूर्वता पाहो । नाना देहां मध्ये वरिष्ठ। म्हणौनि नरदेह श्रेष्ठ । परंतु हा परोपकारी झिजवून । कीर्तीरुपे उरवावा। देह परमार्थी लाविले । तरिच याचे सार्थक जाले । नाही तरी वेर्थचि गेले । नाना आघाते मृत्युपंथे ।''

नरदेह हा अपूर्व असलेने समर्थ त्यास 'धन्य' म्हणतात, कारण वनस्पती - प्राणी -पक्षी अशा सर्व प्रकारच्या योनींमध्ये नरयोनी ही सर्वश्रेष्ठ म्हणून वरिष्ठ आहे असे सांगतात. वनस्पतींमध्ये फक्त चैतन्य आहे जाणीव नाही, पशु-पक्ष्यांमध्ये चैतन्य-जाणीव आहे पण फक्त आहार-निद्रा -भय - मैथुन एवढ्यां पुरतीच मर्यादित आहे. त्याहीपेक्षा मन - बुध्दिची सुरेख लेणी ल्यायलेला हा नरदेह वैशिष्ट्यपूर्ण अशा अनमोल रत्नांनी भरलेला आहे. म्हणून समर्थ त्यास ''रत्नपेटी'' म्हणतात. पण त्याचा खरा गौरव - कृतार्थता- इतिकर्तव्यता आहे ती कशात ते अत्यंत रसिकपणे सांगतात- ''आयुष्य हेचि रत्न पेटी । माजी भजनरत्ने गोमटी । ईश्वरी अर्पूनिया लुटी । आनंदाची करावी ।'' हे नरजन्माचे खरे अंतिम ध्येय आहे. ज्या सत् चित् आनंदापासून हा ईश्वराचा अंश निर्माण झाला आहे त्याची धन्यता अखेर त्यात विलिन एकरूप वा समरस होण्यातच आहे. कारण या विश्वात प्रत्येक जीव निर्भेळ (दुःखरहित) सुख मिळविण्यासाठी धडपडतो आहे, आजच्या जगात - युगात सतत पळतो आहे. तो आनंद, ते समाधान, ती तृप्ती, संतोष, शांती, विश्रांती फक्त ज्ञानोत्तर भक्तीतच आहे. ही समर्थांची शास्त्र गुरु - आत्मप्रचिती आहे. म्हणून ते कळवळून, प्रसंगी अत्यंत स्पष्ट परखडपणे सामान्यांना हे पटण्यासाठी वेगवेगळ्या प्रकाराने सांगत आहेत. थोडक्यात प्रत्येक माणसाने आपल्या आयुष्याचे काहीतरी 'ध्येय' निश्चित करावे व ते प्राप्त करण्यासाठी संपूर्ण आयुष्य प्रयत्नशील राहावे हेच समर्थ सांगत आहेत. मनुष्याची इंद्रिये बाह्य जगत् विषयांकडे आकृष्ट होणारी आहेत. तो एकदम अंतःर्मुख होत नाही. हे जाणून 'देह परोपकारी झिजवून कीर्तीरूपे उरवावा' अशी सामान्य जनांना प्राथमिक शिकवण देतात.

इतकेच नव्हे तर सामान्य माणसाची दिनचर्या कशी असावी तेही सांगतात.

प्रातःकाळी उठावे । कांही पाठांतर करावे ।
येथानुशक्ती आठवावे सर्वोत्तमासी । द.११ - १५ ते ३०.

प्रत्येकाने पहाटे उठावे. दररोज चिंतन - मनन म्हणेजच ध्यान करावे, मग ते निर्गुण - निराकाराचे वा सगुण - साकाराचे काहीही असो. किंबहुना ज्याने मन-बुध्दि-हास्य ही सुंदर देणगी असलेले उत्तम मानव देहाचे निरोगी 'यंत्र' दिले त्या परमेश्वराप्रती कृतज्ञता व्यक्त करून आपल्या दिवसाची सुरुवात करावी.

शौच-मुखमार्जन प्रातःस्नानानंतर आपले देवपूजादि आन्हिक उरकून मग कांही फलाहार घ्यावा । मग संसारधंदा करावा'। इतकेच नव्हे तर समर्थ त्याही पुढे जाऊन सांगतात 'ज्याचा जो व्यापार । तेथे असावे खबरदार ।' म्हणजे प्रत्येकाने आपआपला उदरभरणाच्या कामधंद्यात अत्यंत सावधपणे, सचोटिने व उत्तम आणि तत्परतेने कार्यरत असावे इतके सारे त्या 'खबर्दार' मध्ये समर्थांना अपेक्षित आहे. कारण सदैव सावध राहणे, प्रयत्नशील - उद्यमशील असणे हे समर्थांना अपेक्षित आहे म्हणून ते परखडपणे म्हणतात काही मेळवी मग जेवी आळशी किंवा ऐदी, माणसाची समर्थांना मनस्वी चीड आहे. त्याला ते 'करंटा, आत्महत्यारा,' म्हणून त्याची निर्भत्सना संपूर्ण दासबोधात जिथे जिथे संधी सापडेल तेथे तेथे करतात. कारण त्यांच्यावेळची समाजवृत्ती मोंगलाची गुलामगिरी किंवा त्यांची थुंकी झेलून वतनदारी सरंजामशाही मिळवून ऐदीपणात लोळणारी अशीच समोर त्यांना सदैव दिसत होती. म्हणून तर शिवाजी महाराजांसारख्या नररत्नास त्यांनी पैलू पाडून त्यांच्यातला 'श्रीमंत योगी' यशवंत- कीर्तीवंत सामर्थ्यवंत ..... असा बनवला. अन् त्यायोगे असा मृत समाज एका ध्येयाने प्रेरित करून सजीव जागृत व समर्थ बनवला.

नायं आत्मा बलहीनेन लभ्यते- ह्या वेदवचनानुसार प्रत्येक मनुष्य सर्वार्थाने सबल - समर्थ बनला तरच तो अंतरी दडलेल्या आत्मारामाला पाहून त्याला प्राप्त करू शकतो हे ते जाणून होते.

माणूस म्हणून प्रथमतः शारीरिक बौद्धिक पातळीवर प्रत्येक जण उत्तम व आदर्श बनावा म्हणून अगदी लहान सहान छोट्या गोष्टीही त्यांनी दासबोधात अगदी सविस्तर पुनःपुन्हा (पुनरुक्ती दोष स्वीकारून ही) सांगीतल्या आहेत.

जैसा साहेब नमस्कारिजे । वोळखल्याउपरी । तैसा परमात्मा परमेश्वर । बरा वोळखावा पाहोन विचार ।'' पगार देणाऱ्या बॉसला जसा मनात नसताही (तो अनीतीमान असल्यास) नमस्कार करतो - किंबहुना करावा लागतो. तसे हे मन-बुद्धि युक्त सुंदर निरोगी शरीर व त्यातला निर्मळ शुद्ध अंतरात्मा चैतन्यतत्त्व देणाऱ्या परमेश्वराला विचारपूर्वक ओळखून त्याचे कृतज्ञतापूर्वक चिंतन करावे. हेच ध्यान, त्याचे अनंत गुण आठवत आठवत हळू हळू तो हृदयात साठवीत राहावा. जसे गुणांमुळे माणूस जवळ येतो तसेच त्या परमात्म्याचे औदार्य असजसे भावू लागते तसतसा तो हृदयात खोल खोल रुजत जातो.

हीच शिकवण साररूपाने दासबोधातील सविस्तरपणा सूक्ष्म करीत समर्थांनी मनाच्या श्लोकाद्वारेही सांगितली आहे. 'प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।' यामध्ये पहाटे उठून चिंतन मनन करावे हेच सांगितले आहे. आज सर्वत्र 'योगा' म्हणून ज्याचे प्रस्थ वाढत आहे तोच विचार 'विज्ञानाधिष्ठित अध्यात्म' समर्थांनी १५-१६ व्या शतकात सांगून ठेवले आहे.

उषःकालीच का उठायचे ? तर पूर्ण झोप झाल्याने मेंदू तल्लख 'फ्रेश' असतो, त्या वेळी वातावरणात प्रसन्नता व शांतता असते. तसेच संपूर्ण विश्वातील ज्ञानी, योगी भक्त त्या वेळी मनन-चिंतन-ध्यान निमग्न असल्याने ती स्पंदने समग्र वातावरण अधिक पवित्र करीत सामान्य माणसाची अध्यात्मिक प्रगती अग्रेसर करणारी ठरतात. ह्या उषःकालीन चिंतन मनन वा ध्यानामुळे दिवसभर सर्व प्रकारची अगदी शारीरिक बौद्धिक कामे करण्यास मेंदू व शरीर ताजेतवाने राहते. (Full of Energy)

'' पुढे वैखरी राम आधी वदावा'' - यामध्ये जप, पठण, पारायण इ. मोठ्याने करावे हे अपेक्षित आहे. याचेही विज्ञान असे की मोठ्याने म्हटल्यामुळे

आपली श्वसन व पचन संस्था यांना व्यायाम घडून त्या आपले काम दिवसभर उत्तम करतात. तसेच घरातील वास्तू व व्यक्ती यांचेवर आपोआपच उत्तम संस्कार घडतात. या शब्दातील अनमोल अचिंत्य शक्ती वास्तू व व्यक्तीने संकटापासून संरक्षण व उत्तम तऱ्हेने वर्धन हे दोन्हीही करतात.

सदाचार हा थोर सांडो नये तो ।
जनीं तोचि तो मानवी धन्य होतो।

या एका श्लोकात समर्थ उत्तम वा आदर्श मानवी जडण घडण सहजी सांगून जातात. असा विचार, तसा उच्चार व तसा आचार ही त्रिसूत्री इथे अनुस्यूत आहे. पहाटेचे चिंतन हे दिवसाच्या सदाचाराचे मूळ ठरते.

सदाचार म्हणजे - संतसंग खंडू नये । अंतर्यामी ।

परिस्थितीने जरी दुष्टांसमवेत राहायला लागले तरी मनातून संत किंवा सज्जनांचा जो आदर्श आहे तो कधीही ढळू देऊ नये. म्हणजे आपोआपच सत्याचे पालन काया, वाचा, मनःपूर्वक होईल. कोणाचेही वाईट चिंतणे होणार नाही. आळसाला फाटा देऊन मनुष्य प्रयत्नवादी राहील. चोरी - चहाडी यापासून आपोआपच दूर राहील. दुसऱ्याचे स्त्री, धन इ. लुबाडण्याचा मोह झाला तरी विवेकाने तो टाळला जाईल. हत्या वा हिंसाही हातून अजिबात होणार नाही. थोडक्यात आपण भले आपले काम (कर्तव्य) भले असा व्यक्तीचा नित्यक्रम राहील.

विचारपूर्वक विवेक अंगी बाणला की दुसऱ्यासाठी झिजणे, त्याग करणे यात आनंद वाटू लागेल. आपल्याप्रमाणेच इतरांना सन्मार्गाला सत्संगाला लावणे - हाच परोपकार न समजता उलट हे आनंदाचे कृत्य आपोआप हातून घडू लागेल. व्यसनी जनांना व्यसनमुक्त करून सत्संगप्रवण करणे हातून घडेल. नित्य सद्ग्रंथ स्वतः वाचून, लिहून ती गोडी इतरांना लावली जाईल.

'जे जे आपणासी ठावे ते ते इतरजनांसि शिकवावे, शहाणे करून सोडावे सकलजन' अशी आस लागून त्यानुसार वागणे हाच सदाचार होय.

'लेकुरें उदंड जालि' तो तें लक्ष्मी निघोन गेली ।' हा विचार मांडणारे समर्थ स्वतः विरक्त संन्यासी असून किती क्रांतदर्शी होते हेच यावरून दिसते.

जो अन्न देतो उदरासी । शरीर विकावे लागे त्यासी । मां जेणे घातले जन्मासी त्यासी कैसे विसरावे - असा रोखठोक सवाल समर्थ सर्वांना करतात. वर्षानुवर्षे दासबोधाची पारायणे करणारे देखील या ओव्यांची अंतमुर्ख होऊन विचारपूर्वक प्रत्यक्ष कृतीत अंमलबजावणी करतात का?

सांडून राम आनंदघन । ज्याचे मनीं विषयचिंतन । त्यासी कैंचे समाधान ? असा रोकडा सवालही समर्थ करतात. परंतु तुम्ही आम्ही वर्षानुवर्षे नुसती याची पारायणेच फक्त करतो. प्रत्यक्ष कृतीत समजूनही उतरत नाही ही सामान्यांची व्यथा वा दुर्दैव आहे !

दासबोधाच्या १७ दशकानंतरही द.१८ स.३मध्ये सारांशरुपाने समर्थ सामान्यजनांना केवळ २० ओव्यात नेमका व शेलका उपदेश करून शिकवितात.

दुर्लभ असा मनुष्य देह मिळाला आहे तो कारणी लावा विवेकाने वागून त्याचे सार्थक करा. मूर्खपणा, दुःसंग व आळस टाका नाहीतर यामुळे नागवले जाल-असे पोट तिडीकीने सांगतात. 'येकाग्र करुनिया मन । बळेंचि धरावे साधन । येत्नी आळसाचे दर्शन होऊच नये । अवगुण अवघेचि सांडावे । उत्तम गुण अभ्यासावे । दुसऱ्याचे अंतर जाणावे । पाठ उदंडचि असावे । सर्वकाळ उजळीत जावे । सांगितले गोष्टीचे असावे स्मरण अंतरी । अखंड येकांत सेवावा । ग्रंथमात्र धांडोळावा । प्रचित येईल तो घ्यावा । अर्थ मनीं ।'

आपली इंद्रिये बाह्यकेंद्री असल्याने त्यांना बळजबरीने आत्मकेंद्रित करून साधन-प्रवण करावे लागते. त्यासाठी मन एकाग्र करून, हे नित्य नियमाने करावेच. याबाबतीत अजिबात आळस करू नये. असे केले तरच सर्व उत्तम गुण अंगी बाणवणे अभ्यासपूर्वक शक्य आहे. त्यासाठी पाठांतर व पुनःपुन्हा वाचन-मनन (अभ्यास) अत्यंत आवश्यक आहे. यामुळेच संतसज्जनांचे सर्व बोल, त्यांचे सहज हितोपदेश हे रातत उजळणी करीत राहील्यानेच अंगी बाणतात. यासाठी एकांतात, शांतपणे आत्मनिरीक्षण व परीक्षणास वेळ देणे अत्यंत आवश्यक आहे. 'पहावे आपणासि आपण' हे दररोज नित्य नेमाने घडणे अत्यावश्यक आहे. एकांतातच केवळ आपल्या मनाशी संवाद साधून दुसऱ्याचे अंतर (अंतःकरण) आपण किती जाणले ते पाहणे घडले तरच आपली अध्यात्मात वा लैकिकातही प्रगती शक्य आहे. त्यासाठी गुरुवर श्रद्धा, विश्वास, निष्ठा जशी आवश्यक;तसेच गुरु वा संतजनांचे प्रत्यक्ष सान्निध्य नसल्यास सद्ग्रंथांच्या मननातून स्वशोध व स्वबोध घेणे ही तितकेच अनिवार्य ठरते. यासाठी प्रत्येक ग्रंथाचा अर्थ स्वतःसाठी आत्मप्रचिती प्रीत्यर्थ समजावून घेणे अत्यंत निकडीचे आहे. कारण एकाच गुरुचे वचन अनेकांनी ऐकलेले असले तरी व्यक्तीगणिक प्रत्येकास भावणारा त्याचा भावार्थ - गूढार्थ वेगवेगळा असतो. कारण तो त्याच्या बौद्धिक क्षमतेवर, निरीक्षणावर व सर्वांगीण पात्रतेवर अन् सर्वांत महत्त्वाचे म्हणजे गुरुकृपेवर अवलंबून असतो.

म्हणून एकाच शाळेत एकाच शिक्षकाकडून शिकणारे विद्यार्थी सगळे तोच विषय शिकत असले तरी प्रत्येकाच्या ग्रहण शक्तीनुसार प्रत्येकाची श्रेणी वेगवेगळी ठरते.

२० दशकात समर्थांनी दासबोधात जे सारे सविस्तर मांडले आहे तीच सर्व शिकवण सारांश रूपाने मनाचे श्लोक किंवा मनोबोधात मांडली आहे.

मना बोलणे नीच किंवा नित्य सोशित जावे ।
स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावे ।

हे मना तू सज्जन बनून भक्तीच्या पंथाने वाटचाल करीत राहा. म्हणजे मग तू स्वभावतःच सहजी त्या रामरूपाला प्राप्त करशील. त्यासाठी सामान्यजन ज्याला निंदतात ते कधीही काहीही करू नकोस उलट जनांमध्ये वंदनीय आहे त्या सर्वांचा अंगीकार कर त्यातच तुझे कल्याण आहे.

मरणाचे स्मरण असावे - म्हणजे मनुष्य नेहमी सदाचारीच बनेल हे मानसशास्त्र समर्थांनी नेमके ओळखून सांगीतले आहे. 'मृत्युनिरुपण' नावाचा एक समास त्यासाठी खर्चीही घातला आहे. 'संसार म्हणजे सवेचि स्वार । नाही मरणास उधार । मापी लागले शरीर घडीने घडी ।' असे सांगूनही सामान्य जन या विषय कर्दमातून बाहेर निघत नाहीत हे पाहून मनाच्या श्लोकातूनही समर्थ पुन्हा तोच विषय मांडतात.

मरे एक त्याचा दुजा शोक वाहे ।
अकस्मात तो ही पुढे जात आहे ।

तरीही अजून माणसे जागी होत नाहीत म्हणून अगदी पोटतिडीकीने, कळकळीने समर्थ काय म्हणतात पाहा -

येचि क्षणीं मरोन जासी । तरी रघुनाथीं अंतरलासी । माझें माझे म्हणतोसी म्हणोनिया । तुझें तुज नव्हें शरीर । तेथ इतरांचा कोण विचार । आता येक भगवंत साचार । धरीं भावार्थ बळें ।

हा अगदी शेवटी मतितार्थ म्हणून जनसामान्यांना केलेला उपदेश होय.

ज्याला 'आनंदाची 'सदैव लुटी' लुटायची आहे त्याने मी कर्ता ऐसे म्हणसी तेणे तू कष्टी होसी । राम कर्ता म्हणतां पावसी । येश कीर्ती प्रताप ' हे सूत्र अगदी नसानसात, पेशीत । रक्तात भिनवून घ्यावे म्हणजे तोच खरा धन्यता पावेल. मानवी धन्य होईल । **जय जय रघुवीर समर्थ ।**

- सौ. रेखाताई पटवर्धन
स्टेशनरोड अक्षय रेस्टॉरंट समोर, वृंदावन हॉटेल मागे, मिरज,
जि. सांगली - ४१६ ४१०

• • •

पहावे आपणासि आपण.....

- डॉ. भालचंद्र कापरेकर



प्रत्येक मनुष्याला आयुष्याच्या विशिष्ट वळणावर 'मी या जगात का आलो?' 'माझ्या आयुष्याचे ध्येय काय किंवा आता आयुष्यात करण्यासारखे काही आहे का?' असे प्रश्न छळू लागतात. कुठे तरी अतृप्ततेची भावना घर करून असते. अशा मनोवृत्तीत तो 'निरामय' सुखाचा शोध घेऊ लागतो. या व अशा सर्व प्रश्नांची उत्तरे व निरामय सुखप्राप्तीची साधने याचे विवेचन सर्व संतांनी आपल्या साहित्यातून केले आहे. ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी व अमृतानुभव, तुकारामांची अभंग गाथा, नाथांचे एकनाथी भागवत यातून याचे मार्गदर्शन केले आहे. समर्थ रामदासांनी समर्थ संप्रदायाचा प्रमाणग्रंथ ग्रंथराज दासबोध, आत्माराम, या प्रमाणग्रंथातून आणि पदवाङ्मयासारख्या साहित्य निर्मितीपासून समर्थपणे दिग्दर्शन केले आहे.

प्रत्येक संप्रदायाने संप्रदायाचे दैवत म्हणून विशिष्ट देवाला व प्रमाण ग्रंथाला स्वीकारले आहे. समर्थ संप्रदायाचे दैवत श्रीराम व प्रमाणग्रंथ दासबोध. समर्थांचा श्रीराम हा त्रिमित स्वरूपाचा आहे. दाशरथी राम हे त्यांचे आधिभौतिक रूप सगुण रूपातील श्रीराम हे आधिदैविक रूप, तर प्रत्येक माणसाच्या अंतःकरणात असणारा 'आत्माराम' हे त्याचे आध्यात्मिक रूप. आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक स्वरूपातील रामोपासना प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणे करणे सहज शक्य व्हावे म्हणूनच समर्थांनी आपल्या भक्तांपुढे ठेवली. 'सगुणाचेनि आधारे निर्गुण पाविजे निर्धारे।' हेच समर्थ निरूपित उपासनेचे मुख्य सूत्र आहे. सांप्रदायिकांपुढे निर्गुण, निराकार परब्रह्माची उपासना व त्यायोगे आत्मारामाचे दर्शन हेच साध्य समर्थांनी आपल्या भक्तांपुढे ठेवले आहे. 'गमू पंथ अनंत या राघवाचा' हे याचे सूत्र आहे.

या साध्यासाठी कर्म, ज्ञान, योग हे मार्ग बद्धापासून सिद्धापर्यंत सर्वांसाठी आपल्या सर्व संतानी निरूपिले आहेत. परंतु भक्तीमार्ग हा आचरण्यास सहज सोपा असल्याने व अंतिम ध्येय प्राप्तीसाठी सुलभ असा आहे. भक्ती हिच कर्म, ज्ञान किंवा योग या मार्गापेक्षाही श्रेष्ठ असल्याचे नारदभक्तिसूत्रातही सांगितले आहे. भागवतात सांगितलेली-

'श्रवणं'किर्तनं विष्णोः पादसेवनं।
अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम ॥१॥ (७.५.२३)

भक्तिच समर्थांनी आपल्या साहित्यातून निरूपिली आहे. समर्थनिरूपित नवविधा भक्ती 'इह' आणि 'पर' अशा दोन्ही जीवननिष्ठांना सामावणारी आहे 'व्यावहारिक' व 'पारमार्थिक' यांचा समन्वय त्यांच्या भक्तीनिरूपणा आढळतो. ज्ञान, भक्ती व कर्म या तिनही मार्गांना समन्वित करणारी अशी भक्तिसाधना समर्थांनी सांगितली. समर्थ स्वतः बुद्धीयोगिच होते. त्यामुळे 'इहलोकी, परलोकी, बुद्धीयोगिच पाहिजे' असा त्यांचा आग्रह होता. त्यासाठी प्रपंच व परमार्थ यांचे संमीलन घडवून आणून निर्गुण, निराकार परब्रह्माच्या अंतिम ध्येयप्राप्तीसाठी बुद्धी योगद्वारा ही भक्तीसाधना सांगितली. हेच समर्थांच्या भक्तिनिरूपणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

भक्ती ही मुळातच मातृस्वरूप आहे. मातेच्या ममतेने प्रत्येक भक्ताना सांभाळून त्याच्या गुणवत्तेनुसार आचारधर्माचे पालन करवून घेऊन अंतिमतः निरामय अशा सत्+चित्+आनंद परब्रह्माचे दर्शन ती घडवते. भक्ती ही कुणालाही कुठेही व कधीही करता येते. त्याला स्थळ, काळ व वेळ यांचे बंधन नाही. तसेच स्त्री, पुरुष, उच्च, नीच, सुशिक्षित, अशिक्षित अशा कुणालाही करता येणारी व धर्म, पंथ, जात अशी भेदरहित आहे. मात्र परमेश्वराविषयी भक्तिभाव मात्र अवश्य पाहिजे. परमेश्वराविषयी भक्तिभाव नसेल तर मुक्तीची बडबड करू नये. असे ज्ञानेश्वर महाराज 'भावेविण भक्ति भक्तीवीण मुक्ति । बळेवीण शक्ती बोलू नये ।' अशा शब्दात स्पष्टपणे सांगतात तर बुद्धियोगी समर्थ आपल्या पदात 'भक्तिभावे सापडे देव येक रे । भक्तिभाव हा सर्वही विवेक रे ॥धृ॥ असे विवेकनिष्ठ भक्तीचे वर्णन करतात.

'जाणावे आपणासि आपण....' हे तत्त्व ध्यान्यात घेऊन प्रत्येकाने आपल्या स्वतःची गुणवत्ता, आकलन शक्ती याचा आदर करून सद्गुरुकृपा प्राप्त करून घेऊन त्यानुसार भक्तिमार्ग आचरून आध्यात्मिक उन्नयन करावे. यासाठी समर्थांनी तपशीलवार 'नवविधाभक्ती सांगितली. श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन हे भक्तिप्रकार एकमेकांना पूरकच आहेत. यातील कुठलाही भक्तिप्रकार पूर्णपणे स्वतंत्र नाही. या भक्तीप्रकारापैकी एक किंवा अधिक भक्तिप्रकाराच्या साहचर्यातून परमात्मप्राप्ती हें साध्य प्राप्त होते. या नवविधाभक्तीपैकी पादसेवन, अर्चन, वंदन आणि दास्य या चारभक्ती कायिकस्वरूपाच्या तर श्रवण कीर्तन हे वाचिक स्वरूपाचे भक्ती प्रकार आहेत. स्मरणरूप ही मानसिक स्वरूपाचा असून कायिक, वाचिक व मानसिक भक्तिप्रकाराचे एकत्रित स्वरूप म्हणजे सख्य व आत्मनिवेदन भक्ती होय. नवविधा भक्तिपैकी आत्मनिवेदन भक्तिचे विवेचन यापुढे केले आहे.

नवविधा भक्तिपैकी शेवटचा सोपान म्हणजे आत्मनिवेदनभक्ती नि+विद या धातूपासून निवेदन हा शब्द बनला आहे. याचा अर्थ आपले सर्वस्व अर्पण करणे असा आहे.

आपल्या दासबोध या ग्रंथाचे प्रयोजनच स्वामींनी -

'ग्रंथ नाम दासबोध । गुरुशिष्यांचा संवाद ।
येथे बोलिला विशद । भक्तिमार्ग । (द.१.१.२)

असे सांगून नवविधाभक्तिवरील भाष्य दशक चारमध्ये सांगोपांग केले आहे.

आत्मनिवेदन भक्तीची व्याख्या दासबोधात समर्थांनी
आत्मा निर्गुण निरंजन । तयासि असावे अनन्य ।

अनन्य म्हणिजे नाही अन्य । आपण कैचे तेथे ।
आत्म म्हणिजे तो अद्वैत । जेथे नाही द्वैताद्वैत ।
तेथे मी पणाचा हेत । उरेल कैचा ॥ (द.४.९.१७ व १८)

आत्मा हा मुळात निर्गुण, निराकार व चिरंतन आहे. नरदेहामधे तो वास करतो. देहबुद्धीने मी म्हणजे परब्रह्म असे समजून तो राहतो. त्याच्या अतःकरणातील आस्तित्वाची अनुभूती भक्तात्मा देहात्मक मी संपून गेल्यावर होते. म्हणजे तुज आहे तुजपाशी हेच त्याला जाणवते. कायिक, वाचिक व मानसिक भक्तिप्रकारात भक्त आणि परमेश्वर असे द्वैत असतेच. पण आत्मनिवेदन या भक्तिमध्ये देहात्म मी संपूर्णपणे निघून जातो व भक्ताला जो निर्गुण, निराकार, स्वसंवेद्य, स्वयंप्रकाशी अशा आत्मरामाची आत्मानुभूती येते. ही अनुभूती प्राप्त होण्यासाठी असा भक्त स्वतःच्या आस्तित्वाची व्याप्ती इतकी करतो की तो त्या परमात्म्यात पूर्णपणे सामाऊन जातो. तेथे अद्वैत प्रस्थापित होते यालाच स्वामी अभेदभक्ती असेहि संबोधतात. या अभेद भक्तिची प्रक्रिया कशी घडते हे सांगताना स्वामी म्हणतात-

तत्वे तत्त्व जेव्हा सरे । तेव्हा आपण कैचा उरे ।
आत्मनिवेदन येणे प्रकारे । सहजचि जाले ॥ (द.४.९.९)

एका तत्वाने दुसऱ्या तत्त्वाचा निरास होऊन वेगळेपणानी मी उतरच नाही. पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश या पंचमहाभूतापासून विश्वनिर्मिती झाली. आकाश →वायु→ तेज →आप→पृथ्वी हा क्रम विश्वनिर्मितीचा तर याच्या उलटक्रमाने म्हणजे पृथ्वी→आप → तेज→वायु व आकाश या क्रमाने एक तत्व दुसऱ्या तत्वात विलीन होते. याच पद्धतीने देहातील पंचमहाभुतेदेखील देहबुद्धीचा मी संपून गेल्यावर एकमेकात विलीन होतात व आत्माराम परमात्म्याशी म्हणजेच परब्रह्माशी एकरूप होतो. आत्मा व परमात्मा यातील द्वैत संपून अद्वैत स्थिती प्राप्त होते. यापुढे समर्थांनी आत्मनिवेदन भक्तीचे तीन प्रकार सांगितले आहेत. काया, वाचा, मने मी देवाचा अशी अनुभूती येते ते जड आत्मनिवेदन, जगदीश हाच कर्ता व मी त्याचा अंश असे मानणे म्हणजे चंचल आत्मनिवेदन तर जगाचा प्रलय झाला की, जगदीश्वरही संपतो. पण परब्रह्मच उरते ही आत्मानुभूती म्हणजे चंचल आत्मनिवेदन होय. समर्थांनी निश्चळ आत्मनिवेदनालाच अभेद भक्ती असे संबोधले आहे. याचेच श्रेष्ठत्व समर्थ

पंचभुतामधे आकाश । सकळ देवामध्ये जगदीश ।
नवविधाभक्तिमध्ये विशेष । भक्ति नवमी ॥ (द.४.९.२४)

अशा शब्दात व्यक्त करतात.

आत्मनिवेदन भक्तीची व्याख्या व विवेचन केले तरी समर्थांना भक्तिचे हे वर्म आपल्या भक्तांना नीट कळेल का? कळले तर नीट उमजेल का? अशी शंका येते. आपल्या एका पदात 'ब्रह्मज्ञान काय होय बावळ्याला बावळ्याला ॥

पिकले आंबे काय होय कावळ्याला ॥धृ॥

अशी नाठाळ भक्ताची 'बावळा म्हणून निर्भत्सना करून पिकलेल्या रसरशीत मधुर आंब्यांचे सेवन ज्याप्रमाणे कावळा करू शकत नाही तसेच बद्ध मनुष्याचेही असते असेही ते सांगतात असे असून देखील दासबोधातील भक्तिमार्ग निरूपण न समजलेल्या भक्तासाठी आपल्या आत्माराम, मनाचे श्लोक व पदवाङ्मयातून 'बहुधा आध्यात्मनिरूपण ते करतात.

समर्थ संप्रदायाचा हरीपाठ असणाऱ्या आत्माराम या ग्रंथात -

दासबोधीचे समासी । निर्मुळ केले मीपणासी ।
तया निरुपणेहि वृत्तीसी । पालट दिसेना ॥
म्हणोनी न पुसता सांगणे । घडले शिष्या तुजकारणें ।
आता तरी सोये धरणे । श्रवण मननाची ॥(अ.१.२० व २१)

असे स्पष्टपणे शिष्याची कानउघाडणी ते करतात. दासबोधात सांगोपांग विवेचन करून देखील शिष्याच्या वृत्तीत 'पालट दिसेना' हे बघून 'न पुसता सांगणे हा धर्म नव्हे' असे असून देखील पुनःपुन उजळणी करण्यासाठी 'बहुधा अध्यात्मनिरूपण' करताना स्वामी गुंतलेले दिसतात. यावरून या ठिकाणी देखील समर्थांचा सगळा व्यवहार 'रोकडा' आणि परखड व प्रत्ययकारी आहे. याची पदोपदी जाणीव ते आपल्या शिष्याला दिल्याशिवाय पुढे जात नाहीत हे ध्यानात येते. असे असूनसुद्धा मातेच्या ममतेने सहृदयी समर्थ आत्माराम या संप्रदायाचा हरीपाठ असणाऱ्या ग्रंथात आत्मनिवेदन भक्तिची व्याख्या -

प्राप्त झाले आत्मज्ञान । अभिन्नपणे जे विज्ञान ।
तेचि जाण आत्मनिवेदन । जेथे मी तू पण नाही ॥(अ.४.३१)

अशी करतात. आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर जेथे परब्रह्माशी एकरुप होण्याची क्रिया घडते आणि शिष्य व गुरू हे दोघेही अस्तित्वात न राहता पूर्णपणे एकमेकात सामाऊन जातात म्हणजेच ते परब्रह्मरूप होतात. तेथे अद्वैत प्रस्थापित होते. ही अनुभूती म्हणजेच सिद्धाची 'उन्मनी' अवस्था होय. याचेच स्पष्टीकरण 'पंचसमासी' मध्ये समर्थ 'सेविले आपणासी आपण । हेचि अनुभवाची खूण ॥ (अ.५.२६) असे देतात. याचा अर्थ सेवन करणारा व सेव्य पदार्थ असे न राहता ते एकरूप होतात. मग कुणी सेवन करायचे? व काय सेवन करायचे? असा प्रश्न उठतो. हेच शिष्याला अनुभवायला मिळणारे 'आनंदपद' हीच अभेदभक्ती.

याच अभेदभक्तीला चौथी भक्ती म्हणजे ज्ञानीभक्ती असे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात तर एकनाथ याच भक्तीला निजभक्ती सहजभक्ती असे संबोधतात.

ही अनन्यभक्ती केवळ गुरुकृपेमुळेच प्राप्त होते. सद्गुरूचे महत्त्व समर्थ 'सद्गुरुवाचून देव मोठा । जयास वाटे तो करंटा ।' असे ठासून सांगतात. अशी सद्गुरुकृपा समर्थांच्या सर्वच शिष्यांना लाभली परंतु समर्थांनी आपल्या एका पदात म्हटल्याप्रमाणे -

जो आठासी सांडूनी नवमीस गेला ।
आणि नवमीचाहि मस्तकी चढला ।
तयासिच आत्माराम भेटला ॥

हा आकाशमार्गी जाणारा गुप्तपंथ म्हणजेच 'पंथराज.' आपल्या प्राणाप्रिय अशा कल्याणस्वामी व 'स्वानुभवकर्ते' दिनकरस्वामी यांनाच दाखवला. समर्थकृपेने अभेदभक्तिचा मार्ग स्वीकारून 'आनंदपदी' विराजमान झालेल्या शिष्योत्तमांनी आपली अनुभूती स्वतःच्या साहित्यातून व्यक्त केली आहे. त्याचेही प्रस्तुत विषयाच्या संदर्भात महत्त्व आहे म्हणून त्याचीही नोंद या ठिकाणी घ्यायला हवी.

स्वानुभव दिनकरकर्ते दिनकरस्वामी म्हणतात-

ते वि स्वानुभवेंचि दिनकर । पाहो गेला स्वरूपसाचार ।
तवं पाहते पणासि थार । नाहीच कोठे ॥७॥
जेथे पहातपणचि नाही । तेथे पहावे कोणे काई ।
पहाणे हि न दिसे काही । पाहतेपणे ॥८॥ (कलाप १६ किरण १ पृ.४१)

येथे परब्रह्म स्वरूप झालेल्या दिनकर स्वामींनी कुणी पहायचे? व कुणाकडे पहायचे हा प्रश्नच संपून गेला. किंबहुना पहातेपणच संपले म्हणजे पहाण्याची क्रिया काहीच पहायचे राहिले नसल्यामुळे संपली ही अनुभूती स्पष्ट केली आहे. याचे कारण पहाणारा व पहायाची वस्तु परब्रह्मरूप झाली.

तर कल्याणस्वामींनी आपल्या 'सोलीवसुख' या पन्नास ओव्यांच्या

काव्यात सद्गुरू व सच्छिष्य यांचा 'हृदय संवाद' व्यक्त केला आहे. योग प्रक्रियेच्या उत्तरार्धातील अनुभूती -

कल्याण म्हणे जी रामदासा । माझा मुकेपणाचा ठसा ।
तो मोडुनी बसोसा । मज आपणा ऐसे केले ।।४४।।

अशी व्यक्त केली आहे. येथे समर्थकृपेने कल्याणांना आनंदपद प्राप्त झाले. ते झाल्यावर कल्याण स्वतः सद्गुरूशी एकरूप झाले व त्यातील द्वैत संपल्यामुळे गुरू व शिष्य हा भेद उरलाच नाही. म्हणून कल्याणांनी म्हटले आहे, 'मज आपणा ऐसे केले.'

या ठिकाणी कल्याणांच्या आयुष्यातील निर्याणाचा हृदयस्पर्शी प्रसंग नमूद करावयासा वाटतो. तो गुरू आणि शिष्य यातील अनन्यभक्तीचे उदाहरणच आहे.

समर्थांच्या निर्याणानंतर कल्याणस्वामी यांनाच संप्रदायात प्रतिष्ठा होती. त्यांचा शब्द अखेरचा. समर्थांच्या निर्याणानंतर अस्थिविसर्जन करावे हे शिष्यांना वाटत होते. परंतु तत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन कल्याणांनी या प्रश्नाला 'नंतर बघू' असे उत्तर देऊन टाकले. चाफळला समर्थांच्या अस्थीसुरक्षित ठेवल्या गेल्या. प्रत्येक वेळेला शिष्य विचारणा करीत व कल्याण तेच उत्तर देत. अशी पस्तीस वर्षे लोटली. उंब्रजच्या केशव स्वामींनी आता ही जबाबदारी पार पाडली पाहिजे. असा विचार करून त्या अस्थी चाफळहून घेतल्या व डोमगावला कल्याणस्वामींची परवानगी घेऊन त्यांना भेटून त्यांच्यासमवेत अलाहाबादच्या पवित्र संगमावर विसर्जन करायचे असे ठरवून ते डोमगावला निघाले.

नेमकी त्याच वेळी डोमगावला एक विस्मयकारक घटना घडली. कल्याणस्वामी थोर कीर्तनकार होते. मठामध्ये दररोज कीर्तन करण्याचा त्यांचा परिपाठ होता. नित्याप्रमाणे अंगात कफनी, भाळी रामनाममुद्रा, हातात चिपळ्या घेऊन कल्याणस्वामी कीर्तनाला उभे राहिले. सद्गुरूचा श्लोक पूर्वरंगात सांगून आपल्या ओघवत्या वाणीने, गायनाने उत्तररंगाला सुरवात केली. ते निरूपण ऐकताना श्रोते मंत्रमुग्ध झाले. सगळीकडे रामनामाचा जय घोष सुरू झाला. कल्याणांच्या चेहऱ्यावर तृप्ततेचे भाव होते. डोळ्यामधून घळघळ अश्रू वाहू लागले. आपल्या दंडातील गुरुकृपेने प्राप्त झालेला ताईत कल्याणांनी सोडला आणि तो समोर काढून ठेवला व गुरुचे नामस्मरण करू लागले. थोड्या वेळाने सर्व श्रोते भानावर आले. शांतचिताने बसलेल्या कल्याणांकडे काहींनी बघितले. तर त्यांच्या लक्षात आले. आपल्या सद्गुरूचे स्मरण करताना कल्याणांनी देह ठेवला.

त्यानंतर केशव स्वामींचे डोमगावला आगमन झाले. आपल्या गुरुच्या निर्याणाची वार्ता त्यांना कळली. त्यांना फार वाईट वाटले. ज्या वेळी केशवस्वामींनी चाफळहून अस्थी बाहेर काढल्या त्याच वेळी कल्याणांनी देह ठेवला. यानंतर केशव स्वामींनी अलाहाबाद येथे कल्याणस्वामी व समर्थ रामदास यांच्या अस्थिंचे विसर्जन केले.

खऱ्या अर्थाने गुरू आणि शिष्य यात अद्वैत निर्माण झाले. गुरू हा गुरू राहिला नाही. शिष्य हा शिष्य राहिला नाही.

हीच ती अभेदभक्ती म्हणजेच आत्मनिवेदनाची शेवटची पायरी. तात्पर्य, समर्थांच्याच शब्दात,

'जाणता जाणता जाणीव जाते । आपली वृत्ती तद्रूप होते ।
आत्मनिवेदन भक्ति ते । ऐसी आहे । (द.१३.२.२८)

- डॉ. भालचंद्र अच्युत कापरेकर
१६ न्यू कावेरी सह गृह. रचना,
स.क्र. ८९/९०, प्लॉट क्र. ४९,
वनाझ कंपनी समोर, पौड रस्ता पुणे - ४११ ०३८

●●●

श्री समर्थांचा सोऽहं - एक चिंतन

- प्रा.डॉ. नीला जोशीराव



'शुद्धोऽसि बुद्धोऽसि निरंजनोसि ।
संसार माया परिवर्जितो ऽ सि ॥
संसार स्वप्न त्यज मोह - निद्रां ।
'मदालसा' वाक्यमुवाच पुत्रम् ॥'

हा चिरंतनाचा पाळणाच श्रीमाऊलीचे 'अनाहताचा हल्लरु' गाऊन पुनश्च जागविला. तेच तत्त्वदर्शन श्री समर्थ श्रीमत् दासबोध (प्रा.बेलसरे आ.१९ वी - २००७) कोष्टके मांडून घडवितात. (पृ.९२०-२१-२२) कोऽहं या सनातन प्रश्नाचा जन्मोजन्मी ध्यास लागला तरच 'ऐसे हे ८२ तत्त्वांचे गाठोडे । जो कोणी आत्मनात्म विवेकें सोडे ।' त्यालाच सोऽहं चा 'आत्मदर्शनाचा' मार्ग सापडतो; एरवी 'कऽहचं, कोऽहं, कुत आयातः' - हा प्रश्न (श्री आचार्यांचा) अनुत्तरित राहतो. कारण 'ज्ञानदीप कळिका' श्री मुक्ताबाई सांगतात- 'उलट उलट माघारा प्राण्या' तेच श्री समर्थही 'चंचल नदी । गुप्त गंगा । स्मरणें पावन करी जगा।' या मायानदी निरूपणात उत्तर देतात ''प्रवाहाच्या उलट दिशेने जो उगमापाशी - 'सोऽहं दर्शनात पोहोचला तो त्या उगम-दर्शनं पावन झाले तीर्थरूप'' असा भाग्यवान जीव म्हणजे ज्याने भगवंत देखिला तोच 'संत; किंवा 'सहा धुई' तो साधु अशा साधुसंतांचे दर्शन म्हणजे ज्ञानाची दिवाळी.

एरवी प्रवाहपतिताने खालील तत्त्वविचारांनी या 'सोऽहं' चा ध्यास घ्यावा 'की मी देह नाही' कारण-

अ) मी - गोरा - काळा - ऊंच - ठेंगणा - देहाचे गुणधर्म

आ) मी - हुशार - मूढ - हे बुद्धीचे गुणधर्म

इ) मी - तान्हेला भुकेला - प्राणाचे गुणधर्म

ई) मी- सुखी दुःखी - अंतःकरणाचे गुणधर्म

हे सर्व ज्याचे त्याला दिले की 'मी' उरतोच कुठे? जे उरते ते 'शुद्ध ब्रह्म परात्पर राम ।

कालात्मक परमेश्वर राम ॥'

एकमेव अद्वितीय 'अंतरात्मा' - त्याची ओळख 'श्री' नी श्री आत्माराम ग्रंथात करून दिली आणि सांगितले. 'आत्माराम दासबोध । माझे स्वरूप स्वतःसिद्ध' मी आहे जगज्जीवनीं निरंतर म्हणूनच संत वेणाबाईनी श्रीमत् दासबोध ग्रंथाची पाने सुटी करून पसरवून बसलेल्या एका शिष्यासमोर 'दंडवत' घातला. तो म्हणाला, 'आज हे उलटे काय? वेणाबाई म्हणाल्या 'हे माझे सद्गुरूंना दंडवत प्रणाम आहेत' म्हणून ग्रंथ नीटनेटका लावून ठेवला. थेट 'सोऽहं' दर्शन ते हेच.

हेच दर्शन घेणारे 'प्रल्हाद नारद पराशर पुंडलिक ..... हे सर्व परमभागवत तसेच श्री शंभु राजे. 'श्री शंभुराजास उपदेश' यांतील 'त्याहून करावे विशेष' असे शिवरायांपेक्षा विशेष शंभु - राजे जगले. म्हणूनच अंतःकाळी 'मी देह नव्हेसा झालो' याची अनुभूती त्यांनी प्रत्यक्ष घेतली. त्यांच्यासारखीच हसत हसत फाशीवर जाणारे मदनलाल धिंग्राजी यांनी घेतली. कारण 'भेटेन नऊ महिन्यांनी' ही त्यांना खात्री होतीच पण पुनःपुनः 'वंदे मातरम्' मंत्र जगण्यासाठी. 'मी देह नव्हेच' ज्याला सर्वसामान्य 'मी' 'मी' म्हणून जन्मोजन्मी कुरवाळतात त्यालाच आचार्य विचारतात - 'दिनमपि रजनी सायं प्रातः' असे किती ऋतू किती जन्म फेरे घेशील? अंतर्यामी 'अंतरात्मा' ओळख अन् ओळखून तोच त्याचे स्वरूप सांगतो आहे ते ऐक 'भज गोविंदम् । भज गोविंदम्'

लिहिणे; भाषणे - कीर्तने - प्रवचने - यात 'मी' सापडत नाही पण त्यातून मार्गदर्शन घेऊन 'स्वानुभव' घेणे अगत्याचे आहे. अनुभूती आल्यावर 'मुक्याने गूळ खादला । गोडी न ये सांगायाला' असे तुकोबा सांगतात ' मूकाऽस्वादतवत् हेच ते तत्त्व - त्या 'आत्म' तत्त्वाला 'अक्षरात' कसे बांधणार?

तरी संपूर्ण वर्णमालेच्या ५२ वर्णांवर दक्षकन्या जगदंबेची सत्ता आहे. तिची ५२॥ पीठे म्हणजे श्रीवाणी - लेखणीचीच शक्तिपीठे आहेत. त्यामुळे प्रत्येक 'स्वर-व्यंजनावर' ज्याची सत्ता आहे तोच तुझा 'अंतरात्मा' आहे. म्हणूनच 'गोस्वामी' दासांनी विश्वरूप दर्शन घडविले. 'सियाराम मय सब जग जानी' या जगत्स्वरूपाला जगन्नाथासह त्यांनी दोन्ही हात जोडून नमस्कार केला. 'दीपकळिका धाकुटी म्हणों नये' त्याप्रमाणे साक्षात महालक्ष्मी महाशक्तीचे दर्शन घेणाऱ्या 'महाराणी लक्ष्मीबाईनें' गंगादास बाबांच्या झोपडीत जिवंत देह पंचाग्नीसाधनेप्रमाणे अग्नीच्या स्वाधीन केला.

'सोऽहं' ची स्वानुभूती, 'बद्ध मुमूक्षु, साधक सिद्ध' या अवस्था ओलांडून, 'परा पश्यंती मध्यमा वैखरी' या वाणीच्या पल्याड 'परा ही परतली' तिथे झेप घेता आली तर, किंवा 'नव-विधा' भक्तींमध्ये 'श्रवणं, कीर्तनं, विष्णोस्मरणम्- पादसेवनम्, अर्चनं, वन्दनं, दास्यं, सख्यम् यांतून 'आत्मनिवेदनात आत्मदर्शन घेता आले तर 'मी' ला खरा 'मी' सापडतो.

श्रीदासबोध द.६ 'देवशोधनात समर्थांनी ही अनुभूती स्वतः घेऊन 'प्रसाद' स्वरूप वाणीने भाग्यवंत भक्ताला दिली. त्यासाठी स्वानुभवाचे मार्गदर्शन केले. ''एक 'निमिष' भर 'सावध-चित्त' व्हा, ऐका! ज्या गावात राहायचे तेथील 'प्रभूला' भेटले पाहिजे. सोन्यासारखा नरदेह आहे. 'अंतरात्मा' च मुख्य कर्ता आहे , तोच ओळख. ज्याने राजा ओळखला । तो राव म्हणेना भलत्याला' असे देहातील 'देही' चे दर्शन घे. जो जनात जगासारखा वागतो पण 'जगावेगळी' गोष्ट सांगतो. त्याच्या अंतरी 'आत्मज्योत' अखंड जागृत असते असा 'साधू' धन्य आहे. अशा अनुभूती साठी 'षड्न्यासी, ते सर्व संन्यासी ' षड्रिपूंचा त्याग कर. 'सहा धुई तो साधु' हे लक्षात ठेव. जसे श्री माऊलीने सांगितलं ''पार्था! मी, आणि माझेपण । विसरले जयाचे अंतःकरण । तो च एक संन्यासी जाण निरंतर ।'' असा सत्पुरुष 'स्व-हित', 'आत्महित तत्पर असतो. त्याला 'कोणी निन्दा, कोणी वन्दा । आमचा स्व-हिताचा (आत्महित) धंदा । (तुकाराम)' तेच हे 'आत्म-हित' चालता बोलता भगवंत असा दुर्लभ 'नरदेह' लाभला आहे, तर 'घटका गेली पळे

गेली तास झणत्कारतो 'स्व-हित' साधले का? विचारतो. श्री समर्थ सांगतात '२१ सहस्त्र सहाशे जपा । नेमून गेली ते अजपा' तिचा विचार पाहता सोपा आहे. 'धरता सो । सोडिता हं (अहंकार) । अखंड चाले । सो ऽ हं सो ऽ हं । रोज 'एकवीस सहस्त्र सहाशे वेळा अंतरात्मा सांगतो आहे - जन्म घेतानाचे 'कँहां' - 'कोऽहं?' या प्रश्नाला स्वानुभवाचे उत्तर 'सो ऽहं' हा अजपा जप होय. प्रेमसागर प्रभू दर सेकंदाला 'श्वास' रूपाने दर्शन देत आहेत त्यांचे 'अनुसंधान' तोडू नको, मायेच्या मायाबाजारात हरवून जाऊन 'ते जुने ठेवणे' विसरू नको.

श्री समर्थांनी त्याच राम-प्रेमासाठी १० वे वर्षापासून सर्व वैभव, २४ पिढ्यांचे पाश सोडले अन् श्री गायत्री पुरश्चरणाने थेट सूर्यकुळाशी मुळात असलेले 'नाते' स्वानुभवाने जोडले.

तेच 'अंतरात्मा' स्वरूप कसे जोडावे तर 'हे तो प्रचितीचे बोलणे । प्रचित पाहील ते शहाणे.' व्यक्ताव्यक्ताच्या पल्याड असलेला हा 'सनातन सारथी' देहाच्या रथात बसून अखंड प्रवासी होऊ न 'सोऽहं' च्या साक्षात्काराकडे घेऊन जात असतो तो कोण? 'सत्याअसत्यासी मन केले ग्वाही' अनुभवणारे स्वा. सावरकरही त्याच चिरंतनाचे यात्रेकरू होऊ न 'प्रश्नांकित' काव्यात विचारतात -

"ऐश्वर्ये भारी । या ऐश्वर्ये भारी ।
महाराज आपुली कथा ना । कुठे निघे स्वारी ।।"

हा रथोत्सव ज्याने अनुभवला त्याला 'जग' हाच चालता बोलता जगन्नाथ भेटला. त्या निरंतर चाललेल्या रथोत्सवातच आपण जगतो. पण 'हंस - परमहंस' वृत्ती प्राप्त न झाल्याने जगात येऊन, अ-पूर्व मानव देह लाभून त्या 'हंसगीते' तील 'विष्णु - स्वरूप' 'आत्म-स्वरूप' पारखे होते - 'जगात पाण्यास तहान लागते' हीच संतांची उलटी खूण समजून घे, त्यासाठीच त्यांची शिष्या! स्व-रुपी विश्रांतीस जावे' अशी अखंड 'आत्मजागृती' देणारी आज्ञा पाळली पाहिजे तरच, हा रात्रंदिन युद्धाचा प्रसंग कळेल, आंतर्बाह्य जग-मन हे 'स्वरुप' आकळेल - 'चिदानंद रूपम् शिवोऽहं' चा परमानंद प्राप्त होईल, अन त्यासाठीच 'ज्याचे अंतरी ज्ञान जागे' अशी सत् संगती' आत्मसंगती' लाभावी हीच श्री चरणी प्रार्थना.

टीप - श्री समर्थांच्या २८ नाममुद्रांपैकी 'श्री' ही राजांची आवडती मुद्रा; म्हणून 'हे राज्य व्हावे । हे 'श्री' ची इच्छा । आणि हे राज्य 'परमार्थी तो राज्यधारी ।' असा हा रामराज्याचा आनंदवनभुवनाचा राज्यकर्ता - (श्री समर्थावतार - शं.श्री.देव)

- प्रा. डॉ. नीला जोशीराव
प्रसाद, २९० रामनगर, कॉर्पोरेशन
शाळेजवळ नागपूर - ३३

•••

श्रीसमर्थवंदना

तुझ्यासारिखा तूच खरोखर काय म्हणावे तुला
समर्था त्रिवार वंदन तुला ।।धृ।।
अलौकिक तव सारे जीवन
दिव्य गुणांचा अपूर्व संगम
अंतःस्फूर्ति सदैव जागृत मार्ग दावि सकला ।।१।।
वैराग्याने रूप घेतले
तुझ्या रूपाने प्रकट जाहले
नारायण हा गृह सोडूनिया बैरागी बनला ।।२।।
श्रीरामाच्या अनुसंधानी
द्वादशवर्षे तप आचरुनी
रामप्रभूने दर्शन देऊन मंत्र तुला दिधला ।।३।।
प्रपंचातल्या श्रांत जिवांना
बोध करूनी दिली प्रेरणा
संसारासह आध्यात्माचा धडा जना शिकविला ।।४।।
एकांताची तुजला प्रीती
राममंत्र तो अखण्ड चित्ती
निसर्ग जणु तो तुला खुणावित त्यात सदा रमला ।।५।।
वनस्पतींचे ज्ञान पाहता
कुंठित होते मती समर्था
ऋतंबरा तव प्रज्ञा असता काय उणे तिजला ।।६।।
कार्यशक्तिहि तुझी विलक्षण
अपूर्व ऐसे वाङ्मय लेखन
माऊलिचा अवतार असा तू संताग्रणि शोभला ।।७।।
मरगळलेल्या समाजपुरुषा
जागृत करूनी तू सर्वेशा
साथ तुझी नित शिवरायाला छत्रपती जाहला ।।८।।
रघुनाथार्पण अवघे जीवन
कार्य करूनी अलिप्त त्यातून
कर्ता श्रीराम भाव हा आदर्शच ठेविला ।।९।।
समर्थ पदवी तुला शोभते
धन्य माऊली धन्य कुळ ते
करी वंदना थोर अशा या समर्थ स्वरूपाला ।।१०।।

- सौ. प्रभा टेंभेकर
२१६ हनुमान नगर
नागपूर - ९

समर्थ रामदास आणि स्वामी विवेकानंद

- डॉ. शिरीष गणेश लिमये



साधू दिसती वेगळाले । परि ते स्वरुपी मिळले ।

समर्थ रामदास स्वामी आणि स्वामी विवेकानंद यांची तुलना करणे हा या लेखाचा उद्देश नसून या दोघांचे जीवन, कार्यपद्धती आणि विचारसरणी यांमध्ये असलेले आश्चर्यकारक साम्य आपल्यासमोर मांडणे हा या लेखाचा उद्देश आहे. हे साम्य लक्षात आल्याने आपण त्यावर अधिक चिंतन करून, आपल्या आध्यात्मिक व लौकिक जीवनाला जास्त चांगला आकार देऊ शकू. या उद्देशाने हा लेख लिहिलेला आहे. समर्थ रामदास स्वामी दासबोधात म्हणतात.

साधू दिसती वेगळाले । परि ते स्वरूपी मिळले ।
अवघे मिळोनि येकचि जाले । देहातीत वस्तू ॥ (७.२.३१)

या ठिकाणी समर्थांनी साधू दिसती वेगळाले असे म्हटलेले आहे, साधू असती वेगळाले असे म्हटलेले नाही. साधू हे देहाने जरी वेगवेगळे दिसत असले, त्यांनी केलेले कार्य जरी भिन्न भिन्न असले तरी त्यांनी मनाच्या ज्या अवस्थेत हे कार्य केलेले असते ती त्यांची मनाची अवस्था मात्र एकच असते. त्यांच्या बाह्य कर्मावरून त्यांचा दर्जा ठरविणे बरोबर नाही. त्यांची अंतरस्थिती महत्त्वाची आहे. भगवंताचे अनुसंधान हे साधूचे महत्त्वाचे लक्षण असते. याच अर्थाने संत ज्ञानदेव महाराज म्हणतात -

आत्मज्ञाने चोखडी । संत ही माझी रूपडी ॥

आपण देहबुद्धिच्या पातळीवर जगत असल्याने आपण संतांनाही देहाच्याच पातळीवर आणून त्यांची तुलना करण्याची चूक करतो आणि आत्मानुभूतीच्या स्तरावर यातील काहीही उरत नाही हे विसरून जातो. या ठिकाणी एका गोष्टीची आठवण होते. एकदा काय झालं, राजा जनकांच्या दरबारात एक वादसभा भरलेली होती. त्या सभेत आत्मतत्त्वाचा निर्णय होणार होता. खूप ज्ञानी पंडित नानाविध शास्त्रग्रंथ घेऊन उपस्थित झाले होते. जेव्हा अष्टावक्रांनी त्या सभेत प्रवेश केला, तेव्हा आठ ठिकाणी वाकडे झालेले त्यांचे ते विद्रुप रूप पाहून सर्व पंडित हासले. अष्टावक्रांनी जनकांना शांतपणे प्रश्न केला, "आश्चर्य आहे, आत्मतत्त्वाचा निर्णय चांभारांच्या सभेत चालला आहे." जनकांना त्या प्रश्नाचा रोख कळेना. ब्रह्मवृंद संतापला. पण ते सर्व शास्त्री, पंडित शब्दज्ञानी होते. त्यांची ती पोपटपंची चालू होती. अष्टावक्र म्हणाले, "मी देहाने आठ ठिकाणी वाकडा आहे. तो माझ्या चामड्याचा गुण आहे. या पंडितांना फक्त चामडेच दिसले, आत्मतत्त्व दिसलेच नाही." संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात -

या उपाधीमाजी गुप्त । चैतन्य असे सर्वगत ।
ते तत्त्वज्ञ संत । स्वीकारिती ॥

केवळ अभिव्यक्ती बदलली म्हणून संतत्व, आत्मतत्त्व बदलत नाही. फ्रीज, हिटर, पंखा, लाऊडस्पिकर किंवा कारखान्यातील नानाविध यंत्रसामग्री ही सर्व अभिव्यक्ती वर वर भिन्न भिन्न भासत असली तरी त्या पाठीमागील वीज हे तत्त्व शाश्वत आहे व अपरिवर्तनशील आहे. व्यक्त रूपात अतर्क्य व अचिंत्य विविधता असली तरी त्यामागील अव्यक्त तत्त्वात काहीही फरक पडत नाही. याच अर्थाने समर्थ रामदास स्वामी दासबोधात म्हणतात. 'साधू दिसती वेगळाले । परि ते स्वरूपी मिळले । अवघे मिळोनि येकचि जाले । देहातीत वस्तू ।(७.२.३१) तात्पर्य असे की, समर्थ आणि स्वामीजी यांच्या कार्यातील समन्वय आपणास या लेखात साधायचा आहे.

मूळ पिंड हा निवृत्तिवादीच -

संतांचा मूळ पिंड हा निवृत्तिवादीच असतो. म्हणून समर्थ रामदास आणि स्वामी विवेकानंद यांच्या कार्यात जरी खूप रजोगुण दिसत असला तरी त्यांचा मूळ पिंड निवृत्तीवादीच असतो. समर्थांनी आपल्या जिवनात हजारो मठ स्थापन केले किंवा स्वामी विवेकानंदांनी रामकृष्ण मठ मिशनची स्थापना केली. हे त्यांचे जीवन कार्य जरी रजोगुणात्मक असले तरी त्या दोघांचा मूळ पिंड हा निवृत्तिवादीच होता. या संदर्भात दोन महत्त्वाच्या घटना पाहू.

स्वामी विवेकानंदांच्या जीवनातील एक प्रसंग आहे. स्वामीजींचे एक व्याख्यान अमेरिकेत लेडीज क्लबमध्ये ठेवलेले होते. स्वामीजी ठरल्याप्रमाणे सभास्थानी पोहोचले. पण त्यांना सांगण्यात आले, की सभेला अजून अवकाश आहे. तेव्हा कार्यक्रमाच्या आयोजकांनी स्वामीजींना व्यासपीठाला जोडून असलेल्या एका खोलीत बसायला सांगितले. त्यानुसार स्वामीजी अर्धा तास त्या खोलीमध्ये एकटेच बसले. सभेची वेळ झाली तेव्हा जोसेफाईन मॅक्लिऑड व अन्य भगिनींनी स्वामीजींना व्यासपीठावर येण्याची विनंती केली. त्या खोलीत एक आरसा होता. स्वामीजी व्यासपीठाकडे निघाले. जाताना त्यांनी तो आरसा पाहिला. दोन तीन वेळा ते माघारी फिरले आणि त्यांनी आपल्या चेहऱ्यावरून हात फिरविला आणि डोक्यावरील फेटा आणि स्वतःचा पोषाख नीट तपासून पाहिला. त्या भगिनींना स्वामीजींच्या या कृतीचे आश्चर्य वाटले. एखाद्या संन्याश्याने स्वतःच्या पोषाखाबाबत इतके चोखंदळ कशासाठी राहावे असे त्यांना वाटले. त्यांनी स्वामीजींना या कृतीचे कारण विचारले. स्वामीजी म्हणाले, "अर्धा तास मी एकटा होतो. या काळात माझे देहभान हरपले होते. मी पूर्ण ब्रह्मभावात बुडून गेलो होतो. आता आरश्यातील माझ्या प्रतिमेला मी वारंवार बजावत होतो की तू ब्रह्म नाहीस, तू नरेंद्रनाथ आहेस, तू देह आहेस, तू मन आहेस, स्वतःला पुन्हा शब्दांच्या जगात आणण्याचा मी प्रयत्न करीत होतो."

या कथेवरून सारे संत लौकिक कर्मे कोणत्या मनःस्थितीत करीत असतील याची कल्पना करता येते. म्हणून समर्थांच्या अंतःस्थितीचे वर्णन करताना स्वामी विवेकानंद म्हणतात, "समर्थ रामदास जेव्हा लोकांमध्ये वावरत तेव्हा प्रपंचातील सामान्य गोष्टी कशा नीट कराव्यात याची चर्चा करीत. पण नंतर ते गुहेत किंवा घळीत जात त्या वेळी त्यांचे मन पुनश्च त्या रामरायांच्या अनुसंधानात बुडून जाई. व्यावहारिक जगतातल्या कर्मांचे ठसे त्यांच्यावर उमटत नसत."

याचा अर्थ असा की प्रवृत्ती किंवा निवृत्ती ही बाह्य कर्मावरून ठरत नसते तर अंतःस्थितीवरून ठरत असते. त्या दृष्टीने समर्थ रामदास आणि स्वामीजी या दोघांचा मूळ पिंड निवृत्तीवादीच होता हे आपण लक्षात घ्यायला हवे. या बाबतीत दोघांच्या चरित्रातील एक समान मुद्दा आपण विचारात घेतला पाहिजे आणि तो म्हणजे, या दोन्हीही महापुरुषांनी आपापल्या सद्गुरूच्या आज्ञेवरून लौकिक कार्य केलेले आहे. त्यांची ती मुळात इच्छा नव्हती. समर्थांनी बाराव्या वर्षी लग्नमंडपातून पलायन केल्यावर नाशिकजवळ टाकळीला १२ वर्षे (इ.स.१६२० ते १६३२) तपश्चर्या केली आहे. या बारा वर्षांच्या काळात त्यांनी स्वतःला समाजापासून पूर्ण अलिप्त ठेवलेले होते. नंतर भारत भ्रमणासाठी बाहेर पडल्यावर सर्वप्रथम ते हिमालयात आले. तेथील परिसर पाहून ते मुग्ध झाले. तपश्चर्या केली. त्यांचे मन आत्मबोधावर इतके आरूढ झाले की त्यांना देह ही उपाधी वाटू लागली. या उपाधीचा त्याग करून आपण आपले मन आता आत्मबोधात विलीन करावे असे वाटून त्यांनी देहत्यागाचा विचार केला. भगवंताचे दर्शन झाले. आत्मसाक्षात्कार झाला. आता जीवन कशासाठी आणि कोणासाठी जगायचे हा प्रश्न त्यांच्या मनात उपस्थित झाला. याचा अर्थ सामाजिक कामाची स्पृहा त्यांच्या मनात नव्हती. देहविसर्जन करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी कड्यावरून उडी मारताच श्री रामचंद्रांनी त्यांना झेलले व सांगितले.

तुम्हासी जगदोद्धार करणे आहे ।
तुमची तनु ते आमची तनू पाहे ।।
दोन तपे रक्षिली काया । हे धर्मसंस्थापनेसाठी ।।
केवळ वैराग्य तीव्रतर केले । अन्नवस्त्र विसर्जित भले ।
आता लोक पीडा पावतील दुष्काळे ।
का जे तुम्ही ईश्वरतनु म्हणोनिया ।।
समस्त देवांसी उपवास पडिले ।
समस्त भूदेव वस्त्रहीन जाले ।।
समस्त जीव दारिद्रे पीडिले ।
तुम्ही अन्न-वस्त्र-भूषणे धरावी ।। (समर्थ प्रताप)

याचा अर्थ रामरायांच्या आज्ञेवरून समर्थांनी पुढे भारत भ्रमण, मठांचे संघटन, धर्मसंस्थापना, राजकारण, समाजकारण आदि व्याप केलेला आहे. ती त्यांची व्यक्तिगत उर्मी नव्हती. तर सद्गुरूंची आज्ञा होती.

अगदी हाच मनोभाव स्वामी विवेकानंदांचाही होता. स्वामीजींनी १८८० ते १८९६ या काळात भगवान श्री रामकृष्णांच्या सहवासात कठोर साधना केली, नानाविध ग्रंथांचा अभ्यास केला. पण या काळात समाजसेवा किंवा राष्ट्रभक्ती यांचा विचार त्यांच्या मनाला शिवला नाही. पुढे रामकृष्णांच्याजवळ निर्विकल्प समाधी मागावयास गेले तेव्हा रामकृष्ण म्हणाले, ''नरेंद्रा, तू किती रे स्वार्थी, कसा वटवृक्षासारखा मोठा होशील, सर्वत्र पसरशील व अनेकांना तुझ्या मार्गदर्शनाचा लाभ देशील,'' तेव्हा स्वामीजी म्हणाले,''नाही, मला निर्विकल्प समाधीचा लाभ हवा आहे. यातले मला काही नको. मला ते जमणार नाही.'' तेव्हा श्री रामकृष्ण म्हणाले, ''तू नाही, तुझी हाडे करतील. जगन्माता तुझ्याकडून करून घेईल आणि हे बघ, लोकांवर उपकार म्हणून नव्हे तर, शिवभावे जीवसेवा दरिद्रीनारायणाची पूजा.'' त्या दिवशी स्वामीजी आपल्या गुरूबंधूंना म्हणाले, '' आज रामकृष्णांच्याकडून नवा प्रकाश मिळाला. शिवभावे जीवसेवा दरिद्रीनारायणाची पूजा.'' याचा अर्थ संघटन, धर्मप्रचार, धर्मसंस्थापना हे कार्यसुद्धा स्वामीजींनी केले व त्यांची व्यक्तिगत ऊर्मी म्हणून नव्हे तर त्यांच्या सद्गुरूंची आज्ञा म्हणून त्यांनी कार्य केले. तात्पर्य, आपल्या सद्गुरू प्रभु रामचंद्र यांच्या आज्ञेने समर्थांनी, तर रामकृष्णांच्या आज्ञेने स्वामीजींनी रजोगुणाचा स्वीकार केला व धर्मसंस्थापनेचे कार्य केले. प्रवृत्ती हे दोघांचे सासर होते तर निवृत्ती हे दोघांचे माहेर होते. आध्यात्मिक साधना म्हणजे सासरकडून माहेरकडचा प्रवास होय.

रजोगुणावर भर

या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की, दोघेही कमालीचे निवृत्तिवादी असूनदेखील दोघांच्या शिकवणुकीत रजोगुणावर विलक्षण भर आढळतो. अधिकार तैसा करू उपदेश । साहे ओझे त्यासी तेची देऊ ।। या तुकोबांच्या उक्तीनुसार दोघांनी उपदेश करताना सामान्य माणसाचे भान ठेवले आहे. आपली निवृत्ती त्यांनी कधीही जनसामान्यांवर लादली नाही. जनसामान्यांना उपदेश करताना, महर्षींनी त्यांच्या इच्छा निश्चितच तृप्त कराव्या असेच म्हटले, मानवी मनाचा कल लक्षात घेऊनच आमच्या धर्मशास्त्रामध्ये धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांचा समावेश केला गेला आणि ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास या चार आश्रमांची रचना मांडली गेली. यामध्ये क्रमविकास होता. प्रवृत्तीचा आधी अनुभव घ्यायचा व त्याचे व्यर्थत्व जाणून घेऊन निवृत्तीमध्ये पदार्पण करायचे अशी ही व्यवस्था होती.

समर्थ रामदास आणि स्वामी विवेकानंद यांनी हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत भारत प्रवास केला व देशाची शोचनीय परिस्थिती पाहिली. भारत हा तमोगुणाने ग्रस्त झाला आहे व सत्त्वगुणाच्या नावाखाली देशात चक्क तमोगुणाची जोपासना होते आहे हे दोघांनी अचूक हेरले. भारत वेदान्ताचा वा निवृत्तीवादाचा अधिकारी नसून कर्ममार्गाचा, रजोगुणाचा अधिकारी आहे हे या दोघांनी लक्षात घेतले. समर्थांनी प्रश्नच विचारला.

अन्न पाहिजे आपणाला । अन्न पाहिजे स्त्रियेला ।
अन्न पाहिजे लेकुराला ।
मग कष्ट करोनि मेळवावे । का जोगी होउन जावे ।।
द्रव्य पाहिजे लग्नाला । द्रव्य पाहिजे घराला ।।
द्रव्य पाहिजे प्रपंचाला ।
मग कष्ट करोनि मेळवावे । का जोगी होउन जावे ।
उदंड लागते घरासी । उदंड लागते स्त्रियेसी ।।
उदंड लागते लेकुरासी ।
मग कष्ट करोनि मेळवावे । का जोगी होउन जावे ।। (स्फुट कविता)

अगदी हाच प्रश्न स्वामीजी विचारतात.

''..... ब्रह्म सत्य आहे आणि जग मिथ्या आहे अशी या देशातील दहा लाख लोकांची श्रद्धा आहे. त्यांची शिक्षा बाकीच्या एकोणतीस कोटी नव्वद लाख लोकांना काय म्हणून द्यायची. त्यांना भोगावादी जीवन जगू द्या. त्यांना त्यांच्या इच्छा तृप्त करून घेऊ द्या. आणि पददलित व गोरगरीब लोकांच्या बाबतीत तर मी असे म्हणेन की, त्यांनी प्रयत्नपूर्वक विलासाच्या वस्तू प्राप्त करून घ्याव्यात व सर्व सुखांचा आस्वाद घ्यावा. त्या शिवाय त्यांना निवृत्ती सांगणे म्हणजे मूर्खपणा ठरेल. सारा भारत तमोगुणाने ग्रस्त झाला आहे. आपल्याला आज रजोगुणाची गरज आहे. रजोगुणातून गेल्याशिवाय आपल्याला सत्त्व गुणात प्रवेश नाही.'' आज दुर्दैवाने संतांची ही शिकवण नीट लक्षात घेतली नाही व वैराग्याच्या नावाखाली विपन्नतेची, अहिंसेच्या नावाखाली भीतीची, त्यागाच्या नावाखाली दुबळेपणाची, सहिष्णुतेची नावाखाली लाचारीची, प्रेमाच्या नावाखाली मायेची जोपासना करीत राहिलो. आम्हाला तुकोबांची विरक्ती प्राप्त झाली नाही. मात्र त्यांच्या नावाखाली आमची हेळसांड करून घेतली. समर्थ व

स्वामीजी यांनी लोकांच्या या दांभिक प्रवृत्तीवर प्रचंड आसूड मारले व त्यांना धर्माची शिकवण सांगितली. तमोगुणी माणसाच्या दृष्टीने रजोगुण हाच धर्म ठरतो व त्या दृष्टीने दोघांनी भारताला राजसिक उपदेश प्रदान केला.

कर्मयोग या पुस्तकात स्वामीजी म्हणतात.

''........ अहिंसा परम धर्म असल्या गोंडस सबबींवर अर्जुन युद्धपराङ्मुख होताच श्रीकृष्णांनी ''क्लैब'', ''दांभिक'' असे संबोधून त्याची निर्भसना केल्याचे वर्णन आहे. आम्ही सर्वांनीच शिकावा असा हा एक प्रमुख व महत्त्वाचा धडा आहे की, प्रत्येक बाबतीतील दोन्ही विरुद्ध टोके दिसावयास अगदी सारखी असतात. आत्यंतिक ''अस्ति'' व अत्यंतिक ''नास्ति'' या दोन्ही गोष्टी नेहमीच सारख्याच भासत असतात. प्रकाश- कंपने अत्यंत मंद अवस्थेत आपल्या दृष्टीस गोचर होत नसतात. अति द्रुत कंपनांचीही तीच गत. ध्वनीचेही असेच. अती क्षीण वा मृदू असल्यास तो ऐकू येत नाही. प्रतिकार व अप्रतिकार यामध्येही अशाच स्वरूपाचा फरक आहे. एक जण अन्यायाचा कसलाच प्रतिकार करीत नाही- तो दुर्बल असतो. दुसऱ्या एखाद्याला पक्की खात्री असते मनात आणल्यास तो जबरदस्त तडाखा लगावू शकेल आणि तरीही तो तसे करीत नाही, इतकेच नव्हे तर आपल्या शत्रूला आशीर्वाद देतो. जी व्यक्ती दुबळेपणामुळे प्रतीकार करीत नाही तिला पाप लागते.... याउलट जर या दुसऱ्या व्यक्तीने प्रतिकार केला तर तिने देखील पाप केल्यासारखे होईल....''

एकदा स्वदेशात माझी एका परिचित इसमाशी गाठ पडली. स्वारी पराकाष्ठेची निर्बुद्ध नि आळशांचा राजा असल्याचे मला आधीपासूनच ठाऊक होते. ज्ञानाच्या नावाने पूज्य, ज्ञानलाभाची स्पृहाही बिंदूमात्र नाही असे पशुतुल्य जीवन तो जगत होता. माझ्याशी भेट होताच राजेश्रींनी पृच्छा केली, ''ब्रह्मज्ञानाच्या लाभासाठी मी काय करु? कशाने मला मुक्ती लाभेल?'' ''मी त्याला विचारले,'' तू खोटे बोलू शकतोस काय? तो ''नाही'' म्हणाला. त्यावर मी म्हणालो. तर मग तुला खोटे बोलणे शिकावे लागेल. एखाद्या पशुसारखे किंवा लाकडाच्या ठोकळ्यासारखे असण्यापेक्षा खोटे बोलणे चांगले. तू निष्क्रीय आहेस, पण अर्थातच सर्वकर्मातीत, शांत, गंभीर अशी जी सर्वश्रेष्ठ अवस्था असते ती तुला लाभलेली नाही हे तर नक्कीच. एखादे दुष्कर्मही तू करू शकणार नाहीस इतका तू जड प्रवृत्तीचा आहेस.'' अर्थात मी हे ज्या माणसाविषयी बोलत आहे त्याच्याइतके तामसिक प्रकृतीचे लोक साधारणतः आढळत नाहीत आणि मी थट्टा करीत होतो, त्याचा उपहास करीत होतो हे तितकेच खरे. पण माझ्या म्हणण्याचा अभिप्राय मात्र हाच होता की, संपूर्ण निष्क्रय अवस्था वा शांत भाव प्राप्त करून घ्यावयाचा असल्यास माणसाला कर्मशीलतेमधूनच जावे लागेल.''

आजही आपण पाहतो की, कर्माची उपेक्षा आपल्या देशात फार घडते आहे. अनेक सरकारी कचेऱ्यांमध्ये कामे होत नाहीत. लाल फितीत अनेक कामे अडकून पडत आहेत. आज उच्च राहणीमानाच्या चुकीच्या कल्पना जनमानसात खोलवर रुजल्या आहेत. कमीत कमी काम व जास्तीत जास्त पगार ही कल्पना जनमानसात विशेषतः तरुणांत रूढ झाली आहे. कर्म करायला नको ही भारतीयांची तमोगुणी वृत्ती औद्योगिक क्षेत्रात संपांच्या रूपाने पाहायला मिळते. सर्वच संप अन्याय्य असतात असे नाही. अनेकदा सरकारी धोरणांचेही विपरीत परीणाम दिसून येतात. पण एकंदरीतच कर्तव्याची उपेक्षा, स्वार्थ, कर्मावरील निष्ठेचा अभाव हा आमच्या सर्व क्षेत्रांत दिसून येतो. कर्तव्य हाच परमेश्वर आहे. जो माणूस कर्तव्यकर्मांची उपेक्षा करतो त्याची धार्मिकता केवळ दांभिक होय. त्यापेक्षा नास्तिकता बरी.

अगदी याच अर्थाने समर्थ रामदास स्वामींनी दासबोधात म्हटले आहे.

आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका ।
येथे आळस करू नका । विवेकी हो ॥(२.१.१)
प्रपंच सोडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खावयाला ।
तरी मग तया करंट्याला । परमार्थ कैचा ॥ (१२.१.३)
साहेब कामास नाही गेला । गृहीच सुरवाडोनी बैसला ।
तरी साहेब कुटील तयाला । पाहाती लोक ॥ (१२.१.५)
आळसाचे फळ रोकडे । जांभया देऊनि निद्रा पडे ।
सुख म्हणौन तया आवडे । आळसी लोका ॥(११.३.१०)
आळस उदास नागवणा । आळस प्रेत्न बुडवणा ।
आळसे करंटपणाच्या खुणा । प्रगट होती ॥(११.३.१२)
करंटा पडोनी उताणा । करी नानापरी कल्पना ।
परी ते काहीच घडेना । तैसी माया ॥(१४.१०.२)

विचारवीणेच्या जुळलेल्या इतर तारा -

समर्थ आणि स्वामीजी यांच्या आचार व विचारांमध्ये केवळ वर दिलेल्या मुद्द्यातच साधर्म्य आढळत नाही तर इतरही अनेक बाबतीत कमालीचे साधर्म्य आढळते. उदाहरणार्थ, त्या दोघांनी सांगितलेले गृहस्थाश्रमाविषयीचे विचार मिळते जुळते होते, भारत प्रवासात त्या दोघांचे झालेले मतपरिवर्तनही खूपसे सारखेच होते, धर्म हा माणूस घडविणारा असावा हा धर्माकडे पाहाण्याचा त्या दोघांचाही दृष्टीकोन होता, यत्न तो देव जाणावा हाच उपदेश दोघांनीही समाजाला दिला. श्रद्धा ही एक महान शक्ती आहे, परमेश्वराला आपण आपल्या कर्मांद्वारे पूजले पाहिजे, समर्थांचा कार्यकर्ता व स्वामीजींचा कार्यकर्ता म्हणजे समाजापुढे ठेवलेले आध्यात्माचे चालते बोलते उदाहरण असावे असे दोघांचेही म्हणणे होते. कार्यकर्त्यांने भाव हाच आपल्या कार्याचा आत्मा ठेवावा हे दोघांचेही सांगणे होते. दोघांनीही क्रियाशील वेदांत सांगितला. भारताच्या पुनरुत्थानासाठी आज आपल्याला अनेक युवकांनी समाजकार्याला वाहून घेतले स्वार्थाचे बलिदान हवे आहे. हा विचार दोघांनीही प्रामुख्याने मांडला. जाती - जातींमधील भेदाभेदातून निर्माण होणारे संघर्ष टाळा, हेच दोघांचे सांगणे होते. शिक्षणाने शिक्षण घेणाराचे चारित्र सुधारले पाहिजे, ह्यावर दोघांचाही भर होता. भारताच्या पुनरुत्थानाच्या कार्यात स्त्रियांना समाविष्ट करून घेणे, हे समर्थ आणि स्वामीजी यांच्या कार्यातील मौलिक साम्य म्हणावे लागेल.

समर्थ रामदास म्हणजे सतराव्या शतकातील स्वामी विवेकानंद होत आणि स्वामी विवेकानंद हे एकोणिसाव्या शतकातील समर्थ रामदास होत हे लगेचच लक्षात येते. स्वामीजींच्या वाङ्मयातील अनेक उतारे व समर्थांच्या अनेक ओव्या यांच्यात प्रचंड साम्य आहे. संतांच्या विचार वीणेच्या तारा एकमेकाशी किती जुळलेल्या असतात याची कल्पना यावरून येते. उदाहरणासाठी काही वाक्येच पाहू.

समर्थ आणि स्वामीजी दोघेही ब्रह्मचारी होते..... दोघांनी भारत भ्रमण केले..... दोघांनी समाजाभिमुख अध्यात्म सांगितले.... दोघांनी युवकांना संघटित केले..... दोघांनीही मठस्थापना केली..... दोघांनी देह देखील सारखाच ठेवला.....

समर्थांनी आपण माघ वद्य नवमीस जाणार याची पूर्व सूचना शिष्यांना दिली होती. स्वामीजींनी देखील देहत्यागापूर्वी पंचांग मागून घेतले होते व ४ जुलै या तारखेवर खूण केली होती. गडावरील मठाजवळची खोलगट जागा समर्थांनी आपल्या अग्निसंस्कारासाठी सूचित केली होती. स्वामीजींनी देखील बेलुड

मठातील खोलगट जागा आपल्या अग्निसंस्कार करताना वापरावी असे सूचित केले होते. दोघेही जाताना जीवन कृतार्थ झाले याच्या आनंदात होते. समर्थांनी गडावरील शेजघरातल्या पलंगावर तर स्वामीजींनी त्यांच्या शेजघरातील पलंगावर देह ठेवला. दोघांनी नामस्मरण करीत असताना देह ठेवला. अंतसमयी दोघांच्याही हाती जपमाळ होती.

दोघेही गेले ...... पण अजूनही आहेत.......

जाताना समर्थांनी सांगितले.

माझी काया आणि वाणी । गेली म्हणाल अंत:करणी ।
परि मी आहे जगज्जीवनी । निरंतर ।।
आत्माराम दासबोध । माझे स्वरूप स्वत:सिध्द ।
असता न करावा खेद । भक्तजनी ।।

जाताना स्वामीजी म्हणाले.

''विवेकानंद ही व्यक्ती गेली
तरी विवेकानंद हा विचार शिल्लक राहील,
पुढे अनेक विवेकानंद निर्माण होतील.''
जय रामकृष्ण
जय विवेकानंद
जयजय रघुवीर समर्थ

- डॉ. शिरीष गणेश लिमये,
मित्रमंडळ कॉलनी जवळ,
धनी वेलणकर वसाहत, पुणे

स्वामीजी	समर्थ
''समाजाला कोणी सर्व दृष्टींनी संतुष्ट ठेवतील असे आजवर कधी झाले नाही.	सकळ लोक राजी राखे । कठीण आहे ।
''नेहमी सावध राहा, थोडासुद्धा भोंगळपणा नको.''	अखंड सावधान असावे । दुश्चित्त कदापि नसावे ।
''असत्य असेल ते कटाक्षाने टाळा. सत्याची कास मात्र कोणत्याही परिस्थितीत सोडू नका''	बोलिला बोल विसरो नये । प्रसंगी सामर्थ्य चुको नये ।
''काम करण्याची काटेकोर पद्धत शिका. येथे मैत्री किंवा भीड उपयोगाची नाही''	भिडेने वेव्हार निवडेना । भिडेने सिधान्त कळेना । भिडेने देव आकळेना । अंतर्यामी ।।
''संघटनेत तुम्ही एकापेक्षा दुसऱ्यावर अधिक प्रेम दाखवले की, निश्चित समजून चला की तुम्ही भविष्यकालीन कटकटीचे बीजारोपण करीत आहात.''	येकांची पाठी राखणे । येकांस देखो न सकणे । ऐसी नव्हेत की लक्षणे । चातुर्याची
''प्रत्येकाचे दोष सहन करा. कुणाबद्दल वाईट-साईट बोलू नका व ऐकूही नका.''	दोष देखोनी झाकावे । अवगुण अखंड न बोलावे ।
''कोणतेही कार्य सुरू करण्यापूर्वी श्री रामकृष्णांची प्रार्थना करा. ते तुम्हाला योग्य तो मार्ग निश्चित दाखवतील.	देवाच्या इच्छेने वर्तावे । देव मानील ते मानावे । तरीच मग स्वभावे । कृपाळू देव ।।
''शरीर नष्ट होणारच यात संशय नाही. मग ते आळसात गंजवण्यापेक्षा झिजवून नष्ट होऊ द्या''	मरणहाक तो चुकेना । देह वाचविता वाचेना । विवेकी होऊन समाजाना । काय करावे ।।
''मला अशी एक यंत्रणा उभी करायची आहे, तिच्याद्वारे धर्मप्रचाराचे कार्य माझ्या पश्चातही चालू राहिल''	आपण अवचित मरोन जावे । मग हरिभजन कोण करावे । या कारणे हरिभजनास लावावे । बहुत लोक

• • •

।। समर्थांचा सद्गुरू व शिष्यासंबंधीचा विचार ।।

- डॉ. सौ. सुनिता तांबे



आरंभिक -

भारताचा सांस्कृतिक इतिहास अत्यंत गौरवशाली असून भारतीय संस्कृती व धर्माचे प्रधान अंग म्हणून येथील संतपरंपरा विख्यात आहे. अन्य कोणत्याही देशास अशी श्रेष्ठ परंपरा लाभलेली नाही. भरतखंडी नरदेही प्राप्ती । हे परमभाग्याची संपत्ती ।। तेथही विवेक परमार्थी । त्याचा वशवर्ती मी परमात्मा ।। या शब्दात संत एकनाथांनी भागवतात भरतभूमीचा गौरव केलेला आहे. (ए.भा.२०:१६९) म्हणूनच परंपरेने म्हटले जाते की, इतर देशात देवाचे प्रेषित अवतरतात, भारतात मात्र प्रत्यक्ष भगवंतच संतरक्षणार्थ अवतार घेतात. या भूमीत संत व भगवंताचे अद्वैत असल्याने संताची उपासना तीच ईश्वराची उपासना ठरते. ईश्वरप्राप्तीस्तव सद्गुरूस शरणागत होण्यासही प्राधान्य दिले गेले. संत वा सद्गुरू स्वयंकेंद्री नसल्याने त्यांचे समाजभानही प्रखर असते. आत्मोन्नतीसह जीवनाचे मर्म समजून घेऊन, इतरांसही ते समजेल - रुचेल अशा पद्धतीने सांगून - समजावून देणे हे त्यांचे जीवनव्रत असते.' हे विश्वचि माझे घर' अशी प्रत्येक मानवी मनाची घडण व्हावी यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात. त्यासाठी 'नराचा नारायण' करायचा 'अहं ब्रह्मास्मि' अशा निष्ठेने जगत 'स्व' ला विसरायचे अशीच त्यांच्या आयुष्याची जडण - घडण होत आलेली असते. भारताची भूमी तर आसेतु हिमाचल आचार्य सद्गुरू आणि संतांच्या शिकवणुकीने आजवर सुजलाम सुफलाम् बनत आलेली आहे. त्याद्वारेच धर्म व संस्कृतीस येथे स्थैर्यताही लाभली आहे. वैदिक काळापासून भारतीय संस्कृतीने साधु - सज्जन-सद्गुरूंचे गौरवगान केलेले आहे. ''ब्रह्म त्रिकालाबाध्य असते'' हे जाणणारा तो संत! अशी तैत्तरीय संहितेत त्यांची व्याख्या केलेली आहे. ''संत सदैव धर्माचे पालन करतात, सदाचार हेच त्यांचे प्रधान लक्षण असून संत हीच समाजाची दिशा होय'' असा महाभारतानेही त्यांचा गौरव केलेला आहे. अध्यात्म रामायणाने भक्ती साधनात सत्संगतीचे श्रेष्ठत्व सांगितले असून भागवत तर संतांना 'ब्रह्मविद्' समजते. शंकराचार्यांनीही मनःशांती, लोककल्याण, आत्मसाक्षात्कार आणि निस्वार्थबुद्धी अशी चार प्रधान संतलक्षणे सांगितली आहेत. अशा या संत मंडळीत उत्तर भारतातील संत तुलसीदास, आसामातील संत शंकरदेव आणि महाराष्ट्रातील संत समर्थ रामदास या तीनही संतांनी भारतभूमी पवित्र राखण्याचे हिंदू धर्म व संस्कृतीही जागविण्याचे फार मोठे कार्य केलेले आहे. त्यातही श्रीरामाचे अनन्यभक्त असलेल्या समर्थ रामदासांनी आत्मोद्धाराबरोबरच लोकोद्धाराचेही महान कार्य केले. विशेषतः येथील तरुणांच्या मनात त्यांनी जी विजिगिषुवृत्ती निर्माण केली त्यामुळेच आजवर आपण या भूमीत सुखनैव जीवन जगत आलेलो आहोत. समर्थांनी रामराज्याचा ध्यास घेतला. क्रियाशीलतेने लोकमानसात आपले स्वतंत्र स्थान प्राप्त केले. श्रीरामप्रभू, माता तुळजाभवानी आणि वीर हनुमान या तीनही देवतांचा जागर करून प्रयत्नांती परमेश्वर प्राप्तीचा विश्वास लोकमानसात निर्माण केला. नैराश्यग्रस्त, दुबळ्या, हीन-दीन अवस्थेतील समाजास भौतिक प्रगतीचा मार्ग दर्शवून दिलासा दिला. 'धर्म स्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।' असा श्रीशिवाजीमहाराजांचा गौरव केला. त्याचबरोबर सामर्थ्यशाली संघटनेचा प्रयोग स्वकर्तृत्वाने सिद्ध केला. त्यासाठीच भारतात ठिकठिकाणी मठ स्थापना करून त्यात वीर हनुमंताची प्रतिष्ठापना केली. शेकडो महंतांचे नेतृत्व उभारले. स्वतः दऱ्याखोऱ्यात राहात असले तरी तेथेही सदैव समाज व देशासाठीच चिंतन केले. 'वन्ही तो चेतवावा रे' या मूलमंत्राने समाजजागृतीही घडविली. मंदिरांच्या जार्णोद्धारातून समाजमानसास दिलासा दिला. आपल्या वाङ्मयातून समाज शिक्षणाचे धडे दिले. त्यात बरोबर विधवा स्त्रिया, अनाथ बालिका यांना पितृवात्सल्याच्या कळवळ्याने सन्मार्गाचा - आत्मोद्धाराचा मार्ग दाखविला.

।।कालसंदर्भ ।।

रामदासी संप्रदायाचे प्रवर्तक समर्थ रामदास वावरले तो काळ मुसलमान राजवटीचा -मध्ययुगीन काळ ! तत्कालीन राज्यकर्त्यांची अनिवार राज्यतृष्णा, धर्मवेड, आततायीपणा यांच्या कटू अनुभवाने महाराष्ट्र अंतर्बाह्य पोळलेला ! सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक तसेच राजकीय दृष्ट्याही कर्तव्यमूढ बनलेला ! परिणामी येथील जनतेचे बाह्य व क्षात्रतेजही लोपलेले ! जप-तप-तीर्थाटण-संत-महंत- विरक्त अशा अनेक नावांखाली येथे भाक्तिची ही टिंगल - टवाळी केली जाई. ''तीर्थक्षेत्रे मोडिली । ब्राह्मणे स्थानभ्रष्ट जाली । सकळ पृथ्वी आंदोळिली ! धर्म गेला ... नुसता देशचि उरला'' असे तत्कालीन परिस्थितीचे वास्तव चित्र समर्थांनी रेखाटिले आहे. 'मुखी ब्रह्मज्ञान । मनी धनमान' अशी येथील भट - भिक्षुकांची गत होती; आणि तशीच तकलादू भक्तिही होती. अशी देशास आलेली अवकळा बघून समर्थ अंतर्मुख झाले. चिंतामग्न होत गेले. तत्कालीन भयंकर परिस्थितीचे वर्णन त्यांनी 'अस्मानी सुलतानी' व 'परचक्र निरूपण' या आपल्या रचनांतून केलेले आहे. स्त्रियांवरील अत्याचार, अन्याय, अवर्षणे, भूकबळी, रोगराई देवळांचा विध्वंस, मूर्तींची विटंबना, भयग्रस्तता, जनतेची प्रतिकारशून्यता इत्यादी अनेक विपरीत गोष्टींना देश पोळलेला होता. अशा भयानक अवस्थेतील देशास स्वतंत्र करण्याचा प्रयत्न समर्थांनी केला. अर्थात राज्यपरिवर्तनाच्या निमित्ताने व्यक्तिचा कायापालट करणे त्यांना अभिप्रेत होते. इतर संतसज्जनांप्रमाणेच माणसाच्या अंतस्थ दुष्टप्रवृत्तीविरुद्धच त्यांचाही लढा होता.

।। समर्थांचे चरित्रावलोकन ।।

समर्थ रामदासांचे चरित्रावलोकन करता दिसते की, समर्थांचा जन्म चैत्र शुद्ध नवमी, सोमवार, माध्यान्हकाळी, रामजन्माच्या वेळीच म्हणजे भर दुपारी बारा वाजता, शके १५३० (इ.स.१६०८) मध्ये झाला. पिता सूर्याजीपंत व माता रेणुका - राणुबाई ! माता - पिता दोघेही रामोपासक तसेच सूर्योपासकही ! पुत्राचे (समर्थांचे) पाळण्यातील नाव नारायण ! अवघ्या आठ-नऊ वर्षांचा नारायण एकदा अंधारातच कितीतरी वेळ बसून होता. आईने काळजीनेच विचारिले, ''बाळा, अंधारात बसून तू काय करतोयस रे? नारायण उत्तरला 'चिंता करितो

विश्वाची!' पुढे मोठा झाल्यावर नारायणाने खरेच लोकांच्या सुखदुःखाचीच नव्हे तर राष्ट्राच्या भाग्योदयाचीही चिंता वाहिली. त्यासाठीच विवाह मंडपातून पलायन केले. टाकळी या नाशिकजवळील गावी तेरा कोटी रामनामाच्या जपाचा संकल्प पूर्ण केला. इ.स.१६३२ मध्ये त्यांना श्रीरामांचा साक्षात्कारही घडला आणि त्यानंतर उत्तरेकडे त्यांनी तीर्थयात्रेस प्रयाण केले. पुढील काळात ठिकठिकाणी त्यांनी अकरा मारुतींची तसेच शेकडो मठांचीही स्थापना केली. चाफळ येथे राममंदिर उभारले. शिंगणवाडीस श्रीशिवाजी महाराजांची भेट घडली तेव्हा त्यांनाही अनुग्रहित केले. त्या वेळी महाराजांनी भिक्षा म्हणून आपले राज्यच समर्थांच्या झोळीत टाकले. मात्र समर्थांनी ते महाराजांनाच परत केले. प्रसाद म्हणून भगवा ध्वजही अर्पण केला. नंतरच्या काळात भारतभरच्या तीर्थयात्रा केल्या. राजा - महाराजा-साधुसंत-कवीजन-संतसज्जन आदीच्या गाठीभेटी घेतल्या. अनेकांशी पत्रव्यवहार होत गेला आणि इ.स.१६५९ मध्ये शिवथर घळीत 'दासबोध' या त्यांच्या प्रसिद्ध ग्रंथाची रचना झाली. त्याचप्रमाणे इतरही वैविध्यपूर्ण काव्यरचना समर्थांनी केलेल्या आढळतात. आणि इ.स.१६८१ मध्ये श्रीरामप्रभूंच्या मूर्तीसमोर रामनामाच्या गजरात त्यांनी देह विसर्जन केला. समर्थ संप्रदायाचा विस्तार त्यांच्यानंतरही वाढताच राहिला.

॥ समर्थांचा ग्रंथसंभार ॥

समर्थांच्या ग्रंथसंभारात 'दासबोध' हा महत्त्वाचा ग्रंथ ! त्याखेरीज मनाचे श्लोक, आनंदवनभुवन, रामायण, एकवीस समासी, जुनाट पुरुष, मानसपूजा, जनस्वभाव गोसावी, स्फुट कविता, आरत्या, भारुडे, चौदा ओवीशते, धाट्या, सवाया, भूपाळ्या इत्यादी असंख्य काव्यरचनांचा समावेश असून त्यात काही रचना हिंदी भाषेतही केलेल्या आढळतात. या सर्व रचनात अर्थातच 'दासबोध' हा अलौकिक ग्रंथ असून त्यातून समर्थांनी धर्मकारण, राजकारणासह इतरही अनेक विषयांचा उहापोह केलेला आहे. त्यांच्या दृष्टीने 'मुख्य हरिकथा निरूपण । दुसरे ते राजकारण । तिसरे ते सावधपण । सर्वांविषयी ॥'' त्याचबरोबर 'मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा ॥ हे देखील त्यांनी पुनःपुन्हा सांगितले आहे. देशद्रोही तितुके कुत्ते । मारुनी घालावे परते'' असे सांगून त्यांनी महंतांना राजनीतीचे धडेही दिलेले आहेत. त्याचप्रमाणे सुंदर अक्षर लिहावे । स्पष्ट नेमस्त वाचावे । विवर विवरी जाणावे । अर्थांतर ॥'' असा विद्यार्थ्यांना अमूल्य उपदेश करून मागील उजळणी पुढे पाठ । नेम धरावा निकट । बाष्कळपणाची वटवट करू नये । अशाही नेमक्या सूचना त्यांना दिलेल्या आहेत. ''प्रातःकाळी उठावे । काही पाठांतर करावे । यथाशक्ती आठवावे । सर्वोत्तमासी ॥'' असा सदुपदेशही केलेला आहे. दासबोधातून समर्थांनी आध्यात्मिक विषयाच्या निरूपणाबरोबरच राजकारण, समाजकारण, धर्मकारण, शिक्षणशास्त्र, विज्ञान, भाषा, लेखनक्रिया, काव्य, पाठांतर इत्यादी विविध विषयांवर भाष्य केलेले असून त्याद्वारे समाजातील प्रत्येक घटकास आत्मीयतेने मार्गदर्शन केलेले आहे. ते म्हणतात' जो ये ग्रंथीचा विवेक । विवंचून पाहे साधक । तयांस सांपडे येक । निश्चयो ज्ञानाचा ॥'' ज्ञान अर्थात अद्वैत ॥ अद्वैत ज्ञानमय असेच दासबोध ग्रंथाचे स्वरूप आहे आणि शिष्याने त्याचे निरंतर श्रवण - अध्ययन तसेच परिशीलन करावे असे समर्थांनी सांगून ठेविले आहे.

॥ समर्थांचा सद्गुरू ॥

भारतीय संस्कृतीचे एक महान लक्षण म्हणजे सद्गुरू परंपरा ! माता पित्यापेक्षाही भारतीय संस्कृतीने सद्गुरूस श्रेष्ठत्व दिलेले आहे. विशेषतः अध्यात्म क्षेत्रात तर सद्गुरूंचे विशेषच महत्त्व असते. भारतीय मानसात सद्गुरू परंपरेविषयी अतिशय श्रद्धेची भावना बाळगीत असते आणि शिष्य जर सतत साधनारत असेल तर, सद्गुरू त्यास शोधीत येतात आणि त्यांच्याकडून शिष्यास सहजच उपदेशप्राप्ती होते, अनुभवामृताचा लाभ घडतो आणि जन्मही सार्थकी लागतो. यावर ते 'मानस' विश्वास ठेवीत आलेला असते. सद्गुरूंची अनन्यसेवा ही त्या शिष्यासाठी जणू परमेश्वराचे परमपूजनच असते, असा जनसामान्यांचा विश्वास असतो.

तसे पाहाता, भौतिक जीवन जगण्यासाठी ज्ञान प्राप्त करून देणारा असतो तो 'गुरू' आणि परमार्थाचा अनुभव देणारा असतो तो 'सद्गुरू' असेच समजण्यात येते. ज्ञानविरहित जे जे केले । तें तें जन्मासि मूळ जाले । म्हणौनि सद्गुरुची पाऊले । सुदृढ धरावी ॥ जयांस वाटे देव पहावा । तेणे सत्संग धरावा । सत्संगेवीण देवाधिदेवा । पाविजेत नाही ॥ (दास ५:१:२२-२३) सद्गुरू कृपेखेरीज आत्मज्ञानप्राप्ती नाही आणि हे आत्मज्ञान नसलेले जीव संसारसागरात गटांगळ्या खात राहातात. आत्मज्ञानावाचून जे जे साधन करावे ते ते जन्ममरणाचा फेरा चुकवीत नाही, म्हणूनच सद्गुरूस शरण जाणे आवश्यक असल्याचे समर्थ सांगतात. संत वा सद्गुरूकृपा झाल्याखेरीज देवही भेटत नाही असेही समजण्यात येते.

समर्थांच्या दृष्टीने सद्गुरू हे स्वयंप्रकाशी असून ईश्वराइतकेच श्रेष्ठ असतात. वर्णनातीत असतात. शिष्याच्या मनातील अज्ञानरूपी अंधःकाराचा नाश करून जन्ममृत्यूचा ठावठिकाणाही ते उरू देत नाहीत. ''जैसे नेत्री घालता अंजन । पडे दृष्टीस निधान ॥ तैसे सद्गुरू वचने ज्ञान । प्रकाश होय ॥'' (दा.द.५.२.३८) असो जयांसी मोक्ष व्हावा । तेणे सद्गुरू करावा ॥ सद्गुरूवीण मोक्ष पावावा । हे कल्पांती न घडे ॥ (दा.द.५.२.४४) ॥ सद्गुरूही कसे ? तर नव्हेती इतरा गुरू ऐसे ॥ जयाच्या कृपेने प्रकाशे । शुद्ध ज्ञान ॥ ५:२:४५॥ समर्थांच्या दृष्टीने सद्गुरू हे इतर गुरूप्रमाणे सामान्य नसतात. तर त्यांची कृपा झाल्यास शिष्याच्या अंतःकरणात शुद्ध ज्ञानाचा प्रकाश पडतो. ज्ञानच प्रकाशीत होत राहाते. शिष्यास ज्ञानप्राप्ती घडते. अशा थोर योग्यतेचेच सद्गुरू असल्याचे समर्थांनी सांगितले आहे. ''फोडूनि शब्दाचे अंतर । वस्तु दाखवी निजसार । तोचि गुरू माहेर । अनाथांचे ॥५:२:१५॥ परमार्थ निदर्शक असा सांकेतिक शब्दांच्या अर्थाची फोड करून सारभूत अशी 'आत्मवस्तू' दाखवितो तोच अनाथांचे माहेर असणारा अर्थात 'मायबाप' असा सद्गुरू होय असे समर्थ सांगतात.

समर्थांच्या दृष्टीने जे जे म्हणून काही उत्तम गुण आहेत तेच सद्गुरूंचे लक्षण होय. सद्गुरू हे सर्व उत्तम गुणांचा आगरच असल्याचे समर्थांनी सांगितले आहे. मात्र काही गुरू नुसते नावाचेच गुरू असतात, त्यांचे सतरा - वीस प्रकार समर्थांनी सांगितले आहेत. उदा.मंत्रगुरू, तंत्रगुरू, राजगुरू, कुलगुरू, असत्‌गुरू इत्यादी.

समर्थ रामदास हे श्रीरामप्रभूंचे अनन्य भक्त होते. त्यांचे संपूर्ण जीवनच श्रीराममय होते. प्रभू श्रीराम हेच त्यांचे सद्गुरू होते. कठोर तपश्चर्येनंतर श्रीरामांचा त्यांना अनुग्रह झाला. कृपाप्रसाद लाभला. श्रीरामांच्या निर्गुण स्वरुपाचा साक्षात्कार घडून स्व-स्वरूपाशी तादात्म्यताही लाभाली. समर्थ सगुणोपासक असले तरी ईश्वराचे सगुण स्वरूप हे अंतीम सत्य नव्हे हे सांगण्याकरिता 'परब्रह्म' तसेच 'परमात्मा' यातील भेद त्यांनी स्पष्ट केला. 'सगुण पाविजे निर्गुण' हाच त्यांचा सिद्धान्त ! अद्वैतात 'परब्रह्म' हे एकच शाश्वत तत्त्व आहे. तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू अध्यात्म ! या ज्ञानाची प्राप्ती व्हावयास सद्गुरूंची नितांत आवश्यकता असते. समर्थांचे सद्गुरू श्रीराम ! त्यांच्याच प्रेरणेने 'दासबोध' ग्रंथाची निर्मिती झाल्याचे समर्थांनी सांगितले आहे. समर्थ स्वतः छत्रपती शिवाजीमहाराजांचे आध्यात्मिक गुरु होते. त्यांच्या दृष्टीने ईश्वरप्राप्तीचे निश्चयात्मक साधन म्हणजे भक्तिमार्ग ! आणि परमार्थ हेच

माणसाचे जीवनध्येय ! दासबोधात समर्थांनी नवविधा भक्तिचे सुंदर विवेचन केलेले आहे. श्रवण, कीर्तन, नामस्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य या सर्व नवविधा भक्तिंपैकी आठ भक्तिंची फलश्रुती ज्या भक्तितून साध्य होते ती नववी भक्ती म्हणजे 'आत्मनिवेदन' भक्ती ! हीच सर्वश्रेष्ठ भक्ती ! या भक्तिनेच भक्त व ईश्वराचे तादात्म्य होते. अद्वैताचा अपूर्व सोहळा अनुभवावयास मिळतो आणि साधकास आत्मज्ञानप्राप्ती होऊ न तो उन्मनी अवस्थेत पोहोचतो, तो याच अवस्थेत ! हिलाच सायुज्यमुक्ती असे म्हणतात.

॥ सद्गुरूंची दहा मुख्य लक्षणे ॥

समर्थांनी दासबोधात सद्गुरूंची दहा मुख्य लक्षणे सांगितली आहेत. (१.) शुद्ध ब्रह्मज्ञान (दा.६.५.२५) २. निश्चयाचे समाधान (दा.५.१०.३) (३.) स्वरूपस्थिती (दा.८.९.२०) (४) प्रबळ वैराग्य (दा.१२.७.९) (१२.७.१८) (५.)उदासवृत्ती - उदासीनता (दा.२.९.१०,२.९.२६,२.८.१०) (६.) अंतर्बाह्य निर्मळ आचार (दा.२.८.११) (दा.८.९.५३) (७.) हरिकथा निरूपण, कीर्तन, अध्यात्मश्रवण परमार्थविवरण इत्यादींचा सतत उद्घोष व त्याद्वारे (८.)जनजागरण (दा.४.२.२३)(दा.४.२.५) परमलक्ष्य जो मोक्ष त्याची प्रत्यक्षानुभूती (दा.८.६.३) तसेच (९.) सारासारविचार अर्थात नित्यानित्यवस्तू विवेक (दास द.१३ स.२.२) आणि (१०.) नवविधा भक्तिसाधन (दास ५.२.५०) आत्मनिवेदन (दा.द.१२ स.६.१६-१७) देव व भक्ताची एकरूपता (दा.८.४ स १०.२३) समर्थ म्हणतात, 'सद्गुरूजवळ मुख्यतः शुद्ध ब्रह्मज्ञान असायला हवे. त्या ज्ञानाने त्याच्या मनास निश्चल समाधानाची प्राप्ती व्हायला हवी.'

दासबोधात समर्थांनी सद्गुरू लक्षणांसाठीची अनेक उदाहरणे दिलेली आहेत. त्याद्वारे सद्गुरू माहात्म्य सांगितले आहे. तरीही त्यांच्या दृष्टीत सद्गुरूंचे मुख्य लक्षण हेच की ते शुद्ध ब्रह्मज्ञानी - आत्मज्ञानी असतात. आत्मनिश्चयी समाधान व अखंड स्वरूपाकारता राखणारे असतात. त्याखेरीज कडकडीत वैराग्य जपणारे, उदासीन, अनासक्त, स्वधर्माचे आचरण राखणारे, निर्मळ आचार अंगिकारणारे तसेच आपल्या शिष्यांसमवेत अध्यात्मश्रवण - विवरण करणारे हरिकथा निरूपण, सगुणलीला वर्णन - श्रवण करणारे अर्थात परमार्थ विवरण करणारे असतात. त्यांच्या सान्निध्यातच सामान्यजनांना स्वोद्धाराचा मार्ग गवसतो. त्याचप्रमाणे नवविधाभक्तिद्वारे जे जनसामान्यांच्या उद्धाराचाही प्रयत्न करतात असे गुरू समर्थांच्या दृष्टीने खरे सद्गुरू होत. समर्थ सांगतात, 'ज्या ठिकाणी नवविधाभजन असते व स्वरूपस्थितीच्या साधनामार्गाचे अनुसरण केले जाते तेच सद्गुरू लक्षण श्रोत्यांनी जाणावे.

॥ सच्छिष्य लक्षणे ॥

शिष्य अनेक प्रकारचे असतात पण सद्गुरू वचनांवर पूर्ण विश्वास ठेवणारा शिष्य दुर्मिळच असतो. शिष्यात ही दांभिक नास्तिक, दुर्बुद्धी असणारे शिष्य असतात. काही धनलोभी, तर काही बाहेर सात्विकतेचा आव आणणारे पण अंतरंगात विकल्पी असतात. समर्थांच्या दृष्टीने मात्र शिष्य हा मानापमानाच्या पलीकडे असावा. तो निर्मत्सरी, निर्मम, साक्षेपी, ईश्वराविषयी दृढ श्रद्धा बाळगणारा, व्यर्थ निरर्थक भाष्य न करणारा असाच असावा. समर्थांनी सच्छिष्याचे मुख्य लक्षण सांगितले ते म्हणजे त्याचा सद्गुरू वचनांवर पूर्ण विश्वास हवा. सद्गुरूस त्याने अनन्यभावाने शरण जायला हवे. त्याच्या अंगी सद्विद्येचे सर्व गुण असले पाहिजेत.

''मुख्य सच्छिष्याचे लक्षण । सद्गुरुवचनी विश्वास पूर्ण । अनन्यभावे शरण । त्या नाव सच्छिष्य ॥ ५.३.१९ ॥ शिष्य असावा स्वतंत्र ॥ शिष्य असावा जगमित्र । शिष्य असावा सत्पात्र । सर्व गुणे ॥ ५.३.३१ ॥ शिष्य असावा अंतरीचा । परमशुद्ध ॥ ३२॥ शिष्य सद्विद्येचा, सद्भावाचा आणि अंतःकरणाचा अत्यंत शुद्ध असावा. ''बहु दुःख भोगिले जेणे । तयासीच परमार्थ बाणे । संसार दुःखाचेनि गुणे । वैराग्य उपजे ॥ ४.३.३४॥ समर्थ सांगतात ''संसार दुःखाने गांजलेला आणि त्रिविध तापाने पोळलेला जो असेल तोच शिष्य परमार्थास योग्य होतो असे कां? तर जया संसाराचा त्रास । तयासीच उपजे विश्वास । विश्वासबळे दृढ कास । धारिली सद्गुरुची ॥ ५.३.३६॥ ज्याने अतोनात दुःख भोगले असेल, त्याच्याच अंगी खरा परमार्थ बाणेल. संसार दुःखाच्या योगाने त्याला वैराग्य उत्पन्न होते. (वैराग्यावाचून अनन्यशरणागती होत नाही व ज्ञानही टिकत नाही. ''अविश्वासे कास सोडिली। ऐसी बहुतेक भवी बुडाली। नाना जळचरे ॥) शिष्य अनेक प्रकारचे असतात पण सद्गुरू वचनावर पूर्ण विश्वास ठेवणारा शिष्य दुर्मिळ असतो. शिष्य मानापमानातीत असावा, निर्मत्सरी, साक्षेपी, निर्मम, ईश्वरनिष्ठ, व्यर्थ, निरर्थक भाष्य न करणारा शिष्यच सच्छिष्य असल्याचे समर्थांनी सांगितले आहे. नापेक्षी सन्मान, निर्मत्सरता, दक्षता, सांडविली अहंममता, आस्तिक्य भाव, सद्गुरुसी सहृदयपण, निश्चलपण, अती प्रीती परमार्था आणि अनुसूयू हे शिष्याचे नऊ सद्गुण उद्धवास भगवंतानी सांगितले आहे.

समर्थ सांगतात ''सच्छिष्य तोच की जो विचारपूर्वक पाऊले टाकतो, हातून चूक घडल्यास त्याविषयी वाईट वाटणारा, पश्चाताप करणारा असावा. सद्गुरुविषयी आदराची भावना राखणारा ईश्वराइतकीच श्रद्धा भक्ती राखणारा असावा. वेळेचा अपव्यय टाळणारा, कधीही पापवासना मनात न बाळगणारा, अभ्यासू, आत्मज्ञानासाठी तळमळणारा, सद्गुरुंचे शब्द झेलणारा, अभ्यासाची आवड असणारा, उद्योगी, तत्पर व अतींद्रिय वस्तूवर लक्ष केंद्रित करण्याची क्षमता बाळगणारा असावा. परमार्थ प्राप्तीसाठीच त्याने जगायचे असते. ग्रंथाभ्यास करताना शब्दार्थाच्या अंतरंगात शिरण्याचे सामर्थ्य त्याच्याजवळ असावे. ग्रंथ कर्त्याचा खरा आशय त्याने ध्यानात घ्यावा आणि त्यानुसार अभ्यास; चिंतन - मनन करीत जाणारा हवा. शारीरिक कष्टांची त्याने तमा बाळगू नये. परमार्थ वाढता कसा राहील याविषयीच विचार बाळगणारा आणि त्यानुसार आचार राखणारा असावा. तो स्वतंत्र्य, उद्योगी, चतुर, हजरजबाबी आणि ब्रह्मविद्याभ्यासी असावा. सद्गुरूंची आज्ञा शिरसावंद्य मानणारा, विनयशील तीक्ष्ण बुद्धीचा, मानापमानापासून दूर राहाणारा असावा. जगन्मित्र असावा. भजन - पूजन - कीर्तन - प्रवचन विषयक प्रेम असणारा - श्रद्धाळू असावा. असे सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्व शिष्याच्या ठायी असावे असे समर्थ सांगतात आणि अशा सर्वगुणसंपन्न शिष्याने सद्गुरूचरणांची कास धरल्यावर तो मोक्षाधिकारी बनणार हे निश्चित।'' असो ऐसे गुणावेगळे । जे शिष्य आगळे । दृढ भावार्थ सोहळे । भोगिती स्वानंदाचे ॥ (दा.५.३.९८) सद्गुरूकृपा झाल्यावरच शिष्यास परब्रह्म स्वरूपाची यथार्थ ओळख होते.

नवविधा भक्तिसाधनाद्वारे सद्गुरू जनसामान्यांसाठी अधिष्ठान निर्माण करतात. अंतरी शुद्ध ब्रह्मज्ञान । बाह्य निष्ठेचे भजन । तेथे बहुत भक्तजन । विश्रांती पावती ॥ (दा.५.२.५०) या वचनानुसार सद्गुरू हे आत्मनिवेदन भक्तिचे मूर्त रूपच होत. भवरूपी व्याघ्राने उडी घालून गायवासराची ताटातूट झालेली असते ती पाहून ज्यास दया येते आणि जो त्यांना त्या वाघाच्या तावडीतून सोडवितो तो सद्गुरू । अर्थात येथे गाय म्हणजे ईश्वर, वासरू म्हणजे जीव, वाघ हा अशाश्वत संसार ! जीव मायाजाळात अडकतात. प्रापंचिक दुःखाने होरपळून निघतात. तेव्हा त्यांना या मायारूपी संसारातून सोडवितात ते सद्गुरू होत.

- डॉ.सौ. सुनीता तांबे
२ आसावरी, गणेश खिंड रोड
औंध गाव, पुणे - ४११ ००७

● ● ●

समर्थांचा कर्मयोग

- सौ. प्रभाताई करंदीकर



संमोह निर्माण झालेल्या अर्जुनाला कर्मयोगाचा उपदेश करून भगवान श्रीकृष्णांनी त्याचा मोह नष्ट केला. अगदी तोच उपदेश समर्थांनी तंतोतत आचरणात आणल्याचे आपल्याला त्यांच्या चरित्राचा अभ्यास केल्यास दिसून येते. हाच उपदेश त्यांनी आपल्या ग्रंथराज दासबोधातून केलेला दिसतो. समर्थांचे जीवन म्हणजेच कर्मयोग असे म्हटले तरी चालेल. असे त्यांचे कार्य आहे. त्यांच्या अद्वितीय कार्यामुळेच ते समर्थ म्हणवले गेले. जणू प्रतिश्रीकृष्णच.

धार्मिक विषय हा संतांचा प्रांत - राजकारणाशी त्यांचा काय संबंध ! असे सर्वसामान्यतः सर्वांना वाटते. पण धर्म आणि राजकारण जोडीने चालले तरच देशाची उन्नती होऊन जनता समृद्ध, सुरक्षित व सुखी होऊ शकते. एकाशिवाय दुसरा दुर्बल ठरतो याची पूर्ण जाणीव समर्थांना होती. म्हणूनच तत्कालीन भारतीय संतांमध्ये त्यांचे जे अलौकिक कार्य दिसून येते त्यामुळे त्यांचे स्थान केवळ एकमेवाद्वितीय आहे आणि 'दासबोध' या त्यांच्या ग्रंथामुळे ते तसेच काय राहणारही आहे.

'जय जय रघुवीर समर्थ' आणि 'श्रीराम जय राम जय जय राम' हे मंत्र कानावर पडताच श्री समर्थ रामदासांची मूर्ती डोळ्यासमोर येते. सशक्त शरीरयष्टी आणि पाहताक्षणीच आदर तसाच धाक वाटेल अशी करारी, भेदक दृष्टी हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विशेष तेवीस पिढ्या सूर्योपासना व रामोपासना करणाऱ्या ठोसर घराण्यांत जांब येथे रामनवमीच्या दिवशी व रामजन्माच्या वेळी समर्थांचा जन्म झाला. त्यांचे पिताश्री श्री सूर्याजीपंत यांना भगवान सूर्यनारायणाच्या कृपाशीर्वादाने दोन पुत्र झाले. गंगाधर व नारायण हे ते भाग्यवान सुपुत्र. यातील नारायण म्हणजे आपले समर्थ फार लहान वयात नारायणाने इस्लामी अत्याचार बघितले. त्याचवेळी म्हणजे वयाच्या आठव्या वर्षी पितृसुखालाही पारखे झाले. भोवतालची परिस्थिती म्हणजे सत्ताधीशांची जुलुमजबरदस्ती व अत्याचार पाहून हे बालक ''विश्वाची चिंता'' करण्यांत मग्न झाले आणि नुसतीच चिंता करीत बसले नाही तर या अन्यायाला प्रतिकार करून तो कसा मोडून काढता येईल याचाही विचार करीत होते. कांही विधायक कार्य करायचे असेल तर त्याला भगवंताचे अधिष्ठान हवे आणि त्यासाठी ऐहिक व्यक्तिगत सुखाचा त्याग करायला हवा हे ओळखून ते कुटुंबाचा, घरदाराचा मोहपाश तोडून नाशिक येथे निघून आले.

देवाच्या सख्यत्वासाठी । पडाव्या जिवलगांसी तुटी ।
सर्व अर्पावें सेवटीं । प्राण तो हि वेचावा ॥

असे नुसते विचार केले नाहीत तर प्रत्यक्षात आचरणात आणले.

नाशिकला आल्यानंतर टाकळी येथे गोदावरी - नंदिनी यांच्या संगमावर बारा वर्षे तप केले. मारुतिरायांचे दर्शन झाले. श्रीरामाचे दर्शन व आशीर्वाद मिळाला. याच काळात समर्थांनी अनेक ग्रंथांचे वाचन केले, अनेक विद्या हस्तगत केल्या, विद्वानांचा, साधुसंतांचा सहवास मिळाला आणि उद्धवासारखा शिष्यही मिळाला. आतां ध्येयाकडे समर्थांची नजर लागली.

टाकळीचा मठ उद्धवाच्या स्वाधीन करून, श्रीरामाचा आशीर्वाद घेऊन समर्थ तीर्थटनाला निघाले. कार्याला सुरूवात करण्यापूर्वी आपण आपला देश व समाज जवळून पाहावा, एकूण परिस्थितीचा अभ्यास करावा अशी त्यांची इच्छा होती. त्यानुसार देश व समाजाच्या निरीक्षणासाठी त्यांनी जीवनाची बारा वर्षे दिली. सगळीकडे लोकांचे हाल पाहून त्यांचे मन विषण्ण झाले.

औरंगजेबासारखा कट्टर धर्माभिमानी माणूस सत्तास्थानी होता. हिंदू हा शब्द नावालाही उरू नये हे त्याचे ध्येय होते. जबरदस्त महत्त्वाकांक्षा होती. त्यामुळे इस्लाम सोडून इतर सर्वच धर्मियांवर अत्याचार होत होते. स्त्रिया व मुलींना पळवणे, भ्रष्ट करणे, पुरुषांना गुलाम करून ठेवणे अशा घटना रोज घडत होत्या. विहिरीवर पाणी भरायला गेलेली स्त्री सुखरूप परत येईल याची शंकाच होती. तर कामाला गेलेला तरुण जिवंत परत येईल असा विश्वास नव्हता. देऊळच काय पण मूर्तीही सुरक्षित राहण्याची खात्री नव्हती. हे सर्व प्रत्यक्ष पाहिलेले वर्णन समर्थांच्या 'अस्मानी सुलतानी' मध्ये आपल्याला दिसून येते.

इस्लामी राजवटीने अशा क्रूर कृत्यांनी जी दहशत निर्माण केली होती त्यामुळे सामान्याची प्रतिकार करण्याची हिंमतच नष्ट झाली होती परिणामतः समाज दुर्बल व दैववादी झाला. तीव्र इच्छा असूनही प्रत्यक्षांत मात्र दुर्बलता आड येत होती. अशा वेळी 'मी ही परिस्थिती बदलीन, आपला राजा व राज्य निर्माण करीन' हे समर्थांनी जीवनाचे ध्येय निश्चित केले. या ध्येयासाठी त्यांनी आयुष्य पणाला लावले.

भावनेचे आहारी जाऊन घेतलेला हा निर्णय नव्हता. तर अत्यंत निर्भयतेने व दृढ निश्चयाने घेतलेला तो एका साक्षात्कारी साधुपुरुषाचा निर्णय होता. अत्यंत बिकट काळांत कोणताही भक्कम आधार पाठीशी नसताना एकट्या व्यक्तीने असा निर्णय घेणे हे धाडसाचेच काम होते.

तीर्थाटन करीत असताना समर्थांनी ठिकठिकाणी आपल्या समविचारी माणसे हेरली. त्यांना योग्य मार्गदर्शन केले व ११०० हून अधिक ठिकाणी मठ स्थापन करून तिथे त्यांची नेमणूक केली. समर्थ कृष्णाकिनारी आले. त्यांनी आपला कार्याचा आराखडा मनाशी निश्चित केला होता.

प्रथम लोकांना एकत्र आणायला हवे होते. त्यासाठी त्यांनी चाफळ येथे मंदिर बांधण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांना जागा मिळाली ती स्मशानभूमीची ! समर्थांनी ती जागा स्वीकारली आणि गावकऱ्यांना पहिला धक्का बसला तो समर्थांनी तेथे असलेले शेंदूर फासलेले अनेक दगड (देव) उचलून नदीत टाकले तेव्हा !

हा होता अंधश्रद्धेवरील प्रहार. दैवते कोपतील ही भीती लोकांच्या मनातून गेली. समर्थांविषयी आदर वाढला, विश्वास वाटला. आधार वाटला आणि गावकरी श्रमदानासाठी आपणहून पुढे झाले. अनंत हस्ते, प्रेमभावनेने,

परस्परसहकार्याने मंदिर उभे राहिले. साहजिकच लोकांना ते आपले वाटले. अंगापूरच्या डोहातून बाहेर काढलेली मूर्ती समर्थांनी बाहेर काढून मंदिरांत स्थापन केली आणि तेथे रामाचा उत्सव सुरू केला. तत्कालीन परिस्थिती पाहता मंदिर उभे करणे व उत्सव सुरू करणे धाडसाचेच काम होते हे लक्षांत घ्यायला हवे.

ठिकठिकाणी उत्सवाच्या निमित्ताने लोक एकत्र येऊ लागले. त्यातून समर्थांनी कार्यकर्ते निवडले. भिक्षेच्या निमित्ताने हिंडताना काही लोक पारखून जवळ करीत. असे निवडलेले लोक एकत्र करून त्यांच्यावर समर्थांनी उत्तम संस्कार केले. त्यांच्यातून नेते तयार केले. हेच समर्थांचे महंत. समर्थ हे एक द्रष्टे राजकारणी संत होते. समाजाचे सुख व राष्ट्राची उन्नती यांचा मूळ पाया व्यक्ती. व्यक्ति -कुटुंब-समाज-नगर-प्रांत- देश असा आराखडा त्यांच्या नजरेसमोर होता. त्यामुळे व्यक्ती ताकदीची, सदाचरणी, स्वाभिमानी असायला हवी आणि त्यासाठी बलसंवर्धन, शारीरिक व मानसिक नैतिक बळ आवश्यक होते. ईश्वरी अधिष्ठानावर व्यक्तिचा विश्वास हवा. कारण धर्म व राजनीती यांचे अतूट नाते असते. अन्याय करणाऱ्याला प्रतिकार करायचा तर मनगटांत ताकद हवी मनी धैर्य हवे. मग बलसंवर्धनाला प्रथम क्रमांक दिला गेला आणि ठिकठिकाणी शक्ती व बुध्दिची देवता जी मारुती - त्याची मंदिरे स्थापून गावांतील तरुणांसाठी आखाडे सुरू केले. तरुणांना व्यायामाची सवय लावली. असे कित्येक सशक्त तरुण तयार केले. त्यांच्यावर देशप्रेमाचे संस्कार केले. त्यांना शिवाजीराजेकडे पाठवले. असे जीवाला जीव देणारे अनेक तरुण राजांच्या पाठीशी उभे राहिले.

महंत (नेते) तयार करताना महंतांसाठी त्यांनी तयार केलेली आचारसंहिता पहिली तर कोणत्याही राष्ट्राने नेता कसा असावा याचा धडा त्यावरून घ्यावा. अशा नियमांना काळाचे बंधन नसते. सर्व मठ व महंत यांच्यावर त्यांचे कठोर अनुशासन होते. त्यांनी महंतांसाठी केलेल्या नियमांपैकी काही खालीलप्रमाणे :-

१. महंत अत्यंत निःस्पृह असावा.
२. महंताचे लेखन, वाचन, पाठांतर प्रथम दर्जाचे असावे.
३. आत्मज्ञानाचा विचार, जरूर तेवढे राजकारण, चार लोकांत वागण्याची सवय व समज त्याला असावी.
४. ग्रंथाचा प्रथम स्वतः सखोल अभ्यास केल्यानंतरच तो इतरांना शिकवावा.
५. जे सांगायचे ते योग्य शब्दात व योग्य वेळी सांगता यावे.
६. सर्वांचे समाधान कसे राखावे हे महंताला समजले पाहिजे.
७. सगळीकडे आधीपासून पूर्ण लक्ष असल्याने पुढे घडणाऱ्या घटना कशा घडतील याचा त्याला अंदाज असायला हवा.
८. त्याच्या अंगी भक्ती, ज्ञान वैराग्य असावे.
९. कोणत्याही संकटाला तोंड देण्याची हिंमत व धैर्य त्याच्यात असावे.
१०. अत्यंत प्रयत्नवादी तर असावेच, सतत लोककल्याणासाठी झटावे, पण मानसन्मानाची अपेक्षा नसावी. अशा सत्काराची वेळ आलीच तर लोकांना सापडू नये इतका तो दूर असावा.
११. न्याय व नीतीचा रक्षणकर्ता असावा. त्यासाठी त्याचे शरीरबल व मनोबल उत्तम असावे.
१२. त्याचे विचार, आचार, उच्चार यात एकवाक्यता असावी. त्याने लोकसंग्रह करावा व प्रत्येकाचा अधिकार ओळखून त्याप्रमाणे त्याला काम द्यावे.
१३. स्वतः प्रचिती घेतल्याशिवाय कशावरही विश्वास ठेवू नये.
१४. महंताजवळ सहनशीलता, वाणीची मधुरता, असायलाच हवी.

प्रत्येक नेत्याने ही आचारसंहिता अमलांत आणली तर देश वैभवाला चढायला उशीर लागणार नाही. पण आज नेत्याच्या अंगी गुणांपेक्षा दोषच अधिक दिसून येतात. नेत्याने प्रथम स्वतःला सुधारावे आणि मगच इतरांना सुधारण्याचा प्रयत्न करावा. कारण जो पोहोणे जाणतो तोच बुडत्याला वाचवू शकतो.

समर्थांनी प्रचिती, प्रबोध व प्रयत्न या तत्त्वांना खूपच महत्त्वाचे मानले. अनुभव घेतल्याशिवाय माणसाचे बोलणे व्यर्थ होय **क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे.** (म.श्लो.१८२) असे ते म्हणत. रोकडी प्रचिती हा त्यांचा आवडता शब्द प्रयत्नाबद्दल तर बोलूच नका. स्वतः त्यांनी एक क्षणही वाया दवडला नाही. **रिकामा जाऊ नेदी एकही क्षण** हे तत्त्व सतत आचरणात आणले.

आधी केले मग सांगितले हा बाणा ते स्वतः त्याचप्रमाणे वागले आहेत. या राष्ट्रपुरुषाची साहित्यसंपदा प्रचंड आहे. त्यांनी आपला उपदेश २६३५० ओव्यातून केला आहे आणि विशेष म्हणजे त्यात एकही गोष्ट अशी लिहिली नाही जी स्वतः आचरली नाही / अनुभवली नाही.

'यत्न तो देव जाणावा' किंवा 'अचुक यत्न करवेना' अशा ओळींमधून त्यांनी प्रयत्नांचे महत्त्व सतत सांगितले आहे, ते म्हणतात प्रयत्न करणारा भाग्यशाली व सुखी बनतो तसा प्रत्यय न आल्यास आपले प्रयत्न कमी पडले किंवा योग्य दिशेने झाले नाहीत असे समजावे. प्रयत्न म्हणजेच देव हे त्यांचे तत्त्व असल्याने लोकांनी प्रारब्धावर विसंबून राहू नये यासाठीं त्यांनी **रेखा तितुकी पुसून जाते.** म्हणजे सर्व रेषा आपण पुसू शकतो. मग प्रयत्नांनी प्रारब्धाची रेषाही पुसणे शक्य आहे हे पटवून दिले. मुखे बोलिल्यासारिखे चालताहे (म.श्लो.१८२) हे सांगून विचार, उच्चार, आचार यांच्यात एकवाक्यता हवी हे आग्रहाने सांगितले.

राजकीय स्वातंत्र्याशिवाय समाज, समृद्ध, सुरक्षित, सुखी होणार नाही. परकीयांच्या भीतीने आपली दैवते पाण्यांत बुडवणारे, लपूनछपून धार्मिक विधी करणारे, लाचार जीवन पाहून त्यांना चीड येई. म्हणूनच त्यांनी सांगितले. **केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पहिजे । तसेच ''मनी धरावे ते होते । विघ्न अवघेचि नासून जाते ।'' तसेच देव मस्तकी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा** अशा त्यांच्या वचनांनी लोकांना आत्मविश्वास दिला.

अगदी सामान्य माणसाच्या पातळीवर येऊन त्याला त्याच्या कुवतीनुसार उपदेश करीत. कारण दूरदृष्टी ठेवून लोकांना तयार करण्याचे कौशल्य त्यांच्याजवळ होते. म्हणूनच -

मुलाच्या चालीने चालावे । मुलाच्या बोलीने बोलावे । असे ते म्हणत.

जशास तसे हे त्यांचे मत व्यवहारवाद शिकवते. धंदादेखील हुषारीने करावा हे व्यावहारिक सल्ला ते देतात. एकतर्फी चांगुलपणा व क्षमाशीलता हे परमार्थात गुण समजले जातात पण प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र ती लाचारी ठरते. शत्रूला क्षमा करून सोडून देणे कसे घातक ठरते त्याची साक्ष इतिहास आपल्याला देतो. एक दोन वेळा नव्हे तर अनेकदा ज्याने आपल्याला जीवनदान दिले तो पृथ्वीराज चव्हाण हाती लागताच महंमद घोरीने त्याला ठार केले.

राजकारणांत गुप्ततेला खूप महत्त्व आहे. **राजकारण बहुत करावे । परंतु कळोच नेदावे ।** असे म्हणूनच सांगतात. शिवरायांसारखा राजा मिळाला. राजाने त्यांना सद्गुरुंचा सन्मान दिला. अनेक कठिण प्रसंगात राजेंना समर्थांनी योग्य सल्ला दिला आणि मदतही केली.

खरे तर समर्थांचा मूळ पिंड वैराग्याचाच पण ज्ञानी माणूस जर समाजाकडे दूर्लक्ष करून एकांतात निघून गेला तर ते योग्य होणार नाही म्हणून **संसार त्याग न करता । प्रपंचउपाधी न सांडता । जनामधें सार्थकता । विचारेंचि होय ।** हे लोकांना सांगितले. हरीकथानिरुपण, राजकारण, सावधपणा आणि साक्षेप ही समर्थांची चतुःसूत्री होती. सावधपणासाठी त्यांनी दिलेले उदाहरण - **पर्णाळि पाहोन चाले / जीवसृष्टी विवेके चाले माणसाने** तर किती सावध असायला हवे हेच दर्शविते ना !

समर्थांच्या दासबोधासारखा जीवनाला मार्गदर्शक ग्रंथ दुसरा नाही. त्यात काय नाही? दैनंदिन जीवनात कसे वागावे, आपली दिनचर्या कशी असावी, व्यवहार नेकीने पण फायद्याचा कसा करावा इथपासून तर समाजकारण, राजकारण, धर्मकारण सर्वच आहे. अक्षर कसे असावे इथपासून तर बांधकाम व त्यासाठी लागणारे साहित्य कसे असावे इथपर्यंत सर्व काही आहे. योगविवरण आहे तर गायनादि कलांविषयीही आहे, वक्ता कसा असावा, श्रोता कसा असावा, शिष्य कसा असावा आणि नसावा, गुरु कसा असावा व कसा नसावा, नेटका प्रपंच म्हणजे काय अशा अनेक गोष्टी यात आहेत. भक्ती, ज्ञान, वैराग्य सर्व आहे. सर्वच सांगायचे म्हटले तर एकादे पुस्तकच तयार होईल. दासबोधातील उपदेश म्हणजे प्रचीतीचे बोल आहेत.

मनाच्या २०५ श्लोकांना तर पर्यायच नाही. आबालवृद्ध सर्वांनाच ते प्रिय तसेच पूज्य आहेत. ते जसे घराघरांत पोचले आहेत तसेच आज त्यांनी रचलेल्या मारुती, गणपती, शंकर यांच्या आरत्या घरोघर रोज म्हटल्या जातात. त्यांचे भीमरुपीस्तोत्र तर सर्वांना तोडपाठ असते.

विवेकाचे फळ ते सुख हे सांगताना माणसाने कोणतेही कर्म करण्यापूर्वी विचार करावा हे सर्वांना सतत सांगितले. श्रेयस आणि प्रेयस यातून योग्य निवड विवेकानेच करणे शक्य आहे. माणसाने मरणाचे स्मरण ठेवावे हा मौलिक सल्ला त्यांनी दिला.

मुख्य ते हरिकथा निरुपण ही मूळ बैठक न सोडता त्यांनी समाजात प्रवृत्ति धर्माची जोपासना केली. कारण ती काळाची गरज होती. तत्कालीन संतांनी प्रपंचाची अशाश्वतता पटवून देऊन निवृत्तिपर मार्गाचा उपदेश केला. त्यामुळे समाज दुर्बल, निष्क्रिय झाला होता. अशा वेळी या युगपुरुषाने **संसार करावा नेटका** असा प्रवृत्तीपर उपदेश करून समाजात चैतन्य निर्माण केले. 'जय जय रघुवीर समर्थ' या घोषाने समाजाला खडबडून जागे केले. शिवाजीराजेंच्या राजकारणाला, यशाला उपयोगी पडणारे राजकारण त्यांनी केले.

समर्थांविषयी सर्वांना प्रेम, आदर विश्वास वाटायचा.

संप्रदाय :

एखादी संस्था स्थापन करायची म्हटले तर तिचे हेतू, तिचे धोरण, तिचे नियम, तिची कार्यपद्धत वगैरे घटना तयार करावी लागते. समर्थांनी असे काहीही केल्याचा कुठेही उल्लेख नाही. याचा अर्थच असा की त्यांनी संप्रदाय स्थापन केला नाही तर तो आपोआपच स्थापन झाला. कारण त्यांनी उभ्या केलेल्या संघटनेचाच संप्रदाय झाला.

सर्वांचे इहलौकिक व पारलौकिक कल्याण करणारा हा संप्रदाय आहे. यात नेटका प्रपंच येतो, नेटक्या प्रपंचात राजकारण व व्यवहारवादही येतो. म्हणजेच ऐहिक कर्तव्ये म्हणूया तसेच पारलौकिक कर्तव्यात शुद्ध उपासना, विमलज्ञान व वैराग्य, गुरुपरंपरारक्षण व त्यातून आत्मोद्धार या गोष्टी येतात.

संसार सोडायचा नाही तर त्याची आसक्ती सोडायची आहे. संप्रदायाचे ब्रीद आहे. - **अवघेचि सुखी असावे तसेच परपीडेवरी नसावे अंतःकरण**

असा आगळावेगळा निष्काम कर्तव्यनिष्ठ राष्ट्रप्रेमी संप्रदाय आपल्याला क्वचितच आढळून येईल.

परोपकार म्हणजे पुण्य आणि परपीडा म्हणजे पाप अशी पापपुण्याची सोपी व्याख्या इथे केली आहे.

राष्ट्र जर आदर्श व्हायला हवे असेल तर कुटुंबव्यवस्था व शिक्षणव्यवस्था उत्तम असायली हवी. कारण मनाची व वृत्तीची जडणघडण सर्वात प्रथम तिथे होत असते. अर्थातच त्यासाठी सुसंकृत घर व आदर्श शिक्षकही हवेत.

साध्या साध्या गोष्टीतील समर्थांचे मार्गदर्शन आणि सर्वच विषयांवरील प्रभुत्व व सूक्ष्म निरिक्षण पाहून मन थक्क होते. असा राष्ट्रगुरु आज हवा आहे. कारण आजची सामाजिक परिस्थितीही काही फारशी समाधानकारक नाही. यातून बाहेर काढायला देशाला महंत हवे आहेत. माधवराव पेशव्यांसारखा सत्ताधारी हवा आहे. त्याचबरोबर रामशास्त्रयांसारखा निःस्पृह न्यायाधीशही हवा आहे.

समर्थांचा कर्मयोग असा चार सहा पानात लिहिण्याचा हा प्रयत्न म्हणजे **'गागर मे सागर'** भरण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे. काही थोडा भागच यात येऊ शकला आहे. तोही समर्थांच्या कृपेनेच.

खरोखर समर्थांच्या ऋणातून आपण कधीही मुक्त होऊ शकणार नाही आणि नकोच व्हायला ! त्यांच्या ऋणांत राहणेच आपल्याला आवडेल.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

- सौ. प्रभा करंदीकर
पाटील पर्ल.बी. गोविंदनगर,
नाशिक - ४२२ ००९

• • •



परस्परसहकार्याने मंदिर उभे राहिले. साहजिकच लोकांना ते आपले वाटले. अंगापूरच्या डोहातून बाहेर काढलेली मूर्ती समर्थांनी बाहेर काढून मंदिरात स्थापन केली आणि तेथे रामाचा उत्सव सुरू केला. तत्कालीन परिस्थिती पाहता मंदिर उभे करणे व उत्सव सुरू करणे धाडसाचेच काम होते हे लक्षांत घ्यायला हवे.

ठिकठिकाणी उत्सवाच्या निमित्ताने लोक एकत्र येऊ लागले. त्यातून समर्थांनी कार्यकर्ते निवडले. भिक्षेच्या निमित्ताने हिंडताना काही लोक पारखून जवळ करीत. असे निवडलेले लोक एकत्र करून त्यांच्यावर समर्थांनी उत्तम संस्कार केले. त्यांच्यातून नेते तयार केले. हेच समर्थांचे महंत. समर्थ हे एक द्रष्टे राजकारणी संत होते. समाजाचे सुख व राष्ट्राची उन्नती यांचा मूळ पाया व्यक्ती. व्यक्ति -कुटुंब-समाज-नगर-प्रांत- देश असा आराखडा त्यांच्या नजरेसमोर होता. त्यामुळे व्यक्ती ताकदीची, सदाचरणी, स्वाभिमानी असायला हवी आणि त्यासाठी बलसंवर्धन, शारीरिक व मानसिक नैतिक बळ आवश्यक होते. ईश्वरी अधिष्ठानावर व्यक्तिचा विश्वास हवा. कारण धर्म व राजनीती यांचे अतूट नाते असते. अन्याय करणाऱ्याला प्रतिकार करायचा तर मनगटांत ताकद हवी मनी धैर्य हवे. मग बलसंवर्धनाला प्रथम क्रमांक दिला गेला आणि ठिकठिकाणी शक्ती व बुध्दिची देवता जी मारुती - त्याची मंदिरे स्थापून गावांतील तरुणांसाठी आखाडे सुरू केले. तरुणांना व्यायामाची सवय लावली. असे कित्येक सशक्त तरुण तयार केले. त्यांच्यावर देशप्रेमाचे संस्कार केले. त्यांना शिवाजीराजेकडे पाठवले. असे जीवाला जीव देणारे अनेक तरुण राजांच्या पाठीशी उभे राहिले.

महंत (नेते) तयार करताना महंतांसाठी त्यांनी तयार केलेली आचारसंहिता पहिली तर कोणत्याही राष्ट्राने नेता कसा असावा याचा धडा त्यावरून घ्यावा. अशा नियमांना काळाचे बंधन नसते. सर्व मठ व महंत यांच्यावर त्यांचे कठोर अनुशासन होते. त्यांनी महंतांसाठी केलेल्या नियमांपैकी काही खालीलप्रमाणे :-

१. महंत अत्यंत निःस्पृह असावा.

२. महंताचे लेखन, वाचन, पाठांतर प्रथम दर्जाचे असावे.

३. आत्मज्ञानाचा विचार, जरूर तेवढे राजकारण, चार लोकांत वागण्याची सवय व समज त्याला असावी.

४. ग्रंथाचा प्रथम स्वतः सखोल अभ्यास केल्यानंतरच तो इतरांना शिकवावा.

५. जे सांगायचे ते योग्य शब्दात व योग्य वेळी सांगता यावे.

६. सर्वांचे समाधान कसे राखावे हे महंताला समजले पाहिजे.

७. सगळीकडे आधीपासून पूर्ण लक्ष असल्याने पुढे घडणाऱ्या घटना कशा घडतील याचा त्याला अंदाज असायला हवा.

८. त्याच्या अंगी भक्ती, ज्ञान वैराग्य असावे.

९. कोणत्याही संकटाला तोंड देण्याची हिंमत व धैर्य त्याच्यात असावे.

१०. अत्यंत प्रयत्नवादी तर असावेच, सतत लोककल्याणासाठी झटावे, पण मानसन्मानाची अपेक्षा नसावी. अशा सत्काराची वेळ आलीच तर लोकांना सापडू नये इतका तो दूर असावा.

११. न्याय व नीतीचा रक्षणकर्ता असावा. त्यासाठी त्याचे शरीरबल व मनोबल उत्तम असावे.

१२. त्याचे विचार, आचार, उच्चार यात एकवाक्यता असावी. त्याने लोकसंग्रह करावा व प्रत्येकाचा अधिकार ओळखून त्याप्रमाणे त्याला काम द्यावे.

१३. स्वतः प्रचिती घेतल्याशिवाय कशावरही विश्वास ठेवू नये.

१४. महंताजवळ सहनशीलता, वाणीची मधुरता, असायलाच हवी.

प्रत्येक नेत्याने ही आचारसंहिता अमलांत आणली तर देश वैभवाला चढायला उशीर लागणार नाही. पण आज नेत्याच्या अंगी गुणांपेक्षा दोषच अधिक दिसून येतात. नेत्याने प्रथम स्वतःला सुधारावे आणि मगच इतरांना सुधारण्याचा प्रयत्न करावा. कारण जो पोहोणे जाणतो तोच बुडत्याला वाचवू शकतो.

समर्थांनी प्रचिती, प्रबोध व प्रयत्न या तत्त्वांना खूपच महत्त्वाचे मानले. अनुभव घेतल्याशिवाय माणसाचे बोलणे व्यर्थं होय क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे. (म.श्लो.१८२) असे ते म्हणत. रोकडी प्रचिती हा त्यांचा आवडता शब्द प्रयत्नाबद्दल तर बोलूच नका. स्वतः त्यांनी एक क्षणही वाया दवडला नाही. रिकामा जाऊ नेदी एकही क्षण हे तत्त्व सतत आचरणात आणले.

आधी केले मग सांगितले हा बाणा ते स्वतः त्याचप्रमाणे वागले आहेत. या राष्ट्रपुरुषाची साहित्यसंपदा प्रचंड आहे. त्यांनी आपला उपदेश २६३५० ओव्यातून केला आहे आणि विशेष म्हणजे त्यात एकही गोष्ट अशी लिहिली नाही जी स्वतः आचरली नाही / अनुभवली नाही.

'यत्न तो देव जाणावा' किंवा 'अचुक यत्न करवेना' अशा ओळींमधून त्यांनी प्रयत्नांचे महत्त्व सतत सांगितले आहे, ते म्हणतात प्रयत्न करणारा भाग्यशाली व सुखी बनतो तसा प्रत्यय न आल्यास आपले प्रयत्न कमी पडले किंवा योग्य दिशेने झाले नाहीत असे समजावे. प्रयत्न म्हणजेच देव हे त्यांचे तत्त्व असल्याने लोकांनी प्रारब्धावर विसंबून राहू नये यासाठी त्यांनी रेखा तितुकी पुसून जाते. म्हणजे सर्व रेषा आपण पुसू शकतो. मग प्रयत्नांनी प्रारब्धाची रेषाही पुसणे शक्य आहे हे पटवून दिले. मुखे बोलिल्यासारिखे चालताहे (म.श्लो.१८२) हे सांगून विचार, उच्चार, आचार यांच्यात एकवाक्यता हवी हे आग्रहाने सांगितले.

राजकीय स्वातंत्र्याशिवाय समाज, समृद्ध, सुरक्षित, सुखी होणार नाही. परकीयांच्या भीतीने आपली दैवते पाण्यांत बुडवणारे, लपूनछपून धार्मिक विधी करणारे, लाचार जीवन पाहून त्यांना चीड येई. म्हणूनच त्यांनी सांगितले. केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पहिजे । तसेच "मनी धरावे ते होते । विघ्न अवघेचि नासून जाते ।" तसेच देव मस्तकी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा अशा त्यांच्या वचनांनी लोकांना आत्मविश्वास दिला.

अगदी सामान्य माणसाच्या पातळीवर येऊन त्याला त्याच्या कुवतीनुसार उपदेश करीत. कारण दूरदृष्टी ठेवून लोकांना तयार करण्याचे कौशल्य त्यांच्याजवळ होते. म्हणूनच -

मुलाच्या चालीने चालावे । मुलाच्या बोलीने बोलावे । असे ते म्हणत.

जशास तसे हे त्यांचे मत व्यवहारवाद शिकवते. धंदादेखील हुषारीने करावा हे व्यावहारिक सल्ला ते देतात. एकतर्फी चांगुलपणा व क्षमाशीलता हे परमार्थात गुण समजले जातात पण प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र ती लाचारी ठरते. शत्रूला क्षमा करून सोडून देणे कसे घातक ठरते त्याची साक्ष इतिहास आपल्याला देतो. एक दोन वेळा नव्हे तर अनेकदा ज्याने आपल्याला जीवनदान दिले तो पृथ्वीराज चव्हाण हाती लागताच महंमद घोरीने त्याला ठार केले.

राजकारणांत गुप्ततेला खूप महत्त्व आहे. राजकारण बहुत करावे । परंतु कळोच नेदावे । असे म्हणूनच सांगतात. शिवरायांसारखा राजा मिळाला. राजाने त्यांना सद्गुरुंचा सन्मान दिला. अनेक कठिण प्रसंगात राजेंना समर्थांनी योग्य सल्ला दिला आणि मदतही केली.

समर्थस्थापित अकरा मारुती

- डॉ. सुमती देशपांडे



प्रस्तावना :-

समर्थ रामदासस्वामींचे हनुमंताशी अतुट नाते आहे. समर्थ हे जरी रामभक्त असले तरी त्यांचे आणि हनुमंताचे नाते अधिक जिव्हाळ्याचे होते. समर्थ म्हणतात -

हनुमंत आमुची कुळवल्ली । राममंडपा वेला गेली ।
श्रीरामभक्तीने फळली । रामदास बोले या नावे ।
आमुचे कुळी हनुमंत । हनुमंत आमचे मुख्य दैवत ।
तयावीण आमुचा परमार्थ । सिद्धीतें न पवे सर्वस्था ।

समर्थांचे हनुमंतप्रेम हे त्यांनी रामाची मंदिरे जेवढी उभी केली त्यापेक्षाही जास्त हनुमंताची मंदिरे गावोगावी उभी केली यातूनच दिसते. 'गाव तेथे मारुती' हे समर्थांच्या कार्याचे सूत्र होते. त्यांनी सुमारे १००० हून अधिक मारुती मंदिरे उभी केली. या सर्व हनुमंताचे रूप 'वीर मारुतीचे' आहे. फक्त रामाच्यांसमोर मारुतीचे रूप 'दास मारुती'चे आहे. प्रत्येक मूर्तीत हनुमंताने पायाखाली राक्षस चिरडला आहे. उजवा हात तडाखा देण्यासाठी वर उचलला आहे. पुच्छ उजवीकडून डावीकडे वळविलेले आहे. समर्थांच्या काळातील समाज हा मुसलमानी राजसत्तेचा असून अनन्वित अत्याचार निमूटपणे सहन करीत होता. समर्थांनी या समाजात वीररस निर्माण करण्यासाठी 'हनुमंत' या दैवताची निवड केली. जागोजागी निर्माण केलेली हनुमंताची मंदिरे म्हणजे तरुणांसाठी व्यायामशाळा होत्या. मारुतीच्या उपासनेमुळे समाजामध्ये एक प्रकारचे नवचैतन्य निर्माण करायचे होते. हनुमंत म्हणजे शक्ती, बुद्धी आणि सेवा या तिन्हीचे घनीभूत रूप ! राजे शिवछत्रपतींच्या मावळ्यांच्या अंगी हनुमंताचे बळ संचारावे म्हणून हा खटाटोप होता. बलोपासनेची प्रेरणा मरगळलेल्या महाराष्ट्राला मिळणे आवश्यक होती. संघटना आणि शक्तीसंवर्धन यांचे मूर्तिमंत प्रतीक असलेली मारुती मंदिरे समाजात ओज, अस्मिता, अभिनिवेश, अभंग आणि अखंड निर्माण करेल याबद्दल विश्वास होता. समर्थांमी शेकडो मारुती मंदिरे स्थापन केली असताना 'अकरा मारुती' ना विशेष महत्त्व का आहे या कोड्याचा अर्थ मात्र समर्थ वाङ्मयात कोठेच आढळत नाही. परंतु समर्थांच्या गुप्त राजकारणाचे हे 'अकरा मारुती' साक्षीदार असावेत म्हणून त्यांचे वेगळेपण अज्ञात राहिले असावे. इ.स.१६७४ मध्ये शिवाजीमहाराजांना राज्याभिषेक झाला. तेव्हा समर्थांनी रचलेल्या 'आनंदवनभुवनी' या काव्यात एका कडव्यात अकरा मारुतींशी संबंधीत असा उल्लेख आलेला आढळतो.

अकरा अकरा बहु अकरा । काय अकरा कळेचिना ।
गुप्त ते गुप्त जाणावे । आनंदवनभुवनीं ॥

परंतु यावरूनही फारसा बोध होत नाही. इ.स.१६४५ मध्ये भारत प्रवास संपल्यानंतर समर्थांचे शहाजीराजांच्या जहागिरीत आगमन होणे, त्याच वर्षी शिवाजीमहाराजांचे तोरणा व राजगड किल्ले घेणे, शहाजीराजांच्या जहागिरीतच असलेल्या गावांमध्ये समर्थांनी अकरा मारुतींची स्थापना करणे, या सर्वांचा समर्थांच्या राजकीय जीवनाशी संबंध असावा असे वाटते. समर्थांचे राजकीय जीवन सुरू झाले त्या वेळी वरील सर्व घटनांचा घनिष्ठ संबंध असवा म्हणूनच सांकेतिक भाषेत 'आनंदवनभुवनी' मधील खालील ओळीत उल्लेख केलेला असावा.

''राजकारण बहुत करावे । पण कळोचि नेदावे ॥''

या राजकीय तत्त्वानुसार अकरा मारुतींचे तेव्हाचे राजकीय कार्य आजतरी अज्ञातच आहे.

खरे तर समर्थ स्वतःच हनुमंताचे अवतार होते. रामाचे अनन्य भक्त होते. प्रभूरामचंद्रानी समर्थांना हनुमंताच्या सुपूर्त केले होते. हनुमंत म्हणजे समर्थांचे काळजीवाहू सरकार होते. समर्थ स्थापित अकरा मारुतींपैकी सातारा जिल्ह्यात ७ मारुती, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यात प्रत्येकी २/२ मारुती स्थापन केले. शिवाजीमहाराजांनी इ.स. १६७८ साली या अकरा मारुतीमंदिरांना प्रत्येकी अकरा एकर जमीन इनाम दिली आहे. समर्थांनी मारुतीची अकरा स्तोत्रे रचली आहेत. त्यातील काही स्तोत्रांवरून ते स्तोत्र कोणत्या मारुतीचे आहे हे लक्षात येते. वेणाबाईच्या अभंगातही या अकरा मारुतींचा उल्लेख आहे.

चाफळामाजी दोन उंब्रजेसी येक ।
पारगावी देख चौथा तो हा ॥
पाचवा मसुरी शहापुरी सहावा ।
जाण तो सातवा शिराळ्यात ॥
सिंगणवाणी आठवा मनपाडळे नववा ।
दहावा जाणावा माजगावी ॥
बाह्यात अकरावा येणे रीती गावा ।
सर्व मनोरथा पुरवील ।
वेणी म्हणे स्वामी समर्थ रामदास ।
कीर्ती गगनांत न समावे ॥

गिरीधरस्वामीनीही 'समर्थ प्रतापात' अकरा मारुतींचा उल्लेख केलेला आहे.

बाहेग्रामी शक्तिग्रामीं । मसुरग्रामीं पूर्वग्रामी ॥
उंबरग्रामीं शृंग ग्रामीं । हनुमान स्थापिलें समर्थें ॥
बाहेग्रामी उपग्रामी स्थान । मानस ग्रामीं पारग्रामीं हनुमान ।
अधिष्ठानी महारुद्र मुख्यप्राणनाथ निधान ।
पूर्वपश्चिमे स्थापिलें समर्थे ॥

शृंगग्राम म्हणजे शिंगणवाडी, पूर्वग्राम म्हणजे शहापूर, उंबरग्राम म्हणजे

उंब्रज, मानसग्राम म्हणजे मन पाडळे, पारग्राम म्हणजे पारगाव, अधिष्ठानी म्हणजे चाफळला आणि पूर्व पश्चिम म्हणजे चाफळचा वीर मारुती आणि दास मारुती !

महाबळेश्वरच्या अनंत कवींनी या अकरा मारुतींचा उल्लेख असा केलेला आहे;

'जेणे रुद्र दहा मनोहरजगीं येकागळे स्थापिले।
प्रत्येकी अकरा बिघे नृपतिच्या मुद्रांकिती अर्पिले ।।
त्या त्या नागरिका जना नवविधा भक्तीसी लपीतसे ।
ऐसा सद्गुरु जो अनंत कवीचा बध्दासी तारीतसे ।।

येकागळे म्हणजे हे अकरा मारुती वेगळे आहेत असे अनंत कवीही म्हणतात. मात्र हे वेगळेपण काय आहे. हे गिरीधर, अनंत कवी किंवा वेणुस्वामी या तिघांनीही सांगितलेली नाही. हे सर्व मारुती शिव-समर्थांच्या भेटी आणि गुप्त राजकारण यासाठी महत्त्वाचे आहेत. असे वाटते. राजकारणात गुप्तता पाळवयाची असते म्हणून या स्थानांचे रहस्य शेवटपर्यंत अनाकलनीयच राहिले आहे. या मंदिरांची व्यवस्था ज्या ज्या व्यक्तींकडे आहे, त्यांनाही या संबंधीचा तपशिल माहीत नाही.

समर्थांची मारुती स्थापना - प्रेरणा व स्वरूप -

संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम आणि समर्थ रामदास हे संत म्हणजे मराठी परंपरेच्या पंच गंगाच मानल्या जातात. समर्थांच्या जन्मापूर्वी काही शतकांपासून मुसलमानी राज्यसत्ता स्थिरावली होती. ती सत्ता जुलमी, अन्यायी, अत्याचार करणारी होती. हिंदूंच्या वाट्याला दुःख, दारिद्र्य, लाचारी, उद्वेग, अशाश्वती येत होती. त्यामुळे 'संसार असार आहे' 'देव ठेवीले तैसे राहावे' अशी शिकवण देऊ न भक्तीमार्गाद्वारे मानसिक समाधान मिळविण्याचा मार्ग संत दाखवित होते. समर्थांनी भारतभर पायी भ्रमण करून सर्व तीर्थक्षेत्रांना भेट दिली. त्यामुळे तत्कालीन समाजदर्शन त्यांनी घेतले. सर्वत्र हिंदूंची दैन्यावस्था त्यांना दिसली. त्यांनी सामर्थ्यसंपन्न 'राम' कोदंडधारी 'राम' रामराज्य प्रदान करणारा 'राम' हे दैवत मानून त्याची भक्ती करण्याकडे हिंदूचे मन वळवून त्यांची सद्यःस्थितीतून सुटका होईल असा विचार केला. रामभक्ती आणि हनुमानभक्ती यांच्या योगाने स्वतःचा उद्धार करून घ्यावा हा प्रधान हेतू होता. देशभर तीर्थाटन करून आल्यावर आपल्या ओजस्वी वाणीचा, आपल्या ज्ञानाचा आपल्या अनुभवाचा आपल्याला प्राप्त झालेल्या सिद्धीचा उपयोग हिंदू जनतेची मने रामभक्तीकडे वळवून तिला तिच्या दुःखातून बाहेर काढावे, हा उद्देश होता. या बरोबरच रामाचा संदेश पोहोचविणारा सर्वश्रेष्ठ दास जो मारुती, त्याच्या ठिकाणी असलेल्या बलाची उपासनाही लोकांना शिकवावी असेही समर्थ रामदासांनी ठरविले. मारुतीच्या उपासनेला लावून धैर्य, वीर्य आणि बलसंपादनाची ईर्षा लोकांमध्ये निर्माण केली. उत्तर भारतातही मारुती मंदिरे स्थापन केली उदा. हनुमंतघाटावरील हनुमान मंदिर, तेलंगणातील हनुमानाचे मंदिर, दक्षिणेकडील रामेश्वराच्या सेतुबंधाजवळील हनुमान मंदिर प्रसिद्ध आहेत.

समर्थांनी स्थापन केलेल्या मारुतीच्या मूर्तीची खूण म्हणजे रामापुढे मारुतीराय असले की ते हात जोडून उभे असणार, एकटे असले की त्यांचा उजवा हात प्रहार करण्यासाठी उगारलेला; पायाखाली राक्षस तुडविलेला असणार ! पुच्छ उजवीकडून डावीकडे डोक्यावरून डावीकडे वळविलेले असणार ! सर्व साधारणपणे या मारुतींची स्थापना शके १५६६ ते १५७६ (इ.स.१६४४ ते १६५४) या काळात झालेली दिसते. पण याबद्दल मतभेद आहेत. पण शहापूरचा मारुती हा 'अकरा मारुतीत' पहिला आहे याबद्दल मात्र मतभेद नाहीत. वास्तविक समर्थांनी सर्वांत प्रथम स्थापन केलेली मारुतीची मूर्ती गोदावरीच्या तीरावरील टाकळी येथील गोमयाची मूर्ती ही आहे. तीर्थाटनाला जाण्यापूर्वी त्यांनी ती आपला शिष्य 'उध्दव' याला उपासनेसाठी दिली, पण या मूर्तीचा समावेश 'अकरा मारुतीत' नाही. तसेच सज्जनगड येथील मारुती, शिवथरघळीतील मारुती, मिरज, महाबळेश्वर, वाई, तंजावर, टेंभू शिरगाव येथील मारुती अकरा मारुतीत समाविष्ट नाहीत. याचे कारण मात्र कोठेच सापडत नाही. एक मात्र गोष्ट खरी की ज्या अकरा मारुतींना विशेष महत्त्व दिलेले आहे, ते सर्व मारुती कृष्णानदीच्या परीसरातील आहेत. या अकरा मारुतींची मंदिरे जागृत देवस्थाने आहेत, असे मानले जाते. या अकरा मारुतींना 'वारीचे मारुती' असेही म्हणतात.

अकरा मारुतींची व्यवस्थापना -

शिवाजी महाराजांनी समर्थांच्या विनंतीवरून या मारुतींच्या योगक्षेमासाठी प्रत्येकी अकरा बिघे जमिनीचे वतन लावून दिले. चाफळ येथील मुख्य राम मंदिराकडे यांच्या व्यवस्थापनेची जबाबदारी दिलेली आहे. परंतु या व्यवस्थापनेत सुसूत्रता आढळत नाही. काही मारुती मंदिरांचा जीर्णोद्धार झालेला दिसत नाही. दैनंदिन पूजाअर्चा योग्य पद्धतीने होत नसावी असे दिसते. काही ठिकाणी दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांची राहण्याची, जेवणाची सोय नाही. मात्र मारुती मंदिर असलेल्या गावात एस्.टी.ने अथवा खाजगी वाहनाने जाण्यासाठी रस्ते केलेले आहेत. आज अनेक ट्रॅव्हल्स कंपन्या किंवा खाजगी वाहनाने 'अकरा मारुती दर्शन घडवून आणतात.

समर्थ स्थापित अकरा मारुती -

१. शहापूरचा मारुती - शहापूरचा मारुती हा कालानुक्रमे पहिला मारुती समजला जातो. याची स्थापना शके १५६६ (इ.स.१६४४) मध्ये केली गेली. कऱ्हाड, मसूर रस्त्यावर - शहापूरचा फाटा आहे. शहापूर गावाच्या एका टोकाला नदी तीरावर येथील मारुती मंदिर आहे. ही मारुतीची मूर्ती चुन्याची बनविलेली आहे असे म्हणतात. या मूर्तीची उंची ६ फूट आहे. या मारुतीला 'शहापूरचा चुन्याचा मारुती' असे म्हणतात. या मूर्तीचा चेहरा थोडा उग्र वाटतो. याच्या डोक्याला गोंड्याची टोपी आहे. मंदिर आणि मूर्ती पूर्वाभिमुख आहे. येथे चैत्रशुद्ध पौर्णिमेला हनुमान जयंतीचा उत्सव साजरा केला जातो. या देवळात मारुतीची एक लहान पितळी मूर्ती आहे. ती चाफळ येथील रामनवमीच्या उत्सवात नेली जाते. आदिलशाहीत 'शहापूर' हे गाव होते. तेथे बाजीपंत कुलकर्णी व त्यांची पत्नी सतीबाई राहात होते. समर्थ रोज त्यांच्याकडे भिक्षेला जात असत. सतीबाईंना ते आवडत नसे. त्या समर्थांना 'गोसावडा' म्हणून हिणवीत असत. एकदा बाजीपंत कुलकर्णींना पैशाच्या हिशोबासंदर्भात पकडून विजापूरला नेले. त्या वेळी समर्थांनी सतीबाईंना शब्द दिला की, 'पाच दिवसात बाजीपंतांना सोडवून आणतो, पण तुम्ही रामनामाचा जप केला पाहिजे.' समर्थांनी सांगितल्याप्रमाणे बाजीपंतांची सुटका झाली. त्यामुळे भारावून गेलेल्या सतीबाई समर्थांचे दर्शन घेतल्याशिवाय अन्न ग्रहण करीत नसत. त्यांच्यासाठी समर्थांनी मारुतीरायाची स्थापना केली आणि सांगितले, 'या मूर्तीचे रोज दर्शन घ्या आणि भोजन करा।' तोच हा शहापूरचा मारुती!

२. मसूरचा मारुती - मसूर येथील ब्रह्मपुरी भागात शके १५६७ (इ.स.१६४५) मध्ये मारुतीची स्थापना केली. याला 'महारुद्र हनुमान' असेही म्हणतात. शहापूरपासून दोन किलोमीटर अंतरावर 'मसूर' गाव आहे. ही मारुतीची मूर्ती सुद्धा चुन्याची आहे. ती पाच फूट उंच आहे. मूर्ती पूर्वाभिमुख आहे. अकरा मारुतींमध्ये सर्वांत देखणी मूर्ती आहे. मूर्ती सुंदर रंगविलेली आहे. मूर्तीची मुद्रा सौम्य, प्रसन्न आहे. डोक्यावर सुरेख मुकुट आहे. गळ्यातील माळ, हार, जानवे, कटि-मेखला, लंगोटाचे काठ, हाताची बोटे, ही सर्व बारकाईने

रंगविलेली आहेत. मूर्तीच्या डाव्या-उजव्या हाताला शिवाजी महाराज व समर्थ रामदास यांची चित्रे काढलेली आहेत. गाभाऱ्याच्या एका भिंतीवर गाभाऱ्याचेच रंगीत चित्र आहे. देवळाचा सभामंडप १३ चौरस फूट आहे. सहा दगडी खांबांवर आधारलेले छत आहे. देवळाची मालकी श्रीराम मंदिर चाफळ आणि श्रीसमर्थ सेवामंडळ सज्जनगड ह्या दोन संस्थांची आहे. येथेच समर्थांना 'कल्याण' या शिष्याची प्राप्ती झाली. चैत्र शुद्ध पौर्णिमेला येथे हनुमान जयंतीचा उत्सव होतो.

३. चाफळचा दासमारुती – समर्थांनी चाफळला श्रीरामाचे मंदिर शके १५६९ (इ.स.१६४७) मध्ये आपले शिष्य व गावकरी यांच्या मदतीने बांधले. प्रभु रामाचंद्राच्या दृष्टान्ताप्रमाणे अंगापूरच्या डोहात रामाची मूर्ती समर्थांना मिळाली व या देवळात तिची प्रतिष्ठापना केली. मारुतीच्याही दृष्टान्तानुसार या राम मंदिरासमोर हात जोडून उभ्या असलेल्या 'दास मारुती' ची स्थापना शके १५७० (इ.स.१६४८) मध्ये केली. श्रीरामाच्या समोर दोन्ही हात जोडून नम्र अशी हनुमंताची मूर्ती उभी आहे. ही मूर्ती ६ फूट उंच आहे. चेहऱ्यावर अत्यंत विनम्र भाव आणि दृष्टी श्रीरामाच्या चरणांवर आहे. तिचे अवयव अत्यंत रेखीव प्रमाणबद्ध आहेत.

४. चाफळचा प्रतापमारुती – चाफळ येथील राम मंदिरामागे सुमारे तिनशे फूट अंतरावर प्रताप मारुतीचे मंदिर आहे. या मारुतीला 'भीम मारुती' प्रताप मारुती किंवा 'वीर मारुती' अशी नावे आहेत. या मंदिराला ५० फूट उंच शिखर आहे. या मारुतीची मूर्ती आठ फूट उंच आहे. मूर्ती अत्यंत भव्य, उंच व रेखीव आहे. या मूर्तीचे 'पूच्छ माथा मुरडिले' आहे. मस्तकावर मुकुट, कानात कुंडले आहेत. कटीभोवती सुवर्णाची कासोटी व तिला घंटा आहेत. ही मूर्ती नेटकी, सडपातळ व तेजस्वी आहे.

५. शिंगणवाडीचा मारुती – चाफळपासून जवळच असलेल्या शिंगणवाडीच्या टेकडीवर मारुतीची स्थापना शके १५७१ (इ.स.१६४९)मध्ये केली. चाफळ येथे मुख्य मठ स्थापन करण्यापूर्वी समर्थांचा मठ येथे होता. शिवाजीमहाराज व समर्थ रामदास यांची भेट या मठाजवळ एका शेवरीच्या झाडाखाली झाली. येथून जवळच 'रामघळ' हे समर्थ चिंतनाला बसण्याचे ठिकाण आहे. तसेच येथे शिवाजी महाराजांना तहान लागली असताना समर्थांनी आपल्या कुबडीने दगड बाजूला सारून त्याच्याखाली जो झरा दाखविला तो 'कुबडीतीर्थ' म्हणून प्रसिद्ध आहे. या मारुतीला 'खडीचा मारुती' किंवा 'बाल मारुती' असे म्हणतात. ही साडेतीन फूट उंचीची मारुतीची मूर्ती असून ती उत्तरेकडे तोंड करून उभी आहे. मारुतीच्या डाव्या हातात त्रिशुळासारखी वस्तू आहे. बहुतेक ती भगवी ध्वजा असावी असे म्हणतात. दुसरा हात उगारलेला आहे. या मारुतीच्या देवळाला सभामंडप नाही. ६ फूट लांब रुंद असे देऊळ आहे. देवळाचा परिसर आल्हाददायक व पवित्र आहे. या टेकडीच्या पश्चिमेकडून एक ओढा वाहतो. अकरा मारुतीत हे सर्वांत लहान देऊळ आहे पण उंचावर आहे. चाफळच्याच जवळ हा मारुती असल्यामुळे याला चाफळचाच तिसरा मारुती समजतात. या देवळाचीही व्यवस्था चाफळच्या श्रीराम देवस्थानाकडूनच केली जाते.

६. उंब्रजचा मारुती – मसूरच्या पश्चिमेस चार मैलावर उंब्रज आहे. समर्थांनी शके १५७१ (इ.स.१६४९)मध्ये उंब्रज येथे मारुतीची स्थापना केली. उंब्रजमध्ये समर्थांना काही जमीन इनाम मिळाली होती. चाफळहून रोज समर्थ उंब्रज येथे कृष्णा नदीवर स्नानासाठी जात असत. तेथे रोज मारुतीची पूजा करीत. या मूर्तीच्या स्थापनेनंतर समर्थांनी सतत तेरा दिवस कीर्तन केले. या मारुतीचे देऊळ पूर्वाभिमुख आहे. हा मारुती अकरा मारुतीत वयाने सर्वांत लहान वाटतो. या मूर्तीला चांदीचे डोळे आहेत. उंची सहा फूट आहे. ही मूर्ती चुना, वाळू व ताग या पासून बनविलेली आहे. ह्या मारुतीला 'उंब्रजचा मारुती' किंवा 'मठातील मारुती' असे म्हणतात. काही आख्यायिकांनुसार हनुमानाचे पाऊल आणि खडकावर उमटलेला त्रयोदशाक्षरी मंत्र ह्या पुसटशा खूणा दिसतात. मात्र त्यावर वाळू वाहून गेलेली दिसते. त्यापैकी एक खूण रामकड्याखाली होती तर दुसरी खूण आद्य मठाधिपती केशवस्वामी यांच्या समाधी समोर होती. समर्थांच्या काळात उंब्रज मठाधिपती केशवस्वामी यांनी १८ वेळा दासबोध लिहून काढला होता. चैत्रशुद्ध पौर्णिमेला येथे हनुमान जयंतीचा उत्सव मोठ्या थाटाने साजरा करतात. येथे हनुमान जयंतीच्या आदल्या दिवशी 'सांप्रदायिक भिक्षेचा' कार्यक्रम होतो.

७. माजगावचा मारुती – चाफळहून उंब्रजकडे जाताना पूर्वेला दीड किलोमीटरवर माजगाव आहे. या गावच्या सीमेवर घोड्याच्या आकाराचा एक धोंडा होता. लोक त्यालाच 'ग्रामरक्षक मारुती' म्हणून पूजत असत. त्याच धोंड्यावर मारुतीची प्रतिमा शके १५७१ (इ.स.१६४८) मध्ये कोरुन घेऊन तिची उत्सवपूर्वक स्थापना केली. येथील मारुतीचे मंदिर श्रीधर स्वामींनी बांधलेले आहे असे म्हणतात. ही मूर्ती पाच फूट उंचीची असून ओबडधोबड आहे. या मूर्तीचे तोंड पश्चिमेला आहे. देवळाच्या बाहेरच्या भिंतीवर आकाशोड्डाण करणाऱ्या मारुतीचे चित्र काढलेले आहे. मंदिर कौलारू असून आठ चौरस फूट आहे. माती व विटांनी बांधलेले आहे. चाफळच्या श्रीरामदेवस्थानाकडेच याची व्यवस्था आहे. हा मारुती 'माजगावचा मारुती' या नावानेच ओळखला जातो.

८. बहे बोरगावचा मारुती – बहे येथील नदीच्या पात्रात एक बेट आहे. त्याचे नाव 'रामलिंग' असून या बेटावर एक प्राचीन राम मंदिर आहे. रामाच्या समोर 'शिवलींग' आहे. या राम मंदिराच्या मागे समर्थांनी या मूर्तीची स्थापना शके १५७३ (इ.स.१६५१) मध्ये केली. या मूर्तीचे हात कृष्णेचा प्रवाह अडविण्यासाठी मांड्यांच्या दोन्ही बाजूस धरलेले आहेत. डोक्यावर उंच मुकुट आहे. मूर्ती रंगीत व भव्य आहे. येथील आख्यायिकेनुसार श्रीरामांनी एकदा कृष्णेच्या प्रवाहात स्नान करून शिवलिंगाच्या पूजेला प्रारंभ केला असताना कृष्णेला पूर येऊन तिचे पाणी वाढू लागले. मारुतीरायाने रामाच्या मागे उभे राहून आपल्या दोन्ही हातांनी कृष्णेचा प्रवाह अडविला. येथे बेट तयार झाले व डोहही तयार झाला. या डोहातून समर्थांनी मारुतीची मूर्ती बाहेर काढली. पण काही कारणांनी मारुतीराय पुन्हा डोहात गुप्त झाले. समर्थांनी त्या मूर्तीचे रूप आठवून दुसरी मूर्ती तयार केली व तिची स्थापना केली. समर्थांनी एक सर्व स्तोत्रातील सर्वांत मोठे 'भीमरूपी स्तोत्र' येथेच रचले. या ठिकाणचा उल्लेख 'बाहुक्षेत्र' असा केलेला आहे.

९. मनपाडळेचा मारुती – कोल्हापूरला जवळ असलेले ज्योतिबाचा डोंगर व पन्हाळगड येथून जवळ असलेले दक्षिणेकडचे हे मारुती मंदिर आहे. या मारुतीची स्थापना शके १५७३ (इ.स.१६५१) मध्ये केली आहे. ही मारुतीची मूर्ती साडेपाच फूट उंच असून मूर्ती साधी व सुबक आहे. या मूर्तीजवळ दीड फूट उंचीची कुबडी आहे. येथील मुख्य उत्सव दासनवमीचा असतो. मंदिर व मूर्ती उत्तराभिमुख आहे. मंदिर कौलारू असून मंदिराचा गाभारा ७ x ६ फूट असून त्याच्या सभोवताली २६ x १५ फूट असा सभामंडप आहे हे मंदिर नदीच्या काठावर आहे.

१०. पारगावचा मारुती – मनपाडळेपासून पारगाव हे देवस्थान पाच मैलावर आहे. नवे पारगाव व जुने पारगाव अशी दोन गावे आहेत. कऱ्हाड, कोल्हापूर रस्त्यावर वारणा साखर कारखान्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर नवे पारगाव आहे. त्याच्या उत्तरेस दोन मैलावर जुने पारगाव आहे. पारगावचा मारुती हा जुन्या पारगावचा मारुती आहे. हाच समर्थ स्थापित मारुती आहे. या मूर्तीची स्थापना

शके १५७४ (इ.स.१६५२) मध्ये झाली असावी असे मानले जाते. समर्थ स्थापित अकरा मारुतीतला हा मारुती 'शेवटचा मारुती' असे मानले जाते. ह्या अकरा मारुतींपैकी ही सर्वात लहान मूर्ती आहे. या मूर्तीची उंची दीड फूट आहे. ही मूर्ती एका सपाट दगडावर कोरलेली आहे. या मारुतीने केसांची शेंडी बांधलेली आहे. तो डावीकडे तोंड करून धावत निघालेला आहे, असे वाटते. या मंदिराची मूळ घुमटी ८ फूट लांब रुंद आहे. त्याभोवती १९७२ साली ४२X १६फूट असा सभामंडप बांधला गेला. पारगाव हे पन्हाळ गडाजवळचेच गाव असल्यामुळे शिवाजी महाराज व समर्थ राजकीय खलबतांसाठी पारगावी येत असत असे म्हणतात.

११. बत्तीस शिराळ्याचा मारुती – समर्थांनी शिराळे येथील त्यांचा शिष्य महादजी साबाजी देशपांडे यांच्या आग्रहास्तव शके १५७६ (इ.स.१६५४) मध्ये मारुतीची स्थापना केली. पूजा अर्चेची जबाबदारी देशपांडे यांच्यावर सोपविली. अकरा मारुतींच्या देवळांमध्ये सर्वांत सुरेख मंदिर या शिराळ्याच्या मारुतीचे मंदिर आहे. समर्थांनी मुळात एक कमान बांधून तीत मारुतीची स्थापना केली होती. नंतर त्यांचे शिष्य जयरामस्वामी यांनी कौलारू मंदिर बांधले. हे मंदिर उत्तराभिमुख आहे. ह्यात मारुतीचे तोंडही उत्तरेकडे आहे. ही वीर मारुतीची मूर्ती आहे. तिची उंची ७ फूट आहे. मूर्तीच्या कंबरपट्ट्यातील घंटा, कटिवस्त्र व त्याचा गोंडा सुंदर रंगविलेला आहे. मूर्तीच्या मस्तकाच्या डाव्या व उजव्या बाजूला झरोके आहेत. सूर्योदय व सूर्यास्ताच्या वेळी या झरोक्यातून मूर्तीवर प्रकाश पडतो. ही मूर्तीही चुन्याची बनविलेली आहे. या मारुती मंदिराचा सभामंडप २२ X१७ फूट आहे. या देवळाच्या दक्षिणेला एक प्रवेशद्वार आहे. या मारुतीच्या पूजेची व्यवस्था तसेच उत्सवाची व्यवस्था प्रत्येक वर्षी देशपांडे कुटुंबीयांपैकी एकेकाकडे वाटून दिलेली आहे. ज्याच्याकडे व्यवस्था असेल त्याला 'वर्षलदार' असे म्हणतात. येथे चैत्रशुद्ध पौर्णिमेला हनुमानजयंतीचा उत्सव साजरा करण्यात येतो.

समारोप –

उदात्त मूल्ये जोपासण्यासाठी, उच्च विचारांचे अनुसंधान ठेवण्यासाठी आचरणातील पावित्र्य जसे आवश्यक आहे. तसेच बलवान आरोग्यसंपन्न शरीराचीही गरज आहे. बलोपासनेसाठीच 'मारुती हे दैवत पुढे करून समर्थांनी मारुतीची मंदिरे ठिकठिकाणी बांधली. बाल, तरुण मनांवर सुसंस्कार घडवून त्यांना योग्य दिशेने विचार करण्याची सवय लावणे, त्यासाठी लोकांना एकत्र आणणे, संघटित करणे जरुरीचे होते. समर्थांनी श्रीराम मंदिरातून 'रामनवमी', मारुती मंदिरातून 'हनुमान जयंती' या सारखे उत्सव साजरे करण्याचे ठरविले. जीवनाच्या सुफलतेचे दर्शन समाजाला स्वाभिमानाच्या प्रकाशात करविण्याच्या सत्कार्याला शिवकाळात प्रारंभ करणारे राष्ट्रगुरु समर्थ रामदास हे समाजाचे प्रेरणास्थान होते. आजही त्यांच्या प्रखर व परखड विचारांची समाजाला गरज आहे. सध्या मानवी जीवन हे अतिशय गतिमान झाले आहे त्यामध्ये अपयश आल्यास मनुष्य खचून जातो, तो तसा खचून जाऊ नये म्हणून समर्थांचे जे विचार, त्यांच्या वाङ्मयातून दिसतात ते अत्यंत मौलिक, प्रभावी आणि तेजस्वी आहे. समाजाने त्याचा अभ्यास करण्याची गरज आहे.

– डॉ.सौ. सुमती देशपांडे,
३६/४, एरंडवणा, पांडुरंग कॉलनी,
'संकल्प' बंगला पुणे - ४११ ०३८
दूरध्वनी - २५४३ ०५७६

• • •

कर्ममार्गे उपासना

- डॉ. मीराताई केसकर



'स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिध्दिं लभते नरः ।

श्रीमद्भवद्गीतेत अध्यात्मशास्त्राची सांगोपांग चर्चा करून अखेर समारोप करताना भगवंतांनी अर्जुनाला हे सांगितले, 'आपापले विहीत कर्तव्य निरलसपणे करीत राहिल्याने मनुष्याला सम्यक् सिद्धीचा लाभ होतो.' हीच गोष्ट आणखी स्पष्ट करण्यासाठी भगवंत पुढे सांगतात.

'यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।

''स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ॥ गीता १८.४६ ॥

कर्म करायचे ते एक 'कर्तव्य' म्हणून. कोरडेपणाने, 'टाकणे टाकल्याप्रमाणे केले तर, ते पूर्णत्वाला जात नाही; पण तेच कर्म जर परमेश्वराची पूजा 'उपासना' म्हणून प्रेमपूर्वक, मनःपूर्वक केले तर, त्यात परिपक्वता येते. गीतेत म्हणून भगवंत म्हणतात, 'ज्याच्यापासून या सर्व भूतांची उत्पत्ती होते, तसेच सर्व अंगांनी जीवन जगण्याची त्या भूतांची प्रवृत्ती होते, ज्याने हे सर्वच जग व्यापले आहे, त्याची पूजा ही स्वकर्माने करायला पाहिजे. त्यानेच मानवाला सिद्धी प्राप्त होते. अर्थात् या सिद्धीचा अणिमा-गरिमादि अष्ट सिद्धींशी काहीही संबंध नाही. ही सिद्धी म्हणजे जीवनसाधना सिद्ध झाल्यावर मिळणारे मधुर फळ आहे. जीवनसाधना म्हणजेच परमेश्वर प्राप्तीची साधना, 'नराचा नारायण' होण्यासाठी करण्याची साधना होय. अशी साधना हातून घडावी, यासाठीच हा नरदेह प्राप्त झालेला असतो. भगवंतांच्या या प्रतिपादनाला अनुसरूनच बहुतेक सर्व संतांनी आपले जीवन व्यतीत केले आहे. त्यांचा उपदेशही तसाच आहे. आपल्या कामातच त्यांनी 'राम' पाहिला आहे. संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात 'कर्मे ईशु भजावा', समर्थ रामदासांनी तर प्रयत्नवादाला अत्यंत महत्त्व दिले आहे. जीवनांच्या सगळ्याच क्षेत्रांमध्ये प्रयत्न कसा साक्षेपाने, सावधपणे आणि झडझडून करायला हवा, हे त्यांनी परोपरीने सांगितले आहे.

'आधी ते करावे कर्म । कर्ममार्गे उपासना ।' हे त्यांच्या उपदेशाचे मुख्य सूत्र आहे; कारण सर्व कर्मे उपासनारूप होतात. तेव्हाच, 'उपासका सापडे ज्ञान । ज्ञानें मोक्षचि पाविजे ॥ 'असा त्यांचा अनुभव आहे. ज्ञानाशिवाय केलेले कर्म हे 'वाऊगे, व्यर्थ' होऊ शकते तर, कर्माशिवाय ज्ञान म्हणजे 'क्रियेवीण वाचाळता' ठरते! कर्म व ज्ञान ही भक्तीशिवाय एकत्र आली तर तेथे दंभ आणि अहंकार माजण्याची भीती राहते. म्हणून भक्तीची जोड मिळणे आवश्यक असते. हा सर्व अर्थ, या एका ओवीत समर्थांनी व्यक्त केलेला आहे. भक्तीपूर्वक केलेल्या कर्मात ज्ञानाची काही उणीव राहिली तरी भगवंत त्याची काळजी घेतो, आपल्या तेजाने त्याच्या हृदयातला ज्ञानदीप उजळतो, त्याला आपल्यापाशी स्थान देतो. कर्म मात्र आधी केलेच पाहिजे, निष्क्रीय भक्ती भगवंतालासुद्धा मान्य होत नाही. म्हणूनच समर्थ म्हणतात, 'यत्न तो देव जाणावा!'

तसे पाहता, प्रत्येक मनुष्य आयुष्यभर यत्न करीतच असतो. पण ते प्रयत्न तो कशासाठी करतो? कोणासाठी करतो, स्वतःसाठी, कुटुंबासाठी की समाजासाठी? कशा प्रकारे करतो? योग्य मार्गाने करतो किंवा कसे ? ते पूर्णत्वास जाईपर्यंत करतो की, अर्ध्यातच सोडतो ? आणि का ? हे सारेच प्रश्न विचार करण्याजोगे आहेत. त्यांचा सांगोपांग विचार केला तरच 'यत्न तो देव जाणावा' या समर्थ उक्तीचे खरे रहस्य आपल्याला समजेल.

मनुष्य यत्न करतो तो कशासाठी, हा सर्वप्रथम विचार ठरतो. 'अभ्युदय' व निःश्रेयस' ही मानवी जीवनाची दोन महत्त्वाची अंगे आहेत. अभ्युदयाचा विचार मनुष्याला अधिक जिव्हाळ्याचा वाटतो, अनिवार्य वाटतो. 'अभ्युदय' हा मूर्त स्वरूपात प्रकट होणारा असतो आणि तो तात्कालिक सुखाचाही असतो.' निःश्रेयस' हे मात्र त्यामानाने दूरचे, अदृष्टातले असते. ते अनिश्चित, अमूर्त भासणारे असते. त्यामुळे तो विचार नेहमीच लांबणीवर टाकला जातो. 'आधी अभ्युदय साधू' निःश्रेयसाचा विचार वार्धक्यात करु असा विचार तरुणपणी मनुष्य करतो. पण अभ्युदय आणि निःश्रेयस या काही एकानंतर एक अमलात आणण्याच्या पंचवार्षिक, दशवार्षिक योजना नाहीत. ते एकमेकांपासून निराळे नाहीत. किंवा रथचक्राप्रमाणे नेहमी समांतर जाणारेही ते मार्ग नाहीत. दोन रंगांचे धागे एकत्र गुंफल्याने जसा बळकट सुंदर गोफ तयार होतो, तसेच या दोहोंच्या एकत्र गुंफण्याने जीवन सार्थसुंदर होते. मनुष्याच्या डाव्या-उजव्या अंगांप्रमाणे हे दोन्ही एकमेकांना पूरक ठरणारे आणि एकाचवेळी कार्यरत असणारे असे आहेत. किंबहुना मनुष्य देहाच्या या डाव्या उजव्या दोन्ही बाजू जर, अशा रीतीने एकाचवेळी एकमेकांना पूरक असे कार्य करीत असतील, तरच तो मनुष्यदेह कार्यक्षम म्हणवला जातो, त्या मनुष्याच्या जीवनाला त्यामुळे काही निश्चित अर्थ, आकार येऊ शकतो.

मानवी जीवनात अभ्युदय आणि निःश्रेयस या दोहोंचे स्थान आहे. त्यांच्या सहयोगाने त्यांच्या संयोगानेच मानवी जीवनाचे सार्थक होते. 'प्रपंच व परमार्थ' दोन्ही नेटकेपणाने साधले जावे, असे समर्थ रामदास वारंवार सांगतात ते याच अर्थाने योग्य प्रकारे पुरेसे यत्न करणे न साधल्याने जो प्रपंचात म्हणजे अभ्युदयासाठी लटका पडतो तो समाजात, परिवारात चिंतातुर, हीन-दीन होऊन वावरतो, मग त्याला निःश्रेयसाचा, परमेश्वरप्राप्तीचा विचार कोठून सुचणार? यासाठी प्रपंच नेटकेपणाने यशस्वी करावयास हवा आणि त्याचवेळी परमार्थाचाही विचार करायला हवा. समर्थ लोकान्ताबरोबर 'एकान्तसेवन' करण्यास सुचवितात ते बहुधा याच कारणाने. एकान्तात सद्ग्रंथवाचन, त्यांचे चिंतन आणि विवरण करावे. अन्यथा जो केवळ प्रपंचातच रमून परमार्थ विसरतो, तो 'भूमिभार' होतो. 'हे काहीच जो न धरी मनीं । तो मृतप्राय वर्ते जनीं । जन्मा येऊ न तेणें जननी । वायाच कष्टविली । (दास.२-४-१४) । अशा कठोर शब्दात ते त्याचा धिःकार करतात. म्हणून यत्न करायचा तो जीवनाच्या या दोन्ही अंगांचा समतोल राखून, साक्षेपानेच करावा लागतो.

मनुष्य आयुष्यभर खटाटोप करतो, तो कोणासाठी, जगतो तो कोणासाठी,

हाही मोठा विचार करण्यासारखा भाग आहे. बहुसंख्य माणसे स्वतःला सुख लावून घेण्याच्याच मागे असतात. चांगले-चुंगले खावे प्यावे, नटावे-थटावे, मौज-मजा, करमणूक करावी, अन् जिवाला आराम लावून घ्यावा अशा रीतीने त्यांचा काळ व्यतीत होतो. सिनेमाच्या तिकिटासाठी धावपळ करून, तास न् तास रांगेत उभे राहून ते हस्तगत करणे किंवा चालू फॅशनचे हवे ते कपडे मिळविण्यासाठी वणवण भटकणे हासुद्धा एक प्रकारचा यत्नच असतो. एवढेच की, तो स्वतःची हौस पुरवण्यासाठी केलेला असतो ! कुटुंबातील सदस्यांच्या मागण्या आणि अपेक्षा पूर्ण करण्यासाठीसुद्धा माणसे राबत, झटत राहतात; व ऐहिक ऐश्वर्य, सुखोपभोग प्राप्त करून घेतात. देव-धर्म, कुळाचार, तीर्थयात्रा, तिर्थस्थान करतात; तेही ऐहिकाच्या भरभराटीसाठी किंवा पुण्य संपादनाच्या अवास्तव कल्पना उराशी धरून ! हाही एक प्रकारे यत्नच ! काही महाभाग तर अधिकाधिक संपत्ती मिळवत राहणे, ती आपल्या नावे जमा करत राहणे, याच्याच खटाटोपात सर्व आयुष्य घालवतात. मात्र या संपत्तीपैकी थोडा तरी भाग समाजासाठीच काय, पण आपणावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबासाठी खर्च करणे हेही त्यांच्या जिवावर येते ! आणि मग संपादन केलेली जी अमाप संपत्ती, तिचा स्वामी असूनही तो अगदी रिकाम्या हाताने हे जग सोडतो; सोबत आलेच तर ते केवळ संबंधितांचे तळतळाट ! 'धनधान्याचे संचित । मन होय द्रव्यासक्त अत्यंत कृपण जीवित । तो रजोगुण । (दास.२-५-१३) अशा सर्व प्रकारचे वर्तन हे रजोगुणाच्या प्रभावाने घडते. तथापि या मागण्याचे अपेक्षांचे व आशा - आकांक्षांचे हे चक्र कधीही न थांबणारे आहे. मानवी मनाची ही अधिकाची हाव, त्याला कधीच संतुष्टता लाभू देत नाही. त्यामुळे हे यत्न चुकीच्या कारणासाठी चुकीच्या पद्धतीने केलेले यत्न ठरतात. मग याला उपाय काय?

समर्थ रामदास यावर संसारातच राहून करण्याजोगा सोपा आणि श्रेष्ठ असा उपाय सांगतात.'उपाय येक भगवद्‌भक्ती । जरी ठाकेना विरक्ती । तरी यथानुशक्ती । भजन करावे । (दास.२-५-३६) ..... यथानुशक्ती दानपुण्य । परी भगवंती अनन्य । सुखदुःखें परी चिंतन । देवाचें चि करावें । (दास.२-५-३८) संसारी मनुष्यासाठी विरक्ती हा फार लांबचा पल्ला असला तरी त्याला भक्तीचा सुलभ उपाय उपलब्ध असतो. दान-धर्म करण्याला व्यावहारिक मर्यादा असल्या तरी अनन्य भक्तीला मात्र कोणतीच मर्यादा वा अडचण असत नाही. केवळ दुःखातच देवाचा आठव करावा, या वृत्तीऐवजी सुखातसुद्धा त्याला आठवण्यास कोणतीही आडकाठी नसते. रजोगुणात यत्न करण्याचा झपाटा मोठा चांगला असतो. परंतु माणसाला योग्य दिशा देण्यास, योग्य मार्ग दाखविण्यास, अनन्य भक्ती आणि परोपकारी वृत्तीने संतुलन साधण्यास साहाय्यभूत होतो तो सत्त्वगुण ।

हा सत्वगुण कसा आहे? समर्थ सांगतात, 'शरीर लावावे कारणीं । साक्षेप उठे अंतःकरणीं । सत्त्वगुणाची करणी । ऐसीं असे (दास. २-७-५१) स्वतःच्या आणि आपल्या कुटुंबियांसाठी, त्यांच्या सुखासाठी आयुष्य वेचणे, कष्टत राहणे याला ' शरीर कारणी लावणे' म्हणता येणार नाही; कारण तेथे कळत नकळत पण निश्चितपणे स्वतःचे सुख, सुरक्षितता आणि मान-सन्मान, प्रतिष्ठा यांची अपेक्षा असते आणि ही अपेक्षा पूर्ण झाली नाही तर माणसू उद्वेगतो, त्रागा करतो हेही आपण प्रत्यही पाहातोच. म्हणूनच जेव्हा हे सर्व क्षीण होते, 'आपले घर, आपली माणसे' यांच्या बरोबर इतरांनाही सामावून घेण्याची बुद्धी होते, आणि मग त्यानुसार विचार अन् कृती घडू लागते तेव्हा सत्त्वगुणाचा प्रभाव कृतिशील झाला असे म्हणता येते. मगच केलेली कर्मे 'शरीर कारणी लावण्यासाठी जीवनसाधना सिद्ध होण्यासाठी केलेले 'यत्न' ठरतात! त्या मनुष्याला योग्य मार्गाने म्हणजेच देवत्वाच्या मार्गाने नेणारे ते यत्न ठरतात. अशाच मनुष्याला मग समाज 'देवमाणूस' म्हणून लागतो. कारण 'वसुधैव कुटुम्बकम्' असे देवत्वाशी जवळीक सांगणारे त्याचे ब्रीद असते. 'आपकार्याहून जीवी । परकार्य सिद्धी करावी ।, हीच त्याच्या मनीची आस असते. तथापि अशा प्रामाणिक हेतूने 'परकार्यसिद्धीसाठी कष्ट केले तरी त्यांना नेहमीच यश आणि मान्यता मिळेल असे नाही. सर्व काही करून घेऊन उलटणारी माणसेही भोवती असतातच. मग 'हा कलियुगाचा महिमा आहे' असे मानून, माणूस हताश होतो ! 'भल्याची दुनिया नाही', असे म्हणून या मार्गापासून परावृत्त होण्याचाही तो विचार करू लागतो. अशा वेळी कष्टांचा कंटाळा आणि निंदकांचा उद्वेग न मानता दया, क्षमा, शांती, धैर्य, सहनशीलता या सात्त्विक गुणांचा मनुष्याने आधार घ्यावा. प्रयत्नांची कास सोडू नये, असा समर्थांचा सांगावा आहे. 'शरीरें घीस साहाणें । दुर्जनासीं मिळोन जाणें । निंदकास उपकार करणें । हा सत्त्वगुण । (दास. २-७-६९)

मंदिरांच्या जीर्णोद्धारासाठी, दानधर्म करण्यासाठी पुष्कळजण पुढे येतात, ते चांगलेच आहे. पण समर्थ भर देतात तो 'भलेपणाच्या जीर्णोद्धारावर' आणि 'पुण्यमार्गाच्या विस्तारावर'। बहुतांस करावे परोपकार । भलेपणाचा जीर्णोद्धार। पुण्यमार्गाचा विस्तार । बळेचि करावा (दास.२-९-१९) परोपकाराच्या मार्गानेच हे साध्य होते, म्हणून समर्थांचा परोपकारावर विशेष भर आहे. तो राम, आत्माराम आपल्यासोबत आहे. याचा दृढनिश्चय धरावा आणि सत्कृत्यसाधना करीत राहावे. 'दृढनिश्चियो धरावा । संसार सुखाचा करावा । विश्वजन उद्धरावा । संसर्गमात्रें ॥ (दास २-९-२१) असा आदेश देताना त्यांच्या डोळ्यांपुढे सर्वसामान्य मनुष्याचा चूल - बोळक्यांचा संसार नसावा;कारण प्रपंच मुळीच नासका हे कठोर सत्य त्यांनी ठासून सांगितले आहे. तेव्हा भोवतालच्या विश्वातले दुःख होईल तेवढे दूर करावे, सुख वाढवावे, त्यासाठीच 'शरीर कारणीं' लावावे. 'सावधान' हे शब्द ऐकताच बोहोल्यावरून त्यांनी धाव घेतली आणि त्या चूल-बोळक्याच्या संसारापासून आपली सुटका करून घेतली; 'विश्वाची चिंता' करण्यात, राष्ट्रकार्याचा, धर्मकार्याचा, संसार उभा करण्यात उभे आयुष्य वेचले. आपल्यासारख्यांसाठी ही अगदीच आवाक्याबाहेरची उंच झेप असली तरी, ते ओळखूनच समर्थांनी संसारी सामान्यजन, विरक्त, मुमुक्षूजन आणि महंत या सर्वांसाठीच त्यांच्या त्यांच्या धारणेप्रमाणे योग्य असा कल्याणाचा मार्ग दाखवला आहे.

प्रपंच मुळातच 'नासका' असला तरी तो 'नेटका' करून तडीस नेणे, मात्र शक्य आहे आणि ते आवश्यकही आहे. म्हणून 'आधी प्रपंच करावा नेटका' असे ते प्रापंचिकांना कटाक्षाने बजावतात. त्यासाठी यत्नाला, प्रत्येक कर्माला साक्षेप, सावधानता, विवेक आणि कष्टाळूपणाची जोड हवी. तसेच त्याशिवाय काही भजन, कीर्तन, श्रवण, सद्ग्रंथाचे वाचन हेही हवेच. म्हणजे त्यायोगे परमार्थाचा, विवेक-विचार सुचतो, संसाराचे वर्म समजते, तो जाणता होतो. 'जाणित्यासी कळे वर्म'। नेणत्याचे खोटे कर्म । सकळ काही धर्माधर्म । जाणतां कळती । (दास. ९-४-३३) अशा प्रकारे क्रियेला ज्ञानाची जोड मिळते. तेव्हा ती क्रिया योग्य अशी घडू लागते.

ज्ञान मनुष्याला अंतर्मुख बनवते. त्यामुळे माणसाला सामान्य बनवून टाकणारे स्वतःमधले दोष त्याला दिसू लागतात, खुपु लागतात. त्यामुळे ते अवगुण त्यागून स्वतःला सुधारण्याचा डोळस प्रयत्न तो करू लागतो. उदाहरणार्थ, दुसऱ्याचे उणे पाहणे, बोलणे हा अवगुण आपल्यात आहे, हे लक्षात आले की, तो असे उणे-दुणे काढणे सोडून देतोच; पण त्याशिवाय कुठे उणे दिसलेच तर उलट 'उणे पडो नेदावे । कोणियेकाचे । अशी सद्‌वासना त्याच्या मनी वसू लागते. लोकांची भांडणे चवीने पाहण्याची वृत्ती गळून पडते. त्याऐवजी 'कोणी येकासी मारी । तयास जाऊन वारी । जीव बंधनमुक्तकरी । तो

सत्त्वगुण । (दास. २-७-७५) अशा प्रकारची सात्त्विक वृत्ती बळावू लागते. 'मी-माझे' ही संकुचित वृत्ती मावळू लागते. सत्याची चाड मनात जागते. अन्यायाची चीड त्याला स्वस्थ बसू देत नाही. सद्धर्माची प्रतिष्ठापना व्हावी अशी तळमळ वाटू लागते. या कार्यात इतरांनाही तो सहभागी करून घेत - 'सन्मार्ग दाखवी जना । जो लावी हरीभजना । ज्ञान सिकवी अज्ञाना । तो सत्त्वगुण ॥ (दास.२-८-७८)॥ अशा शब्दात समर्थ त्याचे वर्णन करतात.

अशा प्रकारच्या जाणिवा मनात जाग्या झालेला हा ज्ञानी मुमुक्षू विरक्ततेकडे झुकू लागतो, तेव्हा त्याची पुढची अधिक कठीण परीक्षा सुरू होते. एकीकडे परमेश्वराचे सर्वव्यापित्व आणि 'अहं ब्रह्मास्मि' यासारखी महावाक्ये मनात घोळू लागतात; मात्र त्याचवेळी तो मीपणाच्या पकडीतून सुटलेला नसतो. मग त्याचे मन, त्याचे मीपण भराऱ्या घेऊ लागते. अहंकार आपले खेळ दाखवू लागतो. 'मी तो ब्रह्मचि झालो स्वतां । साधन कोण करील आता । ऐसें मनीं कल्पू जातां । कल्पनाचि उठे । (दास. ५-७-५४) ॥ 'अशा स्थितीत साधना दिली पडते आणि होते काय ते समर्थ पुढे सांगतात, 'परमार्थ मिसे अर्थ जागे । ध्यानमिसे निद्रा लागे । मुक्तिमिसें दोष भोगे । अनर्गळता ॥७-७-६५॥ निरूपणमिसें निंदा घडे । संवादमिसें विवाद पडे । उपाधि मिसें येऊन जडे । अभिमान अंगी ॥ (दास ७-७-६६) तैसा ब्रह्मज्ञानमिसें । आळस अंतरी प्रवेशे । म्हणे साधनाचे पिसें ॥ काय करावे ॥ (दास ७-७-६७) अध्यात्ममार्गावरील व्यक्ती, अधिकारी व्यक्ती म्हणून लोक मान देऊ लागतात. त्याचीच मनाला चटक लागते. ध्यानासाठी बसावे, तो डुलकी लागते. मुक्त झाल्याच्या भ्रमात मन मानेल तसे वागण्याकडे कल होतो. निरुपणाच्या निमित्ताने दुसऱ्यांच्या दोषांचे चिंतन अन् निंदा घडू लागते, त्यात गोडी आणि मोठेपणाही वाटू लागतो. संवाद करताना आपला मोठेपणा सिद्ध करण्याच्या भरीस पडून तो वितंडवाद करू लागतो. नाना उपाधी करताना गर्व मनात घर करतो. ब्रह्मज्ञान झाल्याच्या भ्रमाने सामान्यांप्रमाणे काम धंदा-कष्ट करणे, नको वाटते. अंगी आळस भरतो. 'मला साधनेची गरजच काय?' अशी गैरसमजूत मनात रुजते. येवढेच नव्हे तर, अशाने लोक मला सामान्य साधकच समजतील अशी लाजही वाटू लागते . मग जीवनसाधनेसाठी सर्वांगाने करण्याचे प्रयत्न अर्धवट राहतात. ऐहिक जीवनासाठी करण्याचे प्रयत्न अर्धवट राहिले तर नुकसान होते ते वैयक्तिक व ऐहिक स्वरूपाचे, पण परमार्थमार्गातील अधिकारी, मुमुक्षू व्यक्ती जेव्हा प्रयत्न अर्ध्यात टाकून थोरवी गाजवू पाहते, तेव्हा त्याच्या व्यक्तिगत नुकसानीसह अज्ञानी समाजही हा भलताच आदर्श डोळ्यासमोर ठेवून भरकटण्याची भीती असते.

अशा प्रकारची संभ्रमावस्था येऊ नये, यासाठी समर्थ सांगतात, 'विरक्तें भक्ती वाढवावी । विरक्तें शांती दाखवावी । विरक्तें येत्नें करावी । विरक्ती आपुली ॥(दास.२-९-९)॥ विरक्तें सत्क्रिया प्रतिष्ठावी । विरक्तें निवृत्ति प्रतिष्ठावी । विरक्तें नैराशता धरावी । सुदृढ जिवेंसी ॥ (दास.२-९-१०) ॥ विरक्तें उपाधी करावी । आणी उदास वृत्ति न संडावी । दुराशा जडों नेदावी । कोण येक विषईं ॥ (दास.२-९-२६)॥ ज्ञानाच्या योगाने आलेली विरक्ती टिकवावी, वाढवावी, परंतु स्वतःची साधना आणि लौकिक व्यवहार मात्र सुटू देऊ नयेत, परोपकारी वृत्ती सोडू नये. विविध उपक्रम करीतच असावे, मात्र ते सर्व अलिप्तपणे, निरपेक्ष वृत्तीने करावेत. मोठेपणा किंवा मानसन्मानाचीही त्यात आशा नसावी. चरितार्थ नेटकेपणाने चालवून अधिकाची हाव सोडावी. लोकांना सन्मार्गाला लावावे. भक्तीमार्ग विस्तारावा आणि स्वतः तरून इतरांच्या उद्धारास साहाय्यभूत व्हावे अशी 'कर्ममार्गे उपासना' करावी व ती तशी नेटाने चालू ठेवावी.

'कर्ता-करविता तोच आहे' अशी खूणगाठ मनात पक्की झाली की सर्वच कर्मांना 'भगवंताचे अधिष्ठान' मिळते. ती कर्मे म्हणजेच त्याची उपासना त्यांच्या चरणी रुजू होते. तेच त्याचे सामर्थ्य बनते. लहान-मोठे ओढेनाले जेव्हा एखाद्या मोठ्या प्रवाहात सामावून जातात, तेव्हा तो प्रवाह नदी म्हणवतो, 'लोकमाता' म्हणून वंदनीय ठरतो ! मग ते ओढे-नाले ही त्या नदीबरोबरच वंदनीय ठरतात. तसेच स्वतःच्या लहान-मोठ्या सर्वच कर्मांची आहुती त्या जगचालकाच्या विश्वरूपी यज्ञात अर्पण करण्याने त्या कर्मांनाही प्रतिष्ठा प्राप्त होते. या अथांग विश्वाच्या संदर्भात एखाद्या धुलिकणाप्रमाणे नगण्य असणारे आपले अस्तित्व अशा कर्ममय उपासनेने झळाळून उठते. तेव्हाच मनात अपार शांतीही दाटून येते आणि विचारांच्या लाटांवर समर्थांचे शब्द प्रकाशशलाकांप्रमाणे नर्तन करू लागतात. 'जाले साधनाचे फळ । संसार झाला सफळ । सफळ संसाराचा राजमार्ग म्हणजे ''कर्ममार्गे उपासना''

- डॉ. मीरा केसकर

स्नेहबंधन सोसायटी, सेक्टर ३/डी.१०-१-१,

सानपाडा, वाशी (नवी मुंबई)

(फोन नं. ०२२-२७६१७४२५)

• • •

समर्थ रामदासांचा अर्थविचार

- डॉ. ह.य.कुलकर्णी



महाराष्ट्रात आजवर होऊन गेलेल्या संतमंडळींपैकी ज्ञानेश्वर व रामदास हे दोघे जण सोडले तर बाकीचे सारे संत संसारी होते. वास्तविक या प्रापंचिकांनी संसार करता करता जमेल तेवढा परमार्थ करावयास हवा होता. परंतु तसे न करता त्यांनी प्रपंचाकडे पाठ फिरवून सारा वेळ हरिचिंतनातच घालविला. स्त्री ही मोक्षमार्गातील धोंड आहे या पारंपरिक समजुतीनुसार त्या साऱ्यांचा ओढा प्रपंचापेक्षा परमार्थाकडेच अधिक होता. याउलट, ज्ञानेश्वर व रामदास हे दोघेही विरक्त व ब्रह्मचारी असूनही त्यांनी संसारी माणसाच्या जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण केले होते. त्यामुळेच, या निरीक्षणाचे चित्र त्यांच्या वाङ्‌मयात स्पष्टपणे उमटलेले दिसते.

प्रपंचाचा आग्रह

समर्थ रामदास तर बोलूनचालून कडकडीत विरागी होते. परंतु त्यांच्या १२ वर्षांच्या देशाटणात त्यांनी भारतीय समाजजीवनांचे बारकाईने अवलोकन केले होते. सामान्य माणसाला असलेली स्त्री - पुत्र-द्रव्य यांची आसक्ती, त्याला बसणारे संसारतापाचे चटके, त्याचा कर्जबाजारीपणा, दिवाळखोरी, अन्नान्नदशा,मुलांकडून होणारी अवज्ञा आणि अशा अयशस्वी संसाराच्या मुळाशी असलेली कारणे समर्थांनी अचुकपणे व मोठ्या बारकाईने दासबोधात चित्रित केली आहेत.

परंतु केवळ प्रपंचातील संकटेच सांगून समर्थ थांबत नाहीत. त्यापुढे जाऊन यशस्वी प्रपंच कसा करावा हेही ते आवर्जून सांगतात. विवेक, साक्षेप, सावधानता यांच्या आधारे तो कसा यशस्वी करता येतो हे ते वेळोवेळी सांगतात. मनुष्याने प्रथम नेटका प्रपंच करावा आणि मगच परमार्थाकडे वळावे. प्रपंच न करता नुसताच परमार्थ केला तर खावयास मिळणार नाही आणि असा परमार्थही खोटा असे समर्थ रामदासांचे प्रपंचविज्ञान आहे.

इतक्या ठामपणे प्रपंचाचा पुरस्कार करण्याचे कारण अर्थातच अतिशय व्यापक आहे. महाराष्ट्रातील समाजाने प्रथम प्रपंचात लक्ष घालून खाऊन पिऊन सुखी व्हावे; हनुमंताची उपासना करून बलसंवर्धन करावे आणि शिवरायांनी आरंभिलेल्या स्वराज्यस्थापनेच्या उद्योगास साह्यभूत व्हावे अशी समर्थांच्या विचाराची तर्कशृखंला आहे. त्यामुळे, हे सारे करून मगच परमार्थाकडे वळावे असे त्यांचे ठाम प्रतिपादन आहे.

आर्थिक विपन्नावस्थेची कारणे -

प्रथम समर्थांनी सांगितलेली मनुष्याच्या आर्थिक विपन्नावस्थेची कारणे पाहणे योग्य ठरेल. तिसऱ्या दशकातील पहिल्या तीनचार समासात सांगितल्याप्रमाणे गर्भवासाचे दुःख भोगून बालक जन्माला येते. जसजसे ते मोठे होऊ लागते तसतसा त्याला मातेचा लळा लागतो. मातेवाचून दुसरे दैवत नाही अशी त्याची समजूत होते. बालक मोठे होताच मोठ्या कौतुकाने त्याचा विवाह करून दिला जातो. परंतु विवाहानंतर पत्नीच्या प्रेमात गुंतल्यामुळे तो मातेलाही तुच्छ लेखू लागतो. -

तये भार्येचेनि कैवारें । मायेबापासी नीच उत्तरें ।
बोलोनिया तिरस्कारें । वेगळा निघे ।।३-२-४९

परंतु त्याची ही पत्नी तरुणपणीच निवर्तल्यामुळे काही काळ, तो दुःखी होतो, पण लवकरच 'खास लोकाग्रहास्तव दुसरे लग्न करतो.

लेकुरे उदंड झाली

द्वितीय संबंध झाल्यावर तो मागील दुःख विसरून संसारात लक्ष घालू लागतो. परंतु आता तो कृपणपणे राहून पै पै साठवू लागतो. याचवेळी बाहेरख्यालीपणाचा नाद लागू तो मिळविलेले द्रव्य उडवून टाकतो. परस्त्रीसंबंधामुळे तो नाना रोगांना बळी पडतो. परंतु मरता मरता वाचतो. अजूनही संतती झालेली नसल्याने तो सामाजिक टीकेला पात्र होतो. तेव्हा, संततीप्राप्तीसाठी देवाला, कुळस्वामीनीला तो नवस करु लागतो. निरनिराळ्या देवऋषींकडेही जातो. शेवटी हे मार्ग फलदायी ठरून त्याला एकामागून एक अपत्ये होऊ लागतात. खाणारी तोंडे वाढल्यामुळे साहजिकच त्याच्या विपन्नवस्थेला सुरुवात होते. समर्थ म्हणतात -

लेकुरें उदंड जाली । तो लक्ष्मी निघोन गेली ।
बापडी भिकेस लागली । खावया अन्न मिळेना ।।३-४-१

घरात कन्यापुत्रांची दाटी होऊन खाण्यापिण्याचा खर्च वाढला. तशातच मुली उपवर झाल्या आणि मुलांनाही मुली सांगून येऊ लागल्या. त्यामुळे त्याच्या काळजीत भरच पडू लागली -

ऐसी घरबात वाढली । खाती तोंडे मिळाली ।
तेणे प्राणियास लागली । काळजी उद्वेगाची ।।३-४-६

कर्जबाजारी व दिवाळखोर

आता त्याची खरी दैन्यावस्था सुरू झाली. मुला - मुलींची लग्ने करण्यासाठी ऋण काढू म्हटले तर देणार कोण ? कारण -

मागे रुण ज्यांचे घेतलें । त्याचें परतोन नाही दिल्हे ।
ऐसे आभाळ कोसळले । उद्वेगाचें ।। ३-४-१०

बाजारातील पत पूर्णपणे नाहीशी होऊन घरातील सामान सावकाराकडे गहाण पडू लागले.

पती अवधीच मोडली । वस्तभाव गाहाण पडली ।
अहा देवा वेळ आली । आता दिवाळ्याची ।। ३-४-१२

आणि दिवाळखोर ठरण्याची वेळ येऊन ठेपली. तेव्हा त्याने घरातील चीजवस्तू विकून काही पैसा उभा केला, काही ऋण काढले व मुला - मुलींची लग्ने लावून दिली. परंतु त्यामुळे,

ऐसे रूण उदंड जाले । रिणाईती वेढून घेतले ।
मग प्रयाण आरंभिले । विदेशा प्रती ।। ३-४-१५

सावकारांनी त्याला वेढून घेतले. त्यांची तोंडे चुकविण्यासाठी त्याने देशांतर केले. विदेशात कांही द्रव्य मिळवून तो घरी आला. चार दिवस मुलाबाळांना खावयास मिळाले. परंतु द्रव्य संपताच पुन्हा विदेशी जाणे प्राप्त झाले. द्रव्य मिळवून पुन्हा लवकर परत या असे घरातील सर्वांनी त्याला बजावले कारण ते सर्वजण फक्त सुखात वाटेकरी होते.

यावेळी विदेशी जाताना त्याचा पाय घरातून निघत नव्हता, परंतु पुन्हा पुन्हा मागे वळून पाहात तो तसाच पुढे गेला. यावेळी जास्त दिवस परदेशात राहून द्रव्य मिळवून तो घरी आला खरा; परंतु यावेळी अवर्षण पडून अन्नाची महर्गता झाली होती. दुष्काळात खावयास न मिळाल्यामुळे त्याची दुसरी पत्नीही अन्नान्न करीत मरून गेली.

खरे तर आता तो वृद्ध झाला होता; परंतु लोकांनी भरीस घातल्याने त्याने तिसऱ्यांदा लग्न केले. ही पत्नी तरुण व सुंदर असल्याने तो पुन्हा एकदा संसारात रमला.

परंतु आता मुले मोठी होऊन त्यांच्यात भांडणे लागली होती. ते सारेजण आपापला वाटा मागू असल्याने या वृद्धाने गावातील पंच बोलावून वाटण्याही करून दिल्या; परंतु वाटा मान्य नसलेल्या मुलांनी भांडण करून बापालाच मारहाण केली. म्हणजे, ज्यांच्यासाठी नवस केले तीच संतती अशी बापाच्या जिवावर उठली. हे होत असताना सुलतानी संकट आले आणि

अकस्मात धाडी आली । कांता बंदी धरुनि नेली ।
वस्तभावहि गेली । प्राणियाची ॥ ३-५-२८
तंव तिची वार्ता आली । तुमची कांता भ्रष्टली ।
ऐकोनिया आंग घाली । पृथ्वीवरी ॥ ३-५-३०

आयुष्यभर द्रव्य व विषयसुखाचा हव्यास करून शेवटी अशी अवस्था त्याच्या वाट्याला आली. कुटुंबातील संख्या वाढली की अन्नान्नदशा येते व अस्मानी सुलतानी संकटे येऊन लोकसंख्या कमी होते हा ब्रिटीश अर्थशास्त्रज्ञ टॉमस रॉबर्ट माल्थस याचा लोकसंख्येचा सिद्धान्तच समर्थांनी येथे विस्तारपूर्वक मांडलेला आहे.

समर्थांची दारिद्र्यमीमांसा -

नवव्या दशकांत चवथ्या समासात समर्थांनी केलेली दारिद्र्यमीमांसा देखील या संदर्भात लक्षात घेण्यासारखी आहे. पृथ्वीमध्ये काही लोक धनवान असतात तर काही दुर्बळ असतात याचे कारण जे विद्या शिकतात व काही उद्योग - व्यवसाय करतात तेच भाग्यश्री भोगतात. अवगुणी व अज्ञानी माणसास दारिद्र्य प्राप्त होते-

समर्थांच्या मते,

विद्या नाही बुद्धी नाही । विवेक नाही साक्षेप नाही ।
कुशलता नाही व्याप नाही । म्हणोनि प्राणी करंटा ।। ९- ४-१०

कुठलेही ज्ञान, विद्या किंवा व्यवसायातील कौशल्य अंगी नसलेला प्राणी करंटा ठरतो. हे करंटेपणा टाळण्यासाठी विद्या शिकणे, आळस झटकून कठोर परिश्रम करणे व व्यवसायाचा व्याप वाढविणे हे मार्ग समर्थांनी सांगितले आहेत. ते म्हणतात -

जितुका व्याप तितुके वैभव । वैभवासारिखा हावभाव ।
समजले पाहिजे उपाव । प्रगटचि आहे ॥
आळसे कार्यभाग नासतो । साक्षेप होत होत होतो ।
दिसते गोष्टी कळेना तो । शाहाणा कैसा ॥ १४-६-२६-२७

हे ज्याला समजत नाही त्याला शहाणा कसे म्हणावे ?

दिवाळखोराचा भपका

आळस करून काहीही कामधंदा न करता ऋण काढून सण साजरा करणारे आणि खोट्या श्रीमंतीचा दिमाख दाखविणारे महाभागही समाजात पुष्कळ असतात. रामदासांच्या वेळीही ते होते. असे भपकेबाज दिवाळखोर समर्थांच्या नजरेतून सुटले तरच नवल ! समर्थ म्हणतात -

दिवाळखोरांचा मांड । पाहाता वैभव दिसे उदंड ।
परी ते अवघे थोतांड । भंड पुढे ॥ १०-८-१५

भोळा माणूस या भपक्याने दिपून जातो. परंतु ते सारे थोतांड होय. पुढे त्या दिवाळखोराची फजिती ठरलेलीच आहे असे समर्थ सांगतात.

प्रपंची पाहिजे सुवर्ण

प्रपंचातील दुःखाचे वर्णन केल्यावर प्रपंच सुखाचा करण्यासाठी काय केले पाहिजे तेही ते सांगतात. माणसाने कुटुंब मर्यादित ठेवले पाहिजे हे तर खरेच, परंतु सुखी संसाराचा मूलमंत्र द्रव्य मिळवून चांगले राहणीमान जगता यावे हा आहे -

प्रपंची पाहिजे सुवर्ण । परमार्थी पंचीकरण ।
महावाक्याचे विवरण । करिता सुटे ॥ ११-३-२९

त्यासाठी मनुष्याने आळस झटकून अहोरात्र कष्ट केले पाहिजेत, तरच त्याला फळ मिळेल असे समर्थांचे सांगणे आहे -

आधी कष्ट मग फळ । कष्टचि नाही तें निष्फळ ।
साक्षेपेविण केवळ । वृथा पुष्ट ॥ ११-१०-२०

आळस केल्याने कार्यनाश होऊन दोन वेळच्या जेवणाची भ्रांत पडते. त्यातच आळशी मनुष्य जर खादाड असेल तर जिभेचे चोचले पुरविताना तो कर्जबाजारी होतो -

दुर्बळ अनाचारी वोढगस्त । आळशी, खादाड रिणगस्त ।
मूर्खपणे अवघे वेस्त । कांहीच नाही ॥ १२-९-१

आळशी माणसाचे असे वर्णन करुन 'म्हणोन आळस सोडावा । येत्न साक्षेपे जोडावा ॥' असे समर्थ पुन्हा एकदा सांगतात -

बचतीचे महत्त्व

प्रपंचात केवळ द्रव्य मिळवून चालत नाही तर आवश्यक तेवढाच खर्च करून काही रक्कम शिल्लक टाकावी लागते. तरच वृद्धपणाचा काळ सुखाचा जातो हे व्यावहारिक तत्त्वही समर्थांनी दासबोधात सांगितले आहे.

मेळविती तितुके भक्षिती । ते कठिण काळीं मरोन जाती ।
दीर्घ सूचनेने वर्तती । तेचि भले ॥ १८-७-७

आज मिळविलेले जो सर्वच्या सर्व खाऊन टाकतो त्याचा वृद्धापकाळ कठिण जाईल; पण भविष्यकाळाचा विचार करून जो आज कांही रक्कम शिल्लक टाकतो तो शहाणा असे समर्थांचे प्रतिपादन आहे.

सावधानता

विवेक, साक्षेप, सावधानता व सततोद्योग हीच दासबोधाची मुख्य शिकवण असल्याने, माणसाने सतत सावध राहिले पाहिजे असे समर्थ उदाहरणांनी बजावतात. रत्ने घेताना ती नीट पारखून घ्यावीत, वजने नीट बघावीत, आणि सोने खरेदी करताना ते मुशीत घालून चोख असल्याची खात्री करून घ्यावी-

नाना रत्नें परीक्षिता । अथवा वजनें करिता ।
उत्तम सोनें पुटी घालता । सावधान असावे ॥ १७-३-४

तसेच, नाणी घेताना ती नीट मोजून व खरी - खोटी पाहून घ्यावीत -

नाना नाणीं मोजून घेणे । नाना परीक्षा करणे ।
विवेकी मनुष्यास बोलणे । सावधपणे ॥ १७-३-५

एखाद्या सावकाराने आपल्या पेढीवर रोखपाल नेमताना त्याचा प्रामाणिकपणा पाहून कामावर ठेवावे व मगच त्याचेवर विश्वास टाकावा. इतके करूनही रोखपालाकडून हिशेबात कांही चूक झाल्यास त्याला सांभाळून घ्यावा-

थोर भांडारी करावा । सरताच सांभाळावा ।
गोवा मूर्खपणाचा काढावा । हळू हळू ॥ १९-९-९

सोईरिक व जामीनकी

१४ व्या दशकात निस्पृहलक्षणे सांगताना पहिल्याच समासात माणसाने व्यवहारात कोणती पथ्ये पाळावीत हे समर्थांनी सांगितले आहे-

नेम आंगी लावू नये । भरवसा कोणास देऊ नये ।
अंगिकार करु नये । नेमस्तपणाचा ॥ १४-१-२१

भरवसा देऊ नये याचा अर्थ कोणास जामीन राहू नये असा आहे. पुढे ते आणखी एक पथ्य सांगतात.

सोईरिकीत पडो नये । मध्यवर्ति घडो नये ।
प्रपंचाची जडो नये । उपाधी आंगी ॥ १४-१-५१

कोणाची सोईरिक जमवून देण्यात मध्यस्थी करू नये; कारण त्यात दोन्ही पक्षांकडून वाईटपणा येण्याची शक्यताच अधिक असते. जामीन राहणे किंवा सोईरिक जमविणे यासारखे लचांड मागे लावून घेऊ नये असे समर्थांचे स्पष्ट मत आहे.

रोकडा व्यवहार

या जगातील सारे व्यवहार रोखीने चालतात. येथे उधारी चालत नाही. विशेषतः यमराजाचा प्रत्येकाशी होणारा व्यवहार रोखीचाच असतो.

संसार म्हणजे सर्वेच स्वार । नाही मरणासी उधार ।
मापी लागले शरीर । घडीने घडी ॥ ३-९-१

माणसाच्या जन्मापासूनच त्याचा शरीरास प्रत्येक घटकेचे माप लागलेले आहे. त्यामुळे मृत्यूजवळ उधारी नाही की, गरीब - श्रीमंत, लहान-थोर, स्त्री-पुरुष असा भेदभावही नाही. त्यामुळे सर्वांच्याच बाबतीत त्याचा व्यवहार रोखीचा असतो -

मृत्य न म्हणे देसाई । मृत्य न म्हणजे वेवसाई ।
मृत्य न म्हणजे ठायी ठायी । पुंड राजे ॥३-९-१४

जमाखर्चाची जाण

उद्योग - व्यवसाय करावयाचा तर जमाखर्च लिहिण्याचे ज्ञान असले पाहिजे. ते नसलेल्या माणसाने व्यापार केला तर तो काही दिवस चालेल; परंतु त्याचा सुरनीस, म्हणजे हिशेब तपासनीस, लिखाणातील चुका दाखवून त्या व्यापाऱ्यावर ठपका ठेवणारच, समर्थ म्हणतात -

लिहिणे न येता व्यापार केला । कांही येक दिवस चालिला ।
पुसता सुरनीस भेटला । तेव्हा खोटे ॥ १८-५-१७

युद्ध कसे करावे किंवा हाती शस्त्र कसे धरावे हे माहीत नसलेला माणूस रणांगणावर गेला तर मारला जाणारच. ती चूक त्याचीच तद्वत्, जमाखर्चाचे ज्ञान नसलेल्या माणसाने व्यापार केल्यास आज ना उद्या तो बुडणारच कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी तिचे ज्ञान असले पाहिजे असा समर्थांचा आग्रह आहे.

उपसंहार

वाढते कुटुंब, आळस, अज्ञान, विवेकाचा अभाव यामुळे येणारे दारिद्र्य ही अयशस्वी प्रपंचाची लक्षणे जशी समर्थांनी सांगितली तसेच यशस्वी प्रपंचास लागणारे अपार कष्ट, सावधानता, विवेक हे गुणही सांगितले. हे करताना त्यांनी माणसाचा कर्जबाजारीपणा, दिवाळखोरी, व्यापार, नाणी, जामीनकी, जमाखर्च इ.गोष्टीवरही प्रकाश टाकलेला आहे. आळस टाकून अखंड उद्योगात निमग्न राहा व बहुतांची अंतरे राखा तरच तुमचे भाग्य उजळेल; आणि पर्यायाने मी उरीं बाळगलेले आनंदवनभुवनाचे स्वप्न सत्यात अवतरेल अशी समर्थांची अटकळ आहे. रामदासांची कविता ही स्वैरपणे कल्पनेच्या भराऱ्या मारणारी नाही. तर आपले पाय जमिनीत घट्ट रोवून प्रपंचाशी जवळीक साधणारी आहे. त्यामुळे दैनंदिन मानवी व्यवहारातील कोणतीच गोष्ट त्यांच्या नजरेतून सुटलेली नाही. या निरीक्षणातूनच समर्थ रामदासांचा अर्थविचार ग्रंथराज दासबोधात प्रगट झाला आहे.

- डॉ. ह. य. कुलकर्णी
सीताई ब.१७ मनमोहन सोसायटी,
कर्वेनगर, पुणे - ४११ ०५२

• • •

॥ श्री गुरु : शरणम् ॥

॥ मराठा तितुका मेळवावा महाराष्ट्र धर्म वाढवावा ॥

(वृत्त-दिंडी)

स्थान म हाराष्ट्री अष्ट विनायक ।
तसे रा माचे सज्जन गडी एक ॥
असे ठा ऊक हे महाराष्ट्री यांना ।
मह ति तैशीही इतर प्रांतियांना ॥१॥
भक्त तु क्याच्या वेळी 'रामदास' ।
त्याच का ळी देशांत यवन त्रास ॥
मऊ मे णाहुनी कठिण वज्र जैसे ।
जव ळ त्यांच्या ते भक्ति ज्ञान जैसे ॥२॥
संत वा णी ती गर्जली 'समर्थांची' ।
जमा वा ने एकत्र उठावाची ॥
ऊठ म हाराष्ट्रा गर्जले 'रामदास' ।
देति हा केला एकत्र व्हावयास ॥३॥
महा रा ष्ट्राचे मजबूत तुम्ही वीर ।
घ्या रा ष्ट्र कार्या शपथ व्हा तयार ॥
प्रबो ध नार्थे 'श्रीदासबोध' ग्रंथ ।
सद्ध र्म रक्षाया सज्ज व्हावयार्थ ॥४॥
देश वा चविण्या संत रामदास ।
जा ल ह ण्या दे आशीष शिवाजीस ॥
दिव्य वा टे ही 'श्री समर्थांची गाथा' ।
सुभा वा ने पदीं विष्णु ठेवि माथा ॥

- श्री. विष्णू ल. शिंत्रे
अहमदाबाद

॥शुभम् ॥

श्री समर्थांची करूणाष्टके

- श्री. गोविंद गजानन जोशी



बळे लाविता चित्त कोठे दडेना ।
समाधान ते काहि केल्या घडेना ।
नव्हे धीर नैनी सदानीर लोटे ।
उदासीन हा काळ कोठे न कंठे ।

समर्थ रामदास म्हणतात, "माझं मन कशात लागत नाही, काही केल्या मनाला समाधानच मिळत नाही. मन अधीर झाले आहे, डोळ्यांमधून सतत अश्रुधारा वाहात आहेत. मनाला अतिशय उदासीनता आली आहे आणि अशा मनाच्या अवस्थेत काय करावे काही सुचत नाही.'' त्यांच्या मनाची कशी घालमेल चालू होती हे वरील श्लोकात समर्थांच्या तोंडून व्यक्त होत आहे. आणि हे असे सर्व का तर रामभेटीची तळमळ लागली आहे. समर्थांनी लिहिलेल्या करुणाष्टकातील हा श्लोक आहे.

समर्थांनी जन प्रबोधनार्थ विपुल ग्रंथरचना केली आहे. श्रीमत् दासबोध, मनोबोध (मनाचे श्लोक) आत्माराम, दोन कांडांचे रामायण, हजारो आरत्या, पदे, अभंग, सवाया, विविध वृत्तात्मक श्लोक अशी प्रचंड ग्रंथरचना आहे. यापैकी दासबोध, आत्माराम व मनाचे श्लोक या ग्रंथांना समर्थ संप्रदायांची प्रस्थानत्रयी असे मानतात. आपण ज्या ज्या आरत्या म्हणतो त्या बहुतेक सर्व आरत्या समर्थ रचित आहेत असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होऊ नये. समर्थ वाङ्मयात करुणाष्टकांनाही महत्त्वाचे स्थान आहे. गडावरील अथवा चाफळ येथील दैनंदिन उपासनेत करुणाष्टके रोज म्हणण्याची प्रथा आहे.

करुणापर स्तोत्रे ही समर्थांच्या मनाची अवस्था दर्शविणारी स्तोत्रे आहेत. करुणाष्टके हे नावही समर्थांनी दिलेले नाही. अष्टके असे म्हटले गेले असले तरी ही स्तोत्रे आठ आठ ओव्यांची आहेत किंवा आठ आठ शब्दांची आहेत असेही आढळत नाही. दासबोधामध्ये ज्याप्रमाणे ७७५१ ओव्या आहेत किंवा मनाचे श्लोक जसे २०५ आहेत तशी करुणाष्टकांची संख्या निश्चित किती हेही सांगणे अवघड आहे. परमसमर्थ भक्त व गाढे अभ्यासक कै. शंकर श्रीकृष्ण देव यांनी इ.स.१९२० साली करुणाष्टके धाट्या हे पुस्तक छापले. समर्थ विचारांचे थोर प्रचारक श्री. सुनीलजी चिंचोलकर यांनी या सर्वांचा अभ्यास केला व त्यामधून ज्याला करुणाष्टके म्हणता येतील अशी करुणापर स्तोत्रे निवडली, ती एकत्र केली व त्यावर भाष्य केले आहे. प्रस्तुत लेख हा याच लिखाणावर आधारित आहे. या स्तोत्रांमध्ये समर्थ किती व्याकूळ झाले आहेत. प्रभू रामचंद्रांच्या भेटीची दर्शनाची त्यांना किती ओढ आहे, हे आपल्या लक्षात येते. यापैकी बरीचशी स्तोत्रे त्यांच्या तोंडून लहान वयातच म्हणजे वयाच्या १२ ते २४ या काळातच बाहेर पडली आहेत. वयाच्या १२ व्या वर्षी समर्थ लग्नमंडपातून बाहेर पडले आहेत. आजच्या काळामध्ये मुळात १२ वर्षे हे लग्नाचे वयच मुळी कल्पनेपलीकडील आहे. त्यातून केवळ रामभेटीची पराकोटीची तळमळ लागली आहे म्हणून आई, वडील, भावंडे, आप्तजन यांचा त्याग करून एखादा १२ वर्षांचा मुलगा घराबाहेर पडला आहे असे चित्र आपण पाहतो का? मुलगा चोऱ्या-माऱ्या करतो. लांड्या-लबाड्या करतो, लोकांची फसवणूक करतो म्हणून आई वडीलच मुलाला घराबाहेर काढतात असे आपण क्वचित पाहातो, ऐकतो. परंतु समर्थांनी केलेले पलायन हे जगावेगळेच आहे.

वयाच्या १२ व्या वर्षी लग्नमंडपातून पलायन केलेले समर्थ टाकळी येथे आलेले आहेत. रामाच्या भेटीच्या ओढीने ते बाहेर पडले आहेत. कोणी ओळखीचे नाही, जवळ काही कर्तृत्व नाही, कदाचित एकादे भरकटलेले पोर याच दृष्टीने लोक त्यांचेकडे पाहात असणार, उपेक्षाच नशिबी आली असणार, रामरायाची भेट होत नाही. जवळची माणसे स्वतःहून त्यागिली आहेत. अशी सर्व अवस्था आहे. आपण सर्वांना सोडून निघून आलो ते योग्य केले की अयोग्य? अशा मनाच्या द्विधा अवस्थेत काही काळ गेला. या काळात त्यांच्या मनाची जी अवस्था आहे. ती या वेगवेगळ्या श्लोकांच्या स्तोत्रांच्या माध्यमातून व्यक्त झाली आहे. अत्यंत व्याकूळ अवस्थेत ती व्यक्त झाली आहेत. म्हणून त्यांना 'करुणाष्टके' म्हटले आहे. कित्येक वेळा करुणाष्टके वाचताना आपलाही कंठ दाटून येतो, इतकी आर्तता त्यामधून व्यक्त होते. उदाहरणार्थ खालील श्लोक पाहावा.

जडली उपाधी अभिमान साधी ।
विवेक नाही बहुसाल बाधी ।
स्वामी वियोगे पळही गमेना ।
तुजवीण रामा मज कंठवेना ।

अशी व्यथा व्यक्त करणारे १० श्लोक आहेत.

एखादी गोष्ट प्राप्त व्हावी यासाठी जेव्हा मन व्याकूळ होते तेव्हा काय स्थिती होते याचे अलीकडील काळातले उदाहरण म्हणजे स्वामी विवेकानंदांचे गुरू श्री रामकृष्ण परमहंस यांचे जीवन. दक्षिणेश्वर मंदिरात पुजारी म्हणून काम स्वीकारले तेव्हा कालीमातेच्या दर्शनाची त्याना प्रचंड ओढ लागली होती. अनेक भाव त्यांच्या मनामध्ये निर्माण होत असत. त्या मूर्तीच्या पाठीमागे काही तत्त्व असेल तर मला माता दर्शन का देत नाही? एकच ध्यास. मला दर्शन कसे होईल? ते म्हणत 'माते तू खरोखरच आहेस ना? मग माझ्याशी बोलत का नाहीस? हा भाव त्यांचे ठायी अतिशय प्रबळ झाला. इतका की त्यांना काही सुचेनासे झाले. दिवसां मागून दिवस ते व्याकूळ होऊन रडत असत. मातेच्या दर्शनाच्या प्रतीक्षेत रामकृष्णांकडून विधिवत पूजा करणे. विधिनियमांचे यथायोग्य पालन करणेही अवघड बनू लागले, नव्हे अशक्यच झाले. शेवटी अशी वेळ येऊन ठेपली की नियमितपणे हातून पूजाही घडेना. ते स्वतः एकदा स्वामीजींना म्हणाले, या कालखंडात सूर्य कधी उगवला कधी मावळला हेही भान राहात नसे. मी जिवंत कसा होतो याची देखील जाणीव नाही. देहाचा विसर पडला, खाण्यापिण्याचेही

लक्षात राहात नसे.'' त्यांचाच एक नातेवाईक त्यांची काळजी घेई. तो बळे बळे त्यांना दोन घास भरवीत असे. दिवस संपून तिन्हिसांजा होत, मंदिरातील शंख घंटांचा नाद पंचवटीत निनादू लागे, तेव्हा तर ते अतिशय व्याकूळ होऊन स्फुंदून स्फुंदून रडू लागत. वेदनेने व्याकूळ होऊन कधी कधी जमिनीवर आपले मुख घाशीत आणि रडत जगन्मातेची प्रार्थना करीत. तू माझ्यात आविर्भूत हो. दया कर, की जेणे करून माझ्या हृदयात तुझ्याशिवाय आणखी कशाची देखील आस उरणार नाही. जगन्मातेच्या दर्शनाच्या वेडाने त्यांना पूर्ण पछाडलेले होते. अखेर मातेने त्यांची इच्छा पूर्ण केली. परंतु त्यासाठी इतकी व्याकूळता त्यांचे ठायी निर्माण झाली.

ईश्वर आहे की नाही हे जाणून घेण्यासाठी स्वामी विवेकानंदाना देखील अशीच ओढ लागली होती.

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनातही आपण पाहातो की भारतमातेपासून दूर होते तेव्हा मातृभूमीला परत येण्यासाठी त्यांच्या जीवाची इतकी तगमग झाली की, त्यांचे लेखणीतून ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला हे काव्य निर्माण झाले. ज्याला ध्येय प्राप्ती करून घ्यायची असेल तर त्यालाही ध्येयाशी इतके एकरूप व्हायला हवे. स्वामी विवेकानंद म्हणतात. 'उत्तिष्ठत, जाग्रत प्राप्य वरान् निबोधत.' समर्थांना सुद्धा रामाच्या दर्शनाची अशी उत्कट ओढ लागली होती आणि त्यांचे तोंडून करुणापरस्तोत्रे सहजच बाहेर पडली. तीच करुणाष्टके. या अशा स्तोत्रांच्या बऱ्याच रचना जशा लहान वयात निर्माण झाल्या तशा काही रचना भारत भ्रमणातही लिहिल्या असाव्यात. काही चाफळ येथे वास्तव्य असतानाही रचल्या गेल्या असाव्यात. या रचनांचा कालक्रम आणि त्या त्या करुणाष्टकातील समर्थांची मनःस्थिती लक्षात घेऊन श्री. चिंचोलकरांनी या संपूर्ण रचनांचे ५ विभाग पाडले आहेत ते असे :-

१. करुणाष्टकातील समर्थांची आत्मचरित्र

२. करुणाष्टकातील समर्थांचे अंतरस्थिती

३. करुणाष्टकातील साधकाची अंतर्यात्रा (म्हणजे साधकास उपदेश)

४. करुणाष्टकातील देवदेवतांची स्तोत्रे

५. करुणाष्टकातील समर्थांचे सामाजिक भान.

ज्यामधून समर्थांचे आत्मचरित्र व्यक्त होते अशी १३ स्तोत्रे आहेत व त्यात ११० श्लोक आहेत. खालील काही श्लोकातून त्यांच्या मनातील व्याकूळता लक्षात येऊ शकेल.

आपण काय करावे, कसे करावे याचे त्यांना त्या लहान वयात कोडे पडले होते. ते म्हणतात

उदासीन हा काळ जातो गमेना ।
सदा सर्वदा थोर चिंता शमेना ।
उठे मानसी सर्व सांडूनि जावे ।
रघुनायका काय कैसे करावे ॥
अवस्था मनी होय नाना परीची ।
किती काय सांगो गती अंतरीची ।
विवेके चि या मानसी आवरावे ।
रघुनायका काय कैसे करावे ॥

समर्थ आणखी म्हणत आहेत. हे रघुनाथा हा तुझा दास मनामध्ये अतिशय उदास झाला. सर्वच लोक या नीरस संसारात इतके गुरफटले आहेत. त्यामुळे मला तुझ्याशिवाय दुसरे कोण मार्ग दाखविणार? म्हणूनच मी तुझीच करुणा भाकतो. कारण मी काय करावे हे मला काही कळेनासे झाले आहे.

वय लहान, कोणी ओळखीचे नाही, प्रपंचात गुरफटल्यामुळे या अजाण बालकाकडे बघायला कोणाला वेळ नाही. मनात राम भेटीची ओढ तर लागलेली. पण त्याकरिता काय करावे हे नक्की समजत नाही म्हणून मनी उदास झालेले समर्थ म्हणत आहेत -

कृपाळूपणे भेट रे रामराया ।
वियोगे तुझ्या सर्व व्याकूळ काया ।
जनामाजि लौकिक हा ही न सूटे ।
उदासीन हा काळ कोठे न कंठे ॥
अखंडीत हे सांग सेवा घडावी ।
न होता तुझी भेट काया पडावी ।
दिसंदीस आयुष्य हे वेर्थ आटे ।
उदासीन हा काळ कोठे न कंठे ॥

समर्थांनी स्वतःचे आत्मचरित्रच जणू सांगितले आहे. अशी १३ करुणाष्टके आहेत.

हे रामा मला तुझ्याशिवाय मुळीच करमत नाही असे अनेक श्लोकात समर्थांनी म्हटले आहे. ते म्हणतात, मी अतिशय अज्ञानी आहे. त्या दृष्टीने मी दरिद्रीच आहे. तुझ्याशिवाय जगणे म्हणजे जणू परतंत्रताच आहे. तुझी भेट झाली तर माझा वृथा अभिमान गळून पडेल. मनःस्वास्थ्य नसल्यामुळे देहाला विश्रांती मिळत नाही. रामा मला अनेक वेळा क्रोध येतो. माझं स्वतःच हित मला कळत नाही याला कारण मला तुझी भेट घडत नाही. वास्तविक समर्थ सर्वांचा त्याग करून बाहेर पडले आहेत. का ? तर रामाची भेट व्हावी. तरीही ते म्हणतात. ''संसारसंगे बहु पीडलो मी'' शेवटी ते म्हणतात.

आम्हा अनाथा तू येक दाता ।
संसार वेथा चुकवी समर्था ।
दासा मनी आठव वीसरेना ।
तुजवीण रामा मज कंठवेना ॥

'अनुदिन अनुतापे तापलो रामराया' हे १५ श्लोक तर बहुतेक भाविक नित्य म्हणत असतात. या १५ श्लोकात समर्थांनी स्वतःकडे किती हीनपणा घेतला आहे हे पाहून आश्चर्य वाटते. रामाची अखंड आराधना चालू असूनही ते स्वतःच्या मनाला अचपळ, चंचल अशी दूषणे देत आहेत आणि म्हणत आहेत 'भजन रहित रामा सर्वही जन्म गेला.'

करुणाष्टकांमध्ये समर्थ रघुनाथाकडे बुद्धी मागत आहेत. ते म्हणतात मला युक्ती नाही, बुद्धी नाही, विद्या नाही. मला काही कळत नाही. माझे चित्त ठिकाणावर नाही. असे स्वतःलाच ते दूषणे देत आहेत. आणि म्हणून मला बुद्धी दे अशी मागणी ते रघुनाथाकडे करीत आहेत.

पुढे प्रभू रामचंद्रांनी त्यांची मागणी स्वीकारली आणि त्यांना रामचंद्राचे दर्शन झाले. त्यावर स्वतःची कृतज्ञता व्यक्त करताना समर्थ म्हणतात, 'तुझे हे ऋण मी कसे फेडू ?' ते म्हणतात, समर्था तुझे काय उत्तीर्ण वहावे'' व ''प्रभु देखीला दास संतुष्ट झाला'' असेही ते म्हणत आहेत.

करुणाष्टकांच्या दुसऱ्या भागात समर्थांची अंतरस्थिती कशी होती हे दर्शविणारी २४ करुणाष्टके असून त्यांची 'श्लोकसंख्या ७९ आहे, 'रघुनायका मागणे हेचि आता ''असं म्हणणारे ९ श्लोक आहेत. सदा सर्वदा योग तुझा घडावा हा श्लोक तर नित्य म्हटला जाणारा आहे.

एका करुणाष्टकात ते म्हणतात मला मनापासून द्रव्य, दास संसाराचा पसारा मुळीच आवडत नाही. मायेमध्ये गुंतलेले लोक तर त्यांना पहावत नसत. सामान्य माणसे उपाधींच्या मागे लागतात. त्यातून मी कोणीतरी मोठा आहे असा आभास निर्माण होतो ते समर्थांना मुळीच पसंत नाही. ते म्हणतात.

उपाधी गुणे सत्य ते मिथ्य होते ।
उपाधी गुणे मिथ्य ते सत्य होते ।
उपाधी गुणे येक रंगेविरंगे ।
उदासीन हे वृत्ति कोठे न लागे ॥
उपाधी गुणे लागतो पक्ष घेणे ।
उपाधी गुणे सत्य सोडून देणे ।
उपाधीगुणे वीषई जीव रंगे ।
उदासीन हे वृत्ति कोठे न लागे ॥

समर्थांची अंतरस्थिती अशी होती की त्यांना प्रपंचाची गोडी कधीच नव्हती. म्हणून ते म्हणतात, मला वीट आला आहे. हे रामा मला कधी कधी असे वाटते की, ''तुझा दास मी वेर्थ जन्मास आलो''

करुणाष्टकांच्या तिसऱ्या भागाला श्री चिंचोलकर यांनी साधकाची अंतर्यात्रा असे नाव दिले आहे. यामध्ये ३४ करुणाष्टके आहेत. यामध्ये समर्थांची अपेक्षा अशी की, साधकाने देहाला अती महत्त्व देऊ नये. शहाणपणा अंगी बाणण्याचा प्रयत्न करावा. मी थोर, मी शहाणा, मी धूर्त, मी कर्तृत्ववान अशा प्रकारच्या गर्वाला स्वतःच्या स्वभावाला स्थान नसावे. अशा प्रकारचा बोध साधकांनीही घ्यावा अशी समर्थांची अपेक्षा असेल कदाचित :

या तिसऱ्या भागामध्ये परनिंदा व निंदक ही करुणाष्टके तर प्रत्येक साधकाने अवश्य वाचावी व त्यावर जरूर विचार करावा यामध्ये साधकाने कधीही कुणाची निंदा करू नये ही ताकीद समर्थ देतात. परनिंदेत दोन प्रकारच्या निंदा तर फार मोठा प्रमाद आहे. एक स्त्रियांची निंदा दुसरी साधुसंतांची निंदा. समर्थ म्हणतात -

बहुता दिसांच्या वयोवृद्ध मूला ।
जनी बायकोच्या गुणे जन्म तुला ।
तये जननीच्या कुळा निंदितोसी ।
वृथा पुष्ट तू मानवांमाजि होसी ॥
नको रे नको मानवा साधुनिंदा ।
नको रे नको निंदिता थोर बाधा ।
जिता सीध चि यातना पावशील ।
अंती रवरव योगिता जाणवेल ॥

करुणाष्टकातील चौथ्या भागात समर्थांनी अनेक देव-देवतांची स्तुती स्तोत्रे रचिली आहेत. त्यामध्ये गणेश, शारदा, सद्गुरू, संत - सज्जन, श्रीकृष्ण वगैरे देवतांची स्तुती आहे.

''श्रीराम राम हे म्हणा'' या छोटेखात्री स्तोत्रात श्रीसमर्थांची श्रीरामभक्ती उत्कटत्वाने प्रत्ययात येते. ''भगवान शंकर पार्वतीजवळ आपले गुह्य प्रकट करणारे आत्मकथन करीत आहेत, अशी सुरम्य कल्पना या स्तोत्रात समर्थांनी मांडली आहे. अशी टिप्पणी चाफळ श्रीराम देवस्थान ट्रस्टचे डॉ. वसंत वैद्य यांनी केली आहे. या स्तोत्रात श्री शंकर पार्वतीला आपला स्वतःचा अनुभव सांगताना म्हणतात.

विखे बहुत जाळिले । विशेष अंग पोळिले ।
प्रचीत माझिया मना । श्रीराम राम हे म्हणा ॥
विशाल व्याळ व्यस्तकी । नदी खळाळ मस्तकी ।
ऋषि भविष्य कारणा । श्रीराम राम हे म्हणा ॥
अपाय होत चूकला । उपाय हा भला भला ।
नसे जयासि तूळणा । श्रीराम राम हे म्हणा ॥

शंकर म्हणतात, जेव्हा मी हलाहल विष प्राशन केले तेव्हा माझ्या शरीराचा प्रचंड दाह होऊ लागला. काही केल्या शमेना, अगदी शरीराभोवती सर्प लपेटून घेतले. बर्फासारखा शीत असा गंगेचा श्रोत शिरावर घेतला तरी काही फरक पडला नाही. अखेर रामनाम-अखंड रामनामाने हा दाह शांत झाला व मी वाचलो.

सगुणोपासना या चौथ्या भागात अशी एकूण १७ करुणाष्टके असून त्यांची श्लोकसंख्या १५९ इतकी आहे. श्रीसमर्थांचे सामाजिक भान हे करुणाष्टकांच्या पाचव्या भागात प्रकट होते. यामध्ये ७ करुणाष्टके असून त्यामध्ये एकूण ८३ ओव्या आहेत.

तुळजाभवानी ही शक्तिमाता असल्यामुळे दुर्बल हिंदू समाज तिने बलसंपन्न करावा आणि लोकांच्या प्रयत्नातून धर्माचा कैवारी राजा जन्माला यावा ही स्वतःच्या मनातील तळमळ समर्थांनी या स्तोत्रामध्ये व्यक्त केली आहे. 'भारत भ्रमण काळामध्ये देशस्थिती त्यांच्या लक्षात आली व म्हणूनच तुळजाभवानीला साकडे घालावे असे समर्थांनी ठरविले असावे. खालील ४ श्लोकांमध्ये समर्थांनी साऱ्या हिंदू समाजासाठी भवानीमातेकडे मागणे मागितले आहे.

येकची मागणी आता । द्यावे ते मजकारणे ।
तुझा तू वाढवी राजा । सीघ्र आम्हासि देखता ।
दुष्ट संहारिले मागे । ऐसे उदंड ऐकतो ।
परंतु रोकडे काही । मूळ सामर्थ्य दाखवी ॥
देवांची राहिली सत्वे । तू सत्व पाहसी किती ।
भक्तांसी वाढवी वेगी । इच्छा पूर्ण परोपरी ।
रामदास म्हणे माझे । सर्व आतुर बोलणे ।
क्षमावे तुळजे माते । इच्छा पूर्णचि ते करी ॥

एकंदर करुणाष्टकासंबंधी विचार केला तर आपल्या असे लक्षात येईल की, सुरवातीच्या काळात लहान वयात समर्थांनी केलेल्या प्रार्थना वैयक्तिक मोक्षासाठी होत्या. जसजसे समाजस्थितीचे त्यांना आकलन होत गेले. तसतसा त्यांचा दृष्टिकोन विशाल होत गेला आहे व त्यांना प्रश्न पडला की, सृष्टीमध्ये सर्वत्र देवीची सत्ता असताना समाजाची अशी दुरवस्था का व्हावी? म्हणूनच त्यांनी देवीला साकडे घातले आहे.

समर्थ रामदासांचा मूळचा पिंड जरी आध्यात्मिक प्रवृत्तीचा असला तरी देशकाल परिस्थितीला धरून आवश्यक असलेले मनुष्य निर्माणाचे कार्य समर्थांनी फार मोठ्या प्रमाणावर केले आहे. त्याकरिता मारुतींची स्थापना, मठ स्थापना, महंतांची संघटना, त्याद्वारा लोकसंग्रह व या सर्वांचा उपयोग अखेर स्वराज्य स्थापनेकरिता समर्थांनी केला.

या दृष्टीने समर्थ रामदास आणि स्वामी विवेकानंद या दोघांमध्ये किती तरी गोष्टीत साम्य आहे असे आपल्या लक्षात येईल.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

- श्री. गो. ग. जोशी
पी १४, मौर्य विहार ,
कोथरुड - पुणे- ४११ ०३८

श्रीसमर्थ रामदास स्वामीप्रणित कीर्तनभक्ती

- डॉ. सौ. उषा गुणे



जय जय रघुवीर समर्थ ! अशी खणखणीत आवाजात घुमलेली, भक्तांनी आवेशपूर्ण आवाजात केलेली, घोषणा आपल्या कानावर केव्हाही पडली की आपल्या डोळ्यापुढे उभी राहाते समर्थ रामदास स्वामींची भव्यदिव्य मूर्ती ! वास्तविक हा जयजयकार आहे प्रभू रामचंद्रांचा आणि त्याची प्रथाही सुरू केली आहे स्वतः रामदास स्वामींनीच. परंतु समर्थ आणि प्रभू रामचंद्र यांची एकरूपता अशी विलक्षण आहे की त्या देवाचे नाव घेताच या परमभक्ताचे प्रथम स्मरण व्हावे !

आपल्या धीरगंभीर तेजस्वी व्यक्तिमत्वाने संपूर्ण मराठी मनावर साडेतीनशे - चारशे वर्षांहून जास्त काल अधिराज्य करणाऱ्या श्रीसमर्थ रामदास स्वामींचे चरित्रही अगदी अलौकिक आणि जगावेगळेच होते. अगदी बालपणीच विश्वकल्याण हीच आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता आहे याचे स्पष्ट भान असलेल्या नारायणाने त्या दृष्टिने जीवनाची रूपरेषा अगदी आखीव रेखीव ठरविली आणि त्याकरता सर्व लौकिकाचा त्याग करून थेट तपानुष्ठानास सुरुवात केली. कसून योग्य प्रयत्न आणि साधना करून प्रत्यक्ष भगवंताचे दर्शन, अनुग्रहही प्राप्त केला आणि जीवित कार्याची दिशाही त्यांचेकडून मिळविली.

आपल्या जीवितकार्याचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यापूर्वी देश काल परिस्थितीचे आकलन करून घेणे आवश्यक असते तरच त्याला पूर्णता येते ते यशस्वी होते या धारणेने त्यांनी हिमलयापासून कन्याकुमारीपर्यंत सर्व देशभर पायी पायी भ्रमण केले. लहानमोठी नगरे, कुग्रामे, देवालये, तीर्थालये, मठमंड्या, वाड्यावस्त्या सर्व धुंडाळून पाहिले. घरे, वाडे, राजवाडे, झोपड्या, घरांचीही घरे या सर्वांचे अंतबाह्य निरीक्षण केले, परिक्षण केले व काही निर्णयही केले. अत्यंत दुरावस्थेला पोहोचलेला अडाणी व लाचार अभावग्रस्त समाज, अन्न-वस्त्र-निवारा, उपजीविका, सुरक्षितता या सर्वांचीच अनिश्चितता असलेला हीनदीन समाज पाहिला, त्याला मुख्यतः कारणीभूत असलेले स्वार्थी, मदांध, धर्मांध यवनराज्यकर्ते पाहिले, त्यांच्याच पुढे लाचारीने गुडघे टेकणारे व स्वकीयांबद्दल बेफिकीर असलेले तत्कालीन लोकनेतेही पाहिले. या सर्वांचे त्यांनी योग्य तऱ्हेने मूल्यमापनही केले. तशातच या संकटग्रस्त परिस्थितीचे योग्य आकलन करून त्यावर योग्य, कल्याणकारी व तातडीचा उपाय शोधणारा दूरदृष्टीचा, धाडसाचा विचारवंतही त्यांना आसमंतात कुठे आढळेना !

अत्यंत विमनस्क अवस्थेत गिरीकंदरातून हिंडताना, मन वैफल्याने भारावून गेले असताना त्यांनी भगवान् रामचंद्राचा धावा आरंभिला आणि खरोखरच प्रभूंनी त्यांना दर्शन देऊन त्या घोर निराशेतून बाहेर काढले. 'प्रभूकार्याकरिताच तुमचा जन्म आहे आणि तुमच्या कार्याला प्रत्यक्ष हनुमंताचे तुम्हास साहाय्य होईल' असा आशीर्वाद दिला व मार्गदर्शनही केले. म्हणून रामदास म्हणतातः-

स्वधामासि जाता महाराजा । हनुमंत तो ठेविला याचिकाजा ।

सदासर्वदा रामदासासिपावे । खळी गांजितां ध्यान सांडूनि धांवे ।

समर्थांचा आनंद गगनांत मावेना । त्यांना कार्याची दिशा मिळाली. आता प्रयत्नपूर्वक त्याला गती द्यावयाची. शक्ती आणि युक्ती बुध्दी आणि भक्ती यांची सांगड घालून जनजागरण करावयाचे ! प्रभू रामचंद्र व महाबळी हनुमान यांचा आदर्श लोकांसमोर ठेवून त्यांना कार्य प्रवृत्त करावयाचे. श्रद्धाळू भाबडीसाबडी भक्ती करणाऱ्या समाजाला खऱ्या देवाचे स्वरूप सांगून खरी भक्ती करायला शिकवायचे. त्यांतच त्यांचा प्रपंच व परमार्थ सफल होतात हे पटवून द्यायचे.

समर्थ महाराष्ट्रात परतले आणि महाबळेश्वराचे पूजन करून चाफळ खोऱ्यात उतरले. शक्तिच्या आराधनेकरता जागोजागी महाबली हनुमंताची देवालये स्थापन करून तरुणांना बलसंवर्धन करण्याकरता प्रवृत्त करावयाचे आणि तेथेच नवविधाभक्तीद्वारा परमेश्वराची उपासना करून त्यांचे ज्ञानही वाढवावयाचे अशी समर्थांनी रुपरेषा ठरविली. मोडकळीस आलेल्या, भंगलेल्या मंदिरांचा जीर्णोद्धार करून किंवा नवीन देवालये स्थापन करुन तेथे सामर्थ्यच सद्विचार प्रसृत होतील अशी कार्याची मांडणी केली. ती प्रत्यक्षात आणण्याकरिता आपल्याबरोबरच सुजाण कार्यकर्त्यांची आवश्यकता भासू लागली म्हणून सर्व मठ-मंदिरांत कार्यास वाहून घेतलेल्या महंतांची नेमणूक केली. त्यांना ज्ञान-भक्ति-कर्म व उपासनेचा मंत्र देऊन प्रशिक्षित केले व आदर्श आचार संहितेचा दंडक देऊन कुशल निस्पृह कार्यकर्ते बनविले.

आता प्रत्यक्ष जनजागरण करण्याकरता जनांचा समुदाय झाला पाहिजे. तो होण्याकरिता जनांना आवडणारे उपक्रम तयार करून त्यातूनच त्यांचे उद्‌बोधन करावयाचे समर्थांनी ठरविले. त्यांच्या भाबड्या श्रद्धास्थानांना जराही धक्का न लावता. त्यांचा बुद्धिभेद न करतां त्यांना हळूहळू शिकवून शहाणे करावयाचे, आपला खरा देव, खरा धर्म, आपली खरी अस्मिता कशात आहे ते त्यांना दाखवून द्यायचे, त्याकरिता श्रवण, कथा कीर्तन, निरुपण इत्यादी अंतरंग प्रबोधनकारी उपक्रम चालू केले. त्याचबरोबर पूजाअर्चा, देवांचे महोत्सव, तीर्थाटन इत्यादी बहिरंग उपक्रम सांगितले व करवून घेतले.

कायावाचा आणि मने । चित्तेवित्ते जीवेप्राणे। सद्भावे भगवंत अर्पणे या नाव आर्चन भक्ति ॥४-६-२९॥

या सर्व उपक्रमामध्ये कथा - कीर्तनासारखा उपक्रम एकाचवेळी अंतरंग विचार प्रवर्तक व बहिरंग : एकत्रिकरण, मनोरंजन, सर्वांचा सहभाग होईल असा असल्यामुळे तो लोकांना जास्त आवडतो हेही समर्थांनी लक्षात घेतले होते. त्याकरता प्रत्येक महंताला हरिकथा कीर्तन व अध्यात्म निरुपण उत्तमरीतीने करता आलेच पाहिजे असा समर्थांचा कटाक्ष होता.

कीर्तनाचा उद्देश व स्वरूप : समर्थपूर्व कालापासून कीर्तनाची परंपरा देशामध्ये चांगली रुजलेली होती. नाचूं किर्तनाचे रंगी - ज्ञानदीप लावू जगीं ॥ असे म्हणणाऱ्या नामदेवांनी भक्तजनांना आणि जनार्दनालाही आनंदाने

नाचायला लावले होते. भजन कीर्तन व नामसंकीर्तन हा तर वारकरी पंथाचा बाणाच होता. संत एकनाथांनी आजन्म कथा कीर्तनाचा वसा घेऊन अखेरपर्यंत चालविला. त्यामुळे कीर्तनातून ''ज्ञानप्रबोधन'' उत्तम प्रकारे होते हे समर्थांच्या निरिक्षणातून कसे सुटेल? परंतु हे प्रयत्न एकाकी असत व त्या त्या संतांच्या कार्यक्षेत्रापुरते मर्यादित राहात. परंतु एकाच काळात संपूर्ण महाराष्ट्राच्या अनेकानेक मठातील अनेक महंतांनी 'रामकथेने ' आसमंत दुमदुमवून टाकल्यावर समाज जागरणाला कसे उधाण येईल याचा समर्थांना अचूक अंदाज होता. ते म्हणत 'रामकथा ब्रह्मांड भेदूनी पैलाड न्यावी ।

याकरिता त्यांनी कार्याची चतुःसूत्री ठरविली - मुख्य हरिकथा निरुपण । दुसरे ते राजकारण । तिसरे सावधपण सर्व विषयी ॥ चौथा तो साक्षेप । फेडावे नाना आक्षेप । अन्याय थोर अथवा अल्प । क्षमा करीत जावे ॥ त्याकरिता महंताने प्रथमतः स्वतः सर्व विषयांसहित हरिकथा कीर्तनांचे श्रवण - मनन - चिंतन करावे. नंतर आपल्याला जे समजले ते इतरांना सांगण्याकरिता स्वतःच कीर्तन करायला लागावे.

त्याकरिता :- बहुत करावे पाठांतर । कंठी धरावे ग्रंथांतर । भगवत् कथा निरंतर । करीत जावी ॥४-२-२

कीर्तनाचा उद्देश लोकांचे नुसते मनोरंजन करून लोकांना खूश करणे हा होवू शकत नाही. परंतु नुसत्या शिक्षकी थाटात, जड जाबाल, कंटाळवाण्या भाषेतला उपदेश लोकांना फारसा कधीच रुचत नाही. म्हणून कीर्तनकाराने 'करुणा कीर्तनाच्या लोटे । कथा करावी घडघडाटे । श्रोतयांची श्रवणपुटे । आनंदे भरावी ॥ ' ४-२-१२॥ असे समर्थ आवर्जून सांगतात. त्याकरिता नवरसांनी युक्त गद्यपद्ये,श्लोक, दोहे, वीररसयुक्त पोवाडे, क्वचित प्रसंगी श्रृंगारिक कवने आणि आल्हाददायक विनोदही करावा. भगवंताला कीर्तन प्रिय आहे म्हणून कीर्तन करणे ही भगवंताची सेवा - भक्तिच होय. त्यामुळे स्वतःस व ऐकणाऱ्या सर्वांना समाधान प्राप्त होते व संसार दुःखातून योग्य मार्ग सापडतो. आपल्या कीर्तनाचा परिणाम लोकांच्या मनावर चांगल्या तऱ्हेने व्हावा म्हणून टाळ, मृदुंग, वीणा इत्यादी वाद्यांसहित सुंदर मनोहारी कवने उत्कृष्ट संगीतात सादर करावी; व त्याला यथोचित असे नृत्य प्रकारही सादर करावेत. समर्थ म्हणतात

ताळ तंबुरे तानमाने । ताळबद्धतंतगाणे । तूर्त तार्कीक तनेमने । तल्लीन होती ॥ थर्थरा थरकती रोमांच । थै थै थै उंच स्वर । थिर थिर थिर थिरावेनाच । प्रेमळ भक्तांचा रागरंग रसाळ सुरंगे । अंतर संगीत रागे । रत्नपरीक्षा रत्नामागे । धावती लोक ॥१४-४॥

दिव्य रत्नासारखी सौंदर्ययुक्त वस्तू पाहण्याकरिता लोक आतुरतेने धावत सुटतात तसेच संगीत, नृत्य, नाट्य यांचे उत्तम सादरीकरण करणारे कीर्तन लोकांना हमखास आवडते व त्यांच्या मनावर त्याचा खूप खोलवर परिणाम होतो व हा परिणाम तात्कालिक न होता विचार जागृती करणारा होतो.

कीर्तनाला येणारा श्रोतृवर्ग सर्व पातळीचा असतो त्यात ज्ञानी, अज्ञानी, सुशिक्षित - अशिक्षित, उच्च भ्रू-सामान्यजन, स्त्रीया पुरुषमुले वृध्द सर्वांचा समावेश असतो. सर्व तऱ्हेच्या स्वभावाची, सर्व व्यवसायातली, सर्व मानसिक बौद्धिक पातळीची माणसे कीर्तनाचा लाभ उठविण्याकरिता येत असतात आणि कीर्तनाचीही समग्रता व व्यापकता अशी आहे की अशा सर्व प्रकारच्या माणसांना त्यांच्या आवश्यकतेनुसार, आनंद, समाधान, समस्या निवृत्तीचे उपाय, तोडगे, नवीन मार्ग दिशा सापडतातच !

समर्थ म्हणतात 'कीर्तन वाचा पवित्र किर्तन होय सत्पात्र । हरिकीर्तने प्राणीमात्र । सुशील होती कीर्तने अवेग्रता घडोकीर्तन निश्चयसापडे । कीर्तने संदेह बुडे । श्रोतया वक्तयाचा ॥ म्हणोनि कीर्तनाचा अगाधमहिमा । कीर्तने संतोषे परमात्मा । सकल तीर्थे आणि जगदात्मा । हरिकीर्तनी वसे ॥४.२.२८.२९.३१॥

कीर्तनाचे विषय : समर्थांची कीर्तनभक्ती लोकांचे केवळ मनोरंजन करण्याकरतां नव्हती, तर एक विचारानें भारलेला समुदाय निर्माण करून त्याचेसमोर त्याला उद्‌बोधक अशा विषयांची मांडणी करणे व त्यातून समाजाला स्वहितार्थ विचार प्रवृत्त करणे याकरिताच होती. सामान्य माणसाला आपापल्या प्रापंचिक समस्या, त्यातील सुखदुःखे आशानिराशा यांनी घेरलेले असते. परंतु या सर्वांची मुळे कुठे किती खोल रुजलेले आहेत, त्याला जबाबदार कोण इतका खोल विचार त्याला समजत नाही. तितकी अंतर्मुखता व ज्ञान त्याचे जवळ नसते. अशा वेळी वरवरचे उपाय सुचवून त्याची दिशाभूल करणाऱ्या संधिसाधू, भोंदू लोकांचे फावते. अनेक देवदेवतांची पुण्यपापाची खरी खोटी भीती दाखविणारे तथाकथित शास्त्रीपंडीत, अनेक तऱ्हेची लालूच दाखवून किंवा वेळ प्रसंगी जबरदस्तीने धर्मांतर करविणारे धर्मांध, रुढीपरंपरा श्रेष्ठकनिष्ठता यांचा बडिवार माजविणारे समाजधुरिण या सर्वांमुळे अनेक तऱ्हेचे वैचारिक गोंधळ विसंगती, संघर्ष समाजात माजून राहातात. समाज व व्यक्ती बेशिस्त, निष्क्रिय, आळशी दूरदृष्टिचा अभाव असलेला, तात्पुरता स्वतःचा स्वार्थ साधणारा लाचार होवून जातो. संपूर्ण समाजच विस्कळीत होवून जातो, निर्नायकी होतो आणि दुर्दैव हे की असे विचारांचे दुर्भिक्ष हेच आपल्या दुर्गतीचे कारण आहे ह्यांचेही त्याला आकलन होत नाही. हे सर्व जिव्हाळ्याचे विषय समाजापुढे मांडणे ही काळाची निकड होती. समर्थांच्या काळी लोक शिक्षण, प्रबोधनाकरिता कीर्तन हेच माध्यम सहज सुलभ होते. लेखन, वाचन, संस्कृती सामान्य समाजापासून खूपच दूर होती. म्हणून समर्थांनी कथा कीर्तन माध्यमाचा खूप उपयोग करून घ्यावयाचे ठरविले व त्याला अग्रक्रम दिला. कीर्तनाचे विषय सांगताना समर्थ म्हणतात -

भक्ति ज्ञान वैराग्य लक्षण । नीति न्याय स्वधर्म रक्षण । सावधमार्ग अध्यात्म निरुपण । प्रांजळ बोलावे ॥४.२.१६॥ प्रसंगेहरिकथा करावी । सगुणी सगुणीकीर्ती धरावी । निर्गुण प्रसंगे वाढवावी । अध्यात्मविद्या ॥४.२.१७॥

अशा तऱ्हेने प्रपंच परमार्थाचा समतोल कीर्तनाच्या माध्यमातून लोकांना दाखवून देता येतो. याखेरीज दासबोधामध्ये समर्थांनी करंटलक्षण, टोणपसिद्धलक्षण, जनस्वभाव निरुपण, युगधर्मनिरुपण, जगजीवन निरुपण इत्यादी समासातून सामाजिक, व्यक्तिगत दोषांवर अचूक बोट ठेवले आहे. तसेच हे दोष निवारण करण्याचे उपायही लगेच दाखविले आहे. त्याकरिता चातुर्य निरुपण, उत्तमपुरुषनिरुपण, येत्ननिरुपण, प्रत्ययनिरुपण, सदेव लक्षणनिरुपण, निस्पृह वर्तणूक इत्यादी समास खर्ची घातले आहेत.

महंतांनी या सर्व विषयांचा चांगला अभ्यास करून त्या त्या परीस्थितीला, विषयाला उपयुक्त अशी आख्याने, चरित्रे, लोककथा, बोधकथा आपल्या कीर्तनाकरिता निवडावी व समाजाचे प्रबोधन करावे. समर्थ स्वतः साक्षात्कारी संत होते तरी त्यांनी आपल्या लौकीक जीवनांत समाज शिक्षकाची भूमिका धारण केली ; व महंतांनीही त्याचप्रमाणे कार्य करावे असे त्यांना अपेक्षित होते.

महंत कीर्तनकार हा प्रेमळ सुबुद्ध शिक्षकाप्रमाणे आपल्या विद्यार्थी समाजाच्या अडचणी, स्वभाव, विकार आवडी निवडी या सर्वांचे बरोबर निरिक्षण करतो व त्याला सुयोग्य वळण लावतो. 'बरे सत्य बोला - यथातथ्य चाला । बहुमानिती लोक येणे तुम्हाला ।' किंवा भला रे भला बोलती ते करावे । बहुतां जनाच्या मुखे यश घ्यावे । 'अशा अगदी प्राथमिक सूचनाही समर्थ आपल्या स्फुटकाव्यातून, मनोबोधातून सोप्या भाषेत करतात. कीर्तनकारानी ही अशीच शिकवण समाजाला द्यावी. आपले आरोग्य, आपली दिनचर्या, आपला व्यवसाय व आपले आयुष्यही उन्नतीकारक होण्याकरता व्यक्तीने सतत जागरूक

प्रयत्नशील असले पाहिजेच व महंतांनी आपल्या कीर्तनातून त्यांना मार्गदर्शन केले पाहिजे हे अपेक्षितच होते. समर्थ तळमळीने सांगतात.

शिका रे शिका रे फिका जना जातो । नका रे नका रे तुका घात होतो ।
तुटे तुक त्या भिक तेहि मिळेना । गुणेवीण लोकांस कांही कळेना ॥

समाजाचे व व्यक्तिचे गुण संवर्धन झाले पाहिजे व त्याला महंतांनी आपल्या कीर्तनातून शिकवण दिली पाहिजे. त्याकरिता कीर्तनकार कसा असला पाहिजे त्याचेही समर्थ चित्र रेखाटतात.

कीर्तनकार - समर्थांचा महंत कीर्तनकार हा समाजाचा शिक्षक, नेता, साहाय्यकर्ता, अशा अनेक भूमिका स्वीकारलेला पण परमार्थ साधक आहे. त्यामुळे त्याचा स्वभाव, त्याचे ज्ञान, जनता संपर्क आणि लोकसंग्रह व प्रत्यक्ष कीर्तन कलेतील निपुणता, सादरीकरण उत्कृष्टच असले पाहिजे असा समर्थांना आग्रह असे. त्याहिपेक्षा त्याचे चारित्र्य वर्तनही शुद्धच असले पाहिजे याबद्दल समर्थ फार दक्षता घेतात. समाज अनुकरणशील असतो हे ध्यानात ठेवून कीर्तनकाराने आपले चारित्र्यशीलशुद्ध,आर्दशभूत असले पाहिजे याकरता आटोकाट प्रयत्न करावा असा समर्थांचा आदेश आहे. म्हणून ते म्हणतात 'असो वक्तृत्वाचा अधिकार । अल्पास न घडे सत्योत्तर । वक्ता पाहिजे साचार । अनुभवाचा ॥' ४.२.२४

'जैसे मुखे ज्ञान बोले । तैसिच सवे क्रीया चाले । दीक्षा देखोनि चकीत झाले । शुचिश्मंत ॥' १२.४.१३

आस्था नाही त्रैलोक्याची । स्थिती बाणली वैराग्याची । येत्न - विवेक - धारणेची । सीमा नाही ॥१२.४.१३

महंताने समाजाच्याकडून परतफेडीची यत्‌किंचीत् आशा न धरता स्वतःचा प्रयत्न सतत चालू ठेवावा. विवेक वैराग्याच्या सर्व सीमा ओलांडाव्या. तरीही लौकीक व्यवहार चालू ठेवावा.

प्रखर वैराग्य अुदासिन । प्रत्ययाचे ब्रह्मज्ञान । स्नानसंध्या भगवत् भजन । पुण्यमार्ग ॥ १२.४.१८॥

तैसे ज्ञानेतृप्त व्हावे । तेचि ज्ञान जगास सांगावे । तरतेन बुडो ने दावे । बुडतयासि ॥१२.३.२॥

तत्काळचि सन्मार्ग लागे । ऐसा अंतरी विवेक जागे । वक्तृत्व करिता न भंगे । साहित्य प्रत्ययाचे ॥१२.४.१६॥

स्वतः सन्मार्गाची कास न सोडतां इतरांनीही त्याचेच अनुसरण करावे याकरता समाजमनात विवेक विचार जागृत झाला पाहिजे इतके त्याचे बोलणे, साहित्य प्रत्ययकारी, स्वानुभवाचे असले पाहिजे; तरच त्याचा प्रभाव पडतो हे कीर्तनकाराने सतत ध्यानात ठेवावे असे समर्थ सांगतात.

कीर्तनकाराचे मुख्य लक्षण असावे प्रत्ययाचे. ज्ञान व ते व्यक्त करण्याचे त्याचे साधन आहे त्याची वाणी, शब्द, ते शब्द घटवून प्रभावी करण्याकरता त्याने वाणीची उपासना कशी करावी या करता समर्थांनी अनेक समास लिहिले आहेत. शब्द, त्याच्यामागे असलेला त्याचा मुख्य आशय, त्याचेज्ञान, त्या शब्दाचा सुयोग्य उच्चार, त्याकरिता आवश्यक ते पाठांतर, अर्थांतर, त्यांची आपल्या शब्दात सुयोग्य मांडणी, स्वतःच्या स्वतंत्र रचना, कवित्व व या सर्वांमधून साधावयाचा परिणाम याबद्दल कीर्तनकराने खूप प्रयत्नशील असावे असे समर्थ सांगतात. सुरुवातीस पाठांतर मग धीटपाठ रचना व यथाक्रम प्रासादिक कवित्व करण्यास शिकावे. असे प्रासादिक कवित्व करण्याकरता शब्द योजना, विषय, वर्णने अचूक प्रत्ययकारी असावीत पाल्हाळीक कंटाळवाणे असू नये.

मृदू मंजूळ कोमळ । भव्य अद्‌भूत विशाल । मौल्य माधुर्य रसाळ । भक्तिरसे ॥१४.३.४०॥

नाना प्रसंग नाना विचार । नाना योग नाना विवर । नाना तत्व चर्चासार । या नाव कवित्व ॥१४.३.४६॥

जेणे सद्‌बुद्धिलागे । जेणे पाषांड भंगे । जेणे विवेक जागे । या नाव कवित्व ॥१४.३.५१॥

अशा तऱ्हेने प्रयत्नपूर्वक आपली भाव समृद्धि करून ती साग्रसंगीत कीर्तनाच्या माध्यमातून सादर करावी व लोकांकडून यश कीर्तीची पावती घ्यावी. पण त्यातही विनम्रता रहावी म्हणून

कवित्वशब्द सुमनमाळा । अर्थ परिमल आगळा । तेणे संतषट्‌पद कुळा । आनंद होये ॥१४.३.१ ॥ ऐसी माळा अंतःकरणी । गुंफून पूजा रामचरणी । अंतरी बैसला गोविंद । तेणे लागला भक्तिछंद । भक्तिवीण अनुवाद । आणिक नाही ॥१४.३.२६॥

विनम्र भावाने आपले कवित्व आपली कीर्तनसेवा परमेश्वराच्या पायाशी अर्पण करावी व कीर्तनकाराने समाधानाने कृतकृत्य व्हावे, त्याचबरोबर कीर्तनपरंपरा, त्यातून ज्ञानप्रसार हे कार्य सतत पिढ्यानुपिढ्या चालू ठेवणे हीसुद्धा महंत कीर्तनकारांची जबाबदारी असते. म्हणून त्यानें सुयोग्य शिष्य शोधून त्यांना ही दीक्षा दिली पाहिजे. 'अधिकार परत्वे कार्य होते । अधिकार नस्ता वेर्थ जाते । जाणोनि शोधावी चित्ते ॥ नाना प्रकारे ॥ महंते महंत करावे । युक्ति बुद्धिने भरावे । जाणते करोनी विखरावे । नाना देसी ॥११.१०.२५॥

महंतांनी आपल्यासारखे जाणते, सुबुद्ध महंत तयार करावे व त्यांना कीर्तनादि सर्व विद्या देऊन कार्याचा प्रसार करण्याकरिता सर्वदूर पाठवावे असा दूर दृष्टिचा अदेश संत रामदास स्वामी देतात.

समर्थांचे एक स्वप्न होते. जगातील सर्व दुःखे, सर्व दुराचार, अनिष्ट वृत्ती विकार नष्ट होवून सर्व जीवांना, मनुष्य भावांना सुखासमाधानाने, संतोषाने जगण्याचे एक स्वर्गोपम स्थान निर्माण व्हावे. जणू दुसरे रामराज्यच ! त्याला समर्थांनी नांव दिले होते. 'आनंदवनभुवन ' ! ते स्वप्न आपल्या डोळ्यादेखत साकार व्हावे यासाठी त्यानी जीवनभर अविश्रांत प्रयत्न केले. छत्रपती शिवाजी राजांच्या कार्यरूपाने ते साक्षात्. होताना त्यांनी ते पाहिले. अत्यंत आनंदानी त्यानी रामवरदायिनी तुळजामातेला गळ घातली . तुझा तू वाढवी राजा । शीघ्रचि आम्हासी देखतां ।

हा आनंदसमाधानाचा, मोकळेपणाचा, स्वातंत्र्याचा अनुभव देवदुर्लभच होता ! कीर्तनाच्या माध्यमातून समर्थांना तो आनंद लोकांपर्यंत पोहोचविला आणि महाराष्ट्राला असंख्य पिढ्यांना उपकृत करून धन्य धन्य केले.

अशा समर्थ संत रामदास स्वामींना वारंवार विनम्र प्रणाम !

डॉ. सौ. उषाताई गुणे
गुणे बंगला, मार्केट यार्ड,
पेट्रोल पंपासमोर,
सांगली



श्री समर्थांची पत्रिका

- सौ. वर्षा विलास गोरे



॥ श्रीराम ॥

"जय जय रघुवीर समर्थ"

॥ श्री समर्थ रामदास॥


जन्म ता. १४/०३/१६०८


जन्मवेळ - १५ घटी ०७ पळे, चैत्र शुद्ध नवमी

जन्म ठिकाण - जांब, रास - मिथुन

शके - १५३० ,जन्म नक्षत्र - पुनर्वसु - ३ रे चरण

॥ जन्मलग्न कुंडली ॥ ॥ नवमांश कुंडली ॥





लग्न - ०२/२२°/४३

रवि - ११/१५°/२३

चंद्र - ०२/२६°/४२

मंगळ - ०७/१६°/४४

बुध - ११/१५°/४९

गुरु - ११/२९°/२३

शुक्र - १० / ०१°/०६

शनि - ०८/१०°/०५

राहु - ०४/०५°/२४

केतु - १०/०५°/२४

हर्षल - ०१/१३°/०९

नेप - ०४/२५°/२१

प्लुटो - ००/१२°/१२

● गुरु वर्गोत्तम (नव)


● चंद्र वर्गोत्तम (नव)

(● चंद्र मंगळ प्रतियोग)

● शुक्र उच्च (नवमांश)

● मंगळ अग्नीराशीत

● गुरुच्या दृष्टित -
शनि, प्लुटो, रवि,
बुध, नेप, केतु.



श्रीसमर्थांची पत्रिका मिथुन लग्न व मिथुन राशीची आहे. दोन्ही कुंडल्या एकाच राशीच्या असल्याने मिथुन राशीचे गुण प्रकर्षाने व वाढीवपणे लक्षात येतात. प्रगल्भ बुद्धीमत्ता, उत्तम स्मरणशक्ती, अचूक परिक्षण, निरीक्षण, कल्पना, उत्तम तर्क, निर्मिती क्षमता व संशोधनाची आवड हे विशेष गुण मिथुन राशीत आहेत व हे सर्वच्या सर्व श्रीसमर्थांच्या व्यक्तित्त्वाचे महत्त्वाचे पैलू आहेत. तिथेच चंद्र पुनर्वसु या गुरुच्या नक्षत्रात असल्याने वृत्ती, मन, पूर्णतः धार्मिक व रामचरणी अनन्यभाव होता. श्रीसमर्थांनी आपल्याला डोळसपणे जगायला शिकविले. मानवजातीचे कल्याण व भले करण्यास त्यांनी खूप धडपड व अपार कष्ट केले. त्यांचे व्यक्तिमत्व परिपूर्ण, खंबीर होते. आपण फक्त त्याचे योग पत्रिकेतून बघणार.

चंद्र हा मिथुन राशीत मूळ कुं.त आहे. नवमांश कुंडलीत तो वर्गोत्तम झाला आहे. त्याचे बल वाढले आहे. तसेच समर्थ कणखर दृढ, खंबीर होते. सावधवृत्ती, डोळसपणा, अफाट बुद्धीमत्ता, कुशाग्रता, चाणाक्षपणा असे विविध गुण दिसतात. लग्नेश बुध दशमात रविच्या युतीत, तिथेच मीनेचा गुरु नवमांशात वर्गोत्तम झालेला आहे म्हणून समाजासाठी काम करण्याची प्रबळ इच्छा! दासबोध या ग्रंथातून लोकजागृती केली. निष्काम कर्मयोगाचे समर्थांनी ठासून सांगितले. प्रत्येक काम खरेपणाने, सचोटीने सच्चेषणाने करावे हा संदेश दिला.

यांचा जन्म चैत्र शुद्ध नवमीला दु. १२ च्या दरम्यान झालेला आहे.

श्रीराम हे त्यांचे दैवत!

त्यांच्या वागण्याचा आदर्श त्यांनी समाजापुढे ठेवला. सत्याची कास धरावी. मात्र अकारण कुणाला दुखवू नये. दशमातील रवि, बुध, गुरु यामुळे समाजासाठी, समाज उन्नतीसाठी उद्धारासाठी त्यांचे डोळस प्रयत्न होते. तसेच देह स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. बलोपासना करायला प्रवृत्त करून तरुण पिढीला आदर्श दिला. जीवन म्हणजे नुसता विलास किंवा आळस नव्हे! जाणत्यामुलाने वडिलांचे फुकट खाऊ नये; हा स्वाभीमान जागवला. त्यासाठी ते समाजाचे पिता झाले व त्यांनी कणखर व शिस्तबद्ध नेतृत्व केले.

आपले कर्म करताना खोटेपणा, भ्रष्टाचार, चुकारपणा, आळस करू नये. मात्र यात कुणावर अन्याय ही करू नका. तसेच उगाच कुणाचा अन्याय सहनही करू नका. असा स्पष्ट संकेत दिला. त्यासाठी ज्ञानी व्हा. डोळस व्हा. विद्यावान व्हा. अंधश्रद्धेने वागू नका.

मंगळ हर्षलचा प्रतियोग याने त्यांचे मनोबल दृढ होते. विश्वास पूर्वक ज्ञानाच्या कसोटीवर जे योग्य तेच व तसेच निर्णय घ्या व वागा. ज्ञानी झाले की, भ्रम, शंका राहात नाहीत यावर त्यांचा विश्वास होता. त्यांचा दरारा होता. त्यामुळे त्यांच्या हयातील मोंगलानी त्यांच्या मठावर हल्ला करण्याचे धाडस कधी केले नाही.

मनोबल वाढविण्यासाठी शरीरही कणखर हवे हे त्यांना कळत होते. वृश्चिक या स्वराशीचा मंगळ षष्ठात उत्तम शारीरिक कुवत दाखवतो. नवमांश कुंडलीत भाग्यात अग्निराशीत म्हणजे धनुराशीत मंगळ आहे. मंगळ हा जमीनीचा कारक ग्रह आहे. गुरुच्या दृष्टीत मंगळ असून नवमांशात मंगळाच्या दृष्टीत व्ययात गुरु आहे. भाग्य, पंचम, व्यय ही स्थाने उपासना, तीर्थयात्रा, अशी कारकत्वे दाखविते. त्यानुसार मारुतीच्या मंदिरांची स्थापना समर्थांनी केली. ११ मारुतींची स्थापना त्यांनी केली आणि रामावर अपार प्रेम केले.

पंचमेश शुक्र कुंभेत भाग्यात केतूच्या युतीत व राहुच्या प्रतियोगात आहे.

ज्यास जशी अनुरूप तशी उपासना श्रीसमर्थ सांगत होतेच. साधनमार्गावरील वाटचालीस सुलभ मार्गदर्शनही होत होतेच. पण हळू हळू या उपासना - साधना पद्धतीत सर्वसमावेशक एकसूत्रता आणण्याची निकड श्रीसमर्थांना जाणवू लागली. श्रीसमर्थांची स्वतःची साधनेची बैठक दृढ आणि सिद्ध होती; वाटचालीची दिशा निश्चित होती. आणि ध्येयध्वजावरील दृष्टी अविचल होती. दृढतर साधना, खडतर वाटचाल आणि निर्णायक ध्येयसिद्धी या बद्दल अंतरंग शिष्यवर्गास उद्बोधक होईल अशी 'एकवीस समासी जुन्या दासबोधाची' रचना या काळात झाली.

'तपश्चर्येच्या आणि तीर्थाटणाच्या काळात समाज जागृतीचे कार्य चालू असताना सहज स्फुरणारे काव्य निर्माण होत होते. या काव्यातून श्रीसमर्थांचे जनकल्याणकारी तळमळीचे विचार व्यक्त होत. लोकांना मार्गदर्शन मिळे. उपदेश लाभे आणि स्फूर्ती प्राप्त होई.

श्रीसमर्थांच्या अंतःकरणात स्फुरण पावलेला हा पहिला ग्रंथ म्हणजे एकवीस समासी किंवा जुना दासबोध होय.

प.पू. दत्तामहाराज रामदासी यांचे हे विवेचन पाहता, एकवीस समासीचे स्फुरण त्यांच्या त्यांच्या १२ वर्षांच्या अनुष्ठानाचा उत्तरार्ध आणि देशाटनाची १२ वर्षे या काळात झाले आणि ग्रंथस्वरूपातील ही पहिलीच रचना आहे; हे लक्षात येते.

एकवीस समासीचे बहिरंग :-

एकवीस समासी जुना दासबोध या ग्रंथात २१ समास आणिं १३४० ओव्या आहेत.

श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरात २१ बाठामध्ये एकवीस समासीचे हस्तलिखित आहे. इ.स. १६८० ते १८९६ या कालातील ही हस्तलिखिते आहेत. उद्धवस्वामी, कल्याणस्वामी, दत्तात्रेयस्वामी, एक्केहळ्ळीकर आत्माराम आणि निंबराजबुवांकडील पोथा या प्रती उत्तम व पूर्ण आहेत. अगदी किरकोळ (पाठभेद) आहेत आणि बहुतांश हस्तदोषांमुळे आहेत. ओवीसंख्या बहुतांश प्रतीत १३४० च आहे.

एकवीस समासीतील पुष्कळशा ओव्या वीस दशकी दासबोधात आढळतात. त्याशिवाय पूर्ण ओवी नसली तरी काही ओव्यातील २/३ चरणातही साम्य असलेली स्थळे आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे निव्वळ चरण किंवा ओव्याच नव्हे तर एकवीस समासीतील ४ संपूर्ण समास जसेच्या तसे वीस दशकी दासबोधात आहेत. (श्रीकल्याण स्वामींच्या प्रतीत मात्र हे ४ समास भिन्न आहेत आणि अकरा लघुकाव्यात ते परिशिष्ट म्हणून छापले आहेत.) अन्य सर्व प्रतीत असणारे हे ४ समास असे ;

एकवीस समासी वीस दशकी

१. समास चौथा सद्गुरु लक्षणदशक ५ समास २

२.समास पाचवाशिष्य - लक्षणदशक ५ समास ३

३.समास सहावावैराग्य लक्षणदशक ३ समास १०

४.समास आठवात्रिविधात्मनिरुपणदशक १२ समास ५

'रामदास आणि रामदासी' ग्रंथमालेचा तिसरा खंड 'श्रीसमर्थांची अकरा लघुकाठो म्हणून १९३९ साली समर्थहृदय देवांनी प्रकाशित केला. अतिशय वेधक आणि उत्कट भाषाशैलीच्या देवांची फार सुंदर प्रस्तावना असलेल्या या ग्रंथाची द्वितीयावृत्ती १९९१, मध्ये सत्कार्योत्तेजक सभेने प्रकाशित केली. श्रीसमर्थ संप्रदायातील अधिकारी सत्पुरुष आणि प.पू.भगवान श्रीश्रीधरस्वामींचे प्रथम शिष्य प.पू. दत्तामहाराज रामदासी यांनी प्रत्येक समासाचा भावार्थ ग्रथीत केलेला असल्याने ही आवृत्ती ग्रंथाचे अंतरंग नीटस उलगडून दाखविते. लवकरच चौथी आवृत्ती प्रकाशित होत आहे.

एकवीस समासीच्या अंतरंगात प्रवेश

एकवीस समासीचे अंतरंग जाणण्यासाठी समर्थहृदय देवांच्या प्रस्तावनेच्या महाद्वारातून आणि प.पू. दत्तामहाराजांच्या भावार्थाच्या पायऱ्यावरून जावयास हवे. श्रीसमर्थ संप्रदायाचे केवळ महद्भाग्य म्हणूनच 'ज्ञाता आणि प्रेमळ भक्त' असे संशोधक वृत्तीचे स्वयंप्रज्ञ देव श्रीसमर्थ साहित्याच्या संशोधन - संरक्षण - प्रकाशन कार्यास लाभले आणि आपणा सर्वांची पूर्व - पुण्याई म्हणून प.पू. दत्तामहाराजांच्या सारखा श्रीसमर्थांचे भाव यथार्थतेने प्रकट करणारा स्वानुभूत साधू भावार्थ निरुपणास लाभला. नाहीतर भांडारगृहे भरलेली आहेत. सुरक्षितपणे कडीकुलुपात बंद आहेत पण रसास्वाद घेण्यासाठी किल्ली मात्र नाही अशी स्थिती झाली असती.

देवांच्या सर्वच प्रस्तावना - अगदी खोल अंतःकरणातून साक्षेपी चिंतनाच्या मंथनातून प्रकटलेले नवनीत -अशा असतात. नवनीताइतक्याच त्या मृदु आहेत, हळूवार आहेत, मधुर आहेत. कंठातून अंतःकरणात अगदी सहजतेने उतरतील अशी गौल्यता त्यास असते. त्यातही अकरा लघुकाव्याची आणि त्यातही एकवीस समासीची प्रस्तावना फारच बहारदार आहे. त्याचा एखादाच परिच्छेद संपूर्ण प्रस्तावना वाचण्यास एकवीस समासी आकलन करून घेण्यास आणि श्रीसमर्थ साहित्य जलाशयात सुखेनैव विहार करण्यास उद्युक्त करील.

'अकरा लघुकाव्यात (एकवीस समासी) हे प्रकरण सर्वांत मोठे आहे. तो स्वतंत्र ग्रंथच आहे. त्याच्या १३४० ओव्या आहेत. त्याचा मुख्य विषय आत्मज्ञानाचा आहे पण तदनुरोधाने शिष्याची तयारी व्हावी म्हणून त्यात इतर लहान मोठे स्वतंत्र विषय आले आहेत.आत्मज्ञान ही काही सोपी गोष्ट नव्हे, की पूर्व तयारीवाचून, दीर्घ प्रयत्नावाचून, साधनावाचून ती सहज प्राप्त व्हावी. म्हणून या ग्रंथाचा मुख्य विषय आत्मज्ञान असला तरी त्याच्या प्राप्तीसाठी तळमळणाऱ्या जीवाने कोणते गुण आपल्या अंगी आणावे, प्रयत्न कसकसा करावा, साधने कोणती अवलंबावी, इत्यादी शिकवण आवश्यक असल्याने या सर्व बाबींचा विचार श्रीसमर्थांनी या ग्रंथात केला आहे. नुसते ते व इतर अनुषंगिक विषय नमूद करावे म्हटले, तरी ते शेकडो निवडता येतील. तेव्हा उदाहरणार्थ म्हणून केवळ वीस विषयांची नोंद येथे करावी म्हणतो. ही इतकीं सुभाषिते आहेत............ श्रीसमर्थांची वाणी सहज स्फूर्तिची असल्याने कित्येक ... ओव्यात आणि ओव्यातील शब्दात जादू भरलेली आहे, असे वाटते. हे इतके मंत्रच आहेत की काय, असे भासते. त्यात यत्किंचित् बदल केला तर त्या मंत्रातील सामर्थ्य निघून जाईल की काय, अशी भीती वाटते. त्यात कानामात्रांचाही कोणास फरक करता येणार नाही.'

या प्रस्तावनेच्या महाद्वारातून भावार्थ सोपानाने एकवीस समासीच्या

अंतरंगात प्रवेश करू या.

एकवीस समासीचे अंतरंग -

श्रीसमर्थांच्या एकवीस समासी ग्रंथाचा एकविसावा समास म्हणजे ग्रंथाची 'अवतरणिका' आहे. वीस समासात आलेल्या विषयासंबंधी समास-वार उल्लेख या समासात आहे. श्रीसमर्थांच्या अन्य ग्रंथात अशा प्रकारे ग्रंथसमाप्ती नाही. एकवीस समासी हा अपवाद आहे आणि वाचकांच्या दृष्टीने मोठी गोड सोय श्रीसमर्थांनीच करून ठेवली आहे. भावार्थात प.पू. दत्तामहाराजांनी सांगितल्याप्रमाणे 'श्रीसमर्थांनी यात सर्व जीवमात्रांचे एक - 'विसाव्याचे' म्हणजे विश्रांतीचे व समाधानाचे स्थान शिष्याच्या निमित्ताने सर्वांना दाखवून दिले आहे.

पहिले समासी निरुपण । लिहिले आहे मंगळाचरण ॥

'वेष्टित शिष्य तारांगणी ' असे श्रीसमर्थसद्गुरु पूर्णचंद्र गगनी प्रकट झाले आहेत आणि आनंद सागर उचंबळून आला आहे. त्यामुळे सारा ब्रह्मगोळा बुडून गेला. मंगळमातेचे (पृथ्वीचे) ढेकूळ विरून गेले. पंचभूतांचा पसारा निमाला. श्रीकृष्ण जन्माचे वेळी खवळलेल्या यमुनासागरातून वसुदेवालाच फक्त वाट मिळाली तसाच लाभ श्रीगुरुभक्तांना झाला. या स्वानंदसिंधूत जे समूळ बुडाले ते भवसागर तरले. ज्यांनी जगण्यासाठी तडफड केली. ते जन्ममरणाच्या फेऱ्यात सापडले.

श्रीसमर्थांचा सद्गुरु म्हणजे प्रभू रामचंद्र । त्याची आठवण झाली श्रीसमर्थांना धीर धरवत नाही आणि 'ऐसा सर्वात्मा राजाधीश । ' त्याचे वर्णन दुसऱ्या समासात सुरू होते. 'रामचंद्रा तुझा वियोग । ऐसा नको रे प्रसंग ।' हे जीवीचे आर्त, विधीसमोर मुक्याने वर्णावे, तसे श्रीसमर्थ श्रोत्यांना सांगत आहेत.

सभा म्हटली की, श्रोता - वक्ता आलाच. आणि वीस दशकी दासबोधात थोड्या विस्ताराने आलेली श्रोतयावक्तयाची गाळीव लक्षणे एकवीस समासीच्या तिसऱ्या समासात आहेत. वक्त्याचे 'शांत आणि पूर्णप्राप्त' लक्षणे सांगून इरेस पडलेले श्रोते वक्ते 'उभे रक्ते न्हाले ।' असा प्रसंग सभेत आणतात, असे श्रीसमर्थ म्हणतात. संसारातील सादरतेने अध्यात्माचे श्रवण करणारा धन्य होय. निरभिमान वक्ता श्रोत्याचा अभिमान छेदून त्यासही निरभिमान करतो. संतसज्जनांची कृपा होऊनही अभिमान उरला तर त्याची लाज कोणाला? असा प्रस्ताव मांडून श्रीसमर्थ वीस दशकीतील सद्गुरुलक्षणे, शिष्यलक्षणे, चौथ्या व पाचव्या समासात सांगतात. ज्याला सुखच असावे, लाभावे असे वाटते त्याने सहाव्या विवेक वैराग्य नाम समासीची गोडी वारंवार चाखून स्वतःचे कल्याण करून घ्यावे. 'प्रतिष्ठूनि वैराग्य सार । नश्वर आहे हा संसारु ॥' हे सहाव्यांत सांगून "निंद्य आशा देहाभिमान । त्यागून 'सगुण मूर्तीचे ध्यान।' करावयास सातव्यात सांगितले आहे. परमार्थात सर्वांत मोठा अडथळा म्हणजे देहाभिमान. त्याने निश्चय ढासळतो. भगवंतावरील प्रेम कमी होते. प्रपंचाचे वाढते. तेथें 'देह पडे कीं देव जोडे ।' या निग्रहाने वैराग्य प्रबळले की, 'देव भक्तापाठी लागे । ना भी ना भी म्हणोनि ।'

अत्यंत गहन असे त्रिविध आत्मनिवेदन आठव्या समासात येते. वीस दशकी दासबोधात बाराव्या दशकातील हा पाचवा समास होय.

सर्वदूर व्यापून राहिलेल्या सर्व भेदांचे मूळ, एका मूळतत्त्वात, शुद्ध तत्त्वात आहे. आदिसंकल्पात कोणताही भेद नाही. एका शुद्ध परब्रह्माखेरीज - मीपण म्हणून काहीच नाही. कोठेच नाही. विवेकाने हे निश्चित केले, त्याचा साक्षात्कार झाला म्हणजे मन शांत होते. त्या शांत मनाला नवव्या समासापासून श्रीसमर्थ परमार्थाचे गुह्य ज्ञान सांगत आहेत. श्रीसमर्थ ज्ञानस्वरूपच असल्याने त्यांचे मार्गदर्शन चाणाक्ष शिष्यांसाठी आत्मज्ञानाचे लक्षण आहे. अशा दक्ष शिष्यांसाठी श्रीसमर्थ आपला अनुभव अगदी सहजतेने सांगतात. 'मज आपणाऐसे (समर्थ) करणाऱ्या माझ्या श्रीसद्गुरुंनी (प्रभू रामचंद्रांनी) किती उदार व्हावे? माझा मीपणा पुसून टाकला आणि 'रामदास' हे नावही दिले. स्वतः ग्रंथ निर्माण केला आणि कर्ता म्हणून नाव मात्र रामदास !'

असे स्वानुभूत श्रीसमर्थ शिष्याला म्हणतात की, तूं जलधरासारखा उदार, शांतीचा सागर आणि भावार्थाचा मेरू आहेस. तेव्हा कृपा कर आणि निष्ठूर न होता एकच मागणे मला दे.

काय मागितले श्रीसमर्थांनी दुश्चित शिष्यापासी ? 'अरे शिष्या, कुतर्क सोड आणि मी सांगतो ते आळस न करता, एकचित्ताने ऐक. 'मजपासी काय उणें । मी आणि दुसऱ्यास पुसणे ।' हा लाजिरवाणा विचार सोड. जी जी शंका - आशंका - कुशंका असेल ती तत्काळ निरसन करून घेतली पाहिजे. अंधार विरायला शब्दाचा दिवा चालणार नाही. शब्दाचा आधार न घेता, निरूपण, नीटसे एकाग्रतेने ऐकले पाहिजे.

नवव्यास असे पुरक विचार दहाव्या समासात आहेत. अकराव्यात श्रीसमर्थांचा कनवाळूपणा, शिष्याच्या कल्याणाची तळमळ दिसते. पथ्य पाळले नाही तर वैद्याच्या औषधाचा गुण कसा कळणार? बरे , तोंडदेखले वैद्याचे ऐकायचे, हो का, असे का, म्हणायचे आणि वैद्याची पाठ वळली की, कुपथ्य करायचे, हे घातकच आहे. या समासात शिष्याची परखड झाडाझडतीही आहे.

तैसी परमार्थी बोंब मारावी । कांहीतरी काढाकाढी करावी । हळू हळू सोडवावी मिठी प्रपंचाची '' केवळ प्रपंच वणवा पेटला आणि परमार्थ त्यात जळून गेला तरीही 'आम्ही परमार्थी म्हणून टेंभा मिरवायचा हे बरे नाही. 'तुम्ही कैसे परमार्थी । परघातकी आणि आपस्वार्थी । असे ऐकल्यावर शिष्याच्या मुखश्रीचे चिन्हे पालटले । मग श्रीसमर्थ म्हणतात, अरे, हीच ती देहबुद्धि ! आता जे डळमळतात त्यांना परमार्थ झेपायचा नाही. जे राहिले त्यांना मोक्षभांडार - द्वार मोकळेच आहे. खुशाल लुटा.

अशा प्रकारे प्रारब्धाचा आधार काढून प्रयत्नाचे बळ लावण्यास श्रीसमर्थ सांगतात.

श्रीसमर्थ निश्चयाचा महामेरू होते. ढळणे त्यांना माहीतच नाही. देहबुद्धि झडून, रामचरणी लीन होऊन शिष्याचे कल्याण व्हावे ही उत्कट तळमळ असल्याने श्रीसमर्थ हरप्रयत्न करीत आहेत. श्रीसमर्थांचा आत्मविश्वास कसा दांडगा आहे, बघा ! ते शिष्याला सांगतात, 'मी सांगितले आणि तू सच्छिष्य घडला नाहीस, असे घडणार नाही. तुला पूर्ण समाधान लाभेपर्यंत आम्ही सांगत राहू. तुला समाधान घडेल तेव्हाच तुला सच्छिष्य म्हणू.' श्रीसमर्थांच्या या वचनांचा त्रास न मानता, त्यांच्यावर भिस्त ठेऊन विवेकाने विचार करून, भेदाचे निरसन होण्यासाठी शिष्याने

मृत्युनिरुपण

- श्री. सुहास प्र. आगरकर



आपला जीवन प्रवाह हा अव्यक्ताकडून अव्यक्ताकडे अखंड वाहात असतो. केवळ आपण जे जीवन जगलो तोच फक्त व्यक्त भाग असतो. मृत्युचा विचार केल्याखेरीज जीवनाचा संपूर्ण अर्थ कळणे शक्य नाही. कारण या अशाश्वत जगात मृत्यू ही एकच शाश्वत गोष्ट आहे. जातस्य ही ध्रुवो मृत्यु' असे गीतेचे वचनच आहे. 'जीवासवे जन्मे मृत्यु जोड जन्मजात' म्हणून मृत्यू विचारात घेऊन जीवनाचा अर्थ शोधणारे तत्त्वज्ञानच यथार्थ ज्ञान प्राप्त करून देते. आपणास आहे मरण । म्हणोन राखावे बरे पण हे आपल्या हातात आहे. अध्याम्याची वाटचाल एवढी प्रदीर्घ आहे की एकाच जन्मात स्वरूपसाक्षात्कार होणे महाकठिण.

गीतेतील कर्मविपाक सिद्धांत असे सांगतो की आपण केलेल्या बऱ्यावाईट कृत्यांचे परिणाम आपणास पुढील जन्मात भोगावे लागतात. 'मना त्वाचि रे पूर्वसंचीत केले । तयासारीखे भोगणे प्राप्त झाले. म्हणजे आपली प्रगती वा अधोगती आपल्यावरच अवलंबून असते. यासाठी दोन उदाहरणे पाहू. मैत्रेय ऋषी हे प्रगतीचे उदाहरण या उलट धृतराष्ट्र तो अनेक जन्म मानवदेहात होता. पण त्याचे पूर्वकर्म त्याला अधोगतीकडे नेत होते. महाभारतात संजय प्राप्त झालेल्या दीव्यदृष्टीमुळे भगवंताचे विश्वरूप दर्शन घेऊ शकला. परंतु धृतराष्ट्राला त्याचे वर्णन सुद्धा ऐकावेसे वाटले नाही. त्याची अधोगती कोण थांबवणार ?

आत्मज्ञान व्हावे यासाठी जन्मभर झटणाऱ्या जीवाची अंतकाळी काय अवस्था होते हे समजणे साधकाच्या दृष्टीने आवश्यक आहे. शिवाय एखाद्याला आत्मसाक्षात्कार झालाच तर अंतःकाळी तो मंदावतो का तसाच सतेज राहतो हे सुद्धा समजावयास हवे. परंतु साध्या व्यवहारी जगातही पुढील गोष्टींबाबत अजीबात शंका घेता येत नाही.

१. जगात कोणत्याही गोष्टीची खात्री देता येत नाही पण मृत्युबाबत कोणासच शंका नाही. आपण केव्हा तरी मरणारच हे प्रत्येक जण जाणतो.

२. माणसाच्या मृत्यूचा काळ अगदी निश्चितपणे अगोदर समजणे जवळपास अशक्य असते. अपवाद स्वतःहून मृत्युला सामोरे जणाऱ्या महापुरुषांचा. उदा, विनोबा भावे, स्वा. सावरकर इ.

३. मनुष्य मेला की त्याच्या शरीरातील जीवंतपण लोपते. पुढे त्याचे काय होते याचा काही पत्ता लागत नाही.

४. मृत देहावर अंत्यसंस्कार केले की त्यानंतर जगाचे तसेच त्याच्या निकटच्या नातेवाईकांचे देखील नित्याचे व्यवहार पूर्ववत चालू होतात. जन पळभर म्हणतील हाय हाय मी जाता राहील कार्य काय ?

५. मृत माणसाची स्मृती हळू हळू लोप पावते.

६. माणसाने केलेल्या शुभाशुभ कर्माचे परिणाम कमी जास्त काळ समाजात टिकतात पण ते चिरंतन राहात नाहीत.

७. शेकडा ९९.९९% माणसांच्या मृत्युबद्दल जग फारसा विचार करत नाही.

मनुष्य हा कर्तृत्ववान खरा पण त्याच्या कर्तृत्वाच्या घमेंडीला मृत्यू हा जबर उतारा आहे. मृत्युबाबतचे चिंतन करूनच माणूस खऱ्या अर्थाने माणूस बनतो. जगातल्या सर्व तत्त्वज्ञानात याचा विचार केलेला आहे. प्लेटो म्हणतो तत्त्वज्ञान म्हणजे मृत्यू व अंतकाल यांचा सूक्ष्म अभ्यास. उपनिषदात याबाबत अधिक चिंतन सापडले. उदा. कठोपनिषद-नचिकेताचे आख्यान, छांदोग्योपनिषद-शांडिलविद्या, प्रश्नोपनिषद तिसरा प्रश्न तसेच भगवद्गीता ८ व्या अध्याय. दासबोधात त्यासाठी दोन समास आहेत. मृत्यूची व्यापकता सांगणारा मृत्युनिरुपण हा समास. तत्त्वज्ञान असे सांगते जन्म आणि मृत्यु एकमेकांशिवाय राहू शकत नाहीत. आपल्याला मृत्यू का येतो तर जन्म प्राप्त झाला म्हणून आणि जन्म का येतो तर आत्मस्वरूपाची विस्मृती झाली म्हणून 'तुझीया वियोगे जीवीत्व आले। शरीरपांगे बहू दुःख झाले ।' आत्मस्वरूपाची विस्मृती झालेला जीव आनंद प्राप्त करण्याचे साधन म्हणून देह धारण करतो. कालांतराने तोच देह आनंद देण्यास असमर्थ ठरतो. त्याला जरा व्याधी भोगणे अपरीहार्य असते. तेव्हा जितक्या सहजपणे जीव शरीर धारण करतो तितक्याच सहजपणे त्यातून बाहेर पडतो. यालाच आपण मृत्यू म्हणतो. वासांसि जिर्णानी यथा विहाय म्हणून जो ज्ञानी आहे तो अशा प्रसंगी शोक करत नाही.

जीवाच्या प्रवासात जन्मकाल व अंतकाळ दोन्ही फार महत्त्वाचे आहेत. दोन्ही प्रसंगी जीव व्यक्त आणि अव्यक्त यांच्या सीमा रेषेवर असतो. जन्माचे वेळी तो अव्यक्तातून व्यक्तात उतरतो तर मृत्यूचे वेळी पुन्हा अव्यक्तात परततो. हे दोन्ही संधीकाल फार महत्त्वाचे असतात. गर्भवास हा अती दारुण असतो. जीव वेदनेने तळमळत असतो. ईश्वराला विनवीत असतो. 'देवा सोडवीसी येथून । तरी मी स्वहीत करीन गर्भवास हा चुकवीन । पुन्हा न ये येथे । जन्माला आल्यावर तो वासनेच्या अधीन होतो 'उदरी असता म्हणे सोहं । बाहेरी येता म्हणे कोहं । तात्पर्य जीवाची आत्मबुद्धी लोप पाऊन देहबुद्धी जागृत होते. तो स्वस्वरूपाची जाणीव विसरतो. जन्माच्या वेळची संधी साधणे आपल्या आवाक्याबाहेर असते. पण मृत्यूच्या वेळची संधी साधणे आपणास शक्य असते. साधनेच्या द्वारे ही संधी साधून आपण अध्यात्मिक प्रगतीच्या वरच्या पायरीवर खात्रीने चढू शकतो. अशी संधी साधणे म्हणजे उत्तम मरण काळाच्या कचाट्यातून भगवंताचे अवतार देखील सुटत नाहीत. 'मृत्यु न म्हणे लहानथोर । मृत्य न म्हणे हरिहर । मुत्यू न म्हणे अवतार भगवंताचे।

मरणाचे वेळेस जीवाच्या डोळ्यासमोर सगळा जीवनपट उभा राहतो. उत्तम मरण येण्यासाठी जन्मभर भगवंताच्या अनुसंधानाचा अभ्यास आवश्यक असतो. अविद्येच्या प्रभावामुळे माणसाला दैनंदिन जीवनात मृत्यूचे स्मरण राहात नाही. 'मरणाचे स्मरण असावे । हरीभक्तीस सादर व्हावे । हे संतांचे सांगणे तो विसरतो. त्या कारणाने उत्तम मृत्यू येण्यासाठी लागणारा प्रयत्न त्याच्या हातून होत नाही. भगवंताच्या अनुसंधानात शांतपणे देह सोडणे हे जीवनाचे सार्थक आहे.

याचसाठी केला होता अट्टाहास शेवटचा दिस गोड व्हावा. येणारा प्रत्येक दिवस हा शेवटचा असू शकतो. भगवंताच्या स्मरणात शांतपणे देह सोडणे साधावे म्हणून जो प्रयत्न करावयाचा त्याला परमार्थ म्हणतात. मृत्यू केव्हा येईल याचा नेम नाही म्हणून साधकाने सदैव तयारीत असावयास हवे.

श्रीसमर्थांनी दासबोधात द.३ स.९ मृत्यू निरुपण यामध्ये मृत्यूच्या विलक्षण सामर्थ्याचे वर्णन प्रभावी शब्दात केले आहे.

संसार म्हणजे सवेंची स्वार । नाही मरणास उधार ।
मापी लागले शरीर । घडीने घडी ।

'ऋणानुबंधाचे कारण । कोठे येईल मरण' हे सुद्धा आपल्या हातात नाही - 'मरे येक त्याचा दुजा शोक वाहे । अकस्मात तोही पुढे जात आहे। मृत्यूकाळ काठी नीकी । बैसे बळीयाचे मस्तकी । अतीशय बलाढ्य देखील मृत्युच्या तडाख्यातून सुटत नाहीत यासाठी रावणाचे उदाहरण दिले आहे. मना सांग वा रावणा काय जाले । अकस्मात ते राज्य सर्वे बुडाले । म्हणोनी कुडी वासना सांडी वेगी । बळे लागला काळ हा पाठीलागी ।' हा काळ कोणालाच सोडणार नाही. ही जाणीव ठेऊन माणसाने आपल्या जीवनाचे सार्थक करावे.' ऐसे जाणोनिया जीवे । याचे सार्थकची करावे । मरोन कीर्तिस उरवावे । मृत्युनंतर आपली कीर्ती मागे ठेवावी. देह धारण केलेला असताना कसे जगावे हे समर्थ सांगतातच. पण मेल्यानंतरचे जगणे कसे असावे हेही शिकवतात. 'असो ऐसे सकळही गेले । परंतु एकची उरले । जे स्वरुपाकार झाले । आत्मज्ञानी ।' आत्मज्ञानी संत काळावर मात करतात. त्यांचा मृत्यू व सर्वसामान्य माणसाच्या कल्पना याचे सुंदर विवेचन द.७ स.१० मध्ये आले आहे.

सर्वसामान्य माणूस निर्भयपणे मृत्यूचा विचार करू शकत नाही साहजीकच तो मरण समोर उभे ठाकल्यावर त्याला तोंड देऊ शकत नाही. वर्षभर अभ्यास न केल्याचा पश्चाताप परीक्षेच्या वेळी होतो पण तेव्हा हातातून वेळ निसटलेली असते, तसे अंतकाळी सर्वसामान्यांचे होते. आपणास देहाबद्धल ममत्त्व असल्याने त्याचा मोह सोडवत नाही या उलट ज्ञानी माणूस देहाबाबत उदासीन असतो, अनासक्त असतो कारण त्याला देहाचे मिथ्यत्त्व कळलेले असते. आत्मज्ञानाने त्याचे सारे संशय फिटलेले असतात. त्याने आपल्या देह प्रारब्धावर सोडलेला असतो त्यामुळे देह आत्ताच पडला काय अथवा बरेच दिवस राहीला काय दोन्हीबद्धल त्याला सुखदुःख उरलेले नसते. साप जसा सहजगत्या कात टाकतो तसा ज्ञानी पुरुष सहजगत्या देहाची खोल टाकून देतो.

ज्ञानी पुरुषांना शरीर असत्यपणे भासत असते. म्हणून देहाचे विकार त्यास यत्किंचितही बाधत नाहीत. प्रारब्धयोगाने त्यांचे शरीर जेथे पडते तीच मोठी पुण्यभूमी होऊन जाते. ऋणानुबंधाचे कारण कोठे येईल मरण हे सर्वसामान्य माणसाच्या हातात नसते. पण ज्ञानी मात्र देह कोठे ठेवावा याची योजना करू शकतो. ' पुण्य नदीचे जे तीर । तेथे पडावे शरीरा' हा अज्ञानी माणसाचा विचार. त्यामुळे काशी क्षेत्रात मरण यावे म्हणजे मुक्ती लाभते ही आपली श्रद्धा आहे. उलट साधू नित्यमुक्त असतो. संत कबीर आयुष्यभर वाराणशीत वास्तव्याला होते. पण अंतःकाळी ते मगहरला गेले. तेथेच त्यांनी देह ठेवला. आज मगहर हेच तीर्थक्षेत्र नसले आहे. श्री समर्थांनी दासबोध द.७ स.१० मध्ये अज्ञान माणसाच्या मरण्याबद्धलेच्या भ्रामक कल्पना सांगितल्या आहेत.

उत्तरायेण ते उत्तम । दक्षिणायेतण ते अधम ।
गृही दीपा दिवा मरण ।

याला आधार भगवद्गीता अ. ८ श्लोक क्र. २४ व २५ या श्लोकांचा. अर्थ असा-आत अग्नी बाहेर ज्योतिचा प्रकाश दिवस शुक्ल पक्ष आणि उत्तरायणाचे सहा महीने अशा स्थितीत ज्याचे देहावसान होते तो ब्रह्माप्रत जातो. परंतु हे रूपक स्पष्ट व्हावयास हवे अन्यथा नुसत्या शब्दार्थाने घोटाळा होतो. शुक्ल पक्षात मरण येणे भाग्यदायक असा वरवरचा अर्थ घेतला तर गडबड होते. ज्ञानेश्वरादी सर्व भावंडे तुकाराम, एकनाथ, समर्थ अशा सर्व संतांनी वद्य पक्षात देह ठेवला. मग ते अभागी का? विनोबांनी हे रुपक उत्तम उलगडले आहे. पुण्य मरण यावे अशी इच्छा असेल तर अग्नी, सूर्य, चंद्र, आकाश याची कृपा असली पाहीजे. हे स्पष्ट करताना ते सांगतात अग्नी हे कर्माचे चिन्ह आहे ती यज्ञाची ज्वाला आहे. अंतकाळी सुद्धा यज्ञाची ज्वाला पेटलेली पाहीजे याचा अर्थ माणूस शेवटपर्यंत कार्यरत हवा. कार्यमग्नता जीवन व्हावे मृत्यू ही विश्रांती असे जीवन हवे. सूर्याची कृपा म्हणजे बुद्धीची प्रभा अखेरपर्यंत झगझगीत राहणे. अंतकाळी सुद्धा बुद्धीचे तेज मंदावलेले नसणे.

शुक्लपक्ष ही चंद्राची कृपा. चंद्र जसा कलेकलेने वाढत जातो तसा शुक्ल पक्षातील चंद्राप्रमाणे आपल्या भावनांचा पूर्ण विकास व्हावा. चंद्र ही मनाची देवता आहे. आपण मनापासून जे कार्य स्वीकारले त्यात अखेरपर्यंत खंड नको. कै. रामभाऊ म्हाळगींचे उदाहरण पाहावे. रामभाऊंची कर्तव्यदक्षता एवढी विलक्षण होती की, आजारपणात देखील त्यांच्या कामात खंड पडला नाही. त्यांनी उपस्थित केलेला तारांकीत प्रश्न त्यांच्या निधनानंतर लोकसभेत चर्चेसाठी आला. ही चंद्राची कृपा.

आकाशाची कृपा म्हणजे अंतकाळी मनात आसक्तीचे अभ्र नसणे. अंतकाळी सुद्धा माणसाचा जीव कशात ना कशात गुंतलेला असतो. ही आसक्ती अधोगतीस नेते म्हणून शेवटी आसक्ती नसावी.

देहाचा अंत बरा आला । देह सुखरुप गेला ।
त्यासी म्हणती धन्य झाला । अज्ञानी जन ।

अनासायेन मरणं, मरण पटकन यावे, आजारी पडून अंथरुणावर खितपत न पडता मरण यावे. ते भाग्याचे अशी खुळी समजूत अज्ञानी लोकांची असते. रामकृष्ण परमहंसाना शेवटी गळ्याचा कॅन्सर झाला होता. विवेकानंदांना लॅम्बॅजीसाखे विकार होते. स्वामी माधवनाथांना शेवटी काही वर्षे अर्धांगवात झाला होता मग हे सर्व पुण्यात्म पापी समजायचे का ?

जनांचे विपरीत मत । अंती भेटतो भगवंत ।

अज्ञानी माणसाची अजून एक समजूत असते. आपण जीवंतपणी कसेही वागलो तरी शेवटी देवाचे नाव घेतले की चांगली गती मिळणार अंते मती : सा गती: समर्थ हे मत खोडून काढतात ते म्हणतात-

जिता सार्थक नाही केले । व्यर्थ आयुष्य निघोन गेले ।
मुळी धान्यच नाही पेरीले । ते उगवेल कैंचे ।

जीवंतपणी कोणतेही परमार्थाचे साधन केलेले नसेल तर आयुष्य व्यर्थ आहे. मुळात धान्यच पेरले नाही तर उगवणार काय ?

माणसाने जर जीवंतपणी भक्ती केली तर कल्याण होईल.

दिधल्यावीण पावीजेना । पेरील्यावीण उगवेना ।

आपण काही दिल्याशिवाय मिळणार कसे ? पेरील्याशिवाय उगवणार कसे ?

न करत सेवेच्या व्यापारा । स्वामीस मागे मुशायरा ।

श्रम न करता आपण श्रमांचा मोबदला मालकाकडे मागू शकत नाही. तसे जीवंतपणी जो भक्ती करीत नाही अशा अभक्ताचे अंतकाळी कल्याण होऊ शकत नाही. जर तो आधीपासून भक्तीमार्गावर असेल तर अंतकाळी भगवंताचे स्मरण होईल. अन्यथा नाही. जर नित्यस्मरण असेल तरच अंत्यस्मरण होईल.

जितां नाही भगवद्‌भक्ति । मेल्या कैची होईल मुक्ती ।
होणारच नाही एवं न करता भगवद्‌भजने । अंती नव्हिजे पावन ।
जरी आले बरे मरण । तरी भक्तीवीण अधोगती ।

सारांश भगवंताची भक्ती केली नाही तर अंतकाळी तो पावन होत नाही. देहाच्या दृष्टीने बरे मरण आले तरी भक्ती न केल्याने अधोगतीला जातो.

साधू जीवंत असतानाच आपल्या जन्माचे सार्थक करून घेतो. आत्मसाक्षात्कार करून घेतो. त्याचे शरीर भगवंताच्या कारणी लागत असल्याने धन्य होते. साधूचे शरीर रानावनात कोठेही पडो ते धन्यच होऊन जातात. साधूचा देह खितपत पडला अथवा कोल्हयाकुत्र्यांनी खाल्ला तर अज्ञानी माणसाला ते प्रशस्त वाटत नाही. पण जे जीवनमुक्तच आहेत त्यांना काय स्थिती? साधूचा अंत बरा झाला नाही म्हणून अज्ञानी हळहळतात. पण साधूच्या अंतरंग अवस्थेची इतरांना काय कल्पना येणार? भगवंताच्या अनुसंधानात देह समर्पण करणे यातच जीवनाची सार्थकता आहे.

- श्री. सुहास प्र. आगरकर
२२, दत्तगुरु प्रसाद सोसायटी,
१४६७ सदाशिव पेठ,
पुणे - ४११ ०३०

• • •

समर्थकृत आरत्या

- सौ. सुप्रिया श्रीकांत जोशी



समर्थ रामदासांनी प्रपंच आणि परमार्थ यांची सुरेख सांगड घातली आहे. प्रपंचात आकंठ बुडालेल्या लोकांचे जीवन त्यांनी जवळून पाहिले. मनापासून समरसतेने प्रपंचाचा गाडा ओढताना देवपूजा मोठ्या भावपूर्णतेने आणि नित्यनेमाने करणारे प्रापंचिक लोकांचे त्यांनी जवळून निरीक्षण केले. देवदेवतांची पूजा करीत असताना भक्त त्यात इतका रंगून जातो की पूजेचे सगळे उपचार पूर्ण झाले की, त्याचे अंतःकरण भरून येते. षोडषोपचार, पंचोपचार पूजा करून झाली की घरातील सर्वजण देवांच्या नावाचा जयजयकार करतात, घरातील वातावरण त्या स्पंदनाने भरून जाते. लोकांच्या मनात उद्‌भवलेली ही भक्तीची भावना वृद्धीगंत होत जावी यासाठी समर्थांनी 'आरती' या काव्याची रचना केली.

तबकामध्ये तुपातील निरांजन ठेवून देव किंवा सद्‌गुरु यांना ओवाळणे आणि निरांजनांनी ओवाळताना देवदेवतांचे स्तवन करणे म्हणजे आरती. 'आरती' या शब्दात आर्तता भावाचा आविष्कार जाणवतो. साग्रसंगीत पूजा करीत असताना एकाग्रचित्त झालेल्या साधकाच्या व्याकूळ मनाने, त्याच्या मुखातून आर्ततेने आरतीचे स्वर बाहेर पडतात. समर्थांनी रचलेल्या आरत्यांमध्ये आर्ततेबरोबरच देवतांची स्तुती आहे, त्यांच्या चरित्रामधील पराक्रमाचे वर्णन आहे आणि सगुणरूपाचे ध्यानही आहे. साधकाच्या किंवा भक्ताच्या मनातील भाव, भावना आपल्या दैवतापर्यंत पोचवण्याचे कार्य आरतीमध्ये होत असते.

आ+रती म्हणजे आरती. रती म्हणजे रमणे, आ म्हणजे जोपर्यंत. आरती म्हणजे शेवटपर्यंत भगवंतामध्ये रमणे; भगवंताच्या अनुसंधानात असणे, काया-वाचा-मनाने भगवंताशी एकरूप होणे. दासबोध ग्रंथात समर्थ म्हणतात.

'नाना तीर्थ क्षेत्रास जावे । तेथे त्या देवाचे पूजन करावे ।
नाना उपचारी अर्चावे । परमेश्वरासी ।।'

बारा वर्षे पुरश्चरण केल्यानंतर समर्थांनी बारा वर्षे तीर्थयात्रा केल्या, भारतभर प्रवास केला. त्या वेळी त्या त्या तीर्थस्थानी त्या त्या देवतांचे पूजन करून स्तवन केले असेल आणि आरत्यांची रचनाही केली असेल.

पहाटेची काकडआरती, पूजेच्या वेळेची आरती, दुपारी महा-नैवेद्य झाल्यावरची आरती, सायंकाळची आरती आणि शेजारती असे आरत्यांचे पाच प्रकार आहेत. आरत्यांमध्ये देवांच्या नावाचा जयजयकार असतो, त्याच्या सगुणरूपाचे वर्णन असते, त्याचे पराक्रम, त्याच्या लीला यांचे गुणगान असते. अशा प्रकारे, सर्व भावांनी युक्त असलेल्या आरत्यांचे मोठ्या भक्तीने श्रवण आणि गायन सातत्याने होत राहिले की आपोआपच त्यांच्या सारखे सद्‌गुण आत्मसात करण्याचा प्रयत्न करण्याचा संकल्प मनामध्ये निश्चितच होतो. त्यातही जर या आरत्यांना तबला, पेटी, टाळ-मृदुंग, टाळ्यांची साथ मिळाली तर भाविक त्यात रंगून गेले नाहीत तरच नवल! यासाठीच समर्थांनी रामरायाला मागणं मागितलं आहे की 'दस्तक टाळी दे रे राम।' सर्व भाविकांच्या टाळ्या एकाच तालावर, एकाच सुरावर पडाव्यात.

आरती म्हणजे भगवंताला उठवायचं, भगवंताला झोपवायचं, संगीताने, सुरांनी, तालाने भगवंताला आळवायचं. वाल्मिकी रामायणांत विश्वामित्र ऋषी, यज्ञरक्षणासाठी श्रीरामचंद्रांना घेऊन जातात. मध्ये मार्गात रात्रीचा मुक्काम होतो. प्रातःकाली, मंगलसमयी महर्षी विश्वामित्र रामांना मोठ्या प्रेमाने, वत्सलतेने जागे करतात. 'उत्तिष्ठ नरशार्दूल, पूर्वा संध्या प्रवर्तते ।' 'रामा, वत्सा, उठ, रामांना वाटते प्रत्यक्ष भगवंत आपल्याला उठवीत आहेत. विश्वामित्रांना वाटते आपण प्रत्यक्ष भगवंतांना जागे करीत आहोत. हाच भाव आपल्याला पहाटेच्या काकडआरतीत दिसून येतो आणि म्हणूनच तो हृदयाला स्पर्शून जातो.

रात्री मंदिरात आरती चालली आहे. धुपाचा मंद सुवास हवेत भरून राहिला आहे. साजूक तुपात चिंब भिजलेली जोड वात सात्विक प्रकाश भरभरून देत आहे. सुगंधी अगरबत्तीने सारे वातावरणच सुगंधी करून टाकले आहे. घंटेचा नाद आणि टाळ्यांचा गजर यांनी सर्वजण जणू भारले गेले आहेत. अशावेळी खरोखरच ईश्वराचे अस्तित्व जाणवते. देव दिवसभर जागले आहेत, भक्तांना दर्शन दिले आहे, थकले आहेत, त्यांना आता निजायचे आहे या भावपूर्णतेने शेजारती गायली जाते.

ज्याप्रमाणे कोणतेही मंगलकार्य असले की, सर्वप्रथम विघ्नहर्त्या गजाननाचे पूजन केले जाते. त्याप्रमाणे आरती करताना देखील प्रथम श्रीगजाननाची, त्यानंतर कुलस्वामिनी, कुलदैवत आणि आपले आराध्य दैवत किंवा उपास्य दैवताची आरती करण्याचा प्रघात आहे. समर्थ अष्टविनायकांपैकी मोरगावच्या मयूरेश्वराच्या दर्शनाला गेले असता, तेथे सर्वांना प्रिय असलेली आणि सर्वत्र प्रचलित असलेली 'सुखकर्ता दुःखकर्ता वार्ता विघ्नाची' ही आरती त्यांना स्फुरली. काही जणांच्या मते समर्थांनी चाफळला गणपतीची स्थापना केली त्या वेळी गणेशाला उद्देशून या आरतीची रचना केली असण्याची शक्यता आहे. याशिवाय श्रीरामांच्या पाठीमागे असलेल्या वीरमारुतीला उद्देशून 'सत्राणे उड्डाणे हुंकार वदनी' या आरतीची रचना केली.

गणपतीच्या सगुण रूपाचे वर्णन या आरतीत इतके सुरेख केले आहे की आपल्या डोळ्यासमोर साक्षात् श्री गणेशाची मूर्ती उभी राहाते. सर्वांगाला उटी चर्चिली आहे. पीतांबर ल्यायला आहे, लंबोदर आणि फणिवरवंदन गणपतीच्या सोंडेचे वर्णन, त्याच्या नेत्रांचे वर्णन भान विसरायला लावणारे आहे.

गणपतीची आणखी एक सुंदर आरती समर्थरचित आहे.

'आरती सप्रेम जय जय स्वामी गजवदना ।
तुझिया स्मरणे जाती पातके पार्वती नंदना । मोरया पार्वती नंदना ।'

ही आठ कडव्यांची आरती आहे.

पहिल्या कडव्यात गणपतीने अंगावर धारण केलेल्या दिव्य आभूषणांचे वर्णन आहे. दुसऱ्या कडव्यात गणपती मूषकावर आरुढ होऊन फिरत असता चंद्र

हासला आणि त्यामुळे गणपतीने चंद्राला शाप दिला याचे वर्णन आहे तर तिसऱ्या कडव्यात तो शाप कोणता? तर भाद्रपद शुद्ध चतुर्थीला चंद्राचे मुखावलोकन करू नये या प्रसंगाचे वर्णन आहे. या शापाचा परिणाम प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णांना कसा भोवला हे चौथ्या कडव्यात सांगितले आहे. प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णांनी चंद्र पाहिला आणि त्यामुळे स्यमंतक मणी चोरल्याचा आळ त्याच्यावर आला.

पुढील चार कडव्यात कृष्णावतारातील कथाभाग येतो. स्यमंतकाच्या निमित्ताने श्रीकृष्णाला दोन राण्या प्राप्त झाल्या याचे वर्णन आहे. रामावतारात जांबुवंत वयोवृद्ध होता म्हणून प्रत्यक्ष युद्धावर गेला नव्हता. युद्ध कौशल्य दाखवून रामाची शाबासकी मिळविण्याची त्याची इच्छा अपुरी राहिली. त्या वेळी रामाने जांबुवंताला कृष्णावतार होईपर्यंत वाट पाहात थांबायला सांगितले. प्रत्यक्ष भगवंताशी जांबुतंताने २८ दिवस युद्ध केले आणि शेवटी आपली कन्या जांबुवंती आणि स्यमंतक मणी दोन्हीही कृष्णाला अर्पण केले.

श्रीकृष्णाने तो मणी सत्राजिताला दिला आणि सत्राजिताने आपली कन्या सत्यभामा श्रीकृष्णाला अर्पण केली.

यानंतरच्या कडव्यात कृष्णकन्हैया गोपींच्या घरी जाऊन लोणी भक्षण करतो, गोपी यशोदामातेजवळ कागाळ्या करतात. यशोदामाता घाबरते आणि श्रीगणेशाला नवस करते. संकष्टी व्रत करेन असा ती नवस करते. शिवाय सर्व नरनारी तुझे संकष्टी व्रत करतील असेही सांगते. हा सर्व श्रीकृष्णचरित्रातील कथाभाग या आरतीत आला आहे. त्यामुळे कृष्णाचा पराक्रम आणि कृष्णाची लीला आरतीतून गाताना मन रमते.

प्रथमारंभी गणपतीची आरती झाली. आता त्याच्या पित्याची श्री शंभुमहादेवांची आरती, याविषयाची एक दंतकथा आहे ती अशी श्री क्षेत्र जेजुरीजवळ लवथवेश्वर म्हणून एक श्रीशंकराचे स्थान आहे. समर्थ त्या मंदिरात गेले होते. या मंदिरात रात्री जो झोपेल तो जिवंत राहात नाही. अशी वदंता होती. पण समर्थांनां कसली आणि कुणाची भीती ? त्यांनी त्या मंदिरातच रात्री मुक्काम केला. समर्थ बहुतेक रात्री 'गेले असणार' या कल्पनेने त्या गावातील लोक सकाळी लवकर त्या मंदिरात आले. पाहातात तर समर्थ श्री शंकराची पूजा करीत होते. यावेळी त्यांनी 'लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा' ही शंकराची आरती रचली.

श्री शंभू महादेव, अमृतमंथनातून निघालेले विष कंठात धारण करणारा देव आहे. भगवान् शंकर रामांचे ध्यान करीत असतात. त्यांनी रामनामाचे औषध घेतले आणि विष प्राशनाने कंठाचा झालेला दाह शांत झाला. मनाच्या श्लोकात समर्थ म्हणतातः 'विठोने शिरी वाहिला देवराणा । तया अंतरी ध्यास रे त्यासि नेणा ।' विठ्ठलाने ज्यांना मस्तकी धारण केले ते भगवान् शंकरही रामचंद्रांचे ध्यान करतात आणि श्री रामचंद्र तर समर्थांचे आराध्य दैवत । अशा तऱ्हेने समर्थांचे श्री शंभू महादेवांशी अनन्य नाते आहे.

'दुर्गे दुर्घट भारी तुजवीण संसारी' ही तुळजाभवानीची आरती समर्थांनी तुळजापूरला रचली. तुळजाभवानी ही समर्थांचे दैवत शिवाय समर्थांचे लाडके शिष्य शिवाजीमहाराज यांचेपण तुळजाभवानी हे दैवत शक्ती आणि सामर्थ्य अंगी वास करीत असलेली सगुण प्रतिमा म्हणजे तुळजाभवानी. असुरांचे निर्दालन करणारी ही देवता आहे. त्यामुळे त्या काळी अत्याचार आणि अनाचार या दुष्ट प्रवृत्तींचा नाश करण्यासाठी तुळजाभवानीच्या सगुण साकार प्रतिकाची उपासना समर्थांनी समाजाला आवर्जून सांगितली.

आरतीच्या दुसऱ्या कडव्यात समर्थांनी 'प्रसन्न वदने प्रसन्न होसी निजदासा' असा स्वतःच्या नावाचा उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणे या आरतीचे वैशिष्ट्य म्हणजे यात समर्थांनी नरहरी या शिष्याचा पण नामोल्लेख केला आहे. 'नृहरि तल्लीन झाला पदपंकजलेशा' या चरणावरून हे आपल्या लक्षात येते. कधी कधी समर्थ स्वतःचा उल्लेख 'निजदास' असाही करीत असत. 'साफल्या निजवल्ल्या' या रामाच्या आरतीत 'धन्य तो निजदास भक्त प्रेमळ' असे म्हटले आहे.

तुळजापूरची भवानीमाता ही महाराष्ट्रातील प्रधान शक्तीपीठ आहे. अनेकांची कुलदेवता आहे. तुळजाभवानीला समर्थ 'रामवर-दायिनी माता' म्हणतात. समर्थरचित 'सुखरवरदायिनी मुरहरसुखसदना' या तुळजाभवानीच्या आरतीत, अनेकविध विशेषणांनी तिचा उल्लेख केला आहे. सुखरवरदायिनी, करुणासागर, शशिवंदन, विश्वंभरिता, गुणसरिता, मुनिजनमनमोहिनी, सज्जनतमशमनी, मृगनयनी, राघववरदा ही सर्व गुणविशेषणे भाविकांच्या श्रद्धेला हात घालतात. नवरात्रात ९ दिवस 'उदे गं अंबाबाई' असा उदो बोलला जातो ती सुद्धा समर्थांचीच रचना आहे.

समर्थांच्या घराण्यात २१ पिढ्या रामाची उपासना चालत आलेली होती; तसेच सूर्योपासना पिढ्यान् पिढ्या होती. शिवाय सूर्यवंशातील श्रीरामचंद्र हे समर्थांचे सगुण उपास्य दैवत होते. समर्थांना वयाच्या आठव्या वर्षी प्रभू श्रीरामांनी अनुग्रह दिला होता. त्यामुळे श्रीरामांच्या आरतीत समर्थ 'आचार्या गुरुवर्या' असा श्री रामरायाचा उल्लेख करतात. श्रीरामांच्या या आरतीत समर्थांनी, श्रीरामचंद्रांची माता, पिता, बंधू तसेच जगत्जननी भगवती सीता असे संपूर्ण परिवाराचे वर्णन केले आहे. सुरवर आणि किन्नर रामप्रभुंचे गुणगान करीत असतात असे मोठ्या प्रेमाने समर्थ म्हणतात.

सद्गुरूंच्या आरतीत समर्थ म्हणतात : 'जयदेव जयदेव जय करुणाकरा । आरती ओवाळू सद्गुरुमाहेरा ।' समर्थ सद्गुरूंना 'माहेर' शब्द वापरतात. सद्गुरु हेच त्यांचे विश्रांतीचे स्थान. हे विश्रांतीस्थान कसं आहे तर ' मायेवीण माहेरे विश्रांती ठाव ।' माहेर हे खरं तर विश्रांतीचं ठिकाण. पण सद्गुरूंचे वर्णन करताना 'माया जाली लज्यायमान। काय करु' असं समर्थ म्हणतात. सद्गुरूंचे वर्णन कोणालाही, कोणतीही उपमा, कोणताही दृष्टांत देऊन करता येत नाही. सद्शिष्याला मात्र, त्याच्यावर सद्गुरुंचा कृपारूपी वरदहस्त असल्याने सद्गुरूंचे वर्णन करणे शक्य होते.

हनुमंताचा पराक्रम आणि त्याचा प्रताप वर्णन करणारी रामायणाची दोनच कांडे (युद्धकांड व सुंदरकांड) समर्थांनी लिहीली आणि त्याची आरतीही गायली. मारुतीरायाच्या आरतीत त्याच्या भीमपराक्रमाचे वर्णन आहे. 'सत्राणे उड्डाणे हुंकार वदनी' या आरतीत लंकानगरीकडे सागरावरून झेपावलेला मारुती, त्याच्या उड्डाणाने सर्वांची उडालेली त्रेधातिरपीट याचे वर्णन आहे. हे वर्णन वाचतांना वाल्मिकी रामायणात समुद्रउल्लंघन करतेवेळी मारुतीच्या उड्डाणाचे केलेले अतिशय सुंदर वर्णन आठवते.

हनुमानाचा वेग मनाच्या वेगासमान आहे. 'मनोजवं मारुततुल्य वेगम्' असे रामरक्षास्त्रोत्रात वर्णन आहे. हनुमंताची उड्डाणशक्ती गरुडाच्या गतीतही नसते. वायुसुताची शीघ्रगती ही मनोवृत्तीप्रमाणे होती असे एकनाथ महाराज भावार्थ रामायणात वर्णन करतात. अगतिक आणि प्रतिकारशून्य समाजात शौर्याची जागृती करण्यासाठी मारुतीने लंकेत केलेल्या पराक्रमाचे वीररसाने ओथंबलेले वर्णन यात केले आहे. या आरतीत वीररस उत्कटपणे साकारला आहे. उड्डाण करण्यापूर्वी हनुमानाने जो हुंकार भरला त्याचा ध्वनी पाताळापर्यंत दुमदुमला. सगळे भूमंडळ भयाने डळमळायला लागले आणि भूमंडळ डळमळीत झाल्यामुळे सागराच्या लाटा उचंबळल्या, धरणीधर थरथरला असे पराक्रमाचे

वर्णन यात केले आहे.

मारुतीचे गुणवर्णन सर्वांना उदंड शक्ती आणि प्रेरणा देत असते. 'भीमरुपी महारुद्रा' हे मारुतीस्तोत्र म्हणजे मराठीतील 'हनुमान चालीसा' आहे आणि ते महाराष्ट्राचे आणि मराठीचे वज्रकवच आहे असे ह.भ.प. पांगारकर समर्थचरित्रात लिहीतात. 'भीमभयानक रुप अद्‌भूत। वज्रदेही दिसे जैसा पर्वत ।' या महारुद्राच्या आरतीत समर्थांनी भावार्थ रामायणाचा आधार घेतला आहे. भावार्थ रामायणात अगस्ती ऋषींनी श्रीरामांना हनुमंताची जन्मकथा सांगितली आहे. महाराज दशरथांनी पुत्रकामेष्टी यज्ञ केला. यज्ञपुरुषाने दिलेल्या प्रसादाचे वसिष्ठांनी ३ भाग केले आणि त्यातील कैकेयीचा भाग घारीने पळवला.तोच केसरीची पत्नी अंजनी हिने भक्षिला. याचा अर्थ प्रसादाच्या संपूर्ण एका भागाचा हनुमंत असल्यानेच तो अत्यंत प्रतापी आणि सबळ आहे.

बालसूर्याला पकडण्यासाठी बालहनुमंताने उड्डाण केले. इंद्राने त्याच्यावर वज्राचा आघात केला. पुढे सर्व देवदेवतांनी त्याला निरनिराळे वर प्रदान केले. इत्यादी सर्व कथांचे वर्णन या आरतीत आहे. त्यानंतर समर्थांनी, लंकेमध्ये हनुमंताने प्रवेश केला, सीतामाई अशोकवनात आहे हे शोधून काढून तिची भेट घेतली, पुढे लंकेचे दहन केले इत्यादी वर्णन आहेच. पण सीतेचा शोध लागल्यावर, ती आनंदवार्ता ऐकून वानरसेनेमध्ये कसा आनंदाचा पूर लोटला याचे अतिशय रसाळ वर्णन या आरतीत केले आहे.

'दशरथे यज्ञ केला ऋषि प्रसाद आला' या आरतीत समर्थांनी हनुमंताचे चरित्रच वर्णन केले आहे. पहिल्या कडव्यात भावार्थ रामायणातील हनुमंताच्या जन्मकथेचा आधार घेतला आहे. इंद्राने मारलेले वज्र हनुमंताच्या हनुवटीस लागले तेव्हापासून हनुमंत हे नामाभिधान रूढ झाले याचे वर्णन आहे. अंजनीमातेने मारुतीला सांगितले होते की, 'तू गर्भात असताना तुझी कडकडीत ब्रह्मचर्याची कासोटी होती. ती ज्याला आत्मदृष्टीने दिसेल तोच तुझा स्वामी आहे हे नक्की समज.' या कथा भागाचे सुरेख वर्णन तिसऱ्या कडव्यात आहे.

स्वामींच्या कार्यासाठी शंभर योजने असलेल्या समुद्रावरून मारुतीने उड्डाण केले. दिव्यौषधीसह द्रोणागिरी उपटून आणला ती कथा आणि शेवटी रघुनाथाचा विजय इत्यादी प्रसंग मोठ्या सुरेखपणे वर्णन केले आहेत.

समर्थांनी स्थापन केलेले सगळे मारुती वीरमारुती आहेत. वीरमारुतीच्या पायाखाली राक्षस असतो आणि हात उगारलेला असतो. चाफळला श्रीरामांच्या मंदिरापाठीमागे असलेला भव्य वीरमारुती पाहिला की, 'सत्राणे उड्डाणे हुंकार वदनी' या आरतीची आठवण येते. या आरती संदर्भात एक कथा सांगितली जाते. सेतु माधवराव पगडी लंकेला गेले होते. तेथे एक हनुमंताचे मंदिर होते. त्या मंदिरात ते दर्शनाला गेले. सायंकाळची आरती सुरू होती. मंदिरातील पुजारी 'सत्राणे उड्डाणे' ही आरती म्हणत होते. त्यांना ही आरती कंठस्थ होती. पगडींना आश्चर्य वाटले. त्यांनी त्या पुजाऱ्याला आरती विषयी चौकशी केली आणि ही आरती तुम्हाला कशी पाठ आहे हेही विचारले. तेव्हा त्या पुजाऱ्याने सांगितले की, 'महाराष्ट्रात रामदास नावाचे एक संत होऊन गेले. त्यांनी या मारुतीची स्थापना केली. त्यावेळीपासून येथे ही आरती म्हणण्याची प्रथा आहे.' त्या लोकांना या आरतीचा अर्थ कळत नव्हता पण त्यांच्या म्हणण्यात एक प्रकारची आर्तता होती ती मात्र विलक्षण होती.

नद्यांचा उगम, नद्यांचा संगम, डोंगरातील घळी ही समर्थांची अगदी आवडीची स्थळे. त्यातही कृष्णा नदी समर्थांची अत्यंत लाडकी. कृष्णा, कोयना आणि वेण्णा या तिन्ही नद्यांच्या परिसरात समर्थ संप्रदाय विस्तारत चालला होता. समर्थांना स्वतःला कृष्णातीर निवासी म्हणवून घेणे आवडे. एकदा कृष्णा-वेण्णा संगमात समर्थांनी स्नान केले आणि त्यांना 'जयदेवी जयदेवी जय माय कृष्णे' या आरतीची स्फूर्ती झाली. संगमाच्या स्थानी हरि आणि हॅर यांचे ऐक्य दिसून आल्याचे या आरतीवरून आपल्या लक्षात येते.

समर्थांनी आपल्या आराध्य दैवताच्या, श्रीरामांच्या इतक्या आरत्या रचल्या आहेत. त्या आरत्यांमध्ये रामरायाच्या विविधरूपांनी वर्णन केले आहे. परंतु या सगुणसाकार रूपापेक्षा आणखी एका रूपाचे वर्णन केले आहे ते म्हणजे आत्मारामाचे. जीवनात सगळी चेतना अंतरात्म्यामुळे आहे. तो नसेल तर देह पडतो. मूळ अंतरात्मा एकच आहे. पण अनंत देहांच्या योगाने अंतरात्म्याचेही अनंत भेद आढळतात. स्त्री पुरुष, आहार, आकार या सर्व भेदांमध्ये एकच अंतरात्मा अभेदपणाने राहातो. या सगळ्या विश्वामध्ये असंख्य जीवप्राणी आहेत. त्या सर्वांच्या अंतर्यामी अंतरात्माच आहे. सगळ्या विश्वाचा तो चालक आहे, विश्वव्यापक आहे. परंतु त्याचे शब्दात वर्णन करायचे झाले तर शब्द तोकडे पडतात आणि 'वाचा मौनावली' अशी अवस्था होते. म्हणनूच त्याचे वर्णन करताना अंतरात्म्याच्या आरतीत समर्थ म्हणतात 'दास म्हणे महिमा न बोलवे वाचा ।'. समर्थांच्या मते एकच चैतन्य सर्व जीवसृष्टीत व्यापून आहे म्हणून प्रत्येक शरीर हे भगवंताचे निवासस्थान आहे.

वर उल्लेख केलेल्या आरत्यांबरोबरच समर्थांनी विठ्ठल, दत्तात्रेय, श्रीकृष्ण, नृसिंह, नृसिंहसरस्वती, वेदमाता, श्रीनारायण, सुर्यभगवान, कालभैरव, खंडेराव, वेंकटेश्वर, श्रीजगदंबा, अष्टभुजा, शांतादुर्गा, भैरव, नागेश (या आरतीत श्रीशंकराच्या कंठात विराजमान असलेल्या नागदेवतेचे वर्णन आहे. याशिवाय नागपंचमीचा उत्सव केला जातो, त्याचे पूजन केले जाते या सर्वांचाही समावेश आहे.) भगवद्‌गीतेच्या आरतीतील पहिल्या कडव्यात भगवद्‌गीतेतील पहिल्या अध्यायाचा सारांश आहे तर दुसऱ्या कडव्यात दुसऱ्या अध्यायाचे सार आहे. पुढील तीन कडव्यात मात्र भगवद्‌गीतेची स्तुती केली आहे.

महाकालीच्या आरतीत समर्थांनी 'अनंत कोटी ब्रह्मांडाची जननी आदिमाया' असे महाकालीचे वर्णन केले आहे. पहिल्या कडव्यात ५ व्या चरणात समर्थ म्हणतात- 'तुजवरी सतका करूनी टाकीन मम देह.' हे ऐकताना अक्षरशः अंगावर रोमांच येतात आणि अंतःकरण भरून येते. याप्रमाणेच या आरतीच्या दुसऱ्या कडव्यात चौथा चरण आहे. 'तुजवीण तारक नाही कोणी मज दृष्टी ।' महाकालीच्या कृपाप्रसादासाठी एवढे व्याकुळ झालेले समर्थ शेवटच्या चरणात 'इच्छा फळ तू देई सकळा भक्तांसी' असं सर्वांसाठी मागणं मागतात.

सर्व देव आणि देवता यांच्या आरत्यांबरोबरच समर्थांनी बहिरोबा, खंडोबा इत्यादी लोकदेवांवरही आरत्या केल्या आहेत. संत गोराकुंभार, सेना न्हावी, रोहीदास चांभार, नरहरी सोनार, संत चोखामेळा इ. संतांवरही आरत्या करून त्यांना वंदन केले आहे. आळंदी येथे समर्थांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले आणि ज्ञानेश्वर माऊलींवर आरती लिहीली. या आरतीमध्ये 'ज्ञानेश्वरी ही भगवद्‌गीतेवरील टीका ज्ञानेश्वरांनी लिहीली' याचा उल्लेख केला आहे, रेड्यामुखी वेद वदविल्यामुळे आपोआपच लोकांचे गर्वहरण झाले आणि ज्ञानदेवांच्या ज्ञानाच्या प्रकाशाने मत्सरी लोकांची तोंडे बंद झाली या सर्व घटनांचा उल्लेख आला आहे.

भगवान् विष्णुंच्या दहा अवतारांवर समर्थांनी आरत्यांची रचना केली आहे. मत्स्य अवताराच्या आरतीत समर्थ मच्छपुराण ऐकण्यास सांगतात. तर कुर्मावताराच्या आरतीत 'पृथ्वी रसातळाला जात असता भगवान् विष्णूंनी कुर्मावतार धारण केला आणि पृथ्वी आपल्या पाठीवर झेलली याचे वर्णन करतात. महाभक्त प्रल्हादाच्या रक्षणासाठी स्तंभातून नृसिंह अवतार प्रकट झाला

त्यासाठी नृसिंह अवताराची आरती रचली. नृसिंह अवताराच्या तीन आरत्या केल्या आहे. याप्रमाणेच वामनावतार, परशुराम अवतार, रामावतार, कृष्णावतार, बौद्धावतार आणि कलंकी अवतार यांच्याही आरत्या केल्या आहेत. त्या त्या अवतारांच्या आरतीत त्या त्या अवतारांचे प्रयोजन आणि त्यांचे स्तवन असा दोन्हींचा समावेश आहे.

दासबोध ग्रंथात सुद्धा समर्थांनी या अवतारांवर समास लिहीले आहेत. समर्थ म्हणतात -

'माहाकुर्माचे शरीर भले । नेणो ब्रह्मांड पालथे घातले । वाराहे आपुले दंती । पृथ्वी धरिली होती । तयाची येवढी शक्ती । वायुबळे ॥'

समर्थांनी भारतभ्रमणात समाजाची हीन-दीन अवस्था अवलोकन केली आणि प्रतिकारशून्य समाजाला जागृत करण्यासाठी आणि संकटावर मात करण्याची वृत्ती अंगात बिंबवण्यासाठी त्यांनी 'राक्षसांना मारणारा, देवांना बंदीवासातून सोडविणारा आणि पत्नीचे अपहरण करणाऱ्याला कंठस्नान घालणाऱ्या श्रीरामाचे दैवत' लोकांसमोर ठेवले. शक्ती आणि बुद्धी याचा आदर्श म्हणून बलोपासनेसाठी हनुमंताचा आदर्श तरुणांसमोर उभा केला आणि महिषासुरमर्दिनी तुळजाभवानी ही तीन दैवते समर्थांनी लोकोद्धारासाठी समाजापुढे आदर्श म्हणून उभी केली. ही तिन्ही दैवते शस्त्रधारी आहेत.

समर्थ जरी रामभक्त होते तरी देवदेवतांच्याविषयी त्यांच्या मनात पूज्यभाव होता. तरीही श्रीरामचंद्र हे समर्थांचे परम आराध्य दैवत असल्याने त्यांनी रामरायांवर सर्वांत जास्त आरत्या लिहील्या आहेत. देवतांची स्तुती करायची, स्तवन करायचे आणि अंतःकरणापासून व्याकुळतेने त्यांना एक हाक मारली की ते आपल्या भक्ताची संकटातून निश्चितच मुक्तता करतात हेच या आरत्यांमधूनच प्रकर्षाने व्यक्त होते.

भक्तांकडून देवपूजा यथासांग केली जाते, परंतु आरती म्हणताना मात्र फार घाई केली जाते. गणपतीच्या आरतीत 'वार्ताविघ्नाची नुरवी' म्हणजे विघ्नांचे निवारण करतो आणि 'पुरवी प्रेम' म्हणजे गणपतीची कृपा' असा अर्थ लक्षातच घेतला जात नाही. याबरोबरच आरतीच्या शेवटी समर्थांनी 'संकटी पावावे' असे म्हटले आहे. पण नेमके आपण 'संकष्टी पावावे' असे म्हणतो. गणपतीने भक्तांचे संकटातून रक्षण करावे का फक्त संकष्टी चतुर्थीलाच कृपा करावी?

देवीची आरती म्हणताना सुद्धा असेच चुकीचे शब्द वापरले जातात. 'दुर्गे दुर्घट भारी' या आरतीचे पहिले कडवे असे आहे. 'त्रिभुवन भुवनी पहातां तुज ऐसी नाही' आणि 'साही विवाद करीतां पडिले प्रवाही। ती तू भक्तांलागी पावसी लवलाही' असे शब्द आहेत. आरती म्हणताना सर्वजण 'तुज ऐसे नाही' आणि 'ते तू भक्तांलागी' असा चुकीचा उच्चार करतात. देवीची आरती असल्याने 'तुज ऐसी नाही' किंवा 'ती तू भक्तालागी' हा शब्दप्रयोग योग्य आहे.

अशा प्रकारे समर्थांनी अनेक आरत्यांची रचना केली. मात्र 'समर्थांची आरती' श्रीमद्दासबोधाची आरती, मनोबोधाची आरती या आरत्या त्यांच्या शिष्यांनी लिहिल्या आहेत. कल्याणस्वामींनी समर्थांची काकडआरती लिहीली आहे. रघुवीरकृत समर्थांची आरती आहे, बालकरामकृत समर्थांची आरती रचना आहे तसेच उद्धवसुत आणि माधवकृत समर्थांच्या आरतीची रचना पाहायला मिळते. दिनकरपुत्र रामचंद्राने आणि स्वामीदासकृत समर्थ आरती रचना उपलब्ध आहे. समर्थ वाङ्मयात अशा अनेक आरत्या आपल्याला पाहावयास मिळतात आणि आरत्यांमधील आर्त भाव भक्तांच्या हृदयात भक्तीचे बीज पेरतो.

सौ. सुप्रिया श्रीकांत जोशी,
४०१, अगस्ती सोसायटी, वाळवेकर नगर,
पुणे - ४११ ००९

• • •

दासबोधातील ज्ञानयोग

- सौ.सीमा रिसवूड



संत वाङ्‌मयात मेरुमण्यासारखा शोभणारा दासबोधही समर्थ रामदासांची वाङ्‌मयीन कलाकृती आहे. त्याच्या विशाल मानससरोवरातून उगवलेली जणू ही ''ज्ञानगंगाच'' म्हणता येईल. दासबोध या ग्रंथाच्या नावावरून ''रामदासांना त्यांचे सद्‌गुरु प्रभु श्रीराम यांच्याकडून झालेला बोध किंवा समर्थ रामदासांनी जनसामान्यांना केलेला बोध '' असा अर्थ होतो.

वयाच्या १५ व्या वर्षी ''रामकृपेसाठी'' तळमळणारा ''नारायण'' पंचवटी गाठतो. तेथे १२ वर्ष गायत्री पुरश्चरण, १३ कोटी रामनामाचा जप, शास्त्रांचा अभ्यास, विपुल सृष्टी निरीक्षण, एकांतातील साधना याद्वारे समर्थ, योगी, विवेकी, लोकांच्या सुखासाठी झटणारा कर्मयोगी, तत्त्वज्ञानी अशा गुणसमुच्चयात रूपांतरीत होतो. समर्थ रामदास दासाबोध या ग्रंथाची सुरुवात ''ग्रंथा नाम दासबोध । गुरु शिष्यांचा संवाद'' अशी करतात. म्हणून दासबोधातील तत्त्वज्ञान गुरु शिष्यांच्या संवादातून आपल्याला कळते. ग्रंथाची भाषा साधी, सोपी आहे म्हणून सहज कळते.

ज्ञान म्हणजे आत्मज्ञान - समर्थ दासबोध ''ज्ञान'' शब्द आत्मज्ञान म्हणून वापरतात. ''ऐक ज्ञानाचे लक्षण । ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान। पाहावे आपणासि आपण । या नांव ज्ञान. द. ५ स.ओ.१ समर्थांच्या तत्त्वज्ञान आत्मज्ञानाला परमोच्च मूल्य आहे. आत्मज्ञानाला समर्थ ''शुद्धज्ञान'' म्हणतात. ईश्वर दर्शनासाठी तळमळणारा साधक जवळचे जिवलग व भौतिक सुखे यांचा त्याग करतो व अलीप्तपणे सर्व व्यवहार करत अखेर 'ज्ञानयोग' साधतो. आपल्याला आपण पाहाणे म्हणजे पाहाणारा जीव व ज्याला पाहायचे तो ईश्वर किंवा ब्रह्म होय. जीव जेव्हा ईश्वरात एकरूप होतो. तेव्हा तो ईश्वराहून वेगळा राहात नाही. शिवस्वरूप होऊन जातो. ज्ञानाचे प्रकार सांगताना समर्थ म्हणतात. ''ज्ञान म्हणिजे जाणणे । अज्ञान म्हणिजे नेणणे । विपरीत ज्ञान, म्हणिजे देखणे । येकाचे येक । २०.९.२३. 'ज्ञान म्हणजे स्वस्वरूप यथार्थ जाणणे.'' अज्ञान म्हणजे स्वस्वरूपाला न जाणणे, विपरीत ज्ञान म्हणजे 'एका वस्तूच्या जागी दुसरीचा भास होणे.'' जसा दोरीच्या जागी साप दिसतो तसा भ्रमामुळे हा भास होतो. ज्ञानप्राप्तीनंतरही 'मला ज्ञान झाले' यातील 'मी' साधकाला नष्ट करावा लागतो या 'ज्ञाननिवृत्तिलाच समर्थ विज्ञान' म्हणतात.

'योग म्हणजे अध्यात्मिक शक्ती विकसीत करणे, योग म्हणजे अप्राप्त्याची प्राप्ती. योग म्हणजे चित्तवृत्ती निरोध' योग प्राप्तीसाठी विवेक व वैराग्य या गोष्टी अनिवार्य आहेत. विवेक म्हणजे 'मला भगवंत हवाच, भक्तीमार्गाचा स्वीकार मी करीनच ही भावना दृढ असणे, वैराग्य म्हणजे देहसुख, भौतिक सुखे, लोकेषणा, धनेषणा या गोष्टींचा प्रयत्न पूर्वक त्याग करणे, 'वैराग्यामुळे दृश्य विश्व असून मन दृश्य जगतातून काढून घेतले जाते. समर्थ म्हणतात 'विवेके अंतरी सुटला । वैराग्ये प्रपंच तुटला । अंतर्बाह्य मोकळा झाला । निःसंग योगी ।' १२.४.१२

ब्रह्म - समर्थ रामदास परब्रह्माला 'सद्‌वस्तू' म्हणतात. परब्रह्म निर्गुण, निराकार, निरवय काळातील आहे. समर्थ त्याला ''असताचि असे'' असे म्हणतात. म्हणजे काल आहे आज आहे, उद्या आहे. परब्रह्माचे शब्दाने वर्णन करता येत नाही. ज्ञानमार्गाची चर्चा करताना आत्मा व ब्रह्म एकच आहेत. असे समर्थ म्हणतात. ब्रह्माला शरीराची उपाधी प्राप्त झाली की त्याला 'आत्मा' म्हणतात. परब्रह्म सर्वत्र आहे. समर्थ म्हणतात 'परब्रह्म ते एकले । येकदांचि सकाळांसी व्यापिले । सकळास स्पर्शोन राहिले । सकळा ठायी' २०.१०.१४ द. २० स. १०॥ मध्ये ब्रह्म धरता येत नाही, टाकता येत नाही कुठेही गेले तरी ते सर्वांना व्यापून आहे. ते नाही अशी जागाच नाही असे ब्रह्माचे वर्णन केले आहे.

माया - परब्रह्मामध्ये स्फुरण उत्पन्न झाले 'एकोऽहं बहुस्याम्' एकातून अनेकत्वाची निर्मिती होण्यासाठी प्रथम स्फुरण किंवा चळण म्हणजे मूळमाया. मायेमध्ये ज्ञानमय जाणिव व शक्ती आहे. समर्थ मूळमायेलाच अंतरात्मा, ईश्वर किंवा खरा देव म्हणतात. ईश्वराला व्यक्तपणाने विस्तार करायला लावणारी त्याची ईच्छाशक्ती म्हणजे मूळमाया. समर्थ म्हणतात. 'ब्रह्म निर्मळ निश्चल । माया चंचल चपळ । ब्रह्म निरोपाधी केवळ । माया उपाधिरूपी ६.५.३। 'नाना रुप रंग । तितुका मायेचा प्रसंग' ६.५.२२ माया माणसाला बाह्य जगात रूप, रंग, आकार यात गुंतवते, बाह्यकारी बनवते, दिसते ते खरे वाटायला लावते तीच माया साधकाने अंतर्मुख केली तर समाधीत स्थिर करते. आत्मशांती देते, सार-असार, शाश्वत-अशाश्वत, नित्य-अनित्य, याचा विवेकाने विचार करायला मदत करून 'ईश्वरसन्मुख' करते.

साधकांचा प्रवास - समर्थ मानवी आयुष्याचा प्रवास बद्धावस्थेपासून साधकावस्थेपर्यंत असतो असे सांगतात. 'मी व माझे' या बंधनांनी बांधलेला तो 'बद्ध' त्याला देह सुख हेच खरे सुख वाटते. तारुण्याच्या उन्मादात सत्य-असत्य, शाश्वत-अशाश्वत यातील विवेक करण्यास त्याला वेळ नसतो. 'मरणाचे स्मरण' करणे त्याला पसंत नसते. असा बद्ध माणूस अचानक एखादा अपघात, एखादी शारीरिक व्याधी, जवळच्या आप्ताचा मृत्यू या घटनेनी दुःखी होतो. सुख देणारी गोष्ट दुःखाला कारण झाली म्हणून व्यथीत होतो. समर्थ करुणाष्टकात म्हणतात ''सकळ स्वजन माया तोडीता तोडवे ना, घडी घडी बिघडे हा निश्चयो अंतरीचा'' या आर्त अवस्थेत त्याला खरे समाधान व खरी शांती मिळविण्याची तळमळ लागते. हीलाच समर्थ मुमुक्षू अवस्था म्हणतात. या काळात संतसंगती, अद्वैत ग्रंथाचे (ज्ञानेश्वरी, दासबोध) वाचन, त्यांचा अभ्यास, योग्य मार्गदर्शन मिळाले तर त्याची वृत्ती पालटते व तो साधक बनतो. साधन करतो. ध्यान, जप, सोऽहं साधना, नित्यनित्य विवेक, सद्‌गुरु सेवा या मार्गांनी सर्व व्यवहार ईश्वराच्या अनुसंधानात करतो. अखंड ध्यानाचे लक्षण अखंड देवाचे स्मरण १४.८.२४ अशी त्याची स्थिति असते. ध्यानाची अखंडता त्याला 'सिद्ध' बनवते. भगवंताची उपासना करता करता साधकाचे अंतरंग सूक्ष्म बनते. निष्ठा व श्रद्धा वाढते. चराचरावर प्रेम करण्याची वृत्ती उत्पन्न होते. समर्थ म्हणतात प्रत्यक्ष माया अलक्ष करी । अलक्ष वस्तु लक्षी अंतरी । आत्मस्थितीची धारणा धरी । या नाव साधक । ५.९.१६.

सद्गुरु व सत्‌शिष्य – प्रभुरामचंद्र हे समर्थांचे 'गुरू'होते. बालपणापासून प्रभुरामचंद्राच्या सगुणरूपाचे त्यांना प्रेम होते. श्रीराम आपल्या हृदयात वास्तव्य करतो. आपले सुख-दुख जाणतो. सदैव आपल्या सोबत राहातो. अशी जिवंत भावना त्यांच्या हृदयात १२ वर्षांच्या साधनेनंतर स्थिरावली. रामाच्या सख्यत्वासाठी त्यांनी माता, बंधू, घर सर्वांना त्याग केला. श्रीरामाची निःस्वार्थ सेवा हा त्यांच्या जीवनाचा स्थायी भाव झाला. 'आमुचे कुळी रघुनाथ । रघुनाथे आमुचा परमार्थ । जो समर्थांचाही समर्थ देवा सोडविता।' ६.७.२१ रघुनाथ भजने ज्ञान झाले अशी कबुली ते देतात. दशक ५ मध्ये सद्गुरू व सत्‌शिष्याविषयीच्या त्यांच्या कल्पना स्पष्ट होतात. सद्गुरू म्हणजे विश्वाला भरून उरणारा, विश्वाचे मूळ, परमपुरुष, मोक्षाचा दाता असतो. "जे वस्तु परम दुर्लभ । जयेचा अलभ्य लाभ । तेचि होये सुलभ । संतसंगे करुनी। १.१०.०२" " वस्तु प्रगटचि असे । पाहाता कोणासीस न दिसे । नाना साधनी सायासे । न पडे ठायी ५.५.२" दुर्लभ असा ईश्वरीसाक्षात्काराचा अनुभव सद्गुरू देतात. सत्‌शिष्य तितकाच श्रध्दाळू, निष्ठावंत, आज्ञाधारक, अभ्यासू चिकाटीचा हवा "सावध, साक्षेपी, दक्ष" तयास तत्काळची मोक्ष हे आश्वासन समर्थ देतात. साधनेच्या अखेरी "ऐक शिष्या येथीचे वर्म । स्वये "तू चि आहेस ब्रह्म । ये विषई संदेह भ्रम । धरुचि नको " ५.६.४५ असे सांगून सद्गुरू आत्मस्वरूपात शिष्याला स्थिर करतात.

नवविधाभक्ती – दशक ४ था नवविधाभक्तींचा आहे. भक्तीची व्याख्या सांगताना समर्थ म्हणतात १) ईश्वराच्या लीला गाणे, ऐकणे, त्यात रमणे म्हणजे भक्ती २)ईश्वराचा अंश होणे "मी त्याचा व तो माझा हे सख्यत्व म्हणजे भक्ती ३) भगवंताचा स्वीकार, त्याच्या आश्रयात राहाणे, त्याच्यावर भार टाकणे म्हणजे भक्ती. भक्तीत ज्ञान, कर्म व प्रेम आहे भक्तिची सुरुवात श्रवणाने व शेवट आत्मनिवेदनाने होतो. आत्मनिवेदनाने कामनेची निवृत्ती, प्रेमाची प्राप्ती, ज्ञानाची दिप्ती, कृपेची शक्ती, साक्षात्काराची पूर्ती ही फळे भक्तिच्या वृक्षाला येतात. ज्ञानोत्तर भक्तीमुळे साधकाच्या मनातले संशय, संदेह नाहीसे होतात. द.१ स.१ मध्ये समर्थ म्हणतात "नासे अज्ञान, दुःख भ्रांती । शिघ्रचि येथे ज्ञानप्राप्ती । ऐसी आहे फलश्रुती । इथे ग्रंथी. "

८२ तत्त्वांच्या निरास – शरीर ८२ तत्त्वांचे गाठोडे आहे. अध्यात्मात शरीर एक साधन आहे. दुर्लभ शरीर व दुर्लभ आयुष्य ईश्वरी कृपा प्राप्त करण्यासाठी मानवाला मिळाले. "या शरीरासारखे" यंत्र आणिक नाही असे समर्थ म्हणतात. सांताकडून अनंताकडे झेप घेण्याचे सामर्थ्य शरीरात आहे. तरीसुद्धा शरीराला बालपण, तारुण्य, वृद्धपण या अवस्था आहेत. व्याधीने शरीर जीर्ण होते. जन्म आहे तसा मृत्यू अटळ आहे. समर्थ "नरदेह" स्तवनात याचे वर्णन करतात. दशक १७ मध्ये समास ८ व ९ मध्ये स्थूल, सूक्ष्म, कारण महाकारण देहाची ८२ तत्त्वे सांगतात. या तत्त्वांचे विवरण प्रत्यक्ष वाचणेच उपयुक्त आहे कारण त्यामुळे ती तत्त्वे समजून मागे टाकणे सोपे होते.

आत्मनिवेदन – स्वतःला विसरणे, अहंकार समूळ नष्ट करणे, वृत्ती शून्य होणे, म्हणजे आत्मनिवेदन. आत्मनिवेदनामध्ये स्वतःचे अस्तित्व परब्रह्मामध्ये संपूर्ण विलीन करणे अपेक्षित आहे. द.१२ स.५ मध्ये समर्थ आत्मनिवेदनाचे प्रकार सांगतात. जड आत्मनिवेदनात वस्तू व व्यक्तीवरील हक्क किंवा मालकी सोडावी लागते. "आहे तितुके देवाचे । ऐसे वर्तणे निश्चयाचे " हे तत्त्व अंगिकारावे लागते." चंचल आत्मनिवेदनात सर्वांच्या अंतर्यामी ईश्वरी चैतन्य पाहाण्याची दृष्टी वाढवणे अपेक्षीत असते. ईश्वरी चैतन्यच शरीराला कार्य करायला तत्पर करते. म्हणून सर्वठायी भगवतभाव जागृत होतो. पृथ्वीमध्ये जितुकी शरीरे तितुकी भगवंताची घरे" या वचनाप्रमाणे सर्वत्र ईश्वर नटलेला आहे. "रिता ठाव हा राघवेवीण नाही" हा अनुभव समर्थांना आत्मनिवेदनामुळे आला. यालाच निश्चल आत्मनिवेदन म्हणतात. निश्चल आत्मनिवेदनात फक्त आत्मस्वरूप शिल्लक राहते व देव-भक्त, गुरु-शिष्य हे द्वैत नाहीसे होते.

आत्मदर्शन – उपनिषदे आत्मस्वरूपाबद्दल "न तत्र वाक् गच्छति" असे म्हणतात. आत्मदर्शनात देवा - भक्ती एकांत असतो म्हणजे तेथे "एकाचाही अंत" असतो. वृत्तिशून्य, निष्कंप, निःशब्द अवस्था असते. द.६ स.१०,द.९स.२ मध्ये समर्थ हा विचार विस्ताराने मांडतात. ब्रह्म आहे मी नाही व मी व ब्रह्म दोन्ही नाही. अशी अवस्था साधक ब्रह्मस्वरूप झाल्यावर होते. 'आहे तितुके नाही झाले । नाही नाहीपणे निमाले । आहे नाही जाऊन उरले । नसोन काही' ६.१०.३८ असे या अवस्थेचे समर्थ वर्णन करतात. इथे बोलणे थांबते, मनाचे व्यापार संपतात. वृत्ती पूर्ण शांत होते. बंधन कल्पनेत असते. वासना व संकल्प नाहीसे झाले की, बंधन नाहीसे होते. वासनेचे विचार पुनर्जन्माला कारण होतात. म्हणून साधकाला "निर्विचार स्थिती" प्राप्त व्हावी. "आता मौन्य न भंगावे । करून काहीच न करावे । असोन निशेष असावे । विवेक बळे । ९.३.४१ अशा स्थितीत समर्थ आत्मनिवेदन म्हणतात.

अहंकार व देहांकार नष्ट होणे – मी म्हणजे देह, देहसुख हेच खरे सुख जग सत्य आहे मी कर्ता, मी भोक्ता हे भ्रम अहंकार वाढवायला मदत करतात. अहंकाराने आत्मपरीक्षण होत नाही. आपले अवगुणच गुण वाटतात. दुसऱ्याबद्दल तुच्छ भावना निर्माण होते. स्वार्थाच्या पायी इंद्रियांच्या आधीन होऊन वागल्याने दुर्गुण फोफावतात. वासना, अनिर्बन्ध झाल्या. तर बुद्धि योग्य निर्णय घेत नाही. अहंकारामुळे आपले अवगुणच गुण वाटतात. अहंकारामुळे हवेपणाचा हव्यास, लोकपणा, धनेपणा वाढते. "बरे खावे, बरे जेवावे, बरे ल्यावे, बरे नेसावे, समस्ती बरे म्हणावे," असा अहंकारी माणसाचा आग्रह होत असतो. मीपणा, देहाचा अहंकार व माझेपणा यात जीव बांधला की स्वतः मूळचे आत्मस्वरूप विसरतो. "जुने ठेवणे मी पणे आकळेना" असे समर्थ मनाच्या श्लोकात म्हणतात. आत्मस्वरूप विसरल्यामुळे जीव ईश्वराहून वेगळा, अल्प बनतो व संकल्पाने बांधला जातो.

संशय व दुश्चित्तपणा, देहातून सुख घेण्याची प्रवृत्ती म्हणजे विषयासक्ती, शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या पाच विषयाचा भोगाचा अतिरेक झाल्यामुळे दुःख भोगावे लागते. आत्मज्ञान प्राप्तीसाठी श्रद्धा आवश्यक असते. संशयाने श्रद्धा नष्ट होते. ईश्वर, सद्गुरू यांच्याविषयी अनन्य भाव असावा लागतो. याचसाठी समर्थ "जयाचा भावार्थ जैसा । तयास लाभ तैसा असे म्हणतात. आत्मज्ञान प्राप्तीसाठी मनाची एकाग्रता लागते. दुश्चित्तपणा म्हणजे मन एकाग्र नसणे. आळस, दुश्चित्तपणा व निद्रा हे पारमार्थिक साधकाचे शत्रू आहेत.

ज्ञानयोगाची फलश्रुती – निर्गुण परमेश्वराची प्राप्ती आत्मज्ञानानेच होते. ज्ञानानेच कर्मयोग साधतो. ज्ञानानेच योग्य उपासना होते. ज्ञानानेच 'मी व माझे' या बंधनातून मुक्ती मिळते. ज्ञानानेच जन्म-मृत्यू चक्रातून सुटका होते. ज्ञानामुळे बुद्धित तीक्ष्णपणा व निश्चयात्मक वृत्ती निर्माण होते. नित्य-अनित्य, सार-असार, शाश्वत-अशाश्वत, आत्मा-अनात्मा यात नित्य, सार, शाश्वताची निवड ज्ञानामुळे करता येते. कर्मफळाचा त्याग करून उत्कृष्ट कर्म ज्ञानामुळेच होऊ शकते. दासबोधातील ज्ञानयोग लोकाभिमुख आहे. आत्मज्ञानाने सामान्य माणूस,विशाल मनाचा, निर्भय, निःस्वार्थी व्हावा व ज्ञानयोगाच्या आचरणाने शिक्षण, प्रयोगशाळा, रणांगण, मंदिर, न्यायालय, सेवाकार्य राजकारण इत्यादी सर्व क्षेत्रात आनंदाने निर्भय वृत्तीने, उत्साहात काम प्रत्येकाला करता यावे व निर्भेळ आनंद अनुभवावा असे समर्थांना वाटते.

२० दशक २०० समासात समर्थांनी ज्ञानयोगाचे विविध आयाम स्पष्ट केले. संपूर्ण लेखनाचे श्रेय त्यांनी प्रभू रामचंद्राला दिले. "भक्ताचेनि स्वाभिमाने । कृपा

केला दाशरथीने । समर्थ कृपेची वचने । तो हा दासबोध ।'' असे ते म्हणतात. त्यांच्या मते ग्रंथांचा कर्ता प्रभू रामचंद्रच होता. यात त्यांचा प्रामाणिकपणा, नम्रता,लीनता व सद्‌गुरू चरणी अनन्यता दिसू येते. ''मी कर्ता ऐसे म्हणसी तेणे तू कष्टी होसी । रामकर्ता ऐसे म्हणसी । पावसी यश, कीर्ती, प्रताप।'' या ओवीत स्वतःच्या कार्याचे, वाङ्मय निर्मितीचे संघटनशक्तीचे कर्तेपण ते प्रभुरामाला देतात. दासबोधातील तत्त्वज्ञानाने मानवी जिवनाचे ,सर्वोच्च कल्याण साधावे या तळमळीने ही ग्रंथानिर्मिती रामदासांनी केली. आत्मज्ञानाचा अनुभव सूक्ष्म आहे. सहजसुलभ नाही पण प्रयत्नाने, ग्रंथाच्या अभ्यासाने तो लोकांनी अंगीकारावा व लोकांमध्ये जिज्ञासा, प्रयत्नशीलता, प्रयोगशीलता, नाविन्य, संवाद साधण्याची कला, जगण्याची उर्मी, ज्ञानाची लालसा निर्माण व्हावी यासाठी हा प्रयत्न होती. आजही आपले जीवन भ्रमानी, संशयानी, धोक्यांनी, चुकांनी, उद्वेगांनी भरलेले आहे. दासबोधातील ज्ञान सद्‌वस्तुचे प्रत्यक्ष ईश्वराचे आहे म्हणून त्यात आजच्या जीवनातील असमाधान, अशांती, दुःख नाहीसे करण्यांचं सामर्थ्य आहे. समर्थांनी देशाटनात भारतीय समाजाची दीन अवस्था पाहिली होती. अनुभवली होती म्हणून दासबोधातील तत्त्वज्ञानात त्यांच्या स्वानुभवातील व्यापकता व व्यावहारिक सुसंगतपणा आढळतो. स्वतःच्या आयुष्यातील काही दिवस त्यांनी लोकांतात व एकांतात काढले म्हणून अध्यात्म व लोकजीवनातील व्यवहार याचा सुरेख संगम या ग्रंथात दिसतो. म्हणून ''समर्थदिवे जे केले ते नसेल कोणी ऐकिले देखिले । भक्ती ज्ञान, वैराग्य गाजले न भूतो न भविष्यति ।'' हे वचन खरे वाटते.

॥जय जय रघुवीर समर्थ ॥

- सौ. सीमाताई रिसबुड
ए/२, गिरीतारा कॉम्प्लेक्स, सुमंगल विहार जवळ,
गारखेडा, औरंगाबाद

• • •

॥ मनोबोध श्री समर्थांचा ॥

समर्थांचा मनोबोध
प्राकृत भाषेचे भूषण
चंचल या मनासाठी
दिले जणू संजीवन ॥१॥

भगवद्‌गीतेचे सार जणू
आलेत्यात सामावून
ज्ञान, भक्ति, कर्म यांचा
असे सुरेख संगम ॥२॥

परोपरी गोंजारून
सांगितले या मनास
ओळखण्या आत्माराम
धरा विवेकाची कास ॥३॥

राम सगुण निर्गुण
चराचराला व्यापून
जनी, वनी, प्रपंचात
ठेवा रामाचे स्मरण ॥४॥

देह नश्वर हा जरी
परमार्थाचे ते साधन
नका करू हो कंटाळा
साधा जिवाचे कल्याण ॥५॥

देहबुद्धी त्यजुनिया
आत्मबुद्धीचा निश्चय
सांगितले बहूपरी
धरा सद्‌गुरूचे पाय ॥६॥

नाही क्षणाचा भरोसा
संधी निघून जाईल
अनमोल नरदेह
पुन्हा ऐसा का मिळेल ॥७॥

स्वये विरक्त अलिप्त
केला प्रपंच विश्वाचा
जनमानस शोधून
दिला मंत्र प्रयत्नाचा ॥८॥

मनोबोधाचा ठेवा
दिला समर्थे जगास
नित्य चिंतन करूनी
जपू अंतरात त्यास ॥९॥

भक्तिप्रेमाच्या पुष्पांचा
सुगंधीत दिव्य हार
कंठी धारण करूनी
घेऊ आस्वाद सुंदर ॥१०॥

समर्थांच्या वाङ्मयाचा
मेरूमणी मनाबोध
ताक घुसुळनी हाती
घ्यावे जणू नवनीत

सौ. प्रभाताई टेंभेकर

"समर्थ रचित सुंदरकांड"

- डॉ.सौ. सुनंदा लोहकरे



समर्थ संप्रदायाची प्रस्थानत्रयी म्हणजे दासबोध, मनोबोध व आत्मबोध. ह्या व्यतिरिक्त समर्थांनी देवीची व हनुमंताची स्तोत्रे रचली. तसेच त्यांच्या अनेक स्फुटरचना आहेत. रामायणातील दोन कांडांवर समर्थांनी लेखन केले. ती कांडे म्हणजे सुंदरकांड, युद्धकांड

आपल्या वयाच्या अवघ्या आठव्या नवव्या वर्षी समर्थ रामदासांनी घरादाराचा त्याग करून पंचवटीकडे प्रयाण केले. तेथे पवित्र गोदावरी तीरावर गायत्रीमंत्राचे पुरश्चरण बारा वर्षेपर्यंत केले.

गायत्री ही वेदमाता आहे तशीच ती सवितृमंडलाची आदिशक्ती आहे. या गायत्रीचे एक रूप तुळजामाता असून ती रामवरदायिनी आहे. तीचे स्तवन समर्थांनी वारंवार केलेले आहे. समर्थ रामचंद्रांचा उल्लेख, समर्थ म्हणून करतात. रामांना शक्तिचे वरदान प्राप्त झाले होते. त्याचप्रमाणे हनुमंतालाही शक्तिचे वरदान प्राप्त झाले होते. हनुमंतानेही रामलक्ष्मणांप्रमाणेच शक्तिचा शोध घेऊन तिची कृपा प्राप्त करून घेतली आहे.

"अशा या प्रतापी हनुमंताचे 'अद्‌भुत कार्य' प्रगट करणे हे समर्थांच्या जीवनाचे मूळ प्रयोजन होते. देवी व मारोती स्तोत्रांमध्ये सुंदर व युद्धकांड रचनेचे प्रयोजनच नव्हे तर गाभाही शक्तिचा शोध घेतलेल्या हनुमंताच्या प्रताप वर्णनाचा आहे" असे श्री. म.रा. जोशी समग्र समर्थ साहित्यातील" समर्थ देवालयातील नंदादीप ह्यामध्ये म्हणतात.

आपण ह्याच दोन कांडांचा परामर्ष ह्या लेखात घेणार आहोत.

रामायण - सुंदरकांड -

समर्थांनी लिहिलेले सुंदरकांड एकशे एक कडव्यांचे आहे. प्रत्येक कडवे चार ओळींचे आहे. सीतेच्या शोधाकरिता चारी दिशेला सुग्रीवाने वानरसैन्याला पाठवले होते. दक्षिण दिशेला जे सैन्य गेले त्यात हनुमंताचा समावेश होता. सगळ्यांनी सीतेचा शोध घेण्याचा खूप प्रयत्न केला पण तीचा शोध लागला नाही. म्हणून सगळे उदासीन होऊन समुद्रकिनारी आले. त्यांच्या मनात खूप उद्वेग निर्माण झाला. समर्थ म्हणतात.

कपी शोधितां शोधितां सुस्त आले ।
नव्हे कार्य ते दैन्यवाणे मिळाले ।
समुद्रातिरी ते उदासीन जाती ।
गळाल्या तनू थोर उद्वेग चित्ती ॥६॥

त्या कपींना कळेना आता काय करावे. सुग्रीवाने त्यांना ताकीद दिली होती की, सीतेचा शोध न लावता तुम्ही आलात तर तुम्हाला जिवंत ठेवणार नाही. ते आठवून सगळेच चिंताक्रांत झाले. त्यावर हनुमंत त्यांना दिलासा देतो व म्हणतो, 'तुम्ही काही काळजी करू नका. मी तिन्ही लोक फिरून येतो व सीतेचा शोध लावतो. असे म्हणून त्या हनुमंताने उड्डाण केले.

हनुमंताने जेव्हा उड्डाण केले त्याचे वर्णन करताना समर्थ म्हणता,

भयासूर तो भीम सिंधू उडाला ।
त्रिकुटाचलाहूनि पैलाड गेला ।
पुढे सर्वही पाण जंजाळ पाहे ।
हनुमंत विस्मित होऊन राहे ॥८॥

तो अथांग समुद्र विस्मचकित होऊन हनुमंत बघत होता. तोच समुद्रात मैनाक पर्वत वर आला. त्याला थोडी विश्रांती घे म्हणाला, पण हनुमंताने त्याला हस्तस्पर्श केला व तो पुढे गेला. किती स्वामीनिष्ठा, किती कार्यतत्परता. स्वामीकार्य होईपर्यंत विश्रांती नाही हा त्याचा निर्धार.

समुद्र ओलांडून हनुमंत समुद्र किनारी आला, समोर बघतो तर काय सोन्याची लंका होती. ती लंकापुरी कशी दिसली समर्थ वर्णन करतात,

गुढ्या गोपुरे देऊळे ते अपारे ।
हुडे कोट जाळांधरे थोर थोरे ।
सुवर्णाचळा माजि तें तेज फाके ।
तया पाहता कीरणे दृष्टि झांके ॥११॥

त्रिकुटाचलावर तो हनुमंत बसला असता त्याने त्या लंकेतील वने उपवने आणि पर्वत शिखरे अवलोकन केली. त्याला अनेक गोपुरे व देवळे दिसली. मोठे मोठे कोट आणि परकोट दिसले. त्या परकोटाभोवती पाण्याचे खंदक होते. संपूर्ण त्रिकुटाचल पर्वत चकाकत होता.

लंकेतील रस्ते चांगले मोठे होते. हनुमंताने ऐकले, त्याला वाद्यांचा घोष ऐकू येत होता. दिवसा लंकेत प्रवेश करण्यापेक्षा सायंकाळी प्रवेश करायचे त्याने ठरवले. त्याचप्रमाणे भीमरूप घेऊन लंकेत जाणे बरोबर नाही म्हणून हनुमंताने लघुरूप धारण केले, व लंकेत प्रवेश केला.

त्याला दिसले की घरे दाटीवाटीने बांधलेली आहेत. त्याचप्रमाणे त्या घरांच्या गर्दीत मधून मधून गोपुरे देखील दृष्टीस पडत आहेत. रस्त्यावर चांगलीच वर्दळ होती. बाजारपेठा देखील चांगल्या गजबजलेल्या होत्या. रस्त्याने हत्ती उन्मत्तपणे चालले होते. कांही घोडेस्वार गाणी म्हणत चालले होते. पण त्या सैनिकांमध्ये झुंझार व्यक्तिमत्व असलेला कोणी हनुमंताला दिसला नाही.

हनुमंत लंकेत फिरत होता. त्याने धर्मशाळा बघितल्या त्याचप्रमाणे

बंदीशाळा बघितल्या. बंदिशाळेत बंदिवान कोण होते? तर स्वर्गीचे देव. सर्व देव अगदी हीन दीन झाले होते. भीतीने ते थरथर कापत होते. देवांची अशी स्थिती बघून हनुमंताला खूप क्रोध आला. अतिशय क्रोधाने तो थरथरू लागला.

देवांची ती स्थिती बघून हनुमंताने निर्धार केला. ज्यांनी ह्या देवांची अशी स्थिती केला त्यांना मी सोडणार नाही. त्या सगळ्यांना मी झोडून काढणार.

समर्थांना अन्यायाची किती चीड होती हे यावरुन दिसते. ते म्हणतात-

मनामाजि आंवांकिले सर्व कांही ।
सिमा सांडली तूळणा त्यासिनाही ।
बहू मानले गर्व मोठ्या बळाचा ।
तया झोडितो दास मी राघवाचा ॥२०॥

ज्यांनी देवांना त्रास दिला त्यांना मी चांगले झोडून काढणार असा मनोमनी हनुमंत विचार करतो.

हळूहळू हनुमंताने आपली शेपटी वाढवायला सुरूवात केली. त्या शेपटीने त्याने सर्व लंका वेढून घेतली. घराघरातून त्याची शेपटी वळवळू लागली. त्या शेपटीने तो घरातले सामान पाडत होता. काही वस्तू फोडत होता. त्याच्या पुच्छाने सर्वांचे रस्ते रोखले. सगळे लोक त्या पुच्छाने एकत्र बांधायला सुरूवात केली व स्वतः एके ठिकाणी उंचावर जाऊन उभा राहिला.

काही सैनिकांनी ते पुच्छ बाजूला करण्याचा प्रयत्न केला पण तो अयशस्वी ठरला. ते पुच्छ त्या सगळ्या सैनिकांना लोळण घ्यायला लावत होते. सगळे शूरवीर सैनिक बदाबदा खाली पडत होते. केवळ शेपटीने हनुमंताने लंकेत हाहाकार माजवून दिला. कपी कुणाला दिसेना पण त्याचा भुभुःकार लोकांना ऐकायला येत होता. त्याचे शेपूट रस्ता आडवूनच बसले होते. त्यामुळे चुलीतील लाकडे धडाधडा पेटत होती पण त्यावर पाणी टाकायला कोणी जावू शकत नव्हते. समर्थ वर्णन करतात.

गळे पाय बांधे किती हात बांधे ।
पुरीमाजि हाकेसि ते हांक सांदे ।
महांवीर चोंताळले ते धरेना ।
बळेंवावरे पुच्छ ते आवरेना ॥२७॥

अशा प्रकारे ते पुच्छ आपली करामत दाखवत होते. कोणालाही त्या पुच्छाचा प्रताप आवरता आला नाही. बिचारे राक्षस जागच्याजागेवर चरफडत होते. पण ते काही करू शकत नव्हते.

सकाळपासून तर संध्याकाळपर्यंत हा शेपटीचा खेळ त्या लंकापुरीत होत होता. कोणाच्या तोंडात अन्नाचा घास नाहीकि पाण्याचा थेंब नाही.

सूर्य अस्ताला गेला व अंधाराने आपले राज्य प्रस्थापित केले. अंधारातही ते पुच्छ वळवळतच होते. लहान मुलांच्या खेळात तर कोणाच्या गळ्यात ते पुच्छ वळवळत होते. त्या पुच्छाने सगळेच भयभीत झाले होते. पण ज्याचे ते पुच्छ तो मात्र कोणालाच दिसत नव्हता.

सगळे हवालदिल झाले व रावणाकडे गेले व म्हणायला लागले, ''अहो पहाता काय? लंका बुडाली'' हे ऐकून रावण संतप्त झाला. त्याने सेनापतीला हुकूम दिला, अरे, कोणाचे ते पुच्छ आहे त्याला ताबडतोब पकडून ठार करा.

रावण असे म्हणतोच आहे तोच ते पुच्छ सभामंडपामध्ये आले. त्याने त्या सभामंडपामधील दिवे पाडले, दिवट्या फोडल्या त्यामुळे सगळीकडे सभामंडपात अंधार झाला. सगळे लोक ओरडू लागले व म्हणू लागले

मुखी बोलती दीप रे दीप आणा ।
दिवे आणिता मूकती दैत्य प्राणा ।
कितीयेक त्या दिवट्या दीप थोवे ।
बळे लागवेगे समुदाव धांवे ॥३९॥

दीप आणणारे दैत्य आपल्या प्राणाला मुकत होते. ते बघून बाकीचा समुदाय सैरावैरा धावू लागला. काही दैत्य पुन्हा दिवे घेऊन आले. ते पुच्छाच्या भाराने विझून गेले. त्या अंधारात फक्त हनुमंतच इकडे तिकडे वावरू शकत होता. तो कोणाला गुदगुल्या करत होता तर कोणाचे नाक व कान कापत होता. त्यांच्या गालावर व अंगावर तो नखाने बोचकारत होता. कोणाचे वस्त्र फाडून मोठमोठ्याने गुरगुरत होता.

सगळे शूरवीर दैत्य त्या ठिकाणी होते पण कोणाचे काही चालेना. सगळ्यांचीच भीतीने बोबडी वळलेली होती. हनुमंत आपला आकार सतत बदलत होता. कधी विशाल रूप धारण करायचा तर कधी लघुरूप धारण करायचा. जे दैत्य त्याला धरायला जायचे त्यांचेच हात मोडत होते. त्या सर्व पापी दैत्यांना हनुमंत जोरदार बुक्यांनी मारत होता.

सगळेजण त्या कपीवर खूप चिडले होते. काय करावे त्यांना सूचेना. त्याची फक्त गुरगुर त्यांना ऐकू येत होती. नंतर तो कपीवीर रावणाकडे गेला व त्याचा मुकुट त्याने काढून घेतला व रावणाला जोरदार ठोसा मारला. रावणाची सुंदर वस्त्रे त्याने फाडली त्याचे मोत्याचे दागीने त्याने तोडून फोडून टाकले. हनुमंताला रावणाचा किती राग आला असेल हे ह्या कृतीवर दिसून येते. हनुमंताने त्या सभागृहातील सगळ्यांनाच नग्न केले. राक्षसांची अशी फजिती करून हनुमंत उडाला तो थेट अशोकवनात आला.

अशोकवनात आल्यावर हनुमंत झाडामध्ये दडून बसला. त्याने एका अशोकवृक्षाखाली सीतामाईला पाहिले. ती खाली मान घालून बसली होती. कपीवीराने मुद्रिका तिच्या पुढ्यात टाकली.

सितेने पुढे मुद्रिका वोळखिली ।
बहुतांपरी शब्द कारुण्यबोली ।
पुढे मारुती भेटला जानकीला ।
समाचार सांगोनि आनंद केला ॥५२॥

हनुमंताने सीतेला रामाचा सगळा समाचार सांगितला. तो ऐकून सीता आनंदित झाली. नंतर हनुमंताने तीला भूक लागल्याचे सांगितले. त्यावर सीतामाई म्हणाल्या की अशोकवनात फळझाडे आहेत त्याची फळे खा. सीतामाईची आज्ञा मिळताच

फळे भक्षिली सर्व नानापरीची ।
बहुस्वाद वर्णे कलाकुसरीची ।
कपीवीर तो तृप्त झाला निवाला ।

पुढे वृक्ष मोडावया सिद्ध झाला ॥५५॥

एकदा पोट भरल्यानंतर त्या हनुमंतात शक्तिचा संचार झाला. त्याने अशोकवनातील झाडे मोडायला व काही झाडे उपटायला सुरवात केली. झाडांचा पडण्याचा आवाज ऐकून काही राक्षस त्याला हाकलायला आले. वेगवेगळी शस्त्रे घेवून ते त्याच्या मागे धावू लागले.

बळे आगळा आक्षया लक्ष भेदी ।
चुकावी कपीवीर लागोचि नेदी ।
बहु मारिता भागळे भग्न जाळे ।
कितीयेक ते दैत्य पोटी गळाले ॥६१॥

परंतु तो कपी त्या राक्षसांना सापडला नाही. बरेच राक्षस मृत्युमुखी पडले. रावणाचा मोठा मुलगा अक्षय हनुमंताला मारायला आला. हनुमंताने त्याला चांगले झोडून काढले व ठार केले. त्यानंतर जंबुमाळी आला. त्या जंबुमाळीचा हनुमंताने चांगला समाचार घेतला. जंबुमाळीला मारले हे बघून ती राक्षसांची फळी दुभंगली.

अक्षय ठार झाला तेव्हा सगळे राक्षस शोक करू लागले. मंदोदरीला जेव्हा कळले तीचा पुत्र अक्षय मारला गेला तेव्हा ती शोकसागरात बुडून गेली. तिने खूप आकांत केला. तेव्हा रावण म्हणतो.

पुसे रावणू काय रे काय जाले ।
तुम्हालागी मारावया कोण आले ।
कपी येकला बैसला तो पळेना ।
चळेना , ढळेना कदा आकलेना ॥६७॥

तेव्हा ते राक्षस रावणाला सांगू लागले. हा सगळा प्रताप त्या एकट्या कपीचा आहे. त्याला आम्ही आवरू शकत नाही. ते राक्षस पुढे सांगू लागले.

तया टाकिता पाश मोठाचि होतो.
लघुरुप होवोनि निघोनि जातो ।
कदाही पडेना कदा सापडेना ।
तेणे मारिली दैत्य उदंड सेना ॥६८॥

त्याला बांधण्याकरिता आम्ही मोठा पाश तयार केला पण ह्याने लघुरूप घेतले व तो सहज त्या पाशातून निघून गेला. त्याने आपल्या खूप राक्षसांना मारले व आपल्या सैन्याचा खूप संहार केला. हे ऐकून रावण खूप चिडला. त्याने विधीला बोलावले. त्याला अगदी कडक शब्दात सांगितले की ताबडतोब जा व त्या कपिला धरून आण. तू जर त्याला आणू शकला नाही तर तुला तुझ्या प्राणाला मुकावे लागेल.

विधीने विरंचीला पुढे केले व तो जायला निघाला. त्यांच्या मागे असंख्य लोक निघाले. वनामध्ये ते आले तिथे त्या कपीला बघून सगळ्यांनी नमस्कार केला व ते सर्व हनुमंताची स्तुती करू लागले.

भीमरुपी महारुद्रा वज्रहनुमान मारुती
वनारी अंजनी सुता रामदूता प्रभंजना
महाबळी प्राणदाता सकळा उठवी बळे
सौख्यकारी शोकहारी दूत वैष्णव गायका

पुढे ते म्हणू लागले.

बहुतांपरी कीर्तीचे येश घ्यावे
दयाळा कपी ये घडी शांत व्हावे
न होता मला मारिती ब्राह्मणाला
बहुसाल कल्याण व्हावे तुम्हाला ॥६९॥

असे म्हणताच हनुमंत त्यांच्या स्वाधीन झाला. विधीने त्याला रावणासमोर हजर केले. त्याला बघताच रावण गरजला. म्हणाला, "आता मी तुला जिवंत ठेवणार नाही. तुझा मृत्यू कुठे आहे ते सांग?" त्यावर हनुमंत म्हणाला.

म्हणे मारुती काळ मारु शकेना
कृपाळूपणे तोषला रामराणा
न वाटे खरे सांगता रावणाला
म्हणे वान्नरु लांगुली अग्न घाला ॥७४॥

हनुमंताने सांगितले, माझ्यावर रामाची कृपा आहे. त्यामुळे मला काळाचे देखील भय नाही. माझा मृत्यू माझ्या शेपटीत आहे. त्या शेपटीला आग लाव. सगळ्यांनी मिळून त्याच्या शेपटीला वस्त्रे गुंडाळायला सुरूवात केली. लोक वस्त्रे गुंडाळत आहेत परंतु शेपटी मात्र लांबतच जात होती. त्या वस्त्रांवर तेल टाकले व ते शेपटी पेटविण्याचा प्रयत्न करू लागले. अग्नी प्रदीप्त होण्याचे नाव घेईना. तिथे उपस्थित असलेले सगळे वीर फुंकायला लागले पण अग्नी प्रदीप्त होईना. ते बघून रावण तिथे आला. समर्थ वर्णन करतात-

पुढे रावणू थोर कोपे कडाडी ।
बळे फुंकिता ज्वाल नेटे भडाडी ।
जळाली मुखे भस्मल्या खांडभीषा ।
बहुसाल लंबीत होत्या विशेषा ॥७९॥

शेवटी रावण खूप चिडला व जोरजोरात फुंकू लागला. त्याबरोबर अग्नी प्रदीप्त झाला व रावणाच्या लांब लांब मिशा सगळ्या जळून गेल्या. ते बघून हनुमंत तिथून उडाला. आता त्याने नवीन उद्योग सुरू केला. प्रत्येक गृहामध्ये, गोपुरामध्ये तो आपले पुच्छ घालू लागला. सगळीकडे आग लावू लागला. सगळी बाजारपेठ आगीच्या भक्ष्यस्थानी पडू लागली. आग लागली, आग लागली म्हणून सर्व इकडे तिकडे ओरडत धावू लागले. त्या आगीच्या भक्ष्यस्थानी किती राक्षस पडले, किती प्राणी जळाले ह्याची गणतीच नव्हती.

वेगवेगळ्या प्रकारचे रथ, घोडे, पालख्या सगळे जळून गेले. नृत्यशाळा, नाट्यशाळा, गायनशाळा सगळ्या आगीच्या भक्षस्थानी पडल्या. एका ठिकाणी दारुगोळा होता. त्या दारुगोळ्यात त्या कपीने आपले पुच्छ घातले. त्याबरोबर तो दारुगोळा सगळा पेटला व हवेत त्याचे बार उडू लागले. जणूकाही आकाशात असंख्य तारे चंद्र सूर्यासह प्रकाशत असल्याचे दिसत होते. दारुगोळ्याच्या ज्वलनामुळे सगळीकडे धूर पसरला त्यामुळे काहीच दिसत नव्हते. ती जळणारी सोन्याची लंका तो कपीवीर पाहात होता. त्याच्या पुच्छाचा एक केसही जळला नव्हता. 'देव तारी त्याला कोण मारी.' नंतर त्या कपीवीराने आपले पुच्छ समुद्रात बुडवले तेव्हा ती आग शांत झाली. समर्थ वर्णन करतात.

समुद्री शुचिष्मंत होऊनि आला ।
नमस्कार घाली तया जानकीला ।
म्हणे जानकी येकला बा विदेसी ।
कपी रे बहुतांपरी कष्टलासी ॥९२॥

हनुमंताने शेपटीची आग समुद्राच्या पाण्याने शांत केली व समुद्रात स्नान केले, व तो सीतामाईच्या भेटीला आला. त्याचा पराक्रम सीतामाईनी ऐकला होता, त्याच्या शौर्याचे तीला कौतुक वाटले. ती त्याला म्हणते, ह्या परदेशात तू एकटा असल्यामुळे तुला खूप कष्ट पडले.'

त्यावर हनुमंत म्हणतो

म्हणे मारुती 'धन्य ते दीस आले ।'
तुम्हा देखता सर्वही कष्ट गेले ।
प्रभु वाट पाहेल तो रामराजा ।
निरोपेचि मी सीघ्र जाईन काजा ॥९३॥

मी तुमचा निरोप घ्यायला आलो आहे. तिकडे रामराजा माझी वाट पाहात असेल. तुम्हाला बघितले व माझा सर्व शीण नाहीसा झाला. आता मला निरोप द्या. मी लवकर परत जाईन.

ते ऐकून सीतामाईच्या डोळ्यात अश्रू आले. ती म्हणाली रामाला सांगा मला लवकर येथून घेवून चला.

सीतामाईचा निरोप घेवून हनुमंत निघाला. जाताना परत परत मागे बघत चालला. त्याचाही गळा दाटून आला. पण विवेकाने त्याने आपले मन आवरले व धैर्याने त्याने उड्डाण केले. सिंधू पार करून आला. समुद्रकिनारी सगळे वानर त्याची वाटच पाहात होते. 'सीता सापडली' 'सीता सापडली' असे तो सांगताच सगळ्यांना खूप आनंद झाला.

नंतर सगळे रामाला भेटायला गेले. त्या वानरांचा तो आवेश, त्यांचा तो आरडाओरडा ऐकून रामांना खात्री झाली की काहीतरी चांगली बातमी हे देणार. इतक्यात हनुमंत समोर आला. समर्थ वर्णन करतात-

कपी लागवेगे मुखे बोलताहे
अशोकी जगन्मात कल्याण आहे
पुढे मारुती तो नमस्कार घाली
चितोवृत्ती ते राघवाची निमाली ॥९८॥

सीता अशोकवनात सुरक्षित आहे हे ऐकून रामाचा अंतरीचा शोक कमी झाला. त्यांचे चित्त शांत झाले. सगळ्यांना सीतेचा शोध लागला हे ऐकून आनंद झाला. सगळे एकमेकांना सीतेच्या शोधाबद्दल सांगत होते. त्या सभेत हनुमंत रामांसमोर हात जोडून उभा राहीला व म्हणू लागला. सीतेचा शोध लागला, पण सीतामाईला आपणापर्यंत आण्याकरिता मला आशीर्वाद द्या अशी प्रार्थना करू लागला.

हनुमंत म्हणतो

सभामंडळी राम सन्मुख पाहे
उभा दास साफल्य तो सांगता हे
महत्कृत्य व्हावे जनी येश यावे
प्रभुसी समस्तांसी कल्याण व्हावे ॥१०१॥

अशा प्रकारे हे सुंदरकांड म्हणजे हनुमंताची शौर्य गाथा आहे. समर्थांना शौर्याचे खूपच कौतुक, त्यातून त्यांच्या लाडक्या दैवतेच्या शौर्याचे वर्णन करताना समर्थांची वाणी प्रफुल्लीत न झाली तरच नवल. सुंदरकांड वाचत असताना ते प्रसंग सगळे आपल्या डोळ्यांसमोर घडत आहेत असा भास होतो. समर्थांनी खूप बारीक तपशिलात हे वर्णन केले आहे. पण त्यांच्या काव्याचा मुख्य नायक हनुमंत असल्यामुळे बाकीच्यांबद्दल फार त्यांनी ह्यात लिहिले नाही. समर्थांची शब्दरचना इतकी रोकठोक आहे की सुंदरकांड वाचत असताना आपल्यालाही हनुमंताच्या शौर्याचे कौतुक वाटते व त्याच्या पराक्रमाचा आनंद होतो.

मराठीमध्ये अशा प्रकारचे सुंदरकांड दुसरे नसावे. हिंदीतील सुंदरकांडाचा पाठ नेहमी केला जातो. ह्या मराठी सुंदरकांडाचा पाठ आपण केल्यास समर्थांच्या सुंदर रचनेचा परिचय सर्व मराठी भाषीकांना होईल व त्यापासून त्यांना खचितच आनंद मिळेल.

- डॉ. सौ. सुनंदा लोहकरे
८९ साकेत स्नेहनगर,
वर्धा - ४४२ ००१

• • •

श्री समर्थ रामदास स्वामींचे अभंग व विठ्ठल भक्ती

- श्री. अरविंद बा. बिडकर



'समर्थ रामदास स्वामींचे अभंग आणि त्याची विठ्ठल भक्ती' हा विषय आपल्या मनावर असलेला 'श्री दासबोध आणि मनाचे श्लोक' यांच्या प्रभावामुळे वेगळाच वाटतो. गुरूंचे गुरू असलेले संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज, त्यांच्या वेळेचा काळ, हा धर्मनिष्ठ व वैदिक आचरणाच्या प्रवृत्तीने भरलेला होता. समर्थ रामदासस्वामींच्या वेळेचा काळ हा मोगलांच्या आक्रमणामुळे व तत्कालीन अस्थिर परिस्थितीमुळे धर्मग्लानिचा व आक्रमकतेचा होता. कर्म आणि ज्ञानानिष्ठीत कर्मयोग हा ज्ञानेश्वरांचा ज्ञानेश्वरीतील पाया. तर ज्ञानेश्वरांचे ज्ञान, नामदेवांची भक्ती व रामदासांची शक्ती असा त्रिवेणी संगम, देश, देव आणि धर्म ह्यांचे महत्त्वांसह रामदास स्वामींच्या वाङ्मयात आढळतो. स्वाभाविक धर्मानिष्ठित कर्मयोगाबरोबर, यवन दृष्ट प्रवृत्ती विरुद्ध टिकण्यासाठी शक्ती, वारकरी सांप्रदायासाठी भक्तीचा पाया, समाज एकरूप करण्यासाठी त्यांनी लिहिलेल्या अभंगगाथेमध्ये आढळतो.

''समर्थांनी कर्माचे झाड ज्ञानाच्या भूमीत लावले, त्यांना भक्तीचे पाणी घालून त्या झाडाला येणारी सुगंधी सुवासिक फळे लोकांना मुक्त हस्ते वाटली '' असे न्या. राम केशव रानडे यांनी म्हटलेले आहे.

राष्टभक्ती आणि सर्व समाज एकत्रित करणे. यवन म्हणजे दृष्ट प्रवृत्ती विरुद्ध सारा समाज जागरूक करणे हेच समर्थ रामदास स्वामींचे ध्येय होते. त्यासाठी त्यांनी गणपती, श्रीराम, मारुती, श्रीकृष्ण, विठ्ठल, शंकर, देवी, खंडोबा, ह्या सर्व विविध देवतांची आळवणी विविधांगी काव्यप्रकाराने केलेली आहे. सतराव्या शतकांत महाराष्ट्रात सर्वत्र विठ्ठल भक्तीचे महात्म्य होते. वारकरी सांप्रदायाच्या पताका सर्वत्र फडफडत होत्या. लोकमानसात दृढ झालेला विठ्ठल हा कृष्णाचाच म्हणजेच विष्णूचाच म्हणजेच श्रीहरीच्या रूपाचा अविष्कार होता. 'एकाच निर्गुण निराकार ब्रह्माची विठ्ठल व श्रीराम ही सगुण साकार रूपे आहेत' हे समर्थांनी जाणले होते. 'मना सज्जना भक्तिपंथेचि जावे । तरी श्री हरी पाविजेतो स्वभावे ।' आणि 'प्रभाते मनी राम चिंतीत जावा । पुढे वैखरी राम आधी वदावा' असे विठ्ठल आणि श्रीराम ह्यांचा भक्तीचे महत्त्व त्यांनी 'श्रीमनाचे श्लोक' मध्ये सांगितलेले आहे. 'कटावरि कर उभा निरंतर । भक्तांसी आधार पांडुरंग' सांगून विठ्ठलावर २३ अभंग, ३ आरत्या, एकादशी महात्म्य, हरिनाम आणि हरिदास यांचेवर श्रीरामदास स्वामींनी विठ्ठलावरील भक्तीपदांनी रचना लिहून विठ्ठल भक्ती प्रकट केली आहे. समर्थ रामदास स्वामींच्या साहित्याची थोरवी, विशालता, काव्यातील भारदस्तपणा, बारकाईने केलेले गूढ अध्यात्मिक व पारमार्थिक वर्णन ह्या बाबत विवेचन करण्याचा ह्या लेखाचा भाग नसून भावलेल्या भक्तीभावावर आधारलेला हा लेख आहे.

'ब्रह्मयालागुनी मच्छप । पृथ्वीलागुनि कच्छप । तो हा धरूनि विठ्ठल रूप । शोभतो कैसा ॥१॥ पुढती झाला सूकर । प्रल्हादालागुनि उग्र । तो हा सगुणवेषधर । शोभतो कैसा ॥२॥ बली नेला पाताळी । नृपावरी धुमाळी । तो हा जोडला पाऊली । शोभतो कैसा ॥३॥ रावण वधिला शरी । गोवर्धन गिरिधारी । तो हा जघनावरिल्या करीं । शोभतो कैसा ॥४॥ लुंचित नागिवा उघडा । जो का बैसणार घोडा । तो हा पुंडलिकापुढां । शोभतो कैसा ॥५॥ ब्रह्मांडाच्या हारी । जया रोमरंध्री । तो हा रामदासांतरी । शोभतो कैसा ॥६॥ असे दशावतारी विष्णू म्हणजेच भावलेला विठ्ठल सांगून -

'नाम विठ्ठल सुंदर । ब्रह्मा विष्णु आणि हर । गुणातीत निर्विकार शुकादिकी गायला ॥ चंद्रभागा रम्य तीर । तेथे उभा कटिवर । दिंड्या पताका अपार । यात्रा घोष जाहला ॥ तेथे येता रामदास । दृढ श्रीरामी विश्वास । रूप पालटोनी त्यांस । रामरूपी भेटला ॥ पुन्हा विठ्ठल स्वरूप । राम विठ्ठल एकरूप । पूर्वपुण्य हे अमूप । लक्ष पायी ठेविला ॥' अशा विठ्ठलाकडे येताना 'धन्य क्षेत्र पंढरपूर । तेथे यात्रा मिळाली चूर । चंद्रभागा रम्यत्तीर । नावेवरी बैसती । येऊ नि पैलतिरी जाण । परंपरी होतसे सभामंडपाचा थाट । गाती साधुसंत भाट । ज्याचे नामाचा बोभाट । विणे टाळ वाजती ।' असे विचार एका सवाईमध्ये आहेत.

'राम कृपाकर विठ्ठल साकार । दोघे निराकार एक रूप ।' असे सांगत, ते म्हणतात कृपाळू असलेल्या राघव व पांडुरंग ह्यांचाच भक्तीभाव कायम धरा. विटेवर विसावलेले राघव व पांडुरंग यांचे एकत्रित झालेले, चैतन्य तेथे आहे. आनंदाने विटेवर उभ्या असलेल्या विठ्ठलाला जे ओळखतात ते जन धन्य होत. श्रेष्ठ, थोर, अप्रतिम आणि सहज साध्य होणाऱ्या विठ्ठलाबद्दल ते म्हणतात- ' सहज बरवा सहज बरवा । सहज बरवा विठोबा माझा ॥१॥ सहज सावळा दिगंबर । सहज कटी कर ठेऊनि उभा ॥२॥ रामी रामदास म्हणे । सहज अनुभव तोचि जाणे ॥३॥ निःस्सिम भक्तीभावाने एका अभंगात 'काही बोल रे विठ्ठला, मौन वेष कां धरिला ।'' म्हणत ते विचारतात ' अरे विठ्ठला मी काय तुझ्याकडे गाठोडे मागतो आहे का? मला धन नको आहे, फक्त डोळे उघडून मला कृपा भेट हवी आहे. कारण 'विठोबा तू आमचे कुळदैवत । आम्ही अनन्य शरणागत । तुझे पायी असे चित्त । जीवीं आर्त भेटीचे ॥' परंतु हा विठ्ठल कसा आहे तर हा देव त्रिलोकांतील श्रेष्ठ आणि समचरणी आहे. या विठ्ठलास मी आत्मीयतेने

पाहात आहे 'देवाचे चिंतानाने आजचा दिवस सोनियाचा झाला, पांडुरंग रंगी आला.' अशा प्रकारे विठ्ठला बाबत आळवणी वेगवेगळ्या अभंगातून दिसते.

पुंडलिकाबाबत ते म्हणतात, 'त्याचे भाग्य असे मोठे आहे की त्रिलोकीचे दैवत असलेल्या भवसागर तारणाऱ्या विठ्ठलास केवळ आपल्या भक्तीने भूलवून वेडावून पंढरीस आणले. विटेवर वाळवंटात त्यांना दशदिशा उजाळत भिमातीरी उभे केले. ह्या विठ्ठलाच्या दर्शनाने आमची मात्र संसाराची चिंताच मुक्त झाली. ह्या विटेवर पुंडलिकाने ज्याला उभा केला आहे, तो कोण आहे? त्याचे नाव पांडुरंग. तोच देव, तोच भक्त, तोच मुक्त, तोच श्रोता आणि तोच वक्ता आहे. अशा सर्वव्यापी विठ्ठलामुळे आमच्या संसारातील संकटे मात्र नष्ट झाली.

पंढरपूरचे महात्म्य रामदास स्वामी अतिशय समर्थकतेने करतात. पंढरपूरासारखे अन्य क्षेत्र ह्या तिन्ही जगात नाही. भूलोकीचे हे क्षेत्र. येथील पांडुरंगाच्या मंदिराच्या कळसाचे नुसत्या दर्शनाने अहंकाराचा नाश होतो. येथे जमलेल्या संताच्या भेटी गाठीने जन्म मरणाचा फेरा चुकतो चंद्रभागेच्या स्नानाने सहजतेने मुक्तीचा लाभ होतो. पंढरी हे केवळ एक गाव नाही. तर पंढरी म्हणजे सारे विश्व हे क्षेत्र भिमातीराजवळ. तेथे उभा पांडुरंग. ते स्थान पाहून चित्त गुंततेइतके गुंतते की विषयांचा - षडरिपूंचा व्याप जाऊ न त्या श्रीरंगापाशीच मन जडते. पंढरपूर असे क्षेत्र आहे की तेथे गेलेल्यास कोणत्याही साधनेविणा तारले जाते. इथल्या विठ्ठलास पाहून तिन्ही लोकात आनंदच आनंद व्यापलेला आहे.

विठ्ठलावरील अंभगामध्ये कळस आहे तो श्रीरामाच्या रूपकावरून लिहीलेल्या अभंगाचा 'रामदासी जैसा भाव तैसा होय पंढरीराव' त्या भावातून पंढरीनाथांना पाहून त्यांना वाटले 'धनुष्यबाण' काय केले, कां कर कटावरी ठेविले.' विठ्ठलाने कटावरील कर काढावेत, धरलेला अबोला सोडावा म्हणूनच हा प्रश्न विचारला असावा. त्याच बरोबर दुसऱ्या अभंगात 'राम अयोध्येचा वासी । तोचि नांदे द्वारकेसी । आतां भक्ताचियासाठी । उभा चंद्रभागेतटी । राम तोचि विठ्ठल जाला । रामदासासी भेटला ॥ विठ्ठल व रामाबद्दल त्यांचे सांगणे 'आमुचिये घरी वस्ती निरंतरी । हृदयी एकाकारी राहिलेले ॥ समर्थ रामदास स्वामींची एकाग्र भक्ती म्हणते, 'येथे उभा कां श्रीरामा । मनमोहन मेघश्यामा । चाप बाण काय केले । कर कटावरी ठेविले ॥ शेवटी 'रामदासी सद्भाव जाणा । राम जाला पंढरीराणा ॥ ह्या प्रसिद्ध अभंगावर अनेकांनी निरूपणे केली आहेत.

विठ्ठल, पुंडलिक, पंढरपूर, श्रीराम अशा प्रत्येक भावांतून, प्रसंगातून त्यांनी श्रीरंगाची, श्रीहरीची, पांडुरंगाची भक्ती अभंगातून प्रकट केली आहे. पंढरपूर आणि विठ्ठल म्हटले म्हणजे विठ्ठलाच्या वाराचे बुधवारचे आणि एकादशी तिथीचे महत्त्व आलेच. एकादशी हे व्रत आहे. त्या एकादशीचे महत्व त्यांनी तीन अभंगात सांगितले आहे. 'ज्यासी हरिची प्राप्ति व्हावी । तेणें हरिदिनी करावी ॥ एकादशी त्यजिल्या अन्न । लाभ वैंकुठ भुवन । एकादशी नव्हे व्रत । वैकुंठीचा महापंथ ॥ एकादशीच्या उपोषणे । विष्णू लोकी ठाव घेणे ॥ असे महात्म्य एकादशीचे सांगितलेले आहे.

विठ्ठलावरील भक्ती, संकीर्तन आणि भजनानंदात्रील अभंगानी प्रकट केली आहे. टाळ वाजताच हरिनामाचा छंद लागतो. त्या नामाचा घोषच आगळा वेगळा आहे. त्या त्यांच्या रंगलेल्या आनंदाला रामदास लोटांगण घालत आहेत. अशा तऱ्हेने स्वतःकडे विनय घेऊ न त्यांनी हरिनामाचे महत्त्व वाढविले । माझे भक्त गाती जेथें । तो मी कीर्तनी सापडे । रामदास म्हणे सांचे। वाक्य आहे भगवंताचे॥ हरिदास असलेल्या कीर्तनकाराचे कौतुक करताना 'अशांच्याच पाया पडावे, अशांचेच कीर्तन ऐकावे की जे कथा सांगतात पण त्याचप्रमाणे त्या कथेचा अंगिकार आचरणात आणतात. ते सांगण्याची किंमत करीत नाहीत. त्यांना सन्मानाचा आनंद नाही की कोणी केलेल्या अपमानाचे दुःख नाही. कोणी दात्याने थोडसेच दिले तर तेही आनंदाने घेणारे असे खरे हरिदास, म्हणजेच विठ्ठल भक्त अशी विठ्ठल भक्ती करणारे श्रेष्ठच.

देवाची आर्ततेने केलेली आळवणी म्हणजे आरती, दैवताचे गणुवर्णन, स्वरूप वर्णन, लिला व भक्ताचा भाव आरतीत असतो. उत्कट भक्तीने समर्थ रामदास स्वामींनी विविध दैवतांवर ७७ आरत्या केलेल्या आहेत. त्यातील तीन पांडुरंगावर आहेत. १. जय देव जयदेव जय पांडुरंगा । निरसी मम संगा निःसंगा भवगंगा. २. जय जय पांडुरंगा । जय जय पांडुरंगा । तुझ्या दरषणे दोष जाती भंगा ३. जय देव जय देव जय पांडुरंगा । आरती वोवाळु अघ ने निजभंगा. २ऱ्या आरतीत थोडक्यात महात्म्य व ३ऱ्या आरतीत थोडक्यात पांडुरंगाचे वर्णन.

श्री सांप्रदायिक भजन पद्धती सांगताना, अभंग पदे म्हणून झाल्यावर, 'रामकृष्ण हरी । जय जय रामकृष्ण हरि' हे भजन सुरु होताच बुक्का लावावा व वारांचे पद (बुधवारी विठ्ठलाचे अभंग) व भजन 'विठ्ठल जय जय। विठोबा जय जय ॥' म्हणावे. रामनवमी व दासनवमी उत्सवात सकाळ, संध्याकाळी छबिना संपल्यावर तेरा प्रदक्षिणा घालतात. त्यात क्रमाने ९ व्या प्रदक्षिणेत विठ्ठलाची निर्जरवर स्मरहरधर भीमातीरवासी। पीतांबर जघनी कर दुस्तर भव नाशी ॥ शरणागत वत्सल पालक भक्तांसी चालक गोपिजनमन मोहन सुखराशी ॥ जय देव जय देव जय पांडुरंगा । निरसी मम संगा निःसंगा भवगंगा ॥जयः॥१॥ आणिमा लछिमा गरिमा नेणति तव महिमा । नीलोत्पल दल विमला घननिल तनु शामा ॥ कंटकभजन साधुरंजन विश्रामा । राघवदासा विगलिता कामा निःकामा ॥जय॥२॥ आरती म्हटली जाते. सांप्रदायातील ह्या शिस्तपूर्ण पद्धतीने विठ्ठलावरील भावच प्रकट होतो. 'राम कृष्ण हरी'' मंत्र सिद्ध करणाऱ्या समर्थ रामदास स्वामींच्या विठ्ठल भक्तीचे भाव दाखविणारा हा लेख त्यांनाच अर्पण. जय श्रीराम समर्थः

साभार. संदर्भ : श्री समर्थ रामदास स्वामी अभंग गाथा

प्रकाशन : श्री संत साहित्य सेवा संघ, सोलापूर

श्री. अरविंद बा. बीडकर,

४ जयति, संगमनगर पद्मावती,

पुणे - ४११ ०३७

• • •

श्रीमद् दासबोधाच्या अभ्यासाची दिशा

- सुनिल चिंचोलकर



प्रास्ताविक -

समर्थ रामदासांनी देह ठेवताना आपल्या ग्रंथासंबंधी शिष्यांना सांगितले होते. 'नका करू खटपट । पहा माझा ग्रंथ नीट । जेणें सायोज्यतेची वाट । गवसेल की ॥' कोणता ग्रंथ पाह्याचा ? तर ग्रंथराज दासबोध. कसा पाहायचा' तर नीट. आणि नीट पाहण्याचे तंत्र समर्थांच्याच भाषेत 'वीस दशक दोनसें समास । साधकें पहावे सावकास। विवरता विशेषा विशेष । कळो लागे ॥' याचा अर्थ घाई - गर्दीने वाचून टाकणे समर्थांना मान्य नाही. अर्थांतर पाहिल्यावीण श्रवण करण्याला समर्थ श्रवण म्हणत नाही. अशा श्रोत्याला ते मनुष्यरूपी पाषाण म्हणतात. म्हणून समासांचे वाचन सावकाश व्हावे. त्याचे विवरण व्हावे.

मी सज्जनगडावर राहत होतो तेव्हा आम्ही सर्व रामदासी साधक मंडळी दुपारी एक तास दासबोधाचे सामुदायिक वाचन, चिंतन करीत होतो. त्या वेळी आमच्या समोर ४ दासबोध असायचे. ल.रा. पांगारकर, के.वि. बेलसरे आणि आठल्ये या तिघांचे सार्थ दासबोध असायचे तर अनंतदास रामदासी यांचे दासबोध प्रवेश हा ग्रंथ असायचा. प्रथम एकजण एक ओवी वाचायचा. मग बाकीचे क्रमशः त्या ओवीचा बेलसरे, पांगारकर व आठल्ये यांनी दिलेला अर्थ वाचायचे. तिघांच्या अर्थामध्ये फरक आल्यास त्यावर चर्चा होवून नेमका अर्थ कोणता जास्ती योग्य वाटतो याची चर्चा होई. ज्या कूट ओव्यांचे विशेष विवेचन अनंतदास रामदासी यांनी दिलेले असेल त्याचे वाचन होई. अशा प्रकारे एका समासाची चर्चा ३-४ दिवस चालत असे. समास मोठा असल्यास ही चर्चा ७ - ८ दिवसही चाले. काही मंडळात सलग समास वाचतात आणि नंतर सलग अर्थ वाचतात ही पद्धत सदोष आहे. प्रत्येक समास आणि त्या त्या ओवीचा अर्थ लगेच ओवीनंतर वाचला जावा. म्हणजे कोणता अर्थ कोणत्या ओवीचा आहे ते कळायला मदत होईल. नुसता समासाचा अर्थ कळणें पुरेसा नाही.

प्रत्येक ओवीचा अर्थ त्याच्या मर्मासह समजला पाहिजे. एखाद्या ओवीचा अर्थ कुणी विचारला तर लगेच सांगता यावा. त्यालाच समर्थांनी विवरता विशेषा विशेष कळो लागे असे म्हटले आहे. त्यासाठी सातत्याने, मनापासून अनेक वर्ष दासबोधाचा अभ्यास चालू राहावा. प्रारंभी समर्थांना "तुझ्या दासबोधासी त्वा बोधवावे" अशी अंतःकरणपूर्वक प्रार्थना करावी. समर्थांनी मनावर घेतले तरच त्यांच्या ओव्यांचे रहस्य ते तुम्हाला सांगतील. हा ग्रंथ समजावून घेणे, त्यानुसार आपल्या जीवनाला आकार देणे व मुक्त होणे हा हेतू मनात दृढ ठेवून ग्रंथाचा अभ्यास व्हावा. केवळ स्वाध्याय सोडवीणे, प्रवचनकार होणे, लोकांना समजावून सांगणे हा मर्यादीत हेतू नसावा. दासबोधाचा अभ्यास ही केवळ शैक्षणिक् चळवळ ठरू नये किंवा शाब्दीक, साहित्यिक, वाङ्मयीन कसरत ठरू नये. पहिल्याच समासात समर्थांनी जी फलश्रुती सांगितली आहे ती फलश्रुती दासबोध वाचनानंतर माझ्या वाट्याला यावी.

समासांच्या अभ्यासाचा क्रम :-

ग्रंथराज दासबोधाचा अभ्यास करताना संपूर्ण दासबोध क्रमशःच अभ्यासला पाहिजे असे नाही. सांप्रदायिक मंडळींनी असा आग्रह धरू नये. तसेच जो साधकाच्या भूमिकेतून रोज निवडक ओव्या नीट अर्थ समजावून घेवून जगण्याचा प्रयत्न करतो आहे त्याने पुन्हा रोज ठरलेले २ समासांचे वाचन केले पाहिजेच असे नाही. संपूर्ण दासबोध नीट समजावून घेणे हे ध्येय असावे व हे ध्येय ज्या मार्गाने लवकर साध्य होईल त्या पद्धतीने अभ्यास करावा. समर्थांच्या शब्दात सांगायचे झाल्यास ' अती सर्वत्र वर्जावें । प्रसंग पाहोन चालावें । हटनिग्रही न पडावे । विवेकी पुरुषें ॥' एकदा संपूर्ण दासबोध नीट समजावून घेतला म्हणजे मग रोज क्रमशः दोन समास सांप्रदायिक पद्धतीने वाचायला हरकत नाही.

समजावून घेण्याच्या दृष्टीने दासबोधातील २०० समासांची मी विषयसूची तयार केली असून भिन्न भिन्न विषयांचे काही गट तयार केले आहेत. जर एकाच विषयाचे सर्व समास एकत्र अभ्यासले तर समर्थांची त्या विषयाची संकल्पना नीट समजेल. त्या विषयाचा सर्वांगीण अभ्यास होईल. तेव्हा क्रमशः समासांचा अभ्यास न करता विषयवार समासांचे वाचन, मनन, चिंतन व त्याला पूरक दिलेल्या संदर्भ ग्रंथांचे वाचन याद्वारे अभ्यास चांगला होऊ शकेल. उदाहरणार्थ स्तवनाचे समास.

दासबोधातील पहिला दशक स्तवनाचा आहे. याखेरीज १६व्या दशकातील पहिले ७ समास स्तवनाचे आहेत. या १७ समासांचा एकत्र अभ्यास व्हावा. १६ व्या दशकात सुर्यपरिवारातील सात तत्त्वांचे स्तवन आहे. कवेश्वर स्तवनाचा ७ वा समास अभ्यासून झाला की लगेच १४ व्या दशकातील 'कवित्वकला' हा ३रा समास अभ्यासावा. म्हणजे समर्थ धीट किंवा पाठ काव्य करणाऱ्यांना वंदन करीत नाहीत तर प्रासादिक काव्य करणाऱ्या कवींचे स्तवन करीत आहेत हे ध्यानी येईल. नरदेहस्तवनाचा १०वा समास अभ्यासत असतानाच देहदुर्लभ निरूपण (द.१८ स. ४)आणि देहेमान्य निरूपण (द.१९ स.५) हे समासपण अभ्यासावेत. या तिन्ही समासात समर्थांनी नरदेहाची दुर्लभता, त्याची उपयुक्तता आणि त्याची सार्थकता सांगितली आहे.

दासबोधातील द.१२ स.१ मध्ये नेटक्या प्रपंचाचे वर्णन आहे तर संपूर्ण तिसरा दशक फाटक्या प्रपंचाचे वर्णन आहे. तेव्हा द. १२ स.१ आणि ३ रा दशक एकत्र अभ्यासता येईल. तिसऱ्या दशकात मृत्युनिरूपण या ९ व्या समासाला जोडून देहांत निरूपण (द.७स.१०) देहांतनिरूपण (द.९ स.८) वाचावा. म्हणजे हे तिन्ही समास मृत्युसंबंधीचेच आहेत. तिन्हींच्या एकत्र अध्ययनाने समर्थांची मृत्यू ही संकल्पना स्वच्छ व स्पष्ट व्हायला मदत होते. समर्थांचे एक वैशिष्ट्य या ठिकाणी लक्षात येते. मृत्यू निरूपणाचे ३ समास असले तरी त्यात विषयांची पुनरावृती नाही. प्रत्येक समासाचा आयाम निराळा आहे. द.३ स.९ मध्ये मृत्युची

अटळता सांगितली आहे, तर द. ७ स.१० मधे मृत्यू कसा यावा किंवा मरणाला सामोरे कसे जावे ते सांगितले आहे. द.९ स.८ मध्ये सामान्य माणसाचा मृत्यू व साक्षात्कारी संतांचा मृत्यू यातील मूलभूत फरक सांगितला आहे. म्हणजे मृत्यूच्या तिन्ही समासात वेगवेगळ्या बाजू दिल्या आहेत. चातुर्यलक्षणाचे दासबोधात ३ समास आहेत. (द.१४स.६,द.१५ स.१,द.१५ स.६) पण या तिन्ही समासांचे प्रतिपादन भिन्न भिन्न आहे. राजकारणाचे ४ समास आहेत. पण ४ ही समासांचे प्रतिपाद्य विषय भिन्न आहेत. १८/६ या समासाचे नाव उत्तमपुरुष असले तरी तो समास राजकारणाचाच म्हणजे अफझलखान वधासंबंधीचा आहे. तर द.१९ स.७ या समासाचे नाव उपाधीलक्षण असले तरी राजकारणाची उपाधी कशी सांभाळावी याचे त्यात विवेचन आहे. ११/५ आणि १९/९ या समासांचे नांव राजकारण असेच असून त्यात महत्त्वाच्या राजकीय सूचना दिल्या आहेत.

स्तवनाच्या दशकासाठी 'मला दासबोधीच लाभेल बोध 'हे मी लिहिलेले पुस्तक संदर्भ ग्रंथ म्हणून वाचावे तर राजकारणाच्या विवेचनासाठी ''दासबोधातील कर्मयोग'' हे माझे पुस्तक अभ्यासावे. या खेरीज प्रा. प्रभाकर पुजारी यांच्या ''सामर्थ्य योगी रामदास'' या पुस्तकातील समर्थांचे राजकारण हे प्रकरण अभ्यासावे. या खेरीज डॉ. शं.दा. पेंडसे आणि स.ख. आळतेकर यांच्या समर्थ चरित्रातही 'समर्थांचे राजकारण' या नावाची विस्तृत प्रकरणे आहेत. दासबोधातील राजकारणाचे चारही समास अभ्यासताना वर उल्लेखिलेले चारही ग्रंथ संदर्भ म्हणून वाचले तर समर्थांची राजकारण संकल्पना तत्कालीन घटनांसह संपूर्ण ध्यानी येईल. त्या विषयाला न्याय दिल्याचे आपणास समाधान मिळेल.

दासबोधातील भक्तिमार्ग -

समर्थ हे संत असल्याने 'भक्तिचेन योगे देव। निश्चये पावती मानव । ऐसा आहे अभिप्राव । इये ग्रंथी ॥' असे ते पहिल्याच समासात म्हणतात. दासबोधामध्ये भक्तिमार्गाचे २९ समास आहेत ते पुढीलप्रमाणे -

संपूर्ण ४ था दशक म्हणजे १० समास, द.५ स.१, द.५ स.४, द.६ स.१, द.८ स.१, द.६स.७, द.१० स.७, द.११ स.२, द. १२ स.३, द.१६ स.९, द.१८ स.१ हे सर्व समास भक्तिमार्गाचे आहेत. चौथा दशक नवविधा भक्तीचा आहे. त्यातील श्रवण, कीर्तन व आत्मनिवेदन भक्तीचे समास अन्यत्र आढळतात ते एकत्र अभ्यासणे हिताचे ठरेल. श्रवणभक्ती द.४ स.१, द.७ स.९, द.१७ स.३, द.१८ स.९, द.१८ स.१०, द.७ स.९, या सहा समासात सांगितली आहे. तर कीर्तनभक्ती द.४ स.२, द.१४ स.४, द.१४ स.५, द.१७ स.४ या चार समासात सांगितली आहे. हे सर्व समास एकत्र अभ्यासले म्हणजे श्रवण आणि कीर्तन हे दोन विषय वेगवेगळ्या दृष्टीकोनातून अभ्यासले जातात. आत्मनिवेदनभक्ती द.४ स.९ आणि द. १२ स.५ या दोन ठिकाणी आढळते. हे दोन्ही समास एकत्र अभ्यासावेत. भक्तिमार्गाचे हे २९ समास एकत्र अभ्यासताना ''दासबोधातील भक्तियोग हे माझे पुस्तक संदर्भ म्हणून वापरावे. या खेरीज डॉ. शंकर अभ्यंकर व डॉ. द.वा. पंडीतराव यांनी समर्थांच्या भक्तिमार्गावर चांगली पुस्तके लिहीली आहेत ती पण वाचावी. पंडीतराव यांनी खास चौथ्या दशकावर पुस्तक लिहिले असून ते पुस्तक गुळवणी महाराजांच्या मठाने छापले आहे. या खेरीज ''दासबोधात प्रयत्नवादाचे ३ समास आहेत. द. ११ स.३, द.१२ स.९, द.१९ स.७ हे तिन्ही समास एकत्र अभ्यासणे सोईचे ठरेल. ११/३ आणि १२ /९ मध्ये समर्थांनी प्रयत्नाची दिशा सांगताना आदर्श दिनचर्या सांगितली आहे.

लक्षणांचे विविध समास -

श्रीमद् दासबोधाचे खास वैशिष्ट्य म्हणजे चागल्या आणि वाईट लक्षणांचे विविध समास. अशा समासांची संख्या चक्क ४० आहे. म्हणजे एक पंचमांश दासबोध सद्गुण आणि दुर्गुण यांच्या यादीने भरलेला आहे. समर्थांचा ठाम सिद्धांत होता

अवगुण सोडीता जाती । उत्तम गुण अभ्यासीता येती ।
कुविद्या सांडोनि सिकती । शहाणे विद्या ॥
मूर्खपणा सोडता जाते । शहाणपण सिकता येते ।
कारभार करीता उमगते । सकळ काहीं ॥

जर सद्गुणांचे समास एकत्र अभ्यासले आणि दुर्गुणांचे समास एकत्र अभ्यासले तर कसे वागावे व कसे वागू नये हा मुद्दा डोक्यात पक्का बसेल. यातून समर्थांना अपेक्षित चारित्र्य निर्माण होईल.

अ) दासबोधातील सद्गुणांचे समास - द.२ स.२, द.२स.४, द.२स.७, द.२स.८, द.२स.९, द.५स.२, द.५ स.३, द.५स.८, द.५स.९, द.५स.१०, द.८स.९, द.११स.६, द.११स.९, द.११स.१०, द.१२स.२, द.१२स.१०, द.१३स.१०, द.१४स.१, द.१४स.६, द.१४स.७, द.१५स.१, द.१५स.२, द.१५स.३, द.१५स.६, द.१८ स.२, द.१८स.३, द.१८स.७, द.१९स.१, द.१९स.२, द.१९ स.४, द.१९ स.६ हे सर्व समास उत्तम लक्षणांचे आहेत.

ब) दासबोधातील दुर्गुणांचे समास - द.२ स.१,द.२ स.३,द.२ स.५,द.२ स.६,द.२ स.१०,द.५ स.७,द.८ स.६,द.१७ स.१०,द.१८ स.५,द.१९ स.३, ३० समास उत्तम लक्षणांचे म्हणजे दैवी संपत्तीचे तर १० समास अधम लक्षणांचे म्हणजे आसुरी संपत्तीचे आहेत. ''दासबोधाचे मानसशास्त्र'' हे माझे पुस्तक यासाठी संदर्भ ग्रंथ म्हणून वाचावें. या ४० समासांचे जोडीला भगवद्गीतेतील १६ आणि १७ हे २ अध्याय अभ्यासावे. १६ व्या अध्यायावर प्र.ग. सहस्त्रबुध्दे यांनी ''जीवनमूल्यें भाग १ ते ३'' हे ३ पुस्तक लिहिली असून ती प्रत्येकानें अवश्य वाचावे. दैवी संपत्ती आत्मसात करावी व आसुरी संपत्ती टाकून द्यावी. समर्थ प्रत्यक्ष आचरणाला अभ्यास असे म्हणतात.

दासबोधातील ज्ञानमार्ग -

श्रीमद् दासबोधातील सुमारे ८५ समास म्हणजे जवळ जवळ निम्मा दासबोध ज्ञानमार्गी समासांचा आहे. तुम्ही भक्त असा, ज्ञानी असा वा कर्ममार्गी असा. विवेक आणि वैराग्य ही संपदा अनिवार्य आहे. द.३ स.१०, द.१२ स.४, द.१२ स.७, द.१४स.२,द.१९स.१० या पाच समासात विवेक वैराग्याचा विषय आला आहे, तेव्हा हे पाचही समास एकत्र अभ्यासणे जरुरीचे आहे. ज्ञानमार्गी समासाचे मी ६ गट पाडले आहेत ते असे -

१. मायाब्रम्हाचे समास -

६/२, ६/४, ६/५, ७/२, ७/३, ७/४, ९/२, ११/८, १३/९, १४/९,१४/१०,१५/४,१५/५, १६/८, १७/६,२०/४,२०/६,२०/७, २०/१० हे सर्व समास एकत्र अभ्यासले तर मायाब्रह्म ही संकल्पना स्वच्छ आणि स्पष्ट होईल.

२. पंचीकरणाचे समास - ८/४, ८/५, १७/८, १७/९ यात तत्त्वझाडा, तत्त्वनिरास् , मायेचा हिशेब असलेली ८२ नाशिवंत तत्त्व दिली आहेत.

३. उत्पत्ती कशी झाली ? ६/३, ६/६, १०/४, १२/६, १३/३, १३/५, १५/९,२०/२.

४. प्रलय कसा होतो ? ६/८, १०/५, १३/४

समर्थांना विवेक प्रलयात विशेष रस होता. गट ३-४ एकत्र अभ्यासले म्हणजे उत्पत्ती व प्रलय ही संकल्पना स्पष्ट होते.

५. सारासार विचाराचे समास - ६/९,११/४,१३/२ हे ३ आहेत तर १३ /१ मध्ये आत्मानात्मविवेक सांगितला आहे. २०/१ मध्ये पूर्णापूर्ण, १०/९ मध्ये प्रकृती पुरुष, १०/१० मध्ये चळ अचळ तर १७/२ मध्ये शिवशक्तीचे विवेचन आहे. समर्थ अद्वैतवादी होते. पण ते ईश्वर निर्मित द्वैत कसे स्वीकारतात ते या सर्व समासावरून लक्षात येईल.

६. अद्वैत बोधाचे समास - ५/५, ५/६, ६/१०, ७/१, ७/५, ७/६, ७/७, ८/२,८/३, ८/७,८/८, ८/१०, ९/१, ९/३, ९/४,९/५,९/६,९/७, ९/९, ९/१०,१०/१,१०/२,१०/३,१०/६,१०/८,११/१,११/७,१२/८, १३/६,१५/७,१५/८,१५/१०, १६/१०,१७/१, १७/५,१४/८,१७/७,१८/८, २०/३, २०/५, २०/८,२०/९,१३/७,१३/८.

हे सर्व समास एकत्र अभ्यासल्यास समर्थांचा वेदांत विचार पचनी पडेल. त्यासाठी डॉ. श्री. द. देशमुख यांची दासबोध चिंतनिका, तसेच त्यांची विविध उपनिषदावरील ओवीबद्ध पुस्तके संदर्भासाठी वापरावी. पंचीकरणासाठी त्यांचे आत्मषट्क किंवा निर्वाणषट्क पाहावे. दासबोधातील ज्ञानयोग हे माझे पुस्तकही उपयोगी पडेल.

अशा पद्धतीने केलेला दासबोध अभ्यास साधकाला निश्चित मोक्षाच्या दिशेने घेवून जाईल. कै. शंकर श्रीकृष्ण देव यांचे समर्थ हृदय आणि कै. ल.रा.पांगारकर यांचे समर्थ संजीवनी हे दोन ग्रंथही साधकांनी अवश्य वाचावे. त्यांची मांडणी अप्रतीम असून अभ्यासाची दिशा स्पष्ट करणारी आहे.

- स.भ.श्री. सुनीलजी चिंचोलकर,
अजिंक्यनगर हिंगणे खुर्द,
पुणे - ४११ ०५१

• • •

'पंचसमासी'

- सौ. सुनंदा शाळीग्राम



समर्थ रामदास स्वामींच्या अकरा लघुकाव्यांपैकी 'पंचसमासी' हे एक लघुकाव्य ! फक्त १५१ ओव्यांचे. हे गुरूशिष्यसंवादात्मक आहे. इथे गुरू आहे रामदासस्वामी. इथला शिष्य आपलेच प्रश्न विचारतोय की काय, असे वाटू लागते. म्हणून या काव्याचा प्रत्येक वाचक हा शिष्य आहे. गुरूंच्या सांगण्यात मोकळेपणा आहे. सामान्यांना समजेल अशा पद्धतीने यात उपदेश येतो. समर्थांनी साधनेवर विशेष पुनःपुन्हा भर दिलेला दिसून येतो. आपल्या हृदयीचे परमगुह्य समर्थ 'पंचसमासी'त प्रकट करतात.

ग्रंथारंभी समर्थ श्रीगणेश, श्रीशारदा व कुलदेवतेला वंदन करतात. तसेच 'माझे आराध्य दैवत' म्हणून श्रीरामांना वंदन करतात आणि 'माझा सर्वहि रघुवीरु । सद्‌गुरूरूपे ॥' या शब्दात आपले सद्‌गुरूही श्रीरामच असल्याचे सांगतात. प्रथम समासात समर्थांचे अपरंपार सदगुरूप्रेम व्यक्त झाले आहे -

''ऐसा जो कां परमपुरुष । निर्विकल्प निराभास ।
शुद्ध बुद्ध स्वयंप्रकाश । आत्माराम ॥११॥
ऐसिया जी सद्‌गुरूरामा । अगाध तुमचा महिमा ।
ऐक्यरूपा अंतर्यामा । मूळपुरुषा ॥१२॥
तुझिये कृपेचेनि उजियेडे । तुटे संसार साकडे ।
दृश्य मायेचे मडे । भस्मोनि जाये ॥१३॥
तुमचे कृपेचा प्रकाश । करी अज्ञानाचा नाश ।
भाविक भोगिती सावकाश । अक्षई पद ॥१४॥''

प्रथम समासाच्या शेवटी शिष्य सद्‌गुरूकडे 'ज्ञानाचा प्रबोध मज दीनास करावा' अशी विनवणी करीत आहे.

''दुस्तर भरला भवसागरू । स्वामी बुडतयाचे तारू ।
मज दीनास पैलपारू । पाववा जी ॥''

दुसऱ्या समासात गुरु शिष्याला ज्ञानाचे लक्षण सांगत आहेत.

''जेणे निरसे हे अज्ञान । तया नाव ब्रह्मज्ञान ।
....सस्वरूपी सावधपण । हेचि ज्ञानाचे लक्षण ।''

आणि अज्ञान कशाला म्हणायचे ?

''ब्रह्मी पडे विस्मरण । हे अज्ञान दशा ॥''

अज्ञानदशेत काय घडतं?

''सस्वरूपी भुली पडता । बहु लागे मोहो ममता ।
तेणे गुणे हे अहंता । दृढ होय ॥''
'मी' च्या पाठोपाठ 'माझे' आलेच !
'माझे शरीर माझी संपत्ती । माझे वैभव माझी संतती ।
सर्वांचा अभिमान चित्ती । दृढ जाला' ॥२॥-

समर्थ म्हणतात, 'अभिमाने भोगी यातना ।' कारण 'विषई गुंतला' आणि 'जे विषई आसक्त । तया स्वहित नाही।' 'दृढ धरिले विषयध्यान । या नाव जाणावे अज्ञान ।' हे अज्ञान निरसी, ते ज्ञान होय. पण ज्ञान म्हणजे काय?

'तो मी आत्मा ऐसे जाणिजे । तया नाव ज्ञान बोलिजे ॥'
पण हा आत्मा जाणायचा कसा ? समर्थ म्हणतात-
''आत्मा पाववयाची खूण । आधी पाहावे मी कोण ॥''
'मी कोण ऐसे पाहाता । देहाची तो माईक वार्ता ।
आपल्या आपण शोध घेता । आपणचि मिथ्या ॥
देही शोधिता मीपण उडे ....

आपली शुद्धी घेऊ जाता । आपण आत्माचि तत्त्वत्ता ॥'' आपणच आत्मा आहोत, तर मग हे आपल्याला का कळत नव्हते? त्यांचे कारण समर्थ सांगतात, ''संगे वृत्ती मळे । शुद्ध ज्ञान ते झांकोळे ॥'' श्रीगुरु हा मळ दूर करून शुद्ध स्वरूप दाखवितात ज्ञान करून देतात. पण श्रीगुरूनीं निरोपिलेले आत्मज्ञान 'तेचि आता दृढीकर्ण केले पाहिजे असे शिष्याला वाटू लागते. तिसऱ्या समासात तो म्हणतो, ''परि हे बाणले पाहिजे अंगी । तरीच धन्य होईजे जगी ।''

आजवर प्रपंचासीच निकट संबंध आला.

'मिथ्या लोभासाठी आयुष्य व्यर्थ गेले ।'
'आपुला संसार करिता । जीव सर्वकाळी दुश्चिता
तेणे गुणे भगवंता । अंतर पडे ॥'

श्रीगुरु त्याला सांगतात. -

''अनंत जन्माचा काट जडला । अभ्यासचि पडोनि गेला ।
तो तितुकाहि झाडिला । पाहिजे की ॥
मळिण वस्त्रास धुता धुता । तेणे पावे ते शुद्धता ।
तैसा साधक तो भगवंता । साधने पावे ॥''

साधनेचं महत्त्व इथे समर्थ परोपरीनं सांगत आहेत. नुसतं शब्दानं ब्रह्मज्ञान कळलं तरी प्रत्यक्ष ते आत्मसात करणं, अंगी बाणणं हे साधनेविना शक्य नाही. आणि कोरड्या ब्रह्मज्ञानानं समाधान लाभणार नाही. समर्थ म्हणतात,

''साधनेवीण ब्रह्मज्ञान । तेणे बुडे समाधान ।
आंगी जडे देहाभिमान । वाचाळपणे ॥१३॥
..... म्हणोनि जाणते पुरुषी । सोडू नये साधनासी ।
..... तैसा मी सिद्ध ऐसे कल्पुनी । नित्य नेम न धरी मनी ।
तत्पर होय अशनी शयनी । आत्महत्यारा ॥''

समर्थ आता शिष्याला बजावतात की,

''म्हणोनिया भजनविधी । चुकोचि नेदावी ॥''
भजन म्हणजे भक्ती. तिचे महत्त्व ते आता सांगताहेत -
''जेथे बिऱ्हाड नाही भक्तीचे । तेथे समाधान असेल कैंचे ।
..... भक्ती न करिता जे ज्ञान । तेचि जाणावे अज्ञान ।
तेणे काही समाधान । होणार नाही ॥''

'जैसी गृहासी कळा अंगण सांगे,' तैसे 'पुढे व्हावया ज्ञानासी । आता

भक्ती ते कैसी ।' कारण -

"**भक्तीवीण ज्ञान जोडे । ऐसे कल्पांती न घडे ।**" आणि भक्ती कशासाठी?

"**भक्तिसाधन करिता चढे । भक्त भगवंती ।।**" चौथ्या समासात समर्थ म्हणतात,

"**व्हावया ज्ञानाची प्राप्ती । आधी केली पाहिजे भक्ती ।**
भक्ती घडलिया मुक्ती । पाठी लागे ।।"

ती भक्ती कोणती? 'ते भक्ती नवविधा जाण' असं म्हणून समर्थांनी नवविधाभक्ती निरूपण केले आहे.

"**तेथे नव पाईऱ्या उत्तम । एक पाईरी प्रथम ।**
ते तू जाण गा श्रवण ।"

काय श्रवण करावे ?

"**श्रवण करावे तेचि ग्रंथ । जेथ बोलिला परमार्थ ।।**" श्रवण कशासाठी ?

"**श्रवण केलियाचे फळ । क्रिया पालटे तत्काळ ।।**" आता समर्थ क्रमाने नवविधाभक्ती सांगतात. त्या त्यांच्याच शब्दात पाहू -

"**सगुण सर्वोत्तमाचे ध्यान । करावे गुणानुवादकीर्तन हरिकथा निरूपण । स्वये करीत जावे ।।**
या नाव दुसरी भक्ती । ऐक तिसरीची स्थिती ।
सर्वकाळ आदरे चित्ती । नामस्मरण असावे ।।
चौथी ते पादसेवन । पाचवी जाणावी अर्चन ।
सकळाचे करावे पूजन । विधीप्रमाणे ।।
सकळासी वंदन ते सहावी । दास्यत्व करावे ते सातवी ।
आता परिसा ते आठवी । भक्ती कैसी ।।
सखा देवचि मानावा । अखंड तोचि आठवावा ।
भार आभार घालावा । तयाच वरी ।।
नवमी ते अद्वैत जाण । करावे आत्मनिवेदन ।
विचार घेता अभिन्न । मुळीच आहे ।।
ऐसे हे नवविधा भजन । सायोज्य मुक्तीचे साधन ।
तेणे करिता शुद्ध ज्ञान । प्राणियांसी होये ।।"

यानंतर समर्थ अत्यंत ओघवत्या वाणीत नवविधा भक्तीनं अंतरंग विकसित होत गेलेला साधक सहज समाधी कशी गाठतो, याचे सुंदर चित्र आपल्यापुढे रेखाटतात. नवविधा भजन करून त्याला शुद्ध ज्ञान होते आणि

"**शुद्ध ज्ञानाचेनि बळे । अति वैराग्य प्रबळे ।**
तेणे लिंगदेह मोकळे । होय वासनेसी ।।
लागता स्वरूपी अनुसंधान । निशेष नाठवे देहभान ।
विश्रांती देखोनिया मन । तद्रूप होय ।।
आदि पुरुष एकला । नाही प्रकृतीचा गलबला ।
संग सांडूनि अवलंबिला । शुद्ध एकांत ।
येथे मन पांगुळले । आप आपणासी विसरले ।
आपणासी भुलोनि गेले । स्वरूपवेधे ।।
मी कोण हे न कळे । अवघा आत्माचि प्रबळे ।
तेणे बळे मन मावळे । कर्पूर दीपन्याये ।
तेथे शब्द कुंठित जाला । अनुभव अनुभवी निमाला ।
.....गुरुशिष्य एकचि जाले । अनुभव बोधी बुडाले ।
नको वक्तृत्व उपाधी । स्वरूपी पांगुळले बुद्धी ।
लागली सहज समाधी । हेतुरहित ।।
तुटला संसार संबंधु । आटोनि गेला भवसिंधु ।
बुडाला बोधी प्रबोधी । विवेकबळे ।।
ज्ञानाग्नी प्रगट जाला । तेणे मायाकर्पुर जळाला ।
..... जाले साधनाचे फळ । तुटले जन्माचे मूळ ।
निष्कलंक आणि निर्मळ । तोचि तो आत्मा ।।"

हा संपूर्ण भाग जसाच्या तसा देण्याचे कारण समर्थांनी तो नेमक्या शब्दात परिणामकारकपणे रेखाटला आहे.

ज्याच्या ठिकाणी ही आत्मस्थिती दृढ बाणली आहे, त्याची 'वर्तती गती काय, ती सांगावी?' अशी शिष्याची विनंती ऐकून शेवटच्या पाचव्या समासात समर्थ सांगतात -

"**ज्ञाता समाधानी । प्रारब्धयोगे वर्ते जनी ।**
परि अनुसंधान मनी । वेगळे आहे ।।"

तो प्रारब्धानुसार वर्तत असला तरी त्याला सर्वत्र सदा परब्रह्माचाच प्रत्यय येत असतो. समर्थ म्हणतात -

"**वृत्ति गुंतली स्वानुभवे । जनी तेचि भासे आघवे**
सबाह्य व्यापिले देवे । ब्रह्मांड आवघे ।।"

त्याची अवस्था कशी होते पाहा -

"**वृत्ति मुळाकडे पाहे । तंव रामचि दिसताहे ।**
स्तब्ध होऊनिया राहे । तव रामचि दिसे ।।
मग मुरडे आलिया वाटे । तंव मार्गी रामचि भेटे ।
मागे पुढे प्रगटे । रामचि आवघा ।।
दाही दिशा अवलोकिता । रामचि भासे तत्त्वता ।
वदन चुकवू जाता । सन्मुखचि राम ।।
राम जालिया सन्मुख । कल्पांती नव्हे विन्मुख ।।
नेत्र झांकिता अधिक । रामचि दिसे ।।
मग आपणाकडे पाहे । तंव रामचि जाला आहे ।।
जीव सर्वस्वे वेधिले । संपूर्ण रामे ।।
रामेवीण सर्वथा काही । अणुमात्र रिते नाही ।।"

समर्थ म्हणतात, 'ऐसा राम प्रगटला । दृश्य पदार्थ लोपला ।।" ही अनुभूती शब्दांनी सांगणं कठिण आहे. शब्द इथं निकामी ठरत असला तरी ही अनुभूती येण्याआधी ती येण्यासाठी गुरूवाक्यच कारण झाले आहे. त्यांनी शब्दांनी सांगितले म्हणूनच हे घडले. समर्थ सांगतात -

"**स्वरूप बोलिले न जाये ।**
परि बोलिल्यावीण हाता न ये ।
म्हणऊनी हा शब्द उपाये । रचिला देवे ।।
शब्दाचे उदरी अगाध । साठविला आहे निजबोध ।
अर्थ पाहता स्वानंद । तुंबळे बळे ।।
शब्द मंथन शब्दे केले । अर्थ नवनीत प्रगटले ।।
मंथन कर्त्यासी भासिले । तया नवनीते ।।
नवनीत संपूर्ण जाले । ब्रह्मांड आवघे ।।
..... नवनीत प्रासावयासी । जाता तेचि तयासी प्रासी
सेविले आपणास आपण । हेचि अनुभवाची खूण ।
सद्गुरूसी जाता शरण । सीघ्रचि तुटे जन्ममरण ।
म्हणोनिया दृढ विश्वासे । सद्गुरु सेवावा ।।"

समर्थांनी शेवटी सत्संगाचे महत्त्व सांगितले आहे. सत्संगे करून नरदेहाचे सार्थक करावे, हे परोपरीने सांगितले आहे. त्यांचे शब्द हृदयाला भिडतात. त्यातील कळवळा जाणवल्यावाचून राहात नाही. म्हणून त्यांच्याच शब्दात पाहू-

"सकळ श्रोती सावध होणे । अंती एकले लागेल जाणे ।
येथील येथे राहिली सजणे । आणि संपत्ती ॥
बहुतां जन्माचा सेवटी । नरदेह आला पुण्यकोटी ।
येथे भगवंताची भेटी । होत आहे सत्संगे ॥
ऐसी खूण सकळांस । सांगोन गेला रामदास ।
सत्संगे जगदीश । नेमस्त भेटे ॥"
अत्यंत विनम्रपणे शेवटी समर्थ म्हणतात-
"आरुष बोबडा वाणी । भावे पूजिला कोदंडपाणी ।
न्यून पूर्ण संत सज्जनी । क्षमा केले पाहिजे ॥"

यातला जिव्हाळा अंतःकरणाला भावल्यावाचून राहात नाही. वाटतं, 'ऐसी कळवण्याची जाती । करी लाभाविण प्रीती ॥'

- सौ. सुनंदा शाळिग्राम, पुणे
विश्वनाथ स्मृती दत्तवाडी, पुणे - ४११ ०३०

• • •

जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।
जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ॥

• • •

॥ सद्गुरूंची आरती ॥

जयदेव जयदेव जय स्वामी रामदासा ।
आरती ओवाळते सज्जनगड निवासा ॥ 'जयदेव जयदेव'
ठोसरांच्या वंशा, सूर्याजीच्या पुत्रा ।
राणूच्या सुता, रामाच्या दासा ।
जेष्ठांचा बंधू तू, माझा सद्गुरू ।
हनुमंताच्या समवेत रामाच्या द्वारी ॥१॥ धृ
चारशेव्या जयंती जमतो भक्त मेळा ।
दिंड्या पताका गडी हो सजल्या ।
रांगोळी रंगांची होते बरसात ।
किर्तन सोहळा पारायणासमवेत ॥२॥ धृ
भक्तीचा काकडा घेवून आले सदनी ।
वैराग्याची वात त्यांत लावते क्षणी ।
भक्तमंडळी जमली हो सारी ।
येवून दर्शन दे सत्वरी ॥३॥ धृ
समर्थ सेवा मंडळ, स्वामी संस्थान ।
दोहोंसमवेत भक्तगण दंग ।
लखलखती दिवे, निरांजन तबकी ।
सर्वांसमवेत करते तुझी आरती ॥४॥ धृ
करुणाष्टके, स्तोत्रे, स्फूट काव्ये अपार ।
त्यांतही मिळते उपदेशाचे सार ।
नित्य सेवन करता शांती चित्ताची ।
अध्यात्माची शिकवण मिळते हिताची ॥५॥ धृ
पापियांचे पाप जळे तुझ्या चरणी ।
रामनाम हेच ओठी भक्त जनी ।
भक्त तिष्ठत तुझ्या सदनी ॥६॥ धृ
थकल्या जीवाला तुमचा हो विसावा ।
भरकटलेल्या मनाला तुम्हीच वाचवा ।
राममंत्रात आले तुझ्या द्वारा ।
नको दूर लोटू मज पामरा ॥७॥ धृ
संसारी पोळले दुःखार्त झाले ।
थकला जीव तुझ्या दर्शनास आले ।
हनुमान रूपे तू अकरावा रुद्र ।
काय वर्णू तुझी किर्ती अपार ॥८॥ धृ
आत्मरंगी रंगले, मन झाले शांत ।
रामीरामदास समर्था हो कृपावंत ।
अखेरचे मागणे मागते तुजपाशी ।
पुन्हा जन्ममरण नको मजसी ॥९॥ धृ
जय जय रघुवीर समर्थ ।

-सौ. संगीता गाडगीळ
डी-१/६, राहूल नगर, कोथरूड,
पुणे - ४११ ०३८

• • •

श्रीसमर्थ रामदास स्वामीची - तपोभूमी टाकळी

- श्री.शाम रघुनाथ साखरे



[illegible]

नाशिक शहराच्या पूर्वेस एक - दीड कोसावर म्हणजेच साधारण सात-आठ किलोमिटर अंतरावर टाकळी हे अत्यंत लहान पण समर्थांच्या पदस्पर्शाने आणि वास्तव्याने पुनित झालेले एक महान क्षेत्र गोदावरी आणि नंदिनी उर्फ नासुर्डी नदीच्या संगमावर वसलेले छोटेसे गांव आहे. आपण समर्थांचा चारशे वर्षापूर्वीचा काळ विचारात घेतला तर टाकळी गांव पाच पंचवीस घरांची एक लहान वस्तीच असणार.

समर्थांनी दासबोधात म्हटल्याप्रमाणे -

साधु दर्शने पावन तीर्थे पुरती त्यांचे मनोरथ ।।
साधु न येता जिणे वेर्थ । तया पुण्य क्षेत्रांचे ।। (दासबोध ७.१०.११)

खरे म्हणजे साधुसंत येवून राहिल्याने तीर्थांना पवित्रपणा येतो. संताच्या वस्तीमुळे तीर्थाचे महात्म्य वाढते. साधुसंत जर तीर्थामध्ये जावून राहिले नाहीत तर पुण्यक्षेत्राना कोणी विचारणारच नाही.

एखाद्या सुंदर स्वरुपवान स्त्रीने जर अंगभर सोन्याचे दागिने घातले तर ती स्त्री दागिन्यांमुळे सुंदर दिसते अस न म्हणता त्या सुंदर स्त्रीमुळेच दागिन्याला शोभा येते. रामायणांत सीतेबद्दल वाल्मिकीने असेच उद्‌गार काढले आहेत.

संत ज्ञानेश्वर आणि समर्थ रामदास स्वामी यांच्या मध्यंतराच्या काळांत कलीयुगातील दुसरा दत्त अवतार श्रीनरसिंह सरस्वती होय. त्यांनी एक चातुर्मास श्री क्षेत्र औदुंबर येथे वास्तव्य केले. बारा वर्षे कृष्णा पंचगंगा संगमावर वास्तव्य केले, तप केले. त्यामुळे या दोनही क्षेत्राना महत्त्व प्राप्त झाले आहे. हे आपण आज पाहातोच.

अगदी तसेच महत्त्व आज टाकळी गावास प्राप्त झाले आहे. यात शंकाच नाही. गोदावरीचा उगम आणि नंदीनी नदीचा उगम त्र्यंबकेश्वर येथेच झाला असून टाकळी गावाजवळ या दोनपवित्र नद्यांचा संगम झाला आहे.

समर्थांचा सुरुवातीचा छत्तीस वर्षाचा काळ लक्षात घेतला तर त्याचे साधारणपणे बारा वर्षाचे तीन टप्पे पडतात. पहिली बारा वर्षे जांब येथील बालपण, हुडपण,रानावनांत भटकणे यात गेली. पण याच काळात विश्वाची चिंता करण्याची मानसिक शक्ती त्यांना प्राप्त झाली होती. म्हणूनच आईनी लग्नाच्या बेडीत गुंतवण्याचा जेव्हा प्रयत्न चालवला तेव्हा आईच्या आज्ञेचे पालन म्हणून श्रीसमर्थ विवाहास तयार झाले आणि बोहल्यावर चढले मात्र आणि 'सावधान'हा भटजीबुवांचा शब्द कानावर पडल्यावर समर्थ खरेच सावध झाले आणि जांबजवळील आसन गाव येथून लग्न मंडपातून जे सटकले ते कुणाला सापडलेच नाहीत. ती तिथी होती फाल्गुन शुध्द अष्टमी.

फाल्गुनमासी शुध्द अष्टमी । येकादश घटिका द्वितीय यामी ।
सुमुहूर्तकाल नेमूनी धामी । घटिका स्थापिली जळांत ।।

(दास विश्रामधाम ५ -७१)

गोरज मुहुर्त असल्यामुळे, फाल्गुन महिना, मराठवाड्यात वादळाचे दिवस, वारा सुटला होता, रात्र झाली होती. मराठवाड्यात दिवाळीनंतर चक्रीवादळे सुरु होतात. समर्थांचे विवाह प्रसंगी वादळ झाले. पेटवलेले दिवटे (त्यावेळी लाईट नव्हते) विझले असणार. वादळाची धुळ मंडपात आली असणार, याचा फायदा घेवून समर्थ मंडपातून पळाले असणार. अशा अवस्थेत सर्वांनी समर्थांना शोधण्याचा प्रयत्न केला पण समर्थ सापडले नाहीत (काही प्रवचनकार, कीर्तनकार सांगतात - तेव्हापासून त्या भागात लग्नात मुलगा बोहल्यावर उभा राहिला कि त्यांनी पळून जावू नये म्हणून एक दोन लोक त्याचे पाय गच्च धरुन ठेवतात. ही प्रथा पडली आहे.)

समर्थांसी फावली मध्यरात्री । समर्थ कोणासी दिसतील चर्मनेत्री ।।
समस्त लोक हाःहाकारती वसती । सकळ साधुसंत म्हणती धन्य धन्य।।
ऐसे कोठे नाही हो वर्तले । पूर्वी अवतारादिघांसी न जाले ।
माया मोहिनीने ब्रह्मादिका भुलविले । नाना पुराणे आम्ही ऐकिली ।।
समर्थ प्रताप २-४०:४१

समर्थ विवाह मंडपातून जे निघाले ते जांबेत अश्वस्थावर तीन दिवस होते. तेथून ते पायी प्रवास करीत गोदा काठाने थेट नाशिकला काळाराम मंदिरात आले. वय वर्षे ११-१२, पायात काय घातले असेल, थंडी वाऱ्याला कसे तोंड दिले असेल, जेवणखाण काय केले असेल याचा विचार केला तर माणसाची बुध्दीत कुंठीत होते. खरोखर त्यांची तपश्चर्या तेव्हापासूनच सुरु झाली.

संसार मिथ्या ऐसा कळला । ज्ञान समजोन निघोन गेला ।

काळाराम मंदिरात दर्शनास आलेल्या भाविकांची गर्दी होती, त्या गर्दीतच हे बालक प्रभूरामचंद्राकडे थकीत होवून एकटक पहातच उभे राहिले. त्यांचे भान हरपले. अष्टभाव उदयाला आले. मनांतल्या मनात त्यानी प्रार्थना केली.

रामचंद्रा तुझा वियोग । ऐसा नकोरे प्रसंग ।
तुजकारणे सर्व सैंग । त्यक्त केला ।।
रामा तुझीया स्वामीपणे । मी हे ब्रह्मांड मानीं ठेंगणे ।
स्वामी तुजविण कोण जाणे । अंतर आमुचे ।।
तुजविण मज माया । काही नाही रे रामराया ।
आम्हा अनाथा कासया । उपेक्षिसी ।
तुज समुदाव दासांचा । परी आम्हासी स्वामी अधिक कैसा ।
तुजकारणे जिवलगाचा । संग सोडीला ।।

अशा अत्यंत आर्ततेने, तळमळीने हे बालक प्रभू रामचंद्राच्या दर्शनाच्या ओढीने नाशिक पंचवटीस आले आणि त्यांनी तपश्चर्या करण्याचे ठरविले.

गोदावरी आणि नंदीनी किंवा नासिर्डी नदीच्या रम्य परीसरातच टाकळी गांव, गांव कुठले त्या काळातील वीस पंचवीस घराची वस्तीच म्हणाना होती. जवळच एक गुहा होती. ती समर्थांनी रहाण्यासाठी पसंत केली. स्नान संध्येला

भरपूर पाणी, मनसोक्त स्नान करणे, शुध्द हवा, प्रसन्न वातावरण, प्रभू रामचंद्राचे दर्शनही घेणे सहज शक्य आणि उपासनेला एकांतवास अशा अनेक कारणांनी समर्थांनी ही जागा निवडली असणार यात शंकाच नाही.

अशा रम्य ठिकाणी "चिंता करतो विश्वाची" म्हणणारे समर्थ येथे स्थिरावले. त्यांची तपश्चर्या चालू झाली. भल्या पहाटे ब्राह्म मुहुर्ताला उठावे (म्हणजे पहाटे ३॥ - ४वाजता) प्रार्तविधी आवरुन व्यायाम करावा. समर्थ दररोज बाराशे सूर्य नमस्कार घालीत. त्यावेळी त्यांना घाम येत असे, तेव्हा घामाने जमिनीवर मनुष्याकृती उठत असे. नंतर समर्थ पवित्र संगमावर जावून पात्रामध्ये उभे राहून गायत्रीचे पुरश्चरण व रामनामाचा जप करीत. त्या पवित्र संगम स्थानी तेरा कोटी त्रयोदक्षाक्षरी जपसंख्येचा समर्थांनी शके १५४२ रौद्रनाम संवत्सरी माघ शुध्द सप्तमी दिवशी निश्चय केला व तो पूर्ण केला.

साधारण ११॥ - १२ पर्यंत त्यांचे पुरश्चरण चाले. असे सांगतात की, तीन - चार तास कमरेच्यावर पाण्यात उभे राहणे त्यामुळे कमरेवरील भाग उन्हामुळे कृष्णवर्ण दिसे आणि कमरेखालील भाग थोडा उजळ दिसत असे. त्याचप्रमाणे तीन - चार तास पाण्यात उभे राहिल्यामुळे नदीतील मासे त्याचे पायाचे लचके तोडत त्यावेळी त्यांना जखमाही होत. पाण्यातून बाहेर आल्यावर चालताही येत नसे. पण त्यांनी या सर्वांना तोंड दिले.

असेही सांगतात की, समर्थांनी ज्यावेळी पुनश्चरण सुरु केले तेव्हा एक वानर समोर झाडावर येवून बसत असे आणि समर्थांचा जप पूर्ण झाला की निघून जात असे. असे बारा वर्षे चालले होते. ज्या दिवशी पुरश्चरण पूर्ण झाले आणि अत्यंत समाधानाने, आनंदाने समर्थ पाण्यातून बाहेर आले आणि त्यांना ते वानर दिसले आणि ते भव्य दिव्य झालेले त्यांना दिसले आणि समर्थ भारावून गेले आणि त्यांच्या मुखातून "भिमरुपी महारुद्रा" हे स्तोत्र बाहेर पडले. प्रत्यक्ष समर्थांचे मुखातून हे स्तोत्र बाहेर पडल्यामुळे त्याला अत्यंत महत्त्व आहे. रोज हे स्तोत्र म्हटल्याने अनेकांना अनेक लाभ झाल्याचे दाखले आहेत.

रामनामाचा जप, पुरश्चरण झाल्यानंतर समर्थ गुहेत येवून झोळी घेवून फक्त पाच घरी माधुकरी मागीत. एका घरी समर्थ माधुकरीसाठी जास्त वेळ थांबत नसत. जे मिळेल ते घेवून ते नदीवर येवून नदीच्या पात्रात धुवून घेत. एक भाग जळचरांना, एक भाग प्राणीमात्रांना आणि राहिलेली स्वतः अत्यंत समाधानाने भक्षण करीत. जीवन जगण्यासाठीच अन्न भक्षण करणे हा त्यांचा सिध्दांत होता.

श्रीसमर्थ रामदास स्वामी संगमामध्ये जपतपासाठी कोठे उभे राहात, ती उभी राहण्याची जागा कोणती अशी शंका अनेक लोक प्रगट करीत असतात. पण संगमावरील नदीचा प्रवाह, पाण्याचा ऋतुमानाप्रमाणे होणारा चढउतार पाहून निरनिराळ्या ठिकाणी पण संगमाचे परिसरातच आपली साधना करीत असत.

समर्थ टाकळीस एका गुहेत रहात असत. उपासना चालू असताना त्यांना प्रभू रामचंद्राचे दर्शन झाले. प्रभू रामचंद्रांनी त्यांना अनुग्रह दिला आणि त्यांना रामदास म्हणून संबोधले. त्याचवेळी "उदासीन हे वृत्ति जीवीधरावी । अती आदरे सर्व सेवा करावी । सदा प्रीति लागो तुझे गुण गांता । रघुनायका मागणे हेची आता ।" हे प्रसिध्द दहा श्लोकी करुणाष्टक समर्थांनी केले. बहुतेक सर्व करुणाष्टके टाकळी पंचवटीत तपश्चर्येच्या काळांतच समर्थांनी केली असावीत असे वाटते.

नाशिक पंचवटी हे तीर्थक्षेत्र असल्यामुळे तेथे वर्षभर किर्तन, प्रवचन, भजन, प्रहसन, पुराण, पवित्र ग्रंथाचे वाचन असे कार्यक्रम सातत्याने चालत असत. समर्थांचे बहुतेक श्रवण, वाचन, सद्ग्रंथाचा अभ्यास येथील वास्तव्यातच झाला आहे. किर्तन, प्रवचन, श्रवण करुन अशा विद्वान लोकांशी चर्चा करुन आपल्या शंका निरसन करुन घेत असत.

समर्थ तिसऱ्या प्रहरी पंचवटीस पुरश्चरणांसाठी जात व नंतर संध्याकाळी टाकळी येथील गुहेत येत व संध्याकाळची आन्हीक आवरुन विश्रांती घेत.

समर्थांनी या तपश्चर्येच्या काळांतच टाकळी पंचवटी परीसरांतच वेद, वेदांत, श्रुती, भागवत, उपनिषद, भगवतगीता, अन्य धार्मिक ग्रंथांचा अभ्यास याच परिसरांतच केला. संस्कृत ग्रंथाचे अध्ययन याच काळांत केले. एकवीस समासी अर्थात जुना दासबोध आणि आत्माराम ह्या समर्थांच्या रचना देखील टाकळीच्या ह्याच तपश्चर्येच्या काळातील आहेत असे सर्व विद्वानांचे मत आहे.

वाल्मिकी रामायणाची हस्तलिखित प्रत टाकळी येथील मुक्कामातच समर्थांनी लिहून काढली. ही प्रत सध्या धुळे येथे समर्थ वाग्देवता मंदिरात उपलब्ध आहे.

या तपश्चर्येचे काळांत शहाजी राजे या भागांत आले होते. कुणी तरुण तेजःपुंज साधक रामउपासना करीत आहे असे त्यांना समजले. शहाजी राजांनी समर्थांना बोलावणे पाठवले. त्यावेळी समर्थ २२-२३ वर्षाचे असतील. समर्थांनी शहाजी राजांना उलट निरोप पाठवला. रामरायाचे कृपेने आम्ही कुशल आहोत असे म्हणून भेट टाळली. असे दोनवेळा झाले. शहाजी राजाची उत्सुकता वाढली. ते स्वतः समर्थांच्या भेटीस आले. या दोन महान पुरुषांची भेट झाली.

परत शहाजी राजे, जिजाबाई, शिवाजी यांची समर्थांची गाठ येथे झाल्याचा उल्लेख आहे. महाराष्ट्र राज्याची मुहुर्तमेढ याच काळांत रोवली गेली असे म्हटले तर वावगे होणार नाही.

टाकळीत येवून सुर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत समर्थांची दिनचर्या कडकडीत, अत्यंत कष्टपूर्वक पण मनःसामर्थ्य असल्यामुळे व्यवस्थित चालू होती. मात्र आसपासचे लोक त्याबद्दल निरनिराळे तर्क करु लागले. जगावेगळी याची ही कसली तपश्चर्या, घरी मायेची कुणी नाही, कुणी मार्गदर्शक नाही म्हणून काय तरी हा करीत आहे. याविषयी समर्थच म्हणतात.

विषयाची सोयरी प्रपंचाची सखीं । मिळोनी एकमेंकीं करिता मात ॥१॥
यासी काय झाले धडकि का बिघडले । वयेंवीण लागले देवपिसें ॥२॥
देव काय आम्हा सकळा पासी नसे । जगावेगळे कैसे भजन याचें ॥३॥
हे आधी चि विषय संसारा उबगले । पुरुषार्थ सांडवले अहंतेच्या ॥४॥
न करवे म्हणुनी त्यजिला विषय धंदा । जपतसे सदा रामनाम ॥५॥

अशा अनेक प्रकारांनी लोक उपेक्षेने, कुचेष्टेने, उपहासाने नानाप्रकारे बोलत ही जगरहाटीच आहे. मात्र चमत्कार दाखवला की आपोआप नमस्कार घडतो.

टाकळी परीसरातील कडकडीत तपश्चर्या शुकासारखे वैराग्य प्राप्त झालेल्या समर्थ रामदासांनी आपली अध्यात्मिक शक्ती एक दिवस प्रगट केली. नित्यक्रमाप्रमाणे एके दिवशी समर्थ संगमावर जप झाल्यावर ब्रह्मयज्ञ करीत बसले होते. इतक्यात एक सुवासिनी समर्थ ध्यानस्त बसले होते येथे आली व तिने समर्थांना अत्यंत नम्रपणाने नमस्कार केला. टाकळीच्या जवळच दीड दोन मैलावर दशपंचक नावाचे एक गांव आहे. त्या गावी गिरीधरपंत कुलकर्णी या नावाचे एक सात्त्विक ब्राह्मण राहत होते. त्याची ही पत्नी होती. तिचे नांव अन्नपूर्णाबाई. गिरीधरपंतांना क्षयाचा आजार असल्यामुळे अनेक उपचार होवूनही त्यांना बरे वाटले नाही. त्यांना मरण आले. त्यावेळी अन्नपूर्णाबाई यांनी पतीबरोबर सहगमन करण्याचा पक्का निर्णय घेतला आणि आपल्या गांवाहून पतिशवाबरोबर टाकळी जवळच्या संगमावर आली.

सती जाण्यापूर्वी गोदाकाठी तपस्वी असलेल्या समर्थांना नमस्कार करावा म्हणून ती समर्थांच्या जवळ आली व तिने समर्थांना अत्यंत नम्र भावानी नमस्कार केला. हातातील कंकणाचा आवाज आला आणि समर्थांच्या मुखातून आशीर्वाद बाहेर पडला. "अष्टपुत्र सौभाग्यवती भव" सर्वांना आश्चर्य वाटले. अन्नपूर्णाबाईंनी समर्थांच्याकडे एकदम चमकून पाहिले आणि विचारले, हा आशीर्वाद या जन्मीचा की पुढच्या जन्मीचा ? त्याचवेळी सती जाण्याच्या तयारीने आलेल्या अन्नपूर्णाबाई यांच्या सोबत आलेल्या लोकांनी समर्थांना खुलासा केला की अन्नपूर्णाबाई सती जाण्यासाठी आली आहे. गिरीधरपंतांचे शव संगमावर आहे. आपल्या दर्शनासाठी ही स्त्री आली आहे.

समर्थांनी हे सर्व ऐकलं. क्षणमात्र स्तब्ध झाले आणि आत्मविश्वासाने निश्चयपूर्वक बोलले. हा आशीर्वाद प्रभू रामचंद्राचा आहे, फक्त रामदासाच्या मुखातून बाहेर आला आहे. तो याच जन्मातील आहे यात शंका नाही.

समर्थांनी प्रेत जवळ आणण्यास सांगितले. त्याच्या दोन दोऱ्या सोडण्यास सांगितल्या श्रीरामचंद्राचे स्मरण करुन, गोदावरीतील पाणी घेवून गंगोदक प्रेतावर प्रोक्षण केले आणि क्षणात प्रेत, गिरीधरपंत राम राम म्हणत उठून बसले. उत्तर रामचरित्रात महाकवी भवभूती यांनी म्हटले आहे.

लौकिकानां हि साधूनामर्थं वागनुवर्तते ।
ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति ॥१॥

ऋषीमुनी लोक जसे बोलतात तसेच वागतात. त्यांच्या तपश्चर्येच्या शक्तीवरच ते असे महान कार्य करु शकतात. सामान्य माणसाचे हे काम नाही. त्यामुळे येथे शंका घेण्याचे कारणच नाही.

प्रेत उठल्यावर समर्थ अन्नपूर्णाबाईस म्हणाले, "बाई तुम्हाला अष्टपुत्रा सौभाग्यवती भव" असा प्रथम आशीर्वाद दिला होता. आता श्रीराम कृपेने आणखी दोन पुत्र अधिक होतील. ही अद्‌भूत गोष्ट शके १५४२ (सन १६२०) रूधिरोद्गारि नाम संवत्सरी वैशाख शुध्द दशमी दिवशी झाली.

समर्थांच्या आशीर्वादाप्रमाणे अन्नपूर्णाबाईस दहा पुत्र झाले व गिरीधरपंतांचे आडनांव दशपुत्रे असे पडले. त्यांच्या वंशजास हे आडनांव अद्याप सुरु आहे. आजही दशपुत्रे नावाचे लोक नाशिक भागांत आहेत.

अन्नपूर्णाबाईना पहिला मुलगा झाला. त्याचे नांव उध्दव ठेवले. त्यांनी तो मुलगा रामप्रसादाने, समर्थकृपेने झाला म्हणून समर्थांना अर्पण केला. समर्थांनी त्याची मुंज केली. त्याला अनुग्रह दिला आणि समर्थांचा पहिला शिष्य उध्दव हा झाला. समर्थ तपश्चर्या पूर्ण करुन भारत संचारासाठी निघाले. त्यांनी उध्दवाना टाकळीसच राहण्याची आज्ञा केली. येथेच समर्थांनी गोमयाची मारुतीची मूर्ती करुन त्याची स्थापना केली. ही समर्थांची पहिल्या मारुतीची स्थापना होय आणि उध्वास मठ स्थापून दिला हा पहिला मठ होय. या मठाची शिष्यपरंपरा आजपर्यंत चालत आली ती अशी - श्री.प.पू.रामदास-उध्दवस्वामी (पुण्यतिथी फाल्गुन शुध्द प्रतिपदा) भीमस्वामी (पुण्यतिथी कार्तिक वद्य प्रतिपदा) शिवरामस्वामी (पुण्यतिथी मार्गशीर्ष वद्य चतुर्थी) रामचंद्र (पुण्यतिथी पौष वद्य द्वादशी) गोविंदराम (पुण्यतिथी आश्विन शुध्द चतुर्थी) रघुनाथ(पुण्यतिथी कार्तिक वद्य सप्तमी) गंगाराम (कार्तिक शुध्द सप्तमी) नारायण, दिनकरबुवा

थोडक्यात टाकळी तपोभूमीचे वैभव समर्थांनी पहिला शिष्य, पहिला मठ स्थापना आणि पहिला गोमय मारुती स्थापना करुनच वाढवले.

उध्दवाचा जन्म शके १५४९ च्या सुमारास झाला असावा. फाल्गुन शुध्द प्रतिपदा बुधवार शके १६३२ अरूणोदय समयी श्री उध्दवस्वामीनी आपला देह ठेवला. निर्वाण समयी उध्दवाचे वय सुमारे व्याऐंशी वर्षाचे होते.

प्रभू रामचंद्रांच्या अनुग्रहाने, मारूतीरायांच्या दर्शनाने आणि समर्थांच्या चिकाटीने प्रयत्नाने, श्रध्देने, निष्ठेने समर्थांची तपश्चर्या टाकळी भागात गोदावरी आणि नंदीनी नदीच्या संगमावर बारा वर्षाच्या अथक प्रयत्नाने पूर्ण झाली.

आणि समर्थांची किर्ती सर्वत्र झाली आणि समर्थांना एक प्रकारचे उत्कट समाधान प्राप्त झाले. हेच वैभव पिचलेल्या, दबलेल्या, निष्प्रभ झालेल्या सामान्य जनाना प्राप्त व्हावे म्हणून समर्थ 'घरांची घरे' पाहाण्यासाठी भारत भ्रमणास निघाले.

असे हे स्थान प्रत्येक भारतीयांनी, समर्थभक्तांनी पाहाणे अत्यंत जरूरीचे आहे.

नाशिकच्या पूर्वेस साधारण सात आठ किलोमिटरवर हे स्थान आहे. रिक्षा, बस, एस्.टी.ची सोय आहे.

(दिनांक - ३१/३/२००७ चे साधारण दर रिक्षा रु. ४५ - ५०, बस रु. १५-२०, एस.टी. १०-१५रु. पर्यंत भाडे असते.)

जय जय रघुवीर समर्थ

संदर्भ : समर्थ चरित्र - स.खं. आळतेकर, समर्थ प्रताप, रामदास आणि रामदासी भाग १५ श्रीसमर्थ अभ्यासक प्रमोद संत, नागपूर आणि श्री. शिरवाडकर, नाशिक यांच्याशी चर्चा करुन.

- श्री. शाम र. साखरे
'सुमन निवास', खणीवरील विठ्ठल मंदिरजवळ,
मिरज, फोन :- (०२३३) २२२३८४३

• • •

नरदेहाचे सार्थक

- सौ. मनिषा भास्कर अभ्यंकर



भारत ही संतांची भूमी. संतांनी जगावर फार उपकार केलेले आहेत. मानव जीवनाचा समग्र अर्थ समजून घेणे सामान्य मानवाला शक्य नसते. संतांनी मात्र सर्वकाली, सर्वप्रसंगी अभंग राहील असे सत्य शोधून काढले व त्या सत्याचा स्वतःच्या जीवनात व्यवहार करून दाखवला. आत्मदर्शन' हे ध्येय त्यांनी लोकांसमोर ठेवले व ते ध्येय प्राप्त करून घेण्यासाठी साधनाप्रणाली निर्माण केली.

'आत्मदर्शन' हे एकच ध्येय सर्वच संतांचे असले तरी प्रत्येकाच्या स्वभावधर्माप्रमाणे नाना साधनाप्रणाली निर्माण झाल्या, त्यानुसार नाना पंथोपपंथ उदयाला आले. भोगवादी विचारवंतांनी जगाला संपूर्ण सत्य मानले व मानवदेहाला अतिशय महत्त्व दिले. कारण जगातील सर्व भोग उपभोगण्याचे मानवदेह हेच एकमेव साधन आहे. उलट देहोपभोगात मनुष्य आसक्त होऊन राहिला की, 'आत्मदर्शन' हे ध्येय विसरतो व कामिनीकांचनाचेच चिंतन करू लागतो. त्यामुळे संन्यासवादी विचारवंतानी देहाला किळसवाणा ठरवून त्याची भरमसाठ निंदा केली आहे. श्री समर्थांनी मात्र दोन्ही अतिरेकांच्या त्याग केला आहे. उलट 'आत्मदर्शन' हे सर्वोत्तम ध्येय प्राप्त करून घेण्यासाठी नरदेहासारखे दुसरे साधन नसल्यामुळे त्यांनी नरदेहाची स्तुतीच केली आहे.

या पृथ्वीवर असंख्य जीवप्राणी आहेत. त्यातील मनुष्यप्राणी हा सर्वांत विलक्षण आहे. मनुष्य हा इतर पशूंप्रमाणे सस्तन प्राणी आहे. वानर हा तर मनुष्याला सर्वांत जवळचा प्राणी. दोघांची शरीररचना रक्त सारखेच आढळते. अन्न, निवारा, मैथून, वगैरे शारीरिक गरजा मानव व पशू दोघांच्याही समान आहे. मानवी जीवनाला पशुत्वाची पार्श्वभूमी आहे. तरीही मनुष्य पशूपेक्षा श्रेष्ठ ठरला आहे. तो त्याला मिळालेल्या बुद्धिरूपी देणगीमुळे.

मनुष्य शब्दरूपी भाषा बोलू शकतो. अनादि भूतकाळ व अनंत भविष्यकाळाची कल्पना करू शकतो. पशू फक्त शारीरिक पातळीवर जगतो. मनुष्याचे जीवन मानसिक पातळीवर जास्त व्यक्तीत होते. मनुष्य पशुंप्रमाणे इंद्रियांचा दासही होतो व इंद्रियनिग्रहसुद्धा करू शकतो. बुद्धी, कल्पना, स्मृती इत्यादी मनोधर्मांचा उपयोग करून मनुष्य आपल्या अंगी नवे व्यक्तिमत्त्व निर्माण करू शकतो. बुद्धीच्या प्रभावामुळे विवेक करणे, आपले विचार शब्दरूप भाषेच्या साहाय्याने इतरांना कळवणे, विविध प्रकारचे ज्ञान प्राप्त करून घेणे हे नरदेहात शक्य असते.

मनुष्यामध्ये असणारी मीपणाची जाणीव ही मनुष्यत्वाचा प्राण आहे. त्यामुळे तो स्वतःकडे व जगाकडे नवीन व श्रेष्ठ दृष्टीने पाहू शकतो. या जाणिवेमुळे तो स्वतंत्रपणे विचार करतो तसेच कर्तेपणाची हौस मिरवतो. कर्तेपणाच्या जोरावर परिस्थितीवर स्वामित्व गाजविण्याचा प्रयत्न करतो. निसर्गावर विजय मिळवून आपले हेतू साध्य करण्याचा प्रयत्न करतो. आपल्याला मृत्यू आहे याची त्याला खात्री असल्यामुळे तो अमरत्वाची आकांक्षा धरतो. मी कोण आहे, जन्मापूर्वी मी कोठे होतो, मृत्युनंतर मी कोठे असेन, मृत्यू म्हणजे नेमके काय, मी कसा आहे, मी कसा असायला पाहिजे इत्यादी विचार फक्त नरदेहामधेच करता येतात म्हणून समर्थ म्हणतात-

धन्य धन्य हा नरदेहे । येथील अपूर्वता पाहो ।
जो जो की जे परमार्थ लाहो । तो तो पावे सिद्धीते ॥१-१०-१
या नरदेहाचेनि आधारे । नाना साधनांचे नि द्वारे ।
मुख्य सारासारविचारें । बहुत सुटले ॥ १-१०-१०॥
पशुदेही नाही गती । ऐसे सर्वत्र बोलती ।
म्हणौनि नरदेहीच प्राप्ती । परलोकांची ॥ १-१०-२१॥

मनुष्याला पशुत्वाची पार्श्वभूमी असली तरी मनुष्य व पशू यातील पहिला महत्त्वाचा फरक म्हणजे मनुष्याची मज्जासंस्था प्रगत, सुरचित, संघटित व केंद्रशासित असते व मनुष्याचा मेंदू मोठा असतो. मनुष्य ताठ उभा राहू शकतो. त्यामुळे त्याचे पाऊल सुंदर बनले व हात मोकळे झाले. हात मागे-पुढे, वर-खाली होणे, अनेक प्रकारे वळविणे, वस्तू घट्ट पकडून जवळ घेऊन त्याहाळणे हातामुळे शक्य होत असते. शब्दरूप भाषा बोलणे हा विशेष गुण असल्यामुळे मनुष्याचे जीवन पशुप्रमाणे बाह्य परिस्थितीवर फारसे अवलंबून नसते. परिस्थितीपासून स्वतंत्र असते. म्हणून समर्थ म्हणतात-

नरदेह हा स्वाधेन । सहसा नव्हे पराधेन ॥ १-२५॥

मनुष्य हा समाज करून राहाणारा प्राणी आहे. अशी ॲरिस्टॉटलने मनुष्याची व्याख्या केली आहे. मधमाश्या, मुंग्या, हत्ती, हरिण, वानर यांचेही समाजजीवन चांगले असते. परंतु मनुष्याचे समाजजीवन उच्च पातळीवर प्रगट होते. कारण मनुष्याला संस्कृती असते. ती मनुष्याच्या जन्माआधीही असते व नंतरही चालू राहाते. पिढ्यानपिढ्या चालत आलेला तो वारसा असतो. प्रत्येक पीढी त्यात भर टाकत जाते. माणसाच्या शरीराला, मनाला व आत्म्याला शुद्ध करून त्यांना निर्मल स्वरूप देणारी अथवा संस्कारांनी शुद्ध करून पवित्र करणारी ती संस्कृती विचार, आचार व उच्चार यांच्यात समन्वय घडवून आणण्याचे काम संस्कृती करते. ती मनुष्याच्या शरीराला व मनाला आकार देते. दोषांचा त्याग करून गुणांचा स्वीकार भूषणावह आहे हे संस्कृती शिकवते. ती अर्थ, मूल्य, आदर्श व ध्येय निर्माण करते व मानवी जीवन समृद्ध करते. तसेच मूल्य साकार करण्यासाठी विशिष्ट जीवनपद्धती निर्माण करते व मानवी जीवनात ती प्रत्यक्ष आकार धारण करते. मनुष्याच्या मानसिक शक्ती विकसित करून मानवतेचा विकास करणे हे संस्कृतीचे कार्य आहे. संस्कृतीचे कार्य नरदेहात कसे चालते याचे सुंदर चित्रण समर्थांनी 'देहदुर्लभ निरूपण' या अठराव्या दशकातील चौथ्या समासात केले आहे. मानवी देहामुळे कवित्व, अध्ययन, विद्याभ्यास, श्रवण, मनन, उपासना, दानधर्म, गायन-संगीत वगैरे कलांचा अभ्यास वगैरे विविध गोष्टी करता येतात.

८४ कोटी जीवयोनीतून असा हा दुर्लभ नरदेह प्राप्त होणे ही मोठी भाग्याची गोष्ट आहे समर्थ म्हणतात.

बहुता जन्माचे अंती । होये नरदेहाची प्राप्ती ।८-७-१८

नरदेह संसारी । परम दुर्लभ असे ।।८-७-२०

नाना सुकृताचे फळ । तो हा नरदेह केवळ ।।२-४-१

भारतीय तत्त्वज्ञान पुनर्जन्म मानते आणि कर्मसिद्धांतातील ती महत्त्वाची गोष्ट आहे. प्रत्येक जीवाने कर्म करून साधलेली उन्नती जर मृत्युबरोबर लयाला जात असेल तर त्या प्रगतीला काहीही अर्थ राहाणार नाही. त्यामुळे पुनर्जन्म मानणे हे संयुक्तिकच ठरते. कर्म करून मिळविलेले पाप-पुण्य जीव आपल्याबरोबर नेतो. जीव म्हणजे शरीर व मन यांचा संघात. जीव कर्मानि जे ते साधतो ते संस्कारांच्या रूपात मनात राहाते. मृत्युसमयी देहाचा नाश होतो व मन हे संस्कार घेऊ न जाते. यालाच वेदान्तात सूक्ष्म शरीर म्हटले आहे. या सूक्ष्म शरीरात असे जन्मोजन्मीचे संस्कार साठविलेले असतात. सूक्ष्म देहात मृत्युसमयी जो संस्कार प्रबळ असतो त्यानुसार त्या वासनाच्या पूर्तीसाठी सूक्ष्म देह स्थूल देह निवडतो. म्हणजेच पुन्हा शरीराच्या रूपाने जन्मास येतो. आता पुन्हाचा जन्म मनुष्याचाच मिळेल याची शाश्वती नाही. युरोपिअन मतानुसार एकदा मनुष्याचा जन्म मिळाला की पुन्हा पुढचे जन्म मनुष्याचेच मिळतात. पण वेदान्त तसे मानत नाही. गीतासुद्धा म्हणते-

पुरुषः प्रकृतिस्थो हि भुङ्क्ते प्रकृतिजान्गुणान् ।
कारण गुणसङ्गोऽस्य सदसद्योनिजन्मसु ।।१३-२१।।

रजसि प्रलयं गत्वा कर्मसङ्गिषु जायते ।
तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते ।। १४-१५।। गी.

तानहं द्विषतः क्रूरान् संसारेषु नराधमान् ।
क्षिपाम्यजस्रमशुभानासुरी ष्वेव योनिषु ।।१६-१९।।

आसुरी योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि ।
मामप्राप्यैव कौन्तेय ततो यान्त्यधमां गतिम् ।।१६-२०।।

गीतेचा भावार्थ असा की देहात वास करणारा जीवात्मा प्रकृतिजन्य गुणांचा अनुभव घेतो आणि त्याचा गुणांशी (सत्व, रम, तम) येणारा संबंधच चांगल्या किंवा वाईट योनीत जन्म येण्यास कारणीभूत ठरतो. मृत्यूसमयी ज्या गुणाचे वर्चस्व असेल त्याप्रमाणे पुढील जन्म ठरतो. रजोगुणाची अभिवृद्धी असेल तर कर्माचरणाला अनुकूल अशा मनुष्य योनीत जन्म मिळेल. तमोगुणाचा अंमल असेल तर तिर्यग् योनी प्राप्त होईल. भगवान श्रीकृष्ण तर म्हणतात की क्रूर नराधम आसुरी लोकांना मी आसुरी स्वभावाच्या प्राणिकोटीतच वारंवार जन्माला घालतो. प्रत्येक जन्मात दोषांची भर पडत जाते व उत्तरोत्तर वाईट योनीच त्याला प्राप्त होतात.
अर्थात मृत्यूनंतर पुन्हा मनुष्य देहच मिळेल याची शाश्वती नाही.

हा नरदेह पडिता । तोचि पाविजे मागुता ।
ऐसा विश्वास धरिता । लाज नाही ।। ८-७-२०।।

नरदेही ज्ञानेवीण । कदा न चुके जन्ममरण ।
भोगणे लागती दारुण । नाना नीच योनी ।।८-७-२५।।

इत्यादिक नीच योनी । ज्ञान नस्ता भोगणे जनीं ।
आशा धरी मूर्ख प्राणी । पुढिलिया जन्माची ।।८-७-२७।।

नरदेह मिळूनसुद्धा जो आत्मज्ञान करून घेत नाही, त्याची जन्ममरण परंपरा चुकत तर नाहीच उलट नीच योनीत जन्म घ्यावा लागतो. तेव्हा पुढील जन्म मनुष्याचाच मिळेल अशी आशा धरणे मूर्खपणाचे आहे.

पाहिली घडी नव्हे आपुली । वयसा तरी निघोन गेली ।
देह पडताच ठेविली । आहे नीच योनी ।। ३-१०-४१।।

म्हणून दुर्लभ असा नरदेह प्राप्त झाला आहे तर तो सार्थकी लावला पाहिजे. समर्थ म्हणतात-

नीच योनि दुःख मागे । बहुत भोगिले ।।३-१०-३८।।

नरदेही आलिया येक । काही करावे सार्थक ।
जेणे पाविजे परलोक । परम दुल्लभ जो ।।२-४-५।।

नरदेहाचे उचित । काही करावे आत्महित ।
यथानुशक्त्या चित्त-वित्त । सर्वोत्तमी लावावे ।।२-४-१३।।

कारण या नरदेहामध्येच अनेक जन्मांचा शेवट होणार आहे. जर मनुष्याने आत्मज्ञान करून घेतले तरच.

ज्ञानप्राप्ती करून घेणे हेच शेवटी नरदेहाचे ध्येय ठरते. ज्ञानप्राप्ती करून घेणे हाही एक मनुष्य व पशूमध्ये असणारा मोठा भेद आहे. बुद्धीने मिळविलेले ज्ञान मनुष्याला मोठे सामर्थ्य प्राप्त करून देते. ऐतरेय आरण्यकात ऋषींनी म्हटले आहे की, वनस्पतीचे जीवन त्यांच्यातील रसावर अवलंबून असते, पशूमध्ये जाणीव दृष्टीस पडते, परंतु मनुष्यामध्ये मात्र विज्ञान म्हणजे बुद्धी काम करीत असून त्याचे सर्व व्यवहार बुद्धीने चालतात. शारीरिक गरजा व मनोभावना या दृष्टीने मनुष्य व पशू यात सारखेपणा असला तरी त्यांच्यात फरक आहे तो विचार करण्याच्या शक्तीत. 'बुद्धिर्नाम निश्चयात्मिकान्तकरणशक्तिः' अशी वेदान्तसारात बुद्धीची व्याख्या दिली आहे, तर शंकराचार्य विवेकचूडामणिमध्ये म्हणतात - 'बुद्धिःपदार्थाध्यवसायधर्मतः। थोडक्यात पदार्थाच्या स्वरूपाविषयी निश्चय करणारी अंतःकरणाची वृत्ती म्हणजे बुद्धीः म्हणून शंकराचार्य मनुष्याला 'व्युपन्नचित्त' हे विशेषण लावतात. व्युत्पन्नचित्त म्हणजे विवेक करणारा. तर्क करणारा अशी विवेचिका बुद्धी ही मनुष्याला मिळालेली आहे. 'विवेकेन वस्तुस्वरूपावधारणं विद्यामाहुः' (शांकरभाष्य) वस्तूचे खरे स्वरूप जाणणे म्हणजे ज्ञान.

जंव ते ज्ञान नाही प्रांजळ । जंव सर्व काही निर्फळ ।
ज्ञानरहीत तळमळ । जाणार नाही ।। ५-५-१।।

खरे ज्ञान होत नाही तोपर्यंत मनाची तळमळ शात होत नाही. नद्या, पर्वत, समुद्र, भूत, भविष्य, वर्तमान, संगीत, वेद, शास्त्रे इत्यादी असंख्य प्रकारचे ज्ञान मनुष्य मिळवितो. परंतु समर्थ म्हणतात की काही खरे ज्ञान नाही.

बहुत प्रकारीची ज्ञाने । सांगो जाता असाधारणें ।
सायोज्यप्राप्ती होये जेणे । ते ज्ञान वेगळे ।।५-५-३७।।

ऐक ज्ञानाचे लक्षण । ज्ञान म्हणजे आत्मज्ञान ।
पहावे आपणासी आपण । या नाव ज्ञान ।।५-६-१।।

स्वतःचे पूर्ण ज्ञान होणे यालाच आत्मज्ञान असे म्हणतात. मीपणाच्या जाणिवेमुळे मिळालेली ज्ञानदृष्टी बाह्य सृष्टीकडे न वळविता स्वतःचे ज्ञान करून घेण्याकडे वळविणे यातच मनुष्यपणाचा खरा उत्कर्ष आहे. असा उत्कर्ष जो करून घेणार नाही त्याच्यासारखा मूर्ख कोण बरे असेल? म्हणून शंकराचार्य म्हणतात-

इतःकोन्वस्ति मूढात्मा यस्तु स्वार्थे प्रमाद्यति ।
दुर्लभं मानुषं देहं प्राप्य तत्रापि पौरुषम् ।।५।।(विवेकचुडामणी)

मनुष्य देह मिळूनसुद्धा जो स्वतःचे हित साधत नाही त्याच्यासारखा मूर्ख कोण असेल बरे?

मनुष्यदेहामध्येच आत्मज्ञान साधता येते म्हणून ऐतरेय उपनिषदामध्ये 'माणूस' हा विश्वशक्तीचे पुण्य आहे, तिची उत्तम कृती आहे असे म्हटले आहे. भागवत म्हणते की भगवंतांनी आपल्या मायेच्या योगाने वृक्ष, सर्प, पशू, पक्षी, मासे वगैरे अनेक प्राणी निर्माण केले परंतु त्याला संतोष वाटेना. म्हणून त्याने माणूस निर्माण केला. माणूस आपल्या बुद्धीने आत्मसाक्षात्कार करून घेऊ शकतो हे पाहून त्यांना अतिशय आनंद आला. जरी मनुष्य शरीर नश्वर आहे, मृत्यूची सदैव टांगती तलवार आहे, तरी या नश्वर शरीराच्या साहाय्यानेच परमपुरुषार्थाची प्राप्ती होऊ शकते. अनेक जन्मांच्या नंतर हा नरदेह प्राप्त झालेला

आहे तेव्हा बुद्धीमान पुरुषाने मृत्यूच्या आधीच मोक्षप्राप्तीचा प्रयत्न केला पाहिजे (भागवत ११-९-२७/२८)

या नरदेहाचेनि लागवेगे । सार्थक करावे संतसंगे ।
नीच योनी दुःख मागे । बहुत भोगिले ।। ३-१०-३८।।

सर्व ज्ञानांचे पर्यवसान आत्मज्ञानात झाले तरच माणसाचे माणूसपण पूर्णतेला पोचते. म्हणून आत्मज्ञानाच्या प्राप्तीतच मनुष्यजन्माचे सार्थक आहे. हे आत्मज्ञान मनुष्यदेहातच होत असल्यामुळे श्री समर्थांनी वेळोवेळी नरदेहाची स्तुती करून तो आत्मज्ञानाकरता वापरावा असा उपदेश केला आहे.

- सौ. मनीषा भा. अभ्यंकर
'रामजानकी', चंदनवाडी
भोकरे कॉलनी, मिरज - ४१६ ४१०

• • •

श्रीदत्तात्रेय प्रसन्न
अशी वाहिली जीवन - सरिता स्वामी समर्थांची

रामदास हे पूर्वाश्रमिचे होते नारायण
नांव बदलले याच जीवनी होते ते कारण
अंधश्रद्धा बिमोड करूनी सत्कार्या शिकविले
राष्ट्रधर्म हा जना शिकवुनी हिंदुराष्ट्र राखिले ।।१।।
या कार्याच्या करिता त्याने रामदास केले

कोठीघरच्या आंत बसोनी करिसी तूं काय ?
लहानग्या त्या नारायणाची विचारते माय
चिंता करितो विश्वशांतिची कशी करूं सोय
हिंदुधर्म पुनर्जिवनी शोधित उपाय ।।२।।
या कार्याच्या करिता त्याने रामदास केले

इच्छित नसता लग्न ठरविले माते बंधूनी
सावधान हे शब्द ऐकता पळती मंडपातुनी
टाकळि गावी गुहे राहुनी कोटी जप केला
श्रीरामाने त्रयोदशाक्षरि मंत्रहि तो दिधला ।।३।।
या कार्याच्या करिता त्याने रामदास केले

नारायण ते नाम जावुनी रामदास झाले
तद् नंतर ते भारत भ्रमणा निघते ते झाले
हिमालयाच्यापासुनि दक्षिणीतीर्थे ते बघती
जनःस्थितीचे दर्शन घेवुनि समाज ते घडविती ।।४।।
या कार्याच्या करिता त्याने रामदास केले

कार्य तयांचे नव्हते सोपे परि-वर्तन करण्याचे
धर्म स्थापने कार्याकरिता जीवन ते वेचिले
अभिप्रेत तो राजा त्यांचा परमार्थ स्थापक
सज्जन भक्ता स्त्री-पुरुषांचा होई तो रक्षक ।।५।।
या कार्याच्या करिता त्याने रामदास केले

सांस्कृतिक ती पार्श्वभूमिहि समर्थ करू पाहती
मुख्य लेखनीक कल्याणहि ते येती मदतीसी
दिनकर स्वामी, गिरिधर स्वामी घेवुनि सांगाती
राम मंदिरा स्थापन केले चाफळ या ग्रामी
या कार्याच्या करिता त्याने रामदास केले

दासबोध करुणाष्टक अन् लघु रामायण रचिले,
तुळजापुरिची भवानि तिजसी वरदायिनी म्हटले
प्रयत्न कार्या प्रवृत्त करण्या श्लोक मनाचे म्हणा
परमार्थाची इच्छा असता गावे करुणाष्टका ।।७।।
या कार्याच्या करिता त्याने रामदास केले

समर्थ होण्यापूर्वी त्यांनी केली बहु साधना
निराश होण्या क्षणहि येती त्यावेळी जीवना
प्रासंगिक ते प्रतिबिंबहि त्या पडेल करुणाष्टकी
श्लोक मनाचे उर्दु भाषे करिती तुराव चिस्ती ।।८।।
या कार्याच्या करिता त्याने रामदास केले

समाज होत अगतिकही जाणिव हो त्यांना
नितीधर्माचे आचरण ते लोप पावले तदा
रामनाम ते घेवुनि सगळ्या महाराष्ट्री हिंडती
सामाजिक अन् राजकीयही चळवळ ते करिती ।।९।।
या कार्याच्या करिता त्याने रामदास केले

स्वाभिमान अन् स्वधर्म दिक्षा देती स्वराज्याप्रती
अनुग्रह तो देवुनि शिवबा शिवराया बनविती
स्थानी अकरा हनुमंताची मंदिरे उभारती
अखिल मानवा शिकवुनि देती जाणिव शक्तीची ।।१०।।
या कार्याच्या करिता त्याने रामदास केले

समर्थांची ती शिकवण होती साधी अन् सोपी
विवेक आणि वैराग्याचा समतोलहि राखी
वाणी परि ती गोड ठेवुनि कास प्रयत्नी धरा
परमार्थी ते होवुनि तुम्ही प्रपंचही साधा ।।११।।
या कार्याच्या करिता त्याने रामदास केले

अधिकारहि तो परमार्थाचा स्त्री पुरुषासारखा
अक्का वेणा ह्या तरि त्यांच्या अनुयायी शिष्या
अनेक जाती आणिक धर्मी लोकहि ते येती
कांही मुस्लिम ख्रिचन आदी समाविष्ट होती ।।१२।।
या कार्याच्या करिता त्याने रामदास केले

कार्यारत ते सदा राहिले समाज उन्नतिला
महंत करण्या कटाक्ष होता महंत स्वामींचा
चतुःसूत्रि ती त्यांची होती जीवन जगण्याची
शरीर, भक्ती, युक्ति नि बुद्धि समर्थ करण्याची ।।१३।।
सच्चित्त सुखधन वरद प्रतापी रामदास माऊली
महाप्रयाणां करिते झाले सोळा एक्यांशी

- श्री. शांताराम गोपाळ पोतदार
गुरुनिरोपे परिपूर्ण १५८८ सदाशिव पेठ,
पुणे - ४११ ०३०, दूरध्वनी क्र. २४३३७५६२

• • •

समर्थ स्वामी रामदास

लेखिका - प्रज्ञाशिष्या रामदासी



शुका सारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे ।
वसिष्ठा परि ज्ञान योगेश्वराचे ।
कवी वाल्मिकासारिखा मान्य ऐसा ।
नमस्कार माझा सद्‌गुरू रामदासा ॥
जय जय रघुवीर समर्थ ।

शुकमुनी पित्याचा केवळ उपदेश श्रवण अंतःकरणात परिपूर्ण उतरल्याने वैराग्य संपन्न होऊन केवळ पाचव्या वर्षी "अवधूत" बनून घराबाहेर पडले. तसे हा बालपणापासूनच विश्वाची चिंता करणारा - 'नारायण' लग्नमंडपात खऱ्या अर्थाने 'सावध' होऊ न त्याने वैराग्याच्या गळी माळ घातली. अन् धावत सुटला तो श्रीराम चरणी (नाशिकाच्या) तेथून टाकळीस 'श्रीराम जयराम जय जय राम' या त्रयोदशाक्षरी मंत्राचे १३ कोटी जपास बसून ते जपानुष्ठन पुरे केले. त्यानंतर गायत्री पुरश्चरणही संपन्न केले अन् बालपणी लाभलेल्या प्रत्यक्ष सद्‌गुरू श्रीरामांची अनवरत कृपा अनुभवली. नारायण ज्या भक्तीभाव गर्भतेने आपल्या इष्ट दैवतास - श्रीरामास 'समर्थ' म्हणत तेच बिरुद त्यांना स्वतःला जडले याचे कारण त्या श्रीरामाचे ज्ञान-वैराग्य-भक्ती व सर्व सद्‌गुण आता या नारायणात प्रतिबिंबित व्हावयास लागले. अन् त्यायोगे या प्रपंचरुपी (नार=पाणी) भवसागरात राहणारा (अयन=वसतीस्थान) नारायण ठोसर रामदास नव्हे नव्हे 'समर्थ रामदास स्वामी' बनले. ठोस पणे !

टाकळीच्या एकांतवासात समर्थांनी वेद, वेदान्त, वेदांगे, योगवासिष्ठ्य, रामायण-गीता, महाभारत पुराणांसह अनेक त्यावेळी उपलब्ध अशा सर्व संत वाङ्मयाचा अभ्यास केल्याने ते आता ज्ञानसंपृक्त झाले. त्यांच्या दासबोध, आत्मारामादि रचनांवरून त्यांचे ज्ञान-दर्शन वसिष्ठापरि असलेले दिसते. वसिष्ठ हे ब्रह्मदेवाचे मानसपुत्र म्हणून अपौरूषेय होते अन् समर्थ ठोसर घराण्याच्या सूर्य व रामोपासनेच्या शुद्ध बीजापोटीचे गोमटे फळ फळास आल्याचे इतकाच काय तो दोघांत फरक जाणवतो.

योगेश्वर=योगाचे ईश्वर भगवान शंकरालाही म्हणतात व भगवान श्रीकृष्णालाही म्हणतात. सूर्य नमस्कार व खडतर उपासनेचे योगे समर्थ 'योगेश्वर' योगसमृद्ध योगसमर्थ असल्याचे स्पष्टपणे दृष्टोत्पत्तीस येते ते त्यांच्या दासबोधावरून गुरू अन् शास्त्र प्रचितीसह हनुमंत कृपेने - आत्मप्रचितीच्या बळे समर्थ 'योगारूढ' झाल्याचा पुरावा पहा. 'म्हणोनि सर्व साक्षी मन । तेंचि जालिया उन्मन ॥ मग तुर्यारूप ज्ञान ते मावळोन गेले । वृत्तिरहित जें ज्ञान । तेंचि पूर्ण समाधान । जिथें तुटे अनुसंधान ।

माया ब्रह्मींचे । शुद्ध ब्रह्माचा निश्चयो । करीत कल्पनेचा जयो । निश्चितार्थी संशयो । तुटोनि गेला । जाणावे (पहावे) आपणासि आपण । या नांव ज्ञान ॥' इत्यादि किंबहुना त्यांची ऋतंभरा प्रज्ञा कुंडलिनीचे योगे जागृत झाल्याने त्यांचा संपूर्ण अध्यात्मिक वाङ्मय संपदा आणि संपूर्ण जीवन अन् विशेषतः 'आत्मराम' द्वारे त्यांचा आत्मसाक्षात्कार स्पष्ट जाणवतो. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान-धारणा समाधी असे त्यांचे संपूर्ण जीवन अष्टांगयोग परिपूर्ण होते हे सर्वज्ञात आहेच. आत्संयमन व इंद्रियदमनामुळेच ते बोहल्यावरून पळून पुढे १२ वर्षे सतत संततधारे सारखी खडतर उपासना करू शकले. तेव्हां यावरून ते शमदयादी साधन संपत्तीने समृद्ध होते. विवेक-वैराग्य-अखंड सावधपणा म्हणजे अखंड रामानुसंधान याच्याबळावर ते समाधी पर्यंतची योग साधना संपूर्ण जीवनभर जगले हे सर्वांना माहीत आहेच. याहीपुढे जाऊन लोकांतातही ते एकांत-सेवन करीत आपल्या आत्मारामाची जपणूक अत्यंत प्रेमादराने आत्मीयतेने करीत हेच दिसते.

वाल्मिकींप्रमाणे त्यांचे काव्य रामस्पर्शित-'आत्माराम' युक्त आहे हे दासबोध, आत्माराम, अनेक स्तोत्रे-अष्टके-अभंग-आरत्या इ. वरून दिसतेच दिसते. उत्तम काव्याचे सर्वगुण त्यांच्या प्रत्येक रचनेत आढळतात. तसेच सूक्ष्म ज्ञान, डोळस भक्ती अन् परखडपणातून धगधगीत वैराग्य - हे त्यांच्या काव्याचे खास विशेष आहेत. अन् सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'आधी केले मग सांगितले' यानुसार काव्य असल्याने ते अगदी जनसामान्याच्या हृदयाची -'मनाची पकड घेते. तळागाळातल्या व्यक्तीपासून शास्त्री-पंडितापर्यंत सर्वांना भावणारे असे त्यांचे 'प्रचितीपूर्ण बोळणे = काव्य आहे.

'जे जे आपणासि ठावे । ते ते इतरे जनांस शिकवावे । शहाणे करून सोडावे सकळ जन ॥" इथे त्यांच्यातला सद्‌गुरू परिपूर्णपणे दिसतो. कल्याण-उद्धव-वेण्णाबाई, आक्काबाई- यांसारख्या शिष्यांच्या जीवन-पदावरून सद्‌गुरूंचे साक्षात अध्यात्मिक प्रतिबिंब वा आरसाच दिसतो. तर 'स्वे-स्वे कर्मण्ये अभिरतः संसिद्धिं लभते न नरः ।' या गीता उक्तीनुसार अध्यात्मिकतेच्या आत्मिक अधिष्ठानावर उत्तम राजाची सर्व कर्तव्ये सर्वांगाने परिपूर्ण करणारा 'जाणता राजा शिवराय' हा समर्थांचा शिष्योत्तम-यातून समर्थांनी 'आपणासारिखे करिती तात्काळ' हे दाखवून आपले सद्‌गुरूपण सिद्ध केले वा पणास लावले हे स्पष्ट होते. अध्यात्मिक साधनेसह-ध्यान-धारणायुक्त जगदंबेची प्रार्थना, अथक परिश्रमपूर्वक केलेला पुरुषार्थ पराक्रम यासर्वांमुळे दासबोधासारख्या अध्यात्मिक ग्रंथातही सद्‌गुरू न राहवून या आपल्या शिष्याची शिवरायांची मनमुराद

स्तुती करतात -

''भाग्यवंत जयवंत रुपवंत गुणवंत ।
आचारवंत क्रियावंत । विचारवंत स्थिती ॥
येशवंत कीर्तीवंत । शक्तिवंत सामर्थ्यवंत ।
वीर्यवंत वरदवंत । सत्यवंत सुकृती ॥
विद्यावंत कळावंत । लक्ष्मीवंत लक्षणवंत ।
कुळवंत शुचिस्मंत बळवंत दयाळु ॥
युक्तिवंत गुणवंत वरिष्ठ । बुद्धिवंत बहुधारिष्ठ ।
दीक्षावंत सदा संतुष्ट । निस्पृह वीतरागी ॥''

'रामदास' हा तर त्यांचा स्वभाव, सहज वा स्थायीभाव आहे. अंतःकरण पिळवटून अत्यंत व्याकुळ होऊन ज्या कळकळीने पोट तिडिकीने ते आपल्या रामरायाला करूणाष्टकांतून विनवून प्रार्थना करतात तिथे त्यांच्यातला दास-दासानुदास अगदी स्पष्टपणे दिसतो.

ज्या आत्यंतिक विनयाने व तळमळून 'बुद्धि दे रघुनायका' अशी याचना करताना म्हणतात- 'नेणता भक्त मी तुझा' आर्तभावाने रघुनाथाकडे मागणे मागताना प्रांजळपणे मानवी असमर्थता जाणून मागतात- 'मज न कळे ते दे रे राम ।' तर 'रामदास म्हणे माझा ' संसार तुजा लागला ।' असा वैराग्यपूर्ण सुख-संवाद आपल्या राघवाशी करता करता त्याची सगुण साकाराची स्तुती गाताना अक्षरशः शब्दचित्र उभे करतात- 'घनःश्याम हा राम लावण्यरुपी । महाधीर गंभीर पूर्णप्रतापी ।'

मनोबोध (मनाचे श्लोक) हे तर रामदासांचे सुंदर आत्मनिवेदनच होय- त्या सदा सर्वदा देव सन्निध आहे । कृपाळूपणे अल्प धारिष्ट्य पाहे असा आपला आत्मानुभव स्पष्टपणे सांगतात. तसेच तो सगुण आहे तसाच निर्गुण-सुखानंद, आनंद कैवल्यदानी असा महा उदार महादानी आहे असे सांगून तो आपल्या भक्ताची उपेक्षा तर कधी करतच नाही उलट ''अनन्यास रक्षीतसे चापपाणी'' असे छातीठोकपणे सांगून तो 'दासाभिमानी' आहे असे अत्यंत भावुकपणे सांगतात. अन् विवेके तदाकार होऊनि राहे - यातून रामदास ते 'समर्थ' हा आपला 'दास-सखा व तद्रुपता' असा अध्यात्मिक प्रवास सांगतात.

कारण राघवाचे सर्व गुण आता त्यांच्यात परिपूर्ण उतरल्याने जो समर्थ रामप्रभु (अनंत कोटी ब्रह्मांडनायक -चालक, कर्तुं अकर्तुं अन्यथा कर्तुं तोच) रामदास समर्थ वा ''समर्थ रामदास'' बनून जनोद्धार करण्यास आजही दासबोधरूपाने (व सर्वच त्यांच्या रचनांतून) तत्त्व रुपाने रसद असा (रसो वै सः) विश्वात्मा बनून व्यापकपणे भरून उरला आहे.

तेव्हा अशा या समर्था, रघुवीरा - जो विद्यावीर, ऋजुता वीर, दान वीर, दया-वीर, कृपावीर, अन् प्रसंगी युद्धवीर आहे तो 'आत्माराम' रुपाने आमच्या सर्वांच्या हृदयीं गुप्त रुपाने आहेसच तो क्रियाशील होऊन प्रगट होवो हीच तुझ्या चरणीं प्रार्थना ! म्हणून तुझा अखंड अगणित असा जयजयकार असो. तूंच या जीवाचा खरा स्वामी नाथ प्रभु गुरू आहेस ! आता तूं कृपेच्या, करूणेच्या, अनुग्रहाच्या संतत अनवरत वर्षावाने आम्हा सर्वांचे अंतर (हृदय) भरून भारून प्रगट रूपाने (आम्हांला सदैव अमृतपुत्र म्हणून जागवीत रहा अमृतस्थ पुत्राः उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्त वरान् निवोधयनुसार) रहा. हीच प्रार्थना !

जय जय रघुवीर समर्थ !

- प्रज्ञाशिष्या रामदासी

• • •

राष्ट्राचा बुलंद आवाज - श्री समर्थ

- सौ. मृणाल सुहास थोरात



तिन्ही जगाचा स्वामी कोण म्हणून विचारले तर चटकन श्री रामदास स्वामी म्हणून नाव मुखातून येते. श्री रामदास स्वामींचा जन्म शके १५३० मध्ये जांबगाव येथे झाला. नारायण ठोसर हे नाव. लहानपणापासूनच कुशाग्र बुद्धी, हरहुन्नरी, कणखर व कार्यक्षम व्यक्तिमत्व. जोर बैठका नमस्काराने शरीर पिळदार, बलवान असल्यामुळे समवयस्क पोरे त्यांना घाबरून असत.

लहानपणापासून मनात नाना प्रश्न उभे राहायचे. बीज कसे अंकुरते? रोपे कशी वाढतात? चंद्र, सूर्य, तारे आकाशात कशी व कोणामुळे चमकतात? पण हे सर्व देवामुळे घडते असे वडिलधारी मंडळी सांगायचे. पण देव राहतो कुठे? व तो कसा दिसतो ? ह्या प्रश्नाचे विश्लेषण गुरूकृपेशिवाय शक्य नाही हे कळल्यावर मात्र त्यांच्या मनाची बैचेनी वाढतच गेली. त्यातच १५४२ मध्ये लग्नघटिका संपायच्या आत सावधान हे शब्द कानावर पडल्यावर लग्नमंडपातून त्यांनी पलायन केले. नंतर टाकळीत जाऊन १२ वर्षे पुरश्चरण केले. टाकळीला नंदीनी नदीच्या पात्रात उभे राहून ''श्रीराम जय राम जय जय राम'' ह्या त्रयोदशाक्षरी मंत्राचा अखंड १२ वर्षे १३ कोटी जप केला. ह्या जपानंतर मारुतीरायाने त्यांच्यावर कृपादृष्टी ठेवून त्यांच्या अंतरंगात प्रवेश केला. भानावर आल्यावर त्यांना समोर एक माकड दिसले. ते सतत १२ वर्षे रामदास स्वामींचा जप ऐकत होते. त्या माकडाने मारुतीरायाच्या रूपात स्वामींना दर्शन दिले. रामाकडे जाण्याचा मार्ग केवळ मारुतीच्या प्रवेशद्वारातूनच आहे हे समजल्यावर रामदास स्वामींनी मारुतीरायाची स्तुती केली. त्यांच्या मुखातून उत्स्फूर्तपणे पडलेले काव्य म्हणजेच मारुती स्तोत्र होय. धन्य तो मारुतीराया, धन्य ते श्री रामदास स्वामी.

पुढील बारा वर्षे त्यांनी तीर्थयात्रा केल्या. १५६६ मध्ये कृष्णाकाठी चाफळ खोऱ्यामध्ये त्यांनी जगदोद्धाराच्या कार्यास आरंभ केला. मारुती मंदिर, राम मंदिर यांची स्थापना, मठांची स्थापना अशी अनेक कार्ये सिद्धीस नेली. राम जयंती, हनुमान जयंती, इत्यादी उत्सवही सुरू करून जनजागृतीची मुहुर्तमेढ तिथे रोवली.

रामदासी सांप्रदायिकतेची काही प्रमुख अंगे त्यांनी ठरवून दिली. पहिले अंग म्हणजे अध्यात्मविद्या किंवा आत्मध्यान. दुसरे अंग म्हणजे राजकारण व तिसरे अंग म्हणजे चतुरस्त्रता. पण ह्या सर्वांसाठी सगळ्यात गरजेची गोष्ट होती ती म्हणजे समुदाय. किर्तन-निरूपण ,राजकारण हे केवळ एकट्याचे काम नाही हे जाणून होते. ज्यांना समुदाय गोळा करायचा असेल त्याच्या अंगी मुख्यत्वे करून दोन गुण असणे त्यांना गरजेचे वाटले. पहिला गुण म्हणजे प्रबोधशक्ती. प्रबोधशक्ती म्हणजे आपल्या गोड, प्रेमळ, तेजस्वी वाणीने जनजागृती करून लोकांची मने वळविणे, त्यांनी आपले आचार, विचार, उच्चार शुद्ध ठेवून लोकांपुढे एक आदर्श निर्माण केला।

जैसे बोलणें बोलावे । तैसेचि चालणें चालावे ।
मग महंतलीला स्वभावें । आंगी बाणे ॥

दुसरा गुण म्हणजे लोकांचे अंतरंग जाणून घेणे. लोकांना न दुखविता त्यांना आपलेसे करून सन्मार्गाला लावणे. वरील दोन गुण उंगी बाणविण्यासाठी खालील उपाय व मार्ग अतिशय महत्त्वाचे आहेत हे त्यांनी सांगून दिले.

(१) परिभ्रमण (२) विवेक (३) प्रयत्न (४)देहाच्या क्षण भंगुरतेविषयी जागृती (५) कीर्तिची चाड (६) वैराग्य (७) नि:स्पृहता (८) मृदू वचन (९) क्षमा, शांती, सहिष्णुता (१०) परोपकार (११) उत्कटता.

स्वतः श्री रामदास स्वामींनी वरील उपाय व मार्गाचा अवलंब करून रामदास संप्रदाय सर्व महाराष्ट्रभर पसरविला. त्यामुळे त्यांचा अनुयायी वर्ग वृद्धिंगत झाला. ह्याच काळात त्यांनी श्री. शिवाजी महाराजांवर अनुग्रह केला. त्या दोघांमधील गुरूशिष्याचे नाते अगाध होते. श्री शिवाजी महाराजही आपल्या गुरूला श्रीरामदास स्वामींना अनन्यभावे शरण जाऊन गुरू आज्ञेत राहिले. श्रीरामदास स्वामींनी शिवथर घळीत आपला पट्ट शिष्य कल्याण स्वामींच्या मदतीने श्री दासबोधसारख्या महान ग्रंथाची रचना केली. आजही व अजून अनंत काळापर्यंत हा महान श्री दासबोध ग्रंथ सर्व जनांचा मार्गदर्शक राहिल.

श्री शिवाजी महाराजांच्या आग्रहावरून त्यांनी शेवटी सज्जनगडावर वास्तव्य केले. शके १६०३ मध्ये त्यांचे महानिर्वाण झाले. अजूनही तो बुलंद, खडा आवाज कानात घुमतो ''जय जय रघुवीर समर्थ.'

- सौ. मृणाल सुहास थोरात
४८१ पर्वती दर्शन, फुले,
मॅन्शन ब्लॉक नं. २, पुणे - ४११ ००५

• • •

सदा सर्वदा योग तुझा घडावा ।
तुझे कारणी देह माझा पडावा ॥
उपेक्षू नको गुणवंता अनंता ।
रघुनायका मागणे हेचि आता ॥

'श्री समर्थ रामदासस्वामी यांचे भारताच्या इतिहासातील राजकीय, सामाजिक व लष्करी क्षेत्रातील योगदान'



- अजय गोविंद आपटे

सॉफ्टवेअर इंजिनियर, पुणे.

मौर्य आणि गुप्त काळामध्ये मगध साम्राज्याचा बहुतांशी भारतावर एकछत्री अंमल होता. त्यामध्ये अनेक प्रदेश, मांडलिक जनपदे होती. परंतु त्या सर्वांवर अंमल व प्रशासन ठेवणारे मोठे सैन्य त्यांच्यापाशी होते. त्याच्या जोरावर त्यांनी त्यावेळच्या भारताच्या सीमेपलीकडे म्हणजे हिंदुकुश पर्वताच्या पलिकडे असणाऱ्या गांधार म्हणजे आजच्या अफगाणिस्तान या देशावर नियंत्रण ठेवले होते. परंतु त्यानंतर मगध साम्राज्याच्या अस्तानंतर ते अनेक राज्यात विभागले गेले. केंद्रीय सत्ता नष्ट झाली. लष्करी ताकद क्षीण झाली. त्यानंतर सातव्या शतकात इस्लाम धर्माचा उदय झाला. व यवन आक्रमकांनी भारतावर अनेक आक्रमणे केली. पूर्ण उत्तर हिंदुस्तान यवन आक्रमकांनी पादाक्रांत केला. तेराव्या शतकाच्या शेवटी अल्लाउद्दीन खिलजीने इ.स. १२९६ मध्ये दक्षिणेतील महाराष्ट्रातील देवगिरीचे यादव साम्राज्य नष्ट केले व दक्षिण हिंदुस्थानात यवन सत्तेचा विस्तार केला. या सर्व काळात त्यावेळच्या हिंदू राजांनी या आक्रमणाचा प्रतिकार केला. परंतु तो संघटीत नव्हता. यवन राज्यकर्त्यांच्या संघटीत सैन्यापुढे तो फारच तोकडा पडला. केंद्रीय सत्ता व लष्करी ताकदीचा अभाव या पराभवामागची प्रमुख कारणे होती.

समर्थ जन्मापूर्वीची भारतातील राजकीय परिस्थिती :-

महाराष्ट्रातील यादव साम्राज्य नष्ट झाल्यानंतर दक्षिण भारतात यवन राजवट प्रस्थापित झाली. उत्तरेमध्ये बाबराने दिल्ली ताब्यात घेऊन भारतातील मोगल साम्राज्याचा पाया रचला. अकबराने उत्तर हिंदुस्थानात मोगल साम्राज्याचा एकछत्री अंमल प्रस्थापित केला. दक्षिण भारतामध्ये बहामनी सत्ता स्थापित झाली. विजयनगरच्या साम्राज्याच्या रूपाने दक्षिणेत यवन राजवट उलथवून टाकण्याचा यशस्वी प्रयत्न झाला. परंतु कृष्णदेव राय या सम्राटाच्या मृत्यूनंतर विजयनगरचे साम्राज्य पाच बहामनी सुलतानानी नष्ट केले व दक्षिण भारतात पुनश्च यवन राजवट प्रस्थापित झाली. समर्थजन्मापूर्वीपर्यंत बहुतांश भारतावर यवन राजसत्ता प्रस्थापित झाली होती.

या सर्वकाळात हिंदू समाजाची अवस्था हीनदीन झाली होती. हिंदूंना राजकीय तसेच धार्मिक स्वातंत्र्य नव्हते. ते स्वाभिमानशून्य झाले होते. जे थोडेफार हिंदू राजे होते ते या यवनांची नोकरी करण्यात धन्यता मानू लागले होते. हिंदू समाज हिंदू चालीरीती सोडून यवन रीतीरीवाज स्वीकारू लागले होते.

समर्थांचे राजकीय व सामाजिक कार्य

इ.स.१६०८ मध्ये मराठवाड्यातील गोदावरीकाठी जांब या गावी. श्रीसमर्थ रामदासस्वामींचा जन्म झाला. आयुष्याची लहानपणीची पहिली बारावर्षे त्यांनी जांब गावी व्यतित केली. त्यानंतर बारावर्षे त्यांनी नाशिकजवळ टाकळी गावी उग्र तपश्चर्या केली. तपश्चर्या पूर्ण झाल्यानंतर बारावर्षे त्यांनी संपूर्ण भारतभ्रमण केले. या काळामध्ये त्यांनी भारताच्या राजकीय, सामाजिक स्थितीचा बारकाईने अभ्यास केला. विशेषतः हिंदू समाज व हिंदू राज्यकर्त्यांच्या अधःपतनाची सखोल कारणमीमांसा केली. हिंदू समाजातील हेवेदावे, फितुरी, कर्मकांड असंघटीतपणा व लष्करी सामर्थ्यांचा अभाव ही हिंदू समाजाच्या पराभवाची व अधःपतनाची प्रमुख कारणे असल्याचे त्यांच्या लक्षात आले होते. हिंदू समाजाच्या शोचनीय परिस्थितीमुळे त्यांचे अंतःकरण अत्यंत दुःखित झाले होते. म्हणूनच एकान्तात राहून आत्मचिंतन करण्याची विलक्षण आवड असणारा हा महात्मा आपली आवड बाजूस ठेवून लोकसंग्रहासाठी लोकसंघटनाकरिता जनतेमध्ये मिसळला.

हिंदू मनुष्य हा त्याच्या वैयक्तिक आयुष्यात जबाबदारीने वागणारा असला तरी तो कुटुंबकेंद्रित होता. त्याला सामाजिक जबाबदारी व संघटनासामर्थ्य यांचे भान नव्हते. स्वतःचा धर्म, स्वतःचा समाज, स्वकीय राज्यकर्ते यांवर त्याचा विश्वास राहिला नव्हता. तो स्वाभिमानशून्य आयुष्य जगू लागला होता. अशा गोंधळलेल्या हिंदू मनुष्याला त्याच्या वैयक्तिक आयुष्यातील कर्तव्यकर्मे, धर्म, अध्यात्म व सामाजिक आणि राष्ट्राप्रती असणारी कर्तव्ये यांची जाणीव करून देण्यासाठी दासबोध ह्या विख्यात ग्रंथाची रचना केली. हा ग्रंथ 'वर्तणूक शिक्षण' (Behaviourial Training) या विषयावरील उत्कृष्ट ग्रंथ आहे. हिंदु समाजाच्या उन्नतीसाठी, हिंदु राष्ट्रस्थापनेसाठी श्रीसमर्थांनी एकात्मिक विकास योजना (Integrated Development Plan) आखली होती. समाजाची उन्नती करावयाची म्हणजे ती दोन्ही स्तरावर म्हणजे एक वैयक्तिक स्तर व दुसरा म्हणजे संघटनात्मक स्तर हे त्यांनी ओळखले होते. वैयक्तिक स्तरावर व्यक्तीला आयुष्यामध्ये जबाबदार, निर्भय, धार्मिक, शिस्तबद्ध बनविण्यासाठी सविस्तर मार्गदर्शन 'दासबोध' या ग्रंथामध्ये केलेले आहे.

परकीय राजसत्ता जोपर्यंत एखाद्या समाजावर स्वामित्व गाजविते म्हणजे जोपर्यंत समाजाला राजकीय स्वातंत्र्य नसते तोपर्यंत समाजाची दैन्यावस्था जाऊन त्याची निरोगी वाढ शक्य नसते. समाजजीवनाचे हे त्रिकालाबाधित सत्य लक्षात घेऊन श्रीसमर्थांनी आपल्या लोकसंघटन कार्याची आखणी केली होती. राज्यक्रांतीशिवाय सामाजिक क्रांती घडून येणार नाही आणि समाजक्रांतीशिवाय हिंदु धर्माची पुनर्स्थापना होणार नाही ही खूणगाठ त्यांनी आपल्या मनाशी बांधली. सुदैवाने त्याच सुमारास

शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्य स्थापनेसाठी मोठ्या हिंमतीने आणि अत्यंत निस्वार्थीपणे प्रयत्न सुरू केले. त्यांच्या या धाडसी कार्यामध्ये जनतेची पूर्ण सहानुभूती प्राप्त होऊन स्वराज्यस्थानेमध्ये त्यांचा प्रत्यक्ष सहभाग (Active Participation) वाढावे म्हणून श्रीसमर्थ नवा ध्येयवाद घेऊन पुढे सरसावले. त्यामध्ये दोन हेतु होते.

(एक) राज्यातील लोकांना सुखासमाधानाने निर्भयपणे जगता यावे यासाठी स्वकीयांचे हिंदवी स्वराज्य स्थापन करणे.

(दोन) स्वराज्यामध्ये निर्भयपणे व सुखाने जगणाऱ्या लोकांनी उच्च अध्यात्मिक मूल्ये, राष्ट्रधर्म व त्याग यांची जोपासना करावी. केवळ चांगले खाणे, पिणे आणि चैन करणे यासाठी स्वराज्य असणे काही बरोबर नाही. जीवनातील उच्च मूल्ये आणि परमार्थ साधण्यासाठी निर्भय समाज हवा त्यासाठी राजकीय स्वातंत्र्य अथवा स्वराज्य हवे. परकीय जुलमी सत्ता झुगारून देण्यासाठी राज्यक्रांती घडवून आणणे जरूर आहे. त्यासाठी त्यागी व उदात्त वृत्तीची माणसे जरूर असतात. अशी माणसे तयार करण्यासाठी श्रीसमर्थांनी रामदासी संप्रदाय सुरू केला. भारतभ्रमण करीत असताना त्यांनी मथुरेपासून दक्षिणेत तंजावर पर्यंत ठिकठिकाणी मठ स्थापन केले. या मठांवर त्यांनी उत्तम महंत नेमले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली रामदासी संप्रदायाचे शिष्य तयार केले जात. हे मठ म्हणजे हिंदु समाजाच्या लोकसंघटनेची केंद्रे होती. या सर्व मठांचे कार्य प्रभावी होते. लोकांना अध्यात्मिक मार्गदर्शन करण्याबरोबरच लोकसंघटनेचे, धर्मस्थापनेचे महत्त्वपूर्ण कार्य या मठांद्वारे चालत असे. परकीय जुलमी राजवटीविरूद्ध प्रतिकार करण्यासाठी जनजागृती करण्याचे त्यांना प्रशिक्षण देण्याचे काम या मठाद्वारे होत असे.

श्रीसमर्थ हे स्वतः डोंगरदऱ्यां, खेडोपाड्यांमध्ये भ्रमंती करून लोकशिक्षणाचे व शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्य स्थापनेत जनतेचा सहभाग वाढविण्यासाठी प्रचाराचे कार्य करीत असत. त्यांचा जनसंपर्क हा समाजातील तळागाळापर्यंत व हिंदु समाजातील सर्व जातीधर्मामध्ये होता. तसेच ते लोकांना त्यांच्या वैयक्तिक अडीअडचणी सोडविण्यास मदत करत व संघटीत होण्यासाठी मार्गदर्शन करीत. त्यामुळे ते लोकप्रिय असून जनमानसावर त्यांचा प्रभाव होता. त्याचबरोबर त्यांचे महंत हे मोठ्या योग्यतेचे होते. त्यांचा जनसंपर्क मोठा असे. ते राजकारणात व समाजकारणात सक्रीय असत. परंतु केवळ राजकारणपटु, मुत्सद्दी व समर्थांचा महंत यांच्यामध्ये महत्त्वाचा फरक आहे. नुसत्या मुत्सद्दीपणे राजकारण करणारा पुरूष उदात्त नसतो. त्याचे राजकारण स्वार्थाने बरबटलेले असते. तो त्याच्या प्रपंचाचा एक भाग असतो. परंतु लोकांचे दुःख हरण करून त्यांना सुखी करावे. जीवनातील उत्तमोत्तम मूल्यांची उपासना करण्याची संधी सर्वांना मिळावी यासाठी राजकारण करण्याऱ्या पुरुषाचे अंतःकरण उदात्त व त्यागी असते. ही उदात्तता ईश्वरोपासनेशिवाय शक्य नाही म्हणून श्रीसमर्थांचा महंत प्रथम भक्त व नंतर सामाजिक व राजकीय नेता बनतो. समर्थांना केवळ स्वतःच्या आध्यात्मिक उन्नतीत रममाण असणारा व संघटनात्मक, सामाजिकदृष्ट्या निष्क्रीय महंत अपेक्षित नाही. महंत कसा असावा याचे वर्णन त्यांनी दासबोधामध्ये 'दशक एकोणिसावा समास नववा-राजकारणनिरूपण' मध्ये केले आहे.

समर्थांचे लष्करी कार्य -

श्रीसमर्थांचे स्वतःचे शरीरसामर्थ्य व प्रकृती उतारवय होईतोपर्यंत उत्तम होते. त्याकाळी असलेली शस्त्रे ते चांगल्या प्रकारे चालवीत. घोडेस्वारी ते चांगल्या प्रकारे करीत. त्यांच्या शिष्यांना रोज व्यायाम करणे बंधनकारक असे. त्यांच्या शिष्यांचे शरीरबल उत्तम असे. समर्थांच्या काळामध्ये जुलमी परकीय सत्तांना उलथवून टाकून हिंदवी स्वराज्य स्थापनेचें कार्य शिवरायांनी हाती घेतले होते. त्यासाठी स्वराज्याच्या लष्करात भरती होण्यासाठी धडधाकट व शस्त्रसज्ज तरूणांची नितांत आवश्यकता होती. ती समाजातूनच मिळवावी लागणार होती. समर्थांनी गावोगांव व्यायामशाळा उभ्या केल्या व अकरा मारूतींची स्थापना केली. याद्वारे तरूणांना शरीरसामर्थ्य व शस्त्रसज्जता वाढविण्याची सोय त्यांनी उपलब्ध करून दिली. अन्यायाला प्रतिकार करण्याची क्षमता त्यांनी वाढीस लावली, समाजामध्ये वीरवृत्ती निर्माण केली. यातूनच अनेक लढवय्येवीर स्वराज्याच्या स्थापनेसाठी उपलब्ध झाले.

श्रीसमर्थांनी भारतात ठिकठिकाणी मठ स्थापन केले होतेच. परंतु केवळ समाजामध्ये अध्यात्मिक प्रबोधन करणे हे त्या मठातील महंत व शिष्यांचे कार्य नव्हते. ते गुप्तहेर व निरोप्याचे कार्य बिनबोभाटपणे करीत असत. शिवरायांची गुप्तहेर यंत्रणा अतिशय प्रभावी होती. समर्थांचे सर्वत्र असलेले मठ ही त्यांची आश्रयस्थाने होती. स्वराज्यस्थापनेमध्ये गुप्तचर यंत्रणेचे मोलाचे कार्य या मठांनी केले.

श्रीसमर्थांचा सह्याद्रीच्या डोंगररांगा, दऱ्याखोऱ्यातून सतत संचार असे. त्यातील बारकावे त्यांना ज्ञात होते. शिवरायांना राज्यकारभाराबरोबरच गडकोटाच्या बांधणीतही काहीवेळा त्यांचे मोलाचे मार्गदर्शन होत असे. शिवरायांच्या लष्करी कारवायांमध्ये श्रीसमर्थांचा प्रत्यक्ष सहभाग नसला तरी काही प्रसंगी श्रीसमर्थांचे त्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन झालेले आहे.

शिवराय समर्थांना गुरूस्थानी मानीत असत. शिवरायांनी हिंदवी स्वराज्य स्थापन करून मराठी साम्राज्याचा पाया घातला. या काळामध्ये श्रीसमर्थांची भूमिका ही प्रमुख मार्गदर्शक (Mentor) अशी राहिलेली आहे. 'महाराष्ट्रधर्म राहिला तुम्हाकारणे' अशी श्रीसमर्थांनी शिवरायांच्या कर्तृत्वाची स्तुती केलेली आहे. परंतु शिवरायांच्या स्वराज्यस्थापनेच्या उत्तुंग कार्यासाठी लागणारी सामाजिक पार्श्वभूमी निर्माण करण्याचे मोठे कार्य समर्थांनी पार पाडलेले आहे. शिवरायांच्या मृत्यूनंतर स्वराज्य समूळ नष्ट करण्यासाठी मुघल बादशहा औरंगजेब स्वतः मोठे सैन्य घेऊन महाराष्ट्रात आला. परंतु कोणताही अनुभवी राजा गादीवर नसताना मराठी जनता सतत सत्तावीस वर्षे औरंगजेबाशी लढत राहिली व अंतिमतः त्याचा पूर्ण पराभव केला. मराठी जनतेने दिलेला हा लढा इतिहासात अभूतपूर्व आहे. समाजामध्ये ही वीरवृत्ती निर्माण करण्याचे श्रेय शिवराय व श्रीसमर्थ या गुरूशिष्य द्वयीला जाते.

- अजय गोविंद आपटे
स्वामी विवेकानंद मार्ग,
बिबवेवाडी, पुणे

• • •

ॐ

आर्त स्वराने । करितो धांवा
राम जिवीचा । एक विसावा ॥धृ.॥
अमर व्हावे । जन्मा येऊनि।
मोहपाश । टाकुनि दूरी ॥१॥
राम मित्रित । जीवन जगणे ।
तया सारिखे । चालणे बोलणे ॥२॥
एक विनवणी । माधव नाथा ।
सतत् कृपा करी । माधवदासा ॥३॥

- माधव दास

पसायदान

कल्याण करी रामराया । जनहित विवरी ॥धृ.॥
तळमळ तळमळ होतचि आहे । हे जन हातिं धरी ॥१॥
अपराधी जन चुकतचि गेले । तुझा तूचि सांवरी ॥२॥
कठिण त्यावरी कठिणचि जालें। आता न दिसे उरी ॥३॥
कोठें जावें काय करावें । आरंभिली बोहरी ॥४॥
दास म्हणे आम्ही केलें पावलों । दयेसि नाहीं सरी ॥५॥

श्रीसमर्थ रामदास स्वामींचा अखेरचा संदेश

माझी काया आणि वाणी ।
गेली म्हणाल अंतःकरणी ॥
परी मी आहे जगज्जिवनी ।
निरंतर ॥१॥

आत्माराम दासबोध ।
माझे स्वरूप स्वतःसिद्ध ।
असता ना करावा खेद ।
भक्तजनी ॥२॥

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥